

तमस

भीष्म साहनी

प्रस्तावना

भीष्म साहनी हे सामाजिक जाणिवेने लिखाण करणाऱ्या लेखकांच्या परंपरेतील कथाकार आहेत. ही परंपरा 'परीक्षा-गुरू' पासून सुरू होते आणि प्रेमचंद यांच्या कथा-साहित्यात अधिकाधिक सघन होते. सामाजिक जाणीव कलाकृतीला समाजोपयोगी करते एवढ्यापुरतीच ही गोष्ट मर्यादित नाही, तर ती कलाकृतीला खूपच आशयसघनता, गुंतागुंत आणि इतर अनेक परिमाणेही मिळवून देते. जाणिवेची आणि वास्तवाची जटिलता व बहुआयामिता तिला एकाच वेळी अधिकाधिक सघन आणि पारदर्शक करण्याचा प्रयत्न करतात. प्रेमचंद यांनी बाह्यविश्व आणि मनोविश्व यांच्या वास्तवांना परस्परांत विलीन करून सृजनशील साहित्याची निर्मिती केल्यामुळे ते अत्यंत विश्वसनीय व प्रामाणिक वाटते. आपल्या सभोवारच्या जिवंत विश्वातूनच जन्म घेतल्यामुळे ते साहित्य प्रभावी झालेले आहे. प्रत्येकाला त्यात आपल्या आयुष्याचेच दर्शन होत राहते. प्रत्येक जण त्यात आपली सुखदुःखे, आशाआकांक्षा, आपल्या समस्या आणि संघर्ष, आपली क्षुद्रता आणि महानता पाहू शकतो. प्रेमचंद यांच्या साहित्याचा स्तर वैश्विक आहे की नाही, त्याचे कलात्मक रूप उच्चतर दर्जाचे आहे की नाही हे प्रश्न फारसे महत्त्वाचे नाहीत; तर खरा प्रश्न ते आपले साहित्य आहे की नाही हा आहे; आणि ते आमचे स्वतःचे साहित्य आहे हे निःसंशयपणे सांगता येते. त्याचे कलात्मक सौंदर्य त्यातील कलाकुसरीवर अवलंबून नसून व्यापक आणि गुंतागुंतीचे वास्तव सहजपणे मूर्त करण्यावरच अवलंबून आहे. ती संरचना एखाद्या गहन अरण्यासारखी आहे. काटून-छाटून व्यवस्थित केलेल्या छोट्याशा उद्यानाची ती प्रतिकृती नाही.

प्रेमचंदांची ही जाणीव-परंपरा त्यांच्यानंतरही गतिशील राहिली. मनोवैज्ञानिक म्हणून संबोधिलेल्या गेलेल्या कलात्मक कादंबऱ्यांच्या महत्त्वपूर्ण उपस्थितीतही प्रेमचंद यांच्या सामाजिक जाणिवेचा प्रवाह आपल्या सामर्थ्यानिशी वाहतच राहिला. यशपाल, अश्क, अमृतलाल नागर, अमृतराय, भगवतीचरण वर्मा, भैरवप्रसाद गुप्त इत्यादी लेखक आपल्याआपल्या सामर्थ्यानुसार आणि दृष्टीनुसार सामाजिक वास्तवातूनच आपले साहित्य निर्माण करीत राहिले, आणि वाचकांना

आपल्या काळासोबत जोडत राहिले. स्वातंत्र्योत्तर काळात लिहिल्या गेलेल्या ग्रामीण कादंबऱ्यांतून खेड्यातील जनसमूहांच्या सर्वंकष आयुष्याला प्रतिमाविश्वाच्या रूपात व्यक्त करून भारतीय गावांच्या जटिल वास्तवाला ते अभिव्यक्त आणि मूर्त करू लागले. सोबतच काही सामाजिक जाणिवेचे कथाकार शहरातील सामाजिक जीवनाचाच प्रामाणिक आणि कलात्मक दस्तऐवजही प्रस्तुत करू लागले. सामाजिक जीवन आपल्या तमाम त्रुटींशिवायही आपल्या अस्तित्वाखातर काही मूलभूत मानवी आधारांची अपेक्षा करीत असते. म्हणून सामाजिक जाणिवेचे कथाकार किंवा समग्र कलावंत आपल्या वास्तव-चित्रणाचे मिश्रण एखाद्या मानवी बिंदूवरच करीत असतात. अशावेळी ते स्वीकारात्मक रूपात आहे किंवा निषेधात्मक रूपात आहे हे गौण असते.

भीष्म साहनी हे प्रेमचंद-परंपरेतीलच एक महत्त्वपूर्ण लेखक आहेत आणि 'तमस' ही याच परंपरेतील महत्त्वपूर्ण कलाकृती आहे. 'तमस' भीष्म साहनींची तिसरी कादंबरी आहे. 'झरोखे' आणि 'कडियाँ' या त्यांच्या यापूर्वीच्या कादंबऱ्या. दोन्ही कादंबऱ्या सामाजिक वास्तव आणि मनोवैज्ञानिक वास्तव यांच्या परस्परमीलनातून फारच सहजतेने उमलणाऱ्या कादंबऱ्या आहेत. लेखक मानसिक सत्याला सामाजिक वास्तवाच्या ओझ्याखालीच ओळखतो आहे आणि सामाजिक वास्तवाला मानसिकतेचे एक स्पंदन प्रदान करतो आहे असेही म्हणता येऊ शकेल. म्हणूनच भीष्म साहनी यांच्या कथासाहित्यात दोन्ही गोष्टींचा सहभाग फार सहजपणे केंद्रित होतो. ते सामाजिक वास्तवाच्या विराटतेमागे पळत नाहीत की मानसिक सत्यांच्या जाळ्यात वाचकांना अडकवून टाकत नाहीत. उलट दोन्ही गोष्टींच्या परस्पर-दबावातून निर्माण होणाऱ्या कथावस्तूच त्यांच्या साहित्यकृतीच्या अंतर्वस्तू होतात. 'झरोखे'मध्ये एका मुलाचे मनोविश्व आणि त्याच्या कुटुंबात घडणाऱ्या घटनांचा आंतरिक तणाव आहे. 'कडियाँ'मध्ये जुन्या आणि नव्या संस्कारांचे द्वंद्व चित्रित केलेले आहे. लेखकाने एका बाजूला प्रमिला नावाच्या स्त्रीला सामाजिक वातावरणामुळे मिळालेले संस्कार, त्याचे भयावह परिणाम आणि आर्थिक असहाय्यतेमुळे निर्माण झालेले लाचारीचे क्षण, यातना आणि विटंबनेचे चित्र रेखाटलेले आहे, तर दुसरीकडे तिच्या अंतरंगातून उफाळून येणारी, स्वावलंबी होण्यासाठी संघर्ष करणारी एक नवी स्त्री निर्माण केलेली आहे.

'तमस' चे जग या दोन्ही कादंबऱ्यांपेक्षा वेगळे आहे आणि मोठेही आहे. या कादंबरीत लेखक काळाच्या संदर्भात थोडासा मागे परतलेला आहे, म्हणजे त्याने स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीचा काही काळ निवडलेला आहे. आणि त्या काळाच्या गर्भातील खळबळत्या जातीय भीषणतेची, त्याच्या सोबतच्या आणि नंतरच्या प्रभावांच्या

जटिल दुनियेची ओळख करून दिलेली आहे. इंग्रजांनी आपली सत्ता अबाधित राखण्यासाठी हिंदू आणि मुसलमानांमधे फूट पाडण्याचे कटकारस्थान केलेले होते. या ऐतिहासिक सत्याला इथे लेखकाने फारच स्पष्ट व गुंतागुंतीचे सृजनात्मक रूप दिलेले आहे. इंग्रज लोभ आणि भय अशा दोन्ही गोष्टींनी देशातील ऐक्य खंडित करीत होते, आणि हा देश सोडण्याचा प्रसंग आला, तेव्हाही त्यांनी आपले हे कारस्थान थांबवले नाहीच. उलट आपल्या या कुटिल कारस्थानाला अधिकच गतिशील करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या कारस्थानाचा एक भाग म्हणजे, काँग्रेसला हिंदूंची संस्था मानण्यात येऊ लागले आणि जीनांच्या नेतृत्वाखाली मुसलमानांसाठी 'पाकिस्तान' नावाच्या एका स्वतंत्र राष्ट्राची मागणी करण्यात येऊ लागली. हिंदुस्थानातून पाकिस्तान निर्माण होणे ही काही सरळ स्वाभाविक घटना नाही. तिच्यात हिंदू आणि मुसलमानांना परस्परांबद्दल वाटणारा संशय, घृणा, मारामारी-कापाकापी आणि असंख्य अमानवी कृत्यांची कहाणी लपलेली आहे. त्यांनी आपल्या निघून जाण्यानंतरही इथे एक जातीय आग आणि मानवी यातनाकांड मागे ठेवलेले आहे. अजूनही राहून-राहून त्या आगीच्या विषारी ज्वालांचा धूर आणि असहाय्य किंकाळ्या वातावरणात पसरत जातात. इंग्रजांच्या या ऐतिहासिक अमानवी कटाचे हत्यार बनणारी माणसे आपल्या देशातील काही धर्मांध, अडाणी आणि लोभी लोक होते. हे मूठभर लोक गर्दीत दगड फेकून लपून बसत असत, आणि मग गर्दीतले लोक परस्परांवर संशय व्यक्त करीत, अविश्वास दाखवीत लढू लागत असत. रक्तबंबाळ होत असत.

'तमस'मध्ये याच समस्येशी संबंधित असलेली पात्रे आहेत, संदर्भ आहेत, घटना आहे आणि वातावरण आहे. या कादंबरीत साधेपणा, सरळ, सोपेपणा तर आहे पण तो निव्वळ एकसुरी नाही, त्यात कंटाळवाणेपणा नाही, ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. लेखकाने सरलीकरणाच्या पद्धतीने आपल्या पात्रांचे वर्गीकरण केलेले नाही. ती पात्रे आपल्या साध्या सोपेपणाच्या आतही जटिल आहेत. बहुतेक सर्वांमध्येच अंतर्विरोधांचा तणाव आहे, आणि तोच अधिक विश्वसनीय आणि जिवंत करतो.

ही कादंबरी मुळात राजकीय जाणिवेची कादंबरी आहे. पण ती स्वतःला राजकीय घटनांमध्ये आणि कार्यपद्धतीत सीमित करून घेत नाही. ती राजकीय विसंगतीतून निर्माण होणाऱ्या सामाजिक भयावहतेपर्यंत पसरत जाते. ती सामाजिक व धार्मिक संबंध तुटण्याच्या, संघर्ष करण्याच्या आणि मूलभूत मानवतेला रक्तबंबाळ करण्याच्या अनुभवापर्यंत जाते. ढोबळमानाने जीनांच्या योग्यायोग्य विचारांमुळे काँग्रेस हिंदूंची संस्था समजण्यात, आणि मुस्लिम लीग

मुसलमानांची मार्गदर्शक संस्था म्हणून साकार होण्यात विकसित होत जाते, एवढीच ही गोष्ट आहे. हिंदुंच्या एका वेगळ्या संस्थेचाही उदय होऊ लागला होता. वानप्रस्थीजींचे भाषण या नव्या निर्मितीला उत्तेजन देणारे असते. मुरादअली नत्थूकडून डुक्कर मारून मशिदीसमोर फेकून देण्याचे काम करवून घेत असतो. मग काय, हळूहळू वातावरणात एक जातीय तणाव निर्माण होऊ लागतो, आणि अफवांचे भरमसाट पीक येत जाते. कुठल्याही सत्यस्थितीचा अभाव असतानाही हिंदू आणि मुसलमान परस्परांबाबत संशय आणि भयाने ग्रस्त होऊ लागतात. काँग्रेस, मुस्लिम लीग, हिंदू संस्थेचे अनेक लोक मिळून डेप्युटी कमिशनर रिचर्ड यास भेटावयास जातात आणि त्याला निवेदन देतात की या वेळी त्याने काहीतरी उपाययोजना करावी. नाहीतर शहरात उपद्रवग्रस्त स्थिती निर्माण होईल. रिचर्ड सुरुवातीला तर म्हणतो की "हा तुम्हा लोकांचा धार्मिक मामला आहे, मी यात काय करू शकणार आहे?" मग त्याच्यावर दबाव टाकल्यानंतर "सरकारला जे काही करता येण्यासारखं आहे ते सरकार अवश्य करील," असे गोलमाल उत्तर देतो. लोक निराश होऊन परततात. दंगल पेटत जाते. कापाकापी होते. दंगा शहरातून आजूबाजूच्या खेड्यांमध्ये, गावागावांत पसरत जातो, आणि शतकांपासून बंधुभावाने एकत्र रहात आलेले शीख आणि मुसलमान तोडफोड, मारामारी करून परस्परांना उध्वस्त करून टाकण्याचा प्रयत्न करतात. शेवटी सरकार त्या गावांवरून एक विमान उडवते आणि विमान बघताच गावागावांत माजलेली दंगल शांत होते. मग शहरातही एक शांतता कमिटी स्थापन होते आणि रिचर्डला बढतीवर बदली होत असल्याची बातमी कळते.

या कादंबरीला लेखकाने अनेक आंतरिक आणि बाह्य परिमाणे दिलेली आहेत आणि त्यांना ताणून व परस्परांत विलीन करून एका सघन कथानकाचे विश्व निर्माण केलेले आहे. या कथेचा एक महत्त्वपूर्ण बिंदू रिचर्ड आहे. तो सत्तेचा प्रतिनिधीच आहे. सत्तेचे प्रतिनिधी तर बव्हंशी इंग्रजच होते, पण तो एक विशेष प्रकारच्या इंग्रजांचे प्रतीक आहे. रिचर्डला भारतीय इतिहासाबद्दल प्रेम आहे. त्याला भारतीय समाजाबद्दल आणि इतिहासाबद्दल खूप काही जाणून घेण्याची इच्छा आहे. तो सतत त्याचा शोध घेण्यात रमलेला असतो. त्याच्या या शोधवृत्तीमुळे त्याची पत्नी लीझा कंटाळून जाते. ती एकदा अशीच कंटाळून इंग्लंडला परत गेलेली असते. मग पुन्हा परत येते. लीझाला वाटते की "याच्यात (रिचर्डमधे) मुलांसारखे कुतूहल आहे, डेप्युडी कमिशनर असूनही एक प्रकारचे भोळेपण आहे." तो साधारणतः फार चांगला माणूस आहे, त्याच्या कर्मचाऱ्यांशी त्याची वर्तणूक चांगली आहे, पण काहीही झाले तरी तो शेवटी शासकच आहे. शहरातल्या दंगलीची बातमी कळल्यानंतर लीझा विचारते, "मग तू काय करणार आहेस रिचर्ड?" "मी काय करायला पाहिजे, लीझा? मी शासन करीन, अजून काय करणार?" भारताबद्दल प्रेम असणाऱ्या रिचर्डचे प्रेम असे पुस्तकी आहे, वरवरचे आहे. इथल्या हिंदू-मुसलमानांनी आपापसात झगडत राहावे, म्हणजे शासन नीटपणे चालत राहील , अशीच रिचर्डची मनोमन इच्छा आहे. लीझा विचारते, "तुला तर काही धोका नाही ना रिचर्ड?" तेव्हा तो उत्तर देतो, "नाही, लीझा ! जर प्रजा आपापसात झगडत-लढत असेल तर शासकाला कशाचा धोका असणार?" त्याला हे नीटपणे माहीत असते की राज्य करणारे प्रजेत कोणती समानता असते हे बघत नसतात. राज्य करणाऱ्यांना नेहमी प्रजेत कोणकोणती भिन्न तत्त्वे आहेत यातच रस घेणे आवश्यक असते. भारत-प्रेम आणि भारतीय इतिहासाची थोरवी मिरवणाऱ्या रिचर्डला राज्य करणाऱ्या व्यक्तीचे सगळे गुण माहीत असणे आणि त्यांचा वापर करणेच महत्त्वाचे वाटते. त्याची प्रशासकीय प्रच्छन्नता त्याच्या वास्तविक चांगुलपणाशी विरोध प्रस्थापित करून जास्तच विसंगत आणि विडंबनामय होत जाते. लेखकाने त्याचे व्यक्तिगत आणि वर्गीय व्यक्तिमत्त्व ताणून नुसतेच जटिल चरित्र निर्माण केलेले नाही; तर जनतेवरील त्याच्या प्रभावालाही जटिल केलेले आहे.

लेखकाने काँग्रेस, मुस्लिम लीग, हिंदू संस्था आणि कम्युनिस्ट पार्टीच्या अंतरंगातील संगती-विसंगतीही स्पष्ट केलेल्या आहेत. काँग्रेसचे स्थानिक नेते बक्षीजी आहेत. ते काही लोकांना घेऊन प्रभातफेरी काढत असतात. त्यांच्या दलात विविध स्वभावांचे, व्यवसायांचे, आणि स्वार्थ असलेले लोक असतात. ते परस्परांशी भांडत असतात, तरीही एकत्र मिळून मिसळून प्रभातफेरी काढत असतात आणि पक्षीय कार्यक्रमही यांत्रिकतेने निभावून नेत असतात. त्यांच्यात वेडसर असा एक जरनेल सिंह आहे. तो सत्याशी समर्पित आहे. कुठेही आचपेच न ठेवता तो सत्य तेच बोलत असतो, सत्य जगत असतो, आणि सत्यासाठीच प्राण देत असतो. कम्युनिस्ट पार्टीच्या नवतरुणांना लेखकाने खऱ्या अर्थाने हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी प्रयत्नशील असलेले दाखवले आहे. या उन्मादपूर्ण वातावरणात कुणीही त्यांचे ऐकत नाही, आणि सत्यासाठी त्यांचा दुःखद अंत होतो. मुस्लिम-लीगचे आणि हिंदू संस्थेचे जातीयवादी रूपही इथे उघड करण्यात आलेले आहे. ते लोकही संशयाने आणि भयाने त्रस्त होऊनच एकमेकांसमोर लढण्याची तयारी करीत असतात, म्हणजे त्यांच्या परस्परांतील तणावामागेही इथे एक तर्क आहे. लेखकाने त्यांना अकारण उन्मादित झालेले दाखवले नाही, तर त्यांच्या तणावाचे कारणही परस्परांबद्दलचे भयच आहे. जिथे कम्युनिस्ट पार्टी क्रियाशील स्तरावर आणि काँग्रेस पार्टी भावनिक स्तरावर ही भयग्रस्तता दूर करून त्यांच्यात मनोमीलन निर्माण

करण्याचा प्रयत्न करीत असते तिथे हे दोन्ही धार्मिक पक्ष भीतीमुळे संघर्षांकडे आणि विश्लेषणाकडे जात असतात.

लेखकाने त्या काळच्या जातीयतेच्या भयावह घटनेकडे आणि तिच्या क्रूर, अमानवी परिणामांच्या वास्तवाकडे कलावंताच्या निस्संगदृष्टीने पाहिले आहे आणि चित्रित केले आहे. पण लेखकामधील मानवी दृष्टीने या भयंकर अराजकतेनंतर आणि रक्तपिपासू कोलाहलानंतरही मानवी अस्तित्वाकडे पाहिलेले आहे, मानवतेचे स्पंदन ऐकलेले आहे-एका वर्गाच्या आत असलेली आणि व्यक्तीच्या आतही असलेली स्पंदने ऐकली आहेत. नत्थू नकळतच डुक्कर मारतो; पण दंगलीच्या काळात तो एका भयंकर अपराधभावनेच्या यातनेतून जात असतो. एक मानवी पीडा त्याला कायम सलत असते. जेव्हा एकाच गावातील निवासी परस्परांशी लढत असतात, बहुसंख्याक आपल्या सुखदुःखांशी जोडल्या गेलेल्या अल्पसंख्याकांचा संहार करीत असतात तेव्हा काही अनोळखी लोक आसराही देत असतात. हरनामसिंहला आणि बंतोला त्यांच्या गावातून पळून जाण्यासाठी भाग पाडले जाते, त्यांची दुकाने जाळून टाकण्यात येतात. तरीही आपल्या लीगवाल्या मुलाची भीती असतानाही राजो त्यांना सहारा देते, त्यांचे रक्षण करते अणि चोरून त्यांना पुढे जाण्यासाठी मदत करते. असे अनेक प्रसंग आणि व्यक्ती इथे आहेत. शहानवाझही असाच आपल्या हिंदू मित्राचे रक्षण करणारा मुसलमान आहे. लाला लक्ष्मीनारायण आणि शेख नूरइलाही कडवे हिंदू-मुसलमान असतात, पण त्यांच्यात अभिन्न मैत्रीही असते. शेवटी शांतता प्रस्थापित करण्याच्या सभेच्या ठिकाणी त्यांच्यात चेष्टा-विनोद चाललेला असतो. त्यांना इतक्या प्रेमाने भेटताना पाहून बाजूला उभा असलेला सरदार मोहनसिंह आपल्या मित्राला म्हणतो, "आपल्या सर्वांना इथंच राह्यचं आहे डोक्यात पागलपण स्वार झालं तरीही खरी गोष्ट एवढीच आहे की शेवटी आपल्या सगळ्यांना इथंच राह्यचं आहे." हाच मूलभूत ऐक्याचा आधार आहे. मरून-नष्ट होऊनही, रक्तबंबाळ होऊनही शेवटी आपल्याला परस्परांसोबत राह्यचेच आहे. हे आपल्या सर्वांच्या अस्मितेसाठी, अंतर्बाह्य आरोग्यासाठी आवश्यक आहे. दंगलीनंतर जेव्हा शहरात निर्वासित येतात आणि आपापली करुण कहाणी सांगत असतात तेव्हा जातीयतेच्या घटनांचे एक भीषण भयावह अरण्य उगवून येते. या अरण्याची जाणीव करून देत असतानाही लेखक काही मानवी संवेदनांचे बिंदू प्रकर्षाने उभे करतो आणि काही नव्या परिस्थितीमुळे उद्भवलेल्या नव्या जाणिवांकडे इशारा करतो. लेखक साम्यवादी आहे, साम्यवादी प्रचाराचा भाग तो कुठेही आणत नाही. वस्तुस्थितीची नवी जाण, नव्या चेतनेच्या रेखांकनातून आणि मानवी मूल्यांच्या बाजूने उभे राहण्यातूनच लेखकाची

साम्यवादी दृष्टी अभिव्यक्त झालेली आहे. वस्तुस्थितीच्या योग्य आकलनाचा एक बिंदू शहर आणि खेड्यांच्या संबंधाची ओळख हा आहे. दंगल सुरू होते शहरात, पण सर्वात जास्त गावेच घायाळ होतात. कामगारांमध्ये आणि शेतकऱ्यांमध्ये रोजी-रोटीची, कामा-मोबदल्याची एकता आहे. मग ते कुठल्याही जातीधर्माचे असोत. पण ही भीषण दुर्घटना इतकी व्यापक असते की त्यात ही रोजी-रोटीची एकताही पार कोलमडून जाते. शहरे पाप करतात, आणि त्याची फळे मात्र गावांना-खेड्यांना भोगावी लागतात.

सुरुवातीलाच असे नमूद केलेले आहे की ही एक राजकीय कादंबरी आहे. पण राजकारणाच्या या विणीत लेखक शक्य असतील तेवढे सामाजिक वास्तवाचे पदरही उघडत जातो. तो मनाच्या आतही घुसतो, मात्र त्यासाठी या कथानकात फारशी जागा नाही. म्हणूनच ही कादंबरी मनोविश्लेषणात्मक कादंबऱ्यांसारखा प्रभाव निर्माण करीत नाही. ही कादंबरी आपल्या सद्यःकालीन सामाजिक जीवनाला केंद्रभागी ठेवून त्या जीवनाचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि मनोवैज्ञानिक वास्तवाचे जटिल पापुद्रे सुटे करत जाते, आणि निरंतर जगत असलेल्या आयुष्याचा सखोल परिचय करून देते, तरीही ही कादंबरी ज्या कथावस्तूशी निगडित आहे तिचे अतिशय कौशल्याने चित्रण करते, आणि त्या जगाची सखोल जाणीव करून देण्यात कमालीची यशस्वी होते.

भीष्मजी अस्सल कथाकार आहेत. कथानकाची रचना, भाषा इत्यादी गोष्टींत ते काव्यात्मक उपकरणांचा वापर करीत नाहीत. त्यांच्या कथेत काव्यात्म प्रतिमासृष्टी सापडणे कठिण आहे. पण ते त्यांची कथा अत्यंत कुशलतेने अभिव्यक्त करीत असतात. त्यात एक विलक्षण सहजता आणि साधेपणा असतो. कथानक व्यवस्थितपणे बांधलेले असते, आणि एका विशिष्ट गद्यात्मक पद्धतीनेच जागोजागी मानवी मनातील गुंतागुंतीला, आणि घटनाप्रधान किंवा परिस्थितिजन्य नाटकीयतेला ते सहजपणे अभिव्यक्त करीत जातात. 'तमस' मध्येही ही वैशिष्ट्ये दिसून येतात.

-रामदरश मिश्र

भाग पहिला

1

कोनाड्यात ठेवलेली दिव्याची ज्योत पुन्हा एकदा थरथरली. वर, छताजवळच्या भिंतीवरील दोन विटा निघाल्या होत्या. ज्या ज्या वेळी तिथून हवेचा झोत यायचा, दिव्याची ज्योत थरथरायची आणि खोलीतल्या भिंतीवर सावल्या हलू लागायच्या. थोड्या वेळानं ज्योत आपोआप सरळ व्हायची आणि तिच्यातून वर येणारी धुराची लकेर कोनाड्याला चाटून पुन्हा वरच्या बाजूसमोर सरळ व्हायची. नत्थूचा श्वास भात्यासारखा वेगाने होत होता. त्याला वाटत होतं, जणू त्याच्या श्वासामुळेच दिव्याची ज्योत हेलकावत आहे.

नत्थू भिंतीला टेकून बसला होता. त्याची नजर पुन्हा डुकरावर गेली. डुक्कर पुन्हा चीं चीं करू लागलं होतं आणि एव्हाना खोलीच्या मध्यभागी कचऱ्यातलं कसलं तरी चिकट टरफल चघळू लागलं होतं. त्याने आपले बारीक डोळे फरशीवर रोखून आपलं लांबोडं गुलाबी थोबाड टरफलात रुतवलेलं होतं. सुमारे दोन तासांपासून नत्थू या घाणेरड्या रंगाच्या काटेरी डुकराशी झुंजत होता. तीनदा डुकराच्या गुलाबी थोबाडानं त्याच्या टांगा 'चाटलेल्या' होत्या. त्यामुळे त्यात जोरदार ठणक लागलेली होती. फरशीवर डोळे गाडलेलं डुक्कर काहीतरी धुंडाळत चाललं आहे अशा थाटानं कधी भिंतीला खेटून चालत जायचं, मग मध्येच एकाएकी चीं चीं करीत जोरात पळू लागायचं. त्याचं छोटंसं शेपूट विषारी गाठीसारखं त्याच्या पाठीवर हलत रहायचं. कधी त्याचा आकार अंगठीसारखा गोल व्हायचा, आता त्याला गाठ बसेल असं वाटायचं, पण मग ते आपोआप सरळ होऊन जायचं. डुकराच्या डाव्या डोळ्यातली घाण ओघळून थोबाडापर्यंत आली होती. ते चालायचं तेव्हा त्याच्या अवजड पोटामुळे ते उजव्या आणि डाव्या बाजूला झुलत-झुलत चालल्यासारखं वाटायचं. अनेकदा पळत गेल्यामुळं सगळा कचरा खोलीभर उधळलेला होता. खोलीत भयंकर उकाडा होता. कचऱ्याच्या विखारी वासानं, डुकराच्या धपापत्या श्वासानं आणि तेलाच्या कडवट धुरानं खोली भरून गेलेली होती. फरशीवर जागोजागी रक्ताचे डाग पडलेले होते, पण निव्वळ नावाला म्हणूनसुद्धा डुकराच्या शरीरावर एकही जखम

दिसून येत नव्हती. दोन तासांपासून नत्थू जणू पाण्यात किंवा वाळूच्या ढिगाऱ्यात सुरा घुसवत होता. कितीदा तरी त्यानं डुकराच्या पोटात आणि खांद्यावर सुरा भोसकला होता. सुरा उपसला की थोडेसे रक्ताचे थेंब फरशीवर पडत. पण जखमेच्या जागी मात्र एखादं छोटंसं भोक किंवा छोटासा डागच शिल्लक रहायचा, आणि तोही डुकराच्या कातडीत दिसेनासा व्हायचा. डुक्कर गुरगुरत आपल्या थोबाडानं नत्थूच्या टांगांवर नेम धरायचं किंवा मग पुन्हा भिंतीला खेटून चालू लागायचं, वा पळत सुटायचं. सुऱ्याचं टोक चरबीच्या तळापर्यंत कापत जाऊन परत यायचं, पण आतड्यापर्यंत काही पोहोचू शकायचं नाही.

मारायला मिळालं तेही असं मनहूस डुक्कर. जाडं-भरडं. इतकं अगडबंब पोट, पाठीवरचे घट्ट काळे केस. थोबाडाजवळचे अणकुचीदार सालिंदराच्या केसासारखे पांढरे केस.

डुकराला मारायचं असेल तर त्याच्यावर उकळतं पाणी टाकायचं असतं. असं त्यानं कुठेतरी ऐकलं होतं. पण नत्थूजवळ उकळतं पाणी कुठून असणार. मागं एकदा चामडी साफ करताना डुकराच्या चरबीची गोष्ट निघाली होती. मग त्याचा सोबती असलेल्या भिकू चांभारानं सांगितलं होतं, "डुकराची मागची टांग पकडून त्याला पालथं करावं. डुक्कर असं पडलं की उठूच शकत नाही. मग नीट त्याच्या गळ्याजवळची नस कापावी. डुक्कर पटकन् मरतं." नत्थूनं या सगळ्या युक्त्या करून पाहिल्या होत्या. पण एकाही युक्तीचा उपयोग झाला नव्हता. उलट, त्याच्या टांगांना आणि घोट्याला जखमा झाल्या होत्या. कातडी साफ करणं वेगळं आणि डुकराला मारणं वेगळं. कसल्या वाईट मुहूर्तावर त्यानं हे काम आपल्या डोक्यावर घेतलं होतं कुणास ठाऊक. जर इसाराचे पैसे घेतले नसते तर नत्थूनं कधीच डुकराला खोलीबाहेर ढकलून हुसकून लावलं असतं.

"आपला गुरांचा डॉक्टरय् ना, त्याला एक मेलेलं डुक्कर पायजेय्, डॉक्टरकीच्या कामाला," जेव्हा नत्थू कातडी साफ करून नळावर हातपाय धूत होता, त्यावेळी मुरादअलीनं नत्थूला सांगितलं होतं.

"डुक्कर? म्हंजी करायचंय् काय, मालक?" हैराण होऊन नत्थूनं विचारलं होतं.

"काही नाही. इकडं डुक्करवाड्यातील डुकरं फार हिंडत असतात. त्यातलंच एक इथं खोलीत ढकलून आत घाल, आणि ते कापून टाक."

नत्थूनं डोळे उंचावून मुरादअलीच्या चेहऱ्याकडे पाहिलं. "मालक, आमी तं कधीच डुक्कर मारलं न्हाई बगा. डुक्कर मारणं लईच अवघड कामय् असं म्हन्त्यात. आपल्याला तं काई जमायचं नाही मालक ते. कातडं-बितडं सोलायचं असलं तं ते देऊ करून. मारायचं काम डुक्करवाड्यातले लोकच करू जाने!"

"त्या लोकांकडून करायचं असतं तर तुला कशाला सांगितलं असतं. हे काम तुलाच करायचंय्." आणि मुरादअलीनं पाच रुपयांची करकरीत नोट खिशातून काढून नत्थूच्या जोडलेल्या हातांच्या मागे असलेल्या खिशात कोंबली होती.

"तुझ्यासाठी हे काही फार मोठं काम नाहीये. गुरांच्या डॉक्टरनं सांगितलंय तर आम्ही तरी नाही कसं म्हणणार!" मग मुरादअलीनं बेपर्वाईनं आणि टेचात सांगितलं, "तिकडं स्मशानाच्या पलीकडं पिगरीची डुकरं हिंडत असतात. एकाला पकडून आण. गुरांचे डॉक्टर मग स्वतःच पिगरीवाल्यांशी बोलतील."

नत्थूनं काही सांगायच्या आतच मुरादअली निघालाही होता. आपली बारीक छडी हळूहळू पायावर मारत तो सांगू लागला, "आज रात्रीच हे काम करून टाक. पहाटे-पहाटेच जमादार गाडी घेऊन येईल, तिच्यात ते डुक्कर टाकून दे. विसरू नकोस. तो स्वतःच ते डॉक्टरच्या घरी पोचवील. मी सांगेन त्याला तसं. कळलं?"

नत्थूचे हात अजूनही जोडलेलेच होते, पण पाचाची करकरीत नोट खिशात पडल्यामुळे त्याच्या तोंडातून शब्दच फुटत नव्हता.

"हा मुसलमानी इलाखाय्. एखाद्या मुसलमानानं पाहिलं तर लोक बिघडायचे. लक्षात ठेव. आम्हाला पण हे फारच वाईट काम वाटतंय्, पण करायचं काय, साहेबांचा हुकूमय्, मोडायचा कसा?" आणि मुरादअली पायांवर छडी वाजवत वाजवत तिथून निघून गेला.

मुरादअलीशी रोजचंच काम पडायचं, मग नत्थू तरी नाही कसं म्हणणार? जेव्हा केव्हा गावात एखादं घोडं मरायचं, गाय किंवा म्हैस मरायची तेव्हा मुरादअली नत्थूला चामडं मिळवून द्यायचा; रुपया-आठ आणे मुरादअलीला पण द्यावे लागायचे, पण चामडं तर मिळायचं. मुरादअली मोठा रक्षणकर्ता होता, कमेटीचा कारभारी असल्यामुळे लहान-थोर सगळ्यांनाच त्याच्याशी काम पडायचं.

शहरातला एकही रस्ता असा नव्हता की ज्याच्या मध्यभागातून मुरादअलीला चालत जाताना लोकांनी पाहिलं नव्हतं. पातळ वेताची छडी हलवत हलवत चालणारा ठेंगणा, काळा मुरादअली जागोजागी हिंडत असे. शहरातल्या कुठल्याही गल्लीत कुठल्याही सडकेवर कुठल्याही वेळी तो प्रकट होत असे. सापासारखे बारीक तीक्ष्ण डोळे, काटेदार मिश्या, गुडघ्यापर्यंतचा लांब खाकी कोट, सलवार आणि डोक्यावरची पगडी असं सगळंच त्याला शोभून दिसायचं. हे सगळं मिळूनच मुरादअलीचं स्वतःचं असं खास चित्र तयार होत असे. हातातली वेताची छडी नसती, डोक्यावर पगडी नसती किंवा त्याचं शरीर ठेंगणं नसतं तर त्याचं चित्र अधुरंच राहिलं असतं.

मुरादअली हुकूम सोडून निघून गेला खरा, पण नत्थूचा जीव मात्र भलताच

त्रासात अडकला. डुक्कर आणायचं कुठून आणि ते कापायचं तरी कसं! शहराबाहेर सरळ पिगरीत जावं आणि त्या लोकांनाच एक डुक्कर कापून गुरांच्या डॉक्टरकडे पाठवून द्यायला सांगावं असं एकदा नत्थूला वाटलं. पण त्याचे पाय पिगरीच्या दिशेनं वळले मात्र नाहीत.

डुकराला खोलीत आणणं तरी काय सोपं काम होतं? त्यानं हिंडणाऱ्या डुकरांना कचऱ्याच्या एका ढिगाऱ्यातून तोंड खुपसताना पाहिलं होतं. त्याला काहीच सुचलं नाही. तो कचऱ्याच्या एका ढिगाऱ्यातून भरगच्च कचरा आणीत राहिला आणि या तोडक्यामोडक्या खोलीच्या बाहेर अंगणात, दरवाज्याजवळ ढीग रचीत गेला. संध्याकाळच्या सावल्या लांबत चालल्या तेव्हा घाणेरड्या पाण्याची डबकी आणि शेणाचे ढीग साचलेल्या झाडीजवळ हिंडत हिंडत तीन डुकरं बाहेर आली. त्यातलंच एक डुक्कर कचऱ्याचा वास घेत, हुंगत अंगणात आलं होतं. नत्थूनं झटकन् दारं बंद करून त्या डुकराला आत घेतलं. मग पटकन् पळत जाऊन अंगणातलं पलीकडचं दार उघडलं आणि हातातल्या काठीनं हाकत-हाकत डुकराला खोलीच्या आत ढकललं. डुक्करवाड्यातला माणूस डुकराला शोधत शोधत इकडे येईल आणि डुकराचा चीं चीं आवाज ऐकेल या भीतीनं नत्थू पुन्हा कचरा भरून खोलीत नेऊन टाकू लागला. खोलीत कचरा जमा होऊ लागला तसं डुक्कर त्यातच हरवून गेलं. नत्थू निवांत होऊन बराच वेळ खोलीच्या बाहेर बसून बिड्या फुंकीत होता, आणि अंधार पडायची वाट बघत होता. बऱ्याच वेळानं म्हणजे रात्र गडद होऊ लागली तेव्हा नत्थू खोलीत शिरला. सगळ्या खोलीभर कचरा पसरलेला आहे आणि त्यातून चिखलासारखा सडका वास येऊ लागलेला आहे. हे दिव्याच्या मंद नाचऱ्या प्रकाशात त्याला दिसलं. त्याच वेळी त्या बोजड आणि कुरूप चेहऱ्याच्या डुकराला पाहून त्याचं मन विषण्ण झालं होतं, आणि मनातल्या मनात तो चिडून पश्चात्ताप करू लागला होता. उगीचच त्यानं हे जोखीम असलेलं घाणेरडं काम अंगावर घेतलेलं होतं. पटकन् खोलीचा दरवाजा उघडावा आणि डुकराला बाहेर हाकलून द्यावं, असंही त्याच्या मनात येऊन गेलं.

एव्हाना रात्र अर्ध्याहून अधिक चढलेली होती आणि डुक्कर मस्तवालपणे कचऱ्याच्या मधोमध हिंडत होतं. फरशीवर जागोजाग रक्ताचे डाग पडलेले होते. डुकराच्या फुगीर पोटावर एक-दोन ठिकाणी खरचटल्याच्या खुणा दिसून येत होत्या. त्याच्या स्वतःच्या पायावरही डुकराच्या थोबाडानं जखमा केलेल्या होत्या एवढंच. डुक्कर पहिल्यासारखंच जिवंत, जितं-जागतं, असं खोलीत अस्तित्वात होतं. इकडं नत्थूचा श्वास जोरजोरात चाललेला होता. शरीर घामाघूम झालेलं होतं. या जंजाळातून सुखरूप बाहेर येण्याचा रस्ता नत्थूला दिसत नव्हता.

दूरवरच्या शेखांच्या बागेतल्या घंटेनं दोन वाजवले. नत्थू घाबरून उठून उभा राहिला. डुकरानं कचऱ्याच्या ऐन ढिगाऱ्यात मधोमध उभं राहून उभ्यानंच लघवी केली होती, आणि मग ते पश्चात्ताप झाल्यासारखं दूर जाऊन उजव्या हाताच्या भिंतीला खेटून चालू लागलं होतं. दिव्याची ज्योत पुन्हा हेलकावू लागलेली होती. एखाद्या भयाण दुःस्वप्नासारख्या सावल्या पुन्हा पुन्हा भिंतीवर हलू लागल्या होत्या. आधीच्या परिस्थितीत थोडासुद्धा बदल झालेला नव्हता. डुक्कर पहिल्यासारखंच डोकं खाली झुकवून लांबोड्या थोबाडानं कधी कचऱ्याचे तुकडे हुंगायला थांबायचं, कधी भिंतीला खेटून चालू लागायचं, आणि कधी किंचाळत, केकाटत भिंतीला खेटूनच पळत सुटायचं. त्याच्या पातळ शेपटाची पहिल्यासारखीच कृशकाय लांबट किड्यासारखी गोल गाठ मारली जायची आणि मग आपोआप उकलली जायची.

"असं नाही जमायचं." नत्थूनं दातओठ खाऊन म्हटलं, "ही काही माझ्या आवाक्यातली गोष्ट नाहीय. हे डुक्कर आज मला घेऊनच जाईल वाटतं."

डुकराची टांग मागनं ओढून घेऊन त्याला उलथं पाडायचा प्रयत्न करून बघावा, असं एकदा नत्थूला तीव्रपणे वाटलं. डाव्या हातातला सुरा उंचावून, एकेक पाऊल हळूहळू पुढं टाकीत तो खोलीच्या मध्यभागी आला. डुक्कर उजव्या बाजूच्या भिंतीच्या कोपऱ्यापर्यंत जाऊन डाव्या बाजूच्या भिंतीला खेटून चालू लागलं. नत्थू आपल्याकडेच येतोय हे पाहून दूर पळायच्या ऐवजी ते नत्थूकडेच येऊ लागलं. डुक्कर एकदा गुरगुरलं सुद्धा - पण अशा थाटात की जणू नत्थूवर झडपच घालायची आहे. नत्थू एकेक पाऊल उचलून मागं मागं सरकू लागला. त्याची नजर अजूनही डुकराच्या थोबाडावरच खिळलेली होती. आता डुक्कर ऐन त्याच्या समोरासमोर होतं. आणि त्याच्याकडेच येऊ लागलं होतं. या अवस्थेत त्याची मागची टांग पकडून त्याला मागे खेचणं आणि पाठीवर पाडणं अशक्यप्राय होतं. डुकराच्या बारीक बारीक लालबुंद डोळ्यात रक्त उतरलेलं होतं. ते काय करील नेम नाही. नत्थू बेहोष होऊ लागला होता. दोन वाजून गेले होते. जे काम त्याला काल संध्याकाळपासनं जमलेलं नव्हतं ते या अशा अवस्थेत पहाटेपूर्वीच उरकणं कसं शक्य होतं? कुठल्याही क्षणी जमादाराचा छकडा येऊ शकतो. आणि काम झालं नाही तर मुरादअलीचा काय भरंवसा, कधीही दोस्ती तोडून दुश्मन व्हायचा, आणि कातडं मिळवून देणं बंद करून टाकायचा, कायमचं खोलीबाहेर घालवून द्यायचा, कुणाकडूनही पिटवून काढायचा आणि कायम त्रास देत राहायचा. नत्थूचे हातपाय कापू लागले. डुकराच्या मागच्या तंगड्या पकडल्या तर डुक्कर चावेल किंवा हिसका देऊन तंगडं सोडवून घेईल हे त्याला अगदी मनातून माहीत होतं.

एकाएकी नत्थू भडकून उठला. जणू उगीचच त्याच्या सर्वांगात आग

भडकलेली होती. 'एक मी तरी राहणार नाही किंवा हे डुक्कर तरी राहणार नाही,' असं म्हणत झटकन् त्यानं कोनाड्यात ठेवलेला दगडाचा पाटा उचलला. पाटा घेऊन तो सरळ खोलीच्या मध्यभागी आला. दोन्ही हातांनी पाटा डोक्याच्या वर उचलून तो क्षणभर थबकला. डुकराचं थोबाड अजूनही समोरच्या पायांवर टेकलेलं होतं आणि ते खरबुजाच्या चकत्या हुंगीत होतं. त्याचे लालबुंद डोळे मिचमिच करीत होते. पाठीमागे लहानसं शेपूट सारखं हलत होतं. जर डुक्कर हललं नाही आणि पाटा सरळ त्याच्या अंगावर आदळला तर कुठेतरी घाव बसेलच, आणि डुकराच्या शरीराचा एखादा तरी भाग जायबंदी होईलच. एखादी टांग जरी तुटली तरी तेवढंच पुरेसं आहे, त्याला चालणं तर अवघड होऊन बसेल.

मग दोन्ही हात नीट सांभाळत नत्थूनं तो पाटा धाडकन् डुकराच्या अंगावर आदळला. पाटा डुकराला नक्कीच लागला होता, पण तो नेमका कुठं लागलाय हे नत्थूच्या नीटपणे लक्षात येत नव्हतं. डुक्कर जोरात किंचाळलं आणि तो पाटा फरशीवर आपटला. पाटा फेकताच नत्थू मागे हटला आणि डोळे विस्फारून डुकराकडे बघू लागला. डुकराचे अर्धवट बंद डोळे अजूनही मिचमिचत होते. आणि त्याचं थोबाड अजूनही पुढच्या पायावर टेकलेलं होतं, याचं नत्थूला आश्चर्य वाटलं.

अचानक डुक्कर गुरगुरलं आणि मागची भिंत सोडून खोलीच्या मध्यभागी येऊ लागलं. ते डाव्या-उजव्या अंगावर झुलत झुलत चाललं होतं. नत्थू अंगणात उघडणाऱ्या दरवाज्याकडे सरकून उभा राहिला. दिव्याच्या हिंदोळत्या उजेडात डुक्कर एखाद्या काळ्या पुंजक्यासारखं चालत पुढं पुढं येत होतं. पाटा त्याच्या डोक्यावरच आदळला होता. कदाचित त्यामुळेच ते चक्रावलं असावं आणि त्याला नीट दिसत नसावं. नत्थू घाबरला. डुक्कर नक्कीच आपल्याकडे येऊ लागलं आहे, आणि आता ते आपल्याला खाणार. पाट्याचा त्याच्यावर काहीच परिणाम झालेला नसावा असं दिसतंय.

नत्थूनं झटकन् दरवाजा उघडला आणि तो खोलीच्या बाहेर आला.

'कसल्या संकटात फसलोय् कुणास ठाऊक' तो पुटपुटला, आणि अंगणात येऊन भिंतीच्या वरवंडीजवळ उभा राहिला. बाहेर आल्यावरच बाहेरच्या स्वच्छ वाहत्या हवेत त्याला बरं वाटू लागलं. खोलीतल्या कोंदटपणानं आणि दुर्गंधीनं तो अस्वस्थ झालेला होता. घामानं डबडबलेल्या त्याच्या शरीराला हवेच्या हळुवार स्पर्शानं विलक्षण आनंदाचा अनुभव आला. आपला पुनर्जन्म झाला आहे, आपल्या सैल पडलेल्या, मेलेल्या देहात पुन्हा नव्यानं प्राण आलेला आहे, असं क्षणभर त्याला वाटलं. 'मला काय देणं-घेणंय् या कामाशी ! गुरांच्या डॉक्टरला डुक्कर मिळत नाहीय् तं न का मिळेना, मी चक्क उद्या मुरादअलीच्या अंगावर पाचाची नोट फेकून देईन आणि हात जोडीन. हुजूर, हे काही माझ्या आवाक्यातलं काम नाहीय्. मला नाही जमायचं हे. माझं काय वाकडं करणारय् तो! दोन दिवस तोंड वाकडं करील तर मी गुडघ्यावर हात टेकवून त्याचं मन वळवून घेईन.'

तो वरवंडीच्या मागं स्तब्ध उभा राहिला. चंद्र उगवून बराच वर आलेला होता आणि सगळीकडं सांडलेल्या चंद्रप्रकाशात त्याला आजूबाजूचा सगळा भाग परका, अनोळखी आणि रहस्यमय वाटू लागला होता. पुढून जाणाऱ्या बैलगाडीचा कच्चा रस्ता या वेळी एकदम सुना होता. मुका आणि शांत. दिवसभर त्याच्यावर उत्तरेकडच्या गावाहून येणाऱ्या बैलगाड्यांची खडखड आणि बैलांच्या गळ्यातल्या घंट्यांची किणकिण ऐकू येत असायची. त्यांच्या चाकांमुळे सडकेवर खोल वळणं पडलेली होती आणि माती भरडून भरडून भुगा झालेली होती. पाय ठेवताच भसकन् तो गुडघ्यापर्यंत आत रुतायचा. रस्त्याच्या पलीकडं खाली मैदानापर्यंत पसरलेल्या प्रचंड उतारावर बारीकसारीक झाडंझुडपं, बोरीची झाडं आणि काटेरी निवडुंगाची झुडपं धुळीनं लदबदलेली होती. ती चांदण्यात स्वच्छ धुतल्यासारखी दिसत होती. मैदानापलीकडं स्मशान होतं आणि त्याच्या मागेच दोन खोल्यांत एक डोंब रहात होता. एकाही खोलीत दिवा तेवत नव्हता. तिथं दारू पिऊन डोंब जोरजोरात ओरडत बडबडत असायचा आणि त्याचा आवाज मैदान ओलांडून या खोलीपर्यंत यायचा. पण या वेळी तो जणू मरून पडलेला होता. नत्थूला एकाएकी आपल्या बायकोची आठवण आली. ती या वेळी निवांतपणे चांभाराच्या वस्तीत झोपी गेलेली असेल. हे झंझट मागं लावून घेतलं नसतं तर तो यावेळी तिच्याजवळ असता. त्याचं सुस्त आंबलेलं शरीर तिच्या मिठीत असतं. आपल्या तरुण बायकोच्या मिठीत असण्याची लालसा त्याला फारच अस्वस्थ करू लागली होती. तिनं किती वेळ त्याची वाट बघितली असेल कुणास ठाऊक! तिला काहीच न सांगता, न बोलता तो निघून आला होता. एकाच संध्याकाळपुरता तिच्यापासून दूर राहिल्यामुळे तो विलक्षण अस्वस्थ झालेला होता.

कच्चा रस्ता उजव्या बाजूला दूरवर जाऊन खाली उतरलेला होता. या वेळी चांदण्यात तो रस्ता किती स्वच्छ धुतल्यासारखा दिसत होता! त्याच्या एका बाजूला थोड्याशा अंतरावर एक कच्ची विहीर होती, आणि त्यावरचं रहाट आणि दोरही काही वाईट दिसत नव्हता. थोडंसं पुढे गेलं की हा उजाड भाग संपत असे, आणि हा कच्चा रस्ता शहराकडे जाणाऱ्या पक्क्या सडकेला जाऊन भिडत असे. सगळीकडे सुनसान शांतता होती. दूर डाव्या बाजूला डुक्करवाड्याची खालची इमारत होती. ती चपट्या काळ्या डब्यासारखी दिसत होती. दूर दूर मोकळी जमीन पसरलेली होती आणि तिच्यावर इथं-तिथं काटेरी झुडपं आणि बारीकसारीक झाडं विखुरलेली होती. अगदी

दूरवर वेगवेगळ्या अंतरावर फौजेच्या छावणीच्या बराकी होत्या. तिथं पोहोचायला किती तरी घंटे लागायचे.

नत्थू अगदीच गळून गेलेला होता. तिथंच वरवंडीवर उभ्या उभ्या डोकं टेकवून एक डुलकी घ्यावी असं त्याच्या मनात आलं. खोलीतून बाहेर पडून तो जणू दुसऱ्या जगात येऊन पोहोचला होता. स्वच्छ थंड हवेत आणि सगळीकडं पसरलेल्या चांदण्यात त्याला आपल्या या स्थितीबद्दल रडवेल्यासारखं झालं होतं. बाहेर आल्यावर त्याला हातातला सुरा फारच विसंगत वाटू लागला. त्याला वाटलं, तात्काळ पळून जावं. खोलीत डोकावूनसुद्धा पाहू नये आणि पळत सुटावं. उद्या डुक्करवाड्यातला पहारेकरी नक्कीच या वाटेनं जाईल आणि डुक्कर खोलीतच आहे हे इथं साचलेला कचरा पाहूनच कळून चुकेल. मग त्याला हाकत हाकत तो ते घेऊन जाईल.

त्याला पुन्हा बायकोच्या आठवणीचा त्रास होऊ लागला. आपल्या बायकोकडं जाऊन तिच्यासोबत हळूहळू कुजबुजल्यानेच त्याच्या क्षुब्ध व्याकुळ मनाला शांतता मिळणं शक्य होतं. हे झेंगट कधी मिटेल आणि कधी तो चांभाराच्या वस्तीत तिच्याकडे जाऊ शकेल?

अचानक शेखांच्या बागेतल्या घंटेनं तीनचे टोले दिले आणि नत्थूचं सगळं शरीर थरथरू लागलं. त्याची नजर त्याच्या हातांकडे गेली. अजूनही सुरा हातातच होता. एक खोल ठणक त्याच्या मनात उमटली. आता काय होईल? तो इथं उभा राहून करतोय् तरी काय? कारण डुक्कर तर अजून जिवंतच आहे! जमादार छकडा घेऊन येण्याच्या तयारीतच असेल. त्याला काय सांगायचं, काय उत्तर द्यायचं? आभाळभर फिकट पिवळेपण पसरलेलं होतं. तांबडं फुटायची वेळ झालेली होती आणि अजूनपर्यंत त्याला आपलं काम फत्ते करता आलेलं नव्हतं. त्याला आपल्या या अवस्थेचं रडू कोसळू लागलेलं होतं.

घाबरलेल्या मनःस्थितीतच तो खोलीकडे धावला. हळूच दरवाजा उघडून त्यानं आत डोकावून पाहिलं. दरवाजा उघडताच जणू कुठल्याही दुर्गंधीच्या जाळानं त्याचं अंग लपेटून घेतलं होतं. तशातच खोलीच्या ऐन मध्यभागी डुक्कर उभं आहे. स्तब्ध, निश्चल, हिंडून-हिंडून थकल्यासारखं, शिथिल झाल्यासारखं हे दिव्याच्या उजेडात त्याला दिसलं. आता डुकराला मारून खाली पाडणं काही फारसं अवघड नाही. कुठल्यातरी अंतःप्रेरणेनं त्याला कळलं. नत्थूनं दरवाजा ओढून घेतला. मग तो कोनाड्याखाली गुपचूप उभं राहून डुकराकडे एकटक बघत राहिला.

नत्थू आत जाताच डुकरानं आपलं नाक वर केलं. डुकराच्या नाकपुड्या जास्तच लालबुंद झालेल्या आहेत, आणि डोळेही जास्तच आकुंचन पावलेले

आहेत असं नत्थूला जाणवलं. दगडी पाट्या डुकराच्या मागंच थोड्याशा अंतरावर पडलेला होता. दिव्याच्या मिणमिणत्या ज्योतीनं पुन्हा एक हेलकावा घेतला, आणि हिंदोळत्या उजेडात डुक्करच पुन्हा हलू लागलं आहे आणि चालायलाही लागलं आहे असा नत्थूला भास झाला. तो डोळे विस्फारून मोठमोठ्ठे करून डुकराकडे पाहू लागला. डुक्कर खरोखरच हललं होतं. ते बोजड, धिम्या गतीनं नत्थूच्या दिशेनं पुढेपुढे येऊ लागलं होतं. उजव्या डाव्या बाजूनं झुकत एकदोन पावलं चालल्यानंतर डुकराच्या तोंडातून एक विचित्र आवाज बाहेर पडला. नत्थूनं पुन्हा हातातला सुरा उंचावून वर नेला, आणि पायांच्या आधारानं तो फरशीवर बसला. डुकरानं पुन्हा दोनतीन पावलं टाकली. त्याचं नाक त्याच्या पायाकडे अधिकच झुकलेलं होतं. नत्थूजवळ पोचता पोचताच ते एका बाजूला कलंडून धाडकन् कोसळलं. त्याच्या टांगांत एकदा जोरदार हालचाल झालीही, पण क्षणार्धातच त्या हवेत वर ताठ झाल्या आणि तशाच राहिल्या. डुक्कर मरून पडलं होतं.

नत्थूनं सुरा खाली फरशीवर ठेवला, पण त्याचे डोळे अजूनही डुकरावरच रोखलेले होते. त्याच वेळी अचानक दूर कुठेतरी शेजारच्या घरात कोंबड्यांच्या पंखांचा फडफड आवाज झाला. मग कोंबड्याची बांग ऐकू आली. नेमक्या त्याच वेळी कच्च्या रस्त्यावर धक्के खात येणाऱ्या छकड्याचा आवाज आला. हायसं वाटून नत्थूनं उसासा सोडला.

2

प्रभातफेरीत भाग घेण्यासाठी सुरुवातीला दोन-तीनच निवडक लोक वेळेवर पोहोचत असत. नंतर गल्ल्यांतून जाताना व बाजारपेठ ओलांडत असताना ज्या कुणाचं घर वाटेत लागायचं तो पोट खाजवीत, जांभया देत सामील व्हायचा.

हवेत आता कोरडेपणा जाणवत होता. रात्री बंद खोलीत झोपावं लागे, तरीही पहाटे-पहाटे पांघरूण ओढून घ्यावं लागत असे. प्रभातफेरीसाठी येणारे, वय झालेले लोक कानटोप्या घालून येत असत.

शेखांच्या बागेतल्या घड्याळानं चार वाजवले. काँग्रेस कमिटीच्या कार्यालयासमोरच्या रस्त्यावर फक्त दोन-तीनच लोक उभे राहून इतर सदस्यांची वाट बघत होते. गुप्तचर विभागातले दोन शिपाई साध्या वेषात थोड्या अंतरावर जाऊन आत्तापासूनच उभे होते.

तेवढ्यात दूर अंतरावर उजेड दिसू लागला. कुणी तरी हातात कंदील घेऊन मोठ्या बाजारपेठेचं वळण पार करून या दिशेनेच येऊ लागलं होतं. दिव्याच्या उजेडात त्या माणसाची फक्त विजारच दिसत होती. दोन पाय धडाशिवाय चालत येऊ लागले आहेत असं वाटायचं.

"घ्या, बक्षीजी आले," दुरूनच विजारीतून माणूस ओळखून अजीज म्हणाला.

बक्षीजी म्हणत असत, चार वाजण्याचा अर्थ चार वाजणं, एक मिनिट कमी नाही की जास्त नाही. पण आज ते स्वतः उशिरा आलेले होते.

ते बक्षीजीच होते. कफप्रकृतीचं शरीर असलेले जिल्हा काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी. आयुष्यमान माणूस. शरीर सैल पडलेलं होतं. पण ते आले नाहीत तर कुणीच यायचं नाही. प्रभातफेरीसाठी कुणी पोहोचायचंच नाही.

ते जवळ आल्याबरोबर अजीजनं एक शेर म्हटला,

"मुल्ला, मियाँ, मिशालजी तीनों एक समान
लोकाँ नूँ दस्सण चाणना, आप हनो जाण"

(मौलवी, मालक आणि मशालजी तिघंही एकसारखेच. लोकांना प्रकाश दाखवतील; पण स्वतःच्या अंतःकरणात मात्र अंधारच).

बक्षींनी जवळ जाऊन आपल्या समर्थनार्थ सांगितलं : "रात्री झोपायला उशीर झाला आणि सकाळी जागच आली नाही." मग दुआ-सलाम झाल्यावर मोकळेपणानं बोलू लागले:

"मास्टर रामदास आला नाही का?"

उत्तर अजीजनं दिलं:

"तो गाईचं दूध काढून येईल, त्याच्या आधी थोडाच येणारय्!"

"जेव्हा पगार वाढवायचा होता तेव्हा तर अकरा वाजता बोलावलं तरी यायचा. आता पगार वाढलाय्, आता त्याला काय गरजय् वेळेवर यायची."

दूर अंधारात नव्या मोहल्ल्याकडून उंच देहाचा एक माणूस नखशिखांत पांढऱ्याशुभ्र कपड्यात, पडक्या ढिगाऱ्यावरून आणि उतार पार करून येत असताना दिसला.

"घ्या. ज्यांच्या पदरी सत्य बांधलेलंय् ते हे आले बघा. मेहताजी, तुम्ही तर खरेखुरे लीडर वाटू लागलात."

मेहताजींनी जवळ येऊन इतर लोकांची विचारपूस सुरू केली. अजितसिंह आला आहे की नाही, देशराज, शंकर, मास्टर रामदास, सगळे कुठं आहेत, वगैरे. मग बक्षीजींकडे वळून ते म्हणाले:

"प्रभातफेरीसाठी चारची वेळ सांगणं ठीक नाहीय् हे मी सांगितलंच होतं."

"चारची वेळ दिली तर कुठं पाच वाजता प्रभातफेरीसाठी निघणं शक्य होतं." बक्षीजींनी उत्तर दिलं.

"पाचची वेळ दिली असती तर उन्हं पडल्यावरही लोक जमा झाले नसते. स्वतः उशिरा येता आणि पुन्हा वर आम्हाला सांगता की ही वेळ देऊ नये, ती वेळ देऊ नये," असं म्हणत म्हणत बक्षीजींनी चादरीखालच्या जाकिटात हात घालून सिगरेटची डब्बी काढली.

अजीजनं पुन्हा मेहताजींना कोपरखळी मारली :

"दुरून तर आपण खरेखुरे लीडर वाटता, मेहताजी."

मेहताजींनी चेहऱ्यावर गांभीर्य आणून स्मित केलं. मग हलकेच अजीजच्या खांद्यावर हात ठेवून बोलू लागले :

"त्या दिवशी बसस्टँडवर उभा होतो, तर एक माणूस दुसऱ्या माणसाला विचारू लागला, तो उभा असलेला जवाहरलाल नेहरूय् का." आणि मेहताजींनी दोन्ही हातांनी आपल्या गांधी टोपीचा कोन थोडा तिरका करीत सांगितलं, "फार लोक संभ्रमात पडत असतात."

"तुम्ही कुणापेक्षा कमी आहात थोडेच. वा वा, तुमचं काय व्यक्तिमत्त्वय्!"

"मी थोडा उंच आहे त्यांच्यापेक्षा," मेहताजींनी नम्रपणे सांगितलं.

"आंघोळ करून आलात का मेहताजी?" काश्मिरीलालनं विचारलं.

"वाः हे काय विचारणं झालं? मी नेहमीच आंघोळ करून येतो. गर्मी असो-सर्दी असो; माझा आपला नियमय्. प्रभातफेरीसाठी तर कुणीही आंघोळ न करता यायलाच नको काश्मिरीलाल. तू तोंड तरी धुऊन आलास की नाही?"

त्याचवेळी दूर उतारावरून पुन्हा आवाज ऐकू आला:

"लेफ्ट... लेफ्ट... राइट-राइट लेफ्ट..."

"घ्या जरनेलसुद्धा आलाय्," बक्षीजी म्हणाले, आणि सगळेजण हसले.

दिव्याचा उजेड सर्वात आधी त्याच्या फाटलेल्या बुटावर पडला. ते बूट होते की स्लीपर हे काही लक्षात येत नव्हतं. बुटांच्या सुमारे सहा इंच वर खाकी पँट सुरू झाली होती. त्याच्यावर खाकी कोट, त्याच्यावर गांधी आणि नेहरूंचे जितके बिल्ले जरनेलला मिळणं शक्य होतं तितके लावलेले होते. सोबत रंगीत थिगळं, दोरे आणि वाळलेल्या म्हाताऱ्या शरीरावर मुडपलेला खाकी कोट लटकत होता. वर ओबडधोबड अशी खसखस दाढी आणि सगळ्यात वर काळसर हिरव्या रंगाची पगडी.

जरनेल आंदोलन असो वा नसो, जेलात जात असे, सभा-संमेलन असो वा नसो, स्वतःच भाषणं देत गावभर हिंडत असे. प्रत्येक दिवशी गावात कुठं ना कुठं रोज त्याची पिटाई होत असे. बगलेत छोटीशी वेताची छडी दाबून तो नेहमी कधी

एका मोहल्ल्यात तर कधी दुसऱ्या मोहल्ल्यात हिंडत असताना दिसायचा. जेव्हा जेव्हा टांगा दवंडी पिटायला निघायचा तेव्हा टांग्यात बसलेल्या तीन माणसांतला एक नक्कीच जरनेल असायचा. सभा सुरू झाल्यावर सगळ्यात आधी जरनेलचं भाषण होत असे. त्याचा पोकळ कुजबुजता आवाज फक्त पुढे बसलेल्या लोकांनाच ऐकू जायचा.

जरनेल आल्याआल्याच काश्मिरीलालनं चिमटा काढला,

"जरनेल, काल सभेतून पळून का गेला होता?"

जरनेलनं आवाज ओळखून आपल्या बारीक डोळ्यांनी काश्मिरीलालला निरखून पाहिलं आणि वेत बगलेत घट्ट धरून तो म्हणाला:

"सकाळी-सकाळीच मी तुझ्यासारख्या माणसाच्या नादी लागू इच्छीत नाही. लांब उभं रहा."

बक्षींनी काश्मिरीलालला रोखलं:

"ही वेळय् का छेडछाड करायची? बस्, गप्प बस जरा."

पण जरनेल भडकून उठला :

"पण मी तुझं बिंग फोडीन. तुझं कम्युनिस्टांसोबत उठणं-बसणं आहे, मला माहितय्. देवदत्त कम्युनिस्टाबरोबर कुबड्या हलवायाच्या दुकानात मी तुला छानामुर्गी खाताना पाहिलंय्."

"बस् बस् ठीकय् जरनेल. अजून काही बाहेर काढू नकोस," बक्षींनी समजावणीच्या सुरात सांगितलं.

इतक्यात लांबरुंद बॉटमची विजार फडकावीत शंकरलाल आला.

अंधारात सकाळचं पिवळेपण मिसळू लागलं होतं. डाव्या हाताच्या बँकेच्या उंच भिंतीवरून अंधाराची आणखी एक लाट गळून खाली पडली होती. सडकेच्या पलीकडं आर्य शाळेच्या इमारतीत हलवायाच्या शेगडीतून धूर वर येऊ लागलेला होता. बाजूच्याच गल्लीतून हवा खाणारे शौकीन खाकरत, छडी आपटत अधूनमधून बाहेर पडू लागले होते. क्वचित एखादी बाई डोकं-तोंड झाकून घेत गुरुद्वाराकडे जाताना दिसत असे.

बक्षीजींनी हातात धरलेला कंदील वर उचलला आणि फुंकर घालून वात विझवली.

"काहो बक्षीजी, आम्ही आलो तर तुम्ही एकदम दिवाच विझवून टाकलात की!" दवंडीवाल्या शंकरनं सांगितलं.

"का? तुला माझा चेहरा पाह्यचाय् का मेहताजीचा पाह्यचाय्?" बक्षीजी म्हणाले. "तेल वाया जातंय. हा काही काँग्रेस कमिटीचा दिवा नाहीये, माझा स्वतःचा दिवाय्. काँग्रेस कमिटीकडून तेलाची मंजुरी मिळवून दे, मी हा रात्रंदिवस तेवत ठेवीन."

हे ऐकून काश्मिरीलालच्या पाठीमागं उभं राहून दबलेल्या आवाजात शंकर म्हणाला :

"सिगरेटींसाठी आपल्याला मंजुरीची आवश्यकता नाहीय् तर घासतेलाच्या मंजुरीची तरी काय आवश्यकताय्!"

ते वाक्य बक्षीजींनं ऐकलं, पण विषाचा घोट गिळून ते गप्प बसून राहिले. अशा लोफर माणसांच्या नादी लागणं म्हणजे आपला अपमान करून घेण्यासारखं आहे.

"आपण तर मालक आहात, बक्षीजी, आपल्याला काय गरजय्? आपल्या आज्ञेशिवाय तर चिटपाखरूसुद्धा उडू शकत नाही," शंकर म्हणाला, आणि मग मेहताजींकडे वळून म्हणाला:

"जयहिंद, मेहताजी!"

"जयहिंद!"

"मी आपल्याला पाहिलंच नाही."

"तू आता आम्हाला कशाला पाहशील शंकर. सगळं दान आता तुझ्या बाजूनं पडलंय्."

"आज आपण आपली बॅग आणली नाहीत वाटतं ?"

"प्रभातफेरीत बॅगेची काय जरूरय्?"

"वा वा, बॅगेची सगळीकडेच जरूर असते. विम्याचा ग्राहक कधीही जाळ्यात अडकू शकतो म्हणून."

मेहताजी गप्प बसले. काँग्रेसचं काम करण्यासोबतच ते विम्याचंही काम करीत.

"तुझं तोंड कधीतरी बंद ठेवत जा शंकर. मेहताजी तुझ्या तिप्पट वयाचे आहेत. मोठ्यांना मोठेपणानंच वागवलं पाहिजे," बक्षीजी म्हणाले.

"मी काय म्हणालो मग? मी एवढंच विचारलं ना की बॅग आणली नाहीत! सेठीकडून पन्नास हजारांचा विमा मिळाला की नाही हे तर मी विचारलं नाही ना?"

शंकरनं बाण सोडला. शंकर सामान्यतः अशा पद्धतीनं बोलायचा नाही. फाटक्या तोंडाचा माणूस होता, चांगलं-वाईट सगळं सरळ तोंडावर बोलायचा. पण पन्नास हजारांच्या विम्याची जखम फारच खोल होती. मेहताजी इतके घाबरले की तोंडातून एक शब्दही काढू शकले नाहीत. मेहताजी काही लहान असामी नव्हते. सगळी मिळून एकंदर सोळा वर्षं तुरुंगात काढून आले होते. जिल्हा काँग्रेस कमिटीचे मुख्य होते. आणि सगळ्यात स्वच्छ खादी वापरत होते. त्यांच्यावर हा आरोप लादणं

फारच मूर्खपणाचं होतं; पण सेठी ठेकेवाल्याचा पन्नास हजारांचा विमा त्यांना मिळवायचा आहे अशी फार दिवसांपासून अफवा पसरलेली होती आणि त्या बदल्यात मेहताजी सेठीला निवडणुकीसाठी काँग्रेसचं तिकीट मिळवून देणार आहेत.

"हा तर भुंकलाच आहे मेहताजी ! आता त्याचं हे बोलणं, बस् कानानिराळं करा."

"मेहताजींनी तिकिटाचा वायदा केलाय् हे तर मी बोललो नाही. तिकिटं देण्याचा अधिकार प्रांतीय कमिटीला आहे आणि शिफारस जिल्हा कमिटी करणारय्. आता प्रधान आणि मंत्र्यांनी खाऊन निर्णय घेतला तर वेगळी गोष्टय्. पण ते काम आम्ही करू देणार नाहीत. दोघं, प्रधान आणि मंत्री, ऐकत उभे आहेत. मोठ्यामोठ्या ठेकेदारांना तिकीट मिळू लागलं तर बस्, काँग्रेस संपलीच म्हणून समजा."

तिथून निघून जाऊन मेहताजी काश्मिरीलालशी बोलू लागले. बक्षीजींनी आणखी एक सिगरेट शिलगावली.

शंकरचं आणि मेहताजींचं खरोखरच पटत नव्हतं. लाहोरमध्ये होणाऱ्या एका संमेलनात नेहरूजी भाग घेणार होते-त्यात जिल्हा कमिटीकडून काही प्रतिनिधी पाठवण्यात आले होते आणि मेहताजींनी शंकरचं नाव त्या यादीत घातलं नव्हतं. तेव्हापासूनच त्यांचं बिनसलं होतं. तरी सुद्धा शंकर लाहोरला गेला होता आणि त्यानं सम्मेलनात भाग घेतला होता. इतकंच नाही तर, संमेलनाच्या काळात फार मोठ्या प्रमाणात एक सहभोजनाचं आयोजन करण्यात आलं होतं आणि त्यात नेहरूजी सामील झाले होते. सगळ्या प्रतिनिधींकडून या सहभोजनासाठी आठ-आठ आणे घेण्यात आले होते. आपल्या प्रतिनिधींचा चंदा मेहताजींनी काँग्रेस फंडातून दिला होता. तिथंही शंकरचा चंदा भरणं मेहताजींनी नाकारलं होतं. शंकर फार चिडलेला होता. आणि मेहताजींनी उपेक्षा केली तरी सहभोजनात सहभागी झाला होता, शिवाय मेहताजींच्या ऐन समोरच्या पंगतीत बसून भुकेल्या लांडग्यासारखा जेवणावर तुटून पडला होता. हातही बरबटलेले, तोंडही बरबटलेलं आणि वरण-भाजी वाढणाऱ्यांवर जोरजोरात खेकसत होता. मेहताजींना राहवलं नाही :

"जेवायला बसलायस् शंकर, तर माणसासारखं खा. आपल्या जिल्हा काँग्रेसची बदनामी करू नकोस."

"आता गप्प बसा मेहताजी. हे काँग्रेसच्या पैशानं खात नाहीय. स्वतःच्या पैशानं खाऊ लागलोय्. माझं धन खर्चलंय्. घरी परतल्यावर बोलता येऊ शकेल आपल्याशी. आपल्यासारखे फार पाहिलेत मी."

"काय पाहिलेस रे तू, सारखा बकबक करीत असतोस. तू घरी जाऊन काय करणारयस् माझं?"

लाहोरहून परतल्यावर शंकरनं मेहताजींना खरोखरच वैताग आणला. प्रदेश काँग्रेसच्या निवडणुका होणार होत्या आणि प्रत्येक जिल्हा कमिटीचे चार सदस्य पाठवण्याची योजना होती. मेहताजींनी इतर तीन सदस्यांबरोबर कोहलीचं चौथं नाव पाठवण्याची व्यवस्था केली होती. कोहली नक्कीच जिल्हा काँग्रेस कमिटीकडून निवडून गेला असता.

शंकर असभ्यपणे वागला नसता तर. स्क्रूटिनी कमिटीची मीटिंग चालली असताना शंकर उठून उभा राहिला.

"क्षमा करा, मला एक प्रश्न विचारायचाय्."

मेहताजींचं डोकं भडकलं.

"ही स्क्रूटिनी कमिटीची मीटिंग चाललीय्. जे काही प्रश्न विचारायचे असतील ते नंतर मला विचार."

"मी आपल्याला नाही, स्क्रूटिनी कमिटीला विचारू इच्छितोय्."

मग तो खास नाटकी ढंगात प्रतीक्षेत उभा राहिला. स्क्रूटिनी कमिटीच्या प्रधानांनी सांगितलं की तो लगेच बोलू लागणार होता.

"सांगा, काय आहे?" प्रधानांनी विचारलं.

"काँग्रेस-सदस्यत्वाचे नियम काय आहेत हे मी विचारू शकतो का?"

"कामाचं बोला, वाकडं-तिकडं बोलण्याची ही वेळ नाहीय्."

"मेहताजी, मी आपल्याशी बोलत नाहीय्. आपण गप्प बसा."

"बोलू द्या, बोलू द्या, हाँ, बोला, शंकरराव, काय म्हणता, काँग्रेसच्या सदस्यत्वाचे नियम काय आहेत?"

"की सदस्य वर्षाला चार आणे चंदा देत असावा, शुद्ध हातांनी कातलेली, हातांनी विणलेली खादी घालत असावा, चरखा चालवत असावा. काय बरोबर आहे की नाही?"

"बरोबरय्."

"मी कोहली साहेबांना विनंती करतो की त्यांनी एक मिनिट उठून उभं रहावं." सगळेजण स्तब्ध झाले.

"क्षमा करा, स्क्रूटिनी कमिटीसमोर प्रत्येक सदस्याला प्रश्न विचारण्याचा हक्क आहे."

मेहताजी क्रोधात ओरडले.

"मेहतासाहेब, आपण इथं मुख्य नाहीत. इथं आपल्याला आपला बडेजाव मिरवायची गरज नाहीय. हं, तर कोहलीसाहेब, आपण एक मिनिट उभं राहावं."

कोहली उभा राहिला.

"तुम्ही खादी वापरता ना?"

"हे काय नाटक चालवलंयस? नीट सांग. तुला काय विचारायचंय?"

"तुमची नाडी दाखवा. नाडी, म्हणजे विजारीला बांधलेली."

"का? काय म्हणायचंय?"

"हा मेंबरचा अपमानय. ही काय चेष्टा चालवलीय?"

"मी चेष्टा करीत नाहीय मेहतासाहेब, आपण गप्प बसा. प्रधानजीच्या परवानगीशिवाय आपल्याला बोलण्याचा अधिकार नाही. हं, तर कोहलीसाहेब, काय म्हणत होतो मी? तुमची नाडी दाखवा. विजारीची नाडी."

"दाखवली नाही तर?"

"तुम्हाला दाखवावीच लागेल. जी गोष्ट मला सिद्ध करायचीच त्यासाठी नाडी दाखवणं आवश्यकय्."

"दाखवा हो, त्याशिवाय हा भुंकणारा काही काम करू द्यायचा नाही. कसले लोफर लोक काँग्रेसमध्ये घुसलेत कुणास ठाऊक!"

"काय म्हणालात मेहताजी? मी लोफर आहे तर आपण काय गुंड आहात? मला काही बोलायला लावू नका, मला काळंबेरं सगळं माहितंय. हं, तर कोहलीसाहेब!"

"तुझी काय इच्छाय्, मी सगळ्यासमोर नाडी सोडू?"

"मी सोडायला सांगत नाहीय, मी फक्त दाखवा म्हणतोय."

"दाखवा हो, संपवा एकदाचं."

कोहलीनं पायघोळ कोटाचा समोरचा भाग वर उचलला. खालून आतल्या खादीच्या सदऱ्याचा समोरचा भाग वर उचलला. निळ्या रंगाची नाडी लोंबकळत होती. शंकर लगबगीनं पुढं धावला आणि त्यानं नाडी पकडली.

"बघून घ्या साहेब, नाडी रेशमी आहे. हातानं कातलेल्या सुताची नाहीय. मशीननं केलीय, घट्ट पीळ असलेलीय. आपण स्वतःच हात लावून बघावी."

"तर मग? काय झालं?"

"काँग्रेस-सदस्य आणि रेशमी नाडी वापरणार? आणि आपण त्याला प्रदेश काँग्रेसचा उमेदवार म्हणून पाठवणार? काँग्रेसचे काही नियम आहेत की नाहीत?"

स्क्रूटिनी कमिटीचे सदस्य एक-दुसऱ्याच्या तोंडाकडे बघू लागले. असहाय्य होऊन कोहलीचं नाव काढून टाकलं. त्या दिवसापासून शंकर एकसारखा मेहताजींच्या डोळ्यात सलत होता.

बक्षीजी अस्वस्थ होऊ लागले होते. मास्टर रामदासही आला नाही न् देशराजही. गाणं कोण म्हणेल? प्रभातफेरीत कमीतकमी एकतरी गाणारा पाहिजेच. कुणीच नसलं तर ते स्वतः गाणी म्हणतील, पण जिल्हा कमिटीकडून जे पगार घेतात त्यांनी तर येणं आवश्यकचंय.

"बघून घ्या मेहताजी. आम्ही प्रभातफेरी सुरू करू. तीन गल्ल्या फिरून झाल्या की मास्टर रामदास पळत पळत येईल. गोऱ्ह्यानं दूध पिऊन टाकलं, मी काय करणार, वगैरे सांगू लागेल. हे लोक असं काम करतात बघा." मग इतर सदस्यांना उद्देशून ते म्हणाले, "काश्मिरीलाल, आता जास्त वेळ वाट पाहण्यात अर्थ नाही. तुम्ही सुरू करा."

पण काश्मिरीलालला लोकांचे पाय ओढण्यात मजा येत असे. झटकन जरनेलकडे वळून म्हणाला,

"भाषण सुरू करा जरनेल. प्रभातफेरी सुरू व्हायच्या आधी एक भाषण झालंच पाहिजे."

जरनेलला तरी अजून काय पाहिजे होतं. लगेच छडी हलवीत, लेफ्ट राइट करीत रस्त्याच्या कडेला एका दगडावर जाऊन उभा राहिला.

"हे काय चालवलंय काश्मिरीलाल? अरे काही वेळबीळ तरी पाहात जा," बक्षींनी चिडून सांगितलं. "तुला प्रभातफेरी नको असेल तर सरळ सांग." मग ते जरनेलकडे निघून गेले. पण दरम्यान जरनेलनं आपलं भाषण सुरू केलं होतं,

"साहेबलोकहो,..."

"साहेब-बिहेब कुणी नाहीत. खाली उतर आधी." बक्षींनी हात उंचावून सांगितलं, "अरे, याला उतरवा खाली. काय तमाशा चालवलाय सकाळी-सकाळी!"

"माझं तोंड कुणीच बंद करू शकत नाही," जरनेलनं दगडावर उभ्या-उभ्याच सांगितलं आणि पुन्हा आपलं भाषण सुरू केलं,

"साहेब लोकहो..." खर्जातल्या कुजबुजत्या आवाजात जरनेलनं बोलायला सुरुवात केली.

जरनेलचं वय पन्नाशीच्या थोडं वरच असावं - पण वर्षानुवर्षांच्या जेलयात्रेमुळे शरीरात काहीच उरलं नव्हतं. जिथं शहरातल्या इतर काँग्रेसवाल्यांना कमीत कमी बी क्लास मिळत असे तिथं जरनेलला कायम सी-क्लासमध्ये टाकलं जायचं. त्यामुळे तो सतत आजारी पडत असायचा आणि रेतीनं भरलेली भाकरी खात रहायचा. पण जरनेलनं कधी तोबा-तोबा केलं नाही न् कधी पोषाखही सोडला नाही. तरुण वयात लाहोर-काँग्रेसच्या वेळी तो आपल्या गावाहून व्हालंटियर बनून लाहोरला गेला होता. जेव्हा संपूर्ण स्वातंत्र्याचा नारा लावला गेला होता तेव्हा नेहरूजींसोबत तोही रावी नदीच्या किनाऱ्यावर नाचला होता. त्या दिवसापासूनच त्यानं व्हालंटियरचा पोषाख घालायला सुरुवात केली होती. दिवस चांगले असले की

त्या पोषाखात कधी शिट्टीची भर पडायची, कधी तिरंग्याची दोरी लटकत असायची. दिवस फिरले की मग तो पोषाख धुतलासुद्धा जायचा नाही. जरनेलला कधीच कुठं काम मिळालं नाही, आणि त्यानंही कधी केलं नाही. प्रचारकाचा मोबदला म्हणून काँग्रेसच्या कार्यालयातून तो महिन्याला पंधरा रुपये घेत असे. बक्षींनी कधी दुर्लक्ष केलं की आहे तिथंच उभा राहून भाषण करू लागायचा. मेंदूत एक सणक होती, त्याच आधारावर आयुष्यातलं दुःख, कष्ट निभावून न्यायचा. त्याला ना घर होतं ना दार, ना बायको ना पोरगं, ना काम होतं ना धाम - आठवड्यातून दोनतीनदा तरी कुठं ना कुठं मार खावा लागायचा. पोलिसांच्या लाठीचार्जमध्ये बाकीचे लोक जीव वाचवून पळून जायचे, मात्र तिथं जरनेल निव्वळ सणक म्हणून आपली बारकुळी सुरकुत्यांनी भरलेली छाती ताणून उभा राहायचा आणि फासळ्या तुडवून घेऊन परतायचा.

"काश्मिरीलाल उतरव बाबा त्याला. सकाळी-सकाळी तमाशा चालवलाय्," या वेळी मेहताजींनी आवाज चढवून सांगितलं. पण मग जरनेल जास्तच खंबीरपणे उभा राहिला.

"साहेबहो, आम्हाला खेदाने हे सांगावे लागत आहे, की जिल्हा काँग्रेसच्या प्रधानांनी देशाचा विश्वासघात केलेला आहे. जे वचन आम्ही रावीच्या किनाऱ्यावर इ. स. १९२९ मध्ये घेतले होते, ते आम्ही मरेपर्यंत पाळू. आपला जास्त वेळ न घेता मी एवढेच सांगतो, की काँग्रेसच्या नियमांचे उल्लंघन करू शकेल असा एकही माईचा पूत अजून पैदा झाला नाहीय्. मेहताजी असे कोण लागून गेलेत? आम्ही त्यांना पाहून घेऊ आणि त्यांचे पिट्टे काश्मिरीलाल, शंकरलाल जीतसिंहसारख्या गद्दारांनाही पुरून उरू..."

प्रचंड जोरात हशा पिकला.

"हा काही असं उतरणार नाही," काश्मिरीलालनं हे भूत उभं केलं होतं आणि तो स्वतःच बक्षीजीच्या कानात सांगू लागला होता, "जर त्याला खाली आणायचा प्रयत्न केला तर आणखीनच जास्त हट्टाला पेटेल तो."

बक्षींनी रागानं लालबुंद होऊन काश्मिरीलालकडे पाहिलं.

"टाळ्या वाजवल्या की हा आपोआप उतरेल, आपण काळजी करू नका. दोन-तीनदा टाळ्या वाजवल्या की तो स्वतःच आपलं भाषण बंद करील," म्हणत काश्मिरीलालनं टाळ्या वाजवल्या. मग इतर लोकांनीही टाळ्या वाजवल्या.

"वा वा, फार छान, उत्तमच!"

"साहेबहो, मी आपला जास्त वेळ न घेता आपले आभार मानतो. आपण इतका वेळ धीर धरून आणि आनंदाने माझे तोकडे-मोडके शब्द ऐकून घेतलेत.

मी आपल्याला खात्री देऊ इच्छितो की तो दिवस, जेव्हा हिंदुस्तान स्वतंत्र होईल फारसा दूर नाही. काँग्रेस आपल्या उद्दिष्टांमध्ये निश्चित यशस्वी होईल. जी शपथ मी रावीच्या किनाऱ्यावर..."

"छान-छान; खूपच छान!" काश्मिरीलालनं पुन्हा टाळ्या वाजवल्या.

"साहेबलोकहो, मी आपले आभार मानतो. मी आपल्यासमोर पुन्हा कधी तरी उपस्थित राहीन. आता सर्वांनी मिळून माझ्यासोबत नारा लावा: इन्कलाब!"

उत्तरादाखल दोन-चार जण ओरडले: "जिन्दाबाद!"

"का? जेवला नाहीत का? जोरात म्हणा-इन्कलाब!"

आणि प्रचंड जोरात उत्तर आलं.

"जिन्दाबाद!"

मग जरनेल काखेत वेताची छडी धरून दगडावरून खाली उतरला!

"जिन्दाबाद!" एक आवाज उताराच्या दिशेनंही आला. मास्टर रामदास धापा टाकत पहाटेच्या धुंधुरक्यातून समोर आला होता.

"ही काय वेळय् यायची?" बक्षीजींनी रागात विचारलं.

काश्मिरीलालनं उत्तर दिलं :

"गोऱ्ह्यानं दूध पिऊन टाकलं, म्हणून वेळ झाला..."

सगळे हसू लागले. पण रामदास धीरगंभीर आवाजात म्हणाला:

"आज प्रभातफेरी होणार नाही."

"का?"

"आज विधायक कार्य करायचं ठरलं होतं."

"विधायक कार्याचं कुणी ठरवलं होतं?"

मला गोसावीजींनी काल रात्री सांगितलं, इमामदीनच्या मोहल्ल्याच्या मागील भागातल्या गल्ल्यांची साफसफाई करू."

"उशिरा आलास आणि वर बहाणा करतोस काय?"

"का? मी तर झाडू आणि कुदळी पण तिकडं पोहचवून आलोय. काही रात्रीच पाठवले होते, काही आज सकाळी तिथं ठेवून आलोय्." मग तो स्वतःच मोजू लागला; "पाच खुरपे, बारा झाडू, तीन कुदळी, आणि पाच टोपल्या तर मी रात्रीच तिथं देऊन आलो होतो, सगळं सामान शेरखानाच्या घरी ठेवलंय्."

"आम्हाला तर कुणीच सांगितलं नाही."

"म्हणून तर मी धावत-पळत आलोय्. मी पहिल्यांदा इथं आलो होतो तेव्हा इथं कुणीच नव्हतं."

"मोहल्ल्यामागच्या नाल्या साफ करायच्या? तुझं डोकं फिरलंय का काय?"

काश्मिरीलालनं विचारलं, "तिथं तर नाल्याच नाहीत."

"ह्या ह्या ह्या! नाहीत कशा? कच्च्या नाल्या आहेत, पक्क्या नाहीत."

"कच्च्या नाल्या म्हणजे वर्षानुवर्षांचा घाणचिकट चिखल तिथं जमा झाला असेल. त्या नाल्या कोण साफ करील?"

"आम्ही करूत. तुम्ही गद्दार आहात," जरनेलनं चिडून सांगितलं.

"कधी एक ठरवतात, कधी दुसरंच. गोसावीजींनी ठरवलं होतं तर आम्हाला का नाही कळवलं?"

एव्हाना अंधार मावळू लागला होता. प्रभातफेरीसाठी एकत्र आलेले लोक फार गोंधळून गेले होते.

"चला, आता इथून तर निघा," बक्षीजी म्हणाले आणि विझवलेला कंदील उचलून चालू लागले. "इथून गात-गात जाऊ. हं, सुरू कर रामदास."

जरनेल लेफ्ट-राइट म्हणत पुढे चालू लागला. काश्मिरीलालनं तिरंगा घेतला होता. रामदासनं ज्याच्यापासून कायमच प्रभातफेरीची सुरुवात केली जायची आणि जे कधीच नीट जमलं नव्हतं असं प्रभातफेरीचं जुनं गाणं - आपल्या उंच, बेसूर आवाजात सुरू केलं:

"जरा वी लगन आजादी दी
लग गयी जिन्हाँ दे मन दे विच."

(ज्यांच्या मनात स्वातंत्र्याचा थोडासा जरी ध्यास लागलेला आहे-)

पावलांच्या तालावर लोकांनी त्या ओळींची पुनरुक्ती केली. रामदासनं पुढच्या दोन ओळी म्हटल्या:

"ओह मजनूँ बण फिरदे ने
हर सेहरा हर बन दे विच."

(ते मजनू होऊन गल्लीबोळांतून जमावा-जमावातून भटकत असतात.) मंडळींनी कुतुबदीनच्या जागेकडे आपला मोर्चा वळवला.

3

गल्लीत पाय ठेवताच नत्थूनं सुटकेचा निःश्वास सोडला. गल्लीत अंधार होता, पण बाहेर अंधार विरू लागला होता. नत्थूला लवकरात लवकर गल्लीबोळांचं जाळं ओलांडून आपल्या वस्तीत पोहोचायचं होतं. दुर्गंधीनं भरलेल्या त्या खोलीतून बाहेर पडून मोकळ्या हवेत आल्यावर तो निश्चिंत झाला होता. त्यानं ज्या प्रकारे रात्र घालवली होती या तुलनेत या अर्धवट जाग्या झालेल्या गल्ल्यांमध्ये त्याला शांततेचा भास होत होता.

त्याला डाव्या बाजूला बायकांच्या हळू आवाजात गप्पा मारण्याचा व बांगड्या किणकिणण्याचा आवाज ऐकू आला. त्यानं बाजूनं जाताना पाहिलं. नळाच्या बाजूला दोन-तीन बायका आपापले घडे समोर ठेवून बोलत बसल्या होत्या. नळाला अजून पाणी आलं नव्हतं. नत्थूला हेसुद्धा बरं वाटलं.

थोडीशी पावलं चालून गेल्यावर त्याच्या पायाला ठोकर लागली. त्याला वाटलं, त्याच्या पायाचा धक्का लागून काहीतरी सांडलं आहे. मग त्याला काय ते कळालं आणि कळाल्यावर त्याच्या शरीरात झिणझिण्या आल्या. एका घरासमोर एका बाईनं जादूटोणा करायला काही तरी भारून ठेवलं होतं-चिंध्यात लपेटलेले दगड, मळलेल्या कणकीचा पुतळा आणि त्यात खोसलेल्या लाकडाच्या ढलप्या. कुण्या कमनशिबी बाईनं आपली बला दुसऱ्या घरातल्या बाईवर ढकलण्यासाठी जादूटोणा केलेला होता. नत्थूला स्वतःलाच तो अपशकुन झाल्यासारखं वाटलं. अशी रात्र घालवल्यावर, अशा भारलेल्या गोष्टींवर पाय पडल्यामुळे त्याला विलक्षण विषण्ण वाटलं. पण दुसऱ्याच क्षणी त्यानं स्वतःला सावरून घेतलं. साधारणतः हे जादूटोणे पोराबाळांवरही बला टाळण्यासाठी केले जातात. नत्थूला मूलबाळ नव्हतं. मग निर्धास्त होऊन तो चालू लागला.

तो ही अख्खी गल्ली नीटपणे ओळखत होता. जिथून तो या गल्लीत शिरला होता तिथं काही अंतरापर्यंत मुसलमानांची घरं होती. एक-दोन धोब्यांची, काही कसायांचीही घरं होती. कसायांनी गल्लीच्या बाहेर छोट्याशा रस्त्याच्या कडेला आपली मांस विकण्याची दुकानं लावलेली असत. इथंच महम्मदू हमामवालाही रहात होता. आणखी थोडं पुढं गेल्यावर काही हिंदूंची आणि शीखांची घरं लागत होती आणि गल्लीच्या दुसऱ्या टोकापर्यंत पोहोचता-पोहोचता पुन्हा मुसलमान

शेखांची घरं सुरू होत असत.

एका घरासमोरून जाताना आतून एका म्हाताऱ्याचा आवाज आला. "या अल्लाह कुल दी खैर कुल दा भला!" म्हातारा जागा होऊन सगळ्यांच्या कुळांसाठी प्रार्थना करीत होता. मग त्याच्या खाकरण्याचा आणि आळस झाडून उठण्याचा आवाज आला. लोक जागे होऊ लागलेले होते.

तो थोडीशीच पावलं पुढं गेला असेल, त्याचा उजवा पाय पुन्हा कसल्यातरी चिकट पदार्थात फसला, आणि तो पडता-पडता वाचला. सोबतच शेणाचा जबरदस्त वास आला. त्यानं आपला पाय ओढूनच काढला तर अर्धफुटकं मडकं कलंडलं. त्याला काय ते समजलं आणि जिथं आधी त्याच्या तोंडातून सणसणीत शिवी बाहेर पडायची होती तिथं त्याच्या ओठांवर मंद स्मित झळकलं. जादूटोण्याचा अपशकुन जणू या ठेकरीमुळे धुऊन निघाला होता. काही दिवसांपासून गर्मी वाढू लागली होती आणि आभाळातून एक थेंबसुद्धा पडत नव्हता. जेव्हा जेव्हा थेंब पडायला उशीर व्हायचा तेव्हा मोहल्ल्यातली धाडसी पोरं फुटक्या मडक्यात शेण आणि गाई-घोड्यांचे मूत एकत्र करून एखाद्या दुष्ट माणसाच्या घरासमोर ठेवून यायची, किंवा त्या घराच्या देवडीत फेकून द्यायची. पावसाला आवाहन करायचा हा शकुन समजत असत.

एका घरासमोर एक माणूस गल्लीत बांधलेल्या गाईजवळ उभं राहून तिला चारापाणी घालत होता. जवळच एका घरातून ग्लासांचा किणकिणाट आणि सोबतच बांगड्यांचाही किणकिणाट ऐकू आला. चहा तयार होत होता. तेवढ्यात समोरून एक बाई ओढणीत आपलं डोकं-तोंड झाकून हळू आवाजात गुणगुणत जवळून गेली. तिनं हातात एक कटोरी घेतलेली होती. कुणीतरी बाई मंदिरात वा गुरुद्वारात मत्था टेकवायला जात असावी असा नत्थूच्या मनात विचार आला. अगदी सहजपणे सामान्य पद्धतीनं दिनक्रम सुरू होऊ लागला होता. तेवढ्यात गल्लीच्या टोकाकडून नत्थूला एकतारी वाजवण्याचा आणि त्यासोबत फकिराच्या गाण्याचा आवाज ऐकू आला. हा आवाज त्यानं पूर्वीही ऐकलेला होता, पण या फकिराला कधी पाहिलं नव्हतं. पहाटेच्या धुंधुरक्यात हा फकीर नेहमी एकतारी वाजवायचा आणि संथ आवाजात गाणं म्हणत शहरातल्या गल्ली-बोळातून जायचा- विशेषतः रमजानच्या दिवसात मुसलमान लोक पहाटे-पहाटे उठून आपला रोजा सोडत असत तेव्हा. जवळ गेल्यावर त्यानं पाहिलं, फकीर उंचापुरा, लांब सडपातळ बांध्याचा म्हातारा माणूस होता - थोडीशी पांढरी दाढी, डोक्यावर फकिराची खास टोपी, लांबलचक अंगरखा आणि खांद्यावर मोठ्ठी झोळी अडकवलेला फकीर. नत्थू थांबला. त्याला फकिराच्या गाण्याचे शब्द कानावर पडावेत असं वाटलं:

"तैनूं गाफला जाय न आयी चिडियाँ बोल रहियाँ...!"

(हे गाफिल माणसा, पक्षी किलबिलाट करू लागले आहेत आणि अजूनही तू झोपला आहेस!)

फकीर गात-गात येऊ लागला होता. एकतारीचा आवाज नेहमी नत्थूच्या स्वप्नात मिसळून जायचा आणि झोपेतही त्याला खूप आवडायचा. आत्ताही त्याला तो गोड वाटत होता. त्यानं खिशातून एक पैसा काढून फकिराच्या हातावर ठेवला.

"अल्लाह सलामत रखे! घर भरे रहे!" फकिरानं आशीर्वाद दिला.

नत्थू पुढे चालू लागला.

गल्ली ओलांडून झाल्यावर तो थोडा थोडा उजेडात आला. इथून टांगा चालवणाऱ्या टांगेवाल्यांचा मोहल्ला सुरू होत होता. सडकेवर आल्यानंतरही दृश्य काही फारसं बदललेलं नव्हतं, फक्त इथं उजाडत चाललं होतं. सडकेच्या बाजूला दोन-तीन टांगे उभे होते. त्यांचे दांडे आभाळाच्या दिशेने उंच झालेले होते जणू सगळ्यांसाठी आशीर्वाद मागतायत असं वाटत होतं. लांबलचक भिंतीसमोर उभं राहून एक टांगेवाला आपल्या घोड्याचा खरारा करू लागला होता. जवळच बसलेल्या दोन स्त्रिया शेणाच्या गोवऱ्या थापून त्या आत्तापासूनच भिंतीवर लावत होत्या. सडकेच्या मधोमध एक घोडा एकटाच सहज-स्वाभाविक गतीनं हिंडू लागला होता. प्रातःकाळच्या शांत लोभस वेळी ठिकठिकाणी हळुवारपणे जगण्याची गती आळोखे-पिळोखे देत होती.

नत्थूला वाटलं जणू तो फिरायलाच निघालाय. कुणी त्याला बघावं किंवा ओळखावं अशी त्याची मुळीच इच्छा नव्हती. त्याच्या मनातली खळबळ बहुतांशी थांबलेली होती आणि तो शतपावली करीत एका मोहल्ल्यातून दुसऱ्या मोहल्ल्यात चालला होता.

छकडा आता कुठवर गेला असेल? अचानक त्याच्या मनात आलं, तो कोणत्या दिशेनं जात असेल? फार विसंगत प्रश्न होता, पण ते लक्षात येताच त्याची पावलं विनासायास जलद पडू लागली. तो दूरवरच्या छावणीपर्यंत गेला असेल का? एव्हाना तो गुरांच्या दवाखान्यासमोर उभा असेल हेही शक्य आहे. नत्थूच्या तोंडातून पटकन शिवी बाहेर पडली. दिवसा त्या डुकराला मारणं शक्य नव्हतं का? गुरांच्या डॉक्टरला मेलेल्या डुकराची गरज का पडली? नक्कीच डुकराचं मांस कुणाला तरी विकण्यासाठीच त्याला मारण्यात आलेलं होतं. रात्रीचा सगळा उपद्व्याप लक्षात येताच त्याचं शरीर शहारलं. त्यानं फारच वाईट पद्धतीनं रात्र काढली होती. घामघाम, डुकराचा दुर्गंध, बंद खोली आणि डुकराचं चीं चीं करणं. तीन वेळा डुकरानं आपल्या लांबोड्या थोबाडानं त्याचा पाय चाटला होता आणि पायावरचं

कातडं काढलं होतं. खड्ड्यात गेला तो मुरादअली! आपल्याला वाटेल तिथं आपण भटकत राहू असं नत्थूला वाटलं. त्यानं खिशात हात घालून नोटेचा करकरीतपणा ऐकला. मला काय, मी तर माझे पैसे खरे केलेत बस्!

गुरं चारायच्या कुरणाजवळ येताच तो उजव्या बाजूला वळला. त्याच वेळी दुरूनच त्याला शेखांच्या बागेतल्या घड्याळाचे ठोके ऐकू आले. बहुधा चारचे टोल पडत असावेत. या वेळी त्या घड्याळाचा आवाज किती स्पष्ट ऐकू येत होता. दिवसा कधी ऐकूच यायचा नाही. शहराच्या गलबल्यातच हरवून जायचा. या वेळी तर आभाळाच्या रस्त्यानं येऊन त्याच्या कानावर तो आवाज पडतोय असं वाटत होतं. थोड्याच वेळानं दूर शहराच्या मध्यभागी टेकाडावर असलेल्या शिवालयातल्या घंटांचा आवाज ऐकू आला. आवाज वाढू लागले होते. जागोजागी घरांचे दरवाजे उघडू लागले होते. काही लोक खाकरत खाकरत आपल्या हातातल्या काठ्या रस्त्यावर आपटत फिरायला निघाले होते. एक बकरीवाला आपल्या तीन-चार बकऱ्या घेऊन बकऱ्यांचे दूध विकायला घेऊन चालला होता. नत्थूची पावलं मंद झाली. त्याला पहाटेच्या थंड सुंदर हवेत फिरताना आनंद होत होता.

आता तो टांगेवाल्यांचा मोहल्ला पार करून आला होता आणि इमामदीनच्या मोहल्ल्याच्या बाहेर 'कमिटी'च्या मोठ्या मैदानावरील रेलिंगच्या बाजूबाजूनं चालू लागला होता. उजव्या बाजूला रेलिंगच्या पलीकडे उतार होता, आणि तो संपताच मोठ्ठं मैदान सुरू होत होतं. या मैदानात रोज काही ना काही होतच असायचं. हिवाळ्यात दर रविवारी इथं कुत्र्यांची झुंज होत असे, आणि लोक त्याच्यावर शर्यती लावत असत. जखमी झालेलं कुत्रं मैदान सोडून पळू लागलं की चारी बाजूनं उभी असलेली गर्दी त्याला पळू न देता पुन्हा रिंगणात आणायची. इथंच याच मैदानावर भाषणबाजीही होत असे. त्यासाठी हजारोंचा जमाव इथं एकत्र व्हायचा. इथंच बाहेरगावाहून येणारी सर्कस लागायची. ताराबाईची सर्कस अणि परशुरामाची सर्कस. इथंच वैशाखीचा ढोल वाजत राहायचा आणि दंगलीचं आयोजन व्हायचं. इथंच राजकीय सभाही भरू लागल्या होत्या. आता रोज सभा होत असत. याच मैदानात मुस्लिम लीगच्या सभा भरायच्या, विळ्या-कोयत्याच्या पार्टीच्या सभा व्हायच्या, मात्र काँग्रेसच्या सभा इथून दूर अनाजमंडईजवळ मंडप लावलेल्या मैदानात होत असत.

त्यानं खिशातून विडी काढली अणि थंडगार रेलिंगवर बसून तो विडीचे झुरके घेऊ लागला.

त्याचवेळी इमामदीनच्या मोहल्ल्याच्या मागच्या मशिदीतली अजाँ त्याच्या कानावर आली. पहाटेच्या अंधाराचा आणखी एक थर कोसळून खाली पडला होता आणि आजूबाजूची घरं स्पष्टपणे दिसू लागली होती. नत्थू रेलिंगवरून उतरला, विडी विझवली मग पुन्हा इमामदीन मोहल्ल्याकडे त्यानं आपलं तोंड वळवलं. त्याला अचानक आठवलं, मुरादअली याच 'कमिटी'च्या मैदानाच्या एका बाजूला राहात होता, नक्की कुठं ते माहीत नव्हतं, पण त्यानं दोनतीनदा त्याला या बाजूनंच येताना पाहिलं होतं. तसं तर मुरादअली गावभर हिंडायचा, आपली बारीक छडी घेऊन रस्त्यांच्या मधोमध चालत जाताना कधी या तर कधी त्या मोहल्ल्यात दिसायचा. त्याच्या काळ्याभोर मिश्यांच्या मागं त्याचे दात कधीच दिसायचे नाहीत. हसला तरी दिसायचे नाहीत. केवळ ओठांचे कोपरे दिसायचे आणि त्याच्या गोल गरगरीत चेहऱ्यावरचे बारीक-बारीक तीक्ष्ण डोळे सापाच्या डोळ्यासारखे चमकून उठायचे. कुणी सांगावं, आत्ताही कदाचित तो इथंच कुठेतरी दिसेलही. इथून निघून जाणंच बरं. त्यानं जर आपल्याला पाहिलं तर एकदम बिघडायचा. त्यानं ताकीद दिली होती की डुकराचं धूड गाडीत घातल्यानंतर तिथंच त्याची वाट बघत खोलीत थांबायचं. पण नत्थू तिथून पळून आला होता. डुक्कर कापायचे पैसे तर मिळालेत, मग आता त्या दुर्गंधीत आणि कचऱ्यात का म्हणून पडून राहायचं?

नत्थू एका चिंचोळ्या बोळात आला आणि थोडंसं दूर पुढं जाऊन दुसऱ्या एका गल्लीत वळला. ती गल्ली एक वळण घेऊन उत्तरेच्या दिशेनं पुढं गेलेली होती. थोडंसं पुढं आल्यावर त्याच्या कानांवर समूहगीताचा आवाज आला. काही वेळापूर्वी फकिराच्या गाण्याचा आवाज आला होता अगदी तसाच. काही पावलं चालून पुढं आल्याबरोबर दूरवर समोरच्या गल्लीच्या वळणापाशी गाणाऱ्या लोकांचा आवाज अधिकच स्पष्ट आणि पहिल्यापेक्षा खूपच मोठा झाल्याचं त्याला जाणवलं. ही प्रभातफेरीवाली मंडळी असावी हे नत्थूच्या लक्षात आलं. अलीकडे शहरात जास्तच सभासंमेलनं आणि भाषणबाजी सुरू झालेली होती. नत्थूला त्यातलं काहीच नीटपणे कळालेलं नव्हतं. पण हवेत घोषणा होत्या आणि खूप दिवसांपासून नत्थू त्या ऐकत आला होता. ही गाणारी मंडळी काँग्रेसवाली असावी असं वाटत होतं. कारण या मंडळीच्या पुढं एक माणूस तिरंगा झेंडा धरून चालला होता. जेव्हा ती मंडळी जवळ येऊन ठेपली तेव्हा नत्थू गल्लीतल्या एका भिंतीला खेटून उभा राहिला. ते लोक गाणं गात-गात समोरून पुढं निघून चालले होते. आठ-दहा लोक होते, एका-दोघांच्या डोक्यावर गांधी टोपी होती, काहींच्या डोक्यावर फैज टोपी होती, एक-दोन सरदारजी पण होते. वयस्कर लोकही होते आणि तरुणही होते. त्याच्या जवळून जाताना त्यातील एका माणसानं मोठ्यानं घोषणा दिली :

"राष्ट्रीय नारा"

"वंदे मातरम्!"

"बोल भारतमाता की- जय!"

"महात्मा गांधी की - जय!"

यानंतर फक्त क्षणभराच्या स्तब्धतेनंतरच थोड्याशा अंतरावर या गल्लीला आडव्या जाणाऱ्या दुसऱ्या एका गल्लीतून आणखी एक घोषणा ऐकू आली :

"पाकिस्तान - जिन्दाबाद!"

"पाकिस्तान - जिन्दाबाद!"

"कायदेआजम् - जिन्दाबाद!"

"कायदेआजम् - जिन्दाबाद!"

नत्थूनं पटकन् वळून पाहिलं. तीन माणसं गल्लीच्या तोंडाशी अचानक प्रकट झाली होती आणि घोषणा देऊ लागली होती. जणू गल्लीच्या मध्यभागी उभं राहून ते गाणाऱ्या लोकांचा रस्ता अडवून उभे आहेत. या तिघातल्या एकाच्या डोक्यावर रूमी टोपी होती आणि डोळ्यांवर सोनेरी फ्रेमचा चष्मा होता. तो माणूस गल्लीच्या मध्यभागी उभा राहून गाणाऱ्या मंडळींना आव्हान दिल्यासारखा ओरडत होताः

"काँग्रेस हिंदूंची जमात आहे. तिच्याशी मुसलमानांचा काहीही संबंध नाहीय."

त्याचं उत्तर मंडळीतल्या बाजूनं एका प्रौढ माणसानं दिलं.

"काँग्रेस सर्वांची आहे. हिंदूंची, शीखांची, मुसलमानांची. आपल्याला नीट माहीतय मेहमूदसाहेब. आपणही आधी आमच्याच बरोबर होता."

आणि त्या प्रौढ, वयोवृद्ध माणसानं रूमी टोपी घातलेल्या माणसाला मिठी मारली. मंडळीतले काही लोक हसू लागले. रूमी टोपीवाल्यानं मिठीतून स्वतःची सुटका करुन घेत बोलायला सुरुवात केली:

'ही सगळी हिंदूंची चलाखी आहे, बक्षीजी, आम्हाला सगळं माहितंय. तुम्ही काय वाट्टेल ते म्हणा, काँग्रेस हिंदूंचीच जमात आहे. काँग्रेस हिंदूंची आणि मुस्लिम लीग मुसलमानांची आहे. काँग्रेस मुसलमानांना मार्गदर्शन करू शकत नाही."

दोन्ही बाजूंचे लोक एकमेकांसमोर उभे होते. लोक आपापसात बोलतही होते आणि एक-दुसऱ्यावर ओरडतही होते.

वयोवृद्ध काँग्रेसवाल्यानं सांगितलं:

"ते बघा, शीखही आहेत, हिंदूही आहेत, मुसलमानही आहेत. तो अजीज समोर उभाय, हकीमजी उभे आहेत--"

"अजीज आणि हकीम हिंदुंचे कुत्रे आहेत. आम्हाला हिंदुंची घृणा नाहीये. त्यांच्या कुत्र्यांची घृणा वाटतेय." त्यानं इतक्या रागानं हे उच्चारलं की काँग्रेसवाल्यांमधले दोन्ही मुसलमान खजील झाले.

"मौलाना आझाद हिदू आहेत का मुसलमान?" वयोवृद्धानं विचारलं.

"ते तर काँग्रेसचे प्रेसिडेंट आहेत."

"मौलाना आझाद हिंदुंचा सगळ्यात मोठा कुत्राय. जसे हे कुत्रे तुमच्यामागं शेपट्या हलवत फिरत असतात, तसाच मौलाना आझादही गांधीच्या मागनं शेपूट हालवत हिंडत असतो."

यावर वयोवृद्धानं अतिशय शांतपणे सांगितलंः

"स्वातंत्र्य सगळ्यांसाठीच आहे. सगळ्या हिंदुस्तानासाठी आहे."

"हिंदुस्तानचं स्वातंत्र्य हिंदुंसाठी असेल, स्वतंत्र पाकिस्तानातच मुसलमान स्वतंत्र होतील."

तेवढ्यात गाणाऱ्या मंडळीतला एक दुबळा, सडपातळ, मळके कपडे घातलेला सरदार काखेत वेताची छडी घट्टपणे धरीत समोर आला, आणि जोरात ओरडून म्हणालाः

"पाकिस्तान माझ्या मुडद्यावर!"

हे ऐकून काँग्रेसवाले हसू लागले.

"चूप बसा चूप!" कुणीतरी त्याला गप्प बसायला सांगितलं. नत्थूलाही त्याचा तीव्र खर्जातला आवाज ऐकून गोंधळल्यासारखं झालं होतं. लोकांना हसत असलेलं पाहून हा एखादा सणकी माणूस असावा हे त्यानं ओळखलं.

पण तो बोलतच राहिलाः "पाकिस्तान त्यांच्या मुडद्यावर उभं राहील हे गांधीजींचं फर्मानय. मीही पाकिस्तान होऊ देणार नाही!"

लोक पुन्हा हसू लागले.

"राग आवर जरनेल."

"बस, बस, जरनेल, कधीतरी गप्प बसत जा," बक्षीजी म्हणाले. त्यामुळे जनरेल जास्तच भडकला.

"मला कुणी गप्प करू शकत नाही. मी नेताजी सुभाष बोसच्या फौजेतला माणूसय्. मी सगळ्यांना ओळखून आहे. तुम्हाला सुद्धा ओळखून आहे..."

लोक हसू लागले.

पण जेव्हा मंडळी पुढे जाऊ लागली तेव्हा रूमी टोपीवाल्यानं रस्ता अडवलाः

"आपण इकडून जाऊ नका, हा मुसलमानांचा मोहल्लाय्."

"का?" वयोवृद्ध म्हणाला, "तुम्ही सगळ्या शहरात पाकिस्तानच्या घोषणा देत हिंडता, कुणी अडवतं का तुम्हाला, आणि आम्ही तर फक्त देशप्रेमाची गाणी गात आहोत."

यावर रूमी टोपीवाला थोडासा दयार्द्र झाल्यासारखा दिसला, आणि म्हणालाः

"आपल्या जायचंय् तर आपण जाऊ शकता, पण आम्ही या कुत्र्यांना मात्र

आमच्या मोहल्ल्यात मुळीच जाऊ देणार नाही."

आणि त्यानं दोन्ही होत फैलावले, जणू पुन्हा रस्ता अडवू लागलाय् असे.

त्याच वेळी नत्थूनं रूमी टोपीवाल्यापासून मागं थोड्याशा अंतरावर मुरादअली उभा होता हे पाहिलं, त्याला पाहताच नत्थूच्या सगळ्या शरीरात झिणझिण्या उठल्या. हा कुठून आला इथं? भिंतीशी सरकत-सरकत नत्थू गाणाऱ्या मंडळीच्या आड झाला. मुरादअलीनं त्याला पाहिलं तर नाही ना? गाणाऱ्या मंडळींच्या सदस्यांच्या मागं उभा राहिल्यानं तो खरोखरच झाकला गेला होता. इथून त्याला मुरादअलीसुद्धा दिसत नव्हता. बराच वेळ उभं राहिल्यानंतर त्यानं मान वाकडी करून पाहिलं. मुरादअली तिथंच उभा होता. आणि दुरूनच वादावादी करणाऱ्या लोकांचं बोलणं ऐकत होता.

नत्थू हळू हळू मागे मागे सरकू लागला. जोपर्यंत हे लोक वादावादी करत उभे असतील तोपर्यंत मुरादअलीही तिथंच पुतळ्यासारखा उभा असणार. इथून पळून जाण्याची हीच वेळ आहे. जर मुरादअलीनं पाहिलं असेल तर तो नक्कीच वस्तीवर जाईल आणि जाब विचारील. सरकत सरकत दूरवर गेल्यानंतर नत्थूनं एकदम पाठ फिरवली. तो जोरजोरात चालू लागला. गल्लीचं वळण वेगानं ओलांडून दिसेनासा झाला आणि मग जोरात पळू लागला.

4

टेकडीवर पोहोचल्यानंतर दोघांनीही आपले घोडे थांबवले. समोर दूरवर रुंद दरी पसरलेली होती. ती पहाडांच्या पायथ्यापर्यंत गेलेली होती. दूर क्षितिजावर सप्तरंगी धूळ उडत आहे असं वाटत होतं. विशाल मैदान, कुठे-कुठे लहान लहान पहाडांच्या रांगा आणि त्याच्या माथ्यावर स्वच्छ निळं आकाश. वर पारदर्शक अनंतात घारी उडत होत्या. डाव्या बाजूला उंच पहाड होता आणि त्याला निळ्या प्रकाशानं झाकलेलं होतं. पहाडाची उंची पश्चिमेकडे कमी होत होत इतकी नाममात्र झाली होती की खालच्या सपाट मैदानाला तिनं स्पर्श केला होता. उजव्या बाजूला दूर धूसरतेत लाली-मायलच्या पर्वतांच्या धूसर आकृत्या दिसत होत्या.

सूर्योदयाच्या वेळचं हे दृश्य दाखवण्यासाठीच रिचर्डनं आपल्या पत्नीला इथं आणलं होतं. रिचर्डनं वळून आपल्या पत्नीच्या म्हणजे लीझाच्या चेहऱ्याकडे पाहिलं. हे दृश्य पाहून तिच्या मनावर काय परिणाम झाला असेल ते त्याला बघायचं

होतं. हे मनोहर दृश्य तो लीझाला अशा तऱ्हेनं सादर करू इच्छीत होता, जणू काही इतके दिवस त्यानं हे दृश्य तिच्यासाठीच एखाद्या नजराण्यासारखं सांभाळून ठेवलेलं होतं.

पहाटेच्या सुंदर हवेत लीझाचे सोनेरी केस हळुवार उडत होते. तिच्या निळ्या डोळ्यात विशेष प्रकारची स्वच्छता आणि चमक होती. फक्त डोळ्यांच्या खाली किंचित सूज येऊ लागलेली होती. कंटाळवाणेपणामुळे सतत बिअर पिण्यानं आणि खूप वेळ झोपून राहिल्यानं ती आलेली होती.

लीझाला आनंदी करावं म्हणूनच त्यानं इथं आणलेलं होतं. या वेळी जवळ जवळ सहा महिन्यांनी लीझा विलायतेहून परतलेली होती, आणि रिचर्डला मागची गोष्ट पुन्हा घडावी असं वाटत नव्हतं-म्हणजे लीझानं या नव्या ठिकाणीही भयंकर कंटाळून पुन्हा विलायतेत परत जावं असं. लीझाला हे शहर आवडलं नाही तर इथं राहणं दोघांसाठीही नरकासारखं होईल. तो दिवसभर ऑफीसात काम करून जेव्हा घरी परतेल तेव्हा दोघांमध्ये पुन्हा भांडण सुरू होईल. सकाळची वेळ नेहमी लीझाबरोबर घालवायची रिचर्डनं मनातल्या मनात पक्कं ठरवलेलं होतं. म्हणूनच गेल्या आठवड्यापासून म्हणजे लीझा आल्यापासून कधी थंडगार रस्त्यावर, कधी टोपी पार्कमध्ये तर कधी घोड्यावरून तो लीझाला घेऊन बाहेर पडत असे. रिचर्डच्या सगळ्या आवडीनिवडीत लक्ष घालायचं आणि त्यातच मन गुंतवून ठेवायचं, याचा आपल्या बाजूनं लीझाही पुरेपूर प्रयत्न करीत होती. जिल्ह्याच्या डेप्युटी कमिशनरची पत्नी म्हणून लीझा एकटीही छावणीच्या मुख्यालयात फिरायची, तेव्हा देशी लोक उठून रामराम घालायचे, पळत-पळत तिची आज्ञा पाळायचे. पण एखाद्यानं किती वेळ एकटं हिंडायचं! डेप्युटी कमिशनरचा वेळ काही स्वतःचा वेळ नसायचा. म्हणून दोघांच्याही मनात, हे फार काळ चालू शकेल की नाही, इच्छा असूनही निभवून नेता येईल की नाही, याविषयी शंका होतीच.

"खूपच सुंदरय," लीझा म्हणाली, "तो समोरचा डोंगर कोणताय? इथूनच हिमालय पर्वतही सुरू होतो की काय?"

"हो, तसं समजायला हरकत नाही," रिचर्डनं उत्साहित होऊन सांगितलं, "आणि ही दरी पुढं जाऊन उंच उंच पर्वतांमधून शेकडो मैल पसरत गेलेली आहे."

"किती विलक्षण शांत दरी आहे ही!" लीझा पुटपुटली.

"नाही लीझा, ही फार ऐतिहासिक दरी आहे. हिंदुस्थानात येणारे सगळे हल्लेखोर याच रस्त्यानं आले होते. मध्य आशियातले आणि मंगोलियातलेही." रिचर्डचा उत्साह वाढत चालला होता. "अलेक्झांडरही याच रस्त्यानं हिंदुस्थानात आला होता. पुढं जाऊन ही दरी दोन भागांत विभाजित होते. एक रस्ता तिबेटकडे

जातो, आणि दुसरा अफगाणिस्तानाकडे. याच वाटेनं व्यापार करणारे लोक आणि बुद्ध धर्माचे प्रचारकही दूरदूरवर गेलेले होते. फार ऐतिहासिक प्रदेशय् हा! मी तर गेल्या महिन्यापासून या भागात हिंडतोय. इतिहासकारासाठी तर हा प्रदेश अनमोल आहे. जागोजागी प्राचीन इमारतींचे अवशेष आहेत. किल्ले, बुद्धविहार, धर्मशाळा..."

"रिचर्ड, तू तर जणू काही हा तुझा स्वतःचाच देशय् असं बोलतोयस!" हसत हसत लीझा म्हणाली.

"देश आपला नाहीय लीझा, पण इतिहास हा विषय तर आपला आहे ना!" रिचर्डनं स्मितहास्य करीत सांगितलं. मग घोडेसवारीच्या वेतानं समोरचा पहाड दाखवत तो म्हणला, "त्या पर्वताच्या मागं अंदाजे सतरा मैलांच्या अंतरावर तक्षशिलेचे भग्नावशेष आहेत. तक्षशिला माहितंय?"

"हो, नाव ऐकलंय."

"तिथं एकेकाळी प्रचंड मोठी युनिव्हर्सिटी होती."

लीझा गालातल्या गालात हसली. रिचर्ड या पर्वतमय प्रदेशाचा सगळा इतिहास ऐकवील, हे तिच्या लक्षात आलं. तिला रिचर्डचा उत्साह खूपच आवडला. रिचर्ड या कोरड्या पत्थरांच्या संदर्भातही फार उत्साहानं बोलू शकतो. त्याच्यात लहान मुलांसारखं कुतूहल आहे, डेप्युटी कमिशनर असूनही एक प्रकारचा भोळेपणा आहे. तिलाही या गोष्टीत रस असता तर किती चांगलं झालं असतं.

"तिथं एक म्युझियमही आहे, ते तुला नक्कीच आवडेल. तिथून नुकतीच मी एक गौतम बुद्धाची मूर्ती आणलीय."

"का, आधी तुझ्याजवळ काय कमी मूर्ती होत्या म्हणून आणखी एकाची भर घातलीस?"

"तिथं जवळच खोदकाम चालू होतं. कितीतरी मूर्ती सापडल्यात. क्युरेटरनं एक मूर्ती मला भेट दिली."

लीझाच्या डोळ्यांसमोर बंगल्यातली मोठी खोली फिरू लागली. त्या रिचर्डनं अनेक प्रकारच्या वेगवेगळ्या मूर्ती आणि भारतीय लोककलांचे नमुने सुशोभित करून ठेवले होते, आणि कपाटं पुस्तकांनी गच्च भरून ठेवलेली होती. हेच वेड केनियातही त्याच्या डोक्यात असायचं. तिथं तो आफ्रिकेतल्या लोक-कलांचे नमुने जमा करून ठेवायचा. वेगवेगळ्या प्रकारे धनुष्य-बाण, मणी, पक्ष्यांची पिसं, टोटम वगैरे. आणि इथं मूर्ती जमा करणं चाललंय.

लीझाचं लक्ष पुन्हा सभोवारच्या दृश्याकडे गेलं. डाव्या बाजूला खाली लहान-लहान झाडांचं गर्द जंगल होतं, त्याच जंगलातल्या वाटेनं घोड्यावर बसून ते या टेकडीवर आले होते. जंगलातून बाहेर येऊन टेकडीवर आल्यावर हे

दृश्य स्पष्ट दिसू लागलं होतं. उजव्या बाजूला लहान-लहान टेकड्या होत्या. त्यांच्यासमोर विशाल मैदान पसरलेलं होतं आणि ते दूरवर धूसरतेत विलीन झालेलं होतं.

"इथली माती कशी आहे लाल-लाल रंगाची?" लीझा टेकड्यांकडे पाहून पुटपुटली. मग रिचर्डकडे वळून म्हणाली, "रस्ता कुठून आहे? आपल्याला पुन्हा जंगलातल्या वाटेनंच परत जायचंय का?" मग थोड्या विनोदानं म्हणाली, "अरे, ती सडक तरी दाखव. अलेक्झांडर जिच्यावरून हिंदुस्तानात आला होता ती."

"त्या काळी पक्के रस्ते नव्हते, लीझा. पण एक खूप जुना रस्ता-जवळ जवळ चारशे वर्षांचा-त्या टेकडाच्या पाठीमागून गेलेला आहे."

लीझानं रिचर्डकडे पाहिलं. जाडजूड फ्रेमच्या चष्म्याखाली रिचर्डच्या चेहऱ्याचा खालचा भाग फारच नाजुक वाटत होता. लीझाला वाटलं, रिचर्डनं त्या भागातल्या दगडांच्या आणि उद्ध्वस्त अवशेषांच्या गोष्टी सोडून लीझाशी प्रेमाच्या गोष्टी बोलाव्यात. पण रिचर्ड आपल्याच नादात बोलू लागला होता.

"या प्रदेशातले लोकही फार प्राचीन काळापासून, शेकडो वर्षांपासून इथं वसलेले आहेत." मग लीझाकडे वळून तो म्हणाला, "इथल्या लोकांना तू नीट निरखून पाहिलं आहेस का? सगळ्यांची चेहरेपट्टी सारखीच आहे, एकच प्रकारचं नाक, ओठ, लांबरुंद कपाळ, ब्राऊन रंगाचे डोळे- इथल्या लोकांचे डोळे ब्राऊन आहेत, तुझ्या लक्षात आलंय कधी, लीझा?"

"एकाच वंशाचे कसे असू शकतात? रिचर्ड, तू तर म्हणालास या वाटेनं वेगवेगळ्या प्रकारचे लोक आलेले आहेत."

"नाही-नाही, लीझा, हीच तर गोष्ट विसरतात लोक. " रिचर्डचा आवाज उत्तेजित झालेला होता, जणू तो आपला एखादा शोध सिद्ध करू इच्छीत होता. "जे लोक मध्य आशियातून सगळ्यात आधी इथं आले, अनेक शतकांनंतर त्यांचीच नातवंडं-पतवंडं इतर देशांतून इथं आली. वंश सगळ्यांचा एकच आहे. ते लोक जे स्वतःला आर्य म्हणवून घेत, हजारो वर्षांपूर्वी इथं आले आणि तेही जे स्वतःला मुसलमान म्हणवून घेत होते आणि जे सुमारे हजार वर्षांपूर्वी इथं आले -- एकाच वंशाचे आहेत ते सगळे! सगळे मूळ एकाच जातीचे लोक आहेत हे."

"या गोष्टी इथल्या लोकांनाही माहीतच असतील की!"

"इथल्या लोकांना काहीच माहीत नाहीय. यांना आम्ही जे सांगत असतो तेवढंच थोडंसं माहीतय." मग थोडा वेळ गप्प राहून तो म्हणाला, "या लोकांना आपला इतिहासच माहीत नाहीय. केवळ ते जगत असतात, एवढंच!"

लीझाला कंटाळा येऊ लागला. रिचर्ड एखाद्या नादात असला की सगळंच विसरून जातो. जितका जास्त तो आपल्या नादात हरवून जायचा तितकी जास्त

लीझा मागे फेकली जायची. आपल्या पुस्तकांत हरवून गेलेला रिचर्ड एक तर डेप्युटी कमिशनर असायचा किंवा मग इतिहाससंशोधक. त्याचं लीझावर खूप प्रेम होतं, पण लीझासाठी त्याच्याजवळ वेळच नव्हता. घरात कपाटासमोर उभ्या उभ्या एखाद्या पुस्तकाची पानं उलटू लागला की तो त्यातच बुडून जायचा. त्यामुळेच लीझाला जेव्हा कंटाळा येऊ लागायचा तेव्हा तिच्या कंटाळ्याचा ठावठिकाणाच नसायचा. प्रत्येक गोष्टीची तोडफोड करावी असं तिला वाटायचं. देशी लोक तिला विषासारखे वाटायचे, आणि शेवटी ती एकतर 'नर्व्हस ब्रेकडाऊन'ची शिकार व्हायची, किंवा मग वर्ष-सहा महिन्यांसाठी विलायतेत परत जायची.

"इथं एखादा तरी पिकनिक स्पॉट आहे का?" लीझानं रिचर्डचं बोलणं बंद करण्यासाठी विचारलं.

रिचर्डला एकदम धक्का बसल्यासारखं झालं, पण हा प्रश्नसुद्धा त्याच्यासाठी फारसा विसंगत नव्हता.

"खूप आहेत." मग आपल्या छडीनं डाव्या बाजूचा पर्वतमाथा दाखवत तो म्हणाला:

"त्या पहाडाच्या पायथ्याशी धबधबे आहेत आणि गर्द झाडांच्या राया आहेत. पाण्याचे झरे पायथ्यापर्यंत जाऊन पहाडातून तिथं कोसळतात. फारच सुंदर जागा आहे ती. हिंदूंनी धबधब्याच्या आजूबाजूला दगडांच्या भिंती बांधून तिथं तलाव केले आहेत. एकेका धबधब्याला वेगवेगळं नाव दिलं आहे,-रामाचं, सीतेचं आणि त्यांच्या मायथॉलजीतल्या इतर व्यक्तींचं," असं म्हणत रिचर्डनं स्मितहास्य केलं, आणि ही नावं लीझाला फारच विचित्र आणि अनोळखी वाटली असतील, हे त्याच्या लक्षात आलं. "अशी खूप स्थळं आहेत," तो बोलतच होता, "जागोजागी अनोळखी पीरांच्या कबरी आहेत. तिच्यावर लोक दिवा लावत असतात. जुने किल्ले आहेत, मंदिरं आहेत..." मग वेताच्या छडीनं त्याच पहाडाच्या पायथ्याशी पसरलेली आणखी एक झाडांची राई दाखवत तो म्हणाला, "तिथं, थोड्या उजव्या बाजूला एक फारच सुंदर पिकनिक-स्पॉट आहे. तिथं मुसलमानांच्या कुण्यातरी पीराची कबरय्. वसंत ऋतूत एक विलक्षण यात्रा तिथं भरत असते. दूरदूरहून नाचणाऱ्या- गाणाऱ्या बायका येतात आणि पंधरा दिवस तिथं कार्यक्रम होतात. दिवसा लोक जुगार खेळतात आणि रात्री नाचगाणी होतात. कधीतरी घेऊन जाईन मी तुला तिथं."

"अशात तिथं यात्रा भरलेलीय का?"

"हो, आहे. पण या दिवसात तिथं जाणं बरं नाहीय."

"कां?"

"हल्ली इथं हिंदू-मुसलमानात फार तणावाचं वातावरणय्. दंगली वगैरे व्हायची पण शक्यता आहे."

लीझानं हिंदू आणि मुसलमानांबाबत ऐकलेलं होतं, पण तिला त्यांच्याबद्दल फारच कमी माहिती होती.

"मला तर अजून हिंदू अणि मुसलमान वेगवेगळे असे ओळखताच येत नाहीत. रिचर्ड, तुला माणूस पाहिलं की ओळखता येतं का हा हिंदू, हा मुसलमान, असं?"

"हो, मी ओळखू शकतो."

"आपल्या घरचा स्वैपाकी हिंदू आहे का मुसलमान?"

"मुसलमानय्."

"तुला कसं माहीतय्?"

"त्याच्या नावामुळे, त्याच्या छोट्याशा दाढीमुळे, त्याच्या पोशाखामुळेही. शिवाय तो नमाज पढतो. इतकंच काय, त्याच्या खाण्या-पिण्याच्या पद्धतीही वेगळ्या असतात."

"तुला सगळं माहीतय्, रिचर्ड?"

"थोडं-थोडं माहीतय्."

"तुला किती गोष्टी माहीत आहेत. किती गोष्टी तुला कळतात. मला तर काहीच माहीत नाही. मलाही सांगत जा थोडं थोडं, रिचर्ड. मलाही समजून घ्यायचंय. आणि तुझा तो सेक्रेटरी, त्या दिवशी स्टेशनवर आला होता तो स्वच्छ पांढऱ्या दातांचा, तो कोणय् ? हिंदू की मुसलमान?"

"तो हिंदू आहे."

"कसं ओळखलंस तू?"

"त्याच्या नावावरून."

"तुला नावावरूनच कळतं का?"

"फारच सोपंय्, लीझा. मुसलमानांच्या नावाच्या शेवटी अली, दीन, अहमद इत्यादी शब्द येतात, आणि हिंदूंच्या नावांच्या पुढं असे शब्द नसतात, लालचंद, राम वगैरे पुढं लागलेलं असतं. रोशनलाल असेल तर हिंदू, रोशनदीन असेल तर मुसलमान, इकबालचंद असेल तर हिंदू आणि इकबाल अहमद असेल तर मुसलमान."

"इतकं सगळं तर मला कधीच कळायचं नाही," लीझा निरुत्साही होऊन म्हणाली.

"आणि तो टर्बनवाला आदमी कोणय्? तुमची गाडी चालवत असतो तो?

ज्याला लांबलचक दाढी आहे?"

"तो शीख आहे."

"त्याला ओळखणं अवघड नाहीय." लीझा हसून म्हणाली.

"सगळ्या शीखांच्या नावाच्या अखेरीस 'सिंह' असतं," रिचर्ड म्हणाला.

दोघं टेकडीवरून खाली उतरू लागले. हवेत हळू-हळू उष्णता वाढू लागली होती. सूर्य उगवला होता आणि वातावरणावरचा रहस्याचा पगडा हळू-हळू अदृश्य होऊ लागला होता.

"या प्रदेशात भटकणं खूपच मस्त असतं. तुला नक्कीच आवडेल लीझा. आपण दर वीक-एंडला कुठंतरी जातच जाऊ."

रिचर्डचं घोडं पुढे-पुढे चाललेलं होतं. दोघंही दगड-गोट्यांनी आटवलेला कोरडा नाला ओलांडून पार करीत होते.

"या वीक-एंडला कुठं जायचं?... तक्षशिलेला?"

लीझाच्या आवाजात किंचित् उपहास असल्याचा रिचर्डला भास झाला. रिचर्डसाठी तक्षशिला फारच सुंदर आणि महत्त्वपूर्ण स्थळ होतं. तिथं तो घंटोन् घंटे भटकत राहायचा, पुन्हा पुन्हा त्याला तिथं जावं वाटायचं. पण लीझा? लीझालासुद्धा भग्नावशेषात भटकणं आवडत असेल का?

"काही दिवस तरी आपल्याला तिथं जाता येणार नाही. लीझा. हल्ली शहरात तणावपूर्ण वातावरणय्..जेव्हा स्थिती सुधारेल तेव्हा जाऊ. या वीक-एंडला तर..." रिचर्डला काय बोलावं ते सुचलंच नाही. येणारा वीक-एंड कसा असेल, तो लीझाला घेऊन जाऊ शकेल की नाही, त्याला नक्की माहीत नव्हतं.

"जाऊत कुठं तरी," तो पुटपुटला आणि खाली गेल्यावर त्यानं घोड्याचा लगाम वळवला.

न्याहारी करण्यापूर्वी रिचर्ड आणि लीझा बंगल्यातल्या असंख्य खोल्या ओलांडून मोठ्या दालनात येऊन थांबले. एप्रिल सुरू झाल्यावर दिवस चढू लागताच खिडक्यांवर आणि दारांवर पडदे लावले जात. त्यामुळे घरात स्निग्ध अंधार भरलेला असायचा आणि दिवसासुद्धा दिव्यांच्या उजेडात आवश्यकता भासू लागायची. सगळ्या बाजूंना लावलेल्या कपाटातून पुस्तकं गच्च भरलेली होती. त्यांच्या मधोमध जागोजागी भिंतींना लागून लाकडांच्या उंच आधारावर बुद्ध आणि बोधिसत्त्वाच्या अनेक ऊर्ध्वकाय मूर्ती ठेवलेल्या होत्या. प्रत्येक मूर्तीच्यावर स्वतंत्र आणि वेगवेगळा दिवा लावलेला होता. बटन दाबताच मूर्तीवर प्रकाश पडायचा, मूर्तीचा चेहरा एकदम खुलून दिसायचा. याशिवाय भिंतींवर भारतीय चित्रकलेची अनेक चित्रं, शेगडीसारख्या उंच जागेवर एक बाहुली आणि ताम्रपत्रावर लिहिलेला एक

ग्रंथ ठेवलेला होता. त्याच्यासमोर लाकडाच्या बुंध्याच्या आधारानं शिलालेखाचा एक भला मोठा तुकडा ठेवलेला होता. जवळच तीन स्टूल्स आणि काळ्या कुळकुळीत लाकडाची एक लांबट बुटकी तिपाई ठेवलेली होती. रिचर्ड इथं आपला पाईप ओढत वाचत बसलेला असायचा. इथंच स्वैपाकी स्टोव्हवर पाण्यानं भरलेली किटली आणि चहाची भांडी ठेवून जायचा. रिचर्डला स्वतः चहा करून पिण्याची सवय होती. तिपाईवर अर्धवट उघडून ठेवलेली पुस्तकं, मासिकं ठेवलेली होती, आणि एक पाईप-स्टँड होता. त्यात वेगवेगळ्या प्रकारचे सात-आठ पाईप ठेवलेले होते. तिपाईबरोबर वरच मोठ्या गोलाकार शेडचा दिवा लटकत होता. दिवा लावल्यावर प्रकाशाचे वर्तुळ याच तीन स्टुलांवर आणि तिपाईवरच पडलेलं असायचं. बाकीच्या दालनात अंधारच असायचा.

लीझाच्या कमरेभोवती एका हातानं विळखा घालून रिचर्ड लीझाला एकेक बुद्धमूर्ती दाखवत होता. या सगळ्या मूर्ती त्यानं मधल्या काळात लीझा विलायतेला गेल्यावर जमा केलेल्या होत्या.

ते बुद्धाच्या मूर्तीजवळ येऊन उभे राहिले.

"बंगल्याच्या बाहेर असलो की हिंदुस्तानातल्या एखाद्या शहरात असतो. बंगल्यात परतलो की सबंध हिंदुस्तानात परतल्यासारखं वाटतं," रिचर्ड सांगत होता.

जाडजूड काळ्या फ्रेमचा चष्मा, तोंडात पाइप, कोपरांवर जरतारी गोंडे लावलेला जुना कोट आणि खाली कॉर्डरायची निळी ढगळ पँट घालून एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जाताना रिचर्ड एखाद्या म्युझियमचा क्यूरेटरच आहे असं वाटत होतं.

"बुद्धाच्या मूर्तीचं सर्वांत मोठं वैशिष्ट्य म्हणजे मंद स्मित आहे. ते ओठांच्या आजूबाजूला खेळत असतं. बुद्धाचा चेहरा हे स्मित ठळकपणे दिसू लागेल अशा प्रकाशात ठेवला पाहिजे. थांब, मी तुला दाखवतो," म्हणत रिचर्डनं समोर ठेवलेली बुद्धमूर्ती थोडीशी उजव्या बाजूला वळवली आणि दिव्याचं बटन दाबलं. त्यामुळे मूर्तीच्या ऐन डोक्यावर ठेवलेल्या दिव्याचा प्रकाश मूर्तीवर पडला.

"पाहिलंस, लीझा?" रिचर्डनं आनंदित होऊन विचारलं. अचानक बुद्धाच्या चेहऱ्यावर स्मित झळकतं आहे- शांत, मंद किंचित उपहासपूर्ण स्मित-असं लीझाला वाटलं.

"स्मितहास्य ओठांच्या कोनात लपलेलं असतं. पंचेचाळीस अंशाचा कोन करून मंद प्रकाश टाकला की जणू ते उफाळून बाहेर येतं. आता हाच कोन वळवला की हे स्मित जवळजवळ अदृश्य होऊन जाईल..."

लीझानं वळून रिचर्डच्या चेहऱ्याकडे पाहिलं. हे पुरूष किती विचित्र

असतात, किती रस घेऊन दगडांवर, भग्नावशेषांवर बोलत बसतात. कुठलीही बाई ह्या गोष्टी माहीत असूनही इतकी उत्तेजित होणार नाही, इतक्या बढाया मारणार नाही. तिनं रिचर्डला एका बाजूला ढकललं आणि त्याच्या खांद्यावर आपला गाल टेकवला.

"बुद्धाच्या मूर्तीचं हेच एक फार मोठं वैशिष्ट्यय्. एक मंद असं स्मित बुद्धाच्या ओठांवर खेळत असतं," रिचर्ड म्हणाला, आणि त्यानं लीझाच्या केसांचं चुंबन घेतलं.

प्रत्येक खोलीत वेगवेगळ्या प्रकारचे दिवे होते. जिथं जिथं म्हणून बसायची जागा होती तिथून घंटीची तार किचनपर्यंत किंवा बाहेर व्हरांड्यापर्यंत गेलेली होती.

या सगळ्या खोल्यांतून हिंडणाऱ्या रिचर्डला पाहून कुणालाही वाटलं नसतं की तो जिल्ह्याचा सगळ्यात मोठा ऑफिसर आहे. इथं तर तो भारतीय इतिहासाचा मर्मज्ञ होता, भारतीय कलेचा पारखी होता. पण जेव्हा तो प्रशासकाच्या खुर्चीत बसायचा तेव्हा मात्र तो ब्रिटिश साम्राज्याचा प्रतिनिधी असायचा आणि लंडनमध्ये ठरवण्यात आलेल्या नीतीचं पालन करायचा. एक काम दुसऱ्या कामापासून पूर्ण वेगळं ठेवायचं, एका भावनेपासून दुसरी भावना वेगळी ठेवायची हे त्याच्या प्रशिक्षणाचं, त्याच्या स्वभावाचंच वैशिष्ट्य होतं. तो एका कामातून दुसऱ्या कामात अगदी सहजपणे स्वतःला गुंतवून घ्यायचा, स्वतःच्या आवडीनिवडी सरकारी कामापासून अगदी वेगळ्या ठेवायचा, त्यांच्याकडे तो वेगळ्या पद्धतीनं पाहू शकायचा. एका वेगळ्या प्रकारच्या शिस्तीत, वेगळ्याच अनुशासनात त्याचं आयुष्य फिरत राहायचं. आठवड्यातून तीन दिवस ऑफिसात जायचा, जिल्हा मॅजिस्ट्रेटच्या भूमिकेत तो सगळ्या तक्रारी ऐकायचा. जेव्हा न्यायाधीशाच्या खुर्चीत बसलेला असायचा तेव्हा तो राज्यकर्त्यांचा प्रतिनिधी आहे आणि नेटिव्ह लोकांचे खटले ऐकत आहे, हे पूर्णपणे विसरून जायचा तेव्हा तो न्याय द्यायचा आणि इंडियन पिनल कोड काटेकोरपणे लागू करायचा. एका क्षेत्रातले विचार आणि भावना दुसऱ्या क्षेत्रात कधीच गुंतून जायच्या नाहीत. त्यामुळेच त्याला मानसिक त्रासाला सामोरं जावं लागत नसे, तो कधीच द्विधा मनःस्थितीत अडकून पडायचा नाही. त्याच्या स्वतःच्या श्रद्धा कशावर होत्या, स्वतःच्या धारणा काय होत्या याबाबत निश्चितपणे काहीही सांगता येणं कठिण होतं. कदाचित रिचर्डनं हे प्रश्न स्वतःला कधीच विचारले नव्हते. जेव्हा केव्हा संभ्रम निर्माण व्हायचे तेव्हा तो आपल्या संवेदना, आपले विचार एका डायरीत ओतून द्यायचा. प्रशासनाच्या क्षेत्रात त्याच्या स्वतःच्या मान्यतांना मुळीच जागा नव्हती. तिथं ते विसंगतही असायचे. आपलं आचरण आपल्या पटलेल्या गोष्टींसारखंच असावं हा विचार एक खोटा आदर्शवाद आहे, आणि सिव्हिल सर्विसमध्ये भरती झाल्या झाल्या ऑफिसर्स आपला पिंड सोडून देतात.

मग रिचर्डची भूमिका काय होती, प्रशासनात त्याचं स्वतःचं कर्तृत्व काय होतं? तो ब्रिटिश सरकारचे नीतीनियम कार्यान्वित करीत असे अशाच गोष्टीत होतं. तीक्ष्ण दृष्टीत होतं, समजूतदारपणात होतं. त्याच्या साहाय्यानं तो स्थिती समजून घेत असे. तथ्याला धरून ठेवत असे; कसलाही कानोसा न घेता तो ब्रिटिश सरकारच्या नीतीला अंमलबजावणीचा पोशाख चढवत असे अशा चौकशीत असे. खरं तर त्याच्या आवडीनिवडी काय होत्या असा प्रश्नच विसंगत आहे. कुठलीही व्यक्ती आपला व्यवसाय निवडताना तिच्या नैतिक बाजूचा विचार कधी करत नसते, ती केवळ स्वतःच्या लाभाचा आणि स्व-हिताचाच विचार करणं योग्य समजत असते.

परस्परांच्या कमरेभोवती हात टाकून दोघंही डायनिंग रूमकडे गेले. लीझाला घरातील हीच खोली सर्वात जास्त प्रिय होती. मायफळासारख्या लाकडानं बनवलेल्या काळ्या रंगाच्या वर्तुळाकार टेबलाच्या ऐन मध्यभागी पितळेचं एक लांबरुंद गोल तबक ठेवलेलं होतं, आणि त्यात खास वेचून आणलेल्या लाल गुलाबाची फुलं गच्च भरून ठेवलेली होती. या तबकाच्या नीट वर जाळीदार शेड असलेला विजेचा दिवा होता, तो छतापासून सरळ बशीवरच लटकत होता. प्रकाशाचं वर्तुळ त्या तबकावरच पडलेलं होतं आणि जाळीदार शेडमधून गाळून येणारा प्रकाश टेबलावर पडलेला होता, टेबलावरच्या सुंदर चिनीमातीच्या प्लेटांवर आणि त्यांच्या आजूबाजूला ठेवलेल्या लाल रंगाच्या नॅपकिन्सवर पडलेला होता. रिचर्डला अशा प्रकारच्या सजावटीत फार रस असायचा आणि रिचर्डसोबत राहून त्याच्याच आवडीनिवडीप्रमाणं वागणं आवश्यक होतं हे लीझाला माहीत होतं.

न्याहारीसाठी टेबलाकडे जाण्यापूर्वी रिचर्ड उंबऱ्याजवळ थबकून उभा राहिला.

"कसला विचार करतोयस?" लीझानं रिचर्डच्या खांद्यावर डोकं टेकवत विचारलं.

"विचार करतोय की कुठून सुरू करावं."

"काय सुरू करायचंय?"

"तुला इथल्या लोकांबद्दल माहिती करून घ्यायची उत्सुकताय ना? इथल्या लोकांच्या एकंदर स्थितीबद्दल..."

"मला काहीही जाणून घ्यायचं नाहीय. मला तू ऑफिसातून कधी परतणार आहेस एवढीच माहिती हवीय!"

आणि लीझानं हात पुढे करून रिचर्डच्या छातीवरून हलक्यानं गोंजारायला सुरुवात केली. रिचर्डनं वाकून तिच्या ओठांचं चुंबन घेतलं.

"आतापासूनच कंटाळायला लागलीस का?"

क्षितिजावर एखाद्या ढगाचा तुकडा प्रकट झालाय, तो हळू हळू मोठा मोठा

होऊ लागेल, गडद होईल आणि वेळ येताच सगळं आभाळ झाकून घेईल, असा लीझाला भास झाला.

रिचर्डनं लीझाला आपल्या बाहूत अधिकच जोरानं आवळून घेतलं. पण रिचर्डला या प्रणयानं काही खास आनंद होत नव्हता. याच्या मागे या वेळी लीझाबरोबरचा काळ कसा जाईल अशी एक शंकाही होती. आपल्या ओठांनी लीझाचे केस, कपाळ आणि डोळे गोंजारत असताना त्याला फारसं उत्तेजित झाल्यासारखं वाटत नव्हतं. रात्री ज्या देहाला तो उत्तेजित होऊन आणि आग्रहपूर्वक लीझाच्या देहासोबत घट्टपणे चिकटवून ठेवत असे तोच देह त्याला आता स्थूल आणि मांसल वाटू लागला होता. लीझाला रिझवण्यासाठी तो प्रेमाचा नुसता अभिनयच करीत होता, म्हणजे एक प्रकारे कर्तव्यच पार पाडीत होता.

त्याच वेळी टेबलाच्या मागच्या अंधारात उभा असलेला स्वैपाकी हळूच पुढं आला. प्रकाशाच्या वर्तुळात येताच त्याच्या पांढऱ्याशुभ्र पोशाखाच्या वर बांधलेला लाल रंगाचा कंबरपट्टा चमकू लागला. दबलेल्या पायांनी, किंचितही आवाज होऊ न देता तो टेबलावर न्याहारीचं सामान ठेवू लागला.

लीझा आणि रिचर्ड पूर्वीसारखेच बाहूत विसावलेले होते. आधी आधी जेव्हा ते उघड्या दारात एकमेकांशी प्रेम करीत असत आणि स्वैपाकी किंवा नोकर काही कामानिमित्त येई तेव्हा लीझा थबकून दूर व्हायची, पण रिचर्ड तिला तसाच मिठीत घेऊन उभं राहायचा आणि स्वैपाकी आपलं काम करीत असायचा. लाजून लीझा आपले डोळे बंद करून घ्यायची आणि स्वैपाक्याचं अस्तित्व विसरून जायचा प्रयत्न करायची. पण स्वैपाकी तर एक नेटिव्ह, शिवाय एक भलताच सामान्य माणूस, म्हणून त्याच्या उपस्थितीकडे लक्ष देण्याचं कारण नव्हतं, एवढं हळू हळू तिला कळून चुकलं होतं.

"या वेळी तुला नक्की कशात तरी मन गुंतवून घ्यायलाच हवं, लीझा."

"कशात, कुठल्या कामात?"

"किती तरी कामं आहेत. डेप्युटी कमिशनरची पत्नी म्हणजे जिल्ह्याची पहिली महिला समजली जाते, तू जे काम हाती घेशील त्यात तुला इतर ऑफिसरच्या बायका मदत करतील."

"मला माहितंय, माहितंय. रेड-क्रॉससाठी वर्गणी जमवा, फ्लॉवर-शो भरवा, मुलांसाठी काहीतरी करा, जवानांच्या मदतीसाठी कपडे आणि बूट जमवा, हेच ना?"

"आणखी एक संस्था इथं सुरू करायचा विचारय! जनावरांची देखभाल करण्यासाठी, संरक्षण करण्यासाठी, इथं अजून तरी अशा प्रकारची कुठलीही संस्था नाहीय, कँटोन्मेंटच्या रस्त्यावर बेवारशी कुत्री हिंडत असतात, त्यांना दूर करणं, टांग्यांना म्हातारे न् लंगडे घोडे जुंपलेले असतात त्यांना -"

"त्यांचं काय करायचं?"

"त्यांना मारून टाकलं पाहिजे. त्यांच्याकडून काम करून घेणं तर अन्यायाचंय. बेवारशी कुत्री रोगांचा फैलाव करतात, पागल झाली की लोकांना चावत सुटतात. तू एखादं काम निवड. तुला रस वाटेल असं."

"तू तर डेप्युटी कमिशनर आहेस, आणि मी कुत्री मारायचं काम करू? मला काय गरज़?" ती म्हणाली, "तू माझी चेष्टा करू लागलायस. तू नेहमीच अशी चेष्टा करत असतोस माझी!"

"मी चेष्टा करीत नाहीय, तू कुठल्यातरी कामात रस घ्यावास अशी माझी इच्छाय."

"मी तुझ्या कामात नक्कीच रस घेईन. तू सकाळी सांगत होतास ते मला सांग, हिंदुस्तानी लोकांबद्दलचं."

रिचर्डनं स्मितहास्य केलं.

"तर ऐक, सगळे हिंदुस्तानी लोक चिडचिड्या स्वभावाचे असतात, बारीक सारीक कारणावरून भडकून उठतात, धर्माच्या नावावर खून पाडतात, सगळेच व्यक्तिवादी असतात आणि ... आणि सगळ्यांना गोऱ्या कातडीच्या बायकाच आवडतात..."

शेवटचं वाक्य ऐकून लीझाला वाटलं की रिचर्ड पुन्हा चेष्टा करू लागला आहे. लीझाच्या दृष्टीनं तो फार विद्वान आणि योग्य माणूस होता. तिला हेही जाणवत होतं की तो लीझाला फार अडाणी स्त्री समजायचा. आणि त्याच्या बोलण्यात बहुधा उपहास लपलेला असायचा. गंभीर विषयावर बोलत असतानाही मधेच असं एखादं वाक्य उच्चारायचा की वाटावं चेष्टाच करतोय. त्यामुळे त्याच्या गंभीर गोष्टीत खरंच तथ्य आहे की ते सगळंच चेष्टेनं भरलेलं आहे अशी लीझाला शंका वाटायची.

"तू माझ्याशी एकही गोष्ट गंभीरपणे बोलत नाहीस," लीझानं तक्रारीच्या सुरात सांगितलं.

"गंभीरपणे बोलण्याचा उपयोग तरी काय आहे?" रिचर्डनं शून्य मनानं सांगितलं, "हे बघ लीझा, इथं कदाचित काहीतरी गोंधळ होईल."

लीझानं डोळे वर करून रिचर्डच्या चेहऱ्याकडे पाहिलं.

"कसला गोंधळ? पुन्हा लढाई होईल?"

"नाही, पण हिंदू-मुसलमानांमध्ये तणाव वाढू लागलाय. कदाचित दंगलीही होतील."

"हे लोक आपापसात लढतील? लंडनमध्ये तू सांगत होतास की हे लोक तुमच्या विरोधात लढतायत."

"आमच्याविरुद्धही लढतायत आणि आपपसातही लढतायत."

"काय म्हणतोयस तू? तू पुन्हा चेष्टा तर करत नाहीस ना?"

"धर्माच्या नावानं आपापसात लढतायत, देशाच्या नावानं आपल्या विरोधात लढतायत," रिचर्ड हसून म्हणाला.

"शहाणपणा करू नकोस, रिचर्ड. मला सगळं माहितय. देशाच्या नावानं हे लोक तुमच्याशी लढतायत आणि धर्माच्या नावानं तुम्ही त्यांना आपापसात लढायला लावता. का, बरोबरय की नाही?"

"आम्ही लढवत नाही, लिझा, हे स्वतःच लढत असतात."

"पण तुम्ही त्यांना लढण्यापासून परावृत्तही करू शकता. शेवटी ते तर एकाच जातीचे लोक आहेत की!"

रिचर्डला आपल्या बायकोचा भोळेपणा आवडला. त्यानं वाकून लीझाच्या गालाचं चुंबन घेतलं. मग म्हणालाः

"डार्लिंग, राज्य करणारे प्रजेत कोणकोणत्या गोष्टीत साधर्म्य आहे हे बघत नाहीत. त्यांना तर ते कोणकोणत्या बाबतीत एकमेकांपासून वेगळे आहेत यातच रस असतो."

त्याच वेळी स्वैपाक्यानं ट्रे आणला. त्याला पाहून लीझा म्हणाली, "हा हिंदू आहे का मुसलमान?"

"तूच सांग", रिचर्ड म्हणाला.

लीझा खूप वेळ त्या माणसाकडे बघत राहिली. ट्रेमधलं सामान काढून दिल्यानंतर तो पुतळ्यासारखा स्तब्ध उभा होता.

"हिन्दू आहे."

रिचर्ड हसला, "चूकय."

"का बरं?"

"नीट बघ पुन्हा."

लीझानं पुन्हा काळजीपूर्वक पाहिलं, "शीख आहे, त्याला दाढी आहे आणि डोक्यावर फेटा आहे."

रिचर्डला पुन्हा हसू आलं. स्वैपाकी अजूनही मूर्तीसारखा निश्चल उभा होता. त्याच्या चेहऱ्यावरची एकही रेषा हलली नव्हती.

"यानं थोडीशी दाढी कापलेली आहे. शीख लोक दाढी कापू शकत नाहीत. ते त्यांच्या धर्माच्या विरुद्धय."

"पण हे तर तू मला सांगितलंच नव्हतंस," लीझा म्हणाली.

"मी अजून कितीतरी गोष्टी तुला सांगितल्या नाहीत."

"उदाहरणार्थ?"

"शीखांच्या पाच खुणा असतात, केसांशिवाय आणखीही बाकीच्या चार, हिंदूंच्या डोक्यावर शेंडी असते, आणि मुसलमानांच्या काही विशेष खुणा असतात. तसंच त्यांच्या खाण्या-पिण्याचंही असतं. हिंदू गायीचं मांस कधीच खात नाहीत, आणि मुसलमान डुकराचं मांस खात नाहीत. शीख लोक झटक्याचंच मांस खातात, पण मुसलमान हळूहळू गळा कापून मारलेल्या पशूचं मांस खातात..."

"तुला काही मी या सगळ्या गोष्टी शिकाव्यात असं वाटत नाही. इतक्या सगळ्या गोष्टी लक्षात ठेवणं कसं काय शक्यय?" मग स्वैपाक्याकडे पाहत लीझा म्हणाली, " हे सगळं माहीत झाल्यावर मला पाहाताक्षणीच सांगता येईल का की हा माणूस हिंदू आहे की मुसलमान? एकेक खूण पाहिल्याशिवाय कुणाला सांगता येणारय?" मग ती हसून म्हणाली, "मी अगदी शर्त लावून सांगू शकते की कोण हिंदूय, कोण मुसलमानय. ते खुद्द या लोकांनासुद्धा कळत नसेल. आणि रिचर्ड, तूसुद्धा खोटं बोलतोयस, तुला सुद्धा कळत नसेल ते."

मग स्वैपाक्याकडे वळून तिनं विचारलं, "खानसामा, तुम मुसलमान हो?"

"हां, मेमसाहेब!"

"तू एखाद्या हिंदूला मारू शकतोस का?"

खानसामा सटपटला. त्याने डोळे उंचावून मेमसाहेबकडे पाहिलं, मग हसून तो साहेबाकडे पाहू लागला. मग तो पुढं येऊन प्रकाशाच्या वर्तुळात उभा राहिला. त्यानं साहेबांसमोर एक तबक ठेवलं. त्यात एक घडी घातलेला कागद होता. मग तो पुन्हा मागं सरकून अंधारात उभा राहिला. रिचर्डनं घडी उलगडून तो कागद वाचला, आणि पुन्हा घडी करून तो तबकात ठेवला.

"काय आहे रिचर्ड?"

"शहराचा रिपोर्ट आहे, " रिचर्डनं हळुवारपणे सांगितलं आणि तो आपल्या विचारात गढून गेला.

"कसला रिपोर्ट, रिचर्ड?"

"शहरातल्या स्थितीबाबतचा. तुला तर माहीतय की रोज सकाळी माझ्याकडे तीन-चार खात्यांचा रिपोर्ट येत असतो, पोलीस सुपरिंटेंडेंटचा, हेल्थ ऑफिसरचा, सिव्हिल सप्लाइज् ऑफिसरचा. मला क्षमा कर..." म्हणत रिचर्ड त्या खोलीतून बाहेर गेला.

थोडा वेळ लीझा हतबुद्ध झाल्यासारखी बसली. रिचर्डनं अजून कॉफी

घेतलेली नव्हती. स्वतः कॉफी प्यावी का रिचर्डची वाट पाहावी हे तिला कळत नव्हतं; पण रिचर्ड लगेचच परत आला.

"कुणाचा रिपोर्ट होता, रिचर्ड?"

"पोलीस सुपरिंटेंडेंटचा," रिचर्ड म्हणाला, मग निश्चितपणे म्हणाला, "काही विशेष नाही, रोजचाच रूटिन रिपोर्टय."

पण लीझाला वाटलं, रिचर्ड काही तरी लपवू लागलाय.

"काही तरी नक्कीच रिचर्ड, तू लपवतोस."

"लपवण्यासारखं आहे तरी काय लीझा, आणि तुझ्यापासून लपवायचं? शहरातल्या गोष्टींविषयी तुला आणि मला कसलं आलंय प्रेम की मी त्या लपवून ठेवत जाऊ?"

"तरीही काही तरी आहेच. सुपरिंटेंडेंटनं काय काय लिहिलंय?"

"त्यानं एवढंच लिहिलंय, गावात थोडं ताणतणावाचं वातावरणय हिंदू आणि मुसलमानात. पण हे काही नवं नाहीय. हिंदुस्थानात हल्ली जागोजागी हा तणाव आहे."

"मग तू काय करशील आता, रिचर्ड?"

"मी काय करणार लीझा? मी राज्यकारभार बघेन, अजून काय करणार?"

लीझानं वर पाहिलं.

"तू पुन्हा चेष्टा करू लागला आहेस, रिचर्ड?"

"नाही. चेष्टा नाही. हिंदू आणि मुसलमानात तणाव निर्माण होत असेल तर मी काय करणार?"

"तू त्यांचं भांडण मिटवणार नाहीस?"

रिचर्ड मंदपणे हसला आणि कॉफीचा एक घोट घेऊन सहजतेनं म्हणाला, "धर्माच्या भानगडी या तुमच्या वैयक्तिक गोष्टी आहेत, असं मी त्यांना सांगेन. तुम्ही स्वतःच आपापसात त्या मिटवल्या पाहिजेत. सरकार तुम्हाला सर्वतोपरी मदत करायला तयारय."

"तू त्यांना हेही सांग, की तुम्ही एकाच वंशाचे लोक आहात, तुम्ही आपापसात लढायला नको. तू मला हेच सांगितलं होतंस ना, रिचर्ड?"

"नक्कीच सांगेन ," रिचर्डनं किंचित उपहासानं सांगितलं.

दोघंही शांतपणे कॉफी पीत बसले. मग अचानक लीझाचा चेहरा चिन्ताक्रान्त झाला.

"तुला तर काही धोका नाही ना, रिचर्ड?"

"नाही लीझा, प्रजा आपापसात लढत असेल तर शासनकर्त्याला कसला धोका असणारय?"

लीझाच्या मेंदूत ती गोष्ट उतरली, आणि तिच्या डोळ्यात रिचर्डबद्दल आदरभाव दिसून आला.

"बरोबर सांगतेयस. तुला खूप समजतं रिचर्ड. तू खरंच फार समजदार आहेस. मला उगीचच भीती वाटली होती. मला जॅक्सनच्या बायकोनं एकदा सांगितलं होतं, हिंदुस्तानी लोकांच्या एका जमावाला पांगवण्यासाठी जॅक्सन एकट्याच रिव्हॉल्वर हातात घेऊन जमावाच्या मागं मागं पळत होता. आणि सज्जात उभी राहिलेली त्याची बायको पाहत होती, आणि विलक्षण घाबरली होती. काय होईल कुणास ठाऊक! तू विचार कर, रिचर्ड, एकटा जॅक्सन आणि शेकडो लोकांचा जमाव. काहीही होणं शक्य होतं."

"तू काळजी करू नकोस, लीझा." रिचर्डनं खुर्चीवरून उठून लीझाचा गाल थोपटला आणि तो बाहेर निघून गेला.

5

प्रभातफेरीवाली मंडळी गल्ल्या ओलांडत इमामदीनच्या मोहल्ल्यात आली तेव्हा अंधार सरत आला होता. वाटेत शेरखानाच्या घरून झाडू, विळे, कोयते, पाट्या आणि साफसफाईचं इतर सामान घेऊन ते पुढे आले होते. सकाळच्या उजेडात त्यांचे थकलेले पिवळे पडलेले चेहरे स्पष्ट दिसू लागले होते. मेहताजी सोडून सगळ्यांचे कपडे चुरगळलेले आणि मळलेले होते. बक्षीजींच्या डोक्यावरची गांधी टोपी एका बाजूनं अशी काही दबलेली होती की जणू काही डोक्यावरचं प्रचंड ओझं फेकून ते नुकतेच आले असावेत. शंकर, मास्टर रामदास आणि अझीज यांनी खांद्यावर झाडू घेतलेले होते. देशराजच्या आणि शेरखानच्या हातात टोपले होते. जरनेलनं एक मोठा बांबू घेतलेला होता. दिवसाच्या उजेडत मास्टर रामदासाला आपल्या हातातल्या झाडूची लाज वाटत होती.

"ब्राह्मणांच्याही हातात झाडू दिलात, महात्मा गांधीजी. हे मात्र फार झालं. हो की नाही? ब्राह्मणांच्या हातात झाडू दिलाय हो!" आणि तो शांतपणे हसू लागला. मग त्यानं झाडू मागे धरला. आपल्या वाक्यावर कुणीच काही बोललं नाही हे पाहून त्यानं किंचित मोठ्यानं बक्षीजींना उद्देशून सांगितलं,

"मी गटार साफ करणार नाही. आधीच सांगतो."

"का ? तुला काय चक्रवाकाचे पंख चिकटलेत का काय?"

"माझं हे वय काय गटारी साफ करायचंय?"

"का? गांधीजी आपला संडास साफ करू शकतात; तुला गटार साफ करता येत नाही?"

"मी खोटं बोलत नाहीय, मला वाकता येत नाहीय, वाकलं की कंबरेत दुखू लागतं. मला मुतखडा झालाय."

"गाईचं चारापाणी करतोस तेव्हा होत नाही मुतखड्याचा त्रास? विधायक काम करतानाच तुला त्रास कसा सुरू होतो?"

यावर वळून शंकर म्हणाला:

"मास्टर, आम्हाला प्रचार करायचाय, खरोखरच्या गटारी थोड्याच साफ करायच्यात? गटार मी साफ करीन, तुम्ही टोपल्या केरकचरा उचलून टाकत जा."

थोडंसं चालून पुढं गेल्यावर मंडळी एका गल्लीत वळली.

"कोणत्या रस्त्यानं चाललात?"

अचानक मागून गोसावीजीनं ओरडून सांगितलं. मंडळीच्या पुढे पुढे जाणारा देशराज उजव्या बाजूला वळला होता, आणि त्याच्या मागं मागं सगळेच जण चालू लागले होते.

"हं हं, त्यांना जाऊ देऊ नका," बक्षीजींनी अनुमोदन दिलं. "अरे, सकाळी-सकाळी त्यांची ही नमाजीची वेळय, कशाला जायचं त्या मशिदीचा समोरून?"

"ए काश्मिरी," बक्षीजींनी ओरडून सांगितलं, "तुम्ही सगळे निव्वळ झोपेत असता, इकडं मशिदीसमोरून जायला कुणी सांगितलंय तुम्हाला? नेहमी मनात येईल तसं वागत असता!"

काश्मिरीलाल थांबला.

"शेरखान आणि देशराज तिकडं वळले म्हणून आम्ही पण वळलोय त्यांच्यामागं. ठीकाय, काही हरकत नाही, बक्षीजी, मशिदीसमोर गाणं बंद करून टाकू."

"नको नको, काही गरज नाहीय. कळत नाहीत का वातावरण कसंय ते? तुम्ही परत या आणि मागच्या गल्लीतून पुढे सरळ चौकाच्या दिशेनं चला, तिथून सडक ओलांडून सरळ इमामदीनच्या मोहल्ल्यात जाऊ."

मंडळी परत फिरली, आणि डाव्या हाताची चिंचोळी गल्ली ओलांडून काही वेळानं इमामदीनच्या मोहल्ल्याजवळ येऊन ठेपली. प्रभातफेरीसाठी हा रस्ता नवीनच होता. सामान्यतः शहराबाहेरच्या जुन्या वस्त्यांमध्ये काँग्रेसचे लोक प्रचारासाठी जात नसत. कमिटीचं मैदान ओलांडून जाणं एरवीही दूर पडायचं. इमामदीनचा मोहल्ला कमिटीच्या मैदानाच्या पल्याड पूर्वेकडे एका टोकाला होता.

एका ठिकाणी गायरानावर मंडळी उभी राहिली. काश्मिरीलालच्या हातात तिरंगी झेंडा होता. त्यानं डोकं वर उंचावून सगळा जोर लावून घोषणा दिली,

"इन्कलाब!"

उत्तरादाखल सगळ्यांनी आवेशपूर्ण आवाजात म्हटंल, "जिंदाबाद!"

"बोला, भारतमातेचा...विजय असो!"

घोषणा ऐकून मोहल्ल्यातही पोरं पळत-पळत घराबाहेर आली.

बायका तरटाच्या पडद्यामागून डोकावून पाहू लागल्या. लाल तुऱ्याचा एक कोंबडा उडी मारून कच्च्या भिंतीवर चढून बसला, आणि काही वेळ पंखांची फडफड करून त्यानं 'कु कू ऽ ऽ च कू ऽ ऽ' अशी बांग दिली. त्यानं जणू मोहल्ल्याचं प्रतिनिधित्व करीत घोषणेचं प्रत्युत्तर दिलं.

"तुझ्यापेक्षा हा कोंबडाच बराय की काश्मिरी! बघ, कसा रुबाबात बांग देतोय!" शेरखान म्हणाला.

"का, काश्मिरी काय कमी आहे का, काश्मिरी काँग्रेसचा कोंबडाय!" शंकरनं पुस्ती जोडली.

"तूही डोक्यावर लाल तुरा लावून घे, काश्मिरी. याला एक लाल टोपी घेऊन द्या बक्षीजी, मग एकदम कोंबडाच दिसू लागेल!"

"का, तुऱ्याशिवाय हा कोंबडा दिसतच नाही का? अरे ही कोंबडीय् कोंबडी-काश्मिरी कोंबडी..."

या शहरातला हास्य-विनोद हा असाच होता. वेळी-अवेळी सहकाऱ्यांसोबत अशीच छेडछाड चालायची.

"बस् बस्, आता काम सुरू करा!" बक्षीजींनी हिरवळीवर कंदील ठेवत सांगितलं. बहुतेक घरं एकसारखीच आणि एकमजली होती. बहुतेक घरांच्या दारांवर तरटाचे पडदे लटकत होते. समोर उघडं मैदान होतं. आणि मैदानाच्या पलीकडे दोन समांतर कच्च्या गल्ल्या होत्या. एका गल्लीत गटारी होत्या, पण त्याही कच्च्याच. दुसऱ्या गल्लीत तर नाल्या खोदलेल्याही नव्हत्या. गल्लीतच गुरंढोरं बांधलेली होती. घराघरांतून बायका डोक्यावर एक-एक, दोन-दोन मटके घेऊन पाणी भरायला निघाल्या होत्या. एका ठिकाणी एक पोरगं म्हशीखालचं शेण जमा करीत होतं. गायरानाजवळ दोन मुलं उघड्या मैदानावर एकामेकांसमोर शौचाला बसली होती आणि एकमेकांशी गप्पा मारत होती.

"तुझी संडास इतकी पात्तळ कशी काय?"

"मी बकरीचं दूध पितो. तू?"

मैदानातच कोपऱ्यात एका बाजूला भाकरी भाजायचं चुलाण होतं. इथं आल्यावर वाटायचं, जणू काही या लोकांनी गल्लीवाटेच कुठल्या तरी गावात प्रवेश केला आहे.

"चला, कुदळी उचला आणि विधायक कामाला सुरुवात करा," बक्षीजी म्हणाले.

मेहता आणि मास्टर रामदास टोपले उचलून अंगणाकडे निघाले. शंकरनं आणि काश्मिरीलालनं कुदळी उचलल्या आणि ते नाल्या साफ करायला निघाले. शेरखान, देशराज आणि बक्षीजींनी झाडू उचलले आणि ते अंगणातला केरकचरा काढू लागले.

काय होऊ लागलंय हे आजूबाजूच्या लोकांना कळतंच नव्हतं. टांगा हाकणारा एक माणूस आपल्या घराच्या बाहेर येऊन मैदानाच्या कडेला पायांच्या आधारावर बसला होता. पण बक्षीजींना झाडू मारताना पाहून तो पटकन उभा राहिला आणि लगबगीनं बक्षीजींच्या जवळ आला.

"आमाला कशाला लाजवताय बाबूजी? आमचं घर तुम्ही झाडून काढणार? आना, तो झाडू मला द्या."

"नाही-नाही, हे आमचंच काम आहे," बक्षीजींनी उत्तर दिलं.

"न्हाई मालक, आसं कदी झालंय का, आपण शिकले-तोबा-तोबा. आना आना, द्या इकडं, आमाला कामुन नरकात ढकलायले हो..."

बक्षीजींना त्याचं आचरण चांगलं वाटलं. काँग्रेसच्या प्रचाराचा परिणाम होऊ लागला आहे, त्यांनी मनातल्या मनात म्हटलं, हाच तर विधायक कामाचा अर्थय, दुसरं काय!

काश्मिरीलाल आणि शंकर कुदळी घेऊन घरांच्या समोरून जाणाऱ्या नालीतून चिकटचिकट चिखल काढू लागले होते. जेव्हापासून नाली खोदलेली होती तेव्हापासून त्यात घाण पाणी जमा होऊ लागलेलं होतं, आणि आता गडद निळ्या रंगाच्या चिकट चिखलाचं रूप त्या पाण्यानं घेतलेलं होतं. जितका वेळ हा चिखल त्या नालीत पडून होता, त्याची दुर्गंधी कधीच आली नाही, पण आता जेव्हा शंकर आणि काश्मिरीलालने तो टोपल्यात भरभरून उपसून काढून नालीच्या वर बाजूलाच त्याचे ढीग जमवायला सुरुवात केली होती तेव्हा दुर्गंधीनं नाक फुटायची पाळी आली होती. आणि डास नाल्यावरून उडून सगळीकडे फैलावू लागले होते. नाली फार नाही तर फूटभर तरी खोल असेल आणि तिच्यात वरपर्यंत चिखलच चिखल साचलेला होता.

"ओ बादशहांनो, हा काय जुलूम चालवलायत?"

एका गच्चीच्या वरवंडीमागं उभ्या असलेल्या, दाढी रंगवलेल्या एका म्हाताऱ्यानं ओरडून सांगितलं, "इकडं बिमारी फेकून जाल तर ती कोण काढून टाकणारय? नालीत पडू दिलं असतं तर निदान ते पडून तरी राहिलं असतं. आता त्याचे जागोजागी ढीग जमा होतील. पहिल्यापेक्षा जास्त घाण पसरेल की..."

बक्षीजी दुरूनच ते पहात होते. कंबर ताठ करून ते उभे होते. त्यांना शंकर आणि काश्मिरीलालचा भयंकर राग आला. "या तरुण लोकांना कळायचंच नाही," ते पुटपुटले.

"विधायक कामाचा हा अर्थ नाहीय. म्हणजे खरोखरच नाल्या साफ कराव्यात असा. लोकांचं लक्ष तिकडे वेधून घ्यावं, म्हणजे साफसफाईकडे एवढाच याचा अर्थय. आणि देशाच्या स्वातंत्र्याकडेही."

म्हाताऱ्यानं सूचना दिल्यानंतर तो वरवंडीपासून दूर गेला होता, आणि बक्षीजी पुन्हा अंगण झाडू लागले होते.

त्याचवेळी समोरच्या गल्लीतून एक पांढराफटक वडीलधारा माणूस बाहेर आला. त्याच्या हातात जपमाळ होती. तो मशिदीकडे चालला होता हे स्पष्टच होतं. पांढरीफेक सलवार, पांढराशुभ्र सदरा, वर नव्या पद्धतीचं जाकीट, आणि डोक्यावर लुंगी गुंडाळलेली होती. चालचलन असं की जणू धार्मिक माणूसच वाटावा! लोकांना झाडू मारताना आणि नाल्या साफ करताना पाहून तो थांबला. मग हातात झाडू घेतलेल्या आणि धुळीनं माखून भुतासारख्या दिसणाऱ्या रामदासकडं त्यानं पाहिलं, आणि तो म्हणाला:

"आम्हा लोकांवर उपकाराचं ओझं लादायला आलात काय?" तो मंडळीच्या सेवाभावी वृत्तीनं फार प्रभावित झाल्यासारखा वाटत होता.

"शाब्बास, वा-वा!" आणि त्याची दृष्टी अंगणात, गल्लीत आणि नालीवर काम करणाऱ्या एकेका कार्यकर्त्यावर पडू लागली. "सुखी रहा, वा-वा, किती चांगले आहात मनानं, शाब्बास!" तो पुन्हा पुन्हा तेच म्हणत होता.

"आम्ही कसली सफाई करू शकतो महोदय, आम्ही करून करून करणार तरी किती!" बक्षीजी त्या वडीलधाऱ्या माणसाला बोलताना पाहून झाडू उचलून त्याच्याकडे गेले. पण त्या वडीलधाऱ्या माणसानं समजावणीच्या सुरात सांगितलं, "म्हणजे गल्लीबोळ साफ करणं महत्त्वाचं नाहीय, या मागे ज्या भावना आहेत त्या फार थोर आहेत. शाब्बास, शाब्बास!" त्या पांढऱ्या शुभ्र वेषातल्या वडीधाऱ्या माणसानं हे वाक्य उच्चारलं, आणि तो प्रसन्नपणे स्मितहास्य करीत हळू हळू मोहल्ल्यातून बाहेर पडून मशिदीकडे जाऊ लागला. बक्षीजींना त्याच्या तोंडून विधायक कामांची स्तुती ऐकून भलताच आनंद झाला. त्यांना आजचं विधायक

कार्य सार्थक झाल्यासारखं वाटलं.

"ते बघा तिकडं, मेहताजी आणि अजीजकडे," शेरखान हसून म्हणाला. "दोघांनीही झाडूला हातसुद्धा लावला नाहीय. मेहताजींना तर आपल्या कपड्याचीच काळजीय."

बक्षीजींनी वळून पाहिलं. मेहताजी स्वच्छ हातांनी एकेक दगड उचलून टोपल्यात ठेवत होते अंगठा आणि तर्जनीनं ते एकेक दगड उचलत आणि पाटीच्या जवळ येऊन अगदी खास शैलीनं तो त्यात टाकत. दुसऱ्या टोकाला रामदास होता. त्याच्या मिश्यांवर आणि केसांवर आत्तापासूनच मातीचा थर जमू लागला होता.

आजूबाजूला, मुलांबरोबरच खूप लोक गोळा झालेले होते. तरटाच्या पडद्यामागून अनेक मुली आणि बायका आणि जागोजागी गच्चीवर उभे असलेले लोक विधायक कामाचं प्रदर्शन बघत होते.

इतका वेळ लांबलचक बांबू हातात घेऊन मैदानाच्या हिरवळीवर उभा असलेला जरनेल नाली साफ करणाऱ्यांजवळ गेला.

"नाली उघडायची गरजय का? बांबू घालू का?" त्यानं फौजी आविर्भावात विचारलं.

आजूबाजूचे लोक हसू लागले.

"हे विधायक कार्य म्हणजे शुद्ध गाढवपणाय," शंकरनं कंबर सरळ करीत काश्मिरीलालला सांगितलं, "गटारी साफ करून काही स्वातंत्र्य मिळणार नाहीय."

शंकर आणि काश्मिरी घामानं डबडबलेले होते. त्यांनी नालीच्या कडेला तीन ठिकाणी गाळ आणि कचऱ्याचे ढीग लावलेले होते.

"बकबक करू नकोस, शंकर," गल्लीच्या मधोमध झाडू हातात घेऊन उभ्या असलेल्या बक्षीजींनी सांगितलं. त्यांनी शंकरचं वाक्य ऐकलं होतं. "तुझ्या टाळक्यात फार अक्कल शिरलीय. आम्हाला चरखा चालवायला न् विधायक काम करायला सांगणारे बापू तर नालायकच आहेत ना?"

"काम तर करतोचय की मी! विधायक कामच करतोय नाही तर काय, पण हा अगदी गाढवपणाय."

बक्षीजींना सकाळी-सकाळीच शंकरच्या नादी लागायचं नव्हतं, कारण तो फारच फटकळ होता. तरीही त्यांना राहवलं नाही:

"काही कळून घेत जा, शंकर. अरे, ही आमच्या देशभक्तीची खूणय, अशा तऱ्हेनंच आम्ही गरीबांच्या स्तरावर जाऊन पोहोचतो. अरे, गरीब लोकांत काम करायला जायचं तर ते काय पँट घालून जायचं? झाडू घेऊन किंवा खादी घालून गेलात तरच लोक तुम्हाला आपलं म्हणतील."

"विधायक कामं करायला सुरुवात केलीय तेव्हापासून आंदोलन थंड झालंय," शंकर म्हणाला, "मारा झाडू न् चालवा चरखा." आणि त्यानं आणखी एक खोरं चिखलानं भरून कचऱ्याच्या ढिगावर टाकलं.

ह्याचवेळी मोठ्यानं ओरडून जरनेल म्हणाला:

"तू गद्दार आहेस! मी तुला ओळखतो. तू कम्युनिस्ट आहेस!"

"बस बस जरनेल, पुरे!" पटकन बक्षीजी म्हणाले. जरनेल जर बोलत राहिला तर आणखी एक भांडण उभं रहायचं. मग त्याला आवरणं कठीण होऊन जाईल.

"तू पण, शंकर, भलत्याच वेळी आपलंच चालवतोस! अरे, ही काय जागाय वाद घालायची?"

त्याचवेळी एक माणूस कमिटीच्या मैदानाकडून पळत पळत आला आणि शेरखानाची गल्ली ओलांडून एका बाजूला उभ्या असलेल्या मोहल्ल्यातल्या काही लोकांजवळ जाऊन त्यांच्याशी कुजबूज करू लागला. त्यानं काळ्या रंगाचं जाकीट घातलं होतं, आणि तो फारच उत्तेजित झाल्यासारखा वाटत होता. अशाप्रकारे पळत येणं ही फारच सामान्य गोष्ट होती, पण ज्या तऱ्हेनं तो पळत-पळत आला होता ते आजूबाजूच्या लोकांना वेगळंच काहीतरी वाटलं होतं. बघता बघता इकडे तिकडे विखुरलेले लोक काढता पाय घेऊ लागले, आणि फक्त लहान लहान पोरंच तिथं उरली. मग क्षणार्धात तरटाच्या पडद्यामागच्या बायकाही दिसेनाशा झाल्या. एक बाई लगबगीनं बाहेर आली, आणि शौच्याला बसलेल्या दोन पोरातल्या एकाचा हात पकडून त्याला फरपटत घरात घेऊन गेली.

धक्का बसल्यासारखी अवकळा पसरली. काँग्रेसचे कार्यकर्ते काय झालंय हे न कळल्यानं अस्वस्थ होऊन गेले. त्याचवेळी मण्यांची माळ हातात घेऊन शाब्बास शाब्बास म्हणत गेलेला पांढराशुभ्र माणूस परत येताना दिसला. मेहताजी आणि बक्षीजी जवळ जवळ उभे होते आणि जवळपास उभे असलेले लोक असे एकाएकी निघून कशामुळे गेले याचा तर्क बांधत होते. काय भानगड आहे ते वडिलधाऱ्या माणसाला जाऊन विचारावं असं त्यांना तीव्रपणे वाटलं. हातात मण्यांची माळ हलवत पांढराशुभ्र माणूस त्यांच्याजवळ येऊन उभा राहिला. क्षणभर तो थबकलेला होता, मग लगेच म्हणाला:

"साहेबलोकांनो, आपण इथून तात्काळ निघून जावं. जिवाची पर्वा वाटत असेल तर तात्काळ निघून जा," म्हणता म्हणता त्याचा आवाज उंचावला, हनुवटी थरथर कापू लागली, आणि चेहरा पार पिवळा पडला.

तो जणू मेहताजी आणि बक्षीजींना उद्देशूनच बोलत होता. बाकीचे कार्यकर्ते

लगबगीने तिथं जमा झाले.

"उठा इथून." वडिलधारा म्हातारा बोलतच होता, "पुरे झालं तुमचं काम. ऐकताय की नाही?" त्याचा आवाज थरथरू लागला होता, "पोरांनो, तात्काळ चालते व्हा!" तो ओरडला. आणि पावलं उचलीत तिथून निघून गेला. सगळीकडे स्मशानशांतता पसरली. बक्षी आणि मेहता परस्परांच्या तोंडाकडे पाहत बसले. बक्षीजींना वाटलं, शंकर आणि काश्मिरीलाल नेहमी वाह्यात बडबडत असतात, शक्यय की ते मोहल्ल्यातल्या कुणाला तरी असंच बोलले असतील, त्यामुळे मोहल्लेवाल्यांना वाईट वाटलं असावं. पण हा माणूस तर बाहेरून आला होता. आधी, इथून जाताना तर आमची स्तुती करीत गेला होता, आता काय झालं कुणास ठाऊक, इतका भयंकर भडकलेला आहे.

त्याच वेळी भिरभिरत एक दगड आला आणि बक्षीजींच्या जवळच पडला. काश्मिरीलाल आणि शंकर हतबुद्ध होऊन बक्षीजींकडे पाहू लागले.

"काय झालंय," जवळ येऊन मास्टर रामदासनं विचारलं.

"चला चला, इथून निघा, इथं काहीतरी गडबडय." बक्षीजी म्हणाले, "इथं येणंच चुकीचं होतं. देशराज कुठंय, त्यानंच आपल्याला इथं आणलं."

पण देशराज तिथं नव्हता. तिथून तो कधी पसार झाला हे कुणालाच कळलं नाही.

"काही तरी दांडगाई आहे. नक्कीच काहीतरी भानगड झालीय."

दोन-तीन दगड भिरभिरत आले. एक थेट रामदासच्या खांद्यावर लागला.

"चला इथून लवकर. इथं थांबू नका."

कार्यकर्ते मंडळी गडबडीनं तिथून निघून जाऊ लागली.

उंच बांबू हातात घेऊन जरनेल ओरडला, "तुम्ही सगळे भित्रे आहात. मी तुमच्यातल्या एकेकाला नीट ओळखतो. मी इथं विधायक काम करूनच जाईन."

त्यावर कडकपणे फौजी हुकूम दिल्यासारखं बक्षीजींनी जरनेलला आज्ञा दिली: "झेंडा सांभाळ, जरनेल. झेंडा कुठंय?"

जरनेलनं एकदम अटेन्शन केलं, चप्पल घासत घासत गायरानाजवळ येऊन खाली ठेवलेला झेंडा उचलला व उंच धरू लागला.

त्याच सुमारास एकानंतर एक दोन दगड आले. एक, गवतावर पडला, आणि दुसरा जरनेल उभा होता तिथं जमिनीवर पडला. लगेचच तीन लोक गल्ली पार करून आले आणि गल्लीच्या तोंडाशी उभे राहिले.

मंडळी गुपचूप तिथून निघून जाऊ लागली. जनरेलच्या हातातून झेंडा घेतला. मेहतानं तिथंच पाटी उलटी केली आणि त्यातले दगड खाली टाकले, मग ती रिकामी पाटी घेऊन तो मैदानातून जाऊ लागला. बक्षीजींच्या हातातला

कंदील हेलकावत होता, पण त्यांची मान खाली झुकलेली होती.

"कुदळी न् टोपले शेरखानच्या घरी ठेवू का?" मास्टर रामदासानं बक्षीजींना विचारलं.

"आता आहेत तसे चालायला लागा. इथं थांबायचं नाही."

काश्मिरीलालनं निरखून पाहिलं. गल्लीच्या तोंडाशी आता तीनऐवजी पाच लोक उभे होते. मैदानाच्या पलीकडे येऊन काही लोक उभे राहिले होते आणि त्यांच्याकडे पाहत होते. मोहल्ल्यातून निघून ते कुतबदीनच्या गल्लीत घुसले; तर नानभाईच्या दुकानावरही त्यांना तसंच दृश्य दिसलं. तिघेजण नानभाईच्या दुकानासमोर उभे राहून या मंडळींकडे रागारागानं बघू लागले होते, पण त्यांच्यापैकी कुणीच काही बोललं नाही.

"काहीतरी गडबड झालीय," बक्षीजी मेहताजींना म्हणाले.

"काश्मिरी किंवा शंकरनं एखाद्या पोरीबिरीला छेडलं असेल तर काय की! तुम्ही तर कसले कसले लोफर काँग्रेसमधे भरती करून ठेवलेत."

"काय बोलताय तुम्ही मेहताजी? काश्मिरी तर सगळा वेळ नाली साफ करीत होता. इथं वेगळंच काहीतरी झालं असावं."

मोहल्ल्याच्या गल्लीत वळल्यावर त्यांना तीनचार माणसं गल्लीच्या तोंडाशीच उभी असलेली दिसली.

"कुठं चाललात, बक्षीजी? तिकडं जाऊ नका." एका उंच देहाच्या व्यक्तीनं पुढे येऊन सांगितलं. तो बक्षीजींच्या ओळखीचा होता.

"काय झालंय?"

"बस्, तिकडं जाऊ नका."

'काय झालंय ते सांगा तर खरं."

तोपर्यंत काश्मिरी, जरनेल आणि मास्टर रामदास तिघंही बक्षीजी आणि मेहताजवळ येऊन उभे राहिले होते.

"त्या तिथं गल्लीच्या बाहेर बघा."

बक्षीजींनी समोर पाहिलं. गल्लीच्या बाहेर रस्त्यावर पलीकडे एक मशीद होती. तिला 'कैलांची मशीद' म्हणत असत.

"काय आहे?"

"तुम्हाला तिथं काही दिसत नाहीय का? मशिदीच्या दरवाज्याखालच्या पायऱ्यांवर बघा."

मशिदीच्या पायऱ्यांवर काळंकाळं काहीतरी पडलेलं होतं.

"कुणीतरी डुक्कर मारून फेकून दिलं आहे!"

बक्षीजींनी मेहतांच्या चेहऱ्याकडे पाहिलं. जणू ते सांगत असावेत, "पाहा, मी सांगत नव्हतो का की काहीतरी गडबड आहे म्हणून?"

सगळ्यांनी वळून त्या दिशेनं पाहिलं. मशिदीच्या पायऱ्यांवर एक काळ्या रंगाचं पोत्यासारखं काहीतरी दिसलं. त्यातून दोन टांगा बाहेर आलेल्या होत्या. मशिदीचा हिरव्या रंगाचा दरवाजा बंद केलेला होता.

"चला, चला, इथून परत चला," मास्टर रामदासनं हळू आवाजात सांगितलं.

"आऽक् थू!" काश्मिरीलालनं डुकराकडे पाहून म्हटलं, आणि तोंड वळवून घेतलं.

"बक्षीजी, इथूनच परत जाऊ. पुढे मुसलमानी मोहल्लाय." रामदासनं पुन्हा सांगितलं.

"कुणीतरी खोडसाळपणा केलाय्." मेहता पुटपुटले.

"ते डुक्करचंय हे तुम्हाला पक्कं माहितय का?"

"कुणास ठाऊक, दुसरंही जनावर असू शकतं!"

"दुसरं तिसरं जनावर असतं तर मुसलमान इतके बिथरले असते कशाला?" बक्षीजींनी वरमून सांगितलं.

जरनेलही आपल्या दाट भुवयांमध्ये लपलेले बारीक बारीक डोळे मशिदीकडे लावून उभा होता. नजर हलताच म्हणाला:

"इंग्रजांनी फेकलंय्!"

त्याच्या नाकपुड्या फडफडू लागल्या, आणि पुन्हा तो ओरडून म्हणाला, "इंग्रजांचाच खोडसाळपणाय. मला माहीतय."

"बरोबर बरोबर, इंग्रजांचाच खोडसाळपणाय हा. पण तू आता गप्प बस," बक्षीजींनी समजावणीच्या सुरात त्याला सांगितलं.

मागच्या गल्लीतून वळून पुढं जाऊ," मास्टर रामदासनं पुन्हा एकदा सांगितलं. पण या वेळी जरनेल त्याच्यावर तुटून पडला.

"तू भित्रा आहेस. हा इंग्रजांचाच खोडसाळपणाय. मी तो उघडकीस आणणारय." यावर मेहताजींनी वाकून बक्षीजींच्या कानात सांगितलं,

"या पागल माणसाला सोबत कशाला आणता? हा सगळ्यांचंच मरण ओढवून आणील. काढा याला काँग्रेसमधून."

अधूनमधून रस्त्यावरून एखादा मुसलमान जायचा आणि मशिदीच्या पायऱ्यांवर नजर गेली की आधी निरखून पाह्यचा, मग तोंड फिरवायचा, आणि बडबडत पुढं निघून जायचा.

अचानक समोरच्या रस्त्यावरून भरधाव वेगानं एक टांगा पुढं निघून गेला.

मग मशिदीच्या बाजूनं पळण्याचा आवाज आला. रस्त्याच्या पलीकडे डाव्या बाजूला बसणाऱ्या कसायानं टांगलेल्या बकऱ्यांवर कापड चढवलं आणि दुकान बंद केलं. मोहल्ल्याच्या गल्लीतील घरांचे दरवाजे बंद होऊ लागले होते.

बक्षीजींनी मागं वळून पाहिलं. मास्टर रामदास निसटलेला होता आणि दूर गल्लीच्या तोंडाकडे भरभर जाताना दिसत होता. त्याच्यापासून काही अंतरावर मागं-मागं शेरखान आणि अजीजही चाललेले होते. गल्लीत जागोजागी दोन-दोन, चार-चारच्या टोळ्या उभ्या होत्या.

"आपण इथून निघून जा बक्षीजी, आपण इथं थांबल्यानं वातावरण जास्तच भडकेल," बक्षीजींच्या मोहयाल मित्रानं समजावून सांगितलं.

बक्षीजींनी त्या माणसाकडे पाहिलं, आणि मग ते काश्मिरीलालला म्हणाले,

"झेंडा बांबूवरून काढून घडी करून ठेवा." मग त्या मोहयाल सद्‌गृहस्थास उद्देशून म्हणाले, "या डुकराचं प्रेत तर काढून टाकू! जितका वेळ इथं पडून राहील तितका वेळ तणाव वाढत जाईल."

"तुम्ही डुकराचं प्रेत हटवणार आहात?" मोहयालनं हैराण होऊन विचारलं. "तुम्ही तर, मला वाटतं, तिकडं जायलाच नको."

"मी यांना विनंती करतो की आपण यात पडायलाच नको. त्यामुळे मामला जास्तच बिघडत जाईल," मेहताजी म्हणाले.

"पण इथून गेल्यावरही मामला चिघळणार नाही का? मुसलमान लोक हे प्रेत इथून काढणार आहेत का?"

"त्यांनी नाही काढलं तर एखाद्या भंगी-जमादाराची व्यवस्था करतील. काय वाट्टेल ते झालं तरी आपण यात पडायचं नाही."

बक्षीजींनी आपल्या हातातला कंदील एका घराच्या चबूतऱ्यावर ठेवला आणि मेहताजींकडे पाहून ते म्हणाले;

"मेहताजी, तुम्ही काय बोलताय? आम्ही गुपचूप इथून निघून जावं आणि तणाव वाढू द्यावा? आपल्या डोळ्यांनी पाहिलं नसतं तर एक वेगळी गोष्ट होती," मग काश्मिरीलालला आणि जरनेलला उद्देशून ते म्हणाले, "तुम्ही या माझ्यासोबत." आणि ते गल्लीतून बाहेर येऊन मशिदीकडे जाऊ लागले.

काश्मिरी गोंधळून गेला. जावं की न जावं. इमामदीन मोहल्ल्यात दगडफेक झाली होती, इथं न जाणो अजून काही होईल. त्याच्या कपाळावर घाम निथळत होता. त्यानं झेंड्याची काठी भिंतीला टेकून उभी केली, आणि तिथंच थबकून उभा राहिला. पाय लटलट कापत होते. पण एव्हाना बक्षीजींनी आणि जरनेलनं रस्ता ओलांडलाही होता. थोडा वेळ काश्मिरी तिथंच उभा राहिला, मग त्यांच्या मागेमागे

गल्लीच्या बाहेर आला. रस्त्यावर गेल्यावर त्यानं मागे वळून पाहिलं. मोहयाल सद्गृहस्थ निघून गेले होते. फक्त मेहताजी तिथं उभे होते. त्याला वाटलं, सगळी गल्ली स्मशानवत झालेली आहे. डाव्या हाताला रस्त्याच्या कडेला तीनचार दुकानं होती, तीही बंद झालेली होती. उजव्या बाजूला थोड्या अंतरावर विहिरीजवळ दुकानांची एक रांगच होती, तीही बंदच झालेली होती, आणि विहिरीजवळ लोकांचं एक टोळकं होतं, तेही इकडेच बघत होतं. गच्च्यांवर जागोजागी लोक उभे आहेत, पण सगळी दारं बंद आहेत, असा त्याला भास झाला.

"सगळ्यात आधी हे डुकराचं प्रेत इथून हलवूच," बक्षीजी सांगू लागले होते.

काळ्या रंगाचं डुक्कर होतं. कुणीतरी त्याच्यावर पोतं झाकलं होतं, पण पोत्याखालून त्याच्या टांगा, थोबाड आणि पोटाचा काही भाग दिसत होता.

मेहता अजूनही गल्लीतल्या भिंतीला टेकून उभे होते. ते अजूनही संभ्रमातच होते.

डुक्कर तिथून हटवण्यात धोका तर होताच, पण त्यापेक्षाही खादीचे पांढरेशुभ्र कपडे खराब होण्याची भीतीही होतीच. बक्षी आणि जरनेलनं डुकराच्या तंगड्या धरल्या, आणि त्याचं प्रेत फरपटत मशिदीच्या पायऱ्यांवरून खाली आणलं, मग पुन्हा फरपटत ते रस्त्याच्या पलीकडे नेलं आणि विटांच्या एका ढिगाऱ्यामागं लपवलं.

"सध्या तर ते इथंच राहू द्या. मशिदीचा दरवाजा तर उघडेल. मशिदीच्या पायऱ्या धुऊन टाकू," बक्षीजीनं काश्मिरीलालला सांगितलं, "तू जा काश्मिरी, याच्यामागं भंग्यांची वस्ती आहे तिथं. तिथं म्युनिसिपालटीचे भंगी राहतात. पाहा, एक-दोन भंगी आपली गाडी आणत असले तर ते घेऊन जायला सांगू."

तेवढ्यात विहिरीकडून कुणीतरी पळत असल्याचा आवाज आला. तिघांनीही वळून पाहिलं. एक गाय पळत सुटली होती. तिच्यामागे डोक्याला मुंडासं बांधून आणि हातात काठी घेऊन तिला हाकत हाकत एक माणूस मागे मागे चालला होता. त्याची छाती उघडी होती आणि गळ्यात ताईत लटकत होता. मऊ कातड्याची, बदामी रंगाची मोठमोठ्या चकित डोळ्यांची गाय होती. भीतीनंच तिचं शेपूट वर झालेलं होतं. रस्ता चुकल्यासारखी वाटत होती. तिघंही थबकले. मुंडासं घातलेल्या माणसानं तोंड झाकून घेतलेलं होतं. गाईला हाकत हाकत तो रस्त्यावरून पुढं निघून गेला आणि मग डाव्या हाताच्या गल्लीत शिरला.

बक्षीजी बराच वेळ स्तब्धच होते. मग हळू आवाजात म्हणाले,

"गावावर घारी उडणार आहे असं वाटतंय. लक्षणं फार वाईट दिसतायत." आणि त्यांचा चेहरा जास्तच पिवळाफिकट आणि गंभीर वाटू लागला होता.

6

साप्ताहिक सत्संगाच्या समाप्तीपूर्वी पुण्यात्मा वानप्रस्थीजी नेहमीप्रमाणेच मंत्रपाठ करू लागले. या मंत्रपाठाला ते सत्संगरूपी यज्ञाची 'अंतिम आहुती' म्हणत असत. निवडक अशा विशिष्ट मंत्रांत आणि श्लोकांत भारतीय संस्कृतीचं सार होतं, आणि अनेक वर्षांच्या आग्रहानंतर वानप्रस्थीजींनी सर्व सभासदांना हे मंत्र मुखपाठ करायला लावले होते. वेदीवर बसल्या बसल्याच, डोळे बंद करून, होत जोडून नतमस्तक होऊन वानप्रस्थीजी मंत्रोच्चारण करू लागले:

"सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयः
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःख भाग भवेत्."

सगळ्या सत्संगात एकटे वानप्रस्थीजीच संस्कृतचे ज्ञानी होते. त्यांनी सर्व वेद-वेदांगे वाचलेली होती. म्हणूनच जेव्हा ते उच्चारण करीत तेव्हा त्यांच्याकडून उच्चारणाची चूक कधीच होत नसे. किंबहुना ते प्रत्येक शब्द नीट समजून उमजून खोल प्राणांमधून उच्चारत आहेत असं वाटायचं. उपनिषदाच्या श्लोकानंतर त्यांनी गीतेचे श्लोक म्हटले,

"आपूर्यमाणम् अचल प्रतिष्ठम्..."

सभासद त्यांच्यासोबत गुणगुणू लागले. काही लोक श्लोक म्हणताना मागं राहिले होते, त्यामुळे वनप्रस्थीजींचं संपल्यानंतरही सभागृहात नंतर काही वेळ गुणगुणण्याचा आवाज येत राहिला.

शेवटी शांतीपाठ झाला, आणि सगळं सभागृह स्त्री-पुरुषांच्या आवाजानं निनादत राहिलं, कारण शांतिपाठाचा मंत्र सगळ्यांनाच पाठ होता.

"ॐ द्यौ पृथ्वी, शान्तिरापः
शान्तिरौषधयः शान्ति वनस्पतिः"

शांततेचा लौकिक प्रभाव सगळ्या वायुमंडळावर पडू लागलेला आहे, सगळ्या आसमंतात शांती व्यापून आहे आणि या मुक्तकंठातून निघालेले शांतीचे स्वर घरोघरी पोहोचू लागलेले आहेत असं वाटू लागलं होतं. 'अंतिम आहुती' मुळे खरोखरच सगळ्यांना विलक्षण आनंद वाटत होता. मंत्रोच्चारणानंतर प्रार्थनेचं एक गीत गायलं जायचं. समस्त जड आणि चेतन सृष्टीच्या सुखाच्या टाळ्यांच्या तालावर वानप्रस्थीजी गाऊ लागले होते:

"सब पर दया करो भगवान्
सब पर कृपा करो भगवान्..."

पुण्यात्माजींच्या आग्रहाखातर सत्संगाच्या परंपरागत आरतीचा बराचसा भाग गाळण्यात आलेला होता, कारण त्यात 'मैं मूरख, खलकामी' असे शब्द वापरलेले होते, आणि वानप्रस्थीजींच्या विचारांनुसार ते न्यूनगंड निर्माण करणारे होते. तसंच कुण्या एका खन्नाजीने लिहिलेल्या गीतालाही फाटा दिलेला होता, त्यात 'हम सबही पुत्त, कपुत तेरे' अशा ओळी होत्या, त्या वानप्रस्थीजींना मुळीच मान्य नव्हत्या.

'अंतिम आहुती' संपली. यानंतर खरं तर सभा विसर्जित व्हायला हवी होती, पण सभासद बसूनच राहिले, कारण मंत्रीजींना काहीतरी विशेष सूचना द्यायची होती. मंत्रीजी उठून उभे राहिले, पण त्यांनी फक्त एवढंच सांगितलं की सभा-विसर्जनानंतर कृपया अंतरंगसभेच्या सदस्यांनी थांबावं. एका महत्त्वाच्या विषयावर विचार करायचा आहे. या महत्त्वाच्या विषयाबद्दल सभासदांना तसं तर पहिल्यापासूनच जाणवलेलं होतं. वानप्रस्थीजींच्या भाषणातही अनेकदा त्याचा उल्लेख आलेला होता. इतकंच काय, प्रवचन देतानाही वानप्रस्थीजी आज फारच विचलित आणि भावनावश झालेले होते, त्यांचा चेहरा लालबुंद झालेला होता आणि ओठ फडफडत होते. त्यांनी आवाज उंचावून मर्मभेदी स्वरात खालील ओळी म्हटल्या होत्याः

"फैलाये घोर पाप यहाँ मुसलमीन ने
नेअमत फलक ने छीन ली, दौलत जमीन ने ।।"

तात्पर्य, अंतरंग-सभा कुठल्या विषयावर विचार करणार आहे हे सगळ्यांनाच कळून चुकलेलं होतं.

मंत्रीजींच्या सूचनेनंतर लोक उठू लागले. सभा विसर्जित होऊ लागली. लोक मंदिराच्या सात दरवाज्यांतून बाहेर येऊन व्हरांड्यात आपापली पादत्राणं शोधू लागले व घालू लागले. काही जणांनी मंदिरात प्रवेश करतानाच उजव्या पायाचा बूट एका दरवाज्यासमोर आणि डाव्या पायाचा बूट तिसऱ्या किंवा चौथ्या दारासमोर ठेवलेला असे, यामुळे सत्संग संपल्यावर आपापले बूट सापडणं सहज सोपं व्हायचं. व्हरांड्यात काही वेळ गर्दी उसळलेली होती. एरवीही लोक सभा-विसर्जनानंतर व्हरांड्यात दोन-दोन, चार-चार करून उभं राहून गप्पा मारतच असत, आणि आज तर गावातल्या वातावरणाची चर्चा सगळ्यांच्याच तोंडी होती. वानप्रस्थीजींनी आपलं मर्मस्पर्शी भाषण संपवलं तरी ते अजूनही वेदीजवळच बसून होते. ते अजूनही प्रक्षुब्धच दिसत होते आणि त्यांचा चेहरा चकाकत होता.

त्याच सुमारास काही लोक अंगणातून मंदिराच्या आत येताना दिसले. व्हरांड्यात उभे असलेले तुरळक लोक त्यांना ओळखत होते. ते शहरातल्या इतर

धार्मिक स्वरूपाच्या हिंदू संस्थांचे मान्यवर अधिकारी होते. त्यांच्या मागे पाच-सात शीखही आत जाताना दिसले. ते मोठ्या स्थानिक गुरुद्वारातून आले होते. कदाचित त्यांनाही अंतरंग-सभेच्या गुप्त बैठकीत भाग घेण्यासाठी आमंत्रित केलं गेलं असावं.

अंतरंग-सभेची बैठक सुरू झाली. कृशकाय पण आवेशपूर्ण दिसणाऱ्या मंत्रीजींनी शहरात झपाट्यानं बिघडत चाललेल्या परिस्थितीचा आढावा सादर केला. काही उडत-उडत पसरलेल्या अफवांबद्दलही सांगितलं. मशिदीसमोर सापडलेल्या डुकराच्या प्रेताबद्दलही चर्चा केली. शिवाय जामा मशिदीत गेल्या अनेक दिवसांपासून लाठ्या-काठ्या, भाले आणि अनेक प्रकारच्या शस्त्रांचा साठा करण्यात येऊ लागलेला आहे हेही सांगितलं. शहरतल्या स्थितीचा तपशील दिल्यानंतर मंत्रीजींनी या विषयावर गंभीरपणे विचार करण्याची आणि आपापल्या सूचना मांडण्याची विनंती केली.

"इथं बसणं योग्य नाही."

आवाज वानप्रस्थीजींचाच होता. ते वेदीजवळ बसून आपला हात उंच करून फार गंभीरपणे सांगत होते, "या विषयावर कुठेतरी दुसऱ्या ठिकाणी बसून विचार केला पाहिजे."

वानप्रस्थीजी वेदीवरून उतरून खाली आले आणि मंदिराच्या मागच्या बाजूस निघून गेले. अंतरंग-सभेचे सगळे सदस्यही त्यांच्या मागे-मागे जाऊ लागले. मंदिराच्या मागच्या बाजूच्या पायऱ्या चढून वानप्रस्थीजींनी सगळ्यांना एका लहानशा खोलीत आणलं. मंदिराचं साज-सामान ठेवलेलं होतं, आणि दोन-चार खुर्च्या व बेंच ठेवलेले होते.

सगळे लोक बसल्यानंतर पुण्यात्माजी धीरगंभीर आवाजात बोलू लागलेः

"सर्वात अगोदर आपल्या संरक्षणाची व्यवस्था करणं आवश्यक आहे. सर्व सदस्यांची आपापल्या घरात एकेक टीनचा डबा भरून मोहरीचं तेल ठेवावं, एकेक पोतं कच्चा किंवा दगडी कोळसा ठेवावा. उकळतं तेल शत्रूवर फेकलं जाऊ शकतं, जळते निखारे छतावरून फेकले जाऊ शकतात..."

सदस्य लक्ष्यपूर्वक ऐकत होते. अगदीच सामान्य गोष्ट होती, पण वानप्रस्थीजींच्या मुखातून ऐकल्यामुळे काही लोकांना क्षणभर आपली लाज वाटली. बहुतेक सदस्य व्यापारी होते आणि प्रौढवयीन होते, काही नोकरी पेशातले होते, दोघं-तिघं वकील होते. तसे तर सगळेच चिन्ताग्रस्त होते; पण वानप्रस्थीजीसारखे कुणीच प्रक्षुब्ध झालेले नव्हते. त्यांना, शहरातली परिस्थिती घरातून तेलाचे डबे ठेवण्याइतकी गंभीर झालेली आहे यावर विश्वासच बसत नव्हता. दोन-चार छोट्यामोठ्या घटना झाल्यानंतर सरकार परिस्थितीवर नियंत्रण ठेवून ती आटोक्यात आणील, खोडसाळपणा दाबून टाकील, आणि दंगली काही होऊ देणार नाही असं, त्यांना अजूनही वाटत होतं.

यावर एका सद्‌गृहस्थानं मंत्रीजींना विचारलं:

"युवक समाजाचं कार्य थंड झालेलं आहे. देवव्रतजींना आपण इतर कामात गुंतवून ठेवलंत. मला वाटतं की युवकांनी लाठी चालवण्याचं काम तात्काळ सुरू केलं पाहिजे. दोनशे काठ्या आजच मागवून त्या वाटल्या पाहिजेत."

यावर शहरातल्या नामवंत व्यापाऱ्यांतले एक दानवीर प्रधानजी डोकं हलवून म्हणाले:

"याचे पैसे मी देईन. आजच आपण दोनशे लाठ्या मागवून तरुणांना वाटून टाका."

'वाह-वा'चा आवाज ऐकू आला. उपस्थित सद्‌गृहस्थांनी प्रधानजींच्या उदारतेची खूपच स्तुती केली. मधेच एका सदस्याचा आवाज आला:

"हीच आम्हा हिंदूतली मोठी उणीव आहे. आम्ही तहान लागल्यावर विहीर खोदायला सुरुवात करतो. आज जेव्हा परिस्थिती बिघडत चालली आहे आणि मुसलमानांनी जामा मशिदीत शस्त्रास्त्रं जमवायला सुरुवात केली आहे तेव्हा आम्ही लाठ्या विकत घ्यायला निघालो आहोत."

यावर मंत्रीजी लगेचच म्हणाले:

"या विषयावर चर्चा करण्याची गरज नाही, युवक समाज पूर्णतः सक्रिय आहे. आणि त्याकडे संपूर्ण लक्ष देण्यात येत आहे. स्वतः वानप्रस्थीजी या कामासाठी तनमन अर्पण करीत आहेत. नित्यपाठ, वाचन-प्रवचनासोबतच आणि होम-हवन, यज्ञयागासोबतच वानप्रस्थीजी हिंदू संघटनांच्या पुण्यकार्यात अत्यंत तन्मय होऊन काम करीत आहेत. तरीही प्रधानजींच्या सूचनेचं मी स्वागत करतो. त्यांच्या औदार्यामुळेच आमची अनेक कामं संपन्न होत आहेत. आपल्या तयारीत आपण कुठेही उणीव ठेवता कामा नये."

यावर बाहेरून आलेला, बराच वेळ आपल्या हातातल्या छडीवर हनुवटी टेकून बसलेला आणि एकेक करून आपले दोन्ही पाय उचलून खुर्चीवर घेतलेला एक वयोवृद्ध सद्‌गृहस्थ आपल्या तीव्र बारीक आवाजात म्हणाला:

"लोकहो, हे सगळं ठीक आहे, पण मी म्हणतो, तुम्ही डेप्युटी कमिशनरकडे का नाही जात? जा, डेप्युटी कमिशनरला भेटा. पाणीसुद्धा पिऊ नका न् डेप्युटी कमिशनरला भेटा. हा तंटा काही इथं मिटणारा नाहीय. त्याला भेटा न् त्याला सांगा की हिंदूंच्या जीवाला न् मालमत्तेला फार मोठा धोकाय."

"डेप्युटी कमिशनरांकडे तर जायलाच पाहिजे, नक्कीच, पण लालाजी, आपलं रक्षण आपल्याच हातांनी शक्य आहे," वानप्रस्थीजी म्हणाले.

"ओ महाराज, पोरांना लाठी चालवायला जरूर शिकवा, भाला-बरची न् तलवारही चालवायला शिकवा, आमची लेकरं शूरवीर होतील, पण सगळ्यात आधी

डेप्युटी कमिशनरला भेटा. त्याला सांगा की शहरात दंगल होऊ देऊ नका. डेप्युटी कमिशनरचा खूप दबदबाय. त्यानं ठरवलं तर पाखरूसुद्धा उडू शकणार नाही!"

"आज रविवार आहे, डेप्युटी कमिशनर भेटू शकणार नाहीत," मंत्रीजी म्हणाले

"मी म्हणतो की घरी जाऊन भेटा. हीच वेळय. अगदी इथून उठून काही लोकांनं थेट त्यांच्या घरीच जावं."

यावर एका शीख गृहस्थानं सूचना देत सांगितलं:

"मला वाटतं, एक शिष्टमंडळ आधीच डेप्युटी कमिशनरला भेटायला गेलेलं आहे."

"त्यात कोण कोण आहेत?"

"त्यात काही काँग्रेसी आहेत, काही लीगवाले आहेत आणि शहरातले आणखीही काही लोक आहेत."

काही वेळ सगळीकडे शांतता पसरली.

"ते शिष्टमंडळ काय करणारय? हिंदूंनी आणि शीखांनी स्वतंत्रपणे जाऊन भेटायला पाहिजे. मुसलमान काय करीत आहेत हे त्याला सांगितलं पाहिजे. मुसलमानही सोबत असले तर तुम्ही काय सांगू शकणार आहात? हे सगळं काँग्रेसवाल्यांनी बिघडवलेलं आहे. त्यांनीच मुसलमानांना डोक्यावर चढवून ठेवलंय."

"गुंडगिरी फार वाढू लागलीय यात शंकाच नाहीय." एक शीख सद्‌गृहस्थ म्हणाले, "एक गाय पण कापलीय असं ऐकिवातय. माई सत्तोच्या धर्मशाळेबाहेर तिचे तुकडे फेकलेले होते. हे किती खरं आहे मला माहीत नाहीय, पण ऐकलंय मात्र नक्कीच."

हे ऐकून वानप्रस्थीजींचा चेहरा रागानं लालबुंद होऊ लागला आणि त्यांच्या डोळ्यांत रक्त उतरलं, पण ते काहीच बोलले नाहीत. आपला प्रक्षोभ गुपचूप दाबून ठेवत ते गप्प बसून राहिले.

"गोवध झाला तर इथे रक्ताच्या नद्या वाहू लागतील," मंत्रीजी उत्तेजित होऊन म्हणाले.

काही वेळ सगळेच गप्प राहिले. जरी ही गोष्ट खरोखरच घडली असेल तर यामागे तीव्र गुंडगिरी आहे. हे मुसलमान करणार नाहीत असं थोडंच असेल!

यावर शहरातल्या हिंदूंना आणि शीखांना व्यापक स्वरूपात संघटित करण्याच्या, आत्मसंरक्षणाची भागीदारीची योजना बनवण्याच्या सूचनांवर विचार होऊ लागला.

"मोहल्ला-कमिट्यांची काय अवस्थाय?" एका सद्‌गृहस्थानं विचारलं.

"इथं मोहल्ला-कमिट्या बनवणं फार अवघड कामय. सगळ्या मोहल्ल्यांत मुसलमान घुसून बसले आहेत. हे शहरच असं विचित्र तऱ्हेनं वसलंय. इथं प्रत्येक मोहल्ल्यात हिंदूही राहतात, आणि मुसलमानही राहातात. मोहल्ला-कमिट्या काय

ढेकळाच्या बनवणार - सगळ्या गोष्टींच्या बातम्या मुसलमानांना मिळतातच. १९२६ च्या दंगली नंतर दोनतीन मोहल्लेच तयार झालेत. त्यात हिंदूंचे डोळे उघडल्यानं त्यांनी आपली घरं बांधलीत. नवा मोहल्ला, राजपुरा वगैरे निव्वळ हिंदू आणि शीखांचे आहेत, नाहीतर बाकीच्या सगळ्या मोहल्ल्यांत मुसलमान घुसलेले आहेत."

मोहल्ला-कमिट्यांबद्दल खूप वेळपर्यंत गंभीरपणे विचारविनिमय झाला. एक उपसमितीही बनवण्यात आली. तिनं तात्काळ या मोहल्ला-कमिट्यांशी संपर्क स्थापावा असं ठरलं. शिवाय धोक्याच्या वेळी त्या कमिट्यांशी संपर्क कसा कायम ठेवावा याचाही विचार झाला.

त्याचवेळी एका वयोवृद्ध सद्गृहस्थानं सूचना केली:

"शिवालयातल्या घड्याळाचीही नीट तपासणी करून घ्या."

"का? त्याला काय झालंय?"

"असंच, सावधगिरी म्हणून. रात्रीच्या वेळीच धोक्याची घंटा वाजवावी लागली तर कमीत कमी ते चालू तर असलं पाहिजे. दोरी ओढली तर दोरीच तुटून जावी, घड्याळ वाजूच नये असं काही होऊ नये."

शहरातच्या ऐन मध्यभागी एका टेकाडावर शहरातलं जुनं मंदिर होतं. त्यालाच लोक शिवालय म्हणत असत. आजूबाजूला दुकानं होती. तिथंच मंदिरावर केव्हातरी हे घड्याळ लावण्यात आलं होतं.

"काळही फारच लोटलेला आहे," वयोवृद्ध गृहस्थ म्हणत होते, "१९२७ मध्ये लावलेलं होतं ते, किंवा कदाचित त्याच्याही आधीच असावं."

ह्यावर एका सद्गृहस्थाच्या तोंडातून निघून गेलं:

"वाजलं नाही तरच चांगलंय. परमेश्वरानं ते कधीच वाजवू नये!"

"याच भावनेनं आम्हाला डरपोक बनवून टाकलंय," वानप्रस्थीजी चिडून म्हणाले, "पदोपदी धोक्याला घाबरायचं. यामुळेच म्लेंच्छ आमची थट्टा करत असतात. आमच्या तरुणांना ते 'कोमटी' आणि 'बनिया' म्हणून हाका मारीत असतात."

लोक पुन्हा गप्प झाले. तिथं उपस्थित असलेल्या सगळ्यांची धारणा नक्कीच एकसारखी होती, पण ते वानप्रस्थीजींच्या सारखे उत्तेजित झालेले नव्हते. मुसलमान गडबडगोंधळ करतील असं त्यांनीही गृहीत धरलेलं होतं, पण त्यांची दंगा उसळावा अशी मात्र इच्छा नव्हती. कारण त्यामुळे खरोखरच हिंदू आणि शीखांच्या जीवित-मालमत्तेला धोका होता.

उपाय आणि साधनांच्या संदर्भात खूप वेळपर्यंत विचारविनिमय झाला. संरक्षणाच्या उपायांवरही आणि दंगल थांबवण्याबाबतही. अनेक सूचना सादर करण्यात आल्या: मोहल्ला-कमिट्या स्थापन करण्यात याव्यात, शहरातल्या सर्व हिंदू आणि

शीखांच्या संघटनांमध्ये संपर्क स्थापित करू शकेल अशा व्हॉलंटियर्सचा एक गट स्थापन करण्यात यावा, मोहरीच्या तेलाबरोबरच रेती आणि पाण्याची व्यवस्था करण्यात यावी वगैरे वगैरे. या गंभीर विचारविनिमयाच्या दरम्यान एखाद्या रागाच्या ध्रुवपदासारखा पुन्हा पुन्हा वयोवृद्ध सद्गृहस्थ आपल्या सूचनेची पुनरावृत्ती करीत होता:

"महाजनांनो, डेप्युटी कमिशनरला भेटायचं बघा. पाणी पिऊ नका, पण डेप्युटी कमिशनरला भेटा. सरळ इथून उठून काही लोकांनी त्याच्याकडे जावं. पाहिजे तर मीसुद्धा तुमच्याबरोबर यायला तयार आहे..."

शेवटी मंत्रीजी थांबले. तेल आणि कोळसा आणि लाठ्यांशी संबंधित निर्णयाबद्दल घरोघरी चपराशी पाठवून सूचना द्याव्यात, इतर संघटनांशी संपर्क स्थापित करावा, चौकीदारीसाठी गुरख्यांची व्यवस्था करावी, शिवालयातील घड्याळाच्या दुरुस्तीसाठी सनातन धर्म सभेच्या मंत्र्यांशी बोलावं, युवक सभेत जागृती घडवून आणावी, अंतरंग सभेतील इतर सद्गृहस्थ ज्यावेळी टांग्यांत बसून डेप्युटी कमिशनरच्या बंगल्याकडे रवाना होतील त्यावेळी वानप्रस्थीजींना वगळण्यात यावं; कारण आध्यात्मिक उपदेश देणाऱ्या आणि पांढराशुभ्र वेष परिधान करणाऱ्या वानप्रस्थीजींचे या जगातील तंट्याबखेड्यात गृहस्थाश्रमी लोकांसोबत हिंडत राहाणे हे काम नाहीय. अशा अनेक गोष्टी सभेत संमत झाल्या.

घरी गेल्यानंतर दानवीर प्रधानजींना त्यांचा मुलगा घरी नाहीय हे कळलं. त्यांचं डोकं भडकलं. आत्तापासूनच तो त्या वादळात सापडला तर नाहीय? ते वादळ लवकरच या शहरात भडकणार होतं.

ते घरी येत होते त्यावेळी रणवीर, आखाड्याचे संचालक मास्टर देवव्रतांच्या मागे-मागे, शहरातल्या अरुंद गल्ल्यांमधील एकानंतर एक लागणाऱ्या गल्ल्या ओलांडत चालला होता. मास्टर देवव्रतांच्या जडशीळ बुटांची टाप गल्लीतील भिंतींशी टकरा घेऊन घुमू लागलेली होती. त्यांच्या मागे जाताजाता पंधरा वर्षांच्या तरुण रणवीराच्या मनात लाटांसारखा उत्साह उचंबळून येत होता आणि रोमरोम पुलकित होत होता. आज त्याची परीक्षा होती आणि जर तो परीक्षेत उत्तीर्ण झाला तर त्याला दीक्षा मिळणार होती.

शहरातली कुठलीही गल्ली सरळ नव्हती. एक गल्ली काही अंतरापर्यंत सरळ असायची आणि मग थोडंसं अंतर गेल्यावर दुसरी एखादी वाकडी गल्ली तिला येऊन मिळायची. दोन्ही बाजूंची एकसारखी घरं त्यावर वाकलेली असायची. त्यांच्याच ओझ्यानं गल्ली वाकडी झालेली आहे असं वाटायचं. कधी कधी वाटायचं की आंधळ्या गल्लीत येऊन ठेपलेलो आहोत, पुढं गेल्यावर गल्ली बंद असल्याचं लक्षात येईल. पण ऐन शेवटापर्यंत पोहोचल्यानंतर एक चिंचोळा रस्ता उजव्या किंवा डाव्या बाजूला गेलेला

असायचा. देवव्रतचे चट् चट् वाजणारे बूट सगळ्या गल्ल्या ओळखत होते.

रणवीर वयानं लहान होता, त्यामुळेच त्याच्या डोळ्यांत अजूनही कुतूहल आणि सरळ विश्वास झळकत होता. त्याच्यात विशिष्ट परीक्षणासाठी आवश्यक असं गांभीर्य नव्हतं. गांभीर्य नसेना का, उत्साह तर होता, गुरुजींच्या आदेशानुसार प्राण देण्याची क्षमता तर होती, दृढ संकल्प तर होताच.

रणवीर जेव्हा लहान होता तेव्हा तो मंत्रमुग्ध झाल्यासारखा गुरुजींच्या मुखातून वीर पुरुषांच्या गोष्टी ऐकत असे - जेव्हा राणा प्रतापची उरलेली अर्धी भाकरी मांजरीनं खाल्ली होती आणि पहिल्यांदा त्याला असहाय्य स्थितीची जाणीव झालेली होती ती गोष्ट, आणि तशा किती तरी गोष्टी. शहराभोवतीच्या डोंगराकडे जेव्हा तो पाहायचा तेव्हा कधी त्याला त्या डोंगरावर चेतक घोडा पळत असल्याचा भास व्हायचा, कधी एखाद्या प्रचंड पाषाणावर घोडेस्वार झालेले शिवाजी त्याला दिसायचे, सुदूर तुर्कांच्या लष्कराकडे पाहत पहात शिवाजी म्लेंच्छ सरदाराला आलिंगन देत आहेत असे वाटायचे. त्याला गुरुजींनीच दोरीला वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक गाठी मारायचं शिकवलं होतं, त चढून वर जाणं शिकवलं होतं, आणि अग्निबाण व मेघबाणाचे गुण शिकवले होते.

"वाऱ्यावर सोडलेला अग्निबाण पुढे पुढे जातो, त्याचं टोक घर्षणामुळे चमकत असतं आणि त्यामुळे ठिणग्या पडतात. महाभारतातल्या युद्धात असाच अग्निबाण सोडलेला होता. तो वारा कापत चाललेला होता. मग तो कौरवांच्या एका योद्ध्याच्या ढालीला जाऊन लागला होता, आणि ढालीतून अग्नीच्या ठिणग्या उडाल्या होत्या. पण तीर पुन्हा पुढेच जात होता. अग्निबाण कधीच खाली पडत नाही, हेच त्याचं वैशिष्ट्य आहे. तो बाण सारखा गरगरत असतो, सगळ्या रणभूमीवर फिरत राहातो, आणि फिरताना सगळीकडे आगीचे डोंब उसळवत असतो. कुठं एखाद्या योद्ध्याच्या मुकुटाला स्पर्श केला की तिथं आगीच्या ज्वाळा भडकू लागत; कधी एखाद्या रथावर जाऊन पडला की रथ जळू लागे. चारी बाजूंना फिरणारा बाण जोपर्यंत सगळीकडे सगळ्या बाजूंना प्रचंड आगीच्या ज्वाळा पेटत नाहीत तोपर्यंत फिरत राहातो. मग बाण परत येतो, शत्रूच्या छावणीला भस्मसात करून विजयी सैनिकासारखा परत येतो, त्यातून प्रकाशकिरणं सांडत असतात, पाहताच डोळे दिपून जातात. हवेची चिरफाड करीत तो येतो. वाटतं, जणू हवेलाच आग लावीत तो येऊ लागलाय..."

वेदात सगळं काही लिहिलेलं आहे, विमान तयार करण्याची पद्धत, बॉंब तयार करण्याची पद्धत, हे गुरुजींच्याच मुखावाटे त्यानं ऐकलं होतं. त्यांच्याकडूनच त्यानं योगशक्तीचा महिमाही ऐकलेला होता, "ज्या मनुष्याच्या ठायी योगशक्ती आहे तो सर्व काही करू शकतो. हिमालयाच्या कुशीत एक योगिराज योगसाधना करीत होते. त्यांना सिद्धी प्राप्त झालेली होती. एके दिवशी जेव्हा ते समाधिस्थ झाले होते तेव्हा त्यांच्या

समाधीचा भंग करण्यासाठी एक म्लेंच्छ तिथे गेला. म्लेंच्छ तर गलिच्छ, घाणेरडे असतात, ते स्नान करीत नाहीत, शौचाला जाऊन आल्यानंतर हात धूत नाहीत, एकमेकांचे उष्टे खात असतात, वेळेवर शौचाला जात नाहीत, तर असा तो अस्वच्छ म्लेंच्छ योगिराजांसमोर उभा राहून त्यांच्याकडे पाहू लागला. त्याची कलुषित छाया पडण्याचाच उशीर की योगीजींनी आपले डोळे उघडले, डोळ्यांतून एक अशी दैवी ज्योत काढली की म्लेंच्छ तिथेच उभ्याउभ्याच भस्म होऊन गेला..."

रणवीरच्या डोळ्यांसमोर पुन्हापुन्हा म्लेंच्छ येत होते. शेजारीच रस्त्याच्या कडेला बसलेला मोची म्लेंच्छ आहे, घरासमोरचा टांगा चालवणारा म्लेंच्छ आहे, आपल्या वर्गात शिकणारा हमीद म्लेंच्छ आहे, गल्लीत भिक्षा मागणारा फकीर म्लेंच्छ आहे. शेजारी राहणारं कुटुंब म्लेंच्छांचंच आहे. तसाच कुणीतरी एक म्लेंच्छ योगिराजांची साधना भंग करण्यासाठी हिमालयात गेला असावा. आज आपल्या आठ सहकाऱ्यांपैकी एकट्या रणवीरलाच दीक्षेसाठी निवडण्यात आलेलं होतं. देवव्रतजींची सगळ्यांनाच भीती वाटत असे. ते खाकी चड्डीखाली काळ्या रंगाचे बूट घालीत, कडक आवाजात बोलत आणि कुणालाही कुठल्याही वेळी धुऊन काढू शकत असत. पण हे परीक्षण गुप्त होतं. केवळ दीक्षाप्राप्त तरुणांनाच ही माहिती होती, आणि ते कधीही हे रहस्य सांगत नसत.

गल्ल्या उजाड झाल्यासारख्या वाटत होत्या. परंतु जवळ गेल्यावर लक्षात आलं की एका घराची भिंत पडलेली होती आणि त्या खिंडारातून अंधार डोकावत होता.

एका जागी देवव्रतजींची पावलं थांबली! रणवीरला वाटलं की गल्ली अंधाराच्या गडद पुंजक्यात हरवून गेलेली आहे. खरं तर या निर्जन गल्लीत आल्यानंतर तो थोडासा घाबरलेला होता. लांबच लांब भिंतीत एक धूसर असा दरवाजा होता, आणि तो बंद होता. गुरुजींनी हात पुढे करून दरवाजा ढकलून उघडला.

समोर एक लांबरुंद अंगण होतं. त्याच्या पलीकडे एका कोठीच्या दारावर तरटाचा पडदा लोंबकळत होता. अंगणात डाव्या बाजूला विटांचा आणि दगडांचा ढीग रचलेला होता. रणवीरला ही जागा फारच बिकट वाटली होती.

अंगण ओलांडून गुरुजी कोठीजवळ आले, आणि दारावर थाप मारली. कोठीत कुणीतरी खाकरलं, मग पावलांचा आवाज ऐकू आला.

"मी देवव्रत आहे."

दरवाजा उघडला. समोर शाळेतला म्हातारा गुरखा चौकीदार उभा होता. दरवाजा उघडताच त्यानं हात जोडले.

कोठीच्या आत अंधार होता. आत एका बाजूला बाज ठेवलेली होती आणि त्यावर एक मळकट सतरंजी अंथरलेली होती. उजव्या बाजूला भिंतीला टेकून एक

लाठी उभी केलेली होती. जवळच एक चिलीम उलटी ठेवलेली होती. भिंतीतल्या खुंटीवर चौकीदाराचा खाकी रंगाचा लांब गरम कोट ठेवलेला होता, आणि त्याच खुंटीवर काळ्या रंगाच्या म्यानात बंद केलेली लहान तलवार अडकवलेली होती.

क्षणार्धात डाव्या बाजूनं कोंबड्यांच्या फडफडण्याचा आवाज आला. रणवीरनं मान वळवून पाहिलं. एका मोठ्या टोपल्यात पांढऱ्या रंगाच्या पाच-सहा कोंबड्या ठेवलेल्या होत्या.

रणवीरचा दंड पकडून गुरुजींनी त्याला मागच्या अंगणात नेलं. ते अंगण छोटंसंच होतं आणि दुसऱ्या बाजूला शेजारच्या घराची उंचच उंच भिंत उभी होती. गुरखा एका हातात कोंबडी अन् दुसऱ्या हातात सुरा घेऊन त्यांच्या मागं-मागं आला होता.

"इथं या भिंतीजवळ बस रणवीर आणि ही कोंबडी काप. दीक्षेच्या आधी तुला आपली मानसिक दृढता दाखवून देणं आवश्यकय."

त्यांनी रणवीरच्या हातात धरुन त्याला पुढे आणलं, "आर्य युवकाला मनसा-वाचा-कर्मणा अशा तिन्ही प्रकारच्या दृढतेची आवश्यकता असते. हा सुरा हातात घे व तिकडं जाऊन बस."

रणवीरला वाटलं की अचानक सगळीकडे भयानक शांतता पसरलेली आहे, भयानक स्मशानशांतता. उजव्या बाजूला विटांचा ढीग होता आणि त्यावर जागोजागी कोंबडीची पिसं पडलेली होती. ढिगाजवळ खाली एक दगडाची शिळा होती आणि कोंबड्यांच्या रक्तानं ती काळी पडलेली होती.

"इकडं बस. कोंबडीचा एक पाय आपल्या डाव्या पायाच्या खाली दाबून धर." रणवीरच्या हातात सुरा देत त्यांनी कोंबडीचे दोन्ही पंख पकडून एकमेकात खोसले. एका पंखाखाली दुसरा पंख खोसला, मग वरच्या पंखाला चुरगाळून आधीच्या पंखाखाली ठेवलं. कोंबडी जोरात ओरडली. पण पंख बांधलेले असल्यानं तिची फडफड बंद झाली.

"घे. पकड," गुरुजींनी सांगितलं आणि ते रणवीरच्याजवळ बसले. "हं, आत घाल सुरा."

पण रणवीरच्या कपाळावर घाम आलेला होता आणि त्याचा चेहरा वाईट तऱ्हेनं पिवळा पडला होता. त्याला आता ओकारी येणार आहे हे गुरुजींच्या लक्षात आलं.

"रणवीर!" गुरुजी जोरात ओरडले आणि त्यांनी फाडकन एक थप्पड रणवीरच्या गालफडात हाणली. रणवीर धाडकन् जमिनीवर जाऊन पडला. त्याचं डोकं भलतंच गरगरत होतं. अजूनही गुरखा त्यांच्या मागेच उभा होता. रणवीरला रडू कोसळत होतं आणि तो फारच व्याकुळ झालेला होता; पण थप्पड खाल्ल्यामुळे त्याची ओकारी बरीचशी आतल्या आतच परतली होती.

"ऊठ, रणवीर!" गुरुजींनी दटावलं.

रणवीर उठला आणि जड, त्रासलेल्या डोळ्यांनी गुरुजींकडे पाहू लागला.

"यात अवघड असं काहीच नाहीय. हे बघ, मी तुला दाखवतो."

आणि त्यांनी कोंबडीचा पाय आपल्या डाव्या पायाखाली दाबला. कोंबडीचे डोळे आधीपासूनच मिटू लागले होते. गुरुजींनी तिची मान आपल्या डाव्या हातात पकडली, आणि सुऱ्याचा केवळ एकच वार तिच्या मानेवर घातला. रक्ताची धार उसळून वाहू लागली. काही थेंब गुरुजींच्या डाव्या हातावरही उडाले. पण गुरुजींनी कोंबडीला सोडलं नाही. कोंबडीचं डोकं धडावेगळं होऊन त्यांच्या बुटाजवळच पडलं होतं, पण गुरुजी डाव्या हातानं तिच्या मानेतली नळी खाली दाबून टाकू लागले. पांढरीशुभ्र नळी बाहेर येण्यासाठी उसळत होती आणि गुरुजींनी तिला डाव्या हाताच्या अंगठ्यानं दाबून धरलेलं होतं. कोंबडीचं सगळं अंग थरथरत होतं. गुरुजींनी ती नळी जोरात दाबून धरली आणि काही वेळानं कोंबडीचं अंग स्थिर, निश्चल झालं. रक्तानं भरलेले मूठभर पंख रणवीरसमोर इतस्ततः पडले. गुरुजींनी कोंबडी एका बाजूला फेकून दिली आणि ते उठून उभे राहिले.

"आतून आणखी एक कोंबडी घेऊन ये." त्यांनी गुरख्याला सांगितलं.

याचवेळी रणवीरनं तिथंच बसल्या बसल्या उलटी केलेली आहे आणि दोन्ही हातांनी डोकं गच्च दाबून तो बसला आहे, हे त्यांना दिसलं. गुरुजींना वाटलं की आणखी एक थप्पड ठेवून द्यावी, पण ते गप्प उभे राहिले. थोडा वेळ तसंच स्तब्ध उभं राहून ते शांतपणे म्हणाले, "तुला आणखी एक संधी दिली जातेय. अरे, जो तरुण एका कोंबडीला मारु शकत नाही तो शत्रूला कसा काय मारणार?"

काही वेळ तशीच धाप लागल्यानंतर रणवीरला बरंच हलकं हलकं वाटू लागलं. पोटातली खळबळ हळूहळू शांत होत गेली.

"तुला अजून पाच मिनिटं देतो. एवढ्या वेळात जर तू ती कापू शकला नाहीस तर तुला दीक्षा दिली जाणार नाही."

आणि गुरुजी वळून कोठीत निघून गेले.

पाच मिनिटांनी जेव्हा देवव्रतजी कोठीतून बाहेर आले तेव्हा भिंतीजवळ कोंबडी तडफडत असताना त्यांना दिसली आणि रक्ताचे थेंबही उडताना दिसले. रणवीर आपला उजवा हात गुडघ्याखाली दाबून बसला होता. ते पाहूनच कोंबडीनं हातावर चोच मारलेली आहे हे गुरुजींच्या लक्षात आलं आणि रणवीरनं फक्त तिला जखमी केलेलं आहे, त्याला काही तिची मान कापणं शक्य झालेलं नाहीय हेही गुरुजींना कळलं. फार प्रयासानं रणवीरनं कोंबडीला दाबून ठेवलं होतं आणि तिच्या हलत्या मानेवर त्यानं कसातरी सुरा चालविलेला होता. आणि मग रक्त बाहेर येतय हे पाहूनच

त्यानं तिला सोडून दिलं होतं.

कोंबडी जमिनीवरून एकसारखी उसळ्या मारत होती. एक-एक फूट वर उसळायची आणि खाली पडल्यावर तिचे पंख जास्तच विस्कटून जायचे. मानेतून ओघळणारं रक्त जमिनीवर पडल्यानं आणखी एक डाग पडायचा.

पण रणवीर परीक्षा उत्तीर्ण झाला होता!

"ऊठ रणवीर!" गुरुजी म्हणाले, आणि जवळ आल्यावर रणवीरची पाठ थोपटू लागले. "शाब्बास! जरी हातात जास्त ताकद नसली तरीही तुझ्यात दृढता आहे, संकल्पशक्ती आहे. तुला दीक्षेचा अधिकार मिळाला आहे," म्हणत गुरुजी खाली जमिनीवर वाकले आणि दगडाच्या शिळेवर पडलेल्या रक्तानं आपलं करंगळीजवळचं बोट भिजवून त्यांनी रणवीरच्या कपाळावर रक्ताचा टिळा लावला.

रणवीर अजूनही भान हरवल्यासारखा उभा होता, त्याचं डोकं अजूनही गरगरत होतं, पण अर्धवट भानावर असलेल्या अवस्थेतही गुरुजींचं वाक्य ऐकून त्याला आनंद वाटला.

बाकीच्या सगळ्याच गोष्टींची व्यवस्था करण्यात आलेली होती, पण मुलांना तेल उकळवण्यासाठी मोठी कढई काही मिळत नव्हती. खिडकीच्या कट्ट्यावर तीन चाकू, एक सुरा, एक छोटंसं कृपाण एकत्र ठेवलेलं होतं खोलीतल्या एका कोपऱ्यावर दहा लाठ्या ठेवलेल्या होत्या. त्यांच्यावर पितळेची मूठ आणि खाली पितळेचं बूड बसवलेलं होतं. भिंतीवर एकावर एक असे तीन धनुष्य-बाण लटकवलेले होते. बोधराज खाली पडून धनुष्य-बाण मारू शकत असे, शब्दवेधी बाण चालवू शकत असे, आरशातलं प्रतिबिंब पाहून बाण मारू शकत असे, लोंबकळत्या दोरीवर नेम धरू शकत असे. बाणांच्या टोकांवर लावण्यासाठी त्यानं धातूची त्रिकोणी टोकं करून आणली होती, आणि तो आपल्या सहकाऱ्यांना त्यांच्या शक्यतांबद्दल सांगत होता, "याच्या टोकांवर सोमल चोळलं की तो विषबाण होईल. याच्या टोकावर कस्तुरी कापूर लावला की तो अग्निबाण होईल, जिथं आदळेल तिथून आग निघू लागेल. मोरचूद लावलं की बाण लागेल तिथून विषारी वायू निघू लागतील."

धर्मदेवानं कुठून तरी रिकाम्या काडतुसांची पेटी उचलून आणली होती, तीही भिंतीवर लटकवण्यात आली होती, कारण सगळीकडेच शस्त्रास्त्रांचा आभास निर्माण करायचा होता. रणवीरनं खोलीच्या आतच दरवाज्यावर मोठमोठ्या अक्षरांत 'शस्त्रागार' शब्द लिहिलेला होता.

वानप्रस्थीजींनी तेलाबाबत दिलेला आदेश अजूनपर्यंत कार्यान्वित करण्यात आलेला नव्हता. युवक संघाच्या एकाही सदस्याच्या घरी संपूर्ण डबा भरून तेल उकळलं जाऊ शकेल एवढी मोठी कढई नव्हती. तेलाचा डबा झाळून घेतलेला होता आणि

तो एका बाजूला भिंतीला टेकून ठेवलेला होता. त्यासाठी सगळ्या तरुणांनी चार-चार आणे जमा केलेले होते, आणि उरलेले काही पैसे नंतर देण्याच्या बोलीवर किराणाच्या दुकानदाराकडून मोठा पत्र्याचा डबा आणण्यात आला होता. तेलाची कढई जिथं अधूनमधून भोजनावळी व्हायच्या त्या मंदिरातही नव्हती.

मग संघटनेचा नायक बोधराज याला एक कल्पना सुचली - एवढी मोठी कढई हलवायाच्या दुकानातून आणता येईल.

"पण त्याच्या दुकानाला तर कुलूप लागलेलंय."

"हलवाई राहतोय कुठं?"

"नव्या मोहल्ल्यात."

"कुणी त्याचं घर पाहिलय का?"

बोधराजनं स्वतः ते पाहून ठेवलेलं होतं, पण नायक म्हणून इतकं हलकं काम तो स्वतःच्या खांद्यावर घेऊ इच्छीत नव्हता.

त्याचवेळी रणवीरनं पुढं होऊन सांगितलं, "दुकानाचं कुलूप तोडून टाका."

तरुणांच्या अंगात हुडहुडी भरली, पण ती सूचना मात्र कालानुरूप होती.

नायक काही वेळा छताकडे पहातच स्तब्ध उभा राहिला. गटाचं संचालन फार जबाबदारीचं काम असतं. कुलूप तोडताना तरुण पकडला जाऊ नये, कुणाची दृष्टी त्यावर पडू नये हे सगळं बघितलं पाहिजे. नायक कमसरीटच्या बाबू मस्तरामाचा मुलगा होता आणि स्थानिक महाविद्यालयातल्या पहिल्या वर्षाचा विद्यार्थी होता. त्या मुलांच्या समूहात फक्त तोच खिसे असलेला सैनिकासारखा सदरा वापरायचा.

"ठीकयं, कुलूप तोडा. पण हे काम गुपचूप, चोरून केलं पाहिजे. कुलूप तोडायला कोण जाऊ शकेल?"

"मी जाईन," रणवीरनं पुढं होऊन सांगितलं.

नायकानं रणवीरला आपादमस्तक न्याहाळलं, आणि मग नकारार्थी मान हलवली.

"तुझी उंची कमी आहे, कुलूप वरच्या बाजूला असलं तर तुझा हात पुरणार नाही."

"नाही, कुलूप खालीच लावलेलं आहे, मी पाहिलंय, कितीदा तरी पाहिलेलं आहे."

रणवीर फारच जोरजोरात बोलायचा, ते नायकाला आवडायचं नाही. पण मुलगा चपळ होता, फार वेगानं पळायचा, प्रत्येक काम जलद करायचा. फक्त त्याच्यात शिस्तीचा अभाव होता.

काहीही करून रणवीर कढई घेऊनच येईल, पण तो निष्काळजीपणे वागू शकतो, एखादी चूकही करून ठेवू शकतो, आणि त्यामुळे त्या युवक मंडळाला धोका निर्माण होऊ शकतो हे नायकाला माहीत होतं.

"तू आणि धर्मदेव दोघं जा." नायकानं आपला निर्णय दिला, "पण लक्षात ठेवा, कुणालाही कळू नये की तुम्ही कुलूप तोडून कढई आणलेली आहे. जेव्हा रस्ता सुनसान असेल तेव्हा जा, आणि दोघं सोबत जाऊ नका, वेगवेगळे जा."

चौक ओलांडल्यानंतर नाल्याच्या डाव्या बाजूलाच हलवायाचं दुकान होतं. दुकानाच्या मागेच रणवीरला काहीतरी हलत असल्याचं दिसलं. ती हलवायाची पांढरी पगडी होती. याचा अर्थ हलवाई आला आहे आणि दुकान उघडू लागला आहे. पण हलवाई तिथंच दुकानामागं डोलत होता. काय चाललंय, हलवाई तिथं उभा राहून करतोय तरी काय? हलवाईच आहे, की आणखी दुसराच कुणीतरी? एखादा म्लेंच्छ त्यांचं दुकान लुटायला तर आला नाही ना? रणवीरनं नीट काळजीपूर्वक पाहिलं. तो हलवाईच होता आणि दुकानाचा मागचा भाग उघडत होता.

रस्ता निर्मनुष्य होता. तसा तर एरव्हीही हा रस्ता रिकामाच असायचा, क्वचित एखाद-दुसरा भेळवाला आला तर आला, किंवा मग एखाद-दुसरा टांगा. या रस्त्यावर फक्त संध्याकाळीच चमकदमक असायची.

दोघा तरुणांनी आळीपाळीनं रस्ता ओलांडला.

"तू त्याच्याशी गप्पा मारत रहा, मी आतून कढई उचलून आणीन." रणवीर म्हणाला.

"याची गरज नाहीय. तो आपला हिंदू बांधव आहे, आपणहून देईल."

"मी त्याला कढई मागीन, तू मागायची नाही."

"जा रे बुटक्या, तू स्वतःला काय समजतोस?"

मागच्या बाजूनं दोन्ही तरुण दुकानाकडे गेले. दुकानाचा दरवाजा उघडा होता, पण हलवाई बाहेर उभा नव्हता. तो नक्कीच आत गेलेला असावा.

रस्त्याच्या कडेला असूनही दुकानात अंधार होता. तेल, तूप, आणि मळानं चिकट झालेल्या आसनावर माश्या घोंघावत होत्या. रणवीरनं आत डोकावून पाहिलं.

"काय आहे?" आतून आवाज आला. "आज दुकान बंदय."

दोघंही आत गेले. एका बाजूला उभा असलेला हलवाई मैद्याचा डबा पोत्यात पालथा करत होता. दाराबाहेर कुणाचा तरी चेहरा पाहून तो थबकला होता.

"या, या," हलवायानं हसून स्वागत केलं, "आज काही तयार केलं नाही बघा. मला वाटलं थोडंसं सामान घरी घेऊन जावं म्हणून आलो होतो. शहरातलं वातावरण काही चांगलं नाहीय. बेटा, तुम्ही पण घरीच बसायला पाहिजे, असं बाहेर भटकायला नको."

"उचल ती कढई." रणवीरनं धर्मदेवाला आज्ञा सोडली.

धर्मवीर मागच्या भिंतीला लावलेल्या कढयांकडे जाऊ लागला."

"जातीच्या रक्षणार्थ कढई येऊन जाण्यात येत आहे. संकट समाप्त झाल्यावर

परत केली जाईल."

हलवायाच्या काहीच लक्षात आलं नाही. 'हे काय चाललंय? तुम्ही कोण आहात? कढईची गरज कशासाठी पडली? लग्न-बिग्न आहे का?"

पण दोघांपैकी एकानंही उत्तर दिलं नाही.

"मधली कढई उचल. ती समोर ठेवलीय ती." रणवीरनं सांगितलं.

"अरे थांबा थांबा, काय आहेय ते तर सांगा? कुठं घेऊन चाललात ती कढई?"

"कळेल नंतर. उचल रे ती कढई."

"वा-वा, असं कसं होईल? विचारलं नाही, मागितलं नाही, आणि आपण होऊनच कढई उचलताय. आधी सांगा तर खरं की काय आहे, कशाला पाहिजे, तुम्ही कोण आहात?"

तात्काळ रणवीरनं आपल्या खिशात हात घातला, आणि मग तो ओरडून म्हणाला, "तर तुम्ही कढई देणार नाहीत तर?" आणि त्यानं झेप घेतली.

हलवाई काही बोलायच्या आतच त्याच्या उजव्या गालातून रक्ताची धार लागली. एकदा झेपावल्यानंतर त्याचा हात पुन्हा सदऱ्याच्या खिशात गेला. हलवाई दोन्ही हातांनी चेहरा झाकून, पायांच्या आधारानं 'हाय-हाय' करत खाली बसला. रक्ताचे डाग त्याच्या गालावरून ओघळून फरशीवर पडत होते.

"ही गोष्ट कुणाला कळली नाही पाहिजे, नाही तर खून करून टाकू." धर्मदेव कढई घेऊन नाला ओलांडून पुढं गेला होता. रणवीर थोडा वेळ थांबून थोड्याशा अंतरानं त्याच्या मागून येत होता. रणवीर विचार करीत होता की मारणं काही फार अवघड गोष्ट नाहीय. याची मी अगदी सहज कत्तल करू शकलो असतो. हात उचलला न् बस! हो, लढणं मात्र अवघड असतं, विशेषतः जेव्हा समोरचा माणूस लढण्याच्या पवित्र्यात उभा असेल तेव्हा. पण सुरा खुपसून मारणं फार सोपं कामय, यात अवघड असं काहीच नाहीय.

घराच्या उंबऱ्याजवळ आल्यावर धर्मदेव थांबला.

"तू त्याला कां मारलंस?" रणवीर तिथं आल्यावर धर्मदेवनं त्याला विचारलं.

"त्यानं हुज्जत कशाला घालावी?"

पण धर्मदेवाचा घसा कोरडा पडला होता आणि जीभ अडखळत होती. "जर कुणी पाहिलं असतं तर? हलवाई जोरात किंचाळला असता तर?" धर्मदेवनं थुंका गिळून टाकायचा निष्फळ प्रयत्न केला.

"आपण कुणाला घाबरत नाही. जे करायचं असेल ते करावं. तुला पण जे करायचं असेल ते कर."

रणवीरनं रुबाबात सांगितलं आणि तो पायऱ्या चढू लागला.

7

"ऑफिसात भेटण्याऐवजी आपण घरी भेटायला आलात याचा अर्थ नक्कीच काही फार महत्त्वाचं काम असलं पाहिजे." रिचर्डनं हसून सांगितलं.

चपराश्यानं पडदा वर केला. नागरिकांच्या शिष्टमंडळाचे सदस्य एक-एक करून दालनाच्या आत आले. रिचर्ड दरवाज्याजवळच उभा राहिला. दालनात ठेवलेल्या खुर्च्यांकडे इशारा करू लागला आणि भिरभिरत्या नजरेनं शिष्टमंडळातील सदस्यांकडे पहात राहिला. मग तो टेबलामागच्या खुर्चीवर जाऊन बसला आणि बसताक्षणीच त्यानं पेन्सिल हातात घेतली. चार माणसं पगडीधारी होती, एक रुमी टोपीवाला होता, दोघांनी गांधी टोपी घातलेली होती. रिचर्डनं शिष्टमंडळाचे घटक पाहूनच ठरवलं होतं की यांना निभवणं काही फारसं अवघड काम नाहीये.

"सांगा, मी आपली काय सेवा करू शकतो?"

सदस्यांना डेप्युटी कमिशनरांची सभ्यता फारच थोर वाटली. याआधीचा कमिशनर तर नीट बोलायचाच नाही, त्याला भेटणं सुद्धा फारच अवघड काम होतं.

एव्हाना रिचर्डनं सगळ्याच सदस्यांचं अवलोकन केलेलं होतं. पोलीस रिपोर्टप्रमाणं त्याला ते कोण-कोण असावेत हे कळालेलं होतं. गांधी टोपीवाला माणूस म्हणजे सोळा वर्षं जेलात काढलेला साधासुधा बक्षी असावा. तो कोपऱ्यात बसलेला रूमी टोपीवाला हयातबख्श असेल - मुस्लिम लीगचा कारकून. सोबत किशन कॉलेजचा अमेरिकन प्रिन्सिपल हर्बर्टही आला होता. आणि त्या लोकांनी आपल्यासोबत प्रो. रघुनाथलाही पकडून आणलेलं होतं, कारण तो रिचर्डचा मित्र होता. बाकीचे लोक वेगवेगळ्या संस्थांतून आलेले होते.

रिचर्ड बक्षीजीकडे वळून म्हणाला, "शहरात अगदी तंग परिस्थिती आहे असं मला समजलं."

"आम्ही याच संदर्भात आपणांस भेटण्यासाठी आलो आहोत," बक्षीजी म्हणाले. बक्षीजी उत्तेजित होऊन बोलत होते, सकाळच्या कामामुळे ते शरमिंदे झालेले होते. आधी ते प्रधानांच्या घरी गेले होते, पण तिथं उपेक्षा झाल्यामुळे त्यांनी डेप्युटी कमिशनरकडेच शिष्टमंडळ घेऊन जाण्याचा निर्णय घेतला होता. एकेका सदस्याला घरी जाऊन पकडून-पकडून एकत्र केलेलं होतं, आणि आपल्यासोबत आणलेलं होतं. डेप्युटी कमिशनरकडे जाण्याबाबत कुणालाच आक्षेपार्ह असं काही वाटत नव्हतं.

डेप्युटी कमिशनरकडे जाण्याबाबत कुणालाच आक्षेपार्ह असं काही वाटत नव्हतं.

"परिस्थिती आटोक्यात येईल अशी सरकारच्या बाजूनं तात्काळ कार्यवाही व्हावी. नाहीतर... नाहीतर या शहरावर घारी आणि गिधाडं घिरट्या घालत राहातील!" त्यांनी सकाळच्याच वाक्याचा पुनरुच्चार केला. ते वाक्य पुन्हा पुन्हा त्यांच्या मेंदूत घुमू लागलेलं होतं.

बाकीचे लोक नक्कीच चिंताक्रांत होते, पण बक्षीजींसारखे उत्तेजित नव्हते.

त्याच सुमारास प्रोफेसर आणि रिचर्डची नजरानजर झाली. प्रोफेसर हा एकमेव असा हिंदुस्थानी होता, ज्याच्याबरोबर रिचर्डचं अधून मधून उठणं-बसणं होतं. दोघांनाही इंग्रजी साहित्य आणि भारतीय इतिहासाची आवड होती, आणि रिचर्डला तो नेहमीच एक सुशिक्षित आणि सुसंस्कृत माणूस वाटत असे. दोघांनी डोळ्यांतल्या डोळ्यात स्मितहास्य केलं. जणू काही ते दोघंही म्हणत होते, "या लोकांनी आम्हाला उगीचच या दुनियादारीच्या कामात ओढून आणलंय, एरवी आमचं जग तर वेगळंच आहे."

रिचर्डनं डोकं हलवलं आणि पेन्सिलनं टेबलावर टक्टक् आवाज केला.

"पहा, सरकार तर बदनाम आहे. मी इंग्रजी ऑफिसर आहे. ब्रिटिश सरकारवर तुमचा विश्वास नाही, त्याचं सांगणं तुम्ही थोडंच ऐकणार आहात?" रिचर्डनं उपरोधानं सांगितलं आणि तो पेन्सिलनं टक्टक् करीत राहिला.

"पण शासन तर ब्रिटिशांच्या हातात आहे आणि आपण ब्रिटिश सरकारचे अधिकारी आहात. शहराचं रक्षण ही आपलीच जिम्मेदारी आहे." बक्षीजी म्हणाले. बोलताना त्यांची हनुवटी थरथरत होती आणि उत्तेजित झाल्यामुळे चेहरा पिवळा पडलेला होता.

"पण सगळी शक्ती तर यावेळी पंडित नेहरूंच्या हातात आहे." रिचर्डनं पुन्हा हसत-हसत हळुवार आवाजात सांगितलं. मग बक्षीजींकडे पाहून तो म्हणाला, "तुम्ही लोक ब्रिटिश सरकारच्या विरोधात असला तरी दोष ब्रिटिश सरकारचा, आणि आपापसांत भांडत असलात तरी दोष ब्रिटिश सरकारचा." त्याच्या चेहऱ्यावरचं स्मित कायमच होतं. पण तो स्वतःला सावरून घेत म्हणाला, "पण असो. आम्हाला हा मामला मिळून मिसळून एकत्र बसूनच सोडवायला पाहिजे," आणि त्यानं हयातबख्शकडे पाहिलं.

"पोलीस उदासीन राहिले तर काहीच होणार नाही," हयातबख्श म्हणाला, "मशिदीच्या समोर जे काही पाहण्यात आलं त्यांत हिंदूंचाच फार मोठा खोडसाळपणा आहे."

"हिंदूंचाच खोडसाळपणा आहे हे तुम्ही कसं काय म्हणू शकता?" दानवीर लक्ष्मीनारायणांनी उसळून विचारले, आणि बोलता बोलताच त्यांचा आवाज चढला.

रिचर्डसाठी हा मामला आपोआपच उलगडू लागला होता.

"एकमेकांना दोष दिल्यानं काही साध्य होणार नाही," रिचर्डनं निश्चितपणे सांगितलं, "आपण, मला वाटतं, हा मामला सोडवण्यासाठीच माझ्याकडे आला आहात."

"नक्कीच," हयातबख्श म्हणाला, "शहरात दंगा व्हावा, मारामारी व्हावी अशी आमचीही इच्छा नाहीय."

लक्ष्मीनारायणला फारच एकाकीपण जाणवलं. त्याला आपल्या धर्म-बांधवांचा राग आला. तेही सोबत असते तर यावेळी त्याला एकट्यालाच मुसलमानांविरुद्ध बोलायचा प्रसंग आला नसता. डेप्युटी कमिशनरला दहा गोष्टी सांगता आल्या असत्या - जामा मशिदीत कशी कशी शस्त्रास्त्रं जमा केली गेली आहेत, एका गाईला कसं कापून टाकण्यात आलं आहे, वगैरे. इथं बोलणं तर नकटं होण्यासारखंच आहे. हिंदू-शीखांचं एक वेगळंच शिष्टमंडळ घेऊन डेप्युटी कमिशनरांना भेटणं जास्त उचित झालं असतं, त्यांच्यासमोर काळं आणि पांढरं असं दोन्ही ठेवता आलं असतं.

बक्षीजींनी रिचर्डला उद्देशून म्हटलं, "शहरात जर पोलीस गस्त घालू लागले, जागोजागी सैनिकांच्या चौक्या बसवण्यात आल्या तर दंगेधोपे होणार नाहीत, आणि परिस्थितीवर नियंत्रण ठेवता येईल."

रिचर्डनं डोकं हलवलं, मग स्मितहास्य करून तो म्हणाला, "मी डेप्युटी कमिशनर आहे, सैन्याची व्यवस्था तर माझ्या हातात नाही. इथं छावणी आहे, पण त्याचा अर्थ सैन्य माझ्या आदेशानुसार काम करतं असा नाही."

"छावणीही ब्रिटिश सरकारची आहे आणि सत्ताही ब्रिटिश सरकारची आहे." बक्षीजी म्हणाले, "आपण सैन्य आणलंत तरच मामला आवाक्यात येईल."

रिचर्डनं मान हलवली, "सैन्याला मी आदेश देऊ शकत नाही, हे तर आपल्यालाही माहीत असेल. डेप्युटी कमिशनरला असा कुठलाही अधिकार नाही."

"आपण सैन्य बसवू शकत नसाल तर शहरात कर्फ्यू तरी लावा. त्यानंही परिस्थिती सावरली जाईल. पोलिसांच्या चौक्या बसवा."

"या एवढ्याशा सामान्य घटनेमुळे कर्फ्यू लावला गेला तर शहरात अजून जास्त भीती पसरणार नाही का? तुम्हाला काय वाटतं?"

रिचर्डनं हे शब्द अशा पद्धतीनं विचारले की जणू तो सल्लाच मागू लागलाय. पण त्याचवेळी त्यानं रॅकमधून एक कागद उचलला आणि पेन्सिलनं त्यावर काहीतरी लिहिलं. मग त्यानं घड्याळाकडे पाहिलं.

"सरकारच्या बाजूनं जे काही करता येईल ते सरकार करीलच," रिचर्डनं आश्वासन देत सांगितलं, "पण आपण शहरातले पुढारी आहात, लोक तुमचं बोलणं नीट ऐकतील. आपण एकत्र येऊन लोकांना अपील करा, शहरात शांतता राखा, असं आवाहन करा."

दोघा-तिघांनी होकारार्थी मान हलवली. साहेबांचं म्हणणं बरोबर आहे.

रिचर्ड सांगतच होता, "मुस्लिम लीग आणि कॉंग्रेस, दोन्हीचे पुढारी इथं हजर आहेत. आपण सरदारजींनाही सोबत घ्या आणि सगळ्यांची मिळून एक शांतता कमिटी स्थापन करा. सरकार आपल्याला सर्वप्रकारे मदत करील..."

"ते तर आम्ही करूच," बक्षीजी पुन्हा उत्तेजित आवाजात बोलू लागले, "पण सध्या परिस्थिती फारच नाजूक आहे. जर मारामारी न् कापाकापी सुरू झाली तर मग ते आवरणं फार कठीण होऊन बसेल. एखादं विमान शहरावरून उडालं तरी लोकांना कळेल की सरकारला परिस्थितीची कल्पना आहे."

रिचर्डनं पुन्हा मान हलवली, स्मित केलं आणि कागदावर काही तरी लिहून घेतलं.

"विमानाची व्यवस्था करणंही माझ्या हातात नाही," रिचर्ड म्हणाला.

"सगळं काही आपल्या हातात आहे, अर्थात आपल्याला काही करायचं असलं तरच."

इतकं गप्प राहाणं काही बरोबर नाही, रिचर्डनं विचार केला, हा माणूस फारच पुढं चाललाय.

"खरं पाहिलं तर तुम्हा लोकांचं माझ्याकडे तक्रार घेऊन येणंच चूक होतं. तुम्ही वस्तुतः पंडित नेहरू किंवा डिफेन्स मिनिस्टर सरदार बलदेवसिंहकडे जायला पाहिजे होतं. सरकारचा लगाम तर त्यांच्या हातात आहे," हे म्हणतच रिचर्ड हसू लागला.

डेप्युटी-कमिशनरचं हे स्वरूप पाहून बाकीचे लोक गप्प झाले. पण बक्षीजी पुन्हा उत्तेजित होऊन म्हणाले, "आत्ता एका घंट्याभरापूर्वी तुमचे इंग्रज पोलीस अधिकारी रॉबर्ट साहेब यांनी जबरदस्ती करून एका मुसलमान कुटुंबाला घरातून बाहेर काढलं असं आम्हाला कळालंय्. त्यामुळे त्या भागात तणाव वाढलेला आहे, कारण तो मुसलमान एका हिंदू घरमालकाचा भाडेकरू होता. मला वाटतं, या शहरातील परिस्थितीचा विचार करता अशा प्रकारची कार्यवाही स्थगित करायला हवी होती."

रिचर्डला या घटनेबद्दल माहिती होती, किंबहुना ही कार्यवाही करण्यापूर्वी पोलीस अधिकाऱ्यानं रिचर्डचा सल्ला घेतलेला होता. आणि कोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणं दैनंदिन व्यवहारातली सामान्य बाब आहे, ती थांबवण्यात काही मतलब नाही हे रिचर्डनं सांगितलं होतं. पण त्यानं शिष्टमंडळाच्या सदस्यांना मात्र त्याला या संदर्भात काही माहीत आहे असं जाणवू दिलं नाही. पेन्सिलनं कागदावर काही तरी लिहून घेतल्यानंतर तो म्हणाला, "मी चौकशी करीन." आणि मग पुन्हा त्यानं घड्याळाकडे पाहिलं.

त्यावर बरंच वय झालेला पाद्री आणि स्थानिक मिशनच्या महाविद्यालयाचा

प्राचार्य सौम्य आवाजात म्हणाला, "शहराची काळजी घेण्याचा प्रश्न हा राजकीय स्वरूपाचा नाही, हा राजकीय पक्षांच्याही वरचा प्रश्नय्, शहरातल्या सर्व लोकांचा, सर्व नागरिकांचा प्रश्न आहे. यात आपापल्या पक्षांना विसरणं आवश्यक आहे. सरकारची भूमिकाही त्यात महत्त्वाची आहे. आपण सगळ्यांनीच एकत्र येऊन शहरातील परिस्थिती नीट केली पाहिजे. आपल्याला यावेळी शहरातून हिंडावं लागेल आणि लोकांना समजावून सांगावं लागेल, त्यांना अपील करावं लागेल की आपापसांत भांडणं योग्य नाही."

रिचर्डनं तात्काळ या सूचनेचं समर्थन करीत ती जास्तच जोरदारपणे मांडली, "एक बस करावी, त्यावर लाउडस्पीकर लावला जावा, आपण सर्वांनी आत बसावं आणि शहरभर हिंडून आपला आवाज लोकांपर्यंत पोचवावा अशी माझी सूचना आहे."

रिचर्डच्या तोंडातून हे शब्द बाहेर पडतात न पडतात तोच बाहेर बागेच्या दिशेनं घाबरलेले अनेक आवाज ऐकू येऊ लागले.

"पुलाच्या पलीकडे एका हिंदूची कत्तल करण्यात आलेली आहे," बाहेर बसलेल्या शिपायाला एक माणूस सांगत होता, "सगळा बाजार बंद झालेला आहे."

शिष्टमंडळातील सदस्यांचे कान टवकारले गेले. डेप्युटी कमिशनरांचा बंगला शहरापासून फार दूर होता. खरोखरच दंगल पेटलेली असेल तर सदस्यांना आपापल्या घरी जाणंसुद्धा अशक्य होईल. नेमका त्याच वेळी बंगल्याच्या पलीकडे एक टांगा भरधाव पळत असल्याचा आवाज आला. रस्त्यावर कुणाच्यातरी पळण्याचाही आवाज आला.

"शहरात गडबड सुरू झालीय् वाटतं!" लक्ष्मीनारायणनं घाबरूनच हे वाक्य उच्चारलं आणि तो उठून उभा राहिला.

"जे काही शक्य असेल ते केलं जाईल." रिचर्डनं सांगितलं.

"गडबड सुरू झाली असेल तर फार वाईट गोष्टय्."

एकानंतर एक सगळेच सदस्य उठून उभे राहिले, आणि पडदा वर करून बाहेर आले. डेप्युटी कमिशनरही दारापर्यंत त्यांच्यासोबत आला.

"तुम्हाला पाठवण्याची आम्ही व्यवस्था करू. पोलिसातले काही जवान आम्ही तुमच्यासोबत देऊ." रिचर्ड म्हणाला, आणि टेबलावर ठेवलेल्या टेलिफोनकडे वळला.

"आपण आमची काळजी करू नका. शहरात गडबड होऊ नये हे आवश्यकय्," बक्षीजींनी बाहेर येता-येता सांगितलं, "अजूनही वेळ गेलेली नाही, आपण कर्फ्यू लावावा."

साहेबांनी हसून मान हलवली.

बंगल्यातून बाहेर पडताच शिष्टमंडळातील सदस्यांच्या डोक्यात जणू धूळ उडू लागली होती. फाटक ओलांडताच त्यांनी एकमेकांशी बोलणं बंद केलं होतं. काही वेळ ते एकमेकांसोबतच चालले होते, मग अचानक लक्ष्मीनारायण आणि सरदारजी घाईघाईनं रस्ता ओलांडू लागले. लक्ष्मीनारायणनं डोक्यावरची पगडी बगलेत दाबून धरली आणि पळत-पळत तो रस्ता ओलांडू लागला.

बंगल्याच्या बाहेर रस्त्यावर येताच उजव्या हाताला उतार होता. तो सरळ पुलापर्यंत गेलेला होता. पूल शहरापासून छावणी वेगळी पाडायचा.

हर्बर्ट आपल्या सायकलवरून आला होता. वयोवृद्ध असूनही अजूनही तो सायकल चालवायचा. तो हळूहळू सायकल चालवत उतारावरून पुलापर्यंत आला. त्याला एकदा वाटलं की शांतता-समितीची मीटींग कधी आणि कुठे होईल हे विचारावं. पण या लोकांना घाबरलेलं पाहून तो गप्प बसला. दंगल उसळलेली असेल तर आता कसली मीटींग?

हयातबख्श पळत नव्हता, तो फक्त जोरजोरात चालला होता आणि एकसारखा मागं वळून बघत होता. बहुतेक जणच मागे वळून बघत होते.

'घाबरण्यासारखं काही नाही, आरामात जाऊ, हा भाग मुसलमानांचाच आहे!' त्यानं मनातल्या मनात म्हटलं. रस्त्याच्या पलीकडे सरदारजी झपाझप चालत निघून गेले. त्यांच्यामागे जवळजवळ दहा फुटांच्या अंतरावर लक्ष्मीनारायण चालत येत होता. जाडजूड शरीर असल्यामुळे त्याला लवकर लवकर चालणं कठीण वाटत होतं, आणि तो सारखा आपली मान रुमालानं पुसत होता. बक्षी आणि मेहता काही वेळ गेटजवळच थांबले होते, मग तेही उताराच्या रस्त्याला लागले.

"चला, टांगा करू. पायीपायी चालण्यानं फार वेळ लागेल," मेहता म्हणाले. बक्षीजी थांबले. मागाहून एक टांगा येत होता. मेहतांनी घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकला, ते रस्त्याच्या कडेला उभे राहिले आणि हात हलवत हलवत त्याला थांबायला सांगू लागले.

"कुठे जायचंय?" सावळ्या रंगाच्या पोरसवदा वयाच्या टांगेवाल्यानं घोड्याचा लगाम ओढत विचारलं.

"स्टँडपर्यंत घेऊन चल."

"दोन रुपये पडतील."

"दोन रुपये? कशाचे? चेष्टाय का काय?" जुन्या सवयीनुसार बक्षीजी म्हणाले. टांगा चालू लागला.

"बसा, बसा बक्षीजी जे मागेल ते द्या. ही वेळ सौदा करायची नाही, चला बसा." आणि मेहताजी मागच्या सीटवर बसले. "लौकरात लौकर शहरात घेऊन चल."

त्यांना टांग्यात चढताना पाहून लक्ष्मीनारायणही वळून त्यांच्याकडेच येऊ

लागला होता. पण तेवढ्यात टांगा निघालासुद्धा. लक्ष्मीनारायण सडकेच्या मध्यभागी उभं राहून नुस्तं पहात राहिला.

"हिंदू हिंदुशी असाच व्यवहार करणार. प्राचीन काळापासून हेच घडत आलं आहे. वारे हिंदू! '

लक्ष्मीनारायणनं हे मनातल्या मनात म्हटलं आणि छडी आपटत आपटत तो बाजूच्या पायवाटेने पुन्हा परत गेला.

यावेळी उरलेली माणसे स्वतंत्रपणे, एकमेकांपासून दूर अंतर ठेवून उतारावरून चाललेली होती. लक्ष्मीनारायणच्या थोडं पुढे हकीम अब्दुलगनी होते आणि ते काँग्रेस कमिटीचे फार जुने कार्यकर्ते होते. त्यांच्यापुढे सरदारजी होते आणि सर्वात पुढे हयातबख्शनं कोट काढून खांद्यावर घेतला होता.

टांग्यात बसताच बक्षीजी म्हणाले, "काही लोकांना टांग्यात घेऊ."

"कुणाला घेऊ नका बक्षीजी. असंच डाव्या हाताच्या रस्त्यानं निघून जाऊ. ते आपापली व्यवस्था करतील, " मेहता म्हणाला. मग पुष्टी जोडण्याचा प्रयत्न करीत म्हणाला, "कुणाकुणाला बसवून घ्याल?"

टांग्यात बसून आपण मोठी चूक केली आहे असं बक्षीजींना वाटलं. त्यांना मेहताची चीड आली, आपल्या स्वतःची चीड आली. आपण मेहता आणि इतरांच्या बोलण्यात का अडकतो? इथं एकत्र आलो होतो, एकत्रच जायला पाहिजे. तरी पण ते बसूनच राहिले.

टांगा जेव्हा हयातबख्शजवळून गेला तेव्हा हयातबख्श हसून म्हणाला, "पळून चाललात का? आधी भडका उडवता, मग पळून जाता!"

बक्षीजीबरोबर त्याची घनिष्ठता होती, याच शहरात दोघंही लहानाचे मोठे झाले होते, वेगवेगळ्या राजकीय विचारसरणी असूनही ते एकमेकांशी हसत खेळत भेटत असत, दोघं एकमेकांची मजा करत असत.

हयातबख्शनं मागं वळून पाहिलं, मागाहून सरदार बिशनसिंहला येताना पाहून तो म्हणाला, "बक्षीजी तर निघून गेले! शांतता स्थापन करायला निघाले होते! हेच तर वैशिष्ट्यय या लोकांचं!"

पण सरदार बिशनसिंह गप्पच राहिला. मान खाली घालून गप्प चालत राहिला.

सगळ्यात मागं राहिलेल्या लक्ष्मीनारायणला काही तरी करून पुढं जावं आणि हयातबख्शच्या सोबत चालत जावं अशी आतून विलक्षण इच्छा झाली. हा भाग मुसलमानांचा होता आणि मुसलमानांसोबत चालत जाणं म्हणजे धोक्याशिवाय जाणं होतं. हयातबख्शला सगळे लोक ओळखतात पण.

"थांबा हो, एवढी काय घाईय?" त्यानं जोरात म्हटलं.

त्याचा आवाज ऐकून तिघंही आपापल्या जागी थांबले, पण लक्ष्मीनारायण छडी फिरवत सरळ पुढे निघून गेला आणि शेवटी हयातबख्शपर्यंत पोहोचला.

"शहरात गडबड झाली तर फार वाईट होईल," तो म्हणाला आणि हयातबख्शसोबत चालू लागला. हयातबख्शला लक्ष्मीनारायणचा इरादा समजला होता, आणि त्यात त्याचंही हित होतं, कारण पूल ओलांडून थोडंसं पुढे गेल्यावर हिंदूंचा मोहल्ला सुरू होत होता, आणि हयातबख्शचं घर त्याच्याही पुढे होतं. लक्ष्मीनारायण सोबत असला तर तो हिंदूंचा मोहल्ला पार करायला मदत करील. भीतीची आणि धोक्याची काही बाब नाहीय, सगळेजण शहरातले मान्यवर वडिलधारे लोक होते, त्यांच्यावर कुणी सहजासहजी हात उचलणं शक्य नव्हतं हे हयातबख्शलाही माहीत होतं.

टांग्यात बसलेले बक्षीजी मनातल्या मनात फारच क्षुब्ध अणि विचलित झालेले होते. जेव्हा जेव्हा संकटग्रस्त स्थिती असे, तेव्हा ते बडबडू लागत, सहकाऱ्यांसोबत चिडून बोलत, त्यांचं डोकंच काम करत नसे, आणि भावनांच्या लोंढ्यात सगळं काही वाहून जात असे.

"घारी उडतील, मेहताजी, शहरावर घारी उडतील!" त्यांनी पुन्हा सांगितलं, आणि वाकून वाकून टांग्याच्या बाहेर बघू लागले.

"आता जे होईल ते पाहून घेऊ, पण आधी शहरात तर चला."

यावर बक्षीजी चिडून म्हणाले, "शहरात पोहोचल्यावर काय होणारंय? आता डोक्यावर येऊन ठेपलंय!"

मेहता घाबरलेला तर नक्कीच होता, पण बक्षीजीसारखा बावचळलेला नव्हता.

"डेप्युटी कमिशनरनं ऐकून तरी घेतलं. पहिला डेप्युटी कमिशनर तर धडपणे बोलायचासुद्धा नाही."

"हा काय करणारय, डोंबल!" बक्षीजी चिडून बोलत होते, "यानं आमची एक तरी गोष्ट मान्य केलीय का?"

मग बक्षीचं डोकं वेगळ्याच दिशेनं चालू लागलं.

"कुणावरही विश्वास ठेवता येत नाहीय," मेहता म्हणाले.

"मुसलमानांवर नाही तर हिंदूंवर ठेवला जाऊ शकतो काय?" बक्षीनं पुन्हा तुसडेपणानं सांगितलं.

"हे पहा बक्षीजी, तशी फार लहान गोष्टय, पण हुशार माणसाला लक्षात यायला तेवढंच पुरेसं आहे. मुबारकअली काँग्रेस कमिटीचा मेंबर आहे. खादीचा सदरा आणि खादीची विजार घालतो. पण डोक्यावर पेशावरी टोपी घालतो, गांधी टोपी घालत नाही. मुजफ्फर सोडला तर एकही मुसलमान गांधी टोपी घालत नाही."

बक्षीनं खिशातून रुमाल काढून घाम पुसला आणि डोक्यावरून पगडी काढून बगलेत धरली.

"हिंदू सभावाल्यांनी मोहल्ला-कमिट्या बनवल्यात, आमच्यानं तर तेवढंही होणं शक्य नाही. मोहल्ल्या-मोहल्ल्यात शांतता कमिट्याच बनवल्या असत्या." मेहतानं मानेवरचा घाम पुसत म्हटलं.

"बुडून मरा, मेहताजी, ओंजळभर पाण्यात बुडून जीव द्या!" बक्षीजी भडकून म्हणाले.

"का? मी का मरू ? मी काय केलंय?"

"दोन डगरींवर पाय ठेवणं चांगला नाहीय. तुम्ही कायम हेच करत आला आहात. एक पाय काँग्रेसमध्ये, दुसरा पाय हिंदूसभेत. तुम्हाला वाटतं, कुणाला माहीत नाही, सगळ्यांना माहीतय!"

"जर दंगल झाली तर तुम्ही याल का वाचवायला? नाल्याच्या पलीकडचा सगळा भाग मुसलामानांचाच आणि माझं घर नाल्याच्या अगदी टोकालाय. दंगा उसळला तर तुम्ही मला वाचवायला याल का? का बापूजी येऊन वाचवणार आहेत? त्यावेळी तर मला मोहल्ल्यातल्या हिंदूंचाच आसरा आहे. सुरा मारणारा मला मारताना तू काँग्रेसमध्ये आहेस का हिंदुसभेत, हे काही विचारणार नाही. आता गप्प का झालात?"

"बुडून मरा," मेहताजी, खरंच जीव द्या. माणसांच्या श्रद्धा पारखण्याची हीच वेळ असते. तुम्ही फारच माया जमवून ठेवलीत. तुमच्या मेंदूवर चरबी चढत गेलीय. तुमचं घर मुसलमानी मोहल्ल्याजवळ आहे, तर माझं घर काय हिंदूंच्या मोहल्ल्यातय?"

"तुमचं काय, तुम्ही तर साधू-संन्यासी आहात, तुमच्या कुणी मागं ना पुढं. तुम्हाला मारून काय मिळणारय?" मेहता म्हणाला, मग तोही उसळून म्हणाला, "म्हटलं होतं, लतीफला काँग्रेस ऑफिसमधून काढा म्हणून. मी लिहून देऊ शकतो की तो गुप्तहेर पोलिसांचा माणूसय- आणि आमच्या सगळ्यांचा रिपोर्ट पाठवत असतो. डायऱ्या लिहीत असतो. तुम्हालाही माहीतय आणि मलाही. तरीही तुम्ही अस्तनीतला साप पाळतायत. तिकडं मुबारकअली लीगवाल्यांशी हातमिळवणी करतोय, भेटीगाठी करतोय. तुमच्याकडूनही पैसे घेतोय, लीगवाल्यांकडूनही घेतो. त्यानं पक्क्या विटांचं घर बांधलंय, पण तुम्ही लोक तर चांगले आहात, सगळं काही पाहूनही न पाहिल्यासारखं करता."

"येऊन-जाऊन दोनतीन तर मुसलमान आमच्यामध्ये काम करतात, त्यांनाही काढून टाकायचं? तुमची अक्कल ठिकाणावर आहे की नाही? एक लतीफ वाईट असला की सगळे वाईट झाले का? जे तुमच्याही आधीपासून काँग्रेसमध्ये आहेत ते हकीमजीसुद्धा वाईट आहेत? अजीज अहमद वाईटय?..."

टांगा उतार ओलांडून आला होता आणि पुलाकडे वळला होता.

उजव्या बाजूची इस्लामिया शाळा बंद पडलेली होती. लोकांची रहदारी फारच कमी झालेली होती. इस्लामिया शाळेच्या इमारतीबाहेर चारपाच माणसं गट करून उभी होती. क्वचित मधूनच एखादा टांगा किंवा एखादा सायकलस्वार रस्त्यावरून जाताना दिसायचा.

मागे अजूनही ते **चौघे उतारावरच** होते. वीज कार्यालयासमोर रस्त्याच्या कडेला उभा असलेला **मौलादाद भेटला**. दाढीवाला मौलादाद वीज कार्यालयात क्लार्क होता आणि मुस्लिम लीगचाही क्लार्क होता.

"काय करून आलात?" त्यानं हयातबख्शला विचारलं, "डेप्युटी कमिशनरला भेटायला गेला होतात ना?"

"भेटून आलोत. तिथं त्याच्याकडे बसलो असतानाच बाहेर कोलाहल झाला. सगळ्यांना वाटलं गडबड झालीय आणि मीटिंग संपली. तसेच सगळे तिथून निघून आले. शहराची काय हालहवाल?"

"तणाव आहे, तणाव वाढतच चाललाय. गावात एका ठिकाणी काही गडबड झाल्याचं ऐकिवातय. इकडं मागं कसं काय?"

"मागं ठीकय."

इतक्यात हकीम अब्दुलगनी आणि सरदार बिशनसिंह तिथं आले. थोडंसं अंतर मागेपुढे चालत, मग दोघेही बरोबर चालत आले होते. हकीमजी काँग्रेसी मुसलमान असल्यामुळे बिशनसिंहला त्यांच्यासोबत चालत येण्यात संकोच वाटला नाही.

"दंगल व्हायलाच नको," लक्ष्मीनारायण म्हणाला, "फार वाईट गोष्टय ती!"

मौलादादने अगदी भेदक नजरेनं लक्ष्मीनारायणकडं पाहिलं, आणि म्हणाला, "तुम्हा लोकांच्या मनात आलं तर तुम्ही दंगल घडवून आणालच. आम्हीच सगळं सहन करत चाललोत." मग त्याची नजर हकीमजींकडे वळली आणि त्याचा पारा भलताच चढला. "हे हिंदूंचं कुत्रं पण तुमच्याबरोबर आलं होतं का? हे कुणाचं पुढारीपण करायला गेलं होतं?"

तिघेही गप्प बसले. हकीमजींनी ऐकलं न ऐकल्यासारखं केलं, आणि तोंड वर करून पुलाच्या दिशेनं पाहू लागले. पण मौलादाद हकीमाला पाहून भलताच लालबुंद होऊन गेला होता.

"मुसलमानांचा खरा शत्रू हिंदू नाहीय, मुसलमानच आहे. हिंदुंच्या मागं

शेपूट हलवत हलवतं मागं मागं जाणारा, त्यांच्या तुकड्यांवर जगत बसणारा मुसलमान..."

"हे बघा मौलादाद साहेब," हकीमजींनी अतिशय संयपणे बोलायला सुरुवात केली. "तुमच्या मनात जे येईल ते मला म्हणा. पण सगळ्यात पहिला प्रश्न हिंदुस्तानच्या स्वातंत्र्याचा आहे, इंग्रजांकडून सत्ता हिसकावून घेण्याचा आहे, हिंदू-मुसलमानांचा नाही."

"गप्प बस रे कुत्र्या," मौलादाद जोरात ओरडला. त्याचे डोळे लाल होऊ लागले होते, आणि ओठ थरथरू लागले होते.

"सोडा सोडा, जाऊ द्या, जाऊ द्या, ही वेळ काही भांडायची नाहीय."

क्षणभर लक्ष्मीनारायणच्या पायात गोळे आल्यासारखं झालं. पण हयातबख्श वडिलधारा माणूस होता, त्यानं स्थिती सांभाळून घेतली. "जा. जा हकीमजी, पण आपले आश्रयदाते तर टांग्यात बसून निघून गेले आहेत. आपल्याला एकटंच सोडून गेले."

हकीमजी हळूहळू चालू लागले होते. सरदारजीही त्यांच्यासोबत चालू लागले. लक्ष्मीनारायण मात्र आहे तसाच उभा होता.

"घरी चालला काय?" मौलादादनं हयातबख्शला विचारलं. "लीगच्या ऑफिसात येणार नाहीत का?"

"मी नंतर येईन. तू जा पुढं."

हयातबख्शनं लक्ष्मीनारायणला आपल्यासोबत का घेतलं होतं ते मौलादादच्या लक्षात आलं. अतिशय आदरानं छातीवर हात ठेवून तो लक्ष्मीनारायणला म्हणाला, "खात्री असू द्या लालाजी, आम्ही असताना कुणी तुमचा केसही वाकडा करू शकणार नाही!"

हयातबख्श आणि लक्ष्मीनारायण पुढे निघून गेले.

बारा वाजण्याच्या सुमारास लीझा हिंडत हिंडत व्हरांड्यात उघडणाऱ्या दाराजवळ आली. पडदा थोडासा बाजूला सारून तिनं बाहेर डोकावून पहिलं. व्हरांड्याच्या रखरखत्या उन्हानं सगळा बाग झाकलेला होता, एखादी काचच चमकत असल्यासारखं वाटायचं. जणू जमिनीतून कापून कापून एखादी गोष्ट वर काढलेली असावी आणि हवेत थरथरत असावी. आत्तापासूनच उन्ह इतकं कडक होऊ लागलेलं होतं. तिनं पडदा खाली सोडला.

शेकोटीजवळून जाताना तिची नजर शेकोटीच्या वर मध्यभागी ठेवलेल्या एका मूर्तीवर पडली. तो ढेरी असलेला एक हिंदू देव होता. त्याच्या माथ्यावर लाल आणि पांढऱ्या रेघा ओढलेल्या होत्या, तो बसलेला होता आणि हसत होता. त्याला पाहून लीझाला मळमळू लागलं. तिला ही मूर्ती फारच घाणेरडी वाटत होती. रिचर्डनं कुठून आणलीय ही?

ती मोठ्या दालनात आली. जागोजागी ठेवलेल्या प्रतिमांना आणि मूर्तींना पाहून तिला जडत्वाचा भास झाला, जणू तिथं प्रतिमा नाहीत, मृत बुद्धाची शिरं ठेवलेली आहेत. त्यांना एकटं असताना पाहताना कधी तिला हुडहुडी भरून यायची. पुस्तकांनी आणि मूर्तींनी भरलेल्या या घरात घुसमटल्यासारखं व्हायचं. खोलीत हिंडताना तिला वाटायचं, बुद्धमूर्ती तिच्याकडे चोरून बघतायत. रिचर्ड बाहेर गेल्यानंतर इच्छा असूनही तिला मूर्तीत रस घेणं अशक्य होतं. त्याच्या जाण्यानं या सगळ्या गोष्टीत जडत्व निर्माण व्हायचं. कदाचित ती एकटीच रहात असल्यामुळे आणि मग सगळा दिवस तिला या मूर्तींबरोबर आणि पुस्तकांबरोबर काढावा लागत असल्यामुळेच तिला तसं वाटत असावं. दिवसभर याच मूर्तींना पाहून ती एका खोलीतून दुसऱ्या खोलीत चकरा मारत असायची. ती बुद्धाच्या प्रतिमेसमोर जाऊन उभी राहिली. मन रिझवण्यासाठी तिनं दिव्याचं बटण दाबलं. खरोखरच बुद्धाच्या चेहऱ्यावर मंद स्मित उमटलं होतं. तिनं दिवा बंद केला, आणि ते स्मित नाहीसं झालं. तिनं पुन्हा बटण दाबलं, स्मित पुन्हा परत आलं. पण तिला वाटलं, ती मूर्ती तिच्याकडे चोरट्या नजरेनं एकसारखी पाहू लागलीय. तिनं पटकन दिवा बंद केला.

लीझा तिच्या खोलीत निघून गेली. आत जाताच तिला मंद असा किणकिण आवाज ऐकू आला. ऐन पलंगावर मागं खिडकीच्या समोर एक लहानशी तांब्याची घंटी लटकवलेली होती. दरवेळी हवेचा झोत आला की घंटीचा किणकिण आवाज व्हायचा, अगदी मंद आणि मंजुळ असा किणकिणाट तिच्या कानावर पडायचा, जणू दूर कुठून तरी तो आवाज येऊ लागलाय. सगळा वेळ खोलीत तो मधुर आवाज येत असायचा. ही एक नवीच गोष्ट खोलीत आणून ठेवलेली होती. लीझा परत यायच्या आतच रिचर्डनं कुठून तरी ती घंटी आणून तिच्या खोलीत टांगलेली होती. लीझाला भेट देण्यासाठी, तिला प्रसन्न करण्यासाठीच रिचर्डनं ते केलं होतं.

लगेच खट् आवाज झाला. लीझानं वळून डाव्या बाजूला पाहिलं. तिला पहिल्यांदा काहीच दिसलं नाही, मग तिची नजर ड्रेसिंग टेबलावर गेली. एक पाल तिथं पालथी पडली होती आणि जोरजोरात उसळायचा प्रयत्न करत होती, जणू तडफडत असावी अशी. लीझाचं सर्वांग शहारलं. पाल भिंतीवरच्या विजेच्या दिव्याजवळून पडली होती. थोड्या वेळातच पालीची हालचाल बंद झाली. ती मेली

आहे हे लीझाच्या लक्षात आलं. उष्णता वाढत चालली होती आणि रोज पाली मरत होत्या. असंख्य खोल्या असूनही तो बंगला जुनाट होता. इंग्रजांच्या सत्तेनं जेव्हा पंजाबात आपले पाय रोवायला सुरुवात केली होती, तेव्हाचा तो असावा.

दोन वर्षांपूर्वी असाच बंगल्यातल्या नोकरांच्या क्वार्टर्समधून दीड वार लांबीचा एक साप निघाला होता. तो कधी खाटांच्या खाली घुसायचा, कधी नागमोडी वळणं घेत व्हरांड्यातल्या भिंतीला खेटून सरपटत जायचा. या घटनेनंतर तिला बंगल्यात राहणं अशक्यप्राय झालं होतं. भीतीमुळे किती तरी दिवस तिनं कपड्याची अलमारी उघडलीच नव्हती, न जाणो अलमारीत एखादा फणा काढलेला साप बसलेला असायचा! याच मनःस्थितीत ती विलायतेला परतली होती.

लीझानं दाराजवळचं कॉलबेलचं बटन दाबलं आणि ती स्वतः खोलीच्या बाहेर आली.

लीझा जेव्हा भारतात आली होती तेव्हा तिनं अनेक योजना आखलेल्या होत्या. भारतातल्या हस्तकौशल्याचे नमुने गोळा करायचे, खूप फिरायचं, फोटो काढायचे, वाघाच्या पाठीवर बसून फोटो काढायचा, साडी घालून फिरायचं, आणि अशा कितीतरी गोष्टी. पण इथं मिळालं ते रखरखतं उन्ह, मोठ्या बंगल्याचा कारावास, कधीच न संपणारा दिवस, बुद्धाच्या मूर्ती, पाली आणि साप... बंगल्याच्या बाहेरच्या जीवनातही तसाच तोचतोपणा होता-क्लब, इंग्रजी ऑफिसरांच्या बायका, कमिशनरची बायको- स्वतः कमिशनर जितकी कमिशनरी करायचा नाही तितकी त्याची बायको करायची-ब्रिगेडियरच्या बायकोचं सर्व स्त्रियांशी उच्चनीचतेवर आधारित मिळणंजुळणं. मोठ्या ऑफिसरांच्या बायकाच संख्येनं खूप होत्या. तेव्हा रिचर्ड लहान अधिकारी होता. शनिवारी रात्री क्लबमध्ये नृत्य व्हायचं, रोज रोज पार्ट्या चालायच्या, पण तरीही लांबलचक दिवस काही संपता संपायचे नाहीत. आणि तेव्हाच तिला बियर प्यायची सवय लागली. खोल्यांतून ये-जा करता करता ती कंटाळून जायची आणि बियरचा ग्लास भरून घ्यायची. कंटाळवाणेपणापासून सुटका करून घ्यायचा दुसरा काही उपाय नसायचा.

"तुझ्या नसांतून नक्कीच जर्मन रक्त खळाळत असलं पाहिजे, म्हणूनच बियर तुला इतकी विलक्षण आवडते."

रिचर्ड गमतीनं म्हणायचा, पण लीझाची ही सवय वाढतच गेली होती. कधी कधी लंचच्या वेळी रिचर्ड घरी यायचा तर लीझाचे डोळे धुंद झालेले असायचे, आणि ती सोफ्यावर अस्ताव्यस्त पडलेली असायची. चुंबनांच्या, आलिंगनांच्या आणि उचक्यांच्या मध्ये आता जास्त बियर प्यायची नाही अशी ती पुन्हा पुन्हा शपथ घ्यायची, पण पुन्हा दुसऱ्या दिवशी वेळ काही जायचा नाही.

यावेळी ती अधिकच निरोगी होऊन आली होती. या वेळी ती केवळ रिचर्डच्या आवडीनिवडीतच सहभागी होणार होती. एवढंच नाही तर त्याच्या प्रशासनाच्या कामातही रस घेणार होती, आणि सार्वजनिक कामातही भाग घेणार होती.

जनावरांच्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या संस्था काय काम करणार आहेत? तिनं मनातल्या मनात विचार केला, मला त्यात काय करावं लागणार आहे?... खानसामा आल्यावर त्याला बिअर आणायला सांगावं अशी लीझाच्या मनात तीव्र इच्छा आली. खानसामा नवीनच होता आणि तिच्या या कमजोरीबद्दल त्याला काहीच माहीत नव्हतं. ती स्वतः रस्तोरस्ती, गल्लोगल्ली हिंडत राहील, एकेक करून सगळ्या घोड्यांना आणि बेवारशी कुत्र्यांना मारत राहील? हे काम कसं असेल? का जिल्ह्याची प्रथम महिला म्हणून केवळ ती मुख्य असेल आणि हे काम खालचे लोक करतील?

लीझाची मनःस्थिती विचित्र होऊ लागली होती. एका बाजूला कंटाळवाणेपणाचं भय आणि दुसऱ्या बाजूला जिल्ह्याची पहिली महिला, जिल्हाधीशाची पत्नी असल्याचा गर्व, डझनांनी नोकर-चाकर. इतका प्रचंड बंगला, एकीकडे कीर्र वाटायचा तर दुसरीकडे वर्चस्वाचा आभास निर्माण करायचा.

"मेम साऽब!"

खानसामा समोर उभा होता.

"आमच्या खोलीत ड्रेसिंग टेबलावर पाल मरून पडलीय. ती उचला. जा," ती पुटपुटली.

खानसाम्यानं सलाम केला, 'जी, हुजूर!' म्हणून तो आत गेला.

लीझा पुन्हा चालत चालत व्हरांड्यातल्या खिडकीजवळ आली. पडदा वर केल्यावर पुन्हा तिला तापलेल्या काचेसारखे डोळे दिपवून टाकणाऱ्या उन्हाचा साक्षात्कार झाला. पण त्याचबरोबर व्हरांड्यात एका बाजूला ठेवलेल्या छोट्याशा टेबलाशी रिचर्डच्या ऑफिसातला कारकून दिसला. तो पत्रं वेगवेगळी करीत होता-काळ्या रंगाचा पोरसवदा वयाचा कारकून. त्याचे पांढरे शुभ्र दात चमकत. तो प्रत्येक वाक्यागणिक रिचर्डला हमखास दोनदा 'यस् सर! यस् सर!' म्हणायचाच आणि उजव्या-डाव्या बाजूला मान हलवायचा. त्याला पाहून लीझानं स्मितहास्य केलं. त्याला इंग्रजी येत होतं आणि त्याला इंग्रजीत बोलत असताना पाहून लीझाचं खूप मनोरंजन झालं होतं. लीझा जेवण्याच्या खोलीवाटे व्हरांड्यात आली.

"बाबू!" रिचर्डचं पाहून लीझानंही त्याला बाबू म्हणूनच हाक मारली, आणि दाराजवळ ठेवलेल्या खुर्चीत जाऊन बसली.

बाबू आपली फाईल सांभाळत पळत पळत लीझासमोर येऊन उभा राहिला, आणि म्हणाला, 'यस् सर्! यस् मॅडम्!' त्याचा चेहरा सावळा होता आणि दात फारच पांढरेशुभ्र होते. बाबूच्या शरीराचा प्रत्येक अवयव जणू त्याच्या धडाला स्क्रूनं जोडलेला होता, कारण त्याच्या शरीराचा कुठला ना कुठला भाग प्रत्येक वेळी झटका खाऊन वाकडा व्हायचा, कधी उजवा खांदा झुकायचा, कधी डावा गुडघा झुकायचा, पण तोंड सारखं हलत राहायचं आणि शुभ्र दात चमकत असायचे.

"यू हिंदू, बाबू?"

"यस् मॅडम," बाबूनं किंचित झुकून सांगितलं.

लीझा आपल्या समजुतीवर खूष झाली व प्रफुल्लित झाली.

"आय् गेस्ड राईट!"

"यस् मॅडम!"

लीझा त्याच्याकडे पहातच राहिली. पाहताक्षणी ती गोंधळात पडली. तिनं कशाच्या आधारावर सांगितलं होतं की तो हिंदू आहे? त्याच्या अंगावरचा वेष म्हणजे विजार-कोट-टाय घातलेली होती. ती विचारात पडली. ज्यानं हिंदू ओळखता येतो अशा कोणत्या खुणा असतात? मग ती उठून उभी राहिली आणि हात उंचावून त्याच्या डोक्यातल्या केसात काहीतरी शोधू लागली. बाबू एकदम शरमला. तीसेक वर्षांचा बाबू गेल्या दहा वर्षांपासून ऑफिसात स्टेनोचं काम करीत होता. निस्संकोचपणे त्याच्याशी गप्पा मारत असणारी लीझाच अशी पहिली डेप्युटी कमिशनरची बायको होती. इतर डेप्युटी कमिशनरच्या बायका फारच रुक्षपणे आणि उपेक्षेनं त्याच्याकडे पहात आल्या होत्या.

व्हरांड्याच्या दुसऱ्या टोकाशी किचनकडे जाणाऱ्या छोट्याशा अंगणात खानसामा, बागेचा माळी आणि किचनमधला स्वैपाकी उभे होते आणि ते इकडेच पहात होते.

"नो, इट ईझन्ट देअर!" लीझा म्हणाली. बाबूला पायापासून डोक्यापर्यंत शिरशिरी आली. शरमेनं त्याचे हसरे ओठ कापत-थरथरत होते.

"यू आर नो हिंदू, यू टोल्ड अ लाय्!"

"नो मॅडम, आय् यम् ए हिन्दू, ए ब्राह्मण हिंदू!"

"ओ नो, देन वेअर इज युवर टफ्ट?"

बाबू घाबरत होता. गावात दंगलीचं वातावरण होतं आणि फार कठीण परिस्थितीतून स्वतःला वाचवत तो ऑफिसात आला होता. पण लीझाचं ऐकून तो निश्चिंत झाला. काळ्या चेहऱ्यातून पांढरेशुभ्र दात चमकत होते.

"आय हॅव् नो टफ्ट, मॅडम्!"

"देन यू आर नो हिण्डू!"

लीझानं आपलं बोट त्याच्यासमोर धरत-हलवत ती हसून म्हणाली, "यू टोल्ड अ लाय्!"

"नो मॅडम्, आय एम् अ हिंदू!"

"टेक ऑफ युअर कोट, बाबू!" बाबू पुन्हा लाजला.

"टेक ऑफ, टेक ऑफ, हरी."

"ओह, मॅडम्!" बाबू पुन्हा शरमला.

बाबूनं हसत हसत कोट काढला.

"व्हेरी गुड्, नाऊ अन्बटन् युअर शर्ट!"

"व्हॉट् मॅडम्?"

"डोंट से व्हॉट मॅडम्, से आय बेग युअर पार्डन्, मॅडम्. ऑल राइट् अन्बटन् युअर शर्ट!"

बाबू असहायपणे लीझासमोर उभा होता, मग टायच्याखाली हात घालून त्यानं एक-एक करून तिन्ही बटनं उघडली.

"शो मी युअर थ्रेड!"

"व्हॉट् मॅडम्?"

"युअर थ्रेड, शो मी युअर हिंदू थ्रेड!"

बाबूच्या लक्षात आलं. मेमसाहेब यज्ञोपविताबद्दल विचारत होती. बाबूजवळ ते नव्हतं. दहावी पास होऊन कॉलेजात आल्यावर त्यानं शेंडी कापली होती आणि बारावीत आल्यावर त्यानं यज्ञोपवीत काढून फेकून दिलं होतं.

"आय् हॅव्ह नो थ्रेड, मॅडम्." त्यानं ओशाळलेल्या चेहऱ्यानं सांगितलं.

"नो थ्रेड, देन यू आर नो हिंदू."

"आय् ॲम अ हिन्दू मॅडम्, आय स्वेअर बाय् गॉड, आय् एम् अ हिंदू." त्याला पुन्हा भीती वाटू लागली.

"नो, यू आर नो हिंदू, यू टोल्ड अ लाय! आय् शॅल टेल् युवर बॉस अबाउट इट्!"

बाबूचा चेहरा पांढराफटक पडला. सदऱ्याची बटनं बंद करून कोट घालून तो घाबरून म्हणाला, "आय टेल् यू सिन्सिअर्ली मॅडम्, आय् ॲम् अ हिंदू, माय नेम इज् रोशनलाल!"

"रोशनलाल! बट् दि कूक्स नेम इज् रोशनडीन, ॲंड् ही ईज् अ मुसलमान!"

"यस् मॅडम!" बाबू म्हणाला. त्याला मॅडमला समजावून सांगणं कठीण झालं. "ही इज् रोशनदीन मॅडम्, आय् ॲम् रोशनलाल. आय् ॲम् अ हिंदू, ही इज्

मुस्लिम्!"

"नो, रिचर्ड टोल्ड मी, यू पीपल् हॅव् डिफ्रंट नेम्स."

मग बाबूच्या दिशेनं बोट उगारून खोट्या आक्रोशानं ती म्हणाली, "बाबू, यू टोल्ड अ लाय्! आय् शॅल् टेल् युवर बॉस्!"

बाबूचा गळा कोरडा पडला होता आणि ऊर धडधडत होतं. शहरात झालेल्या गडबडीमुळे तर ही विचारपूस होत नसावी ना? मेमसाहेबांची इच्छा तरी काय आहे?

अचानक लीझा उठली.

"गो बाबू, आय शॅल् टेल एव्हरिथिंग टु युवर बॉस्!"

बाबूनं व्हरांड्यातल्या फरशीवरची फाइल उचलली आणि मागे वळला. तो अजून व्हरांड्यातच असेल की लीझानं पुन्हा हाक मारली, "बाबू!"

बाबू वळला.

"कम् हिअर!"

जवळ आल्यावर लीझानं गंभीर चेहरा करून त्याला विचारलं,

"व्हेअर इज् युवर बॉस्?"

"इन् द ऑफिस, मॅडम्. ही इज् व्हेरी बीझी, मॅडम्!"

"ऑल् राइट्, गो! यू अँड् युवर् बॉस्! गो! गेट आउट ऑफ् हियर! " तिनं ओरडून सांगितलं.

"यस् मॅडम्," आणि बाबू मग थरथर कापत वळला.

बाबू निघून गेल्यावर लीझाला मळमळू लागलं होतं. तिचा हसरा मूड पुन्हा विरक्ती आणि वितृष्णतेत बदलू लागला. बाबूला खांदे वाकवून जाताना पाहून तिला वाटलं, एखादा चिकट प्राणीच चाललाय्. रिचर्ड दिवसभर अशा लोकांसोबत कसं काय काम करू शकतो कुणास ठाऊक! तिच्या मनात एक खोल गर्जना घुमू लागली, आणि त्याचपावली ती आत जाण्यासाठी वळली.

8

शहरातल्या सगळ्या कामांची जणू वाटणी झालेली होती. कपड्यांची बहुतेक दुकानं हिंदुंची होती, चपला-जोड्यांची मुसलमानांची, मोटारी, ट्रंकांची सगळी कामं मुसलमानांच्या हाती होती. अन्नधान्याची दुकानं हिंदुंच्या हाती होती. छोटी-छोटी

कामं हिंदुही करीत, मुसलमानही करीत.

शिवालयाचा बाजार एखाद्या नवऱ्यामुलीच्या चेहऱ्यासारखा उत्फुल्ल दिसत होता. तिथं रोजच्यासारखीच चमकदमक होती की, तिथं तंग वातावरण होतं, हे सांगणं कुणालाही कठीण होतं. सोनारांच्या दुकानावर बुरखावाल्या अनेक खेडूत बायका चांदीचे दागिने खरेदी करायला वा बनवून घ्यायला जागोजागी बसल्या होत्या. हकीम लाभरामच्या दुकानासमोर औषध कुटणारे दोन काश्मिरी मुसलमान नाक-तोंड झाकून आळीपाळीनं औषध कुटीत होते. कुबड्या हलवायाच्या दुकानावर दररोजच्या सारखीच गर्दी होती. भेळवाला संतराम आजही बरोबर एक वाजता हळूहळू आपली हातगाडी ढकलीत, सराफी बाजार ओलांडून शिवालयाच्या बाजारात आला होता आणि दररोजच्या नेमानं खुदाबख्श शिंपी आणि त्याच्या दोन भावांना अर्धा अर्धा छटाक हलवा तीन पानं करून पाठवत होता.

वातावरणात निवांतपणा होता. सकाळच्या घटनेनंतर निर्माण झालेला तणाव थोडासा दबलेला होता, थोडासा सैल झालेला होता. रस्त्यावर ये-जा होती. खुदाबख्शाच्या दुकानासमोर गल्लीच्या तोंडाशी कमिटीचा कारभारी शिडी लावून, भिंतीवरच्या दिव्याची काजळी साफ करीत होता, आणि दिव्यात तेल घालत होता. गावातला कारभार जणू पुन्हा एखाद्या संगीताच्या लयीवर चाललेला होता. अत्तरवाला इब्राहीम खांद्यावर आणि पाठीवर तऱ्हेतऱ्हेच्या बाटल्या अडकवून एका गल्लीतून दुसऱ्या गल्लीत 'इत्र-फुलेल' असं ओरडत स्थिर चालीनं चालत जायचा तेव्हा वाटायचं, शहरातल्या या तालावरच त्याची पावलं उचलली जातायत, ह्याच तालावर इथल्या बायका आपले घडे भरायला नळावर जातायत, ह्याच तालावर रस्त्यावरचे टांगे धावतायत, याच तालावर मुलं शाळेला जातायत; वाटायचं, शहरातला सगळा कारभार अशाच कुठल्यातरी मोठ्या तालावरच अवलंबून आहे. ह्यातलं एखादं जरी कडं तुटलं तर ह्या वाद्यातल्या सगळ्या तारा तुटून जातील. शहरातल्या सगळ्या क्रिया मिळून एका विशाल संगीताला जन्म देत आहेत, आणि ते शहरातल्या हृदयाच्या तालाबरोबरच वाजत आहे. शहरातले लोक तरुण होतात ते याच लयीवर, म्हातारे होतात तेही याच लयीवर, याच तालावर पिढ्यानपिढ्या आपलं आयुष्य व्यतीत करत आल्या आहेत. तुम्ही त्याला संगीत म्हणा किंवा एक नाजुक संतुलन, त्यात व्यक्तींचं परस्परांशी असलेलं नातं, जनसमूहाचं परस्परांशी असलेलं नातं एका विशिष्ट बिंदूवर स्थिरावलेलं आहे...

शहरातल्या दैनंदिन जीवनात लाटा उठत नव्हत्या असं नव्हतं; काँग्रेसचं आंदोलन व्हायचं तेव्हा प्रचंड लाटा खळबळून यायच्या, दरवर्षी गुरुपर्वाला शीखांची शोभायात्रा निघायची तेव्हा शहरातलं वातावरण तंग व्हायचं; जामा मशिदीसमोरून

मिरवणूक जाताना बँडबाजा वाजेल की नाही, त्यावर दगडफेक होईल की नाही, हे सांगतानाही वादळ उठायचं. मुसलमानांचे ताबूत निघत, आणि ऊर बडवून घेत 'या हुसेन!' म्हणत घामानं चिंब झालेल्या मुसलमानांचे समूह निघत तेव्हाही शहरात तणाव निर्माण व्हायचा, पण नंतर तणाव निवळून जायचा आणि जनसामान्यांच्या जीवनाची गती पुन्हा त्याच तालावर सुरळीत चालू लागायची, पुन्हा वातावरणात मृदुता यायची, पुन्हा लोक हसत-खेळत दिवस घालवू लागायचे.

खुदाबख्श शिंप्याच्या दुकानावर सरदार हकीमसिंहाची पत्नी तक्रार करीत होती, "बे बख्शिया, तू कपडे की देसें-मरसें या फेरे ही पवांदा रहसे?" (आमचे कपडे कधी शिवून देणार आहेस, का रोज तुझ्या दुकानाच्या चकरा मारत राहू?)

खुदाबख्शानं स्मितहास्य केलं. शहरातल्या सगळ्या हिंदुंच्या बायका, सरदारणी, विशेषतः खात्या-पित्या घरातल्या स्त्रिया 'बख्श्या' म्हणूनच हाक मारायच्या. बख्शाच्या दुकानात लग्नासाठी शिवायला टाकलेल्या कपड्यांचे ढीग लागलेले असायचे.

"जद मैं कहँदा रिहा बीबी भेजो कपडे भेजो कपड़े, तुसा न कुझ न कीता, सारियाँ सरदीयाँ लँघा दित्तिया. हुण वकत ताँ लगदै. सोलह हत्थ ताँ नही मेरे." (जेव्हा मी म्हणत होतो, बाई, कपडे आणा, कपडे आणा, आपण काही पर्वा केली नाही. सगळा हिवाळा निघून गेला. आता वेळ तर लागणारच. मला काही सोळा हात नाहीयत.)

"का, हिवाळा कसा गेला?"

"का बरं, शिवरामाच्या मुलाच्या लग्नाच्या पंधरा दिवसांनीच तुम्ही तुमच्या मुलीचं लग्न ठरवलं होतं ना? तेव्हा कोणता महिना होता?"

हाकिमसिंहाची बायको हसू लागली.

"बरं बुवा, तुला सगळं माहितंय. आता सांग, मुलीचा सूट कधी देणार आहेस?"

"कार्य कधीचंय?"

"वा! पोरीचं लग्न ठरल्याचा दिवस तुला माहितय न् लग्नाची तारीख नाही माहीत?"

"पंचवीसलाय ना? आज काय तारीखय? पाच तारीख. देईन ना!"

"देईन नाही, कधी देशील ते सांग. लग्नकार्याच्या वेळेसच तू चकरा मारायला लावशील, मला काय माहीत नाहीयेस का तू? विद्याच्या लग्नाच्या वेळेसही तू असंच केलं होतंस, तिकडं वरात यायची वेळ झाली न् इकडं जरीच्या सुटासाठी मी पुन्हा पुन्हा माणूस पाठवतेय. नक्की कधी देणार आहेस ते सांग!"

तिचं बोलणं चालूच होतं, तेवढ्यात तिच्या पाठीमागून कुणी तरी बख्शाच्या झोळीत कपड्याचं एक पुडकं फेकलं, हिरव्या रंगाचं रेशमी कापड होतं, सोबत जाळीदार बॉर्डर. "बख्शा, कपडा मोजून घे आणि गरज पडली तर बुद्धासिंगच्या दुकानावरून माझं नाव सांगून उरलेलं कापड आण."

एक बाई होती. बख्शानं कपड्याच्या एका कोपऱ्याला ओठ लावून ओलं केलं, मग कानाच्या मागं खोसलेली पेन्सिल काढून कपड्यावर खूण केली आणि बाजूच्या कपाटात ते कापड टाकून दिलं. ते कपाट लग्नासाठी शिवायच्या कपड्यांनी भरलेलं होतं.

"देईन, देईन, मी स्वतः घरी आणून देईन."

"तू बोलतोसच फार. आता जर वेळेवर कपडे दिले नाहीस तर मी पुन्हा तुझ्या दुकानात पाय ठेवणार नाही."

आणि हाकिमसिंहाची बायको निघून गेली.

ती बाई गेल्यावर खुदाबख्शाची नजर शिवालयाच्या भिंतीवर गेली. कुणीतरी त्या भिंतीवर चढलं होतं. खुदाबख्शानं नीट टक लावून पाहिलं. चौकीदार गुरखा होता, पण तो तिथं करतोय तरी काय? भिंतीच्या मागं शहरातलं सगळ्यात जुनं मंदिर होतं आणि त्याचा कळस दूर दूर अंतरावरूनही चमकताना दिसायचा. त्या मंदिराच्या भिंतीवर एक घंटा होती. गुरखा चौकीदार ती घंटा साफ करू लागला होता.

"बघ बघ, ते काय चाललंय्!" खुदाबख्शानं आपल्या एका कारागीर माणसाला सांगितलं. तो त्याच्याजवळच बसून मशीनवर कपडा शि.वत होता.

"घंटेची दुरुस्ती चाललीय्," त्या कारागिरानं सांगितलं.

"या अल्लाह!" खुदाबख्शाच्या तोंडून बाहेर आलं.

"गावात दंगलीची शक्यताय..."

मग दोघंही गप्प झाले.

एकोणीससे सव्वीसच्या दंगलींत ही घंटा बसवण्यात आली होती. तेव्हापासून आत्तापर्यंत तिची बरीच चमक उडालेली होती. उन्हं आणि पावसामुळे आजूबाजूच्या भिंतीवरचं प्लास्टरही पडलेलं होतं. पहिल्या दंग्याच्या वेळी खुदाबख्श वीस-बावीस वर्षांचा तरुण होता आणि तेव्हा त्याला दंड-बैठकांची व व्यायामाची आवड होती. त्याच काळात तो आपल्या वडिलांच्या दुकानात बसू लागला होता. त्याच काळात ही घंटा लावण्यात आली होती. आता खुदाबख्श मध्यम वयाचा झाला होता, आणि शहरात ज्याचे कपडे त्याच्या दुकानावर शिवले जात नसत असं एखादंच लग्न असेल. भिंतीवर चढलेला रामबली गुरखा पण जुनाच चौकीदार होता. त्याच्या हातानं ती घंटा चढवण्यात आली होती. मागच्या दंग्यानंतर आपली

तप्तरता, सेवाभाव आणि प्रामाणिकपणामुळे तो अजूनही तिथंच कामावर टिकून होता. दहा वर्षांच्या कालावधीत त्याचं शरीर पिकलेलं होतं, चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्या होत्या, कानावरचे केस पांढरे झालेले होते, पण शिवालयाची चौकीदारी मात्र तो अजूनही आधीच्याच तप्तरतेनं करत होता.

घंटेचा हलकासा टण् टण् आवाज ऐकू आला. खुदाबख्शचं लक्ष पुन्हा घंटेकडे गेलं. गुरखा घंटेला नवी दोरी बांधत होता. त्यामुळेच ती हलली आणि टण् टण् आवाज झाला. गुरख्यानं बाहेर कडांना तेल लावलं होतं आणि घंटा चमकू लागली होती.

"या घंटेच्या आवाजाने शरीर थरथर कापू लागलं," खुदाबख्शनं सांगितलं,"पहिल्या दंग्याच्या वेळी जेव्हा ती वाजली तेव्हा मंडीत आग लागली होती अणि ज्वाळा आभाळापर्यंत भिडल्या होत्या, त्यांनी जवळपास अर्ध आभाळ झाकलेलं होतं."

भिंतीवर अजूनही गुरखा घंटा साफ करीत होता; जणू एखादा सण-उत्सवच येणार होता. एखादं पितळेचं भांडं घासल्यापुसल्यावर लखलखीत होऊन चमकू लागावं तशी घंटा चमकत होती. आणि सोबतच बांधलेली लांबलचक दोरी हलू लागली होती.

खुदाबख्शचं लक्ष घंटेवरून शेजारच्या सोनाराच्या दुकानाकडे गेलं. तिथं एक मध्यम वयाचा माणूस आणि त्याची बायको - ते जवळपासच्या गावाहून आल्यासारखे वाटत होते-आपल्या पोरीला डुलाची एक जोडी घ्यायचा आग्रह करत होते.

"तुला आवडली असेल तर घेत का नाहीस? चल आटप लवकर, आपल्याला अजूनही बरीच खरेदी करून गावी परत जायचंय."

मुलीचे डोळे चमकत होते. ती पुन्हा पुन्हा ते डूल कानाजवळ घेऊन जायची आणि लाजून आपल्या आईला दाखवायची.

"कसे वाटतात ग?"

लाजणारी-संकोचून जाणारी तरुण मुलगी डूल आपल्याला शोभून दिसतात की नाही, ते विकत घ्यावेत की नाहीत याचा निर्णयच घेऊ शकत नव्हती.

खुदाबख्शची नजर पुन्हा एकदा मंदिराच्या भिंतीकडे गेली. आता म्हातारा चौकीदार भिंतीवरून उतरत होता आणि चमकणाऱ्या घंटेला बांधलेली दोरी भिंतीच्या वर हलू लागली होती. खुदाबख्शचा तोंडातून पुन्हा एकदा 'या अल्लाह!' असे शब्द बाहेर पडले आणि त्यानं आपलं तोंड वळवलं.

तिकडं फजलदीन नानवाल्याच्या दुकानात बैठक रंगली होती. उतरत्या

दुपारी कामधंदा मंदावल्यामुळे येणारे-जाणारे दोस्त लोक गप्पाटप्पा करायला जमा होत आणि हुक्का ओढत ओढत जगरहाटीच्या गोष्टी चालत.

गप्पागोष्टीची सुरुवात शहरात ज्याची दिवसभर चर्चा चालू होती त्या घटनेपासूनच झाली होती, पण गप्पागप्पांत लांबत जाऊन ती एक मर्मभेदी गोष्टीपर्यंत येऊन थांबली. म्हाताऱ्या करीमखाननं सांगितलेल्या एका गोष्टीपर्यंत. थोर अधिकाऱ्याच्या मनाचा थांगपत्ता लागणं फार अवघड असतं, ते सर्वसामान्यांना कळणं शक्य नसतं, असे अधिकारी फार दूरवरचा विचार करतात, त्यांच्या प्रत्येक कामामागे दूरदर्शीपणा असतो, ते जे काही पाहतात ते सामान्य माणसाला पाहता येणं शक्यच नसतं असं त्या गोष्टीचं तात्पर्य होतं.

"मूसानं एके दिवशी खिजरला सांगितलं," करीमखान सांगू लागला, "की तू मला तुझा शिष्य करून घे. ऐक, जिलानी ऐक, फार उद्‌बोधक कथाय."

"मूसा लहान होता आणि मूसाला स्वतःला पैगंबर व्हायचं होतं. तेव्हा तो पैगंबर झाला नव्हता. पण इच्छा जबरदस्त होती. खिजर तर आधीच पैगंबर झालेला होता, म्हणजे देवदूत बरं का, देवदूत! कळलं? कळलं का? आणि वयानंही मोठा होता, सगळेजण त्याचा फार आदर करायचे." करीमखान सांगतच होता. त्याचे बारीक डोळे सारखे हसल्यासारखे वाटायचे, आणि तो हसायचा तेव्हा तो आपल्या मांडीवर थाप मारायचा, त्यामुळे आजूबाजूचे लोक स्मितहास्य करायचे.

"तर एके दिवशी मूसानं खिजरला सांगितलं की तुम्ही मला तुमचा शिष्य करून घ्या. खिजर म्हणाला, 'ठीक आहे, करून घेऊ, पण एका अटीवर.' 'काय?' मूसानं विचारलं. 'अट एवढीच की तू काही बोलायचं नाही, विचारायचं नाही, मी काहीही करीन, तू तोंड बंद ठेवायचं.' मूसा म्हणाला, मान्यय, तेव्हा खिजरनं त्याला आपला शिष्य म्हणून स्वीकारले."

"आता खिजर त्याला शिकवू इच्छित होता. काय शिकवायचं होतं? की पाहणारा तर खुदाबंद ताला असतो सर्वशक्तिमान परमेश्वर, आम्ही मानव काहीच पाहू शकत नाहीत, आम्ही आपलं डोकं खाजवून खाजवून कारणं शोधतो आणि अर्थ काढत राहतो, पण आमच्या हाताला काहीच लागत नाही; कारण पाहणारा तर खुदाबंद करीम असतो. तर खिजर म्हणाला, की तू काहीही बोलायचं नाही. मी काय वाट्टेल ते करीन, वाट्टेल ते बोलेन, तुझं तोंड गप्प ठेवायचं."

करीमखानच्या समोर हुक्का सरकावला गेला; आणि जिलानी तो जोरजोरात फुंकू लागला होता- ढळत्या दुपारी पखालवाला दुकानासमोर पाण्याचा सडा मारून गेला होता आणि मातीचा मंद ओला वास सगळ्या हवेत पसरलेला होता. सडकेवरची ये-जा कमी झालेली होती. काही लोक जामा मशिदीत नमाज

पढण्यासाठी एक-एक करत समोरुन जात होते.

"मग काय झालं की दुसऱ्या दिवशी खिजर एका गावाहून दुसऱ्या गावी जायला निघाला. त्याच्या मागं-मागं मूसा. नंतर मूसा फार मोठा पैगंबर झाला, पण त्या वेळी तर तो खिजरचा चेला होता. ऐक, जिलानी, कान उघडे ठेवून ऐक, फार उद्बोधक कथाय. तर दोघंही निघाले. वाटेत एक नदी लागली. किनाऱ्यावर एक होडी बांधलेली होती. तिच्यात बसून लोक नदी ओलांडून जायचे. मग काय झालं की दोघंही पाण्यात उतरले आणि होडीत बसले. मग नावाडी त्यांना होडीत बसवून घेऊन जाऊ लागला. तर थोड्याच वेळात मूसाला दिसलं की खिजर होडीच्या तळाला भोक पाडू लागलाय, होडी एकदम नवी कोरी होती, जणू आजच तयार केलीय अशी, आणि खिजर तिच्या तळाला भोक पाडू लागला होता. एक भोक पाडल्यावर त्यानं आणखी एक भोक पाडलं, मग आणखी एक. मूसा ओरडला, 'वल्लाह, आपण हे काय चालवलंत, नाव बुडून जाईल ना! आपण दोघं बुडून मरू-'

"खिजरनं आपल्या ओठांवर बोट धरलं आणि त्याला गप्प बसण्याचा इशारा केला. पण मूसा अस्वस्थ झाला होता. होडीत पाणी घुसू लागलं होतं आणि त्याला भीती वाटत होती की होडी आता बुडते का मग बुडते. पण तो गप्प बसला, त्यानं खिजरला वचन दिलं होतं ना! थोड्या वेळानं खिजरनं एकेक करून सगळी भोक बुजवली, पण तोवर होडीचा बराच भाग खराब झाला होता न् पाण्यानं भरला होता-मग दोघं किनाऱ्यावर आले - आले तर, अल्लाची कृपा - दोघेही चालले होते, तर एका ठिकाणी एक लहान पोरगं जमिनीवर बसून खेळत होते. खिजरने मागंपुढं न पाहता त्या पोराची मान मुरगळून टाकली. 'हे काय? हे काय?' मूसा ओरडला, 'निरागस पोराला मारून टाकलंत!' पण खिजर गप्पच. खिजरनं पुन्हा ओठांवर बोट ठेवलं आणि मूसाला गप्प राहण्याचा हुकूम सोडला.

"अलहमदुलिल्लाह! बोलू नको? आपण निष्पाप पोराची मान मोडून टाकलीत. ओळख ना पाळख, आपण या गावात पूर्वी कधी आला नाहीत. या निष्पाप पोराशी आपलं काय वैर होतं?" मूसा फारच अस्वस्थ झाला. आतून तर तोही पैगंबरच होता, पण अजून त्याला पैगंबरकी मिळाली नव्हती." करीमखाननं डोकं हलवून सांगितलं, "मग अल्लाची कृपा, ते दोघंही पुढं जाऊ लागले. गाव ओलांडलं. आता ते गावाच्या तटबंदीजवळ आले, तर तिथं पडलेली भिंत लागली. मूसानं पटकनं उडी मारली न् तो पुढं गेला, मग मागे वळून पाहिलं तं काय, खिजर त्या भिंतीजवळ उभे आहेत, आजूबाजूला पडलेल्या एक-एक विटा उचलून आणून भिंतीवर ठेवतायत आणि चुन्यानं भिंत बांधतायत. मूसा परत आला. 'बुजुर्गवारम्! त्या पोराला तर आपण यमसदनाला पाठवलंत, त्यानं बिचाऱ्यानं काहीच आयुष्य

पाहिलं नव्हतं, आणि ही भिंत कितीतरी वर्षांपासून पडलेली आहे, पुन्हा बांधत आहात. हा काय प्रकारय? आपलं हे वागणं काही माझ्या लक्षात आलं नाही.'

"खिजरनं पुन्हा बोट वर उंचावून त्याला गप्प राहायला सांगितलं. मूसा पुन्हा गप्प बसला.

"मग ते पुन्हा चालू लागले. चालत चालत खूप पुढे आले. मग एका बागेत आले. तिथं एक पाण्याचा झरा लागला आणि गच्च सावली असलेलं एक मोठं झाड लागलं. दोघांनी तोंड धुतलं, हात धुतले आणि ते झाडाखाली जाऊन बसले. मग खिजर म्हणाला--

" 'ऐक बरखुरदार, आधी मी जिथं होडीला भोक पाडलं होतं आणि तू चिडला होतास तिथं त्या गावात एक फार वाईट अधिकारी राहात होता, तो आपल्या चैनीखातर गोरगरीबांच्या होड्या हिसकावून घ्यायचा. मला वाटलं त्या होडीला भोकं पाडावीत, म्हणजे त्यामुळे त्या अधिकाऱ्याची माणसं ती होडी हिसकावून घेणार नाहीत, आणि नावाड्याला आपला रोजगार मिळवता येईल.' मुसा गुपचूप ऐकत होता. 'पण त्या निष्पाप मुलाला तुम्ही का मारलंत?' 'ऐक, ऐक, सांगतो सगळं. ते अपवित्र माणसाचं पोरगं होतं, पवित्र आणि धर्मसंमत माणसाचं नव्हतं. ते ज्याचं आहे तो फारच क्रूर आणि अपवित्र माणूसय. मी त्याला मारलं; कारण तो मुलगा मोठा होऊन बापासारखाच अपवित्र आणि क्रूर झाला असता आणि त्यानं निरपराध लोकांवर अत्याचार केले असते. आता सांग, मी चांगलं केलं का वाईट?'

"मूसा विचार करू लागला, त्यानं डोकं खाली झुकवलं. 'पण आपण त्या पडक्या भिंतीची डागडुजी का केलीत? त्याचा कुणाला काय फायदाय?'

" 'तेही ऐकून घे,' खिजर म्हणाला, 'ज्या पडक्या भिंतीची मी डागडुजी केली तिच्या खाली फार मोठा खजिना गाडलेला आहे. पण गावातल्या लोकांना त्याबद्दल काहीच माहीत नाहीय. आणि गावातले लोक फार गरीब आहेत, आणि फार गरजवंत आहेत. मला त्यांना मदत करायची इच्छा आहे. मी ती भिंत पक्की बांधलीय. जेव्हा ते नांगर चालवत चालवत इथं येतील तेव्हा त्यांना ह्या भिंतीचा अडथळा येईल, आणि मग एके दिवशी ते ही भिंत पाडून टाकतील, आणि एक एक वीट उचलून शेताच्या बाहेर फेकून देतील. मग त्यांना खाली पुरुन ठेवलेला खजिना मिळेल आणि ते धनवान होतील. मग त्यांच्या अंगावर कपडे दिसू लागतील आणि घरात भाकरी दिसू लागेल. आता सांग, मी काय वाईट केलं?...' "

करीमखाननं ही कहाणी सांगितल्यावर मान हलवत हलवत एकेका साथीदाराकडं पाहिलं, मग म्हणाला, "तर सांगायचं तात्पर्य की जी गोष्ट अधिकारी लोक पाहू शकतात, ती तुम्ही-आम्ही पाहू शकत नाही. इंग्रजी अधिकाऱ्याची नजर सगळीकडचं बघू शकते, नाहीतर मूठभर फिरंगी सात समुद्र ओलांडून इतक्या मोठ्या देशावर कसे काय सत्ता गाजवू शकले असते? इंग्रज फार बुद्धिमान लोक आहेत, फार दूरदर्शी आहेत..."

"बेशक्! बेशक्!" आजूबाजूच्या लोकांनी माना डोलावल्या.

याच दुकानात एका बाजूला नत्थूही बसलेला होता. कॉफीचा प्याला समोर ठेवून हातात मोठा पावाचा तुकडा घेऊन तो कॉफीत बुडवून खात होता आणि अगदी लक्ष देऊन करीमखानची कथा ऐकत होता. कथा ऐकून त्याला एकदम बरं वाटलं. जेव्हापासून तो त्या खोलीच्याबाहेर आला होता, तेव्हापासून तो सतत शहरातल्या एका भागातून दुसऱ्या भागात, दुसऱ्यातून तिसऱ्या असा भटकतच होता. कुठंही बसला तरी त्याला डुकराची चर्चा ऐकू यायची. लोक दुसरं काही बोलायचेच नाहीत डुकराशिवाय. कधी कधी लोक दुसऱ्याच एखाद्या डुकराबद्दल बोलतायत असं त्याला वाटायचं, पण पुन्हा कधी तरी त्याला डुकराबद्दलची चर्चा ऐकत असताना भयंकर विषण्ण वाटायचं. इथं, या नानवाल्याच्या दुकानावरही गप्पा त्या डुकरापासूनच सुरू झाल्या होत्या, पण मग या वयोवृद्ध माणसाच्या गप्पांमुळे त्याला खूप बरं वाटलं, हलकं हलकं वाटलं. जर दंगाधोपा झाला नाही तर ही एक सामान्य घटना म्हणूनच बघितलं जाईल, सरकारच्या डोळ्यांना सगळं काही दिसत असलं तर अघटित काही घडणार नाही.

नत्थूनं पुन्हा आपला खिसा तपासून पाहिला. नोटेच्या करकरीतपणाचा आवाज झाला. समाधान वाटलं. मुरादअलीचं भलं होवो, त्यानं आधीच सगळे पैसे देऊन टाकले. एरवी आठ आणे हातावर ठेवून बाकी रक्कम नंतर घेऊन जायला सांगितली असती तर नत्थू चांभार त्याचं काय करू शकणार होता! मुरादअली वचनाचा पक्का निघाला तर नत्थूलाही आपलं वचन पाळायला पाहिजे होतं. पण तो त्या खोलीतून पळून आला होता. मुरादअलीसमोर शपथ घेऊन त्यानं कबूल केलं होतं की तो तिथंच त्याची वाट पाहत राहील, त्या खोलीत तो गुदमरू लागला होता. पण शहरात पोहोचायचाच अवकाश की त्याचं रक्त गोठू लागलं, जागोजागी डुकराचाच विषय चर्चिला जात होता.

तो आतल्या आत खोलवर अस्वस्थ झालेला होता. त्याच्या मनात

तऱ्हेतऱ्हेचे विचार घुमू लागले होते. जितकी जास्त घबराट वाढायची तितकं त्याचं मन पांगायचं. बोलावं तरी कुणाशी, आणि विचारावं तरी काय? त्याला विलक्षण फसवण्यात आलेलं होतं. मुरादअलीनं गुरांच्या डॉक्टरचं नाव पुढं करून त्याच्याकडून डुक्कर मारून घेतलं होतं आणि मशिदीसमोर फेकून दिलं होतं. पण हे दुसरचं एखादं डुक्कर नसेल कशावरून? त्यानं मशिदीसमोरचं डुक्कर पाहिलं तर ते हे नव्हतं. त्याचं मन पुन्हा पुन्हा अस्वस्थ व्हायचं. जर ते हेच डुक्कर असेल तर काय होईल? लोकांना जर कळलं की त्यानंच डुक्कर मारलं होतं तर काय होईल? याच घालमेलीत त्याच्या मनात येत होतं, सरळ घरी जावं, आतून कडी लावून पडून राहावं, कधी त्याला वाटायचं की गल्लीबोळात भटकत रहावं, कधी काही, कधी काही. मी घरी जाणार नाही, रात्र झाली की मोतिया रांडेकडं जाईन. तिनं एक रुपया मागितला की पाच रुपये देईन. रात्रभर तिच्याजवळ राहीन.

रस्त्यावरची धूळ दिवसभर उधळून झाल्यावर त्याला आपल्या बायकोची आठवण फारच त्रासदायक वाटू लागली. ह्यावेळी तो आपल्या घरी असता तर आपल्या सोबतच्या चांभारांबरोबर हुक्का पीत असता, गप्पागोष्टी करीत असता. नाही, मी आपल्या वस्तीत जाईन, आंघोळ करीन, सदरा बदलीन, घरवालीला जवळ बसवून तिच्याशी गप्पा करीन. गेल्यागेल्याच तिला मिठीत घेईन; मुरादअलीचं नावसुद्धा काढणार नाही, तिला यातलं काहीच सांगायचं नाही, हा सगळा घृणास्पद प्रकार तिला मुळीच सांगायचा नाही. तिच्या छातीवर डोकं ठेवल्यावरच शांत वाटेल, रांडेजवळ गेलो तर ती कडवट बोलेल, वाईट-साईट बोलेल. घरवाली शांत राहणारी बाई आहे, धाडस टिकवणारी, सुख देणारी बाई आहे. नत्थूला आत कुठेतरी वाटलं की दोन रुपये मोतिया रांडेला देण्यापेक्षा घरवालीसाठी काहीतरी घेऊन जावं. तिला खूप आनंद होईल, ती म्हणेल कशाला आणलंत हे, माझ्याजवळ सगळं काही आहे. ती कधीच काही मागत नाही. त्याला वाटलं, दूर असूनसुद्धा ती त्याच्या बाहूतच आहे, आणि त्याच्या मनातला सगळा प्रक्षोभ मावळू लागला आहे. दुःखापासून सुटका करून घेण्यासाठी माणूस सगळ्यात आधी बाईकडेच जातो. बायकोला मिठीत घेताक्षणीत सगळे क्लेश नाहीसे होतील, या गोष्टीवर माणसाचा दृढविश्वास असतो. ती फार धीराची बाई आहे. तिच्या छातीत अपार प्रेम भरलेलं आहे.

कॉफीचं दुकान भरून गेलं होतं. दुकानाच्या बाहेर दोन बाकडी ठेवलेली होती. त्यांच्यावर ओझी वाहणारे हमाल बसलेले होते, ते जर्मनच्या थाळ्यात जेवत होते, वरणाची प्लेट समोर ठेवलेली होती, बाकड्यांच्या दोन्ही बाजूला पाय टाकून ते नान तोडत होते. रस्त्यावर पखालवाला पुन्हा एकदा पाण्याचा शिडकाव करू

लागला होता.

मध्येच दुरून ढोल बडवल्यासारखा आवाज आला. बाहेर बसलेल्या हमालमजुरांनी मागे वळून रस्त्यावर पाहिलं. ढोल बडवण्याचाच आवाज होता आणि तो जवळ जवळ येत चालला होता. कॉफीच्या दुकानातले लोक एकदम गप्प झाले.

"कायय?" कुणीतरी विचारलं.

"दवंडी आहे." कुणीतरी उत्तर दिलं, "इकडंच येऊ लागलीय."

तेवढ्यात एक टांगा आला. टांग्यावर काँग्रेसचा झेंडा लावलेला होता, आणि टांग्याच्या आत बसून कुणी तरी ढोल बडवत होतं. तो टांगा जवळ जवळ नानवाल्याच्या दुकानासमोरच येऊन थांबला. समोरच्या सीटवरचा एक माणूस उठून उभा राहिला. त्याचवेळी ढोल बडवणं थांबलं आणि तो माणूस उठून दवंडी देऊ लागला

"वतन की फ़िक्र कर ज्यादा मुसीबत आनेवाली है।

तेरी बरबादियों के तजकरे हैं आसमानों में ॥

लोकहो,

आज संध्याकाळी सहा वाजता गंजमंडीत जिल्हा काँग्रेस-कमिटीच्या वतीनं एक जाहीर पब्लिक सभा होणार आहे. त्यात हिंदुस्तानच्या आझादीच्या संघर्षात इंग्रज सरकारच्या फूटपाडू धोरणाची माहिती सांगितली जाणार आहे आणि शहरातल्या आम जनतेला विनंती करण्यात येणार आहे, की सर्वांनी शांतता राखावी. प्रचंड संख्येने हजर राहून या सभेची शोभा वाढवावी हो ऽऽ"

टांग्याच्या मागच्या सीटवर जरनेल ढोल घेऊन बसला होता. दवंडी देणारा शंकर होता. तो दवंडी देऊन झाल्यावर पुन्हा आपल्या सीटवर बसला. ढोल पुन्हा वाजू लागला. आणि फडफडत्या झेंड्याबरोबर टांगा तिथून पुढं निघून गेला.

टांगा जेव्हा दूर निघून गेला तेव्हा एक मजूर दुसऱ्याला म्हणाला, "गंजमंडी तो इक बाबू नी पंड चुक्की आ रिहा सी जे बाबू कहण लगा, 'अजादी आवणवाली है.' मैं हस्स के किहा, 'आवे आजादी बाबूजी सानू के, असाँ हुण वी पंड चक्कणी ऐं, पिच्छो वी पंड चक्कंगे' " (तो माणूस म्हणाला, आझादी येणार आहे. मी म्हणालो, येवो आझादी, आम्हाला काय त्याचं? आम्ही तर आधीही ओझं वाहत होतो, आझादीनंतरही ओझंच वाहणार आहोत.) असं म्हणून तो जोरजोरात हसू लागला आणि त्याच्या लाल हिरड्या चमकल्या.

"असाँ हुण वी पंड चक्कणी ते पिच्छों वी पंड चक्कणी," आणि मग दुसरा मजूरही पुन्हा हसू लागला.

त्याचवेळी कॉफीच्या दुकानात बसलेला एक वयस्कर दाढीवाला म्हणाला, "ज्यानं मशिदीचा अपमान केला होता तो माणूस पकडला गेला की नाही? नालायक, त्याच्या हातापायात किडे पडोत!"

"फार वाईट झालंय!" कुणीतरी पुटपुटलं.

नत्थूनं ते ऐकलं आणि तो पायापासून डोक्यापर्यंत शहारला.

मग दुसरंच कुणीतरी म्हणालं, "एका गाईला पण मारून टाकलंय असं ऐकलंय. कुणी नाल्याजवळ फेकून दिलीय कापून."

"हेही फार वाईट झालं बघा."

यावर किलकिल्या डोळ्यांचा हसतमुख असलेला वयस्क करीमखान पुन्हा धर्मोपदेशकाच्या आविर्भावात सांगू लागला, "कुरान शरीफमध्ये सांगितलंय की शेतं माझ्या आदेशानुसार उभी आहेत, माणसाचे सगळे इरादे माझ्या आदेशानुसार उभे आहेत. माझा आदेश नसेल तर लहरत डोलणारी शेतं सुकून जातील, माझ्या आदेशानं पूर येतील, शहरंच्या शहरं उद्ध्वस्त होतील," आणि मग म्हाताऱ्यानं सांगितलं, "सगळं काही परमेश्वराच्या हातात आहे, माणसाच्या हातात काहीच नाही. सगळी कामं पवित्र परवरदिगाराच्या आदेशानुसार होतात, त्याची जशी आज्ञा असेल तसंच होईल!"

आजूबाजूला बसलेल्या लोकांनी माना डोलवल्या. हुक्क्याचं एकाकडून दुसऱ्याकडे हस्तांतर बरोबर चालूच होतं. बाहेर एक मजूर उंच सूर लावून गाऊ लागला.

"ओये उडी उडी किया तक्कणै

माहडे सुत्थणे नी चूडियाँ."

(तू वाकून वाकून माझ्या सलवारीच्या निऱ्या का बघतोयस?)

काही वेळापूर्वी एका सद्‌गृहस्थाबरोबर स्वातंत्र्याबद्दल झालेलं आपलं बोलणं दोस्ताला सांगत खो-खो करून हसणारा हा मजूरच गाणं म्हणत होता. त्याच्या बेपर्वाईनं हसण्याच्या स्वभावाची नत्थूला ईर्ष्या वाटली.

त्याचवेळी रस्त्यावर पुन्हा गलबला दिसला. चालता चालता लोक थांबू लागले आणि सगळ्यांच्या नजरा उजव्या बाजूला जामा मशिदीकडे वळू लागल्या.

"पीरसाहेबांचं आगमन झालंय! गोलडा शरीफचे पीरसाहेब आलेत," रस्त्यावर उभ्या असलेल्या एका माणसानं नानवाल्याला सांगितलं, आणि छातीवर हात ठेवून पीरसाहेबांची वाट पाहायला सुरुवात केली.

नानवाला पण उठून उभा राहिला. तेव्हा दुकानात बसलेले सर्व लोक बाहेर

आले आणि जणू रस्त्यावर पापण्या अंथरून पीरसाहेबांच्या आगमनाची वाट पाहात राहिले.

मग एक धिप्पाड दाढीवाला माणूस प्रकट झाला. लांब काळा झगा, गळ्यात टपोऱ्या मण्यांचे तीन-चार हार, पगडीच्या मागं मानेवर रुळणारे लांबलचक केस, हातात जपमाळ असा. रुंद गोऱ्या चेहऱ्यावरून तेज ओसंडत होतं. डाव्या-उजव्या बाजूनं आणि मागेमागे अनेक भक्त चालत येत होते.

नानवाला चालत जाऊन गर्दीच्या पुढे आला आणि डोकं झुकवून, मांड्यावर हात ठेवून रस्त्याच्या मधोमध उभा राहिला. पीरसाहेबांनी आपला डावा हात पुढे केला, नानवाल्यानं पुढे वाकून त्या हाताचं चुंबन घेतलं, मग आपला उजवा हात हृदयावर ठेवून पूर्वीसारखाच, पुढच्या बाजूला दोन्ही हात एकमेकात बांधून वाकत वाकत उभा राहिला. सगळ्यांनी आपल्या डोळ्यांनी पीरसाहेबांच्या हातांचं चुंबन घेतलं. पीरसाहेबांनी सगळ्यांना दुवा दिली.

"फार पोहोचलेले आहेत हे पीर!" नानवाल्यानं आपल्या जागेकडे येता-येता सांगितलं, "वल्लाह, चेहऱ्यावर किती तेजय, कपाळातून नुसतं तेज सांडतंय, तेज!"

आणखीही लोक परत आले. काही लोक तिथूनच आपापल्या घरी निघून गेले. नानवाल्याच्या दुकानात आता पीरसाहेबांची चर्चा सुरू झाली होती.

"फार पोहोचलेले आहेत, मनातील गोष्ट ओळखून घेतात," नानवाला सांगत होता. मग तो आपल्या गादीवर जाऊन बसला व आतल्या बाजूला तोंड वळवून म्हणाला, "मी एकदा दर्शनासाठी गोलडा शरीफला गेलो होतो. पीरसाहेबांच्या दरबारात गेलो तर मला पाहून ते म्हणू लागले, 'समोरचे दाणे उचल, बघतोस काय?' समोर गव्हाच्या दाण्यांचा ढीग होता. मी असेच वाकून मुठीत दाणे घेतले. त्यावर पीरसाहेब म्हणाले, 'बस्! फक्त १७० दाणे! अरे, जास्त घ्यायचे की!"

"मी गडबडून तिथं बसूनच दाणे मोजू लागलो. बरोब्बर एकशे सत्तर दाणे होते."

त्याच्यावर करीमखान म्हणाला, "त्यांच्या हाताला फार गुण आहे. माझा एक नातूय, आता चांगला गोल गरगरीत झालाय, पण तो जेव्हा लहान होता तेव्हा एकदा त्याच्या कानामागे गाठी झाल्या होत्या. दोन्ही गाल सुजलेले होते. कुणीतरी म्हणालं, गोलडा शरीफला घेऊन जा. पीरसाहेबांनी इशारा केला, 'पोराला माझ्यासमोर झोपवा', मी झोपवलं, मग त्यांनी जवळच ठेवलेला एक मोठा सुरा घेतला आणि सुऱ्यानं दोन्ही गालांना एकेकदा स्पर्श केला. मग हाताच्या पंज्यावर आपल्या तोंडातला थुंका घेतला आणि पोराच्या दोन्ही गालांना लावला. बस् एवढंच. मग मी पीरसाहेबांच्या पायांचं चुंबन घेऊन घरी आलो. घरी येता-येता सगळी सूज उतरली होती, आणि तापही उतरला होता."

"पीर-दस्तगीरांच्या हाताला गुण असतो. इकडं स्मशानाजवळ एक रोडा बसत असतो, त्याच्याही हाताला फार गुण आहे."

"पण पीरसाहेब काफिरांना (गैरमुसलमानांना) कधी पावत नाहीत. काफिरांचा फार तिरस्कार करतात. पूर्वी पीरसाहेबांजवळ सगळेच जायचे. एखादा काफीर इलाज करायला त्यांच्याकडे आला तर ते छडीचं एक टोक त्याच्या नाडीवर ठेवायचे, दुसऱ्या टोकाला कान लावायचे आणि त्याची नाडी ऐकायचे, पण आता मात्र ते एकाही काफिराला जवळ येऊ देत नाहीत."

"सहसा ते उन्हाळ्यात कधीच शहरात येत नाहीत, पण याचवेळी आलेत."

"पीरांना गर्मी-सर्दीचं काय हो?"

"त्यांच्यापर्यंत ही वार्ता गेली असेल हे शक्यय. त्यांना सांगायला कुणी गेलं असेल थोडंच? त्यांना अंतर्ज्ञान असतं, त्यांना सगळं कळतं. आपोआप ज्ञान झालं असेल म्हणून इथं आले."

"त्यांची कृपादृष्टी पाहिजे. पीर-फकिरांचा शाप लागला तर शहरंच्या शहरं नष्ट होऊन जातात."

"बरोबरच आहे."

"धर्मोपदेश करतील का?"

"काय माहीत! जुम्म्यापर्यंत राहिले तर नक्कीच करतील."

"आता आलेच आहेत तर जुम्म्यापर्यंत नक्कीच राहतील. धर्मोपदेश तर करतीलच, आता आलेच आहेत तर शहर पवित्र करूनच जातील."

नत्थू त्या दुकानातून बाहेर पडला तेव्हा दुपार उतरत होती, त्याचं मन पुन्हा हलकं-हलकं होत असल्याचं त्याला जाणवलं. त्याला सकाळपासून अस्वस्थ करणारी एक प्रकारची धुकधुकी, त्याचं मन कुरतडणारी एक अज्ञात शंका आता बरीचशी कमी झालेली होती. सगळं शहर प्रकाशात बुडालेलं होतं, लोकांची ये-जा होती, लोक डुक्कर फेकणाराबद्दल बोलत, पण त्याला माथेफिरू, पागल म्हणून एकदोन शिव्या हासडत, आणि मग ती घटना विसरून जात. मग त्यानं तरी त्या एवढ्याशा गोष्टीचा बाऊ करून कशाला हिंडत रहायचं? त्याच्याबद्दल कुणालाही काही माहीत झालेलं नव्हतं हेही त्याला कळून चुकलं होतं. लोक या घटनेला कधी एखाद्या वेड्याचा पागलपणा समजत, तरी कधी काफिरानं केलेला खोडसाळपणा समजत. या घटनेबद्दल फक्त मुरादअलीलाच माहिती होती. तरी काय झालं, तो मुसलमान असूनसुद्धा इतरांना थोडाच सांगत सुटेल की त्यानंच हे काम करवून

घेतलं होतं म्हणून?

नत्थूला आजूबाजूच्या गोष्टी चांगल्या प्रसन्न करणाऱ्या वाटल्या. एका छोट्याशा दुकानासमोर एक खेड्यावरला माणूस आपल्या बायकोला नवे जोडे घेण्याचा आग्रह करीत होता, "घे ना ग, मी सांगतोय तर. तुझ्याजवळ एकही जोडा नाहीय. आणि ती चप्पलही पार फाटलीय."

आणि त्याच्याजवळ बसलेली, डोक्यापासून पायापर्यंत बुरख्यात झाकली गेलेली त्याची बायको मंजुळ आवाजात नकार देत होती, "मला त्याची गरज नाहीय. माझं धकून जातंय. तुमच्याजवळ चांगला जोडा नाहीय, तुम्हीच घ्या एक चांगला जोडा. तुम्हालाच जास्त चालावं लागतं." नत्थू पुढं निघून गेला. त्याला सुखाचा भास झाला. तो रस्ता ओलांडून उजव्या बाजूला आला आणि हळू हळू पुढं जाऊ लागला. नानवाल्यांच्या दुकानाची आणखी एक रांग लागली होती. मोठमोठे हंडे आणि हंड्यातून येणारा मटन-मसाल्याचा वास आणि नानच्या चळती. दुकानं खच्चून भरलेली होती. जास्तीत जास्त गिऱ्हाईकं मजूर, ओझे वाहणारे, किंवा आजूबाजूच्या खेड्यांतून येणारी कुटुंबं होती. दिवसभराच्या कामानंतर किंवा विक्री-खरेदीनंतर ते अन्नावर तुटून पडत होते. हा बाजार शहराच्या एका टोकाला होता. जेवण झाल्यानंतर शेतकरी आपापल्या बैलगाड्यावर बसून शहराच्या बाहेर त्यांच्या-त्यांच्या गावाला घेऊन जाणाऱ्या दूरवरच्या रस्त्यांवरून जाऊ लागतील.

नानवाल्यांच्या दुकानांच्या मागं त्याला जामा मशिदीची भव्य उंच इमारत दृष्टीस पडली. ढळत्या दुपारी मशीद जास्तच स्वच्छ आणि धुतल्यासारखी वाटत होती. रोजचं तेच ते दृश्य होतं. पायऱ्यांवर भिकारी, आडवे झालेले, झोपलेले मजूर, जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांची रीघ. अचानक नक्षीकाम केलेल्या मोठ्या दरवाजातून शेकडो लोक एकत्रच बाहेर पडत आहेत असं त्याला दिसलं. क्षणाक्षणाला लोकांचे लोंढे बाहेर येतायत, ते फाटक ओलांडून येतायेत, पायऱ्यांच्या वरच्या बाजूला ठेवलेले जोडे घालतायत किंवा जोडे हातात घेऊन पायऱ्या उतरतायत. नत्थू पहातच राहिला. फक्त ईद असली तरच इतके लोक मशिदीतून बाहेर पडताना दिसायचे. आज काय धर्मोपदेश होता? त्याच्या अचानक लक्षात आलं, गोलडा शरीफचे पीर तर धर्मोपदेशासाठी आले नाहीत? धर्मोपदेशानंतरच हे लोक परत चालले तर नाहीत? त्याच्या उरात पुन्हा धस्स झालं. त्याला वाटलं, मशिदीत गोळा झालेले हे शेकडो लोक त्याच्याच कुकर्माची चर्चा करण्यासाठी एकत्र आले होते. गोलडाचे पीरही ती बातमी ऐकूनच शहरात दाखल झाले होते.

नत्थूनं समोरूनच जामा मशीद ओलांडली. मशिदीची भिंत संपत होती तिथं बाजूनं एक घाणेरडा नाला वाहत होता. सगळ्या शहरातलं सांडपाणी त्या

नाल्यात येऊन पुढं शहराच्या बाहेर जायचं. नत्थू नाल्यावरच्या दांडीला धरून उभा राहिला.

त्याची नजर खालच्या बाजूला गेली तर दांडीच्या खाली नाल्याच्या कडेला एक ओटा होता आणि त्याच्यावर एक उघडानागडा माणूस झोपला होता. गडद रंगाचा एक काळा माणूस. दाढी आणि डोक्यावर विचित्र चिवडलेले केस, वेडेवाकडे गुंतलेले, गळ्यात एक ताईत. नाल्याच्याच भिंतीला टेकून आपला पत्र्याचा डबा एका खिळ्याला अडकवून झोपलेला होता. ओटा अरुंद होता, झोपेतल्या झोपेत कूस वळवली तरी तो सरळ नाल्यात पडला असता. हा सुद्धा एखादा पोहोचलेला पीर-फकीर असावा, नत्थूनं मनात म्हटलं आणि त्याच्याकडे पहातच राहिला.

अचानक फकीर उठून बसला आणि डोळे फाडून नत्थूकडे पाहू लागला, आणि पाहता पाहताच जोरजोरात उजव्या-डाव्या बाजूस डोकं हलवू लागला, एखाद्या पागल माणसासारखं.

नत्थूनं तोंड वळवलं आणि तो बाजाराकडे पाहू लागला. थोड्या वेळानं त्यानं जेव्हा पुन्हा वळून पाहिलं तेव्हा त्या माणसानं मान हलवणं बंद केलं होतं आणि विस्फारीत डोळ्यांनी नत्थूकडे पाहून तो आपली तर्जनी हलवत नत्थूला बोलावत होता. नत्थू घाबरला. त्याला भीती वाटली की हा फकीर त्याच्यावर, न जाणो, जादूटोणा करायचा किंवा त्याला शाप द्यायचा. त्यानं खिशात हात घातला, एक आण्याचं नाणं काढून फकिरासमोर फेकलं आणि तो तिथून गेला. नत्थू बघत असतानाच त्यानं ते नाणं उचललं आणि नाल्यात फेकून दिलं आणि रागारागानं नत्थूकडे बघत तर्जनी हलवत हलवत तो नत्थूला आपल्याकडे बोलवू लागला. नत्थू घाबरला, आणि थरथर कापत तो तिथून निघून गेला.

मोठ्या बाजारात खूप वर्दळ होती. नत्थूला शहराचा हा भाग फारच आकर्षक वाटायचा. सोडावॉटरच्या दोन्ही दुकानांवर असंख्य रंगीबेरंगी बाटल्या चमकत होत्या. खाली, स्वच्छ कपडे घातलेले दुकानदार मांडी घालून लिंबू सरबताचे ग्लास भरभरून गिऱ्हाइकांना देत होते. रस्त्याच्या फुटपाथवर गजरे विकणारे लोक आत्तापासूनच आलेले होते. सोडावॉटरच्या दुकानांच्या बाजूलाच शीख-कबाबवाले बसत असत. आणि जवळच देशी दारूचं दुकान होतं. कसाई गल्ली त्याच ठिकाणी मोठ्या रस्त्याला येऊन मिळत होती. तिथं वेश्या येऊन बसायच्या. नत्थू रस्त्याच्या कडेला येऊन उभा राहिला.

दुकानांसमोर रस्त्यावर बरेच टांगे उभे होते - चमकणारे साजशृंगार, घोड्यांच्या डोक्यावर मिरवणारे तुरे, अगदी जत्रा असल्यासारखंच वाटायचं. कधीकधी एखादा टांगा रस्त्याच्या ऐन मध्यभागी येऊन थांबायचा. घोड्याचं

तळमळणारं शरीर सजावटीतून सुटका करून घ्यायला आळोखेपिळोखे देत आहे असंच वाटायचं. आणि टांग्यात कुणीतरी ऐटबाज श्रीमंत माणूस आपल्या एकदोन सोबत्यांबरोबर बसलेला असायचा.

नत्थू चांभार बिनधास्त होऊन इकडं-तिकडं हिंडू लागला. त्याला वाटलं, सगळे लोक आनंदात आहेत आणि आपल्यातच दंग आहेत. नत्थू चांभार खूप वेळ तिथं भटकत राहिला, मग जेव्हा संध्याकाळ झाली आणि बाजारातली रोशणाई जास्त व वाढली तेव्हा तो लगबगीनं सीख-कबाबवाल्या दुकानासमोर गेला. तिथून त्यानं आठ आण्याचे कबाब घेतले आणि सरळ तो देशी दारूच्या दुकानात जाऊन बाकावर बसला. तो आनंदित होऊन घोट-घोट करून दारू पीत बसला व मधूनमधून कबाबाचे लचके तोडू लागला.

संध्याकाळच्या सावल्या उतरणीला लागल्या आणि मोठ्या बाजारातल्या बत्त्या जळू लागल्या. शिडकाव्यामुळं पुन्हा एकदा मातीचा मंद वास येऊ लागला आणि फुलांच्या गजऱ्याच्या सुगंधात मिसळून तो नत्थूच्या डोक्यात एक विचित्र मस्ती रुजवून गेला. आपण फुलांचा गजरा कधी घेतला न् कधी तो आपल्या स्वतःच्या मनगटावर बांधला तेही नत्थूला कळलंही नाही. तो देशी दारूच्या दुकानावरून उठून राजाबाजारचा मोकळा भाग ओलांडून वेश्यांच्या गल्लीत तो कधी आला होता हेही त्याला कळलं नाही.

पण लगेचच त्याला मुरादअली समोरून येताना दिसला. गुडघ्यापर्यंतचा लांब कोट, हातात वेताची छडी, ठेंगणा, घट्ट शरीराचा, काळाभोर मिश्यांचा मुरादअली. तो खरोखरच मुरादअली होता का? त्याच्या डोळ्यांसमोर मुरादअली एखाद्या प्रेतासारखा घिरट्या घालताना दृष्टोत्पत्तीस पडला. गल्लीबोळातून भटकत जाणारा, वेताची छडी हलवत जाणारा मुरादअली. खरोखरच मुरादअली नावाची एखादी जितीजागती, या शहरात राहणारी व्यक्ती आहे का? की निव्वळ एखादी पडछायाच एका गल्लीतून दुसऱ्या गल्लीत हिंडत असते आणि लोकांनी तिचं नाव मुरादअली ठेवलंय? नाही, तो मुरादअलीच होता, मंडीकडून गल्लीच्या वाटेनं येऊ लागला होता. नत्थू दारूच्या नशेत नसता तर एखाद्या घराच्या चबुतऱ्यामागं लपला असता. पण नत्थूचा उत्साह भलताच वाढलेला होता. तो सरळ गल्लीच्या मधोमध आला. त्यानं काही जास्त पिलेली नव्हती. चामडं रंगवणाऱ्या चांभाराला तर दोन ग्लास दारू अगदी पाण्यासारखी होती. दिवसभर एकटं भटकत राहिल्यानंतर आता कुठे त्याला एक परिचित दिसला होता. आणि अचानक नत्थूला अभिमान वाटला. आपण जे काम हाती घेतो ते पूर्ण करूनच दाखवतो.

"सलाम, हुजूर!"

नत्थूनं पुढं होऊन हसत-हसत सलाम केला न् तो ताठ उभा राहिला.

मुरादअली क्षणभर थांबला. त्याच्या तीक्ष्ण डोळ्यांनी नत्थूला पाहून घेतलं आणि मग सगळा प्रकार त्याच्या लक्षात आला. काहीच न बोलता, अभिवादनाला प्रत्युत्तर न देता तो पुढं निघून गेला.

"सलाम, हुजूर! मी नत्थू आहे, आपण मला ओळखलं नाहीत?"

म्हणून नत्थू हसला.

दरम्यान मुरादअली पुढं निघून गेला होता.

नत्थू हतबुद्ध झाल्यासारखा गल्लीच्या मधोमध उभा होता, मग तिथूनच जोरात ओरडला, "हुजूर, मुरादअली साहेब!"

पण मुरादअली थांबला नाही.

एकाएकी नत्थूच्या मनात विचार आला, कमीतकमी मुरादअलीला एवढं तरी सांगायला पाहिजे की मी त्याचं काम केलेलं आहे. मी इथं भटकतोय म्हणजे मी त्याचं काम केलेलं नसावं या भ्रमात त्यानं राहू नये.

नत्थू लडखडत मुरादअलीच्या मागे गेला. अंधार होता तरी मुरादअलीचं शरीर त्याला दुरूनही दिसत होतं. तो पडत-धडपडत चालत गेला. तो जमेल तसं पळू लागला होता. मुरादअलीचं काम झालेलं होतं, हे त्याला सांगणं आवश्यक होतं.

त्याला वाटलं, तो मुरादअलीच्या अगदी जवळ पोहोचला आहे. पण प्रत्यक्षात गल्ली सुनसान होत चालली होती आणि मुरादअलीनं आपली गती मंद केलेली होती.

"हुजूर, मी सांगायला विसरलो होतो. ते काम करून टाकलं होतं. वेळेवर पोहोचवून दिलं होतं. हातगाडीवाले आले होते..."

तेव्हाच मुरादअली थांबला आहे, आणि आपली वेताची छडी उगारून त्याच्याकडे बघू लागला आहे हे नत्थूनं पाहिलं.

आता मुरादअली त्याच्याजवळ येईल. पण मुरादअलीनं आपली छडी का उगारलीय? आणि तो काहीच का बोलत नाहीय? अंधाऱ्या गल्लीच्या तोंडाशी उभं राहून दोघंही एकमेकांकडे टक लावून बघत होते.

नत्थू पुन्हा एकदा म्हणाला, "तुमचं काम झालं होतं, हुजूर! मी सगळं मार्गी लावून दिलं होतं."

त्यानं एवढं म्हणायचा अवकाश की मुरादअली पुन्हा मागं वळून चालू लागला. झपाझप पावलं टाकीत तो पुढं चालला होता. गल्लीच्या तोंडाशी चढ सुरू झाला होता, आणि तो चढ चढू लागला होता.

नत्थूनं वर पाहिलं. मुरादअली एव्हाना खूप दूर गेला होता, गल्लीतून निघून

शिवालयाच्या दिशेनं जाणाऱ्या चढावर तो होता. त्याला असं पाठमोरं जाताना पाहून एखादं प्रेतच चालत जात आहे, दूरदूर जात आहे, तरीही दृष्टिआड होत नाहीय असं नत्थूला पुन्हा वाटलं.

दरवाजा उघडताच नत्थूला उंबरठ्यावर आपली बायको उभी असल्याची दिसली आणि त्याचा जीव भांड्यात पडला. त्याच्या डोळ्यात अश्रू तरारले. "तुम्ही असं करत जाऊ नका हो," ती रडत रडत खाटेवर जाऊन बसली, "माझं काळीज फाटून चाललं होतं. मला वाटायचं तुम्ही गेलात तरी कुठं? ही काय पद्धतय? किती त्रास देता हो."

साडीच्या पदरानं डोळे पुसत ती त्याच्याकडे पहात होती, मग अचानक तिला हसू आलं, "हे काय सोंग केलंत? हातावर फुलाचा गजरा बांधलात. कुणाकडे गेला होतात?"

पण नत्थू गप्पच राहिला, आणि गुपचूप खाटेवर जाऊन बसला.

"दारू पिली आहे तर हसत-गात का नाहीत? आधी जेव्हा पीत होता तेव्हा तर हसत-हसत घरी यायचेत!"

नत्थूची बायको परमेश्वराकडून धैर्याचं वरदान घेऊन आलेली होती. नत्थू कधी रागात येऊन बडबड करीत असला तरी ती बोलायची नाही. एवढं मात्र म्हणायची, "बोला, बोला, मन हलकं करून घ्या!" किंवा मग एका बाजूला संकोचून उभी रहायची, आणि ओठांवर बोट ठेवून म्हणायची, "पुरे, पुरे, अजून काही बोलू नका, नंतर तुम्हालाच पश्चात्ताप होईल." आता एखाद्याच्या मांसात काटा टोचता येईल, पण मातीच्या गोळ्यात काय टोचवणार? तिच्या शीतल स्वभावामुळे नत्थू चांभारही हळूहळू शांत होऊ लागलेला होता. बाजूच्या खोल्यांतून फार नाही तर वीस तरी चांभारांची कुटुंबं रहात होती, आणि सगळ्यांशीच तिचे चांगले संबंध होते, सगळ्यांची सुखदुःखं ती वाटून घ्यायची. आपल्या आहे त्या थोड्याथोडक्यात संतुष्ट राहणारी आणि देवाला घाबरणारी ती बाई होती. काही लोकांच्या स्वभावातच समजूतदारपणा असतो. ते आपली अवस्था फार चांगल्या तऱ्हेनं समजू शकतात आणि आयुष्याकडून मिळणं अशक्य असतं असं काहीच मागत नाहीत. म्हणूनच त्यांचं मन नेहमी प्रसन्न आणि फुललेलं असतं.

नत्थू अजूनही गप्पच बसलेला होता.

"तुम्ही बोलत का नाहीत? तुम्ही इतका वेळ बाहेर राहिलात, आणि मी मासोळीसारखी तडफडत होते."

नत्थूनं डोळे वर करून आपल्या बायकोकडे पाहिलं. त्याच्या उरात पुरासारखं उसळून आलं. एकदम त्यानं मानेला झटका दिलाः खड्ड्यात गेला तो मुरादअली आणि त्याचं डुक्कर! त्यानं मनातल्या मनात म्हटलं. आपण तर घरी आलोत आता!

"वाड्यातल्या लोकांनी माझी विचारपूस केली का?"

"हो, विचारत होते, एकदा विचारलं होतं."

"तू काय सांगितलंस?"

"मी म्हणाले कामाला गेलेत, येतीलच आता."

"खूप वेळा विचारलं का?"

"नाही हो, लोक कामावर जात नाहीत का? संध्याकाळी शेजारणीनं विचारलं तर सांगितलं की घोड्याचं कातडं काढायला गेलेत."

एक मंद हास्य नत्थूच्या ओठांवर पसरलं.

"पण तुम्ही कुठं गेला होता?"

"नंतर सांगेन."

नत्थूची बायको त्याच्या चेहऱ्याकडे पहातच राहिली. नत्थूनं एखादी गोष्ट तिच्यापासून लपवलीय असं पूर्वी तर कधीही घडलं नव्हतं. पण गप्प बसणंच हितावह होतं, गप बसले की काही दिवसांनी आपण होऊनच तो सांगेल.

"विचारणार नाही, तुमची इच्छा नाहीय तर विचारणार नाही... जेवणार का? मी आत्ता एका मिनिटात गरम गरम भाकरी भाजून देते. चहाबरोबर भाकरी खा."

आणि ती खाटेवरून उतरली. पण कुठल्या तरी भावनोद्रेकानं नत्थूनं तिला थोपवलं आणि आपल्याकडे ओढून घेऊन जवळ बसवलं.

"नाही, तू इथंच बसून रहा." नत्थूची बायको नत्थूजवळच खेटून बसून राहिली.

"तू जेवलीस?" नत्थूनं भावनावश होऊन तिचे केस कुरवाळीत विचारलं.

"हो, जेवले."

नत्थूला बायकोचं वागणं थोडं अनोळखी वाटलं.

"खोटं बोलतेस. खरं सांग, जेवलीस का?"

बायकोनं डोळे वर करून हसत हसत सांगितलं, "आम्ही जेवायला केलं होतं, पण आमच्यानं खाववलंच नाही!"

"सकाळी जेवली होतीस का नाही?"

"जेवले होते."

"पुन्हा खोटं? खरं सांग, जेवली होतीस?"

तिनं पुन्हा नवऱ्याकडे पाहिलं आणि हसली, "खाल्लं नव्हतं काही. मी

तुमचीच वाट बघत होते, तर जेवणार कसं?"

"आणि आज रात्री पण मी आलो नसतो तर?"

"मला माहीत होतं तुम्ही येणारच म्हणून. का नाही येणार?"

नत्थूचं हृदय अजूनही ढवळून काढत होती अशी काहीतरी धूसर अस्पष्ट व्याकुळता होती. या व्याकुळतेमुळेच तो रस्त्यावर चकरा मारत हिंडत होता. त्यामुळेच त्यानं दारू घेतली होती. बायकोजवळ बसल्यानंतरही आतल्या आत कुठली तरी शंका त्याचं काळीज चाटत होती. अचानक नत्थूला झटका आल्यासारखं झालं आणि त्याला भास झाला की मुरादअली दरवाज्याबाहेर उभा आहे आणि त्याच्या छडीचं टोक दरवाज्याला लावलेलं आहे. त्याचं ऊर धपापत राहिलं, मग मनातल्या मनात स्वतःलाच आश्वासन देत तो म्हणाला, 'मुरादअलीनं मला ओळखलं नसावं. नाही तर बोलला तर असताच. गुपचूप निघून गेला. त्याला नक्कीच कुणीतरी दारुड्या आहे, नशेत चूर झालेला, त्याला त्रास द्यायलाच आलेला, असं वाटलं असेल. पण काही झालं तरी पाच रुपयाची नोट तो माझ्या हातावर ठेवून गेला होता.'

"तुम्हाला काही तरी क्लेश आहेत हे मला माहीत होतं. तुम्ही आनंदी नाहीत. म्हणूनच मी घाबरले होते."

नत्थूनं वळून बायकोकडे पाहिलं. ती एकसारखी टक लावून त्याच्याकडे पाहात होती.

"लोक म्हणत होते की शहरात गडबड झालीय, तंग वातावरण आहे. कुणीतरी डुक्कर मारून मशिदीसमोर टाकलं होतं. त्याचीही मला भीती वाटत होती. मी म्हणायचे, खरंच गडबड झाली तर तुम्हाला शोधायला मी जाऊ तरी कुठं?"

नत्थू थबकून बायकोच्या चेहऱ्याकडे पाहू लागला.

"कोणतं डुक्कर? कसलं डुक्कर?"

डुक्कर कसं असतं?" त्याची बायको हसली. तिला खूप बरं वाटलं होतं. नत्थू परत आला होता. दोघांनीही असंच बसून राहावं आणि खूप गप्पा माराव्यात असं तिला वाटत होतं.

"काळं होतं का पांढरं?" नत्थूनं विचारलं. त्याचे कान बायकोच्या उत्तरासाठी आसुसलेले होते.

"त्यानं काय फरक पडणारय?"

"तू पाहिलं होतंस?"

"मी डुक्कर बघायला जाऊ? माझं काय अडलंय?"

"वाड्यातल्या कुणी पाहिलंय का?"

"तुम्ही पण असं कसं बोलताय हो? वाड्यातले लोक डुक्कर बघायला जातील? ऐकलेल्याच गोष्टी लोक बोलत असतात."

रात्र गडद व्हायला लागली होती. आजूबाजूच्या खोल्यांतून आवाज येणं बंद होऊ लागलं होतं.

"बाहेर झोपणार आहात का आत?" बायकोनं डोळ्यांच्या कोपऱ्यातून नवऱ्याकडे बघत विचारलं.

"का?"

"तुमचा काय भरंवसा? बाहेर झोपलं तर उठवून आत घेऊन येता. आम्हाला वाटलं आधीच विचारून घ्यावं. तुमची नियत वाईट असली तर आधीच आत पडून राहिलेलं बरं. आत उकाडा फारय!" आणि ती बसल्या बसल्या आपले केस उकलू लागली.

"तुम्ही काहीच नाही सांगितलं, जेवणार आहात की नाही? चहा करू का? तुम्ही इतके शांत शांत का बसलात? काल तुम्ही नव्हता तर घर खायला उठलं होतं."

इतक्या बेपर्वाईनं बायकोला केस उकलताना पाहून वेदनेनं भरलेली उन्मादाची एक लाट नत्थूच्या शरीरातून फैलावत गेली. त्यानं वेड्यासारखं बायकोला आपल्या मिठीत गच्च धरलं आणि तो तिचे गाल, तिचे ओठ, तिचे केस, तिचे डोळे पुन्हा पुन्हा चुंबू लागला. ही भावनावशता उत्तरोत्तर वाढतच गेली आणि त्याचं रोम-रोम आपल्या बायकोच्या मांसल आणि उत्तेजित श्वासात हरवून गेलं.

"मी तीनदा रडलेय आज. व्हरांड्यात बसून घंटोन्‌घंटे तुमची वाट बघत होते. मग आत येऊन रडायची. मला वाटायचं जणू आता तुम्ही कधी येणारच नाहीत."

बायकोच्या आलिंगनात नत्थू हरवत चालला होता, सगळं जग विसरत चालला होता; त्याचे भुकेले अस्वस्थ ओठ तृप्तीसाठी भटकत भटकत कधी बायकोच्या ओठांशी टेकत, कधी तिच्या स्तनांशी भिडत. धापा टाकत तो पत्नीच्या अंगांगात उत्तेजना निर्माण करू पाहत होता. सुख अणि विस्मृतीच्या शोधात जणू भटकत होता.

त्याचवेळी मैदानाच्या पलीकडे कुत्री जोरजोरात भुंकू लागली. दूर कुठून तरी दबलेल्या आवाजातला कोलाहल कानावर येऊ लागला. नत्थूला कशाचंच भान नव्हतं. पण थोड्याच वेळात बायकोची नजर छताखालच्या भिंतीकडे गेली. दिव्यासमोरच्या भिंतीवर फिकट प्रकाश थरथरत होता. जणू लाललाल सावलीच नाचू लागली आहे. त्याला वाटलं, भिंतीवर पडणारा उजेड थरथर कापू लागलाय. दूरवर पुन्हा दबलेल्या आवाजातला कोलाहल.

"हे काय आहे हो." भिंतीकडे पाहून बायको म्हणाली, "हे बघा बरं भिंतीवर? हा कसला उजेडय? जणू आगीचा डोंबच. कुठं आग लागलीय का काय? ऐका बरं, हा गोंधळ गलबला कशाचाय?"

नत्थूनं डोकं वर करून पाहिलं तर त्याच्या तोंडातून एक हलकंसं कण्हणं बाहेर पडलं. कुत्री अजूनच जोरात भुंकू लागली होती आणि दूरवरचा कोलाहल वाढू लागला होता. त्याचा अस्पष्ट प्रतिध्वनी दौडत पुढं पुढं जाणाऱ्या लष्करासारखा वातावरणात फैलावत चालला होता. भिंतीच्या वरच्या भागात ज्योत जास्तच अस्थिर, जास्तच गडद झालेली होती, जणू आगीच्या हालत्या-हिंदोळत्या सावल्याच असाव्यात!

"कुठं तरी आग लागलीय!" त्यानं भरून आलेल्या आवाजात सांगितलं आणि तो उठून बसला.

त्याचवेळी भणभणत्या कोलाहलाच्या वर तरंगत आल्यासारखा कुठल्यातरी घंटेच्या ठोक्यांचा आवाज आला. दोघांसाठीही तो आवाज नवीनच होता. रोजच शेखांच्या बागेतल्या घंटेचा आवाज यायचा. चौकातून निघाल्यानंतर जेव्हा नत्थूची बायको यायची आणि दोघंही झोपेच्या तयारीत असायचे तेव्हा टोल पडू लागले की बायको बहुतेक वेळा दहापर्यंत मोजत रहायची. कधी कधी अकरा टोल पण ऐकू यायचे, पण हा आवाज शेखांच्या घंटेचा नव्हता. नत्थूनं पूर्वी कधीही ऐकला नव्हता अशा एका घंटेचा आवाज होता. घंटेचा आवाज वाढतच होता आणि वाढत्या कोलाहलात तिचा टणटण आवाज कधी स्पष्ट ऐकू यायचा, तर कधी काही क्षणांपुरता बुडून जायचा, मग पुन्हा कोलाहलावर तरंगत येऊन त्याच्या कानांवर आदळायचा.

दुरून येणारा कोलाहल वाढतच चालला होता. वाड्याच्या आतून खोल्याखोल्यांतून आवाज येऊ लागला होता. लोक जागे होऊन खोल्यांच्या बाहेर येऊ लागले होते.

"मंडीत आग लागलीय!" कुणीतरी जोरात ओरडलं. मग मध्येच दुरून आवाज आला. आवाज फारच मोठा होता, स्पष्टही होता.

"अल्ला-हो-अकबर!"

नत्थूचं शरीर पायापासून डोक्यापर्यंत थरारून उठलं. तो डोळे फाडफाडून छताकडे बघू लागला होता. जणू आपल्याला लकवा झालेला आहे असं त्याला वाटत होतं.

"चला, बाहेर जाऊ," त्याच्या बायकोनं घाबरलेल्या आवाजात सांगितलं, "वाड्यातल्या लोकांना विचारू. मला भीती वाटू लागलीय."

पण नत्थूनं तिला धरून ठेवलं होतं, आणि जडपणे तो खाटेवरच बसून राहिला होता.

थोड्या वेळानं वाढत्या कोलाहलात अनेक जणांच्या कंठातून आणखी एक आवाज एकसाथ वर आला:

"हर-हर-महादेव!"

शेवटचा शब्द जास्तच लांबवलेला होता.

या वाढत्या कोलाहलात आणि बरोबर वाजणाऱ्या घंटेच्या आवाजात पुन्हा पुन्हा तोच आवाज कानावर आदळू लागला. जणू फार मोठा उत्सव साजरा होऊ लागलाय.

शेवटी नत्थूच्या बायकोला न राहवून नत्थूच्या मिठीतून स्वतःला सोडवून घेत उठली आणि दरवाजा उघडून बाहेर गेली. नत्थू अजूनही विषण्ण डोळ्यांनी छताकडेच पाहात होता.

हाच कोलाहल, एक अस्फुटसा स्वरतरंग होऊन शहराच्या बाहेर दूर रिचर्डच्या बंगल्याच्या भिंतीवर आदळू लागला. या घुमणाऱ्या प्रतिध्वनीमध्येच काही वेळानं घंटेचा टण्‌टण् आवाजही तरंगत-तरंगत येऊन आदळू लागला होता. रिचर्ड त्या वेळी गाढ झोपेत होता, पण लीझाला मात्र त्या आवाजानं जाग आली. तो आवाज ऐकताना लीझाला आधी वाटलं की तिच्या खोलीतल्या घंटीची हलकीशी किणकिण ऐकू येऊ लागलीय. दिवसा हवेच्या झुळकीसरशी किणकिण आवाज यायचा तशी. पण जेव्हा ती पूर्णपणे जागी झाली तेव्हा तिला हा आवाज वेगळाच असल्याचं जाणवलं. अधूनमधून हा आवाज वाऱ्यावरच विरून जायचा. जणू त्या आवाजाला पळवून नेलं आहे. मग मध्येच तो स्पष्ट ऐकू यायचा. अंधःकाराची घनघोर अंतरं भेदून तो तरंगत आलेला असायचा. लीझाच्या डोळ्यात झोप होतीच. झंझावातात समुद्राच्या लाटांशी झुंजणाऱ्या आणि वाट शोधणाऱ्या एखाद्या जहाजाचीच ती घंटा आहे असं तिला अधूनमधून वाटायचं.

तिनं कोपराच्या आधारानं उठून बसत रिचर्डकडे पाहिलं. रिचर्डचं मंद घोरणं चालू होतं. उशीवर डोकं टेकवताच तो झोपी जायचा हे त्याच्या स्वभावाचंच वैशिष्ट्य होतं. अलिप्त, निर्विकार. पलंगावर पडताच तो गाढ झोपेच्या अधीन व्हायचा.

लीझाला खोलीतला अंधार फारच जडशीळ वाटू लागला होता. गेटजवळ पहारेकऱ्याच्या बुटांचा आवाज रस्त्यांना मारत असल्यासारखा वाटायचा.

"रिचर्ड, हा आवाज कसलाय?" म्हणत लीझा रिचर्डला खेटून बसली.

"अं, काय आहे?" रिचर्ड जागा झाला होता.

"हा आवाज कसलाय्? "

"काही नाही, तू झोप."

पण लीझानं त्याच्या गळ्याभोवती आपले हात गुंफले. "कुठे तरी घंटा वाजल्यासारखं वाटतंय." लीझा म्हणाली, "जणू चर्चची घंटा घणघणतेय."

रिचर्ड जागा झाला. त्यानं कान देऊन तो आवाज ऐकला आणि हाताच्या कोपराच्या आधारानं तो उठून बसला. "चर्चच्या घंटेचा आवाज जास्त तीव्र असतो. हा मंदिरातल्या घंटेचा आवाजय. हिंदूंच्या मंदिरातल्या घंटेसारखा."

"पण ही घंटा आता, यावेळी का वाजू लागलीय? हिंदूंचा एखादा उत्सवय की काय? ही घंटा ऐकून समुद्रात वादळ आलंय आणि एखादं जहाज धोक्याची सूचना म्हणून घंटा वाजवू लागलंय असं वाटतंय." रिचर्ड गप्प होता.

शहराच्या दिशेनं येणार भणभणता कोलाहल उत्तरोत्तर वाढतच होता. कधी कधी एखादा आवाज या भयंकर कोलाहलातून वर यायचा. जणू कुणीतरी कुणाला तरी बोलावतंय. मग पुन्हा कोलाहलाच्या समुद्रात बुडून जायचा. तशातच अंधाराच्या लाटांवर तरंगत आणखी एक आवाज आला:

"अल्ला-हो-अकबर!"

रिचर्डचं सगळं शरीर एकदम ताठ झालं, आणि मग थोड्या वेळातच सैलही पडलं.

"कसला आवाजय? हा कसला आवाजय? याचा अर्थ काय?"

"याचा अर्थ आहे गॉड इज् ग्रेट!"

"हा आवाज यावेळी कसा काय? नक्कीच काहीतरी धार्मिक उत्सव असला पाहिजे!"

रिचर्ड मनातल्या मनात हसला.

"हे धार्मिक उत्सवाचं नाहीय, लीझा, गावात हिंदू आणि मुसलमानांमध्ये दंगल चाललेली आहे."

"तू असताना दंगल, रिचर्ड?"

रिचर्डला वाटलं, सगळं काही समजून-उमजूनही लीझा हा अडचणीत टाकणारा प्रश्न विचारतेय.

"आम्ही त्यांच्या धार्मिक भांडणात पडत नाही, तुला तर हे माहीतच आहे, लीझा."

क्षणभर लीझाला वाटलं, ती एखाद्या भयाण जंगलात सगळ्या बाजूंनी वेढलेली आहे, आणि दुरून येणारे आवाज जंगलातलेच आहेत-कोल्हेकुईचे, गिधाडाचे आणि वेगवेगळ्या प्राण्यांचे.

"तू ते बंद का केलं नाहीस? इथं मला भीती वाटतेय रिचर्ड!"

रिचर्ड गप्प बसला. कोपरांच्या आधारानं बसला. या स्थितीत मला काय करावं लागेल, सरकारच्या नीतीची अंमलबजावणी कशी करावी, अशा विचारात त्याचा मेंदू पुन्हा जोरात चालू लागला.

लीझानं आपले बाहू पुन्हा रिचर्डच्या गळ्यात टाकले.

"हे लोक भांडू लागले तर तुझ्या जिवालाही धोका आहे, रिचर्ड!"

लीझानं म्हटलं, आणि तिला रिचर्डबद्दल प्रचंड सहानुभूती वाटू लागली. दुबळासा रिचर्ड जंगली लोकांमध्ये एकाकीपणे, एकटाच हिंडतो आहे. अशा लोकांवर राज्य करणं काय सोपं काम आहे?

मधून मधून अंधाराच्या गुहेतून बाहेर येणारी घंटेची टणटण ऐकू येत होतीच.

"हे लोक आपापसात लढणं चांगली गोष्ट आहे का?"

रिचर्ड हसला.

"तर या लोकांनी मिळून माझ्याशी लढणं चांगली गोष्ट आहे का?" रिचर्ड म्हणाला, आणि कूस बदलून एक हात लीझाच्या केसांवरून फिरवू लागला, "आत्ता जर हे आवाज माझ्या घरांच्या भोवती असते आणि माझ्या रक्तासाठी संगिनी घेऊन हे लोक बाहेर उभे असते, तर काय झालं असतं?"

लीझाचं सर्वांग शहारलं. ती रिचर्डच्या अधिकच जवळ आली आणि अंधारात त्याच्या चेहऱ्याकडे पाहू लागली. तिला वाटलं, मानवी मूल्यांना काहीही महत्त्व नसतं. वास्तवात केवळ शासकीय मूल्यांनाच महत्त्व असतं. लगेच रिचर्ड उठून बसला. "लीझा, शहरात गडबड आहे, तू झोप. काय झालंय ते माहीत करून घ्यायला हवंय मला."

त्याच वेळी टेलिफोनची घंटा वाजली.

9

"काय रांडेच्चं घर आहे! एखादी गोष्ट कुठं ठेवली की पुन्हा सापडायचं नावच नाही. धुंडून धुंडून मेलं तरी सापडायची नाही." लाला लक्ष्मीनारायण आलमारीसमोर उभे राहून बडबडत होते. आलमारीच्या खालच्या खान्यात कपड्यांखाली त्यांनी एक छोटीशी कुऱ्हाड ठेवलेली होती, आणि ती या वेळी

सापडत नव्हती. आणि तिकडं गावात तर गडबड सुरू झालेली होती. दोनदा त्यांनी खोलीतून बाहेर येऊन कुन्हाड कुठं आहे ते बायकोला विचारलं होतं आणि दोन्ही वेळा बायकोनं एका प्रश्नाची दोन उत्तरं दिली होती.

"हे पाहा, मी काही काड्यांनी दात घासत नाही. बाभळीच्या काड्या तोडायला मी कशाला कुन्हाड घेऊ ? मी लाकडंही फोडत नाही. मला सारखं सारखं कुन्हाडीबद्दल काय विचारताय?"

"आता विचारणंही गुन्हा झालाय, कुन्हाड सापडली नाही तर तुला विचारायचं की नाही? मग कुणाला विचारायचं?"

"हे पाहा, एवढं हैराण व्हायला काय झालं? वर देव आहेत की! त्याच्या भरंवशावर बसा की गप्प. या एवढ्या कुन्हाडीनं तुम्ही वाचवणार तरी कुणाकुणाला?"

कुन्हाड खरोखरच फार लहान होती. तिच्या पिवळ्या रंगाच्या मुठीवर लाल आणि हिरव्या रंगाची नक्षी होती. लालाजी एकदा मुलांना जत्रेला घेऊन गेले होते आणि तेथूनच ही कुन्हाड आणली होती. मग काही दिवस सकाळी फिरायला जाताना छडीऐवजी ते ही कुन्हाडच घेऊन जात. मग तिचा दात घासायची बाभळीची काडी तोडायलाही उपयोग होऊ शकतो असं त्यांच्या लक्षात आलं. म्हणून ती रोज ते आपल्या सोबत घेऊन जात असत. घरी काड्यांचा खच जमू लागला होता. त्यांची गरज एका काडीपुरतीच असायची, पण एक फांदी तोडून ती कापत कापत घरापर्यंत येईतो तिच्यातून अनेक काड्या मिळायच्या. बायको उरलेल्या काड्या कचऱ्याच्या टोपलीत फेकू लागली की यांना वाईट वाटायचं:

"ताज्या काड्या फेकाय लागलीस का? काही बघत जा जरा."

"हे पाहा, ताज्या असू की शिळ्या, यांचा कुणाला उपयोग तर नाही. आता त्या ठेवून करायचं तरी काय?"

"तू स्वतः वापरत जा की!"

"माझे दात हलू लागलेत. तुमच्या त्या काड्यांच्या कृपेनंच हलू लागलेत. आधी कसे लोखंडासारखे मजबूत होते. " असं म्हणत ती कोपऱ्यात ठेवलेल्या कचऱ्याच्या बादलीकडे जाऊ लागायची.

"हे पहा, भाग्यवान बाई, एक दिवस अजून राहू दे की त्या काड्या. त्या वाळल्यावर मी काही म्हणणार नाही, पण हिरव्या काड्या कशाला फेकायच्या?"

आज मात्र कुन्हाड हरवली होती. कुन्हाड घरात असताना त्यांना सुरक्षित असल्यासारखं वाटायचं. कुन्हाड नसल्यामुळे ते निःशस्त्र झाले होते. आणि तिच्याशिवाय घरात शस्त्राचं नाव घ्यावं अशी एकही गोष्ट नव्हती. काही मशालीचे दांडे होते आणि स्वयंपाकघरातले चाकू. तेलाचंही तसंच. फक्त एक बाटलीभर

मोहरीचं तेल होतं आणि कोळसा तर नसल्यासारखाच होता. वानप्रस्थजींचं प्रवचन झाल्यानंतरही लालाजींना या गोष्टीची व्यवस्था करता आली नव्हती. सरकार काही दंगल होऊ देणार नाही असं त्यांना अगदी आतून वाटलं होतं. आणि समजा, झालीच तर तिची झळ काही इतक्या लवकर त्यांना बसणार नाही.

कुन्हाड या वेळी युवक संघाच्या 'शस्त्रागारा'ची शोभा वाढवत होती. ती खिडकीच्या आतल्या कट्ट्यावर होती. तिथं रणवीरनं धनुष्यबाण एक-एक करून सजवून ठेवले होते.

"हे घरच रांडेच्चं आहे, आता मी जाऊ तर कुठं?" ते पुन्हा एकदा बडबडले.

"तू पाहिलीस का कुन्हाड, नानकू?" त्यांनी नोकराला बोलावून विचारलं.

"इथंच होती पिताजी, पण मी काही पाहिली नाही."

"घरातच होती तर काय पंख फुटून उडून गेली? तू मला बनवतोस काय, तुला माहीत नाही तर मग गेली कुठं?"

"मी पाहिलीच नाही, पिताजी!" नानकू उंबऱ्यावर उभा होता.

अंतरंग-सभेच्या मिटींगमध्ये त्या दिवशी जेव्हा शहरातील परिस्थितीवर चर्चा चालू होती तेव्हा हिंदू जातीच्या सामूहिक संरक्षणाचा विचार सतत त्यांच्या मनात घोळत होता. 'पोरांना लाठी चालवायला शिकवा, या कामात एकाही दिवसाचा उशीर व्हायला नको. या कामासाठी मी पाचशे रुपये द्यायला तयार आहे', लालाजींनी सांगितलं होतं, आणि त्यांच्या प्रेरणेनं बघता बघता अडीच हजार रुपये गोळा झाले होते. पण त्यावेळी शत्रूला आव्हान देण्यात, शत्रूला कमी लेखण्यात त्यांना उत्साह वाटत होता. कारण ते स्वतःला सुरक्षित समजत होते. प्रत्यक्षात ते सुरक्षितही होते. पैसेवाले होते, प्रतिष्ठित होते, भारीच्या घरात राहात होते, त्यांच्यावर हात उगारायची कुणाची हिंमत होती? आजूबाजूला मुसलमान लोक रहात असत, पण सगळेच खालच्या श्रेणीतले होते. शहरातील अनेक मुसलमान व्यापाऱ्यांसोबत लालाजी व्यवहार करीत असत. त्यांच्यासोबत उठणं-बसणं होतं. मग भीती कशाची? पण आग लागल्यापासून शहराचं स्वरूपच फार बदललं होतं. सगळं काही समजून-उमजूनही त्यांचं मन विषण्ण होऊ लागलं होतं.

"ऐकलंस का? मला वाटतं, आपल्या होतकरू सुपुत्रानं ती कुन्हाड युवक समाजाला दिली असावी."

"तुम्ही आणि तुमचं पोरगं काय वाट्टेल ते करा. मला तर तुम्ही सगळे मूर्खच समजता. मी तुमच्या भानगडीत कशाला पडू?"

"काही सांगून गेलाय का तुला?"

"कोण?"

"कोण म्हणजे? रणवीर, अजून कोण?"

"मला काही सांगितलं नाहीय. तुमचेच उपदेश दिवसभर ऐकत असतो, आता मला काय माहीत कुठं गेलाय ते! या असल्या प्रलयाच्या रात्री पोरगं घरी नाहीय एवढं खरं!"

लालाजी हात झटकून पुन्हा खोलीच्या दिशेनं वळले.

पण आता खोलीत तरी काय अर्थ होता? कुन्हाड तर तिथं नव्हतीच. त्यांनी खोलीबाहेर ठेवलेले मशालींचे दांडे घेतले आणि ते बाहेर आले. एक दांडा त्यांनी नानकूला दिला आणि त्याला खाली जाऊन दारासमोर बसायला सांगितलं. दुसरा त्यांनी, त्यांची बायको आपल्या तरुण पोरीसोबत खाटेवर बसली होती त्या भिंतीला टेकून उभा करून ठेवला. एक दांडा त्यांनी आपल्या हातातच ठेवला. थोडा वेळ तो तसाच घेऊन ते उभे राहिले, मग त्यांना विचित्र वाटू लागलं आणि मग तोही भिंतीला लावून ठेवला. मग पायऱ्या चढून गच्चीवर गेले. तिथं शौचालय बांधण्यात आलेलं होतं.

गेल्या वेळी दंगल पेटली होती तेव्हा फक्त मंडीत आगच लागली होती, मारझोड झाली नव्हती. या वेळी हवेत जास्तच विष होतं, लोक भडकलेले होते. अंतरंग-सभेच्या मीटिंगपर्यंत तर लालाजीही भडकलेले होते.

आग पहिल्यापेक्षा जास्तच फैलावलेली होती. उत्तर-पश्चिमेकडे आकाश जास्तच लालभडक होऊ लागलं होतं. या लालीतून उसळणाऱ्या आगीच्या ज्वाळा एखाद्या महानागाच्या जिभेसारख्या लपलप करीत होत्या. आग या वेळी हळूहळू उत्तरेकडे पसरू लागली होती, अगदी दसऱ्याच्यावेळी लंकादहनाची आग पसरते तशीच. आग जास्तच भडकू लागली होती. खाली, आगीच्या तुफानानं गाठोड्यासारखे दिसणारे ढग, आणि एकाएकी त्यात नाचणाऱ्या आगीच्या ज्वाला सरळ आभाळाच्या दिशेनं झेपावत होत्या. आकाशात लालसरपणाची पुटं वाढू लागली होती. कधी कधी लाल धुळीचा एखादा ढगासारखा आकार वर आभाळाकडे झेप घ्यायचा आणि मग विरून जायचा. त्याचा लाल रंगाचा धूर होऊन तो आभाळात विरघळून जायचा. चांदण्या धूसर आणि अस्पष्ट झाल्या होत्या. क्षितिजापासून थोडासा वर असलेला भाग गडद लाल झाला होता, पण त्याच्यावरच्या भागात लाल रंग पिवळेपणात मिसळू लागला होता. कधी कधी आगीचं वादळ सरळ उंच होत दूरवर आभाळाकडे जायचं, एका ढगातून दुसरा ढग निघत असल्यासारखं वाटायचं, गडगडत धडपडत पुढे निघून जात असल्यासारखं दिसायचं.

शौचालयातून बाहेर येऊन लालाजी गच्चीच्या कट्ट्याच्या मागे उभे राहिले. भडकत्या आभाळाच्या पार्श्वभूमीवर घरांच्या गच्च्यांवर उभं राहिलेल्या लोकांच्या आकृत्या जास्त स्पष्ट दिसू लागल्या होत्या. सगळेच आगीकडे पाहू लागले होते. दूरवर पसरलेल्या शहराच्या गच्च्यांच्या वरवंडी, आणि पावसाळ्यासाठी उभारलेले चौकोनी सांगाडे एखाद्या तसबिरीसारखे दिसू लागले होते. लालाजींचं गोदाम मुख्य बाजाराच्या एका गल्लीत होतं. मंडीपासून थोडं बाजूला उत्तर-दक्षिणेकडे ते लागायचं. त्यांना त्या दिशेने अंधार आहे हे पाहून बरं वाटलं. त्या बाजूला आगीची चिन्हं नव्हती.

लालाजींनी वरवंडीवरून खाली वाकून पाहिलं, तर शेजारच्या गच्चीवर तीन माणसं उभी असलेली दिसली. तिघांची तोंडं आगीच्या दिशेलाच होती. फतहदीन, त्याचा भाऊ आणि बाप असे तिघे उभे होते. फतहदीनची नजर आभाळातली लाली पहाता पहाता मागे वळली तर त्याला लालाजी दिसले.

"कसा कहर उडालाय, लालाजी, उफ्, किती भयंकर आग उसळलीय!"

लालाजी काहीच बोलले नाहीत. त्यावर फतहदीननं शाश्वती दिल्याच्या सुरात म्हटलं, "निश्चिंत असा लालाजी, तुमच्या घराकडे कुणी डोळा उचलून बघणार नाही. आधी आमच्यावर हात उगारला जाईल, मगच तुमच्यावर उगारू देऊ."

"का नाही, शेजारी तर माणसाच्या हातासारखे असतात, आणि मग तुमच्यासारखे शेजारी असल्यावर-"

"तुम्ही बेफिकीर व्हा. हे दंगेखोर दंगा करत असतात, आणि सज्जन लोकांना त्रास देत असतात. इथं आपल्या सगळ्यांना याच गावात रहायचंय, मग भांडण-तंटे कशासाठी? का लालाजी?"

"बेशक-बेशक!"

लालाजींचा फतहदीनच्या बोलण्यावर विश्वासँ होताही आणि नव्हताही. वीस वर्षं झाली इथं राहून, कधीही त्याच्याकडून त्रास झाला नव्हता, पण शेवटी ते मुसलमानच होते! तसं भीती वाटण्यासारखं काही नव्हतं. जर कुणी माझ्या घराला आग लावली तर माझं एक घर जळेल, पण मुसलमानांचा तर अख्खा मोहल्ला जळून खाक होईल. शिवाय सकाळीच मुस्लिम लीगचा प्रमुख असलेल्या हयातबख्शनं आश्वासन दिलं होतं की तो असताना कुणीही लालाजींच्या केसांना धक्का लावू शकणार नाही म्हणून. गोदामाबद्दलही त्यांना फारशी काळजी नव्हती. गोदामातल्या सगळ्या मालाचा विमा उतरवलेला होता. तरीही परिस्थिती चिघळायला फारसा वेळ लागत नाही आणि या मुसरड्यांवर विश्वास ठेवणं अवघड होतं.

त्यांना एकच चिंता होती आणि ती म्हणजे रणवीरची. यावेळी तो घरात

नव्हता. रणवीर म्हणजे आवेशात असलेलं पोरगं आहे, कुठं एखादी चूक करून बसू नये म्हणजे झालं. तसं तर मास्टर देवव्रतांनीच त्याला गावातली गडबड बघून थांबवून ठेवलं असेल. सगळी मुलं गुरुजींकडेच आहेत असं संध्याकाळी रणवीरचा एक मित्र सांगूनही गेला होता. पण कुणाला ठाऊक, तो मंडीकडे गेला असला तर!

त्याच वेळी घंटेचा आवाज त्यांच्या कानावर येऊन आदळला. तो ऐकून त्यांना बरं वाटलं. अंतरंग सभेच्या बैठकीत त्यांनीच ठराव मांडला होता की धोक्याची सूचना देणारी घंटा ठीक करून घेण्यात यावी आणि तिला नवी दोरी बांधण्यात यावी. आपली सूचना अंमलात आलेली आहे हे पाहून त्यांना बरं वाटलं. पण दुसऱ्याच क्षणी आगीच्या या वादळातच घंटेचं असं वाजणं त्यांना बेमानीचं आणि निरर्थक वाटू लागलं.

इकडं धोक्याची घंटा वाजू लागलेली, तर तिकडं मंडी जळू लागलेली. हिंदुंचं लाखांचं नुकसान होऊ लागलेलं आहे. आम्हां हिंदुंचं यानंच नुकसान केलेलं आहे, आणि कशाकशानं नुकसान केलेलं आहे... ते बडबडू लागले.

ते दोन्ही हात पाठीमागे बांधून येरझाऱ्या घालू लागले होते आणि बडबडत होते. कधी कधी त्यांना भयंकर खिन्न वाटायचं. घरात तरुण मुलगी आहे. जर या बाजूला गडबड झाली तर मी यांना कसं सांभाळू? आणि रणवीर कुठं हिंडू लागलाय कुणास ठाऊक!

"फार वाह्यात पोरगं आहे, कुणाचंच ऐकत नाही. सारखा 'समाजसेवा', 'समाजसेवा' असा जप चालू असतो. ज्याला आई-बापाची काळजी नाही तो समाज-सेवा तरी काय करणार?"

कधी कधी त्यांना वाटायचं, रणवीर धान्य-दुकानांच्या मंडीकडेच गेला असेल, आणि तिथं तर आग भडकलेली आहे. हा विचार मनात येताच त्यांचं शरीर थरारून जाई.

इतरांचीही मुलं आहेत, तीही युवक सभेत जात असतात, लाठी चालवायला शिकतात, धोक्याच्या वेळी घराच्या बाहेरच असतात अशी नाहीत. फार शूर सैनिक व्हायला निघालाय... त्यांना स्वतःचाच राग येऊ लागला. मीटिंगमध्ये मीच एकटा बोलत असतो आणि बाकीचे सगळे चूप बसतात. माझ्याकडून पाचशे रुपये काढले, पण बाकी कुणी शंभराच्यावर एक पैसाही दिला नाही. माझ्यावर जर काही प्रसंग ओढवला तर एकही भडवा जवळ येणार नाही. इथं मुसलमानांच्या मोहल्ल्यात मला मदत करायला कोण येणारय?

वरवंडीवर उभं राहून लालाजींनी घराच्या आत डोकावून पाहिलं. खाली गच्च अंधार होता. जाळी लावलेल्या खिडकीजवळ खाटेच्या पायापाशी पोरगी शांतपणे

आईला चिकटून बसलेली होती.

"देवाचं नाव घे!" आई सांगत होती, "देवाचं नाव घे. गायत्रीचा पाठ म्हण."

आणि मुलगी हात दुमडून गायत्री मंत्र म्हणू लागली.

वरूनच लालाजींनी हळू आवाजात विचारलं,

"रणवीर आलाय का? रणवीरच्या आई, रणवीर आलाय?"

"नाही हो, कुठं आलाय अजून? कोणी नाही आलं!"

"बरं, हळू बोल. तुला हळू बोलता येत नाही का?"

लालाजी पुन्हा गच्चीवर येरझाऱ्या घालू लागले. ते पुन्हा पुन्हा मनातल्या मनात स्वतःला धीर देतः माझ्या घराला आग लावली तर यांची गल्लीच्या गल्ली जळून खाक होईल. पण शेवटी त्यांच्याच्यानं राहवलं नाही, ते बडबडत पायऱ्या उतरून खाली आले.

पण आपल्या कुटुंबासमोर गेल्याबरोबर त्यांचा सगळा नूरच पालटला.

"ही अशी हरवल्यासारखी शांत का बसली? रणवीरच्या मातोश्री, घाबरायसारखं काय आहे, जरा हिंमत धरा! उठा!"

रणवीरची आई गप्प बसली. तिचं काळीज रणवीरसाठी धडकत होतं. आतल्या आत ती पण व्याकुळ होती.

"आम्हाला हिंमत बांधायला सांगता आहात, आणि स्वतः मात्र तीनदा शौचाला जाऊन आलात." रणवीरची आई पुटपुटली.

लालाजी खिडकी सोडून आपल्या खोलीत निघून गेले.

थोड्या वेळानं रणवीरच्या आईला खटकल्यासारखं वाटू लागलं.

"विद्या, जा बरं, बघ तुझे वडील काय करतायत." विद्या त्याच पावली उठून वडिलांच्या खोलीकडे गेली. लालाजी आपलं अडीज मीटर धोतर बदलून विजार घालू लागले होते. विद्या पुन्हा तशीच तडक आईकडे आली.

"ते तर कुठेतरी बाहेर जायची तयारी करू लागले आहेत," विद्यानं घाबरलेल्या आवाजात सांगितलं.

"अरे देवा, ह्यांना तर काही कळतच नाही!" आणि आई खाटेवरून उतरून सरळ आपल्या पतीच्या खोलीत गेली आणि म्हणू लागली, "बघा ओ, माझा मुडदा गाडलेला बघा न् मगच घराच्या बाहेर पाय ठेवा."

"तर काय करू? त्याचा ठावठिकाणा न घेता घरातच बसून राहू का काय?"

"आपल्या तरुण पोरीला माझ्याजवळ एकटी सोडून जाणार! बघा तर, किती घोर प्रसंगय आणि तुम्ही -" आईनं उत्तेजित आवाजात सांगितलं.

"पोरगं बाहेर गेलंय आणि मी बांगड्या घालून घरात बसू? जरा भान ठेवून

बोलत जा!"

"पोरगं तुमचं आहे, तसं माझंही आहे! या असल्यावेळी त्याला शोधायला जायचं पण जाल तरी कुठं? शाळा बंद झालेली असेल, मंदिरातून लोक कधीच बाहेर गेलेले असतील. कुठं शोधत फिराल त्याला? पोरगं आता मोठं झालंय, नक्कीच कुठेतरी थांबलं असेल. संध्याकाळी मित्रही सांगून गेला होता की सगळी पोरं गुरुजींच्या घरी आहेत म्हणून. मी कित्ती सांगत होते तुम्हाला की पोराला आर्यवीर करायची काही जरूरी नाही. पोरगं शिकेल-सवरेल, खेळेल, खाईल-पिईल, वाढत राहील. पण नाही, तुम्ही काही माझं ऐकलं नाहीत. त्याला कवायत करायला लाव, काठी खेळायला शिकव, हे कर, ते कर, अहो, मुसलमानांचं गाव आहे, तर आयुष्यभर त्यांच्यातच रहायचंय की! पाण्यात राहून मगरीशी वैर करणं काय फार शहाणपणाची गोष्टय का? बघा आता काय काय होतंय ते!"

"फार उपदेश करू नकोस. तो युवक समाजात जाऊ लागला तर काय वाईट झालंय? देशाची आणि समाजाची सेवा केलीच पाहिजे!"

"करा मग देशाचं न् समाजाचं काम आणि भोगा त्याची फळं! पण मी तर काही बाहेर जाऊ देणार नाही तुम्हाला या वेळी!"

लालाजींनी बाहेर जाण्याचा बेत रद्द केला. त्यांना आग इतकी भडकेल असं काही वाटलं नव्हतं. त्यांना मुसलमानांचा राग तर नेहमीच यायचा, पण इंग्रज त्यांना दाबून टाकतील असंही मनोमन वाटायचं!

"बाकीचे लोकही आहेतच की! ऑफिसरांबरोबर, शेजाऱ्यांसोबत, हिंदू-मुसलमान सगळ्यांसोबत कसं खेळीमेळीनं, गोडीगुलाबीनं राहतात. आपले व्याहीच बघा की. त्यांच्या घरी मुसलमानांची रांग लागलेली असते. तुम्ही ऑफिसरांसोबत संबंध ठेवले नाहीत की शेजाऱ्यांसोबतही नाहीत."

प्रत्यक्षात जणू त्यांच्या बायकोनं त्यांच्या मनातली गोष्टच बोलून दाखवली होती, कारण नेमकं या वेळी लालाजी याच गोष्टीचा विचार करत होते. त्यांच्या व्याह्याची शहानवाझबरोबर प्रगाढ मैत्री होती, आणि शहानवाझ फार प्रतिष्ठित आणि प्रस्थ असलेला मुसलमान होता, जागोजागी त्याच्या मोटारी चालत, त्याचा पेट्रोलचा ठेका होता आणि लालाजींच्या व्याह्यासोबत त्याचं एकाच ताटात बसून जेवण्यासारखं नातं होतं. कसंही करून त्याच्या मदतीनं काही दिवस बाहेर निघून जावं हेच सगळ्यात चांगलं होतं. वणवा पेटलेलाच आहे तर तो काही इतक्या लवकर शांत होणार नाही, आणि अजून पुढं काय काय वाढून ठेवलंय कुणास ठाऊक! पोरीला घेऊन काही दिवस तरी सदर बाजारात जाऊन रहायला पाहिजे. पण हे कसं शक्यय?

त्याचवेळी दुरून घोषणांचा आवाज ऐकू आला. 'अल्ला-हो-अकबर' चा नारा तसा दूरवरून आलेला होता, पण त्याची घरांच्या गच्च्यांवरून पुन्हा पुन्हा पुनरावृत्ती होऊ लागलेली होती. घरांच्या छतांवर चढून आगीचं थैमान बघणारे लोकही तोच नारा लावू लागले. कोलाहल वाढू लागला होता. दूर शिवालयाच्या बाजूनं हिंदूंचाही आवाज यायचा, पण तो अधूनमधूनच, आणि खूप क्षीणही होता. जवळपास कुठेही त्याचा पुनरुच्चार होत नव्हता. त्यामुळे लालाजी जास्तच त्रस्त झालेले होते.

"ऐक, रणवीरच्या आई, तू नानकूला वर बोलव."

"का? कायय?"

"प्रत्येक गोष्टीत 'का?' करत जाऊ नको, तू बोलव त्याला, मला त्याच्याबरोबर एक चिठ्ठी पाठवायचीय."

बायको लालाजींच्या चेहऱ्याकडे बघतच राहिली, "यावेळी पाठवणार? कुठं पाठवायचंय?"

बायकोचं मन रणवीराच्या दिशेनं धावू लागलं होतं.

"तो रणवीरचा शोध घेणारय? गुरुजींनी तर निरोप पाठवलाय की रणवीर त्यांच्याकडे आहे, मग आता एवढं परेशान का होताय? देवावर विश्वास ठेवा आणि गप्प बसून रहा सकाळपर्यंत!"

"नाही, रणवीरसाठी नाही पाठवायचं त्याला. माझं दुसरं एक कामय..."

"हे बघा, या गरीबाला कशाला पाठवताय? बाहेर एवढी गडबड चालूय. याची काही ओळख नाही न् पाळख नाही."

"तू प्रत्येक गोष्टीत टांग का घालतेस? विद्याला घेऊन आपण इथंच रहावं अशी माझी मुळीच इच्छा नाहीय. काहीही होऊ शकतं. मी व्याह्याला चिठ्ठी पाठवतो की त्याच्या शहानवाझ नावाच्या मित्राला सांगून आम्हाला इथून घेऊन जा. तरुण पोरगी घरात आहे, मी नाही इथं राहू शकत."

"हे काम पण उद्या पहाटेच होऊ शकतं ना? यावेळी काही होऊ शकत नाही ते. तुमची चिठ्ठी घेऊन तुमचा व्याही काय लगेच शहानवाझच्या घरी जाणारय? तुम्ही कसं बोलता हो!"

पण लालाजींनी ऐकलं नाही. 'एकदा एक गोष्ट यांच्या मनात शिरली की मग ती जाणंच कठिणय,' बायको पुटपुटली. मग आवाज चढवून ती म्हणाली, "हा कुठं घेऊन जाणारय तुमची चिठ्ठी? त्याला काही माहीत नाहीय."

"का नाही घेऊन जाणार? याला ठेवलंय कशासाठी? गल्लीगल्लीनं दोन मिनिटांत व्याह्याच्या घरी पोहचेल. जवळच तरय."

"तुम्ही का एवढा हट्टीपणा करता हो? इथून निघायचं म्हटलं तरी सकाळीच

निघावं लागेल ना? यावेळी कुणाला लिहून काय उपयोगय? व्याह्यांना तरी कशाला त्रास देताय यावेळी?"

लालाजी क्षणभर थबकले, मग हळू आवाजात म्हणाले, "शक्य असलं तर रात्रीच निघून जावं म्हणतो."

"इतकं काय आहे हो? तुम्हाला शेजाऱ्यांची भीती वाटते, मला नाही वाटत. देवाचं नाव घ्या न् गुपचूप बसून राहा." बायको म्हणाली, पण नंतर ती गप्पच बसली.

ते एवढे उतावीळ झाले आहेत म्हणजे नक्कीच काही तरी कारण असलं पाहिजे. नानकूलाही धोकादायकच होतं, पण तरुण पोरीचा विचार मनात येताच आईची शांतता ढळू लागली. कुणी सांगावं, आत्ताच इथून निघून जाण्यातच भलं असेल! देव न करो, जर काही झालंच तर हिला लपवत लपवत कुठं हिंडत बसणारय मी?

"त्याला सांगा की मशालीचा दांडा सोबत घेऊन जा म्हणावं," लालाजींनी नानकूबद्दल सद्भाव व्यक्त करण्याच्या उद्देशानं म्हटलं.

चिठ्ठी देऊन लालाजी खूप वेळपर्यंत नानकूला समजावून सांगत होते, "जर एखाद्या गल्लीत गोंधळ असला तर लगेच दुसऱ्या गल्लीत वळ. जमलं तर मंदिरातून चपराशाला सोबत घेऊन जा. जा आता, उशीर करू नकोस. जमेल तसं कर, पण हे पत्र देऊन येच."

पण तो निघायच्या आधी बायको पुन्हा एकदा चिडून म्हणाली, "हे बघा, देवाचं नाव घेऊन एवढी रात्र इथंच काढा. उद्या जे होईल ते बघू. अहो, हा पण कुठल्या तरी आईचा पोरगाच आहे ना, का त्याला भडकत्या आगीत ढकलताय?"

"काही होणार नाही, काऽही होणार नाही. मी जाऊ शकतो तर हा का नाही जाऊ शकत? याला काय हळद लागलीय का?"

पण त्याचवेळी मागच्या गल्लीत कुणीतरी पळत असल्याचा आवाज आला. पावलांचा आवाज जवळ येत होता, आणि क्षणाक्षणाला अधिकच स्पष्ट ऐकू येऊ लागला होता. त्या रात्री गल्लीतून जाणाऱ्यांच्या पावलांचा आवाज नेहमीपेक्षा जास्तच मोठा वाटत होता, आणि कानावर पडता पडताच तो हृदयातही वाजू लागायचा.

लालाजी एकाएकी थांबले. त्यांच्या पायात गोळे आल्यासारखे जाणवत होतं. उरात जास्तच जोरात धडधड होऊ लागली. रणवीरच कुठून पळत येतोय की काय?

पळणाऱ्या पावलांच्या आवाजावरून कोण कुणाला ओळखू शकतं?

अचानक दुसऱ्याही माणसाच्या पळण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. कुणीतरी वळून गल्लीत घुसलं आहे आणि आधीच्या पळणाऱ्या माणसाचा पाठलाग करू लागलं आहे, असं वाटलं.

मग एकाएकी अंधार कापत कापत आवाज आला.

"वाचवाऽ, वा ऽ च वा ऽऽ!"

लालाजींचं सर्वांग शहारलं. गल्लीच्या मागच्या बाजूला एक नाही, दोन नाही, तीनचार माणसांच्या पावलांचा आवाज येऊ लागला होता. हे आवाज खाटेवर बसलेल्या आईनं आणि लेकीनंही ऐकले. शेजारीपाजारी छतावर चढलेल्या लोकांनीही ऐकले, सगळ्या आसमंतात ते आवाज घुमू लागले होते.

"वाच...वाऽऽ"

पुन्हा एकदा तसाच आवाज आला. किंचाळण्याचा आवाज होता, कुणातरी बेफाम घाबरलेल्या माणसाचा आवाज. या आवाजावरूनही आपल्या मुलाचा आवाज ओळखणं अशक्य होतं. भयाकुल, भेदरलेले सगळेच लोक एकसारख्याच आवाजात हाका मारत असतात.

गल्लीत काहीतरी फेकल्याचा आवाज आला. लाठी होती की दगड? कुणीतरी पळणाऱ्या माणसाच्या मागे लाठी फेकून मारली असावी कदाचित. किंवा कुऱ्हाडही असावी. जवळच्याच भिंतीला लागून ती खाली पडली होती, आणि मग फरशीवरून गडगड करत पुढे गेली होती.

"पकडा... मारा... माऽरा साल्याला!"

मग बचावासाठी ओरडणारा माणूस धापा टाकत, पायांचा पटपट आवाज करीत गल्ली ओलांडून पुढे निघून गेला आणि त्याचा पायांचा आवाज हळूहळू कमी कमी होत नाहीसा झाला, मात्र त्याचा पाठलाग करणाऱ्या माणसांचा आवाज वाढतच होता.

ती काठी त्याला लागली नसावी का? रणवीरवरच कुणी काठी फेकली असेल का? रणवीर त्यातून वाचून आला असेल का? तो एवढ्यात दरवाजा ठोठावेल का?

पाठलाग करणारे पाय गल्लीच्या पुढं निघून गेले होते. लालाजींचं हृदय धडधड करीतच होतं. कुणीतरी एवढ्यात दरवाजा ठोठावेल म्हणून त्यांचे कान दरवाज्याकडे लागलेले होते. पण कुणीच दार ठोठावलं नाही.

लालाजींच्या पायात त्राण आलं. रस्त्यावरून पळत जाणाऱ्या या लोकांना बघता यावं म्हणून ते चालत चालत गच्चीवर गेले, रस्ता सुनसान झाला होता. समोर कच्च्या घराच्या छतावर बायका, माणसं आणि मुलं उभी होती, त्यांनीही ते आवाज ऐकले असतीलच. सगळे जण स्तब्ध उभे होते. त्याच वेळी छताखाली तीन माणसं रस्त्यावरून गल्लीत परत येताना दिसली. तिघांनीही आपली तोंडं

कपड्यांनी झाकून घेतलेली होती, तिघं जोरजोरात श्वास घेत होते आणि तिघांच्याही हातात लाठ्या होत्या.

"पळालं सालं शिखडं. ते पळालं नसतं तर आपण त्याचा पाठलागही केला नसता!" त्यातला एकजण म्हणाला.

मग त्यांची पावलं गल्लीत वळली आणि हळूहळू पावलांचा आवाज येणं बंद झालं.

मग लालाजींचा जीव भांड्यात पडला आणि त्यांनी पाठीमागे हात बांधून खोलीत येरझाऱ्या घालायला सुरुवात केली. नानकूनंही मशालीचा दांडा उचलला आणि तो पायऱ्या उतरून दरवाज्यामागे जाऊन बसला.

10

दिवसाच्या उजेडात शहर अर्धवट मरून पडल्यासारखं झालं होतं. जणू शहरालाच साप चावला असावा. मंडी अजूनही जळतच होती. म्युनिसिपालिटीच्या फायर ब्रिगेडनं तिच्याशी झुंजणं कधीच सोडून दिलं होतं. त्यातून उठणाऱ्या धुरानं आभाळभर काजळी पसरलेली होती, पण रात्री मात्र आभाळ लाल झालेलं होतं. सतरा दुकानांची जळून राखरांगोळी झाली होती.

दुकानं बंदच होती. दूध-दह्याची दुकानं कुठे कुठे उघडलेली होती आणि त्यांच्याजवळ दोनदोन, चारचार लोक उभे राहून रात्रीच्या घटनांबद्दल अंदाज बांधत होते. कापाकापीबद्दल अफवाच जास्त होत्या. गवालमंडीवाले म्हणत रत्तामध्ये दंगल झाली आहे; रत्तावाले म्हणत, कमिटी मोहल्ल्यात दंगल झाली आहे.

नव्या मोहल्ल्याच्या चौकात एक घोडं मरून पडलेलं होतं. बाहेरगावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका पन्नाशीतल्या माणसाचं प्रेत सापडलं होतं. कॉलेज रोडवर एक बुटाचं दुकान आणि त्याच्या शेजारची शिंप्याची दुकानं लुटण्यात आली होती. आणखी एक प्रेत शहराच्या एका कोपऱ्यात असलेल्या कबरस्तानात सापडलं होतं. लाश पन्नाशीतल्या एका हिंदूची होती आणि त्याच्या खिशात थोडीशी चिल्लर आणि लग्नाच्या बस्त्याची एक यादी सापडली होती.

मोहल्ल्यांच्या मध्ये रेघा ओढण्यात आल्या होत्या. हिंदूंच्या मोहल्ल्यांत आता मुसलमानाला जाण्याची हिंमत नव्हती, आणि मुसलमानांच्या मोहल्ल्यात हिंदू आणि शीख जाऊ शकत नव्हते. डोळ्यांत संशय आणि भीती तरंगत होती.

गल्ल्यांच्या टोकाशी आणि रस्त्यांच्या चौकाचौकांत जागोजागी लोक लाठ्या आणि भाले घेऊन आणि तोंडं झाकून घेऊन लपून बसलेले होते. जिथं जिथं हिंदू आणि मुसलमान शेजारी एकमेकांच्या बाजूला उभे होते तिथं पुन्हा पुन्हा एकच वाक्य उच्चारायचे, 'फार वाईट झालं, फार वाईट झालं!' त्याच्यापुढे संभाषणच होणं शक्य नव्हतं. वातावरणात अचेतनत्व आलं होतं. हे कोडं इथंच थांबणं शक्य नाही हे सर्वच लोकांना आतून माहीत होतं; पण पुढे काय होईल हे मात्र कुणालाच माहीत नव्हतं.

घरांची दारं बंद होती. शहरातला कारभार, शाळा, कॉलेज, ऑफिसं सगळंच ठप्प झालेलं होतं. रस्त्यावरून चालत जाणाऱ्या माणसाला कायम खिडक्यांच्या मागं, घरांच्या अंधाऱ्या उंबऱ्यांवरून, फटींमधून, छिद्रांतून त्याच्यावर डोळे रोखलेले आहेत, त्याचा पाठलाग करताहेत असा भास व्हायचा. लोक आपापल्या मोहल्ल्यांतच बंदिस्त झालेले होते, आणि फक्त अफवांच्या आधारानंच एकमेकांशी संपर्क साधून होते. खात्या-पित्या घरांतले लोक आपापल्या संरक्षणात गुंतलेले होते. सार्वजनिक कामं ठप्प झालेली होती. काँग्रेसची प्रभातफेरी आणि विधायक कार्य आणि इतर सगळीच कामं एका दिवसातच बंद पडली होती. तरीही पहाटे नेहमीप्रमाणेच जरनेल रस्ते ओलांडत काँग्रेसच्या कचेरीसमोर येऊन धडकला. तिथं कुलूप लागलेलं पाहून उजाडेपर्यंत तो आपल्या सोबत्यांची वाट पहात राहिला आणि ते आले नाहीत म्हणून नाल्यावर उभारण्यात आलेल्या चौथऱ्यावर उभा राहून त्यानं छोटंसं भाषण केलं, आणि मगच तो पुढं निघून गेला.

"लोकहो, आज सगळे जण कमकुवत, भित्रे उंदरासारखे घरात घुसून बसले आहेत. मला खेदपूर्वक असं म्हणावं लागतंय की आज प्रभातफेरी निघणार नाही. मी आपली क्षमा मागतो आणि आपणां सर्वांना अशी विनंती करतो की आपण शहरात शांतता पाळावी. हा सगळा खोडसाळपणा इंग्रजांचा आहे. ते भावाभावांना एकमेकांविरुद्ध लढायला भाग पाडत आहेत. जयहिंद!" आणि तो चौथऱ्यावरून खाली उतरून लेफ्ट-राईट करीत अंधारात नाहीसा झाला.

तिकडे रणवीर रात्री घरी परतला नव्हता, पण कसंतरी गुरुजींनी म्हणजे मास्टर देवव्रतांनी त्याचं क्षेमकुशल लाला लक्ष्मीनारायणकडे पाठवलेलं होतं. दुसरं, आता काय करावं, कुठे जावं असा लालाजींच्या मनात विचार चालूच होता की शहानवाझ स्वतःच तिथं आला. उंच, धडधाकट, आकर्षक असा शहानवाझ आपली गडद निळ्या रंगाची ब्यूक गाडी घेऊन तिथं आला होता. शहानवाझची व लालाजींची ओळखपाळख तर होती. पण घनिष्ठता नव्हती, बघता बघता लालाजी, त्यांची पत्नी आणि मुलगी त्याच मोटारीत बसून मोहल्ल्यातून निघून

गेले. घराची काळजी घ्यायला म्हणून एकट्या नानकूलाच मागं ठेवण्यात आलेलं होतं.

"नीट काळजी घेऊन पहारा कर, झोपू नकोस, नानकू, सगळं घर तुझ्यावर सोपवून चाललो आहोत."

आणि मोटर निघूनही गेली होती. निळी ब्यूक गाडी निर्जन रस्त्यावरून धावत जात होती. समोरच्या सीटवर ड्रायव्हरऐवजी तुर्रेदार पगडी घातलेला शहानवाझ बसला होता हे सगळ्यांना दिसत होतं. आणि सगळ्यांच्या नजरा त्याच्यावरच केंद्रित झालेल्या होत्या. गाडीत मित्राचा मित्र, चमकत्या चेहऱ्याचा शहानवाझ होता आणि त्याच्या बाजूलाच लाला लक्ष्मीनारायण बसलेले होते. मागे बायका बसलेल्या होत्या. तसं निघून जाणं फारच हिमतीचं काम होतं. जेव्हा जेव्हा रस्त्यावर लोकांची टोळकी उभी असलेली दिसायची, लालाजी मान वळवून दुसरीकडे पाहू लागायचे. मागच्या सीटवरची लालाजींची बायको शहानवाझला आशीर्वाद देत होती-'अशा लोकांच्या हृदयात साक्षात परमेश्वर वसत असतो. तोच अडचणीत सापडलेल्या लोकांना मदतीचा हात पुढे करीत असतो.'

आणि आता ब्यूक गाडी, लालाजी आणि त्यांच्या कुटुंबाला सदर बाजारातील लालाजीच्या कुणा तरी व्याह्याकडे सोडून आल्यानंतर शहरातील रस्त्यावरून आरामात हिंडत होती. आता शहानवाझ सरळ आपल्या जीवश्च-कंठश्च मित्र रघुनाथच्या वस्तीत आला होता. शहानवाझला आपल्या संरक्षणाची काहीच काळजी नव्हती; त्याची ब्यूक कार सगळ्या ठिकाणी सहजपणे जाऊ शकत होती.

जामा मशिदीच्या समोरून पुढे जात ब्यूक गाडी माई सत्तोच्या तळ्याच्या दिशेनं चालली होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूची घरं, लहान लहान दुकानं आणि त्याच्यासमोर काठ्या लावून उभारलेली कापडी छतं एखाद्या भग्नावशेषासारखी दिसत होती. हा मुसलमानी भाग होता. अर्धवट तुटलेला पूल ओलांडल्यावर मोटर सैयदांच्या मोहल्ल्याकडे निघाली. डाव्या-उजव्या बाजूची घरं आता उंच-उंच वाटू लागली होती. गच्ची असलेली दोन-मजली, तीन-मजली घरं, खालच्या बाजूला पुढे आलेले ओटे आणि दारं-खिडक्यांवर लावलेल्या रंगीत काचा. इथं हिंदू वकील आणि ठेकेदार राहत असत. एखाद-दुसरा सोडला तर बहुतेक सगळेच हिंदू होते. अनेक लोकांसोबत शहानवाझाचं उठणं-बसणं होतं, घनिष्ठता होती. जिवाभावाची दोस्ती होती. यावेळी खिडक्यांतून बाहेर बघणारे अनेक डोळे त्यालाच बघत आहेत हे त्याला माहीत होतं, पण त्याला हेही माहीत होतं की ते सगळे त्याला ओळखणारेच आहेत. तरीही त्यानं आपल्या मोटारीची गती थोडीशी वाढवलीच.

माई सत्तोच्या तळ्याजवळ आल्यानंतर तो उजव्या बाजूला वळला. तो संमिश्र वस्तीचा भाग होता, आणि तिथं सगळ्या प्रकारचे लोक रहात असत.

एका लांबलचक रांगेतील दुकानं जोडे बनवणाऱ्यांची होती आणि हे लोक होशियारपूरहून आलेले होते, सगळेच शीख होते, आणि आता ती सगळी दुकानं बंदच होती. पुढे काही अंतरावर कच्ची घरं होती, त्यांच्या भिंतीवर शेणाच्या गोवऱ्या थापलेल्या होत्या, पण हाही भाग निर्जन वाटत होता. ही भंग्यांची वस्ती होती. शहानवाझची मोटर पुन्हा मंद गतीनं चालू लागली. इथं संकटाची सावली इतकी गडद नव्हती, कारण विजेच्या खांबाभोवती दोन मुलं शिवणापाणी खेळत होती. त्यांच्या जवळच मुलांची आणखी एक टोळी खेळताना दिसत होती. तिथून जाताना शहानवाझनं त्यांच्याकडे निरखून पाहिलं. मुलांनी एक रिंगण केलेलं होतं आणि रिंगणात मध्यभागी एक लहानशी पोरगी झगा वर करून झोपली होती आणि तिच्या मांड्यांवर एक चिमुरडं पोरगं बसवलं होतं- त्यानंही आपला सदरा वर केलेला. आजूबाजूला उभी असलेली सगळी पोरं प्रचंड हसत होती. "नीच! ह्यांना काही दुसरा खेळ सुचला नाही का?" शहानवाझ पुटपुटला, आणि हसून पुढं निघून गेला. या भागात अजून तरी तणाव नव्हता आणि असला तरी दिसून येत नव्हता.

शहानवाझच्या चेहऱ्याकडे पाहून त्याच्या मनात कधी क्षुद्र आणि नीच विचार येत असतील असं वाटत नव्हतं. रुबाबदार तरुण, छाती ताणलेली असायची, केसांचा तुरा वाऱ्यावर उडायचा, बूट चमकत असायचे, नेहमीच धोब्यानं स्वच्छ धुतलेले सळसळणारे कपडे घालून फिरायचा. 'खरोखर हा जर एखाद्या तरुणीकडे पाहून हसला तर तीही नक्कीच हसल्याशिवाय राहणार नाही!' असं त्याच्याबद्दल बोललं जायचं. पण ती फार पूर्वीची गोष्ट होती, आता तो धीरगंभीर संसारी माणूस झालेला होता, पेट्रोलच्या दोन पंपांचा मालक होता, त्याच्या ट्रका-मोटारी चालत होत्या, आणि तरीही दोस्तान्यावाला, मिळून-मिसळून राहणारा, हसतमुख आणि भावनाशील. पूर्वी जसा होता तसाच आजही होता.

दोस्ती हे त्याचं इमान होतं. गावात गडबड सुरू झाली होती आणि तो रघुनाथची खबरबात घ्यायला गेला होता तेव्हा त्यानं रघुनाथच्या शेजारीच असलेल्या एका नानवाल्याला सांगितलं होतं, "हे बघ फकिरा, दोन्ही कान उघडे ठेवून ऐक. जर माझ्या दोस्ताला किंवा त्याच्या घरच्या कुणालाही कुणी वाईट नजरेनं पाहिलं तर मी तुलाच पकडीन. या घराच्या जवळपासही कुणी यायला नको! लक्षात ठेव!"

मोटर आता मोठ्या रस्त्यावर आलेली होती. हा भाग बराचसा मोकळा आणि उघडा होता. रस्ता लांबरुंद आणि आडवा होता. आजूबाजूची घरं रस्त्यापासून बऱ्याच दूर अंतरावर होती. हा भाग मुसलमानी होता आणि मोटरची गती खूपच कमी झालेली होती. दूर आत जाणाऱ्या एका रस्त्याच्या टोकाशी मौलादाद उभा

होता. मागे एका दुकानाच्या ओट्यावर पाचसात माणसं तोंडाला फडकी बांधून आणि लाठ्या-काठ्या-भाले हातात घेऊन बसली होती. मौलादाद आजही आपल्या वेगळ्याच पोषाखात होता. त्यानं खाकी रंगाचा गणवेष आणि गळ्यात हिरव्या रंगाचा रेशमी रुमाल बांधलेला होता. शहानवाझची मोटर येताना पाहून तो पुढे आला, "काय बातमी-बितमी?" शहानवाझनं मोटर उभी करीत त्याला विचारलं.

"कसली काय बातमी खानजी, तिकडं मागच्या मोहल्ल्यात काफिरांनी एका गरीब मुसलमानाला मारून टाकलंय," म्हणत असताना मौलादादच्या ओठांवर रागामुळे फेस आला.

मौलादादच्या डोळ्यात क्रोध होता, जणू तो म्हणत होता: 'खानजी, तुम्ही तर काफिरांना मिठ्या मारीत असता, त्यांच्याबरोबर उठत-बसत असता, पण इकडं मुसलमान मात्र मरू लागलेत.' पण उघडपणे तो काही बोलला नाही. शहानवाझची धाव जिथपर्यंत आहे तिथपर्यंत आपली असणं शक्य नव्हतं हे मौलादादला पक्कं माहीत होतं. शहानवाझचे संबंध, उठणं-बसणं डेप्युटी कमिशनरपर्यंत सगळ्याशी होतं, शहरातल्या सर्व श्रीमंतांशी होतं, पण मौलादाद मात्र कमिटीच्या आसपासच अनेक वर्षांपासूनच चकरा मारत होता.

"पाच काफीर आम्ही पण कापलेत! त्यांच्या आयला-"

शहानवाझनं ऐकून न ऐकल्यासारखं केलं, आणि मोटर सुरू केली.

तो थोडासाच पुढे गेला असेल तेवढ्यात उजव्या बाजूच्या गल्लीत खूप लोक प्रकट झाले. गुपचूप, शांतपणे लोक रस्ता ओलांडत होते. प्रेतयात्रा होती. सर्वात पुढे हयातबख्श चालला होता. डोक्यावर रुमाल, पांढरा स्वच्छ सदरा आणि विजार. लोकांच्या पायांचा सौम्य हळुवार आवाज जणू काही हवेला थपडा मारत चालला होता. मुसलमानाची मौत असली पाहिजे हे शहानवाझच्या लक्षात आलं. प्रेतयात्रेच्या सगळ्यात मागं दोन छोटी-छोटी मुलंही होती. ती नक्कीच त्या माणसाची असावीत.

थोड्या वेळानं रस्ता मोकळा झाला. शहानवाझनं पुन्हा गाडी सुरू केली.

फाटक ओलांडून शहानवाझनं आपली मोटार झाडाखाली उभी केली आणि किल्ली फिरवत फिरवत तो बंगल्याकडे येऊ लागला. पडद्याआड खिडकीजवळ उभ्या असलेल्या रघुनाथच्या बायकोनं त्याला सर्वात आधी पाहिलं, आणि तिला हार्दिक आनंद झाला.

"ओ सावकार, दरवाजा उघडा!" बाहेरून आवाज आला. रघुनाथची बायको लगबगीनं बाथरूमकडे गेली.

"शहानवाझ आलाय तुम्हाला भेटायला," तिने बाहेरूनच पतीला सांगितलं,

"मी त्याला बसवून ठेवते, लवकर या."

पण दरवाजा उघडण्याच्या आधीच शहानवाझ पुन्हा ओरडू लागला, "ओ भाऊ, बंगल्यात राहायला लागल्यापासून दरवाजाही उघडत नाहीयेस!" मग वहिनीला समोर उभी असलेली पाहून थोडा अडखळला,

"नमस्कार वहिनी! कुठाय माझा दोस्त?" असं विचारत तो समोरच्या खोलीत जाऊन बसला.

"इथं कसं काय आहे? काही त्रास वगैरे? तिकडून इकडं निघून आलात ते चांगलं केलंत!"

"चांगलं आहे, पण आपलं घर म्हणजे शेवटी आपलंच घर असतं. आता पुन्हा कधी जायला मिळेल की नाही कुणास ठाऊक!" म्हणता म्हणता तिचे डोळे भरून आले.

शहानवाझही भावनावश झाला. "वहिनी, रडू नकोस. जर मी जिवंत राहिलो तर तुम्ही सगळे नक्कीच आपल्या घरात परत जाल. तू निश्चिंत राहा."

रघुनाथची बायको शहानवाझसमोर डोक्यावरून पदर घेत नसे. त्याच्या मित्रांमध्ये, ज्याच्यासमोर ती निस्संकोचपणे येत असे असा हाच एक मुसलमान मित्र होता. रघुनाथला आपला सर्वात जवळचा मित्र मुसलमान आहे याचा गर्वही होता.

"फातिमाला का नाही आणलंत? केव्हाही आलात की एकटेच येता!"

"गावात गडबड आहे वहिनी, तुला काय वाटतं, मी हवा खायला बाहेर पडलोय?"

"तुम्ही येऊ शकता तर मग ती का नाही येऊ शकत? तीही मोटारीत बसू शकली असती!"

तेवढ्यात रघुनाथ आला.

"ओ भाऊ, तुला इथंही संडास लागली की काय? साला काफीर, तिकडून पळून आलास आणि इथं संडासाशिवाय दुसरं काही-"

मग दोघांनी एकमेकांना मिठी मारली. शहानवाझचं हृदय पुन्हा भावनोद्रेकात बुडालं. "या दोस्तासाठी तर मी जीव द्यायलाही तयारय, याला कुणी हात लावून तर बघावा, नाही त्याची चमडी लोळवली तर!"

वहिनी जायला निघाली तशी शहानवाझनं तिला थांबवलं, "वहिनी, चाललीस कुठं, मी काही जेवणार-बिवणार नाही."

"का? का नाही जेवायचं?"

"हा तर तसंच म्हणणार ग जानकी, तू कर जेवायला लवकर," रघुनाथ

म्हणाला.

"अरे जा, भेंडी खाऊ घालशील. मी नाही खात भेंडी. वहिनी, माझ्यासाठी काहीच करू नकोस!"

पण एव्हाना जानकी गेलेली होती. तो मागाहून ओरडला, "देवाशप्पत वहिनी, मी काही खाणार नाहीय. मला लवकर जायचंय, फक्त दोन मिनिटांसाठी आलोय मी."

"जेवणार नाहीत, चहा तरी घ्याल?" वहिनी खोलीच्या उंबऱ्यावरूनच परत आली.

"तुम्ही काही मला जेवायला घालणार नाहीत हे तर मला आधीपासूनच माहीत होतं; पण जाऊ द्या, चहाच आणा लवकर."

दोन्ही मित्र बसले. रघुनाथनं गंभीर आवाजात म्हटलं, "फार गडबड चालूय. फार वाईट वाटतं मनाला, भाऊ भावाचा गळा कापू लागलाय."

पण अचानक या वाक्यानं दोघांमध्ये अंतर निर्माण झालं. त्यांच्या दोघांतला संबंध वेगळा, हिंदू-मुसलमानांमधला संबंध वेगळा. या वाक्यानं रघुनाथनं जणू व्यक्तिगत नात्यासोबत जाती-जातीचं नातं जोडायचा प्रयत्न केला होता आणि या बाबत दोघांची मतं वेगवेगळी होती.

"आता गावागावांतूनही दंगली सुरू झाल्यात असं ऐकलंय." रघुनाथ म्हणाला. पण या विषयावर अधिक काही बोलणं शक्य नव्हतं. दोघांनाही अवघडल्यासारखं झालं. हा विषय त्यांच्या आत्मीय संभाषणावर धुक्याच्या चादरीसारखा पसरला गेला.

"सोड यार, तू तुझं बोल," शहानवाझनं विषय बदलीत म्हटलं, "तुला माहितीय काल माझी कुणाची भेट झाली ते? भीमाची!" शहानवाझनं खिदळत सांगितलं.

"भीम कोणता?" रघुनाथनं विचारलं, आणि मग दोघंही मोठ्यानं हसले. भीम त्यांच्या बाळपणातला वर्गमित्र होता, आणि एका छोट्याशा 'डेप्युटी असिस्टंट सिटी पोस्टमास्टर'चा मुलगा होता, आणि तो त्याच नावानं स्वतःचा परिचय करून द्यायचा. म्हणून सगळे मित्र त्याची चेष्टा करत असत.

"इथंच राहतो तो काफीर, पण दोन वर्षांत कधी दिसलाच नाही," शहानवाझ म्हणाला, आणि मग तो टाळी वाजवून हसला. "मी दुरूनच त्याला ओळखलं, मी जोरात ओरडलो, 'ओ डेप्युटी असिस्टंट पोस्टमास्टर साहेब!' कंबख्त! उभा राहिला. पण भेटला मात्र फार प्रेमानं."

वहिनीनं चहा आणला होता तो टेबलावर ठेवत ती म्हणाली, "मला तुमच्याशी एक कामय, खानजी!"

वहिनीच्या येण्यानं दोघांनाही बरं वाटलं. दंग्याबद्दल बोलत असताना दोघांनाही अवघडल्यासारखं झालं होतं, आणि भेटलो आहोत तरी या भयानक स्थितीबद्दल काहीही बोलत नाहीत हेही विचित्र आहे असंही वाटत होतं. बालपणातले विनोद आणि हास्यविनोदही पार्श्वभूमीवर काहीसे निरर्थक वाटू लागले होते.

"सांग ना, वहिनी!"

"त्रासाचं वाटत नाहीय तरीही?"

"सांग तर खरं!"

"माझ्या आणि माझ्या थोरल्या जावेच्या दागिन्यांचा एक डबा तिकडं घरात राहिलाय, तो काढून आणायचाय. आलो तेव्हा थोडंसंच सामान घेऊन आलो. मी काही आणलं नाही सोबत."

"ह्यात काय अवघडय वहिनी, छोटसंच कामय. कुठं ठेवले आहेत?"

"अर्धवट छताच्या खोलीत."

शहानवाझला त्यांच्या घरातला कोपरान कोपरा परिचित होता. दोस्तांमधला एवढाच एक दोस्त त्यांच्या घराच्या आत येऊ शकत असे.

"पण तिला तर कुलूप लावलेलं असेल? एवढं मोठं कुलूप."

"मी किल्ल्या देते. कुठं आहे ती जागाही समजावून सांगते."

"बिलकूल घेऊन येतो. अगदी आजच घेऊन येतो."

"मिलखी तिथंच असेल. तो कुलूप-बिलूप काढून देईल."

"मिलखी तिथंच आहे. मी सकाळीच तिकडं चक्कर टाकून आलोय. त्याला काळजी घ्यायला न् सावधान राहायला सांगत असतो."

"जेवायचं काय करतो?"

"सगळं घर तर त्याच्या हवाली आहे. तिथंच स्वयंपाकघरात जेवण तयार करत असेल न् काय!" रघुनाथ म्हणाला.

"सामान तर एवढंय की सहा महिने खाल्लं तरी संपायचं नाही," रघुनाथची बायको म्हणाली. मग शहानवाझकडे बघून म्हणाली,

"मग आणू का किल्ल्या?"

शहानवाझ पुन्हा भावनावश झाला, पुन्हा त्याला अभिमान वाटला. हजारो रुपयांच्या दागिन्यांच्या किल्ल्या वहिनी माझ्या हातात देतेय, मला आपलं मानतेय, म्हणजे काय!

वहिनी किल्ल्यांचा खणखण आवाज करत आली.

"आणि मी जर तुमचे दागिने खाऊन टाकले तर, वहिनी?"

"तुमच्यापेक्षा काय दागिने मोठे आहेत, खानजी? तुम्ही ते फेकून आलात तरी मी 'हूं की चूं 'करणार नाही. मी म्हणेन तुमची बला गेली."

आणि मग किल्ल्यांच्या जुडग्यातली एकेक किल्ली दाखवू लागली आणि समजावून सांगू लागली.

थोड्या वेळानं शहानवाझ जाण्यासाठी म्हणून उठला. दोघेही दोस्त बाहेर आले आणि गुपचूप चालत चालत मोटारीपर्यंत आले.

"कोणत्या तोंडानं तुझे धन्यवाद व्यक्त करू, शहानवाझ, तू माझ्यावर फार मोठे उपकार केले आहेस!" रघुनाथच्या हृदयातून जणू आपोआपच कृतज्ञतेचे शब्द बाहेर आले होते.

"ए गप रे सावकारा!" शहानवाझ म्हणाला. "जा फूट, घरात जाऊन बस, संडासला जा!" तो म्हणाला, आणि मोटारचं दार उघडून आत जाऊन बसला.

रघुनाथ थबकून तिथंच उभा राहिला.

"जा ना, जा, इथं माझं डोकं का खातोस?"

रघुनाथ तरीही उभाच होता. त्यानं हात मिळवण्यासाठी हात पुढे केला.

"जा ना, जा बे, माझा हात खराब करू नकोस. जा जा, एखाद्या ओळखीच्या माणसाशी बोलत बस. जा. उभ्या उभ्या डोकं का खातोस माझं? फार पाहिलेत तुझ्यासारखे!"

आणि शहानवाझनं मोटर सुरू करून तो पुढे निघून गेला.

दुपार ढळलेली होती आणि दागिन्यांचा डबा घेण्यासाठी शहानवाझ रघुनाथच्या पिढीजात घरी गेला.

मिलखीनं उशिराच दार उघडलं, "कोणय हो?"

"दरवाजा उघड, मी शहानवाझ."

"कोणय?"

"उघड उघड, मी शहानवाझय."

"होय, होय, आतून कुलूप लावलंय हो, आत्ता किल्ली आणतो हो, किल्ली शेकोटीच्या वर ठेवलीय."

रस्त्याच्या पलीकडे फिरोझ खालवाल्याचं गोदाम होतं. फिरोझ आपल्या गोदामाच्या चौथऱ्यावर उभं राहून कातड्याच्या दोन गाठी नीट लावून ठेवत होता. शहानवाझनं त्याच्याकडे पाहिलं तर तो पुतळ्यासारखा स्तब्ध उभा राहून शहानवाझकडे एकटक बघत होता. शहानवाझनं तोंड वळवलं, पण अजूनही

फिरोज त्याच्याकडे तिरस्कारानं बघत आहे असं त्याला वाटलं.

'आजही हिंदुंच्या घराचा दरवाजा ठोठावतोस!' जणू तो मनातल्या मनात म्हणत होता.

बाजूनं एक टांगा गेला. शहानवाझनं वळून पाहिलं. चौधरी मौलादाद आपला वेगळाच वेश घालून-खाकी गणवेश आणि गळ्यात हिरव्या रंगाचा रेशमी रुमाल - उघड्या टपाच्या टांग्यात बसून मुसलमानी भागात गस्त घालत होता. शहानवाझला बघून तो हसला, आणि नेहमीपेक्षा जास्तच हात उंचावून 'सलाम आलेकुम!' म्हणाला.

शहानवाझला लाज वाटली. नोकर दरवाजा उघडायला वेळ लावत होता, तर नोकराचा रागही आला.

आतून कुलूप उघडल्याचा आवाज आला, मग मिलखीनं थोडासा दरवाजा उघडला आणि शहानवाझला पाहताच दात विचकले. शहानवाझनं पायानं ठोकर मारून दरवाजा उघडला आणि तो आत गेला.

"बंद करून घे दार."

"होय, खानजी."

घराचा अंधारानं भरलेला व्हरांडा ओलांडताना त्याला स्निग्धतेचा भास झाला. ह्या अंधाऱ्या व्हरांड्यात पूर्वी तो अनेकदा आला होता. घरातला सुपरिचित वास त्याला चांगला वाटला. कित्येक वर्षांपूर्वी जेव्हा तो रघुनाथसोबत व्हरांडा ओलांडून आत यायचा तेव्हा रघुनाथची लहान मुलगी तोंडात बोट घालून खूप वेळ त्याच्याकडे बघत बसायची, मग दोन्ही हात उंचावून कडेवर घे असं त्याला सूचित करायची. प्रत्येक वेळी तो आला की ती पळत पळत व्हरांड्याच्या एका टोकाशी येऊन उभी राहायची आणि दोन्ही हात उंचावून हसत राहायची. ह्याच व्हरांड्यातून जाताना घरातल्या तरुण बायका दाराआडून आतल्या आत पळून जायच्या. जेव्हा पहिल्या-पहिल्यांदा त्यानं रघुनाथच्या घरी यायला सुरुवात केली होती तेव्हाची ती गोष्ट होती. त्या बायकांपैकी कुणाचीही नजर शहानवाझवर पडली असती तर ती पळून न जाता तिथंच थांबली असती.

"अरेच्या, आपण आहात! मला वाटलं कोणय की."

शहानवाझचं हृदय भरून आलं. या घरात रघुनाथसोबत आणि त्याच्या कुटुंबासोबत त्यानं किती तरी प्रसन्न संध्याकाळी घालवलेल्या होत्या. तिथं येताच रघुनाथच्या लहान भावाची बायको त्याच्यासाठी ऑम्लेट करायला आत निघून जायची. शहानवाझला ऑम्लेट फार आवडतं हे घरच्या सगळ्या लोकांना माहीत होतं. मग हळूहळू घरातले सगळे लोक अंगणात येऊन बसायचे.

"खानजी, घरातले सगळे लोक मजेत आहेत ना हो?" मिलखीनं हात जोडून विचारलं.

त्याच वेळी शहानवाझचं लक्ष मिलखीकडे गेलं. मिलखी हात जोडून केविलवाणा होऊन त्यांच्यासमोर उभा होता. मिलखीचे घाणेरडे डोळे, बोलण्याची आर्जवी तऱ्हा आणि पिचलेलं शरीर त्याला कधीही आवडलं नव्हतं. यावेळीही मिलखीचे डोळे अजागळासारखे, घाणेरडे होते. कधीकधी घरातले सगळे मिळून त्याची चेष्टा करीत तेव्हा तो लाजून आपला चेहरा सदऱ्याच्या बाहीनं झाकून घ्यायचा, अगदी बायकांसारखा, तेव्हा सगळे मोठमोठ्यानं हसायचे. तेव्हा तो शहानवाझाला वाईट वाटायचा नाही, पण बहुतेक वेळा शहानवाझला तो चिकट पालीसारखा वाटायचा. हा मिलखी कुठून आला होता कुणास ठाऊक, न पंजाबी होता, न गढवाली. आपल्या घासलेल्या बारीक बारीक दातांच्या मधून कुठल्यातरी खिचडी भाषेतले शब्द चावून चावून बाहेर काढायचा.

अंगणाच्या ऐन मध्यभागी मिलखीनं तीन विटा मांडून आपली चूल तयार केली होती. राख अंगणभर इतस्ततः विखुरलेली होती, पण त्याहीपेक्षा जास्त विडीची थोटकं विखुरलेली होती.

"तुझं अन्न तू स्वयंपाकघरात का शिजवत नाहीस?" शहानवाझनं विचारलं.

मिलखी डोकं वाकडं करून हसला.

"एकटाच आहे साहेब, इथंच वरण शिजवून खातो."

"घरात सामान पुरेसं आहे ना? कशाची जरूरी आहे का?"

"खूप आहे हो खानजी, शेजारचा नानवाला आहे ना, तोही रोज विचारपूस करीत असतो. आपण त्याला सांगून गेला होता ना!"

"कोणता नानवाला?"

"साहेब, जो नाल्यावर बसत असतो. तो माझ्यासाठी बिड्यांचं बंडलही फेकून जातो. फारच चांगला माणूसय हो," मिलखी खो-खो करून हसला.

अंगणाच्या आतून ऐन स्वयंपाकघराच्या बाजूनंच वर जायला पायऱ्या होत्या. शहानवाझनं पायऱ्यांवर पाय ठेवून अंगणात पाहिलं. मोठ्या खोलीचा अंगणात उघडणारा दरवाजा बंदच होता. त्या खोलीतली एक-एक गोष्ट त्याला माहीत होती; शेकोटीवरच्या प्लॅटफॉर्मवर रघुनाथच्या आईचं चित्र ठेवलेलं होतं, खोलीत दोन खाटा आणि एक उंच पलंग ठेवलेला होता. दार बंद पाहून त्याला फार उदास वाटलं. बंद दाराच्या बाहेर उंबरठ्याजवळ मिलखीची चिलीम पडलेली होती, त्याच्याजवळ कळकट-मळकट कापडाची एक चिंधी पडलेली होती.

"तू इथं बसून काय करतोस? फरशी पण झाडत नाहीस?"

"आता काय झाडायचं, साहेब, आता तर सगळे निघून गेलेत! मिलखी दात विचकत म्हणाला. तो बोलत असताना जणू घुमटातूनच आवाज येतोय असं शहानवाझला वाटलं, आणि जेव्हा बोलणं संपलेलं होतं तेव्हा सगळीकडे विलक्षण शांतता पसरलेली होती.

"सामानसुमानाची खोली मधल्या छतावर आहे ना?"

"होय साहेब, इकडं पायऱ्यांसमोर. जिथं मोठे ट्रंक ठेवलेत तिथं."

आणि मिलखी शहानवाझच्या मागंमागं पायऱ्या चढू लागला.

किल्ल्यांच्या जुडग्यात काही नाही तर पंधरा तरी किल्ल्या होत्या. काही बारीक-बारीक पितळेच्या किल्ल्या होत्या. वहिनीनं पहिल्यांदा मोठ्या कुलपाची किल्ली वेगळी करून दाखवली होती. "ही किल्ली आहे, खानजी विसरू नका!"

पण शहानवाझला मात्र ती.किल्ली शोधणं कठीण चाललं होतं, "या मोठ्या कुलपाची किल्ली कोणतीय, काही माहीतय का तुला?"

"होय साहेब, मी दाखवतो साहेब."

आणि मिलखी एखादा मुनीमच वहीखात्यावर वाकून आकडे पाहू लागलाय अशा तऱ्हेनं किल्ल्यांच्या जुडग्याकडे पाहू लागला. कमी-अधिक करून मिलखी शहानवाझच्या हाताच्या कोपराहून थोडा जास्तच उंचीचा होता. शहानवाझला मिलखीच्या पगडीतून बाहेर आलेली त्याची शेंडी दिसली. डाव्या कानाच्या अगदी वर ती एखाद्या गोमेसारखी दिसत होती. शहानवाझला हुडहुडी भरून आल्यासारखं झालं.

मिलखीनं कुलूप उघडलं. त्या लहानशा खोलीच्या आत कोंडमारा झाल्यासारखं वाटत होतं. अणि अंधारही होता. मिलखीनं पुढं जाऊन त्या खोलीतली एक खिडकी उघडली. ती घराच्या मागच्या बाजूला उघडायची आणि तिथून मशिदीतलं सगळंच्या सगळं अंगण दिसायचं. खिडकी उघडल्यामुळे खोलीतल्या सगळ्या गोष्टी स्पष्टपणे दिसू लागल्या होत्या.

खोलीत श्वास गुदमरून जायचा, पण त्याहीपेक्षा जास्त बायकांच्या कपड्यांचा सुगंध भरलेला होता. तीन भावांच्या बायका, घर सोडण्याआधी असतील ते, सापडतील ते कपडे गुंडाळून बाकी सगळे ट्रंकांवर फेकून निघून गेल्या असाव्यात असं जाणवत होतं. ती खोली ट्रंकांनी आणि संदुकांनी गच्च भरलेली होती.

ट्रंकांच्यामधून वाट काढत तो ज्या कपाटात दागिन्यांचा डबा ठेवलेला होता तिथपर्यंत गेला.

तेवढ्यात त्याची दृष्टी उघड्या खिडकीतून दिसणाऱ्या मशिदीच्या अंगणात गेली. तिथं नमाजापूर्वी हात-पाय धुण्यासाठी बांधलेल्या हौदाजवळ बरेचसे लोक

बसलेले होते. त्यांच्या मधोमध कुणाचं तरी शव ठेवल्यासारखं वाटत होतं. त्याच्या डोळ्यासमोरून तो मोटारीतून रघुनाथच्या घराकडे जाताना दिसलेल्या प्रेतयात्रेचं दृश्यही उमटून गेलं. खूप वेळपर्यंत शहानवाझ खिडकीत उभा राहून मशिदीकडे एकटक बघत होता.

डबा शोधून काढण्यास काहीही वेळ लागला नाही. निळ्या मखमलीनं झाकलेला तो डबा म्हणजे वस्तुतः कुण्यातरी बाईची शृंगारपेटी होती. त्यानं तो डबा अगदी काळजीपूर्वक बाहेर काढला. आणि मग कपाटाला कुलूप लावलं.

बाहेर आल्यावर दोघंही पायऱ्या उतरू लागले. मिलखीच्या हातात किल्ल्यांचा जुडगा होता आणि तो पुढे-पुढे चालत पायऱ्या उतरत होता. दोन्ही हातात डबा धरून शहानवाझ मागे-मागे येत होता. अचानक त्याचं मन पेटून उठलं. असं का झालं कुणास ठाऊक? मिलखीच्या शेंडीकडे दृष्टी गेल्यामुळे, मशिदीच्या अंगणातील गर्दी पाहून, किंवा मग गेल्या तीन दिवसांपासून तो जे काही ऐकत-पाहत आला होता त्यामुळे ते जे काही होतं ते त्याच्या मनात विषासारखं भिनत चाललं होतं. शहानवाझनं अचानक पुढं येऊन मिलखीच्या पाठीत जोरानं लाथ मारली. मिलखी कोलमडून पडला आणि पायऱ्यांच्या वळणावर सरळ भिंतीवर जाऊन आदळला. मिलखी जेव्हा खाली कोसळला तेव्हा त्याचं कपाळ फुटलं होतं आणि पाठ तुटली होती, कारण तो जिथं पडला तिथून त्याला उठता येत नव्हतं. शहानवाझ त्याच्या जवळून पुढे आला तेव्हा त्याचं डोकं खाली लोंबत होतं आणि तंगड्या पायऱ्यांवरच लटकत होत्या. शहानवाझचा राग वाढतच चालला होता आणि त्याचं कारण त्याला स्वतःलाही कळत नव्हतं. जवळून जाताना त्याच्या मनात आलं, पाय उचलून मिलखीचं तोंड ठेचावं, किड्यासारखं रगडून टाकावं, पण पायऱ्यांच्या वळणावर त्याला आपलं संतुलन ढळत जाण्याची भीती वाटली होती.

खाली अंगणात पोहोचल्यावर त्यानं एकदा मिलखीकडे पाहिलं. मिलखीनं डोळे उघडले आणि ते शहानवाझच्या चेहऱ्याकडे रोखलेले होते. त्याच्या कुठल्या चुकीमुळे खानजीनं त्याला मारलं होतं हे त्याच्या लक्षात येत नव्हतं. खाली कोसळताना मिलखीच्या तोंडातून एक क्षीण अस्फुट शब्द बाहेर आला होता, पण मिलखी आता गप्प होता. एकतर भयभीत होऊनच त्यानं प्राण सोडला होता किंवा मग तो बेहोष तरी होता किंवा मग त्याच्या मानेचं हाड मोडलं होतं.

शहानवाझनं त्याला तिथंच पडू दिलं, दागिन्यांचा डबा बगलेत धरला, तो बाहेर आला आणि मिलखी जे कुलूप आतून लावायचा ते त्यानं बाहेरून लावून दार बंद केलं.

त्याच रात्री वहिनीच्या हातात दागिन्यांचा डबा देताना शहानवाझ विचलित झाला नाही. डबा घेताना वहिनींचे डोळे डबडबले होते. वहिनीचा रोम-रोम कृतज्ञतेने भरलेला होता. रघुनाथ मनातल्या मनात त्याच्या चारित्र्याची, त्याच्या उच्चतम विचारांची स्तुती करत होता. त्यामुळेच सगळ्या बाजूंनी आगीचे डोंब उसळले असतानाही या अशावेळी एक मुसलमान मित्र त्याच्याशी इतकी निष्ठा ठेवून होता.

"पण एक वाईट बातमीसुद्धा आणलीय् वहिनी."

"काय ? चोरी झाली का काय?"

"मिलखी वाईट तऱ्हेनं पायऱ्यांवरून पडला आणि कदाचित त्याचं हाड-बीड तुटलं असावं. आधी वाटलं एखाद्या डॉक्टरला वगैरे न्यावं, पण या वेळी डॉक्टर मिळणार तरी कुठं? उद्या त्याची काहीतरी व्यवस्था करीन."

"बिचारा!"

"म्हणत असाल तर त्याला इथं आणून टाकतो. तिथं एकट्याच कुठं पडून राहील? मी माझा एखादा माणूस रखवालीसाठी तिथं ठेवून देईन."

पण या सूचनेमुळे वहिनी आणि रघुनाथ दोघांनाही अवघडल्यासारखं झालं. ते या भागात अजून नवखेच होते. त्यांच्यानं आजाऱ्याची देखभाल करणं कसं काय जमणार? जिथं शहानवाझला डॉक्टर शोधणं कठीण झालेलं आहे तिथं त्यांना हे जमणं कसं शक्यय.

"मी करीन व्यवस्था," शहानवाझनं डोकं हलवून सांगितलं, "काही ना काही व्यवस्था होईलच, इतकं काही अवघड नाही!"

वहिनीला या वाक्यामुळेही कृतज्ञता वाटली, आणि त्याचं उंच भव्य कपाळ व तेजःपुंज चेहरा पाहून ती एखाद्या पुण्यात्म्याचंच दर्शन घेऊ लागलीय असं तिला वाटत होतं.

11

देवदत्त आंघोळ करून, हात चोळतचोळत आपल्या घरासमोर येऊन उभा राहिला. जेव्हा जेव्हा तो हात चोळत असतो किंवा डाव्या हातानं नाक आणि तोंड कुरवाळत असतो आणि मग पुन्हा हात चोळत असतो, तेव्हा तो आपल्या कामाची यादी तयार करत आहे असं समजायला हरकत नाही. देवदत्तच्या डोक्यातच डायरी

होती. तो हात चोळत, नाक खाजवत आपल्या डोक्यातल्या डायरीत एकेक काम टिपत होता. 'रत्तावाल्या सहकाऱ्याकडून रिपोर्ट येऊ शकणार नाही, रत्त्यात गडबड चालू आहे. कुणी तरी एक सहकारी तिथं धाडायला हवा.'

'शहरातली दंगल थांबवण्यासाठी पुन्हा एकदा काँग्रेस आणि मुस्लिम लीगच्या नेत्यांना एकत्र आणायला हवं. हयातबख्श आणि बक्षीला एकत्र बसवायला हवं.' कालही देवदत्त अशा अनेक लोकांच्या घरी आळीपाळीनं गेला होता. राजारामनं त्याला पाहताच दार बंद करून घेतलं होतं. रामनाथ चिडून बोलला होता. कम्युनिस्टांना वाईट-वाईट बोलत राहिला तरी हयातबख्श भेटायला तयार झाला होता. हयातबख्शाचे डोळे लालबुंद होऊ लागले होते. तो घोषणा देऊ लागला होता: 'लेके रहेंगे पाकिस्तान!' 'बनके रहेगा पाकिस्तान!' त्यानं देवदत्तला बोलण्यासाठी संधीच दिली नाही. 'आज त्यांच्याकडे पुन्हा जायला पाहिजे.' देवदत्तनं पुन्हा हात चोळले, नाक कुरवाळलं. बक्षीजींना हयातबख्शाकडे पाठवायचं. अटलला सोबत घेऊन बक्षीजींकडे जायचं आणि अमिनला घेऊन हयातबख्शाकडे जायचं. मग पुन्हा ही व्यवस्था रद्द करण्यात आली. नेत्यांना जाऊ द्या, दहा-दहा लोक मुस्लिम लीगचे, काँग्रेसचे आणि सिंह सभेचे घ्यायचे आणि सगळ्यांना एकत्र बसवायचं. त्यानं डोकं हलवलं. पार्टी ऑफिसात जाऊन सहकाऱ्यांसोबत हे अंमलात आणायची व्यवस्था करायची गरज आहे. आणखी एक विचार मनात आला: मजुरांच्या वस्तीत गडबड थांबवण्यासाठी एकेक कार्यकर्ता पुरेसा नाही. रत्ता मुसलमानांचा भाग आहे. तिथं साथी जगदीशला पाठवलेलं आहे, पण जगदीश एकटा काही पुरेसा नाही; गावागावात तात्काळ दोनतीन, दोनतीन कार्यकर्ते पाठवायला पाहिजेत. एका गावाहून दुसऱ्या गावाला संदेश पाठवू शकतील, दौरा करू शकतील असे कार्यकर्ते. कार्यकर्ते कमी आहेत, पण जितकं शक्य आहे तितकं दंगल थांबवण्याचं काम करायलाच हवं. त्यानं पुन्हा नाकावरून हात फिरवला, पुन्हा मनगटावरच्या घड्याळात किती वाजलेत ते पाहिलं. कम्यूनमध्ये दहा वाजता मीटिंग आहे. तिथं सगळे साथी आपापल्या भागातला रिपोर्ट देणार आहेत. आता निघावं. देवदत्त गुपचूप आत गेला आणि आवाज न होऊ देता व्हरांड्यातली सायकल काढू लागला.

"कोणय? देवदत्त?"

देवदत्त सायकल तिथंच सोडून खोलीत घुसला.

"पुन्हा चाललास का बाहेर?" खाटेवर बसलेला पन्नाशीतला स्थूल देहाचा बाप ओरडला, "मरायचं असलं तर आधी आपल्या घरातली माणसं मारून जा. शहरात काय धुमाकूळ चाललाय तो दिसत नाही का?"

देवदत्त गुपचूप उंबऱ्यावर उभा राहून हात चोळू लागला आणि नाक गोंजारू लागला. आई ओढणीला हात पुसत-पुसत स्वैंपाकघरातून तिथं आली, "आम्हाला तळमळत ठेवून तुला काय मिळतं रे? माहीत नाही का, आम्ही रात्र कशी काढली ते! तिकडं आग लागलेली होती, आणि रात्रभर तू तिकडंच गडप झालेला."

देवदत्त हात चोळत म्हणाला, "मागे मरी रोडपर्यंत आणि पुढून कंपनी बागेपर्यंत सगळा भाग हिंदुंचा आहे. चारी बाजूला खाते-पिते हिंदू लोकच राहतात. तुम्हाला काही धोका नाहीये."

"आम्हाला धोका नाही याचं तुला काय अंतर्ज्ञान झालंय?" बाप गुरकावत म्हणाला.

"या लाइनीत दहा घरांत तरी बंदुकी आहेत, याच मोहल्ल्यातल्या युवक-सभावाल्यांनी तिघांची कत्तल केलेली आहे..."

"अरे उल्लूच्या पठ्ठ्या, आमच्याबद्दल आम्ही कुठं विचार करतोय? आम्ही तर तुझ्याबद्दल बोलतोय!"

"असं काही धोकादायक नाहीय." आणि देवदत्त पुन्हा व्हरांड्यात जाऊन सायकल काढू लागला.

आईनं ओढणी गळ्याभोवती टाकली आणि त्याचा रस्ता अडवू लागली.

"अरे, सगळी रात्र मी तळमळत काढली. कळत नाही कसली वेळ आलीय्?" समस्या अधिकच गंभीर होऊ लागली होती. देवदत्तनं पुन्हा नाक गोंजारलं, हात चोळले आणि आईजवळ जाऊन तिच्या कानात सांगितलं, "मी लवकर परत येईन, तू काही काळजी करू नकोस!"

"मला फसवतोस काय? कालही सांगितलं होतंस की लवकर परत येईन. माझ्या गळ्याची शप्पथ घेऊन सांग, संध्याकाळच्या आत परत येईन म्हणून!"

"येईन, येईन, येईन, मी शपथ घेत नाही." आणि तो सायकल घेऊन पुढं निघाला.

"हा हराम काही ऐकणार नाही! कशाला डोक्याला ताप करून घेतेस? हा आपला अपमानच करणारय. डुक्कर सालं, आई-बापाची काळजी नाही न् चालला दंगल थांबवायला, हरामी..."

सायकल घेऊन देवदत्त बाहेर आलाही होता.

आतून जोरजोरात ओरडणं चालूच होतं.

"सगळे शिव्या हासडत असतात, न काम, न धाम. दोन-दोन पैशावाले मजूर आणि हमाल जमवून फिरत राहतो, त्यांच्यासमोर भाषणं ठोकत बसतो, हर्रामजादा, अजून थोबाडावर दाढीसुद्धा उगवली नाही न् लीडर झालाय. डुकराची

अवलादय..."

देवदत्त चौकीपर्यंत पोहोचलाही होता.

परिस्थिती पहिल्यापेक्षा जास्तच उग्र झाली होती. रस्तेच्या रस्ते निर्मनुष्य झाले होते. एकही दुकान उघडे नव्हते की एकही टांगा न् मोटार रस्त्यावर दिसत नव्हती. एखाद्या दुकानाचं दार उघडं दिसत असलं तर ते लुटण्यात आलं आहे असंच समजायचं. कुठं लोक काठ्या घेऊन उभे असले की नक्कीच त्यांच्या जातीचाच तो मोहल्ला आहे असं समजायचं आणि जिथं ते उभे आहेत तिथून दुसऱ्या जातीजमातीचा मोहल्ला सुरू होतोय हेही नक्कीच होतं. पण सगळेच मोहल्ले असे आपापसात वाटलेले नव्हते. रस्त्याच्या कडेकडेनं दोनमजली पक्की घरं हिंदूंची, मागच्या गल्लीतली कच्ची घरं मुसलमानांची, किंवा देवदत्तच्या भाषेत सांगायचं तर रस्त्यावर उघडणारी घरं मध्यमवर्गीयांची आणि गल्लीबोळात उघडणारी घरं निम्नमध्यमवर्गीयांची होती.

"देवदत्त!" चौकाच्या डाव्या बाजूनं कुणीतरी हाक मारली. सायकलवर बसल्या बसल्या जमिनीवर पाय ठेवून देवदत्त थांबला.

"पुढं जाऊ नकोस. एक माणूस मरून पडलाय."

हातात काठी घेऊन एक बुटका माणूस रस्त्यावर आला.

"कुठं?"

"चौकाच्या पलीकडं, उतारावर."

"कोणय?"

"मुसलमानय, अजून कोण असणार? तू या वेळी कुठं निघालास?"

"मी माझ्या कामासाठी पार्टी-ऑफीसमध्ये चाललोय!"

"एक हिंदू तिकडं कबरस्तानात मरून पडलाय," म्हणत असताना त्या बुटक्या माणसानं देवदत्तला खिजवण्याच्या आविर्भावात पुढे म्हटलं, "तुम्ही फार मुसलमानांच्या हक्काबद्दल सांगत होता ना, आता आमच्या माणसाचं प्रेत द्या न् तुमचं घेऊन जा, असं त्यांना जाऊन सांगा."

उजव्या बाजूच्या गच्चीवरून आवाज आला, "जाऊ नका, ते लोक मारून टाकतील."

"हा मुसलमानांच्यात शिरलेला असतो, याला कुणी मारणार नाही."

"पण शेवटी आहे तर हिंदूच ना?' गच्चीवरून आवाज आला.

जे लोक पूर्वी लपून-छपून कामं करीत ते आता बेधडक बाहेर आले होते.

"त्यांना जाऊन सांग, आमचा एक मेला तर आम्ही त्यांचे तीन मारू."

तो माणूस कदाचित मेला नसावा, कारण त्याची छाती धडधडत होती.

उतारावरून त्याचं शरीर थोडंसं खाली घरंगळत आलं होतं. त्याची पूर्वी काळी-पांढरी असलेली दाढी, आता रक्तानं रंगलेली होती. खाकी कोटावर पैशाला आठ अशी सगळ्यात स्वस्त असलेली पत्र्याची बटणं होती. बुटाचे बंद उघडलेले होते. जणू पुढच्या मुक्कामाला जाण्यापूर्वी त्यानं स्वतःच सोडलेले असावेत. बहुधा तो काश्मिरी असावा असं वाटत होतं. देवदत्तनं वळून रस्त्यावर पाहिलं. रस्त्यावरच्या नाक्यावर एक टोळी उभी होती, आणि ती त्याच्याकडे रागारागाने बघत होती. दुसऱ्यांदा जेव्हा त्यानं त्या प्रेताकडे निरखून पाहिलं तेव्हा त्याच्या लक्षात आलं की तो काश्मिरी होता, फतेचंदाच्या वखारीत काम करत होता, आणि घरोघर कोळसे आणि लाकडं पोहोचवणारा होता.

देवदत्तनं नाक गोंजारलं आणि डोकं हलवलं. ही वेळ या माणसाला वाचवण्याची किंवा त्याचं प्रेत पोहोचवण्याची नव्हती. किंवा हिंदुचं प्रेत पाहून येण्याचीही नव्हती. ही वेळ पार्टी-ऑफिसात जाण्याची होती.

पार्टी-ऑफिसात झेंडेच झेंडे दिसत होते, पण एकूण तीनच माणसं बसलेली होती. कम्यूनमध्ये एकूण आठ लोक होते. या वेळी त्यातले पाच ड्युटीवर होते. पण एक वाईट बातमीही होती. एका मुसलमान कॉम्रेडचा विश्वास उडाला होता आणि तो कम्यून सोडून चालला होता. तो बोलत असताना त्याचे ओठ थरथर कापत होते आणि तो रागानं भडकून लालबुंद झाला होता.

"इंग्रजांचा खोडसाळपणा, इंग्रजांचा खोडसाळपणा, इथं इंग्रज कुठं आला? मशिदीसमोर डुक्कर मारून टाकतात, माझ्या डोळ्यासमोर तीन गरीब मुसलमानांना कापून-मारून टाकलं, फेकून द्या सगळं, ही सगळी व्यर्थ बडबडय."

देवदत्त गोंधळून कॉम्रेडला एवढंच सांगू शकला, "घाईगर्दीत कुठलंही काम करू नका, साथी. आम्ही मध्यवर्गातले लोक आहोत, आमच्यावर जुन्या संस्कारांचा फार मोठा पगडा आहे. कामगारवर्गातले असता तर हिंदू-मुसलमानांच्या प्रश्नानं तुम्ही व्यथित झाला नसता." पण साथीनं गाठोडं उचललं आणि तो कम्यून सोडून निघून गेला.

"या साथीचा सैद्धांतिक आधार कच्चा आहे. भावनेच्या पुरात वाहून जाऊन कुणी कम्युनिस्ट होत नसतं. त्यासाठी समाजाचा विकास नीट समजावून घेणं आवश्यक असतं."

मीटिंग सुरू झाली. पहिलाच मुद्दा 'शहरातील सद्यःपरिस्थिती' होता. ह्यातही मजुरांच्या वस्त्यांवर विचार करणं सर्वात महत्त्वाचं होतं.

"रस्त्यात गडबड झाल्याची बातमी खोटी आहे. कुठल्याही मजूर-कामगार वस्तीत अजूनपर्यंत गडबड झालेली नाही. हं, तणाव मात्र आहे. साथी जगदीश

मुसलमान-कामगारांच्या वस्तीत बसून आहे. लोक अजूनही त्याचं ऐकतात. शीख कामगारांची तिथं वीस घरं आहेत. एकही घटना तिथं अजूनपर्यंत झालेली नाही; पण साथी जगदीशनं, परिस्थिती बिघडू लागलेली आहे अशी माहिती दिली आहे. काल दोन कामगारांमध्ये शिवीगाळ झालीय. बाहेरून येणाऱ्या अफवांनी फार वाईट परिणाम होऊ लागला आहे."

कुर्बानअलीलाही रस्त्यात पाठवलं पाहिजे, म्हणजे साथी जगदीश एकटा पडणार नाही, असा निर्णय घेण्यात आला आणि देवदत्तानं तो निर्णय कागदावर लिहून घेतला.

मालक-लोक गावात गेलेले आहेत. काहीच बातमी नाहीय. लोकांचं जाणं-येणं बंद झालेलं आहे. फक्त गडद निळ्या रंगाची एक मोटार गावोगावी जाताना दिसते. कुणाची मोटार आहे, का फिरत आहे, काहीच माहीत नाही. काही लोकांचं ती शहानवाझची मोटार आहे असं म्हणणं आहे.

मीटिंग बराच वेळ चालू होती. तीन कॉम्रेड्स खूप वेळपर्यंत देवदत्तसोबत बसून विचार करीत होते. मीटिंग-बुकात एकेका आयटमवर पेन्सिलनं टीक करणं चालू होतं. शेवटचा आयटम समोर आला:

'सगळ्या पार्ट्यांच्या नेत्यांची मीटिंग बोलवणं!'

"ही मीटिंग होऊ शकणार नाही." एक साथी म्हणाला, "काँग्रेसच्या ऑफिसला कुलूप लावलेलं आहे. लीगवाल्यांशी बोलायला जावं तर ते पाकिस्तानचे नारे लावू लागतात. ते प्रत्येक गोष्टीत म्हणतात, काँग्रेस हिंदुंची पार्टी आहे हे आधी काँग्रेसवाल्यांनी मान्य करावं; मगच आम्ही त्यांच्यासोबत बसायला तयार आहोत. आणि या वेळी कुणीही आपल्या मोहल्ल्यातून बाहेर पडायलाच तयार नाहीय. मीटिंग कुणासोबत करायची?"

नाक फुगवून देवदत्तनं पुन्हा मत बदललं: "दहा-दहा पुढाऱ्यांचं काही जुळणारं नाहीये, मोजक्याच नेत्यांना कसंही करून एकत्र बसवायला हवं. त्यांच्यासोबतच इतर काही लोक येऊ शकतात."

"कुणी येणार नाही, कॉम्रेड," दुसऱ्या साथीनं सांगितलं, "आणि आले तरी तू-तू मी-मी होईल, काही निघायचं नाही त्यातून."

"कॉम्रेड, ते एकत्र बसण्यानंच लोकांवर चांगला परिणाम होऊ शकेल. मग आपण त्यांच्या नावानं शहरात शांतता प्रस्थापित करण्याचं आवाहन करू शकू. मोहल्ल्या-मोहल्ल्यांतून दवंडी फिरवता येईल. या वेळी काय आहे? या वेळी दंगल आणि उघड-उघड कापाकापी चाललेली नाहीय, पण जर एखाद-दुसरा माणूस सापडला तर त्याला कापून टाकलं जातं. पण त्यांची भेट घडवून आणणं फारच

आवश्यकय..."

आणखीही काही गोष्टींवर चर्चा झाली. मीटिंग कुठं बोलवण्यात यावी? हयातबख्शच्या घरी घ्यावी असा निर्णय झाला. "मी बक्षीजींना आणीन. मुसलमानांच्या मोहल्ल्यात पोहोचल्यानंतर साथी अजीज मोहल्ल्यातल्या दोन-तीन मुसलमान शहरवासियांना घेऊन येईल आणि मग आम्ही सगळे हयातबख्शच्या घरी जाऊन बसू."

"हयातबख्शशी बोलणं झालं का?"

"आत्ता जाऊन बोलतो."

"कॉम्रेड, तुम्ही कोणत्या जगात राहता? हयातबख्शच्या घरी तुम्ही कसे जाल? तिथपर्यंत तुम्हाला कोणी पोहोचू देईल का?"

"तुला माझ्यासोबत यावं लागेल." देवदत्त हसून अजीजला म्हणाला.

"कॉम्रेड, हे पाण्याचे थेंब आहेत. यानं आग विझणार नाही."

पण मीटिंगनंतर खरोखरच देवदत्त आणि अजीज गल्ली-बोळ ओलांडत, लपत-छपत, कुठं शिव्या खात, कुठं धमक्या ऐकून घेत हयातबख्शच्या घरी पोहोचले.

आणि खरोखरच, त्या दिवशी दुपारी हयातबख्शच्या घरी मीटिंग झाली. बक्षीजींना देवदत्तनं आणलं. देवदत्तनं दुसऱ्या एखाद्या काँग्रेसवाल्याला सांगितलं असतं तर तो आला नसता. देवदत्तला खात्री होती की बक्षीजी येतील. कारण सगळी मिळून सोळा वर्षं त्यांनी तुरुंगात काढली होती. त्यांचा मेंदू स्वच्छ आणि स्पष्ट नसेना का, राजकीय गुंतागुंती सोडवायला ते असमर्थ असतीलही, तरीही ते असा विध्वंस आणि रक्तपात इच्छिणारे नक्कीच नव्हते. ते गेल्या काही दिवसांपासून सर्वांशी चिडून बोलत होते. कारण ते गोंधळलेले होते. आतल्या आत अस्वस्थ होते. परिस्थिती त्यांच्या आटोक्यात नव्हती. देवदत्तसोबत येताना सगळा वेळ ते कम्युनिस्टांना शिव्या देत होते, तरीही ते आले. त्यांच्यासोबत दोन तरुण काँग्रेसवालेही आले आणि मीटिंग झाली. आणि तू-तू, मी-मी पण झालं. सुमारे अर्धा घंटा हयातबख्श एकाच गोष्टीवर अडून बसला होता. त्याचं म्हणणं, बक्षी हिंदुंचं नेतृत्व करायला आलेत आणि काँग्रेस हिंदूंची जमात आहे, हे बक्षींनी कबूल करावं. मग देवदत्त म्हणाला, "सद्गृहस्थहो, ही वेळ अशा वादात पडण्याची नाहीय. बाहेर लोक मरत आहेत, घरं जळत आहेत, ही आग गावागावांतही पसरणार आहे. या वेळी आमचं कर्तव्य काय आहे? आम्ही या नाजूक वेळेचं भान ठेवून ही आग थांबवण्याचा प्रयत्न करावा अशी मी नम्र विनंती करतो." मग देवदत्तनं शांतता राखण्यासंबंधीचं अपील वाचून दाखवलं. पुन्हा वादाला तोंड फुटलं. हे अपील काँग्रेस आणि लीगच्या वतीनं असू नये. हे हयातबख्श आणि बक्षीजींच्यातर्फे असावं. नाही

नाही, ह्यात इतरही काही नावांचा समावेश करावा...

मग लोक थकून गेले, आणि हयातबख्शच्या मुलानं अपिलावर सही करण्यानं काही फरक पडत नाही. शांतता राखण्याचं तर अपीलय, असं हयातबख्शच्या कानात सांगितलं; मग हयातबख्शनं सही केली. मग 'पाकिस्तान झिंदाबाद'चे नारे लागले आणि ही नारेबाजी चालू असताच, बक्षीजी जोडे घालत असतानाच, रस्त्यामध्ये कामगारांच्या वस्तीतही दंगा झाला आहे, आणि दोन शीख सुतारांना मारण्यात आलेलं आहे अशी बातमी आली.

आधी देवदत्तला ती बातमी खोटी आहे असं वाटलं. त्यानं तिच्यावर विश्वास ठेवण्यास नकार दिला. "तिथं तुम्ही स्वतः दंगा पाहिलात का? आपल्या डोळ्यांनी? बातमी कुणी आणली?" हे वाक्य तो शेवटपर्यंत उच्चारू शकला, पण त्याचं डोकं खाली झुकलं, आणि मजूर-कामगार आपापसात भांडू लागलेत म्हणजे हे विष फार खोलवर रुतलेले आहे, असं त्याला वाटलं. सध्यातरी या मीटिंगला पाण्यावरची रेघच समजायला पाहिजे.

आणि त्याच वेळी देवदत्तनं पार्टी-ऑफिसमधून सायकल घ्यायची आणि सरळ रस्त्याला जायचं, एकट्या साथी जगदीशला हे सांभाळणं कठिणय, असा मनातल्या मनात निर्णय घेतला. मी गेलो तर कदाचित परिस्थितीत फरक पडेल, कामगार आपापसात भांडणार नाहीत, असं त्याला वाटलं.

पण ज्या वेळी देवदत्त कसाबसा पार्टी ऑफिसात गेला त्या वेळी त्याचा बाप तिथं आधीच येऊन हातात छडी घेऊन बसलेला होता. आणि जेव्हा देवदत्तनं परिस्थितीचं साम्यवादी विश्लेषण केलं आणि दंगल आटोक्यात आणण्याचे प्रयत्न चालू आहेत असं सांगितलं आणि मग तो सायकल बाहेर काढू लागला तेव्हा त्याचा बाप पुन्हा संतापून उठला. "उल्लूच्या पठ्ठ्या, हर्राम्, कुणी मारून टाकलं तर मुडदा उचलायला सुद्धा कुणी मिळायचं नाही. पहात नाहीस का, गावात काय चाललंय्? हर्राम, तू एकटा दंगल थांबवायला जाणारैस?..." आणि बापानं गल्लीच्या बाहेर उघडणारं दार बंद केलं. त्याच्या मनात पोराला मारायची तीव्र इच्छा होती. त्यानं छडी उगारली सुद्धा, मग जोरजोरात रडू लागला, "आम्हाला का रडवतोस रे बाप्पा? आमचं एकुलतं एक पोरगं आहेस तू. काही समजून-उमजून काम कर रे. अक्कल वापर. बघ, तुझी आई किती परेशानय. तू म्हणत असलास, बाप्पा, तर ही पगडी तुझ्या पायांवर ठेवतो रे. घरी चल रे."

देवदत्तानं नाक गोंजारलं, हात चोळले, परिस्थिती फारच चिघळू लागलीय. कुणाला तरी मध्ये घालायला हवं. यांना घरी पोहोचून द्यावंच लागेल.

"मला रस्त्याला जायचंय," तो म्हणाला, "मी थांबू शकत नाही. पण तुम्हाला घरी पोहोचवायची मी व्यवस्था करतो. साथी रामनाथ तुमच्याबरोबर येईल."

त्याच दिवशी दुपारी आणखी एक जण मृत्युमुखी पडला. जरनेल मारला गेला. तो पहिल्यापासूनच सणकी होता. काखेत छडी घेऊन, लेफ्ट-राइट करीत तो दंगल रोखायला निघाला होता. त्याच्या मनात काही विचार येत असत की नाही हे कुणालाच माहीत नव्हतं. पण हृदयात सारखी वळवळ चालायची आणि पाय मात्र चालत राहायचे, आणि डोक्यात सणकी यायची. शहरात दंगल चाललीय ही काय चांगली गोष्टय, आणि सगळे काँग्रेसी गद्दार घरात लपून बसले आहेत.

तो निघाला, आणि जागोजागी रस्त्याच्या कडेला कधी या ओट्यावर तर कधी दुसऱ्या ओट्यावर उभा राहून भाषणं देऊ लागला:

"साहेबलोकांनो, मी आपल्याला सांगायला आलो आहे, की श्री. जवाहरलाल नेहरूजींनी रावीच्या किनाऱ्यावर संपूर्ण स्वातंत्र्याची शपथ घेतलेली होती आणि ते तिथं रावीच्या किनाऱ्यावर नाचले होते आणि मीही नाचलो होतो आणि आम्ही सगळ्यांनी शपथ घेतली होती. आज जे लोक घरात लपून बसले आहेत ते सगळे गद्दार आहेत, मी एकेकाला चांगला ओळखून आहे. मी विचारतो, की हे लोक घरात बसून काय करत आहेत? यांनी बुरखा घालून बसलं पाहिजे, यांनी आपल्या हातात बांगड्या घातल्या पाहिजेत. लोक हो, गांधीजींनी म्हटलं आहे, की हिंदू-मुसलमान भाऊ-भाऊ आहेत. त्यांनी आपापसात लढू नये. मी आपल्याला, मुलं-म्हातारे-तरुणांना आणि बायकांना अपील करतो की आपापसात लढणं बंद करा. त्यामुळे आपल्या देशाचं नुकसान होत आहे. देशातली संपत्ती इंग्लंडमध्ये जात आहे. इंग्रज हे गोरं माकड आहे आणि आमच्यावर राज्य करीत आहे..."

एका ओट्यावरून दुसऱ्या ओट्यावर. गल्लीबोळ आणि रस्ते ओलांडत-ओलांडत तो कमिटी मोहल्ल्यात गेला. दिवस ढळत चालला होता. तो भाषण देत होता. काही माथेफिरू तिथं येऊन उभे राहिले. जरनेलला, आपण कोणत्या मोहल्ल्यात आहोत, कुठं आहोत, काहीच माहीत नव्हतं.

"साहेबलोकहो, मी आपल्याला सांगतो की हिंदू-मुसलमान भाऊ-भाऊ आहेत, शहरात दंगा भडकलेला आहे, जाळपोळ होऊ लागलेली आहे आणि कुणीच ते थांबवत नाहीय. डेप्युटी कमिशनर आपल्या मेमला मिठीत घेऊन बसला आहे, आणि मी सांगतो, की आपला शत्रू इंग्रज आहे. गांधीजी म्हणतात की तोच आम्हाला भांडायला लावतो आहे आणि आपण भाऊ-भाऊ आहोत. आम्ही इंग्रजांच्या बोलण्यात स्वतःला अडकवून घेऊ नये. गांधीजींचा आदेश आहे, की

पाकिस्तान त्यांच्या मुडद्यावर बनेल. मीही म्हणतो की पाकिस्तान माझ्या मुडद्यावरच बनेल, आम्ही एक आहोत, आम्ही भाऊ-भाऊ आहोत, आम्ही मिळून-मिसळून एकत्रच राहू..."

"तुझ्या आऽयला-" अवतीभवती उभ्या असलेल्या एकानं म्हटलं आणि लाठीच्या एकाच जबरदस्त फटक्यानं जरनेलचं डोकं फोडलं. छडी एकीकडे पडली, काळसर-हिरव्या रंगाची, फाटलेली पगडी दुसरीकडे पडली आणि फाटक्या चपला कुठेतरी पडल्या. वाक्य पूर्ण न करताच जरनेल जिथं उभा होता तिथंच मरून पडला.

12

"एकानं गॅलरीत उभं राहून पहारा द्यावा," रणवीरनं मागं वळून सांगितलं. कोंबडी कापून दीक्षा घेतल्यामुळे त्यांच्यात भरपूर आत्मविश्वास निर्माण झाला होता. तो दलातला सर्वात चतुर, सर्वात चपळ, आणि जास्त कुशल असा सदस्य होता. त्याच्या आवाजात धारदारपणा आला होता.

लाठ्या, कुऱ्हाडी, सुरे, तीर-कमान आणि गुलेर-या हत्यारांशिवाय 'शस्त्रागार' अगदी ओकं-ओकं वाटत होतं. खोलीच्या बाहेर, पायऱ्यांपासून थोडंसं बाजूला चुलीवर तेलाची कढई ठेवलेली होती, पण लाकडं कमी पडल्यामुळे तेल उकळवण्याचा विचार कालच सोडून देण्यात आला होता.

"जी आज्ञा, सरकार!" म्हणून शंभू गॅलरीत गेला.

चारी योद्धयांची हृदयं तळमळत होती. रंगभूमीवर उतरण्याची आणि आपलं कसब दाखवण्याची वेळ आलेली होती. गॅलरीच्या मागं राहून मोठमोठ्या दगडांच्या मागं उभ्या असलेल्या राजपुतांना खाली हळदीघाटात येणाऱ्या म्लेंच्छांची वाट बघत असताना जसं वाटत असेल, तसंच त्यांना वाटत होतं, म्लेंच्छांवर तुटून पडण्याची वेळ आलेली होती.

रणवीरचा बांधा लहान होता म्हणून मनातल्या मनात तो स्वतःला शिवाजीच्या भूमिकेत असल्याचं समजत असे. छातीवर दोन्ही हात बांधून, डोळे तिरके करून तो रस्त्याची आणि रस्त्याच्या आसपास असणाऱ्या भागाची पाहणी करीत असे. कधीकधी त्याच्या मनात यायचं, कमरेला तलवार लटकवावी, रुंद कंबरपट्टा घालावा, अंगरखा असावा, डोईवर पिवळ्या रंगाची पगडी घालावी आणि त्यावर शिरस्त्राण असावं. सैल ढिली विजार घालून इतक्या मोठ्या संग्रामात भाग

घेणं त्याला अडचणीचं वाटत होतं. विजार आणि साधा सरळ सदरा आणि खाली फाटकी चप्पल काही वीर सैनिकाचा वेश असू शकत नाही. पण जो अधिकार त्याच्या पोषाखात नव्हता तो त्यानं आपल्या धारदार आवाजात आज्ञा देण्यानं पूर्ण केलेला होता. फौजेच्या कमांडरासारखा तो आज्ञा सोडायचा आणि दलातल्या सगळ्या सदस्यांना कडक शिस्तीत ठेवायचा. मागे हात बांधून, किंचित वाकून, खोल चिंतेत बुडालेला रणवीर 'शस्त्रागारा'च्या खालीवर येरझारा घालायचा. जणू औरंगजेबाशी लढाई करण्यापूर्वी अस्वस्थपणे येरझारा घालणारा शिवाजीच!

"सरदार !"

रणवीरनं मागं वळून पाहिलं. मनोहर उभा होता. इतका वेळ तो एकेका गुलेरीजवळ खड्यांचा ढीग जमवत होता.

"लाकडं कमी पडतील. तेल उकळू शकत नाही."

"कोळसे पण नाहीत का?"

"नाहीत, सरदार!"

रणवीर पाठीमागे हात बांधून बराच वेळ खोलीत येरझारा घालत राहिला. असंच रणनीती म्हणते. निर्णय अविलंब घेतला गेला पाहिजे. परिस्थिती ओळखणं, तिच्या मुळापर्यंत जाणं आणि तत्परतेनं निर्णय घेणं नेत्यासाठी अनिवार्य अशा अटी आहेत.

"तुझ्या घरून घेऊन ये. जे मिळेल ते, लाकूड किंवा कोळसा, आणि जितकं असेल तितकं घेऊन ये. वेळ लावू नकोस!"

मनोहर तिथंच थांबला.

"काय आहे?"

"पण आईनं आणू दिलं नाही तर?"

ह्यावर सरदार 'शस्त्रागार'च्या मध्यभागी उभा राहून मनोहरच्या चेहऱ्याकडे बघू लागला. मग एकदम कडाडला, "माझ्या तोंडाकडे काय बघत बसलास? जिथं कुठं असेल तिथून लाकडं घेऊन ये!"

"जशी आज्ञा, सरदार!" मनोहर म्हणाला आणि मागे सरकला.

"पण आता थांब. या वेळी जायची गरज नाही," आणि त्याच वेळी तेल उकळवण्याचा विचार सोडून देण्यात आला.

'शस्त्रागार' एक दोनमजली घराच्या वरच्या मजल्यावर करण्यात आलं होतं, आणि या वेळी ते रिकामंच होतं. खालच्या मजल्यावर शंभूचे म्हातारे आजा-आजी रहात असत. वरच्या मजल्याची गॅलरी रस्त्याच्या दिशेनं होती, आणि खाली रस्त्यावर एक सुंदर असं पिंपळाचं झाड होतं. त्या झाडामुळे गॅलरीचा बराचसा भाग

झाकलेला असायचा. घरात जायचा रस्ता पिंपळाच्या समोरून आत जाणाऱ्या एक गल्लीतून होता. ही गल्ली अगदी वाकडीतिकडी होती, अंधारानं भरलेली आणि अगदीच अरुंद होती. रस्त्यावरून येणारा माणूस या गल्लीत, म्हणजे खरं तर बोळातच, हरवून जायचा. रणवीरला ती समजावून सांगताना शंभूनं त्याला 'चक्रव्यूह' असं नाव दिलं होतं, आणि दलाच्या एकूण कारभारासाठी ती सगळ्यात जास्त उपयुक्त असल्याचं सांगितलं होतं. तो बोळ थोडासा पुढं जाऊन डाव्या हाताला वळला होता. वळणावरच एका पिराचं तुटलेलं थडगं होतं आणि थडग्यासमोरच एक मुसलमान रहायचा. त्याला दोन बायका होत्या. पुढं गेल्यावर एक नळ लागायचा आणि तो दुपारी बंदच असायचा. दुपारी चारपर्यंत तिकडे कुणीही फिरकायचं नाही. नळाच्या पुढं सगळी घरं हिंदूंची होती. फक्त गल्लीच्या शेवटी दोनतीन कच्ची घरं होती आणि त्यात मुसलमान रहायचे. एकात महमूद धोबी राहायचा, आणि दुसऱ्यात रहमान हमामवाला. याशिवाय अधूनमधून उजव्या-डाव्या बाजूला अनेक गल्ल्या फुटलेल्या होत्या. जरया गल्लीत म्लेंच्छांवर हल्ला केला तर तो नळाची जागा व गल्लीच्या तोंडाचा भाग या मधल्या भागात करणं शक्य होतं. जर धोका असला तर कुठल्याही हिंदुंच्या देवडीत घुसणं शक्य होतं.

"तू गल्लीत राहणाऱ्या म्लेंच्छांना ओळखतोस का?"

रणवीर शंभूला विचारत होता.

"होय, सरदार, मी त्यांना ओळखतो. महमूद धोबी आमच्या घरचे कपडे धूत असतो, आणि पिराच्या कबरीसमोर जे मियाँजी राहतात ते माझ्या आजोबांचे फार मित्र आहेत."

"तू या गल्लीत काम करायचं नाही." रणवीरनं निर्णायक स्वरात सांगितलं.

शंभू एकदम हताश झाला.

आज हे लोक आपल्या पहिल्या शिकारीवर हल्ला चढवणार होते. चौघेही उत्तेजित झालेले होते. आजपर्यंत केवळ तयारी चाललेली होती, पण आज त्यांना रणांगणावर आपलं तेज दाखवायची वेळ आलेली होती. 'आज जाउनी रणी धूम माजवी मुला!' धर्मदेवाच्या कानात वीररसानं ओतप्रोत अशा या ओळी सारख्या घुमत होत्या. मनोहर किंचित चिंतित होता. तो आपल्या आईला काही न सांगताच निघून आला होता आणि आता दुपारचे दोन वाजू लागले होते. मनोहरला भीती वाटत होती. स्वयंपाकघरातला ओटा साफसूफ करून झाल्यावर त्याची आई त्याला शोधायला बाहेर पडली आणि शोधत-शोधत इथं आली तर?

रणवीरनं इतर तीन योद्ध्यांना 'शस्त्रागारा'त एकत्र केलं आणि रणनीतीवर विचार करीत सांगितलं, "शत्रूवर उकळलेलं तेल ओतायची वेळ अजून आलेली नाही. उकळतं तेल त्याच वेळी टाकायचं असतं जेव्हा शत्रू आपल्या किल्ल्यावर हल्ला करू लागतो आणि आपण हत्यारांनी त्याचा मुकाबला करू शकत नाही त्याचवेळी शत्रूवर उकळतं तेल टाकायचं असतं." मग क्षणभर थांबून तो म्हणाला, "इथं फक्त सुऱ्याचा उपयोगय, वाकलेल्या सुऱ्याचा."

मग त्यानं इंद्राला संबोधून सांगितलं, "एक वेळ पुन्हा पवित्रा घेऊन दाखव. उचल त्या कट्ट्यावरचा सुरा!"

इंद्रानं झटकन तो सुरा उचलून आणला. खोलीच्या मधोमध दोन्ही पाय फाकून तो उभा राहिला. सुऱ्याची मूठ डाव्या हातात धरलेली होती आणि त्याचं पातं मागच्या बाजूला होतं. मग डावा पाय उचलून त्यानं उडी मारली आणि हवेत अर्धवर्तुळाकार झेप घेऊन दोन्ही पाय लांबवून रणवीरच्या पाठीकडे तोंड करून तो फरशीवर आला. याच वेळी त्यानं रणवीरच्या कमरेवर नेम धरून उलट्या हातानं सुऱ्याचा वार केल्याचा आविर्भाव केला.

रणवीरनं डोकं हलवलं, "शत्रूच्या छातीवर अथवा पाठीत कधीही वार करायचा नाही. वार नेहमी कमरेवर किंवा पोटात करायचा. वळणदार सुरा आत खुपसल्याबरोबर तो आतल्याआत थोडा वळवायचा, त्यामुळे आतडी बाहेर येईल. जर तुम्ही गर्दीत वार केलेला असेल तर सुरा उपसून काढायचा नाही, तो तसाच तिथं राहू द्यायचा आणि आपण गर्दीत हरवून जायचं."

रणवीरनं मास्टर देवव्रताच्या तोंडून जे काही ऐकलं होतं तेच तो थोडंसं बोलत होता.

थोड्या वेळानं दलाची दोन गटांत विभागणी करण्यात आली. पहिला हल्ला इंद्राच्या हातानं होईल म्हणून इंद्र, शंभू आणि सरदार 'शस्त्रागार' सोडून देवडीत आले, आणि मनोहर वरच राहिला. रस्त्याला लागून असलेल्या गॅलरीत उभा असलेला सैनिक रस्त्यावर लक्ष ठेवील आणि येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांवर, रणवीर, इंद्र आणि शंभू लक्ष ठेवतील असा निर्णय झाला होता. रणवीरच्या आदेशानुसार इंद्र देवडीतून बाहेर जाऊन शत्रूवर हल्ला करील. बोळीत उघडणाऱ्या दरवाजाला किंचित पुढं ढकलून थोडीशी फट केली की रस्त्याचा काही भाग आणि बोळीचा सुरुवातीचा भाग दिसत असे. पिंपळाच्या बुंध्यापलीकडं दिसणारा रस्त्याचा भाग दुपारच्या उन्हानं चमकू लागला होता.

बोळाच्या समोर एक टांगा येऊन थांबला. रणवीरनं जवळजवळ सगळाच दरवाजा ओढून घेतला आणि तो एका बारीक फटीतून बाहेर पाहू लागला.

"कोणय?" इंद्रानं कुजबुजत्या आवाजात विचारलं.

रणवीर गप्पच राहिला. इतर दोन्ही सैनिकांनीही पुढं सरकून फटीतून बाहेर

पाहायला सुरुवात केली.

–"जलालखान आहे. नवाबजादा जलालखान," शंभू म्हणाला, "हा रस्त्याच्या कडेलाच समोरच्या घरात राहतो. आमच्या मोहल्ल्यातला हा सगळ्यात श्रीमंत माणूस. डेप्युटी कमिशनरला भेटायला जात असतो." शंभूने हे सगळं एका दमात सांगितलं.

फटीतून क्षणभरच त्याचा पांढऱ्या केसांचा तुरा, वर वळवळलेल्या मिश्या, आणि लाल चमकता चेहरा दिसला. पण तो जसा समोर दिसला तसाच तो दिसेनासाही झाला. गल्लीतून जाताना त्याच्या सळसळणाऱ्या सदऱ्याचा व करकणाऱ्या जोड्यांचा आवाज ऐकू आला. काहीतरी निर्णय घ्यायच्या आतच तो आपल्या घरातही पोहोचलेला होता. तिघंही वीरसैनिक फसवले गेल्यासारखे झाले होते व स्तब्ध उभे होते. त्याला समोर जाताना पाहून तिघंही थोडे दचकले होते. विचार करायलाही त्यांना संधी मिळाली नव्हती.

गुरुजींनी सांगितलं होतं, आपल्या शत्रूकडे कधीही लक्षपूर्वक बघायचं नसतं, त्यामुळे आपल्या निश्चय डळमळीत व्हायला लागतो. कुठल्याही जीवाकडे लक्षपूर्वक पाहिलं की त्याच्याबद्दल सहानुभूती निर्माण होते. असं कधीही होऊ नये याची काळजी घेतली गेली पाहिजे.

मागच्या बोळीत कुठला तरी दरवाजा उघडला आणि मग खाडकन बंद झाला. तिघांही तरुणांचे कान उभे राहिले. रणवीरनं दोन्ही दारं किंचित उघडली. त्यामुळे बोळाच्या मध्यभागी फटीतून पाहता येऊ लागलं.

"कोणय?" इंद्रानं पुन्हा कुजबुजत विचारलं.

"म्लेंच्छ आहे," रणवीर म्हणाला.

दोन्ही मित्र फटीशी डोळा लवून बाहेर पाहत राहिले. एक दाढीवाला वयस्कर माणूस बोळातून चालत चालत मोठ्या रस्त्याकडे चालला होता.

"मियाँजी आहेत." पाहताच शंभू म्हणाला, "पिराच्या कबरीसमोरच्या घरात राहतात. नमाज पढायला जात असतील. रोज याच वेळी नमाजाला जात असतात."

"गप बस."

मियाँ गल्लीचं थोडंसं अंतर कापून पिंपळाच्या झाडाजवळ आला आणि तिथून डाव्या बाजूला वळला. त्यानं काळ्या रंगाचं जाकीट घातलं होतं, खाली सलवार आणि मोठी ढिल्ली चप्पल. त्याच्या डाव्या हाताला एक लहान माळ लटकत होती. म्हातारा झाल्यामुळे त्याची पाठ वाकलेली होती आणि तो हळू-हळू पावलं टाकीत चालला होता.

"जाऊ?" इंद्रानं पट्‌कन विचारलं.

"नको, आता तो मोठ्या रस्त्यावर जाऊन पोहोचलाय."

"तर काय झालं?"

"नाही. रस्त्यावर हल्ला करायची बंदी आहे."

शंभूला इंद्राच्या आवाजात उतावळेपणा जाणवला. शंभूचं मन मात्र एकदम शिथिल पडू लागलं होतं. इंद्रानं विचारलं तेव्हा शंभूला विचित्र धक्का बसला होता. सरदारनं मनाई केल्यामुळे त्याला आतून खोलवर सुटका झाल्याचा अनुभव आला.

काही वेळ पुन्हा ते दाराआड उभे राहिले. वेळ चाललेला होता. चार वाजता नळाला पाणी येईल आणि गल्लीतल्या बायका आपली मटकी घेऊन नळावर येतील. दुपार ढळताच एखाद दुसरं माणूसही गल्लीत दिसू लागेल.

यानंतर एकानंतर एक अशी दोन माणसं गल्लीत आली. एकाच्या हातात सायकल होती आणि डोळ्यांवर चष्मा.

"हा चुनीलाल कारकून आहे. हा एका ऑफिसात काम करतो. याच्याकडं एक कुत्रा आहे."

आणि दुसरा एक शीख सरदार गल्लीत आला होता, आणि त्याच्या खांद्यावर एक गाठोडं होतं.

दोघं एकानंतर एक आले आणि आपल्या जोड्यांच्या पटपट आवाजासोबत गल्ली ओलांडून पुढं निघून गेले.

त्याच वेळी त्यांना पुन्हा कुणाच्या तरी पावलांचा आवाज ऐकू आला. इंद्रानं फटीतून डोकावून पाहिलं आणि रणवीरच्या कोपराला स्पर्श केला.

इंद्र काहीच बोलला नाही, फक्त बाहेर बघत राहिला.

"कोणय?"

"कुणी तरी भेळवालाय," इंद्रानं कुजबुजत सांगितलं.

"नाही. अत्तर-सुगंधी तेलं विकणाराय. कुठं तरी लांब राहतो, रोज या वेळी इथून जात असतो. म्लेंच्छ आहे."

मेंदीनं रंगवलेल्या मिश्या आणि बारीक दाढीवाला असा एक भारी-भक्कम माणूस, आपल्या काखेत खूप वेगवेगळ्या पिशव्या लटकावून पिंपळाच्या झाडाच्या बाजूनं गल्लीत आला. ओझ्यामुळे त्याच्या कपाळावर घामाचे थेंब ओघळलेले होते. त्याच्या उजव्या कानात कापसाचे फाये होते आणि वर दोनतीन काड्या पगडीत खोचलेल्या होत्या.

रणवीरला वाटलं, त्याच्या पाठीमागे काहीतरी घडलेलं आहे. त्यानं मागे वळून पाहिलं. इंद्राचा हात आपल्या खिशातल्या सुऱ्यावर गेला होता.

एकेक क्षण पुढे चालला होता आणि निर्णयाची वेळ येऊन ठेपली होती. तो

माणूस म्लेंच्छ होता, अनोळखी होता, पिशव्यांनी लदबदलेला होता, पळून जाऊ शकत नव्हता, आपल्याला वाचवू शकत नव्हता, आणि थकलेला होता. सगळे गुण होते. काही प्रश्नांची उत्तरं मेंदू देत नाही, अंतःस्फूर्ती देते. क्षण पुढे पुढे सरकत होते आणि फेरीवाला गल्लीतून पुढे पुढे जात होता. रणवीरनं डोळ्यांनी खूण केली आणि इंद्र लगबगीनं बाहेर आला. तो बाहेर पडला त्यावेळी क्षणभर बाहेरचं भक्क ऊन्ह आत आलं. पण रणवीरनं पुन्हा दार बंद करून घेतलं.

पावलांचा आवाज नव्हता की काहीच नव्हतं. रणवीर आणि शंभू श्वास रोखून दाराच्या मागं उभे होते. रणवीर अत्यधिक उत्तेजित झालेला होता. त्याला राहवलं नाही. त्यानं हळूच दार उघडलं आणि डोकं बाहेर काढलं. गल्लीत दूर अत्तरविक्या झुलत झुलत चालला होता. पिशव्यांच्या ओझ्यामुळे त्याची पाठ वाकलेली होती आणि इंद्र बुटकासा, छोटासा इंद्र, त्याच्यापासून मागे-मागे थोडंसं अंतर राखून चालला होता. इंद्राचा हात सदऱ्याच्या खिशात होता आणि तो पायांच्या पंज्यावर चालला होता.

रणवीरला दरवाजा थोडासा उघडून त्यातून डोकं बाहेर काढून बघणं, दरवाजा बंद करून त्याच्यामागं उभं राहण्याइतकंच धोकादायक होतं. त्याचं सगळ्या गोष्टींवर नियंत्रण होतं, पण आपल्या बालसुलभ कुतूहलावर मात्र मुळीच नियंत्रण नव्हतं. त्याला अचानक शंभूनं मागं खेचून घेतलं. शंभू घाबरलेला होता आणि त्याचे पाय लटलट कापत होते. सर्वात शेवटी रणवीरला इंद्र त्या भारीभक्कम म्लेंच्छाच्या सोबत चालला आहे आणि दोघंही गल्लीतून वळत आहेत, एवढंच दिसू शकलं.

शंभूनं कडी घातली आणि दोघंही त्या अंधारात एकमेकांकडे बघत राहिले. दोघंही विलक्षण धापा टाकत होते. शंभूला उभं राहणंसुद्धा अशक्य होतं आणि रणवीर बाहेर जाण्यासाठी आतुर झाला होता.

गल्लीतून वळून पुढे आल्यावर अचानक अत्तरविक्याचं लक्ष त्या बालकाकडे गेलं. आपल्या जोड्यांच्या आवाजामुळे कदाचित त्याला त्या बालकाची चाहूल ऐकू आली नसावी.

अत्तरविक्यानं स्मितहास्य केलं.

"कुठं चाललास रे बेटा या वेळी?" त्यानं विचारलं आणि हसतच त्यानं आपला हात इंद्राच्या डोक्यावर ठेवला.

इंद्र थबकला आणि एकटक त्याच्या चेहऱ्याकडे पहात राहिला. इंद्राच्या अवचेतन मनातून अचानक गुरुजींनी सांगितलेल्या गोष्टी बाहेर येऊ लागल्या - या माणसाचे गाल फुगलेले आहेत, फुगीर गालांचे लोक भित्रे असतात, त्यांचा कोठा

जड असतो आणि त्यांना पळता येत नाही, ते लगेचच धापा टाकू लागतात. आणि हा माणूस खरोखरच धापा टाकत होता.

इंद्र आपल्या सावजावर झडप घालण्यासाठी पायांचे संतुलन साधू लागला होता. त्याचे डोळे अजूनही म्लेंच्छाच्या चेहऱ्यावरच रुतलेले होते.

अत्तरविक्याला तो मुलगा निरागस वाटला. लहान वयाचा, कोवळा, कदाचित सहारा शोधत-शोधत त्याच्यामागं चालत येत असावा असा. कदाचित भेदरलेला असावा. आज शहरात सगळेच लोक घाबरलेले आहेत.

"कुठं राहतोस? चल बेटा, माझ्यासोबत चल! आज असं एकटं एकटं बाहेर पडू नये बेटा."

पण इंद्रावर त्याचा काहीच परिणाम झाला नव्हता. अजूनही तो अत्तरविक्याच्या चेहऱ्याकडे निरखून बघतच चालला होता.

"तेली-मोहल्ल्यापर्यंत मी तुला पोहोचवून देईन. पुढे कुठं जायचं असलं तर मी तुला कुणाच्या तरी हवाली करीन. आज शहरात फार गडबड्य रे."

आणि त्या बालकाच्या उत्तराची वाट न पाहता तो वळून पुढे जाऊ लागला.

क्षणभर इंद्र तिथंच उभा राहिला. मग तोही त्याच्यासोबत चालू लागला.

आजूबाजूच्या सगळ्या घरात शांतता होती. त्यांच्या देवड्यांमध्ये इतका अंधार होता की डोळे फोडून फोडून पाहिलं तरी काही दिसणं शक्य नव्हतं.

"मलाही आज फेरीवर निघायला नको होतं," तो इंद्राला सांगू लागला, "आजचा दिवस काय बाहेर पडायचा दिवसय? सगळं गाव कोरडं-ठण्ण झालंय. पण मला वाटलं, घरी बसून तरी काय करणार , दोन-चार आणे जमा झाले तर काय वाईटय, दुकानदार घरी बसला तर खाईल काय रे बेटा?" आणि अत्तरविक्या हसला.

पाण्याचा नळ जवळ येऊ लागला होता. नळात पाण्याचा थेंबही नहता, आणि नळाखालचा घासून-घासून काळा झालेला दगड कोरडाठणक होता. आणि त्याच्या आजूबाजूला दोन-तीन भुंगे उडत होते. अगदी आत्ता आत्तापर्यंत इंद्र भुंगे पकडायचा.

"अत्तराचे फाये जरी कुणी विकत घेतले तरी तेवढेच चार आणे मिळतात, बेटा," अत्तरवाल्यानं मनाशीच बोलल्यासारखं म्हटलं. वेळ काढण्यासाठी तो बोलू इच्छित होता. कदाचित शहरातल्या निर्मनुष्य गल्ल्या चालून आल्यावर तो स्वतःच घाबरला होता.

"आम्हाला एक-एक गल्ली माहितीय. तिथं कोण कोण अत्तर विकत घेणारं राहतं तेही. ज्या माणसाला दोन बायका असतात ते हमखास अत्तर घेणारच. तो केसांना लावायचा कलपही घेणार आणि काजळही घेणार. जो वयानं मोठा आहे,

ज्याची बायको त्याच्याहून खूप लहानय तो माणूसही नक्कीच अत्तर घेणार. अच्छा, अजून सांगू का?"

अत्तरविक्याच्या गप्पांमुळेच इंद्रानं स्वतःला सावरून घेतलं होतं. त्याची पावलं दृढतेनं पडत होती आणि बाकदार चाकूची मूठही त्यानं घट्टपणे पकडून ठेवली होती. त्याचं मन एकाग्र होऊ लागलं होतं, आणि डोळे अत्तरविक्याच्या कमरेकडे लागलेले होते. जिच्या साह्यानं अर्जुनानं झाडावर बसलेल्या पक्ष्याचा डोळा फोडला होता तीच एकाग्रता. अत्तरविक्याच्या डाव्या खांद्यावर हलणारी पिशवी घड्याळाच्या पेंडुलम्‌सारखी त्याच्या कमरेजवळ हिंदोळत होत होती. त्याचा जाडाभरडा सदरा बाटल्यांनी गच्च भरलेल्या पिशवीखाली थोडा फुगीर झाल्यासारखा वर आला होता.

नळ ओलांडताच त्याची सगळी संवेदना त्याच्या उजव्या हातात एकवटली होती. नळाच्या पुढचं अंतर त्याच्या मेंदूत एकेका वितीनं मोजलं जात होतं. बाटल्यांवाली पिशवी झुलत होती, कंबर सारखी पुढे येत होती आणि अत्तरवाल्याचे बूट त्याच तालावर पट पट आवाज करीत होते.

"बाजारात अत्तराचे फाये जास्त विकले जातात, घरात अत्तर आणि सुगंधित तेल विकलं जातं," अत्तरविक्या सांगू लागला होता. अचानक इंद्रानं झेप घेतली आणि वार केला. अत्तरविक्याला वाटलं, जणू त्याच्या डाव्या हातात काहीतरी जोरात घुसलं आहे. त्याला काहीतरी चकाकल्याचा भासही झाला, पण थांबून मागं वळून काय झालंय ते पहायच्या आतच त्याच्या पिशवीच्या खाली काही तरी जोरात टोचल्याचा भास झाला. इंद्राचा वार बरोबर लागला होता. वार केल्याबरोबर त्यानं सरदाराच्या आदेशानुसार चाकू थोडासा वळवला सुद्धा होता आणि आतड्यांत घुसवला होता.

अत्तरविक्या अजून पुरता वळलाही नव्हता, तेवढ्यात त्याला तो मुलगा मागच्यामागे पळून जाताना दिसला. तरीही काय झालंय हे त्याच्या लक्षात आलं नाही. त्या मुलाला हाक मारून बोलवावं असं क्षणभर त्याला वाटलंही. पण त्याच वेळी त्याच्या पायावर पडणारं रक्त दिसलं, आणि कमरेत काहीतरी ठणकत, बुडत जात असल्याचं जाणलं. हलकीशी वेदना झाली, मग तीव्रतर वेदना झाली, आणि मग भीतीमुळे तो बेहोष झाला.

"बाप्पा रे, मला मारलं रे! मला मारलं रे! मला..."

अत्तरविक्या इतका भयंकर घाबरला होता की त्याच्या तोंडातून शब्दही फुटत नव्हता. तो कमरेवरच्या घावानं इतका अर्धमेला झाला नव्हता, त्रास, भय आणि एका बालकानं केलेल्या हल्ल्यानं झाला होता! त्याला आपल्या पिशव्यांचं ओझं वाहणंसुद्धा अशक्य झालं होतं, आणि त्या ओझ्यामुळेच तो धाडकन तोंडावर पडला होता.

आधी काही क्षण त्याला इंद्राची पळत जाणारी पावलं स्पष्ट दिसत होती, पण आता त्या गल्लीत त्याचं नामोनिशाण सुद्धा नव्हतं.

"बाप्पारे...!" तो पुटपुटला.

एक अस्फुट किंचाळी त्याच्या तोंडातून बाहेर पडली आणि त्याचे डोळे गल्लीवर पसरलेल्या गडद निळ्या आभाळाच्या छोट्याशा तुकड्यावर रुतून बसले. तिथं दोन-तीन घारी उडत होत्या. आता दोनाच्या चार घारी झाल्या आणि आभाळाची निळाई हळूहळू धूसर होत गेली.

13

नत्थू अस्वस्थ होता. आपल्या खोलीच्या बाहेर बसून सारखा चिलीम फुंकत होता. जितक्या जास्त कापाकापीच्या अफवा ऐकायचा, तितका जास्त विषण्ण होत जायचा. पुन्हा पुन्हा स्वतःच्या मनाची समजूत काढायचा, मी तर काही अंतर्मनातलं जाणणारा नाही, कोणत्या कामासाठी माझ्याकडून डुक्कर मारून घेतलं जातंय हे मला थोडंच माहीत असणारंय! काही वेळेपुरतं त्याचं मन नीट ठिकाणावर यायचं, पण पुन्हा जेव्हा तो एखादी घटना घडल्याचं ऐकायचा तेव्हा बेचैन व्हायचा. हे सगळं माझ्या हातून घडलेल्या कर्माचंच फळ आहे. सगळे चांभार सकाळपासून एकमेकांच्या खोल्यांसमोर बिड्या फुंकत गप्पा मारत होते. नत्थू पुन्हा पुन्हा त्यांच्यामध्ये जाऊन उभा राहायचा. तो स्वतःही बोलायचा प्रयत्न करायचा, पण सारखा-सारखा त्याचा घसा कोरडा पडायचा, पाय थरथर कापायचे आणि मग तो आपल्या खोलीत परत यायचा. मी या सगळ्या गोष्टी माझ्या बायकोला सांगून टाकू का? ती समजूतदार बाई आहे, ती मला समजून घेऊ शकेल. माझं मन हलकं होईल. पावशेर दारू जर कुठं मिळाली तर निदान काही वेळ तरी शुद्ध हरवता येईल असंही कधी त्याला वाटायचं. पण या वेळी दारू तरी कुठं मिळणार? बायकोला ते सांगणंही धोकादायक कामय. बोलण्याच्या ओघाओघात तिनं कुणाला सांगून टाकलं तर? मग काय होईल? मला कुणी धड सोडणार नाही. काय माहीत, पोलीसच मला पकडून घेऊन जाईल! मग काय होईल? मुरादअलीच्या सांगण्यावरूनच मी हे केलंय हे माझं बोलणं कुणी ऐकून तरी घेईल का ? मुरादअली मुसलमानय, तो

मशिदीसमोर डुक्कर फेकण्याचं काम करू शकेल का?... नत्थू अस्वस्थ झाला की त्याचं डोकं त्राण यावं म्हणून दुसऱ्या दिशेनं चालू लागायचं. ते डुक्कर नक्कीच वेगळं असलं पाहिजे. मशिदीसमोर फेकण्यात आलेलं डुक्कर हे नव्हतंच. मी ते पाहिलंच नाही. ते काळ्या रंगाचं डुक्कर होतं, तर काय दुसरंही एखादं काळ्या रंगाचं डुक्कर असू शकतं की! दोन डुकरं काळ्या रंगाची असूच शकत नाहीत? हा माझा भ्रमय! मी उगीचच अशा तऱ्हेनं विचार करू लागलोय. ते खरोखरच दुसरंच कुठलं तरी डुक्कर होतं. असा विचार करून झाला की नत्थू आपल्या बायकोशी गप्पागोष्टी करू लागायचा, हसायचा. आपण होऊनच एखाद्या शेजाऱ्याच्या खोलीत जायचा आणि मंडीत लागलेल्या आगीबद्दल बोलायचा. पण ही मनःस्थितीही फार काळ टिकायची नाही. रात्रीचा व्यापार आठवला की त्याच्या शरीरावर रोमांच उभे रहायचे. निर्जन भाग, दुर्गंधी आणि कोंदट खोली, चोरलेलं डुक्कर आणि काळोखाच्या पडद्यातून येणारा काळूचा छकडा. सगळी घटना एखाद्या दुःस्वप्नासारखी त्याच्या डोळ्यासमोरून सरकत जात असे. गुरांचे डॉक्टर कधी अशा तऱ्हेनं डुक्कर कापून घेतील का? 'पिगरीची डुक्करं तिकडं भटकत असतात, एखादं पकड... रात्री छकडा येईल, त्यात टाकून दे. जोपर्यंत मी येणार नाही तोपर्यंत माझी वाट बघत रहा.' अशी कधी कामं झालीत का? ही काय काम करायची तऱ्हा आहे? त्याच्या मनात आलं, सरळ उठून काळू भंग्याकडे जावं आणि त्याला विचारावं, की त्यानं ते डुक्कर कुठं नेलं होतं? सरळ मुरादअलीकडे जावं आणि त्याला सांगावं... पण मुरादअली काय म्हणेल? जर त्याच्या मनातच चोरी असेल तर तो धक्के देऊन घराबाहेर काढून देईल. शिवाय उलटं माझ्यावरच आळ घेईल, उलटं मला पकडवून पण देऊ शकेल...

त्यानं पुन्हा चिलीम उचलली. खड्ड्यात गेला मुरादअली आणि त्याचं डुक्कर! जे झालं ते झालं! मी मुद्दाम, जाणून-बुजून काही केलेलं नाही. मी तर जे काही केलं ते अजाणतेपणीच केलं, पण हे लोक ज्या आगी लावतायत आणि रस्त्यानं जाणाऱ्या येणाऱ्यांना मारून टाकतायत, ते तर डोळे उघडे ठेवून सगळी कामं करताहेत. हे लोक का वाईट काम करतायत? माझ्या एक डुक्कर मारण्यानं काय होतंय? एक डुक्कर मारण्यात असं आहे तरी काय? मी गुन्हेगार असलो तर हे लोक गुन्हेगार नाहीत का? ज्यांनी मंडीत आग लावलीय ते? मी जाणून-बुजून काही केलेलं नाहीय. जे व्हायचं होतं ते झालं. मला त्याच्याशी काही देणं-घेणं नाही...

नत्थूला आपल्या बापाची आठवण आली. देवाला घाबरणारा माणूस होता तो. नेहमी हीच शिकवण द्यायचा: ' बेटा, हात स्वच्छ ठेवावेत. ज्याचे हात स्वच्छ आहेत तो कधी वाईट काम करीत नाही... आपल्या इज्जतीनं भाकरी खावी... ' नत्थूला ते आठवून रडू कोसळलं. त्याच्या छातीवरचं ओझं पुन्हा वाढू लागलं, असह्य होऊ लागलं.

मैदानाच्या पलीकडं कुणी तरी माणूस चालता चालता थांबला होता आणि वळून चांभाराच्या वस्तीकडे बघत होता. त्याला पाहून नत्थूच्या उरात धडकी भरली. त्याला वाटलं, जणू तो आपल्यालाच शोधतोय! जणू त्याला कळलं आहे की डुक्कर नत्थूनंच मारलय ते.

नत्थूची बायको लुगड्याला हात पुसत बाहेर आली. तिला पाहून त्याचं मन पुन्हा व्याकुळ झालं. तिला सगळं सांगून टाकावं असं नत्थूच्या मनात आलं. आपल्या मनातली गोष्ट सांगायला कुणीतरी असावं.

नत्थूचे डोळे पुन्हा मैदानापलीकडे उभ्या असलेल्या माणसाकडे वळले.

"काय बघतोस?" त्याच्या बायकोनं विचारलं. मग पुन्हा मैदानापलीकडे उभ्या असलेल्या माणसाकडे पहात म्हणाली, "कोणय तो? तुला तो माहीतय का?"

"नाही, मला काय माहीत तो कोणय ते? मला नाही माहीत!" नत्थू म्हणाला आणि मोठमोठे डोळे करून तो आपल्या बायकोकडे पहात राहिला.

"तू इथं का उभी राहिलीस? जा, तुझं काम कर," थोडंसं कठोरपणे नत्थू तिला म्हणाला.

त्याची बायको त्याच पावली खोलीत परत गेली.

नत्थूनं चोरट्या नजरेनं पुन्हा रस्त्याकडे पाहिलं. तो माणूस जाऊ लागला होता. मैदानाच्या कडेवर त्यानं सिगारेट शिलगावली होती आणि आता सिगारेटचे झुरके ओढत तो पुढे निघाला होता.

"मला भ्रम झाला होता," मनातल्या मनात नत्थू म्हणत होता, "कामासाठी इकडं कितीतरी लोक येत असतात. ज्यांना आमच्याशी कामं असतात ते."

त्याचं मन निवांत झालं. उगीचच बायकोला रागावून बोललो असं त्याला वाटलं. "ऐकलंस का?" त्यानं बायकोला हाक मारून सांगितलं, "थोडा चहा कर बरं!"

त्याची बायको उंबऱ्याजवळ आली. ती जवळ असल्यावर नत्थूला खूपच सुरक्षित असल्यासारखं वाटायचं, असं काहीतरी तिच्या शरीरातच वा स्वभावातच होतं. ती घरात असली की वाटायचं घरात स्थिरता आहे. ती डोळ्यांसमोरून दूर झाली की नत्थूला सगळी सृष्टी डळमळीत झाल्यासारखी वाटायची. ती जवळ असावी असं त्याला आजही खोल आतल्याआत वाटत होतं. ती कधीच अस्वस्थ, उत्तेजित व्हायची नाही, घाबरायची नाही, तिचं हृदय कधीच धडधड करायचं नाही, कुठलीही गोष्ट तिच्या काळजात टोचायची नाही. कदाचित तिचं उफाड्याचं शरीर आहे, माझ्यासारखं सगळा वेळ उरात दुःख घेतलेलं दुबळं-पिचकं नाही. तिच्या आळसावलेल्या शरीरात नत्थूला स्निग्धतेचा भास व्हायचा, तिच्या

चालण्याबोलण्यात, प्रत्येक गतीत स्थिरता होती, संतुलन होतं.

ती उंबऱ्याजवळ येऊन उभी राहिली होती. एक हात उंचावून तिनं चौकटीवर ठेवला होता आणि हळुवारपणे ती स्मितहास्य करत होती.

"तू कधी या वेळी चहा मागत नव्हतास. आज सुट्टीची मजा करून घ्यायचीय का?"

यावर नत्थू भडकला. "सुट्टीची मजा? ही तुला सुट्टी वाटतेय का? तुला करायचा नसला तर मी स्वतः हातानी करून घेईन! फालतू गोष्टी का बोलतेस?"

आणि नत्थू उठून खोलीत निघून गेला.

"आत्ता करून देते, चहा करायला काय वेळ लागणाय! तू चिडतोयस कशाला?"

"नाही, तू बाजूला हो, मी स्वतःच करणाय," रागारागानं नत्थू म्हणाला.

"मी असताना तू चूल पेटवलीस तर मी मरून जाणार नाही का?" असं म्हणून ती पुढे झाली आणि त्याचा दंड पकडून त्याला उठवू लागली. "ऊठ, तुला माझ्या गळ्याची शप्पतय!"

नत्थू उठून थबकल्यासारखा उभा राहिला, मग पुढं होऊन त्यानं आपल्या बायकोला मिठीत घेतलं.

"आज तुला झालंय तरी काय?" त्याची बायको म्हणाली आणि हसली. पण नवऱ्याच्या आलिंगनात तिला त्याच्या उरातली व्याकुळता स्पष्ट जाणवली. काही तरी याच्या उरात काट्यासारखं टोचलंय, त्यामुळे काल रात्रीपासून हा विचित्रपणे वागू लागलाय.

"काल रात्रीपासून तू बहकल्यासारखं वागू लागलास. असं नाही वागायचं, मला भीती वाटते."

"आम्हाला कसली भीतीय, आम्ही काय कुणाचं घर जाळलंय का?" नत्थूनं गोंधळल्यासारखं उत्तर दिलं.

त्याच्या पाठीवर बायकोचा हात थांबला, पण तिनं नत्थूला आपल्या मिठीत घेतलंच. नत्थूची अस्वस्थता आणि क्षोभ, दोन्हीही सारखं वाढतच होतं. तो काल रात्री करीत होता तसंच वेड्यासारखं करू लागला.

त्याच्या नजरेसमोर अचानक डुकराचं प्रेत तरळलं. फरशीच्या मधोमध, चारी टांगा वर झालेल्या आणि खाली रक्ताचं थारोळं. त्याचं अंग शहारलं. बायकोच्या मिठीत नत्थूचं शरीर थंड पडू लागलं. त्याच्या खांद्यावर घामाचे ओघळ वाहू लागले. आणि त्याचं मन दूर कुठंतरी भटकू लागलेलं आहे असं त्याच्या बायकोला वाटलं. उभ्या उभ्या नत्थूच्या तोंडातून हुंदका बाहेर पडला आणि तो बायकोपासून दूर झाला.

"नको, आज माझ्या मनात नाहीय. बघ, बाहेर काय चाललंय ते! लोकांची घरं जळू लागलीत."

नत्थू अस्वस्थ होऊन बराच वेळ एका जागी थबकून उभा राहिला.

"काय झालं? तू इतका गप्पगप्प का झालास? खरं सांग, तुला माझ्या गळ्याची शप्पतय!"

पण नत्थू गुपचूप खाटेवर जाऊन बसला.

"काय झालंय?"

"काहीतरी झालंय. तू माझ्यापासून लपवतोयस."

"काही नाही."

बायको नत्थूजवळ आली, आणि त्याच्या केसातून हात फिरवत म्हणाली, "तू बोलत का नाहीस?"

"काही बोलायसारखं असेल तरच बोलेन नं?" त्यानं हळूच उत्तर दिलं.

"चहा करू? थांब , मी चहा करून आणते."

"मला चहा नकोय."

"आत्ता तर स्वतःच करून घेणारय म्हणत होतास आणि आता चहा नकोय?"

"नाही, मला नकोय."

"ठीकय मग! चल खाटेवर!" त्याची बायको हसून म्हणाली.

"नाही, खाटेवर पण येणार नाही."

"नाराज झालास? माझ्या प्रत्येक गोष्टींवर सारखं नाराज होऊ लागलास!" बायकोनं तक्रारीच्या सुरात सांगितलं.

नत्थू गप्पच राहिला. तो खरोखरच रडवेल्या पोरासारखा वागू लागला होता.

"काल रात्री कुठं गेला होतास? मला काहीही सांगितलं नाहीस." नत्थूची बायको म्हणाली, आणि फरशीवर त्याच्या शेजारी जाऊन बसली.

नत्थूनं थबकून बायकोच्या चेहऱ्याकडे पाहिलं. हिला नक्कीच कळलं असलं पाहिजे. सगळ्यांनाच आज ना उद्या कळेल. नत्थूला त्याचे पाय कापत असल्याचा भास झाला.

"सांगितलं नाहीस तर मी इथंच डोकं फोडून घेईन. तू कधीच तुझ्या मनातली गोष्ट माझ्यापासून लपवली नाहीस, मग आजच का लपवू लागलास?"

नत्थूचे डोळे बराच वेळ बायकोच्या चेहऱ्यावर रोखलेले होते. हिला जर शंका आली असेल तर काय विचार करत असेल कुणास ठाऊक! माझ्याबद्दल काय काय तिच्या मनात चाललं असेल! पण बायकोचे विश्वासानं आणि याचनेनं भरलेले डोळे

अजूनही त्याच्याकडेच बघत होते. मग अचानक तो आपण होऊनच बोलू लागला, "तुला माहितीय, मंडीत आग का लागलीय ते?"

"माहीतय, मशिदीसमोर कुणी तरी डुक्कर मारून फेकलं होतं. म्हणून मुसलमानांनी मंडीत आग लावून दिलीय!"

"ते डुक्कर मी मारलं होतं."

नत्थूची बायको स्तंभित झाली.

"तू? तू हे वाईट काम कां केलंस?"

आणि तिच्या चेहऱ्यावरचं सारं रक्त उतरलं, चेहरा पांढराफटक झाला आणि ती उदास डोळ्यांनी नत्थूकडे पाहात राहिली.

नत्थूनं हळूहळू तिला सगळी घटना सांगितली.

"डुक्कर फेकायला पण तूच गेला होतास?" बायकोनं विचारलं.

"नाही, काळूनं ते छकड्यात टाकून नेलं होतं."

"काळू तर मुसलमानय, त्यानं कसं नेलं ते?"

"काळू मुसलमान नाहीय, किरिस्ताव आहे. तो चर्चमध्ये जात असतो."

त्याची बायको बराच वेळ त्याच्या चेहऱ्याकडे बघत राहिली, "तू फार वाईट काम केलंस, पण यात तुझा काय दोषय? तुला धोका देऊन लोकांनी हे काम करून घेतलंय. तू फसलास!" स्वतःशीच बोलतेय अशा थाटात ती पुटपुटत होती. पण नत्थूची कहाणी ऐकून ती पायापासून डोक्यापर्यंत शहारून गेली होती. तिला वाटलं, एखाद्या भयानक अरिष्ट ग्रहाची सावली तिच्या घरावर पडली आहे, उपास करूनसुद्धा न टळण्यासारखी , प्रायश्चित्त घेतलं तरी न टळण्यासारखी!

पण तरीही तिच्या मनावर ते ओझं राहिलंच.

नत्थूच्या हृदयात एक खोल खोल कळ उठली. बायकोनं डोळे वर उचलून नत्थूकडे पाहिलं. त्याला विचलित झालेलं पाहून तिच्या हृदयात ममतेचा झरा उसळून आला. ती उठून नत्थूजवळ गेली, आणि त्याचा हात पकडून म्हणाली, "तरीच मी म्हणत होते की हा इतका त्रासलेलाय कशामुळं. मला काय माहीत, तू मला सांगितलं का नाहीस? आपलं दुःख असं आतल्या आत दाबायचं नसतं."

"मला माहीत असतं तर मी हे काम कशाला घेतलं असतं?" नत्थू तोंडातल्या तोंडात पुटपुटला, "गुरांच्या डॉक्टरला ते डुक्कर पाहिजेय, असं मला तर सांगण्यात आलं होतं!" मग नत्थू आपल्या काळजीत, मनातल्या गोंधळात आणखीच खोलवर बुडत गेला. आणि सांगू लागला, "काल रात्री मी मुरादअलीला पाहिलं होतं, पण तो माझ्याशी बोललाच नाही. मी त्याच्या मागे-मागे पळत होतो, पण तो न थांबता पुढे निघून गेला. तो माझ्याशी एक अक्षरही बोलला नाही..."

नत्थूचा आवाज अनिश्चिततेत बुडाल्यासारखा झाला. त्याच्या मनात खरंच मुरादअलीनं त्याला पाहिलं होतं की नाही अशी शंका आली.

"किती पैसे मिळाले ते डुक्कर मारायचे?"

"पाच रुपये. त्यानं मला अॅड्व्हान्सच दिले होते."

"पाच रुपये? इतके जास्त? तू काय केलंस त्या रुपयांचं?"

"काही नाही केलं. चार रुपये उरलेत, तिथं कोनाड्यात ठेवलेत."

"मला सांगितलं का नाहीस?"

"मला वाटलं, तुझ्यासाठी लुगड्यांची जोडी आणावी..."

"मी त्या पैशांचे लुगडे घेईन? मी त्या पैशांना आग नाही लावायची का?" नत्थूच्या बायकोनं त्वेषात सांगितलं, "तुझ्याकडून असं कुकर्म करवून घेतलं." पण लगेच तिनं स्वतःला सावरून घेतलं. हसण्याचा निष्फळ प्रयत्न करीत ती म्हणाली, "पण हे तर तुझ्या कमाईचे पैसे आहेत, का नाही घेणार मी? याचं म्हणशील ते घेईन."

ती उठून उभी राहिली आणि कोनाड्याजवळ गेली. टाचा उंचावून कोनाड्यात ठेवलेली रक्कम पाहिली, मग नवऱ्याकडे परत आली. नत्थूची मान आणखी जास्तच वाकली आणि तो कुठल्यातरी गहन अंधाऱ्या तळात हरवला.

"मैदानाच्या पलीकडं उभा असलेला तो माणूस तू पाहिला होतास का?" नत्थूनं डोकं वर उचलून विचारलं.

"हो, पण त्याचं काय?"

"मला वाटतं, तो कैकाडी असावा. त्याचं डुक्कर मी आत ओढून नेलं होतं. त्याला नक्कीच समजलं असेल."

"तुला काय झालंय? कळलं असेल तर तो तुझ्याकडं येऊन घेईल की! कसं बहकल्यासारखं बरळू लागलायस तू?" नत्थूच्या बायकोनं आवाज उंचावून सांगितलं. मग डोक्याला झटका देऊन ती म्हणाली,

"हे बघ, आपण कातड्याचं काम करतो. जनावरांचं कातडं सोलणं, जनावरं मारणं आपलं काम नाय. तू डुक्कर मारलंस. आता ते मशिदीसमोर फेकलं काय, नि भर बाजारात फेकलं काय, त्याचं आपल्याला काय? आणि कसं तुला माहीत की मशिदीसमोरचं डुक्कर तेच होतं का आणखी कोणतं ते? तुझं कायय त्यात?"

मग निष्काळजीपणाचा आव आणत ती म्हणाली, "मी तर त्या पैशाचं लुगडं घेणार, नक्कीच घेणार. तुझ्या कमाईचे पैसे आहेत ते! मेहनतीची मजुरी आहे ती!" मग ती पुन्हा कोनाड्याकडे गेली आणि हसत-खिदळत तिनं कोनाड्यातले पैसे उचलले. पण मग पुन्हा तिथंच ठेवून दिले.

"हं, मला काय त्याचं? तुझं बरोबरच आहे, मला काय, खड्ड्यात गेलं ते

इक्कर आणि तो मुरादअली! मी पण काल तेच म्हणत होतो..."

नत्थूनं हे उच्चारलं आणि तो बिनधास्त झालाय असं त्याला वाटू लागलं.

"आता माझ्याजवळ एकूण पंधरा रुपये जमलेत...आता तूही स्वत:साठी काही घे."

"मला काही नकोय!" नत्थू भावनावश होऊन म्हणाला, "तू माझ्याजवळ असतेस तेव्हा मला सगळं मिळाल्यासारखं असतं."

नत्थूची बायको पटकन खोलीतल्या एका कोपऱ्यातल्या चुलीजवळ जाऊन बसली, आणि चहा करू लागली.

"ज्याचं हृदय स्वच्छ असतं त्याला देव काही करत नाही." नत्थूची बायको म्हणाली, "आपलं हृदय स्वच्छय. आपल्याला कुणाची भीती का म्हणून?" मग तिथंच बसल्या बसल्या म्हणाली, "मला सांगितलंस तेवढं पुरे. पण आता मात्र वस्तीतल्या कुणाला सांगू नकोस!"

"नाही, नाही. मी कशाला सांगू! तू पण कुणाला सांगू नकोस!"

नत्थूची बायको ग्लासात चहा ओतत होती तेव्हा मैदानापलीकडे कुणाचा तरी पळण्याचा आवाज आला. नत्थूच्या बायकोचा हात मध्येच थांबला. तिनं डोळे वर करून नत्थूकडे पाहिलं, पण काही बोलली नाही, उलट हसली.

थोड्या वेळानं वाड्यात एका चांभाराचा आवाज आला. एक चांभार दुसऱ्याला विचारत होता, "काय झालं वो काका?"

"दंगल झालीय, रस्त्यावर."

"कुठं?"

"रस्त्यात. हिंदू-मुसलमानांची दंगल झालीय. दोन माणसं मारून टाकलीत म्हणतात."

"हा पळत जाणारा माणूस कोण होता?"

"माहीत नाहीय... कुणीतरी बाहेरगावचा असावा!"

खोलीच्या आत आणि बाहेर पुन्हा स्तब्धता पसरली. चांभार आपल्या खोलीत निघून गेला असावा किंवा परसात गेला असावा.

नत्थूच्या हातात चहाचा कप देत त्याची बायको म्हणाली, "तू पण जा. वस्तीवाल्यांना भेट. चल, मी पण येते. इथं बसून काय करणारैस?"

नत्थूची बायको उठली आणि विनाकारणच खोली झाडू लागली. एक-एक कोपरा, एक-एक गोष्ट उचलून खालून झाडू लागली. ती असं का करतेय हे तिला स्वत:लाच माहीत नव्हतं. जणू कुठली तरी अमंगळ सावली झाडून तिला खोलीच्या बाहेर फेकून द्यायची होती. खूप वेळ ती खोली झाडून काढत राहिली. मग तिनं

फरशी धुऊन काढली, खूप पाणी ओतून फरशी धुऊन काढत राहिली. पण शेवटी जेव्हा थकून ती खाटेवर जाऊन बसली तेव्हा तिला वाटलं, बंद दारांच्या फटीतून ती विशाल सावली पुन्हा खोलीत परत आलीय, खोलीत गच्च काळोख भरलाय, आणि खोलीच्या आत सावली सगळ्या बाजूनं हसू लागली आहे.

14

पहिली बस खानपूरहून निघून सकाळी आठ वाजता गावात यायची. ती आलीच नाही. नंतर दर घंटा-दोन घंट्यांनी शहराकडून आणि खानपूरहूनही सारख्या बसेस येत असायच्या. आज दुपार झाली तरी एकही बस आली नाही. चहाच्या दुकानात किटलीत भरुन ठेवलेलं पाणी सकाळपासून नुसतं उकळत राहिलं. दोन्ही बाकं रिकामी पडली होती. पूर्वी बाकांवर सारखी रीघ लागलेली असायची. येता-जाता हरनामसिंहाच्या दुकानात न बसणारा माणूस गावात एकसुद्धा नसेल. बस-स्टँडवर दोनतीन झिपरी कुत्री हिंडत होती. सगळा आसमंत मूर्च्छित झाल्यासारखा भासत होता.

बाईची समज जास्तच तीक्ष्ण असते. बन्तोनं या गावातून निघून जाऊ, खानपूरला जाऊ, तिथं आपले बरेच सगेसोयरे आहेत, असं काल रात्रीपासून सुरू केलं होतं. या गावात फक्त हे दोनच जीव शीख परिवाराचे होते, बाकीचं सगळं गाव मुसलमानांचं होतं. पण हरनामसिंहानं ऐकलं नाही. चालतं दुकान सोडून पळून कसं जायचं? दंगेधोपे होतच राहतात, पण कामधंदा तर बंद करता येत नाही.जायचं तर कुठं जायचं? शहरात जायचं तर आधीच आगी लागल्या आहेत! खानपूरला जायचं तर आम्हाला खाऊ घालणारं कोणय? आणि आपल्या माघारी कुणी दुकान लुटलं तर मग खाणार तरी कसं? मुलाकडे जावं? तो तर वीस मैल लांब मीरपूर गावात आहे. आम्ही जसे इथं एकटे आहोत तसाच तोही तिथं एकटा आहे. आहोत तिथंच गुरू महाराजांच्या आश्रयानं राहू. मुलाकडे गेलो तर तो आम्हा म्हाताऱ्यांना वाचवील, का स्वतःचे प्राण वाचवील? आपल्या खिशातून खाल्लं तरी किती दिवस आणि दुसऱ्यानं खाऊ घातलं तरी किती दिवस? आणि चौकीवर बसलेला हरनामसिंह काखेतले हात जोडायचा आणि म्हणायचा-

"जिसके सिर उपरि तूँ सुआमी सो दुःखु कैसा पावै!"

(हे स्वामी, ज्याच्या शिरावर तुझा हात आहे तो दुःखी कसा होईल?)

बन्तो ऐकायची आणि गप्प बसायची. मग जेव्हा आतल्या आत तिचं मन खचून जायचं तेव्हा ती म्हणायची : "चला, माझ्या बहिणीच्या गावी जाऊ ,,ते तर

जवळचय, तिथं गुरुद्वारात पडून राहू, बहिणीच्या जवळ राहायचं नाही, तिथं बरीच शीख-संगत आहे, आपल्या लोकांचा आसरा तर असतोच की!"

पण हरनामनं तेही ऐकलं नाही. इतरांचं काय होईल ते होवो, आपल्याशी कुणी वाईट वागणार नाही यावर त्याचा खोलवर विश्वास होता.

"सुण भागे भारिये, असाँ कदे किसे दा बुरा नहीं चेतिया, बुरा नही कीता. इत्थो दे लोकी बी साडे नाल भरावाँ वाँग रहे हन. तेरियाँ आखाँ साहमणे करीमखान दस वाग कह गिया है: चुपचाप बैठे रहवो तुहाडे वल कोई अँख चुक के वी नही वेखणया. करीमखान तो वडा मोतबर इत्थे कौण है? इक्को इक इत्थे सीख घर है? के गिरावालियाँ नूँ सॉडे ते हत्थ चुकदियाँ गैरत नही आयेगी?"

(ऐक सुभागी भार्ये, आम्ही काही कुणाचं देणं लागत नाही, कधी कुणाचं वाईट चिंतिलं नाही, वाईट केलं नाही. हे लोक पण आपल्याशी कधी वाईट वागले नाहीत. तुझ्या डोळ्यासमोर दहादा करीमखान सांगून गेलाय, आरामात रहा, तुमच्याकडं कुणी डोळा वटारून बघणारसुद्धा नाही. आता तूच सांग, या गावात करीमखानपेक्षा कुणी मातब्बर माणूस आहे तरी का? सगळ्या गावात एक तर शीखांचं घर आहे. आपल्यासारख्या म्हाताऱ्यांवर हात उगारायला त्यांना लाज नाही का वाटायची?)

बन्तो पुन्हा गप्प बसली. तर्काचं उत्तर तर्कानं दिलं जाऊ शकतं, पण विश्वासाचं उत्तर तर्काजवळ नसतं. बन्तोचं मन कधी कधी खचत जायचं, पण हरनामसिंह एकदाही विचलित झाला नाही. त्याचा चेहरा सारखा प्रफुल्लित असायचा. सगळा वेळ गुरुमहाराजांचं नाव घेत रहायचा, आणि त्याला बघून बन्तोलाही शक्ती मिळायची.

पण आजही एकही बस आली नव्हती, एकही गिऱ्हाईक दुकानाची पायरी चढलं नव्हतं आणि रस्ता ओस पडलेला होता. उलट, दोन-तीनदा पूर्वी कधीच पाहिले नव्हते असे एकटे-दुकटे लोक गावात जाताना त्यांच्या घराकडे रोखून रोखून पहात गेले होते.

आणि जेव्हा दुपार ढळू लागली होती तेव्हा दुरूनच त्याला कुणाच्यातरी पावलांचा परिचित असा आवाज आला. करीमखान काठी टेकत येत होता. हरनामसिंहाला धीर वाटला. करीमखान काहीतरी सांगेल, काही सुचवील, काहीतरी उपाय सांगेल. इथं धोका वाटला तर आपल्याला करीमखानच्या घरी जाता येईल.

करीमखान दुकानासमोर आला, पण थांबला नाही, हरनामसिंहाकडे तोंड वळवलं नाही, फक्त त्यानं आपली गती मंद केली आणि खाकरण्याचा बहाणा करून तो पुटपुटला, "हालत काही चांगली नाहीय हरनामसिंह, तू निघून जा!" दोन

पावलं टाकून पुन्हा म्हणाला, "गावातले तर तुझ्याकडे डोळा उंचावून बघणारही नाहीत, पण बाहेरच्या लोकांची भीती आहे. त्यांना रोखणं काही कुणाला शक्य होणार नाही!"

आणि मग पुन्हा खाकरत-खोकत, काठीचा आवाज करीत पुढे निघून गेला.

तेव्हा पहिल्यांदा हरनामसिंहाचा विश्वास डळमळीत झाला. करीमखान थांबला नाही याचा अर्थ खरोखरच धोका आहे आणि करीमखान आला तोही जोखीम पत्करूनच आला असला पाहिजे. तरीही हरनामसिंह फारसा घाबरला नव्हता; पण उदास मात्र अधिकच झाला होता. त्याच्या मनात क्षोभ, क्रोध, भय इत्यादींपेक्षा वैराग्याचा भावच अधिक प्रकर्षानं निर्माण झाला होता.

पाचेक मिनिटांनी करीमखान पुन्हा परत आला. पुन्हा तसाच चढ चढत, कंबरेवर हात टेकवत, खाकरत-धापा टाकत आला. त्याचे पाय मंदावले होते. पुन्हा तो पुटपुटला: "वेळ लावू नकोस, हरनामसिंह, हालत चांगली नाहीय, बाहेरगावचे दंगेखोर कधीही यायची भीती आहे."

आणि तसाच कमरेवर हात ठेवून धापा टाकत तो चढ चढू लागला.

हरनामसिंहानं कुठं जावं? मैलोन् मैल लांब रस्ते आणि मैदान आणि दऱ्या पसरलेल्या होत्या. करीमखाननं तर सांगून टाकलं की निघून जा, पण जाणार कुठं? त्याला कुठं आश्रय मिळणारय? साठी झालेली आणि सोबत बायको, तिला घेऊन किती दूरवर पळून जाणं शक्यय? आणि पळून जायचं म्हटलं तरी जायचं कुठं?

पुन्हा एकदा मनाच्या तळघरातून आवाज आला: कुठंही जाऊ नकोस, इथंच रहा, जेव्हा दंगेवाले येतील तेव्हा त्यांना घरही देऊन टाक अणि स्वतःचा प्राणही. परदेशाची धूळ झाडण्यापेक्षा इथंच मरणं चांगलं आहे, हल्ला करायला कोण येईल? तो पुन्हा-पुन्हा विचार करायचा, पण गावातला एखादा माणूस त्याच्यावर हल्ला करील यावर त्याचा विश्वासच बसत नव्हता. गावातले लोकही बाहेरच्यांना हल्ला करू देतील असं त्याला वाटत नव्हतं.

हरनामसिंह उठून मागच्या खोलीत गेला. तिथं बन्तो बसली होती.

"करीमखान येऊन इथून निघून जा म्हणून सांगून गेलाय. बाहेरून हल्लेखोर येऊ लागलेत."

क्षणभरासाठी बन्तोच्या रक्ताचं पाणी-पाणी झालं. ती तशीच स्तब्ध बसून राहिली. रात्र डोक्यावर चढणार होती आणि कुठंही ठावठिकाणा नव्हता. आणि तिकडं अंधाऱ्या खोलीत उभा असलेला तिचा पती खिन्नतेचा पुतळा असल्यासारखा वाटत होता.

पण आत्ताची वेळ विचार करायची नव्हती की जास्त वेळ वाट पहात

बसण्याची नव्हती. जितकं लवकर शक्य होईल तितकं, अंधार पडताच इथून निघणं आवश्यक होतं.

"मी तर अजूनही म्हणतो, इथंच रहावं. कुठंच जाऊ नये." मग त्यानं भिंतीवर टांगलेल्या आपल्या दुनळी बंदुकीकडे बोट दाखवून म्हटलं, "मरायची वा मारायची नौबत आली तर आधी मी तुला मारीन, मग स्वतःला मारून घेईन."

बन्तो गप्प बसून ऐकत राहिली. काय म्हणावं, काय सल्ला द्यावा? समोर काहीही उपाय नाहीय तर?

हरनामसिंह आपल्या दुकानाच्या ओट्यावर परत आला, तरटाखालचे कमाईचे पैसे काढून घेतले, मग आत आला, पेटीतून जमवलेले पैसे काढून घेतले, मग नोटा वेगळ्या काढून घेतल्या, आणि चिल्लर तिथंच ठेवून दिली. नोटांचं बंडल करून ते बंडीच्या आतल्या खिशात ठेवलं. मग खोलीतली भिंतीवर लटकणारी बंदूक काढून घेतली, आणि खांद्यावर अडकवली. काय काय सामान घ्यावं आणि कोणतं घेऊ नये हे त्याच्या लक्षात येत नव्हतं. दुकानाच्या रजिस्ट्रीचे कागद घ्यावेत का? पण ते शोधून काढायला वेळच नव्हता. बन्तोचीही तशीच अवस्था झाली होती. आपले दागिने घेऊ का? जेवणासाठी काही थोडंफार करून घ्यावं का? दोन भाकरी भाजून घेऊ का? वाटेत कुठं काय मिळणारय खायला? कपडे बदलू का? बाहेर जायचं तर स्वच्छ कपडे घालायला हवेत. पण बन्तोच्या काहीच लक्षात येत नव्हतं, काय घ्यावं आणि काय सोडून द्यावं.

"दागिन्यांच्या पिशवीचं काय करू?" तिनं विचारलं, "हे अंगावर घालू का?"

"घाल." हरनामनं सांगितलं, मग किंचित विचार करून म्हणाला, "तुझे दागिने बघूनच तुला कुणी मारून टाकायचं. नको. ते इथंच दुकानाच्या मागं जमिनीत पुरून ठेव."

बन्तोनं कुडत्याखाली अंगावर दागिना चढवला. काही रुमालात बांधून ट्रंकेच्या तळाशी ठेवले, बाकीचे दागिने मागं अंगणात पुरून टाकले. जिथं त्यांनी भाजीचे वाफे लावले होते तिथं. खोलीत ट्रंका ठेवलेल्या होत्या, चादरी आणि सतरंज्या होत्या, मुलीच्या लग्नात तयार करून घेतलेली सगळी अंथरुणं-पांघरुणं होती, कितीतरी गोष्टी होत्या, पण त्या सोबत घेणं शक्य नव्हतं.

"दोन भाकरी भाजू का? कुठं कुठं जावं जागेल कुणास ठाऊक!"

"भाकरी भाजायला आता वेळ तरी कुठंय बाई, आधीच जायचा विचार केला असता तर तेही करता आलं असतं."

तेवढ्यात दूरवर कुठंतरी ढोल बडवल्याचा आवाज ऐकू येऊ लागला. दोघंही एकमेकांकडे बघतच बसले.

"दंगेखोर आलेत, खानपूरकडून आल्यासारखे वाटतायत." चढाच्या पलीकडं नारेबाजी सुरू झाली.

"या अली!"

"अल्लाह-ओ-अकबर!"

'हे अशरफ आणि लतीफ असतील. तेच गावातले लीगवाले आहेत. तेच पाकिस्तानचे नारे लावत असतात,' हरनामसिंह मनातल्या मनात म्हणाला.

सगळं आसमंत थरारून उठलं.

संध्याकाळ झाली होती, पण संधिप्रकाशाचं अजून काळोखात रूपांतर झालं नव्हतं. दंगेखोरांचा आवाज डाव्या बाजूनं हाकेच्या अंतरावरूनच आल्यासारखा वाटत होता.

तेव्हा एकाएकी हरनामचं लक्ष खोलीच्या छताला लटकवलेल्या मैनेच्या पिंजऱ्याकडे गेलं.

"बन्तो, हा पिंजरा मागच्या अंगणात घेऊन जा आणि त्याचं दार उघडून मैना सोडून दे."

थोड्या वेळापूर्वीच बन्तोनं मैनेच्या पिंजऱ्यातल्या वाट्यात दाळ आणि पाणी ठेवलं होतं. आता जेव्हा बन्तो तो पिंजरा घेऊन बाहेर चालली होती तेव्हा मैनेनं रोजचंच पाठ केलेलं वाक्य उच्चारलं "बन्तो, रब्ब राखा, सरबद्ध दा रब्ब राखा."

ते ऐकताच बन्तोचा गळा भरून आला आणि उत्तरादाखल बन्तोही पुटपुटली, "हां मैना, रब्ब राखा, सरबद्ध दा रब्ब राखा."

हे शब्द मैनेनं हरनामसिंहकडून ऐकून पाठ केले होते. बऱ्याचदा हरनाम दुकानातल्या एका लाकडाच्या फळीवर बसलेला असायचा आणि त्याची बायको मागे खोलीत बसलेली असायची. दुकानात कुणीही गिऱ्हाईक नसलं की हरनाम आत बसलेल्या बन्तोशी गुरुवाणी आणि धर्माबद्दल बोलत बसायचा, तेव्हा तो उठल्याबसल्या म्हणायचा, "रब्ब राखा, सरबद्ध दा रब्ब राखा."

आणि मैना हेच शब्द घरात बोलत असायची.

मैनेच्या मुखातून हे शब्द ऐकून बन्तोला एकदम बळ मिळालं. तिच्यात साहस आणि स्थिरता आली. जणू एक छोटासा पक्षी तिला उपदेश करू लागला होता.

घराच्या परसातल्या छोट्याशा तुकड्यात हरनामसिंहनं भाज्या लावल्या होत्या, एक आंब्याचं झाडही लावलं होतं. अंगणाच्या मध्यभागी गेल्यावर बन्तोनं पिंजऱ्याचं दार उघडलं आणि अगदी कोमल आवाजात ती म्हणाली, "जा मैने, जा, सरबद्ध दा रब्ब राखा." (ईश्वर तुझा रक्षणकर्ता, सदैव रक्षणकर्ता आहे.)

त्याच वेळी पुन्हा ढोलाचा आवाज आला. या वेळी आवाज फारच जवळ

आल्यासारखा जाणवला. गावातही आवाजाचा कोलाहल वाढू लागला होता. खूप लोक जमून कुठून तरी येऊ लागलेत असं वाटत होतं. गावातून नारे लावल्याचा आवाज अधून मधून यायचा.

बन्तो आणि हरनाम, आपल्या तीन कपड्यांसह आणि थोडीफार पुंजी व बंदूक सांभाळत , दुकानाला कुलूप लावून बाहेर पडले. घराबाहेर पाय ठेवताच सगळा प्रदेश परका झाला. कुठे जायचं? कोणत्या दिशेनं वळायचं? डाव्या हाताला गाव पसरलेलं होतं. त्याच दिशेनं दुरून दंगेखोरांच्या ढोलाचा आवाज येत होता. उजव्या बाजूला पक्की सडक खानपूरकडे गेलेली होती. त्या दिशेला जाण्यातही प्रचंड धोका होताच. सडकेपासून थोड्याशा पलीकडे दूर एक नाला वहात होता. नाल्याचा पाट बराच रुंद होता. आणि त्याच्या उजव्या बाजूला उंच डगर होती. फक्त त्याच बाजूनं लपत-छपत जाणं शक्य होतं, सडकेवरून चालत जाण्यात धोका होताच. नाल्यात पाणी जवळजवळ नसल्यासारखंच होतं. नाल्याचं पात्र कोरडं आणि वाळूनं भरलेलं होतं, आणि दगड-धोंड्यांनी पार आटून गेलेलं होतं.

दोघांनीही सडक ओलांडली, आणि थोडं दूर जाऊन ते नाल्याकडे उतरू लागले. तोपर्यंत दंगेखोर गावाच्या अगदी जवळ पोहोचले होते आणि याच दिशेनं पुढे पुढे सरकत येत होते. सगळं आसमंत त्यांच्या नाऱ्यांनी आणि ढोल व टाळ्यांच्या आवाजांनी भरून गेलेलं होतं.

हरनामसिंह आणि त्याची बायको नाल्यात उतरत असतानाच वरून कुठून तरी क्षीण आवाज आला:

"बन्तो तेरा रब्ब राखा
सरबद्ध दा रब्ब राखा."

मैना त्यांच्या मागंमागंच उडत आलेली होती आणि झाडावर जाऊन बसली होती.

त्याच वेळी दंगेखोर एका टेकाडावर पोहोचले होते. त्या टेकाडाचा उतार संपायचा तिथंच खालच्या बाजूला हरनामसिंहाचं दुकान होतं. दंगेखोर आरोळ्या ठोकत होते, मोठमोठ्यानं नारे देत होते, आणि ढोल बडवत खाली उतरत होते.

चंद्र उगवलेला होता, आणि सगळीकडे पसरलेल्या चांदण्यात प्रत्येक झाडामागं आणि प्रत्येक दगडामागं कुणीतरी अज्ञात शत्रू लपलेला आहे असा भास होत होता. नदी कोरडी ठणक होती आणि चांदण्यात नदीचं पात्र स्वच्छ पांढरी चादर अंथरल्यासारखं वाटत होतं. पति-पत्नी उंच काठावरून उतरून खाली आले होते आणि आता त्या उंच कडेच्या आडूनच हळूहळू उजव्या बाजूनं पुढं चालले होते. नदीचा काठ अनेक लहान-मोठ्या दगडांनी गच्च भरलेला होता, आणि तिथून

जाताना दोघांनाही धाप लागली होती. दोघांचेही कान दंगेखोरांच्या दिशेला वळलेले होते.

कोलाहल आधी जवळजवळ येत गेला आणि मग थांबला. हरनामसिंहाला वाटलं, दंगेखोर त्याच्या दुकानासमोर थांबले आहेत, आणि काय करावं या विचारात पडले आहेत. हरनामसिंहानं मनातल्या मनात करीमखानचे आभार मानले. यानं ऐन वेळेवर सांगितलं म्हणून बरं, नाहीतर पळताही आलं नसतं. तेवढ्यात कशावर तरी जोरजोरात बडवल्याचा आवाज येऊ लागला. दंगेखोर त्याच्या दुकानाचा दरवाजा तोडू लागले आहेत, हे हरनामसिंहाच्या लक्षात आलं. पुढं जाण्यासाठी दोघांचेही पाय लटपटत होते. दोघंही एकमेकांचा हात धरून हळूहळू सरकत होते.

"वाहे गुरूचं नाव घेऊन चालत राहा," हरनामसिंह बायकोला आपल्याकडे ओढत म्हणाला.

तशातच एक कुत्रं भुंकू लागल्याचा आवाज आला. दोघांनीही डोळे वर करून पाहिलं. वरच्या उंच काठावर सांडलेल्या चांदण्यात एक भयानक काळ्या रंगाचं कुत्रं उभं राहून त्यांच्याकडे बघून भुंकत होतं. हरनामसिंह एकदम थिजून गेला. आता काय होईल? गुरुमहाराज कोणत्या पापाची इतकी भयानक शिक्षा देऊ लागलेत? कुत्र्याचं भुंकणं ऐकून ते या बाजूला येतील, आणि आपण या बाजूनं पळून चाललो आहेत हे त्यांना सहजच कळेल.

"तुम्ही चालत राहा हो, थांबू नका," बन्तो म्हणाली.

कुत्रं सारखं भुंकतच होतं. नेहमी त्यांच्या दुकानासमोर भटकणारं आणि जागोजागी तोंड खुपसणारं झिपरं कुत्रं. बराच वेळ चालत राहिल्यानंतर बन्तोनं मागं वळून पाहिलं. कुत्रं अजूनही टेकाडावर उभं राहून भुंकतच होतं, पण त्या टेकाडाच्या काठाकाठानं किंवा खाली उतरून पुढे काही आलं नव्हतं.

ते पुढे जातच राहिले.

"कसं तरी करून हे गावं मागे पडलं की झालं, पुढे देवावर हवाला आहे."

"कुत्रं तिथेच थांबलय, पुढे येत नाहीय."

"पण भुंकत तर आहे."

एका मोठ्या शिळेमागे लपून दोघंही कुत्र्याचं भुंकणं कान देऊन ऐकू लागले. तिकडं दुकानाचा दरवाजा तुटून खाली पडला होता, आणि 'या अली!' असं ओरडत दंगेखोर आत घुसले होते.

"लुटू लागलेत. आमचं घरदार लुटू लागलेत!"

पण कुत्र्याच्या भुंकण्याकडे कुणाचंही लक्ष गेलं नव्हतं. दोघंही पहिल्यापेक्षा जास्तच निश्चिंत झाले होतं. लक्ष गेलंही असतं तरी त्यांनी पाठलाग केला नसता,

यांना मारून काय मिळणार होतं. दुकानात तर कितीतरी माल हाती लागणार होता.

"आता कुणाचं दुकान न् कुणाचं घर! सोडून आलोत तर आमचं काय राहिलंय तिथं!" बन्तो म्हणाली.

चांदण्यात चमकणाऱ्या नदीच्या पात्राचा विस्तार, कुठंकुठं उगवलेली झाडं-झुडपं, टेकाडावर उभं राहून भुंकणारं झिपरं कुत्रं-सगळं एखाद्या विशाल स्वप्नासारखं होतं. किती लवकर सगळं बदललेलं होतं. वीस वर्षं एका जागी राहिल्यानंतर पापण्या लवताच ते परके झाले होते, आणि बेघर झाले होते. हरनामसिंहाचा हात थंड आणि घामानं भिजून चिंब झाला होता. पण सारखं-सारखं तो एकच एक वाक्य उच्चारायचा, "चला निघा, आता जमेल तसं पुढे चला!"

गाव मागे राहिलं होतं. कुत्रं अजूनही काठावरच उभं होतं. ते पुढे आलं नव्हतं. काही वेळानं कदाचित आपोआप परत जाईल. दुकानाची लूटमार चालू होती, दंगेखोरांचा गोंधळ थांबला होता, लुटीच्या सामानानंच ते संतुष्ट झाले असावेत असं वाटत होतं. की आता ते त्यांना शोधायला निघतील? आता फक्त दगडाधोंड्यांवरून अडखळत चालताना होणाऱ्या पावलांचा आवाजच ऐकू येत होता, आणि सगळ्या आसमंतात निस्तब्धता पसरलेली होती.

चालत चालत थोडंसं दूर आल्यावर बन्तोला आभाळात लाल रंगाचा प्रकाश फैलावत असल्याचं जाणवलं. तिनं वळून पाहिलं तर नाल्याच्या उंच काठावर मागे गावाच्या दिशेनं आभाळ लाल होत असल्याचं तिला दिसलं. बन्तो बघतच राहिली.

"बघा हो, काय आहे ते?"

"काय असणार बन्तो, दुकान जळू लागलंय, दुसरं काय?" हरनामसिंह म्हणाला. तोही उभाच राहून तिकडेच बघत होता. थोडा वेळ ते मंत्रमुग्ध झाल्यासारखे आगीच्या ज्वालांकडे बघत राहिले. आपल्या घरातून उठणाऱ्या ज्वाला दुसऱ्यांच्या घरातून उठणाऱ्या ज्वालांपेक्षा नक्कीच वेगळ्या असल्या पहिजेत, नाहीतर ते मूर्तीसारखे स्तब्ध उभे राहून त्या ज्वालांकडे इतके एकटक का बघत राहिले असते?

"सगळं खाक झालं!" हरनामसिंह गळालेल्या आवाजात म्हणाला.

"डोळ्यादेखत सगळी राखरांगोळी झाली!"

"वाहेगुरूला हेच मान्य होतं!" त्यानं थंड श्वास घेतला आणि मग ते पुन्हा चालू लागले.

भिंती माणसांना लपवून ठेवतात, पण इथं एकही भिंत नव्हती. फक्त टेकाड, कुठे कुठे मोठमोठ्या शिळा - त्यांच्यामागे माणूस लपू शकला असता, पण किती वेळ? काही तासांनीच रात्रीचा अंधार सरून जाईल, ते पुन्हा उघडे होतील, डोकं लपवायलाही जागा मिळणार नाही.

बन्तोचा घसा कोरडा पडत चालला होता आणि हरनामसिंहाचे पाय सारखे लडखडत होते. पण या वेळी ते दोघंच नव्हते. अगणित लोक अनेक गावांतून असेच प्राण वाचवत पळू लागले होते, अगणित लोकांच्या कानांत तुटणाऱ्या दारांचे आवाज घुमत होते. पण त्यांच्याजवळ ना विचार करायला वेळ होता, ना भविष्याच्या योजना बांधायला वेळ होता. फक्त कसा तरी जीव वाचवण्यासाठीच वेळ होता. जोपर्यंत रात्रीच्या सावल्यांनी तुम्हाला आडोसा दिलेला आहे तोपर्यंत चालत राहा. लवकरच दिवस उगवेल, चढत जाईल आणि मग आयुष्याचं संकट चारी बाजूंनी भुकेल्या लांडग्यासारखं तुमच्यावर हल्ला चढवील.

काही वेळातच ते थकून चूर झाले होते.

पण जेव्हापासून आपण सहीसलामत वाचून निसटून आलो आहोत याची जाणीव त्यांना झालेली होती तेव्हापासून दोघांच्याही डोळ्यांसमोर आपल्या मुलामुलींची चित्रं तरळू लागली होती. इकबालसिंह यावेळी कुठं असेल, त्याच्यावर काय प्रसंग ओढवला असेल, आणि जसबीर कुठं असेल? जसबीरची त्यांना फार काही काळजी नव्हती, कारण जसबीर मोठ्या गावात होती. तिथं त्यांच्या जातीचे लोक मोठ्या संख्येनं वस्ती करून होते. तिथं सगळी शीख-संगत गुरुद्वारात एकत्र आली असेल, त्यांनी आपल्या बचावाचा काहीतरी मार्ग काढला असेल हेही शक्य आहे. पण इकबालसिंह एकटाच होता आणि छोट्याशा गावात त्याचं कापडाचं दुकान होतं. कदाचित वेळ निघूनही गेली असेल, किंवा मग तोही आमच्यासारखाच रानावनातून एकटाच पळत सुटला असेल! सगळेच विचार व्याकुळ करणारे होते. हरनामसिंहानं डोळे मिटून घेतले, हात जोडून गुरुमहाराजांचं नाव घेतलं, आणि मग गुरुवाणीतले तेच शब्द पुन्हा उच्चारले,

"जिसके सिर उपरि तू सुआमी
सो दुःखु कैसा पावै!"

जेव्हा तांबडं फुटायची वेळ आली तेव्हा ते एका छोट्याशा झऱ्याजवळ काठावरच्या दगडावर बसले होते. हरनामसिंहाला हा भाग माहीत होता. ते ढोक मुरीदपूर नावाच्या एका छोट्याशा खेड्याजवळ पोहोचले होते. सगळी रात्र चिंतेत, दोलायमान अवस्थेत आणि रखडण्यातच गेली होती. पण उजाडायच्या आतच मनाला एकदम शांती मिळाली. पिवळ्या लुकाटांच्या बहराचा मंद वास दूरवरून तरंगत आला. ढोक मुरीदपूरला लुकाटांच्या बागा होत्या आणि त्यांच्यामधून पाट वाहत असत. आधीचा नारंगी-लाल चंद्र आता पिवळसर झाला होता. आभाळाच्या मळक्या रंगात आधी पिवळेपणा मिसळला, मग त्यात चांदी मिसळत गेली. स्वच्छ

निळाई आभाळभर पसरू लागली. आजूबाजूला पाखरं किलबिलाट करू लागली.

"आधी तोंड धुऊन घे बन्तो. मग 'जपुजी' महाराजांचा पाठ म्हणत जाऊ."

पहाटेच्या प्रसन्न क्षणांमुळे हरनामसिंहाचा विश्वास जणू पुन्हा परत आलेला होता.

"आता कुठं जायचं?" बन्तोनं काळजीच्या सुरात म्हटलं, "दिवसभर वणवण करीत कुठं भटकायचं? दोन भाकरी भाजल्या असत्या तर मग घोर नव्हता, दिवसभर बेशक इथंच एखाद्या दगडाच्या आड पडून राहिलो असतो."

"याच गावात जाऊन कुणाचं तरी दार ठोठावू. त्याच्या मनात दया असली तर आसरा देईल, नसली तर जे गुरुमहाराजांना मान्य असेल ते होईल!"

"या गावात तुम्ही कुणाला ओळखत नाहीत का?"

हरनामसिंहानं मंदस्मित केलं.

"जिथं सगळ्यांना ओळखत होतो तिथं कुणी आसरा दिला नाही, सामान लुटलं आणि घराला आग लावली. इथं अनोळखी माणसाकडून कसली आशा करायची? त्यांच्यासोबत खेळत खेळत तर तिथं मी मोठा झालो होतो..."

सकाळचं धुंधुरकं नाहीसं झाल्यावर दोघंही उठून गावात जाऊ लागले. आधी एक झाडांचा समूह लागला. त्यात तुती आणि शिसवीची झाडे होती. त्याच्या पुढे लागूनच कबरस्थान होतं. तुटक्या-फाटक्या कबरी, लहानमोठ्या कबरी, त्यांच्याच बाजूच्या एका कोपऱ्यात एका पीराची कबर असावी; कारण त्यावर दिवा तेवत होता. आणि बाजूला दोन हिरवे झेंडे फडफडत होते. मग शेतं आली. गहू पिकला होता. कापणीचे दिवस जवळ आलेले असावेत. मग सपाट छताची मातीची घरं समोर दिसू लागली. बाहेर गायी-म्हशी बांधलेल्या होत्या. कुठं-कुठं कोंबड्या आत्तापासूनच आपल्या पिल्लांसोबत दाण्यांच्या शोधात भटकू लागल्या होत्या.

"बन्तो, जर ते लोक मारायला आलेच तर मी आधी तुला मारून टाकीन, मग मला स्वतःला मारून घेईन! जिवंतपणी मी तुला दुसऱ्याच्या हाती पडू देणार नाही."

एव्हाना ते गावाबाहेरच्या घरासमोर थांबले होते. दार बंद होतं. मोठ्या लाकडाचं रंग उडालेलं दार होतं ते. कुणाचं घर होतं हे माहीत नव्हतं. दाराच्या मागं आत कोण लोक राहत होते? दार उघडलं की नशिबात काय वाढून ठेवलंय ते कळणार! हरनामसिंहानं हात वर उचलला, क्षणभरासाठी तो थबकलाच, पण मग त्यानं दरवाज्यावर थाप मारली.

15

गुरुद्वारा गच्च भरलेला होता आणि सगळी शीख-संगत मस्तीत नाचत होती. बस, अमूल्य वेळ होती. रागी अतिशय तल्लीन होऊन बंद करून गात होते:

"तुम बिन कौन मेरे गोसाई..."

संगतमधल्या सर्वांचे हात जोडलेले, डोळे मिटलेले आणि डोकं आनंदातिरेकानं हलत होतं. काही जणांनी हातावर हात ठेवत ताल धरलेला होता. हा आत्मसमर्पणाचा आवाज अनेक शतकांचं अंतर ओलांडून पुन्हा घुमू लागलेला होता. तीनशे वर्षांपूर्वीही शत्रूशी लढाई करण्यापूर्वी असंच गाणं गायिलं जायचं. आत्मबलिदानाच्या भावनेनं ओथंबून गेल्यामुळे ते सगळं काही विसरलेले होते. या विलक्षण क्षणी त्यांचा आत्मा आपल्या पूर्वजांच्या आत्म्याला जाऊन भेटला होता. ते जणू काही पुन्हा भूतकाळात परतलेले होते. शीख जातीवर पुन्हा एकदा संकट आलेलं आहे, आणि तेही पुन्हा एकदा तुर्कांकडूनच आलेलं आहे. त्यांची चेतना पुन्हा एकदा शतकांपूर्वीच्या वातावरणात श्वास घेत होती. कोणत्या बाजूनं सैन्य येईल ते अजून कळालेलं नव्हतं. बाहेरून येईल, की गावातूनच आरोळ्या ठोकत येईल ते अजूनपर्यंत स्पष्ट झालेलं नव्हतं. शत्रूचा काहीच भरंवसा नव्हता. पण संगतमधला प्रत्येक सिंह शिर तळहातावर घेऊन बसलेला होता.

गुरुद्वाऱ्यात मागच्या दोन खिडक्यांमधून प्रकाश येत होता. खिडक्यांच्या वर लाल, हिरव्या आणि पिवळ्या रंगाच्या काचा लावलेल्या होत्या. चार लाकडी खांबांच्या मध्ये गुरुग्रंथ साहेबाचा चौक होता. चौकाच्या आजूबाजूला पितळी कठडा लावलेला होता. चौक लाल रंगाच्या रेशमी कपड्यानं झाकण्यात आलेला होता, आणि कपड्याला सोनेरी रंगाची किनार होती. कापडाची एक बाजू फरशीपर्यंत आलेली होती आणि फरशीवर पांढऱ्याशुभ्र चादरी अंथरलेल्या होत्या. जागोजागी चौकासमोर, फरशीवर दोन आण्यांची, चार आण्यांची नाणी विखुरलेली होती; एका बाजूला पिठाचा ढीग होता.

प्रवेश केल्यावर गुरुद्वारात डाव्या बाजूला स्त्रिया बसलेल्या दिसत होत्या. सर्वांनी चेहऱ्यावरून ओढणी घेतलेली होती, सर्वांचे चेहरे चमकत होते, सर्वांच्या डोळ्यात आत्मसमर्पणाचं तेज झळाळत होतं. काही काही स्त्रियांच्या कमरेवर कट्यार लटकत होती. प्रत्येकाच्या रोमारोमांत एक गोष्ट भिनलेली होती. ती म्हणजे,

संकटकाळी आपल्या पूर्वजांप्रमाणंच आत्मबलिदानासाठी मैदानात उतरणं, ही शीखांच्या इतिहासाच्या दीर्घ शृंखलेतली एक कडी आहे.

सगळी शस्त्रास्त्रं लांबलचक व्हरांड्यात आणि ग्रंथीच्या खोलीत जमा केली जात होती. गावातल्या सात गुरुसिंघांजवळ दुनळी बंदुकी होत्या आणि काडतुसांच्या पाच पेट्या होत्या. संरक्षणाची व्यवस्था जत्थेदार किशनसिंहाकडे होती. किशनसिंहानं पूर्वी ब्रह्मदेशाच्या लढाईत भाग घेतलेला होता, आणि ब्रह्मदेशातल्या लढाईचे डावपेच तो आपल्या या लहानशा शहरगावी असलेल्या मुसलमानांवर वापरू इच्छित होता. संरक्षणाची आज्ञा झाल्यानंतर तो घरी जाऊन आपला खाकी सदरा घालून आला होता; सदऱ्यावर ब्रिटिश सरकारची तीन पदकं आणि अनेक रंगीत फिती लावलेल्या होत्या. सदऱ्याला घड्या पडलेल्या होत्या, पण या वेळी त्याला इस्त्री करण्याइतपत अवधी नव्हता. दोन बंदुकांचा एक मोर्चा गल्लीच्या डाव्या तोंडाशी एका घरात बांधलेला होता, आणि दोनच बंदुकांचा दुसरा मोर्चा गल्लीच्या उजव्या कडेला होता. शेवटी डाव्या बाजूचा मोर्चा निष्फळ झाल्याचं सिद्ध झालं होतं, कारण त्या घरात राहणारा हरीसिंह आपल्या शेजाऱ्यांवर गोळी चालवायला शेवटपर्यंत कचरला होता. उरलेल्या तीन बंदुकांचा मोर्चा गुरुद्वाराच्या छतावर ठेवण्यात आलेला होता. आणि स्वतः किशनसिंह सगळा वेळ गुरुद्वाराच्या छतावर खुर्ची टाकून बसला होता. बंदुकांचा वापर एवढ्यापुरताच होता. बाकीची हत्यारं म्हणजे भाले, बरच्या, तलवारी, लाठ्या-काठ्या वगैरे होती. गुरुद्वाराच्या मागच्या भिंतीला टेकून काही हत्यारं ठेवलेली होती. रंगीबेरंगी मखमली म्यानात ठेवलेल्या तलवारी एकाला जोडून दुसरी अशा ठेवण्यात आल्या होत्या. खिडकीतून त्यांच्यावर सरळ उन्हाची तिरीप पडत असल्यामुळे त्या फारच प्रभावशाली वाटू लागल्या होत्या. प्रकाशाची किरणं भाले आणि बरच्यांच्या टोकांवरही पडत होती, त्यामुळे भरले-बरच्याही झगमगत होत्या. निहंग शीखांकडून काही ढालीही मिळालेल्या होत्या. दोन निहंगसिंह छतावर पहारा देऊ लागले होते. निळा पोशाख, निळी पगडी, पगडीवर लोखंडाचं चक्र आणि पिवळा कंबरपट्टा. दोघंही छाती ताणून, हातात भाले घेऊन उभे होते. एक छताच्या एका टोकाला आणि दुसरा दुसऱ्या टोकाला दूरवर न्याहाळत पहारा करत होते. सैन्य कोणत्या बाजूनं धूळ उडवीत येईल, कुणास ठाऊक!

"निहंगसिंहजी, भाला खाली धरा, उन्हात त्याचं टोक चमकत आहे. त्यामुळे शत्रू त्याला दुरूनच ओळखू शकेल," एकदा किशनसिंहानं समजावून सांगितलं तर निहंगसिंहाला फार राग आला.

"निहंगसिंहाचा भाला कधीच खाली होऊ शकत नाही," निहंगसिंहानं

उत्तर दिलं, आणि तसाच भाला वर धरून तो क्षितिजाकडे डोळे लावून उभा राहिला. निहंगसिंहाच्या डोळ्यांसमोर तीच पूर्वीच्या लढायांची चित्रं तरळत होती. सैन्य आगेकूच करीत यायचं, तलवारी तळपायच्या, घोडे किंचाळायचे, नगारे आणि शंखाचा जोश उसळू लागला होता.

दोन निहंगांना गुरुद्वाराच्या प्रवेशद्वारासमोर तैनातीला ठेवण्यात आलं होतं. दोघांच्याही हातात भाले होते आणि दोघेही फार तत्परतेनं उभे होते. दोघांनीही मिश्यांवर ताव दिलेला, निळा पोषाख केलेले आणि पिवळा कंबरपट्टा बांधलेला होता. पूर्वीच्या काळी खालसा पिवळा वेष धारण करून रणांगणावर उतरत. या वातावरणात प्रत्येकाचा शक्य तेवढा प्रयत्न करून आपल्या पोशाखात त्या अखंड परंपरेचं काही ना काही चिन्ह ठेवावं असा प्रयत्न होता. त्यामुळे आपल्या भूतकाळाशी संबंध प्रस्थापित करता येईल अशी समजूत होती.

बिशनसिंह बांगडीवाल्यानं पिवळ्या रंगाचा रेशमी रुमाल आपल्या पगडीत खोचला होता; बिशनसिंहाची ड्युटी खालसा लंगरमध्ये लावण्यात आलेली होती. वसंतपंचमीच्या जत्रेनंतर त्यानं आपल्या पोराच्या डोक्यावरचा पिवळा रुमाल काढून घेऊन खिशात ठेवलेला होता. आज अचानकच खिशात हात घातल्यावर त्याला हा रुमाल सापडला होता; म्हणूनच त्यानं तो आपल्या पगडीत खोचला होता. संगतमधल्या काही काही जणांनी कंबरपट्टाही बांधलेला होता, पण बहुसंख्य लोक सलवार-कुडत्यातच होते. एवढंच काय, सरदार किशनसिंहानंही आपल्या पदक लावलेल्या खादी सदऱ्याखाली पायजामाच घातलेला होता. पण पोषाखाकडे लक्ष देण्याची ही वेळ नव्हती. उरात बलिदानाची भावना उसळी मारत होती, आणि त्यावेळी पोषाख आणि वर्दीचं लक्षात आलं तरीही ते प्रत्येक बाबतीत परंपरेशी संबंध प्रस्थापित करण्याच्या भावनेमुळेच होतं.

गुरुद्वाराचं वातावरण भरून आलेल्या ढगांसारखं गंभीर होऊ लागलेलं होतं. सगळेजण कीर्तनात माना डोलवत होते, सर्वांच्या चेतनमानसात भूतकाळात असलेल्या सर्व गोष्टीच उफाळून वर येत होत्या-बलिदानाची भावना, मुसलमान शत्रू, ढाल, तलवार, गुरूचा प्रसाद, अखंड एकता. त्यांच्या चेतन मानसात नसलेली गोष्ट म्हणजे फक्त इंग्रजच. त्यांच्या त्या कसब्यापासून म्हणजेच शहरवजा गावापासून पन्नासेक मैलांच्या अंतरावर इंग्रजांची देशातली सर्वात मोठी छावणी होती, पण त्या छावणीकडे त्यांचं लक्ष जात नव्हतं. शहरात आणि प्रांतात असलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांकडेही त्यांचं लक्ष नव्हतं-जणू या देशात त्यांना काही अस्तित्वच नव्हतं. अस्तित्व होतं ते तुर्कांचं, खालसांचं, त्यांच्यावर चालून येणाऱ्या सैन्याचं, सर्वजण आपल्या प्राणांची आहुती टाकण्यासाठी सज्ज झालेल्या

आत्मबलिदानाच्या महायज्ञाचं.

गोळीबाराचं भय सर्वात जास्त गुरुद्वाराच्या मागच्या बाजूनंच होतं. तिथं हिरव्या कठडेवाल्या शेखांच्या घराघरांतून मोठ्या प्रमाणावर हत्यारं गोळा करण्यात येत होती. शेखाच्या घरातही जवळजवळ तशीच भावना पसरलेली होती-तिथं गावातले सगळेच मुसलमान, शेतकरी, तेली, नानवाले वगैरे सगळे मुसलमान आता 'मुजाहिद' (धर्मरक्षणासाठी लढणारे) झालेले होते, 'काफिरां'विरुद्ध (गैरमुसलमान) 'जिहाद' (धर्मयुद्ध)ची तयारी सुरू झालेली होती. इथंही प्रत्येकाच्या डोळ्यात रक्त उतरलेलं होतं आणि कुर्बानीची भावना उचंबळून येत होती.

गुरुद्वाराच्या अगदी समोर गल्लीच्या पलीकडे शीखांच्याच दुकानांची रांग होती आणि दुकानाच्या मागे मोठा उतार होता. उतार सरळ एका लहानशा नदीपर्यंत गेलेला होता आणि नदीच्या पलीकडे भलीमोठी लुकाटांची फळबाग होती. म्हणून समोरून तर कुणी माईचा लाल हल्ला करू शकत नव्हता. जो कुणी आला असता त्याला छतावरच्या किशनसिंहाच्या बंदुकीनं जमीनदोस्त केलं असतं.

डाव्या हाताला गल्लीच्या टोकाशी मुसलमानांची काही घरे होती आणि त्यांच्यामागे खालसा स्कूलची इमारत उभी होती. मग तिथून पुढं शेतं होती. उजव्या बाजूलाही गल्लीच्या टोकाला मुसलमानांचा एक संपूर्ण मोहल्ला सुरू होत होता, पण तिथंही मोर्चा बांधलेला होता.

गुरुद्वाराच्या पिछाडीला दोन गल्ल्या सोडून शेख गुलाम रसूलचं उंच दोन मजली घर होतं आणि गुप्तहेराच्या माहितीप्रमाणं मुसलमानांनी त्याला आपला किल्ला बनवलेला होता. त्याच घरात हत्यारं गोळा केली जात होती. कठड्यामागची सगळीच दारं बंद होती, आणि वर हिरव्या खिडक्यांची पावसाळी खोलीही बंद होती. सज्ज्यात कुणीही उभं असलेलं पाहण्यात आलं नव्हतं. पण सगळ्यांच्या नजरा याच घरावर होत्या. पहिली गोळी इथून डागण्यात येईल म्हणून असतील कदाचित.

तसं पाहिलं तर हे गाव फार सुंदर होतं. शांततेच्या काळात कुणीही इथं आलं असतं तर या गावाच्या सौंदर्यानं मुग्ध झाल्याशिवाय राहिलं नसतं. छोट्याशा नदीकाठच्या छोट्याशा पहाडावर घोड्याच्या नालेच्या आकारासारखं वसलेलं हे गाव होतं. नदीच्या निळ्या जलप्रवाहाच्या पलीकडं लुकाटांच्या घनदाट राया होत्या आणि त्यातून अनेक झरे वाहत होते. या वेळी लुकाटांच्या फळबागा ऐन बहरात होत्या आणि पोपटांच्या झुंडीच्या झुंडी या झाडांवर वस्ती करून होत्या. या दिवसांत नदीचा रंगही आजूबाजूच्या रंगासारखा गडद निळा झालेला होता. जमिनीतली

मातीही भुरकट तांबड्या रंगाची होती. गावाबाहेरची शेतं या भागाच्या पाठीशी असलेल्या पहाडापर्यंत पसरलेली होती. पहाडाचा रंग क्षणाक्षणाला बदलत असायचा. कधी तो पहाड झिरझिरीत निळी चादर पांघरून घ्यायचा, कधी त्याचा चेहरा तापलेल्या तांब्यासारखा चमकताना दिसायचा, कधी त्याच्या खांद्यावर काजळी ढग खेळत असायचे, कधी त्याच्यावर हिरवळ अंथरलेली असायची. या पहाडाच्या पोटाशीही झरे होते, आणि घनदाट वडाची व अंजिराची झाडं होती. याच निसर्गरम्य परिसराच्या कुशीत या गावातले लोक पिढ्यान पिढ्या रहात होते.

अचानक गुरुद्वारात विजेसारखी लहर पसरत गेली. सगळ्यांचे डोळे प्रवेशद्वाराकडे वळले होते, आणि दारातून गावाचे मुख्य सरदार तेजासिंहजी प्रवेश करत होते. गुरुद्वाराच्या ओट्यावर चढून तेजासिंहजी गुडघे टेकून बसले आणि मग पुढे वाकून त्यांनी गुरुद्वाराच्या उंबरठ्याचं डोळ्यांनी चुंबन घेतलं. ओट्यावर ठेवलेल्या त्यांच्या दोन्ही हातांची बोटं थरथरत होती.

खूप वेळपर्यंत तेजासिंहजींनी आपलं मस्तक उंबरठ्यावर नमवलेलं होतं. त्यांच्या डोळ्यांतून आसवं टपटप वहात राहिली. तेजासिंहजी प्रार्थना करत होते. त्यांचा रोम रोम पंथाचं रक्षण करण्यासाठी ओवाळून टाकण्यात आलेला होता.

मग ते उठले आणि दोनही हात बांधून, मान खाली झुकवून ते आले आणि गुरु ग्रंथसाहेबांच्या पीठासमोर माथा झुकवण्यासाठी ते वाकले. त्यांच्या शुभ्र दाढीनं छाती झाकून टाकलेली होती. इथंही ते बराच वेळ नतमस्तक झालेले होते. त्यांचा चेहरा लाल झालेला होता, आणि पांढऱ्या स्वच्छ चादरीवर आसवं टपटप गळतच होती.

सगळी संगत श्वास रोखून ते बघत होती, सगळ्यांचे ऊर भरून आलेले होते. जेव्हा तेजासिंहजी आले तेव्हा सगळ्या हॉलमधून एक लहर उसळत गेल्यासारखं झालं.

ते उठले आणि संथपणे चालत एका खांबाजवळ जाऊन उभे राहिले. तिथं एक जुनी तलवार खांबाला टेकवून उभी केलेली होती. ही त्यांच्या आजोबांची तलवार होती आणि त्यांचे आजोबा महाराजा रणजितसिंहांच्या दरबारात होते.

तलवार उचलून घेण्याचाच उशीर की सगळ्या संगतमध्ये बलिदान-भावनेची भरती उचंबळून आली. डोकी हलू लागली. दरवाज्याजवळ उभ्या असलेल्या तरुण प्रीतमसिंहाच्या तोंडातून सहजपणे नारा उमटला : 'जो बोले सो निहाल!'

सगळ्या संगतनं एका आवाजात उत्तर दिलं : 'सत् सिरी अकाऽऽऽल!'

नाऱ्याच्या निनादानं गुरुद्वाराच्या भिंती थरथरल्या. खरं तर नारा लावण्यावर

बंदी होती. सगळी शीख संगत गुरुद्वारात एकत्र झाली आहे हे शत्रूला कळणं संगतला नको होतं. पण काही गोष्टींवर माणसांचा ताबा असत नाही. ह्या तीव्रतर असह्य भावनेला नाऱ्यातूनच व्यक्त केलं जाऊ शकत होतं.

म्हाताऱ्या हातांनी तलवारीची मूठ पकडली आणि ती उचलून तिचं दोन्ही डोळ्यांनी चुंबन घेतलं. सगळ्या संगतनं हुंदका दिला. प्रवेशद्वाराजवळ उभ्या निहंगाचं डोकं उजव्या-डाव्या बाजूला डोलू लागलं. शेकडो डोकी हलू लागली.

"आज पुन्हा खालसा पंथाला गुरूच्या सिंहाची आवश्यकता आहे," त्यांनी थरथर कापणाऱ्या भावनोत्तेजक आवाजात बोलणं सुरू केलं : "आमच्या परीक्षेची वेळ आलेली आहे, आम्हाला अजमावण्याची वेळ आलेली आहे. महाराजांची या वेळी एकच आज्ञा आहे-प्राणार्पण, प्राणार्पण, प्राणार्पण!"

तेजासिंहाच्या मेंदूत सोनेरी धूळ उडू लागलेली होती. तीच मस्ती होती, तन्मयता होती. सगळ्या भावना 'प्राणार्पण' या एकाच शब्दावर केंद्रित झालेल्या होत्या.

"अरदास म्हणा, गुरूच्या सिंहांनो, अरदास म्हणा."

सगळी संगत उठून उभी राहिली. हात जोडले गेले, माथी झुकली, सगळे कंठ स्वरांकित झाले. गुरुद्वारा गुरुवाणीनं दुमदुमून गेला. खूप वेळ अरदास म्हटला गेला. शेवटच्या शब्दांच्या वेळी आपोआपच आवाज तीव्र झाला :

"राज करेगा खालसा, बाकी रहे न को..."

आवाजांच्या लहरी साऱ्या गुरुद्वाराच्या वायुमंडलात लाटांसारख्या पसरत चालल्या होत्या.

अरदास संपण्याचाच अवकाश की प्रवेशद्वाराजवळ उभ्या असलेल्या निहंगसिंहानं हात वर केला आणि तारस्वरात-त्याच्या गळ्याच्या नसा दिसू लागल्या आणि डोळे बंद झाले इतक्या तारस्वरात--पुन्हा एकदा नारा लावला :

"जो बोले सो निहाल!"

उत्तरादाखल संगतनं हात वर करून आणि छातीत खोलवर श्वास ओढून नाऱ्याचं उत्तर दिलं: "सत् सिरी अकाऽऽऽल!"

नव्यानं आवेश वाढला. नाऱ्यांच्या प्रतिध्वनीमुळे एकता आणि बलिदानाची भावना अधिकच उग्रतर होत असते.

त्याच वेळी बाहेर काही अंतरावर गगनवेधी आवाज ऐकू आला:

"नारा-ए-तकदीर!" मग उत्तर आलं:

"अल्ला-हो-अकबर!"

"नारा-ए-तकदीर!"

"अल्ला-हो-अकबर!"

प्रवेशद्वाराजवळ उभ्या असलेल्या निहंगसिंहानं पुन्हा हाताच्या मुठी आवळल्या आणि खांद्याच्या वर हात उंचावून नारा पुकारणार एवढ्यात तेजासिंहजींनी त्याला थांबवलं :

"बस्, पुरे झालं. शत्रूंना माहीत झालेलं आहे..."

पण मुसलमानांच्या उत्तरादाखलच्या नाऱ्यांनी संगतला वस्तुस्थितीची थोडी थोडी कल्पना आली.

"आमच्या ताकदीची शत्रूंना कल्पना यावी असं आम्हाला वाटत नाही. सगळी शीख संगत गुरुद्वारात जमा झालेली आहे हे त्यांना कळू नये अशी आमची इच्छा आहे. ही रणनीतीची गोष्ट आहे."

यावर संगतला परिस्थितीचा तपशील सांगताना ते म्हणाले, "आम्ही असा प्रयत्न केलेला आहे की या जिल्ह्याचे प्रमुख डेप्युटी कमिशनर साहेब यांना इथं मुसलमानांनी काय वाईटसाईट प्रकार सुरू केले आहेत, याची कल्पना देण्यात यावी. मी रिचर्ड साहेबांना ओळखतो. फारच कर्तव्यदक्ष आणि समजूतदार अशी सज्जन व्यक्ती आहे ती! जिल्हाप्रमुखापर्यंत आवाज पोहोचवण्यापेक्षा जास्त असं आम्ही काहीच करू शकत नाही. वेगवेगळ्या प्रकारच्या बातम्या आमच्यापर्यंत येऊ लागल्यात. आम्हाला असं समजलं आहे की रहीम तेल्याच्या घरात हत्यारं आणि दारूगोळा जमवण्यात येऊ लागला आहे. शिवाय असंही समजलं आहे की गडद निळ्या रंगाची एक मोटर दुपारी शहराकडून आली आणि कस्ब्याच्या बाहेर फझलदीन नावाच्या शाळामास्तराच्या घरासमोर थांबली होती. त्यातून काही सामान फझलदीनला दिलं गेलं. त्यानंतर ती मोटर सरळ पुढे निघून गेली. ही मोटर अनेक ठिकाणी जात असते आणि थांबत असते. आम्हाला असंही समजलं आहे की इथल्या मुसलमानांनी मुरीदपूरच्या मुसलमानांना पत्र पाठवून त्यांच्याकडे हत्यारांची मागणी केलेली आहे. आम्ही आमच्या बाजूनं खूप प्रयत्न करून पाहिला आहे की शेख गुलाम रसूल आणि गावातल्या इतर मुसलमानांशी संपर्क स्थापन करून त्यांच्याशी बोलाचाली करावी, पण त्यांचा काही भरंवसा नाही..."

"आपण काहीही प्रयत्न केलेला नाही. हे धादांत खोटं आहे."

-अचानक संगतमधून कुणी तरी म्हणालं आणि गुरुद्वारात एकदम स्मशानशांतता पसरली. कोण होतं ते मध्येच बोलणारं? गुरुद्वारात बसलेल्या लोकांचा पारा चढला.

एक दुबळासा तरुण उठून उभा राहिला, "आम्हाला मुसलमानांच्या विरुद्ध भडकवण्यात येऊ लागलं आहे, आणि मुसलमानांनाही आमच्या विरोधात

भडकवण्यात येत आहे हे आम्हाला नीट माहीत आहे. आपण खोट्या अफवा ऐकून ऐकून संतापत आहोत. आपण आपल्या बाजूनं जास्तीत जास्त प्रयत्न केला पाहिजे, गावातल्या मुसलमानांशी मिळून-मिसळून राहिलं पाहिजे आणि शक्यतो गावात दंगल होऊ नये असा प्रयत्न केला पाहिजे."

"बसा! बसा!"

"राष्ट्रद्रोही कोणय हा?"

"मी बसणार नाही! बंधूंनो, मी अजूनही सांगतो की आपण शेख गुलाम रसूल आणि गावातल्या इतर समजदार मुसलमानांना भेटलं पाहिजे. शेख गुलाम रसूल जर ऐकत नसला तर जाऊ द्या, गावात अजून बरेच समजूतदार मुसलमान आहेत. त्यांच्या मदतीनं आपण गावात शांतता राखली पाहिजे. त्यांना जर मुरीदपूरहून हत्यारं येत असतील तर आपणही कहुटाहून हत्यारं मागवण्याच्या प्रयत्नात नाहीत का? कत्तल आणि लुटालूट कुणालाही नकोय. या कसब्यातल्या शीख आणि मुसलमानांनी आपापसात मिलाप करून गावात शांतता राखावी. मी आज सकाळीच रसूल आणि अजूनही काही मुसलमानांना भेटलो होतो."

"तू तिथं कशाला गेला होतास? ते लोक तुझे कोण लागतात?"

"तुझा बाप आहे का गुलाम रसूल?"

"मला बोलू द्या. खोडसाळपणा बाहेरगावचे लोक करतील. या गावात बाहेरचे लोक यायला नकोत म्हणून आपण कसून प्रयत्न केला पाहिजे. आणि यावर एकच उपाय आहे, इथल्या शीखांनी आणि मुसलमानांनी एकत्र होऊन त्यांना थोपवलं पाहिजे. ते आमच्या भीतीनं हत्यारं जमवतायत आणि आम्ही त्यांच्या भीतीनं हत्यारं जमवू लागलोत..."

"मुसलमानांचा काही भरंवसा नाही. बसा!"

"तेही लोक म्हणतायत की शीखांचा काही भरंवसा नाही!"

"बसवा त्याला!" एक वयस्क माणूस उठून उभा राहिला, आणि सोहनसिंहला संबोधून रागारागात बोलू लागला, "तू कोण आहेस मध्ये बोलणारा? अरे, तुझ्या ओठावरचं दूध अजून वाळलं नाही आणि मोठ्यांच्या मध्ये बोलतोस?"

तीन-चार सरदार आपापल्या जागांवर उभे राहिले होते, "तुला माहीतय का की त्यांनी मंडी जाळलीय ते?"

"हा सगळा इंग्रजांचा उपद्व्याप आहे," सोहनसिंहाचा आवाज जास्तच चढला होता, "दंगा होऊ नये यातच आमचं भलं आहे. ऐका बंधूंनो, आज शहराकडून एकही बस आली नाही. रस्ते बंद करण्यात येऊ लागलेत. हा सगळा भाग मुसलमानी आहे. जर या गावावर बाहेरच्या मुसलमानांनी हल्ला केला तर तुम्ही त्यांचा मुकाबला कसा काय करणार आहात? कहूटाहून तुम्हाला किती मदत मिळणारय? तुम्ही कशाच्या जिवावर एवढा अभिमान बाळगता आहात?" थोडा वेळ गुरुद्वारात एकदम शांतता पसरली.

मग तेजासिंहजी गुरुद्वाराच्या मध्यभागी येऊन उभे राहिले, आणि मग कापऱ्या आवाजात बोलू लागले, "आमचीच मुलं आम्हाला चुकीच्या रस्त्यानं नेत आहेत हे बघून माझ्या हृदयाचे तुकडे-तुकडे होत आहेत. आपल्याच पंथाच्या विरुद्ध बोलत आहेत. आम्हाला दंगेधोपे हवे आहेत का? मी स्वतः गुलाम रसूलशी बोललो आहे, त्यानं आपल्या छातीवर हात ठेवून सांगितलं होतं की गावात काहीही होणार नाही. आणि माझी पाठ वळण्याचा अवकाश की काही लोकांनी खालसा शाळेवर हल्ला केला, तिथल्या ब्राह्मण शिपायाला मारून टाकण्यात आलं आणि मुसलमानांनी त्याच्या बायकोला पळवून नेलं. ही गोष्ट मी अजून आपल्याला सांगितली नव्हती, कारण मला आपल्या भावना भडकवायच्या नव्हत्या."

दुःखाची आणि संतापाची एक लाट गुरुद्वारात पसरली.

"आपल्याला कुणीतरी चुकीची बातमी सांगितली आहे," सोहनसिंह पुन्हा बोलू लागला, "खालसा शाळेवर हल्ला झाला होता नक्कीच, पण गावातल्या मुसलमानांनी तो हल्ला केला नव्हता. ढोक इलाखीबख्शहून काही गुंड आले होते. पण शहरातून आलेला आमचा साथी मीरदाद वेळेवर तिथं पोहोचला, त्यानं आणि गावातल्या दोन-चार मुलांनी मध्ये पडून परिस्थिती चिघळू दिली नाही. शिपायाला फक्त एक-दोन जखमा झाल्या, तो मेला नाहीय, आणि त्याच्या बायकोलाही कुणी पळवून नेलं नाहीय, ती अजूनही शाळेतच आहे."

"हा मीरदाद कोणय?" एका सरदारनं विचारलं.

"मी याला मीरदादसोबत कॉफीच्या दुकानात बसलेलं पाहिलं आहे. ते आपापसात काय बोलत होते कुणास ठाऊक! जेव्हा मुसंडे आमच्या बायकांची इज्जत लुटतायत तेव्हा इकडं आमचीच पोरं त्या मुसंड्याशी दोस्ती करतायत." मग त्या कृश सरदाराकडे तोंड वळवून तो म्हणाला, "आम्हाला काय समजावतोस? त्या मुसंड्यांकडे जाऊन समजावून सांग. आतापर्यंत शीखांनी कुणाला मारलंय का? कुणाचं घर लुटलंय का? फार आलाय उपदेश करणारा!"

हवा बदलत गेली. दरवाज्यावर उभा असलेला निहंगसिंह चालत चालत, एकेक पाऊल उचलीत त्या कृशकाय सरदाराजवळ आला. त्यानं सरळ एक सणसणीत चापट त्या सरदाराच्या मानेवर हाणली.

"पुरे पुरे! मारू नका, मारू नका!"

जवळ बसलेली काही माणसं उठली आणि त्यांनी निहंगसिंहाचा हात धरला.

जेव्हा हा गोंधळ गुरुद्वारात चालला होता, त्याचवेळी मुसलमानांच्या मोहल्ल्यात मीरदादचा जीवही असाच भयंकर आपत्तीत सापडलेला होता.

तीन कसायांची दुकानं आजूबाजूला होती. यावेळी ती बंदच होती आणि काही लोक ओट्यावर बसून मीरदादशी वाद घालत होते.

"ए, गप रे, गप बस, इंग्रजाला कुणी पाहिलंय? शहरात किती तरी मुसलमान मारले गेलेत, त्यांची प्रेतं अजून गल्लीतच पडून आहेत. त्यांना काय इंग्रजांनी मारलंय? मशिदीसमोर डुक्कर मारून टाकलं तेही इंग्रजांनीच फेकलं होतं काय? "

"अरे, काही समजून घ्या." मीरदादनं हात झटकून सांगितलं, "जर हिंदू-मुसलमान-शीख एकत्र आले, त्यांच्यात एकजूट झाली, तर इंग्रजांची स्थिती फारच कमजोर होईल. जर आम्ही आपापसात लढत राहिलो तरच त्यांची स्थिती भक्कम होत जाईल."

लोक रोज हे ऐकून ऐकून कंटाळले होते. हा घासलेला-झिजलेला तर्क होता. पण आता पाणी डोक्यावरून गेलं होतं. या तर्काचा काहीही परिणाम होणं शक्य नव्हतं.

"जा-जा, डोकं जरा बदामाच्या तेलानं मालीश करून घे," जाड्या कसायानं म्हटलं, "अबे, आमचं इंग्रजांनी काय बिघडवलंय बे, हिंदू-मुसलमानातला झगडा फार पूर्वीपासून चालत आलेलाय. काफीर हा का काफीरच असतो आणि जोपर्यंत तो इस्लाम धर्माचा स्वीकार करीत नाही तोपर्यंत तो शत्रूच असतो. काफिराला मारणं हे पुण्यकर्मच आहे."

"अरे ऐक काका," मीरदाद म्हणाला, "राज्य कुणाचंय?"

"कुणाचंय, इंग्रजांचंय, अजून कुणाचंय?"

"सैन्य कुणाचंय?"

"इंग्रजांचंय," कसाई म्हणाला.

"तर मग त्याला लढाई थांबवायची असली तर थांबवता येणार नाही का?"

"थांबवू शकतो, पण त्याला आमच्या धार्मिक भानगडीत पडायचं नाही. इंग्रज न्यायप्रिय आहे."

"म्हणजे आम्ही एकमेकांचं डोकं कापायचं, आणि त्यानं पहात रहायचं, म्हणजे मग तो अधिकारी काय राहिला?"

यावर जाड्या कसाई रागारागात म्हणाला, "ऐक बे मीरदादा, लढाई हिंदू-मुसलमानांची आहे, त्यात इंग्रजांचा संबंध नाहीय. तू इथं बकबक करू नकोस. खऱ्या बापाचा असशील तर जा, आत्ता या वेळी गुरुद्वारात जा आणि त्यांना

समजावून सांग की हत्यारं गोळा करू नका. त्यांना मान्य करायला लाव. त्यांनी मान्य करावं आणि आपली हत्यारं न् दारूगोळा गुरुद्वारात ठेवून त्यांनी आपापल्या घरी जावं. आम्हालाही लढाई नको आहे. आम्ही पण घरी जाऊन बसू. बस, मर्द असलास तर त्यांच्याशी जाऊन बोल, इथं आमचं डोकं खाऊ नकोस!"

दंग्यामुळे तणाव निर्माण झाला होता तेव्हापासून मीरदाद कसब्यात जागोजागी जाऊन नानवाल्यांच्या दुकानात, चहावाल्या गंडासिंहाच्या दुकानात, शेखच्या बैठकीत, विहिरींवर, जिथं कुठं चार-पाच लोक जमलेले असतील तिथं हीच चर्चा करीत बसायचा. लोक त्याचं ऐकून घेत, कारण तो शिकलेला होता, लाहोर-मुंबई-मद्रासपर्यंत फिरून आला होता, आणि आपला लहान भाऊ अल्लाहदादकडे शहरगावी रहायला आला होता. पण कसब्यात तणाव वाढता-वाढता आणि बाहेरून अनेक प्रकारच्या बातम्या येत असताना तो एकदम एकाकी पडत चालला होता. त्याच्याजवळ आपला जमीनजुमला आणि दुकान वगैरे नसल्यामुळे त्याच्या बोलण्याला वजन नव्हतं. नानवाल्याच्या दुकानाच्या बाहेर खाट टाकून झोपायचा. इथं एक शाळा सुरू करावी या हेतूनं शहरातून इथं आला होता. शाळा सुरू केल्यावर त्याला कमाईचं लहानसहान साधन मिळेल, असं गावातल्या लोकांना वाटायचं, पण मीरदादच्या मनात हा विचार नव्हता. त्याला शाळेच्या माध्यमाद्वारे कसब्यातल्या लोकांना एकत्र घेऊन बसण्याचं एक ठिकाण हवं होतं. तिथं प्रत्येकाला येता येईल, लोक एकत्र बसू लागतील, त्यांना कुणीतरी वर्तमानपत्र वाचून दाखवील, ते प्रत्येक बारीक-सारीक घटनांचा विचार करू लागतील आणि त्यांची समज वाढू शकेल हे त्याचं स्वप्न होतं. या वेळी त्याला देवदत्तनं कसब्यातच ठाण मांडून बसायला आणि दंगल थांबवायला पाठवलं होतं. सोहनसिंहालाही याच कामासाठी पाठवण्यात आलं होतं. दोघही एकाच पार्टीचे कार्यकर्ते होते, दोघांचेही सगेसोयरे याच कसब्यात रहात होते, पण दोघांपैकी एकाचीही डाळ शिजत नव्हती.

त्याच वेळी कसायांच्या या दुकानाजवळ एक छोटीशी घटना घडली. दुकानापासून दूर गल्लीच्या अंधाऱ्या भागात, एका तरटाच्या पडद्यामागं बसून एक माणूस यांच्या गप्पा ऐकत होता. त्याला गुप्तहेर म्हणून गुरुद्वारातून पाठवण्यात आलेलं होतं. आजूबाजूला मुसलमानांची घरं होती, पण या तरटाच्या पडद्याच्या घरात एक वृद्ध विधवा चन्नईदेवी राहत होती आणि गोपालसिंह तिच्याच घरात बसला होता. मागच्या घराची भिंत ओलांडून गोपालसिंह इथं येऊन बसला होता. मुसलमानांच्या योजनांचा पत्ता लागू शकेल या आशेनं तो ऐकत होता. मीरदाद आणि कसायांच्यात चाललेलं बोलणं ऐकत असताना एकदा त्यानं तरटाचा पडदा

वर उचलला आणि गुपचूप गल्लीत जाऊन शेजारच्या ओट्यामागे तो लपून बसला. इथून त्यांचं बोलणं अधिक स्पष्ट ऐकू येत होतं. घरांची दार बंद होती, गल्लीत अंधार होता, आणि कुठूनही कुणाची चाहूल ऐकू आली की झटकन त्याला तरटाच्या पडद्यामागे लपता येऊ शकेल असा त्याचा अंदाज होता. पण त्याला ही संधीच मिळाली नाही. त्याचे कान त्या गप्पांवर केंद्रित झाले होते, तेवढ्यात त्याच्या मागाहून त्याला कुणाची तरी चाहूल लागली. त्यानं मागे वळून पाहिलं तर गल्लीच्या धूसर उजेडात बाजूच्याच घरातून एक माणूस ओट्याच्या दोन पायऱ्या उतरून सरळ गोपालसिंहाकडे येऊ लागला होता. सरदारजी एकदम सर्द झाला. अंधारात हे दृश्य फारच भयंकर वाटलं. तो माणूस ओटा उतरून आला होता आणि त्याचे दोन्ही हात सदऱ्याच्या खाली होते - जणू तो आपला सुरा किंवा खंजीरच काढू लागला असावा. गोपालसिंह गुप्तहेर घाबरून उठून उभा राहिला आणि त्याच्या तोंडातून किंचाळी बाहेर पडली. तरटाच्या पडद्यामागे तर जाणं शक्य नव्हतं, तो सरळ तिथून पळत सुटला. या गडबडीत त्याची सदऱ्याखाली हात असलेल्या माणसाशी जोरदार टक्कर झाली होती. वस्तुतः टक्कर होण्यापूर्वीच त्या माणसानं आपली नाडी सोडली होती आणि तो जवळजवळ नालीवर बसलेलाच होता. गोपालसिंह गुप्तहेराची नजर त्याच्या बोळकं झालेल्या तोंडावर, चंप्पी केलेल्या डोक्यावर आणि त्याच्या जवळजवळ आंधळ्या झालेल्या डोळ्यांवर पडली नाही. टक्कर झाल्यामुळे म्हातारा नूरखान नालीत पडला, आणि त्याच्या तोंडातून आरोळी आली, "मारी दित्ता, ओ मारी दित्ता!"

हे सगळं पापणी लवते न लवते तोच घडलं होतं आणि म्हाताऱ्या नूरूचा आवाज व पळत जाणाऱ्या पावलांचा आवाज ऐकून कसायांच्या दुकानावरचे दोघे जण झटकन बर्च्या घेऊन धावत आले होते. अशरफ कसाई तर पळत पळत थेट पुढे पळत गेलेल्या माणसाच्या मागेच धावला आणि जोरात त्यानं आपली लाठी फेकून मारली. गुप्तहेराला लाठी लागली नाही, पण त्याच्या अगदी जवळ पडल्यामुळे त्याचा धीर सुटला आणि तो जोरात ओरडला, "वाचवा, वाचवा, मेलो! मेलो!"

त्यामुळे आणखी काही लोक गल्लीत गोळा झाले. म्हातारा नूरू अजूनही नालीच्या कडेवर उकिडवा बसलेला होता, आणि त्याच्या हातात नाडी होती. अजूनही तो कळवळून ओरडत होता, "मारी दित्ता, ओ मिछी मारी दित्ता!"

गल्लीतून अशरफला उद्देशून लोक ओरडू लागले, "परत ये, पुढे जाऊ नकोस, परत ये!"

त्यावेळी गल्लीत उभ्या असलेल्या लोकांपैकी फक्त मीरदादच पुढे आला आणि म्हाताऱ्याला उचलण्याचा प्रयत्न करू लागला. यावर जाड्या कसाई रागानं

लालबुंद झाला, "पाह्यलंस का बे मीरदादच्या बच्च्या! नूरला इंग्रजांनी मारलं का? तात्काळ इथून निघून जा, नाहीतर अल्लाकसम, माझ्याइतकं वाईट कुणी नाही बघ! आत्ताच्या आत्ता निघून जा, आमच्या डोळ्यांसमोरून फूट, हो बाजूला!" आणि मीरदादला जवळजवळ धक्के देऊनच तिथून हाकलण्यात आलं, "आगा नाही, पीछा नाही, घरचा ना घाटचा, आला साला शांतता करायला! अबे तू आहेस कोण? ज्यांना आई विचारत नाही ते येतात साले आमच्याजवळ. फुकट्या कुठला!"

गल्लीच्या तोंडाजवळ वळून त्यानं पुन्हा बोलायचा प्रयत्न केला, पण कसाई संतापलेलाच होता. ओरडून म्हणाला, "जा-जा नीघ इथून, हलकट कुठला! एक झापड देईन थोबाडावर तर सगळे दात बाहेर येतील. जा, आपल्या बापाला लेक्चर दे."

वाकलेल्या खांद्यांचा दुबळासा मीरदाद तिथून जाऊ लागला. पूर्वी काही काही लोक त्याचं बोलणं ऐकून घ्यायचे आणि हो-हो करायचे तेही आता कुठं दिसून येत नव्हते. हाच जाड्या कसाई त्याच्याशी हसून-हसून गप्पा मारायचा. पण आता त्याच्याही डोळ्यांत रक्त उतरलेलं होतं.

गोपालसिंह गुप्तहेर पळत सुटला आणि ओरडत सुटला. गुरुद्वाराच्या जवळ जाईपर्यंत तो ओरडतच होता. संगतमधल्या लोकांमध्ये पुन्हा एकदा आवेशाची लाट उसळली. लोक घाईघाईनं बाहेर येऊ लागले. काही काळ सगळी शिस्त कोलमडून पडली. दोन्ही निहंगसिंह बाहेर आले, छतावर उभे असलेले निहंगसिंह पायऱ्या उतरून खाली आले. "काय झालं? काय झालं?" गुरुद्वाराच्या आतील बहुसंख्य लोक उठून उभे राहिले.

दहा लोकांनी अंगांग चाचपून पाहिलं गोपालसिंहाला कुठेही जखम झालेली नव्हती. तो धापा टाकत होता आणि त्याचा घसा कोरडा पडला होता. फार प्रयत्न करूनही काय झालंय ते त्याला धडपणे समजत नव्हतं.

"तो सरळ माझ्यावर वार करायला येऊ लागला होता..."

"कोण होता तो?"

"आंधळा नूर बाबा!" गोपालसिंहाच्या तोंडातून निघून गेलं. पळण्यापूर्वी क्षणभर अगोदर त्यानं बाबा नूराला ओळखलं होतं.

"अंधा बाबा नूरा?"

"मला काय माहीत कोण होतं ते? त्याच घरातून आलं होतं..."

"मग काय झालं?"

"मग कसाई गल्लीतूनही लोक आले. मी पळालो तर माझ्यावर लाठ्या फेकत होते."

गल्लीत लोकांची गर्दी जमा होऊ लागली. एक सरदारजी लोकांना हटवू लागले, "काळजीचं काही कारण नाही. सिंहखालसा सुखरूप परत आला आहे, शत्रूच्या मोर्च्यावरून परत आला आहे. बालंबाल वाचला. आत चला, संगतनं आत जावं."

जेव्हा गोपालसिंहाचा श्वास पूर्ववत नीट सुरू झाला तेव्हा हळूच तेजासिंहनं त्याला विचारलं, "काही ऐकलं का? त्यांची काय स्कीमय?"

"तिथं मीरदाद आपली बडबड करीत होता, काही ऐकूच देत नव्हता. जाड्या कसाई त्याला सांगत होताः जा, गुरुद्वारावाल्यांना सांग समजावून, आम्हाला काय सांगतोस, ते जर आपापल्या घरी निघून गेले तर आम्हीही जाऊ आपापल्या घरी... असंच काहीतरी चालू होतं."

संगत गुरुद्वारात परत आली. पण गोपालसिंहाच्या या ओरडण्यानं अधिकच जोश पसरू लागला. कीर्तन पुन्हा सुरू झालं, आणि पेट्या आणि खंजिऱ्यांचा आवाज अधिकच वाढू लागला होता.

"पाहिलंस? पाहिलंस का सरदार?" एक माणूस गुरुद्वाराच्या मधोमध उभा राहून सोहनसिंहावर ओरडत होता, "जीव वाचवून परत आला. मुसंड्यानी त्याला मारायचा पुरेपूर प्रयत्न तर केला होता ना? पाहिलंस आता? फार आलाय आम्हाला उपदेश करणारा!"

त्यावर आणखी एक सरदारजी उठून म्हणाला, "या माणसाला नजरकैदेत ठेवावं अशी माझी सूचनाय. काळकोठडीत टाकावं. याच्यावर आमचा विश्वास नाहीय. हा त्यांची हेरगिरी करत असला तर काय कळणारय?"

यावर निहंगसिंहानं पुढं होऊन सोहनसिंहाला आणखी एक थापड लगावून दिली.

"पुरे पुरे, मारू नका, मारू नका !"

"समजावून सांगायचं असलं तर, जा तुझ्या काकांना समजावून सांग! त्या शेखांना सांग! सगळा वेळ त्या शेखांच्या बाजूला बसलेला असतो. चल हो बाहेर!"आणि मग पुन्हा कीर्तन सुरू झालं.

संध्याकाळ उतरू लागलेली होती. गुरुग्रंथ साहेबाच्या पीठाच्या उजव्या-डाव्या बाजूला छतावरून खाली लटकणारे दोन हंड्यासारखे दिवे पेटवण्यात आले. दिव्यांखाली बसलेल्या तेजासिंहजींच्या निळ्या पगडीखालचा त्यांचा पांढरा दुपट्टा आणि पांढरी दाढी चमकू लागली होती. बायकांच्या उजळ चेहऱ्यांवरही प्रकाश पडला होता. भावनांनी पेटलेले चेहरे. उत्कंठा, भय, अथांग श्रद्धा आणि विश्वास त्या सर्वांच्याच डोळ्यांत दाटलेला होता. क्वचित एखाद्या युवतीचे

आश्चर्यचकित डोळे गुरुद्वाराचं आगळं वेगळं सौंदर्य न्याहाळत होते. याच तरुणीमध्ये जसबीरही बसलेली होती. जसबीर हरनामसिंह चहावाल्याची मुलगी होती. तिला याच गावात दिलेलं होतं, आणि लग्नानंतरही तिनं आपली अतूट धार्मिक प्रेरणा कायम ठेवलेली होती. ही प्रेरणा तिला आपल्या पित्याकडून बाळकडूसारखी मिळालेली होती. अरदासचं गायन चालू होतं तेव्हा संगतमधल्या आवाजाशी मेळ न साधणारा असा फक्त एकट्या जसबीरचाच आवाज होता. पातळ उंच तीव्र आवाजात ती निःसंकोचपणे गात राहिली होती. काळ्या पट्टीनं बांधलेलं एक कृपाण कायम तिच्या कमरेजवळ झुलत असे. संगतमधल्या सगळ्या लोकांना तिचा आवाज परिचित होता, आणि सगळेजण तिला गुरु-कन्या म्हणत असत. जसबीरचा प्रफुल्ल असा रुंद चेहरा सर्वात जास्त चमकत होता. जसबीर आपल्या हातानं गुरुद्वारच्या पायऱ्या धूत असे. गुरुग्रंथ साहेबांवर झाकलेल्या रेशमी कपड्यावर तिनंच बारीक कशिदाकाम केलेलं होतं. तिच्या अंतःकरणातूनच वेगवेगळ्या ऊर्मी उठत असत. आपण होऊनच उठून ती संगतला पंख्यानं वारा घालू लागायची. थंड पाणी पाजायची, संगतच्या वहाणांची देखभाल करीत बसायची आणि कधी कधी आपल्या ओढणीनं संगतच्या वहाणा स्वच्छ पुसून त्यांच्या समोर ठेवायची. कधी कधी मनात आलं तर ती संगतमधल्या लोकांचे चरण स्पर्शून त्यांना बूट घालायला मदत करायची. जेव्हापासून हे संकट आलेलं होतं तेव्हापासून तिचे डोळे सतत तेजासिंहजींच्या मुखकमलाकडे होते. जणू त्या मुखाकडून एखाद्या दैवी संदेशाची अपेक्षा असावी. त्या मुखातून हा संदेश ऐकण्यासाठी ती एकही क्षण वाया न दवडता आपले कान लावून बसलेली असायची. जवळपास अशीच भावना गुरुद्वारात बसलेल्या सर्वच स्त्री-पुरुषांच्या हृदयात घर करून होती.

तेवढ्यात छतावर गस्त घालणाऱ्या निहालसिंहाला गावापासून दूर क्षितिजाजवळ धूळ उडताना दिसली. धुळीचं वादळच होतं. त्यानं डोळे लावून पाहिलं, धुळीचं वादळ पुढे पुढे सरकताना दिसत होतं. धुळीचं वादळच होतं आणि खरोखरच या बाजूला येत होतं. त्याला आधी आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसला नाही, पण ते पाहता पाहताच त्याच्या कानांवर घोंघावणारा आवाजही आदळला. त्याचं डोकं भणाणलं. गुंडगिरी या गावातूनच होणारय अशी सर्वांचीच खात्री होती. काळू मलंग, अशरफ कसाई आणि नबी तेलीसारखे लोक दंगल घडवून आणण्यासाठी आतुर झालेले आहेत असं सर्वांनाच वाटायचं. पण दंगेखोर खरोखरच बाहेरगावाहून येऊ लागले होते. तो अजून ऐकतच उभा होता, तेवढ्यात ढोल बडवण्याचा खोल दबलेला आवाजही त्याच्या कानावर आला. पाहता पाहता परिस्थितीनं गंभीर आणि विकट रूप धारण केलेलं होतं.

खाली जाऊन तेजासिंहजींना पूर्वसूचना द्यावी असं त्याला वाटलंही. पण इथं उभं राहून शत्रूची हालचाल पाहणंही आवश्यक होतं, म्हणून सूचना देण्याचं काम त्यानं दुसऱ्या निहंगसिंहावर सोपवलं.

निहंग पळत पळतच पायऱ्या उतरला आणि शेवटच्या पायरीपर्यंत येता येता ओरडला, "तुर्क आले! तुर्क आले!"

विद्युतगतीनं ते गुरुद्वारात पसरलं आणि त्याच वेळी ढोल वाजत असल्याचा आवाजही ऐकू येऊ लागला.

तेजासिंहजी काही वेळ खरोखरचा विलक्षण अस्वस्थ झाले. खरोखरचा हल्ला होईल याची त्यांना अपेक्षा नव्हती. त्यांना वाटलं की तेल्यांच्या मोहल्ल्यात किंवा गाव-शिवेवर एखाददुसरी दुर्घटना घडेल, आणि कसब्यातले सगळे शीख जर पक्क्या निर्धारानं उभे राहिले तर एकही मुसलमानाची हात वर उचलण्याची हिंमत होणार नाही. तशी बरीच मोठी संख्या होती आणि मुसलमानांचे सगळे व्यवहार शीखांशीच होते. शीख श्रीमंत होते, त्यांच्याजवळ बंदुका होत्या आणि इतर हत्यारंही होती. पण इथं तर सगळं उलटं झाल्यासारखं वाटत होतं.

ढोल बडवल्याचे आवाज जवळ-जवळ येऊ लागले होते. 'या अली!' चा गोंगाटही अगदी जवळून ऐकू येऊ लागला होता. त्याच वेळी बुलंद आवाजात पिछाडीनं एक नारा ऐकू आला:

'अल्लाह-हो-अकबर!'

क्षणभर हॉलमध्ये एकदम अवकळा पसरली. मग गुरुद्वाराच्या आत उत्तेजित झाल्यासारखी एक लाट तरंगत गेली.

"जो बोले... सो निहाल, सत् सिरी अकाऽऽल"चा उत्तरादाखलचा नारा हवेत दुमदुमला.

"कुठल्याही गुरूच्या प्याऱ्या सिंहानं इथून बाहेर पडू नये. सर्वांनी आपापल्या मोर्चावर जावं."

जसबीर कौरचा हात आपल्या कृपाणावर गेला. सिंहांनी भिंतीकडे झेप घेऊन भिंतीला टेकून ठेवलेल्या आपापल्या तलवारी उचलून घेतल्या. सगळी संगत उठून उभी राहिली.

"तुर्क! तुर्क आले! तुर्क आले!" सर्वांच्या मुखी एवढंच होतं. "तुर्कांचं लष्कर आलंय!"

"तुर्क आले!" जसबीर कौरनं भावविवश होऊन म्हटलं, आपल्या डोक्यावरची चुनरी काढून गळ्याभोवती गुंडाळली आणि शेजारीच उभ्या असलेल्या एका बाईला गच्च मिठी मारली.

"तुर्क आले?" तिनं भावविवश होऊन विचारलं.

एव्हाना सगळ्या स्त्रियांनी आपल्या ओढण्या गळ्यात अडकवल्या होत्या, आणि 'तुर्क आले! तुर्क आले!' म्हणत एकमेकींच्या गळा पडू लागल्या होत्या. गुरूचे सिंहही एकमेकांना मिठ्या मारत हेच शब्द उच्चारत होते.

"सगळे आपापल्या जागेवर जा!"

काही सिंहांनी आपले केस मोकळे सोडले आणि म्यानातून तलवारी उपसून काढल्या होत्या.

"तुर्क आले! तुर्क आले!"

मग तीन कंठांतून एकत्रित आवाज आला,

"जो बोले सो...निहाल!"

पुन्हा सारा गुरुद्वारा दुमदुमला:

"सत् सिरी अकाऽऽल!"

युद्ध समितीचे सदस्य सरदार मंगलसिंह सोनार, प्रीतमसिंह बजाज आणि भगतसिंह पंसारी (किराणावाला) तिघेही पायऱ्या चढून छतावर गेले. तिथं तेजासिंहजी आणि किशनसिंहजींसोबत एकत्र बसून युद्धनीती ठरवणं आवश्यक होतं.

ढोल आणि टाळ वाजवत तुर्क गावात दाखल झाले. कदाचित आपल्या आगमनाची सूचना देण्यासाठी त्यांनी हवेत गोळीबार केला असावा. नाऱ्यानी आभाळ दुमदुमू लागलं होतं:

"या अली!"

"अल्लाह-हो-अकबर!"

"सत् सिरी अकाऽऽल!"

मग कुणीतरी म्हणालं की तुर्क नदीच्या बाजूनं गावात शिरणार आहेत. याचा अर्थ ते मागच्या बाजूनं उतार ओलांडून शीखांच्या घरांची लूटमार करणार, आगी लावणार. कारण घरात या वेळी फक्त काही म्हाताऱ्या लोकांशिवाय कुणीच नव्हतं, आणि धर्मरक्षणाच्या कामानं उत्तेजित झालेली त्यांची मुलं त्यांना घरीच ठेवून आली होती. अशा वेळी दंगेखोरांना घरातलं सामान लुटणं सहज शक्य होतं.

संध्याकाळच्या सावल्या अजूनही पूर्णपणे लांबल्या नव्हत्या आणि नदी, बुडत्या सूर्याच्या किरणांमुळे लाल झालेली होती. डाव्या बाजूचा टोकावरचा मोर्चा त्या घरापासून दूर होता आणि त्या घरांनाच या वेळी मोठा धोका होता.

त्याच वेळी बलदेवसिंहाला आपल्या आईची आठवण आली. तिला तो एकटीलाच घरी सोडून आला होता. आणि दिवसभर तिची आठवणही आली नव्हती. तिकडे आता आईचे प्राण धोक्यात असतील. संगतमधल्या आणखीही

काही लोकांचं हृदय धडधडत होतं. कारण आपल्या आई-बापांचं काय होईल हा विचार या लोकांना अस्वस्थ करीत होता.

बलदेवसिंहाला रहावलं नाही. बघता बघता त्यानं आपले केस मोकळे सोडले आणि विजार काढली आणि गुडघ्यापर्यंत धोतराचा कासोटा घालून, बनियन घालून नागडीउघडी तलवार डोक्यावरून फिरवत तो आपल्या घराच्या दिशेनं पळत जाऊन उभा राहिला.

"रक्ताचा बदला रक्तानंच घेऊ!" तो जोरात किंचाळला, आणि गल्लीत पळत सुटला.

काही लोकांनी त्याला माघारी वळ म्हणून ओरडून सांगितलं, पण तो पुढेच पळत राहिला.

"रक्ताचा बदला रक्तानंच घेऊ" म्हणत तो गल्लीतून पळत गेला.

दुबळासा, हाडं निघालेला बलदेवसिंह पळत असताना त्याचे पाय शेळीच्या पायांसारखे दिसत होते. लोकांना, तो डाव्या हाताच्या गल्लीकडे का पळत गेला, हे लक्षातच आलं नाही. समोर जाऊन उताराकडे वळला असता तर तो शत्रूंशी दोन हात करायला जातोय हे कळू शकत होतं; उजव्या बाजूला गेला असता तर तो रस्ता कसायांच्या गल्लीकडे जात होता. तो डाव्या बाजूला कशासाठी गेला असेल?

पण काही वेळानंतर तो गल्लीतून येऊन गुरुद्वाराकडे परतू लागला होता. त्यानं अजूनही आपल्या हातात तलवार घट्ट धरलेली होती, पण तो आता ती नाचवत नव्हता. तो जवळ आल्यावर लोकांना दिसलं की त्याची तलवार रक्तानं माखलेली होती. त्याच्या बनियन आणि धोतरावरही रक्ताचे थेंब उडालेले होते. आता तो ओरडत नव्हता, आणि पळतही नव्हता. उलट, त्याच्या चेहऱ्यावर विचित्र अशी दहशत पसरलेली होती.

तो कुणाची तरी हत्या करून आलाय हे काही लोकांच्या लक्षात आलं. गल्लीच्या कोपऱ्यावर राहणाऱ्या म्हाताऱ्या करीमबख्श लोहाराच्या छातीत तलवार भोसकून तो आला होता. आपली आई तर आता वाचू शकत नाही, तिला तुर्कांनी एव्हाना मारूनही टाकलेलं असेल हे त्याच्या डोक्यात भिनू लागल्यानं त्यानं तिच्या खुनाचा बदला खुनानंच घ्यायचा निर्धार केला होता, आणि त्याच्याआड फक्त म्हातारा करीमबख्शच येऊ शकत होता.

गावावर सावल्या उतरल्या होत्या. नाऱ्याचे आवाज अधिकच तीव्र होऊ लागले होते. डाव्या बाजूला उतारावर खरोखरच दारं तोडण्याचा आणि आरोळ्यांचा आवाज ऐकू येऊ लागला होता. गुरुद्वारातलं उत्तेजित वातावरण आता पराकाष्ठेला पोहोचलं होतं.

16

हरनामसिंहानं जेव्हा दुसऱ्यांदा दाराची कडी वाजवली तेव्हा आतून एका स्त्रीचा आवाज आला:

"घरी नाहीत, पुरुष बाहेर गेलेत."

हरनामसिंह स्तब्ध उभा राहिला. बन्तोचे डोळे कुणी आपल्याला पाहिलं तर नाही या काळजीनं सगळीकडे पाहत होते.

"तू दरवाजा उघडायला सांग, बन्तो, आत बाईमाणूस आहे," आणि हरनामसिंह एका बाजूला झाला.

बन्तोनं दार ठोठावलं आणि त्यासोबतच ती मोठ्यानं म्हणाली,

"भाग्यवंतांनो, जरा दार उघडा. आम्ही संकटात सापडल्यानं तुमच्या दारी आलोत."

आपल्या पत्नीचा आवाज ऐकून क्षणभर हरनामसिंहाचे डोळे खाली झुकले. आपली पत्नी आश्रय मागण्यासाठीही अशी गयावया करते आहे, हे पाहणंही आपल्या नशिबी आलं.

दाराच्या मागे पावलांची चाहूल ऐकू आली, मग आतून कुणीतरी कडी काढली. दरवाजा उघडला. त्यांच्यासमोर उंच अशी ग्रामीण वयस्कर स्त्री उभी होती. तिचे दोन्ही हात शेणानं भरलेले होते आणि तिनं आपली ओढणी काढून ठेवलेली होती. तिच्यामागे कुरळ्या केसांची कमी वयाची एक तरुण मुलगी उभी होती. तिनंही आपल्या बाह्या वर केलेल्या होत्या, आणि ती बहुधा गायी-म्हशींना चारापाणी करीत असावी असं वाटत होतं.

"कोण आहात? काय कामय?"

वयस्क बाईनं विचारलं. एका दृष्टिक्षेपातच तिला त्यांची अवस्था कळून चुकली होती.

"कमनशिबी आहोत, ढोक इलाहिबख्शहून आलो आहोत. तिथं दंगेखोर आले होते. आमचं घरदार लुटून नेलं. रात्रभर चालत होतो."

क्षणभरासाठी ती बाई तशीच स्तब्ध उभी राहिली. जेव्हा माणूस आपल्या सर्व संस्कारांच्या, विचारांच्या, आपल्या मान्यतांच्या प्रभावाखाली एखादा निर्णय घेत असतो तेव्हाचा तो निर्णायक क्षण होता. बाई बराच वेळ त्यांच्याकडे पाहत राहिली.

मग तिनं दरवाजा पूर्णपणे उघडला.

"या, आत या."

हरनामसिंह आणि बन्तोनं वर पाहिलं, आणि दोघंही उंबरठा ओलांडून आत अंगणात आले. ते आत आल्यावर त्या बाईनं बाहेर डोकावून उजव्या-डाव्या बाजूला वळून पाहिलं आणि मग पटकन दार बंद करून कडी घातली.

कमी वयाची मुलगी एकटक दोघांकडे बघत होती. तिच्या डोळ्यात संशय आणि अविश्वास होता.

"खाट टाकून दे, अकराँ!" बाई म्हणाली, आणि स्वतः जमिनीवर बसून पूर्वीसारखीच शेणाच्या गोवऱ्या थापू लागली.

अकराँ खांद्यावर पदर घेत खोलीतून बाहेर आली आणि तिनं भिंतीला टेकून ठेवलेली खाट तिथंच सरळ केली.

"तुझं कल्याण होईल बहन, आम्ही एका दिवसातच घरातून बेघर झालोत," आणि बन्तोच्या डोळ्यात पाणी आलं.

"ढोक इलाहीबख्शमध्येच सगळं आयुष्य काढलं. तिथंच एक दुकान होतं, स्वतःचं घर होतं. आधी तर सगळ्यांनी सांगितलं इथंच रहा, जाऊ नका, काही होणार नाही. मग काल करीमखाननं सल्ला दिला, गावात राहिलात तर धोका होईल, तात्काळ निघून जा. त्यानं बरोबरच सांगितलं. आमची पाठ वळायचा अवकाश की दंगेखोर आले, दुकान लुटलं, आणि त्याला आग लावून दिली," हरनामसिंह म्हणाला. बाई गप्पच होती. या दरम्यान बन्तो खाटेवरून उठून त्या बाईच्या शेजारी जाऊन बसली.

अकराँ आली आणि मोठ्या टोपल्यात ठेवलेल्या शेणाच्या ओल्या गोवऱ्या घेऊन गेली आणि एक-एक करून अंगणातल्या भिंतीवर लावू लागली. तोंड गप्पच होतं.

"पुरुष कुठं गेले आहेत?" हरनामसिंहानं विचारलं.

बाईनं वळून एकदा हरनामसिंहाकडे पाहिलं, पण त्याच्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाही. पुरुष कुठे गेले असतील ते हरनामसिंहाच्या पटकन लक्षात आलं. आणि त्याच्या शरीरात झिणझिण्या आल्या.

"आम्ही तर दोन कपड्यातच निघून आलो," बन्तो सांगू लागली, "सलामत राहो करीमखान, त्यानं आमचे प्राण वाचवले. आणि तूही सलामत राहोस बहन, तू आम्हाला आसरा दिलास!"

घरात एक विचित्र प्रकारची शांतता पसरलेली होती. त्यामुळे हरनामसिंह काही बोलता बोलता गप्प बसायचा. लहान बाई आत निघून गेली होती, आणि

हरनामसिंहला सारखं वाटत रहायचं की ती लहान बाई, कमी वयाची मुलगी खोलीतल्या अंधारातून सारखी त्याच्याकडे निरखून पहात आहे.

बाई उठून उभी राहिली आणि टोपल्या ठेवलेल्या पाण्यानं हात धुऊन एका बाजूला गेली. तिथं भांडी ठेवलेली होती. मग मातीचं भांडं उचललं आणि त्यात लस्सी घेऊन आली. हरनामसिंहानं अजूनही बंदूक खांद्यालाच लटकवलेली होती. काडतुसांची पेटी घामानं भिजल्यामुळे त्याच्या सदऱ्याला घट्ट चिकटलेली होती.

"घ्या, लस्सी घ्या, रात्रभराचे थकलेले आहात."

ते भांडं हातात घेताच हरनामसिंह मुसमुसून रडू लागला. रात्रभराचा थकवा, उत्तेजित मनोवस्था, आणि दबलेल्या भावना एकाएकी उफाळून वर आल्या आणि तो लहान मुलासारखा रडू लागला. शेवटी तो खाता-पिता दुकानदार होता, शे-दोनशे रुपये कमरेला बांधून आला होता, आयुष्यभर कधी कुणासमोर हात पसरला नव्हता, पण आता एका दिवसातच दारोदार ठोकर खाऊ लागला होता.

"इथं जोरजोरात रडू नका, सरदारजी, गल्ली-मोहल्ल्यातल्या लोकांनी ऐकलं तर धावत पळत येतील. गुपचूप बसून राहा."

हरनामसिंह आपले हुंदके दाबून गप्प झाला, आणि पगडीतून रुमाल काढून डोळे पुसू लागला.

"तुझं कल्याण होवो, बहन, तू केलेलं आम्हाला कधी फेडता येणार नाही."

रब्ब घरी बेघर किसी आँ न करे. रब्ब दी मेहर होई ताँ सब ठीक हो जाएगा. (ईश्वर कुणाला बेघर न करो. ईश्वराची कृपा असली की सगळं ठीक होऊन जाईल!)

बाई अजूनही लस्सीचं भांडं हातात घेऊन बन्तोसमोर उभी होती. लस्सीच्या भांड्याकडे बघून बन्तोची द्विधा मनःस्थिती झाली होती. बन्तोनं डोळे वर करून पतीकडे पाहिलं. तिचा पतीही तिच्याकडेच पाहात होता. मुसलमानाच्या हातातून भांडं कसं घ्यायचं? रात्रभराचा थकवाही होता, घसा कोरडा पडलेला होता. तिच्या संकोचाचं कारण त्या बाईच्या लक्षात आलं.

"तुमच्याजवळ तुमचं एखादं भांडं असलं तर त्यात ओतून घ्या. इथं गावात एका पंडिताचं दुकानय. तो घरी असला तर मी त्याच्याकडून तुमच्यासाठी दोन भांडी घेऊन येईन. पण तो असेल की नाही माहीत नाही. आमच्या हातचं घेतलं नाहीत तर दिवसभर भुकेच्या अवस्थेत कुठं पडून राहणार आहात?"

यावर हरनामसिंहानं हात पुढे करून ते भांडं घेतलं.

"तुझ्या हातानं दिलेलं अमृताच्या बरोबर आहे, बहन, तू आमचं केलेलं कधीही फेडता येणार नाही आम्हाला."

उन्ह पडलं होतं, आणि आजूबाजूच्या घरांतून आवाज येऊ लागले होते.

हरनामसिंहानं अर्धी लस्सी उरलेलं भांडं बन्तोच्या पुढे धरलं.

"ऐका, सरदारजी, मी तुमच्यापासून काही लपवून ठेवणार नाही," घरच्या मालकिणीनं सांगितलं, "माझा घरवाला आणि मुलगा दोघंही गावातल्या लोकांसोबत बाहेर गेलेले आहेत. आता येतीलच ते. माझा घरवाला तर अल्लाला घाबरणारा माणूसय, तुम्हाला काही म्हणणार नाही, पण माझा मुलगा लीगवालाय आणि त्याच्यासोबत अजूनही बरेच जण आहेत. ते तुमच्याशी कसे वागतील, मला माहीत नाही. तुम्ही तुमच्या नफ्या-नुकसानीचा विचार करा!"

हरनामसिंहाचं हृदय एकदम धडधडलं. आत्ता आत्ताच ही बाई वेगळी भांडी आणून देण्याविषयी बोलत होती, आणि आता काही वेगळंच सांगू लागलीय. त्यानं हात जोडले.

"आता या वेळी दिवसाढवळ्या आम्ही कुठं जाऊ?"

"मला काय माहीत? दुसरा-तिसरा दिवस असता तर गोष्ट वेगळी होती, पण आता कुणी कुणाचं ऐकत नाहीय. मी तुम्हाला सांगितलंय की पुरुषलोक बाहेर गेलेत आणि ते आता येतीलच म्हणून. ते तुमच्याशी कसं वागतील मला माहीत नाही. जर काही कमी-जास्त झालं तर मला सांगू नका."

हरनामसिंह बराच वेळ खोल विचारात बुडून गेला, मग पडलेल्या आवाजात म्हणाला, "सत्य वचन, जे वाहेगुरूला मान्य असेल तेच होईल. तुझ्या उरात दया होती, तू दार उघडलंस. आता तू म्हणत असलीस बाहेर जा, तर बाहेर जाऊ. चल, बन्तो, ऊठ..."

हरनामसिंहानं बंदूक उचलली आणि दोघंही पति-पत्नी दरवाज्याकडे जाऊ लागले. त्याला माहीत होतं की दरवाज्याबाहेर प्रलय आ वासून उभा आहे. पण काही उपाय नव्हता.

बाई आहे तशीच अंगणाच्या मध्यभागी उभी राहून त्यांच्याकडे पहात राहिली.

जेव्हा हरनामसिंहानं कडी उघडण्यासाठी हात उंचावला तेव्हा ती बाई एकदम म्हणाली, "जाऊ नका हो, थांबा. कडी लावून टाका." ती म्हणू लागली, "तुम्ही माझ्या घराचं दार ठोठावलंत, मनात काही आशा घेऊन आलात. जे होईल ते बघता येईल. तुम्ही मागं वळा."

मागे अंधाऱ्या खोलीत उंबरठ्यावर उभी अकराँ आपल्या सासूकडे बघतच राहिली, तिला बोलताना पाहून पुढे आली, "जाऊ द्या ना आई, आपण काही पुरुषांना विचारलेलं नाही. त्यांना फार वाईट वाटेल!"

मी देईन त्यांना उत्तर. तू जा आणि आतून शिडी घेऊन ये, पळ! घरी आलेल्यांना हाकलून लावू? अल्लाच्या दरबारात सगळ्यांनाच जायचंय. जा, इथं उभी राहून माझ्या तोंडाकडं काय बघतेस, आतून शिडी घेऊन ये!"

हरनामसिंह आणि त्याची बायको दारापासून वळून परत आले. हरनामसिंहानं पुन्हा हात जोडले.

"वाहेगुरु तुला सलामत ठेवो, बहनं, तू म्हणशील तसंच आम्ही करू!"

सकाळ चढत आली होती. आजूबाजूच्या बायका एकमेकांच्या घरी ये-जा करू लागल्या होत्या, जागोजागी दंगलीच्याच चर्चा चाललेल्या होत्या. या गावातूनही काल संध्याकाळी खूप लोक नारे लावत, बरच्या-भाले हवेत नाचवीत आणि ढोल वाजवत हिंडले होते आणि मग पूर्वेकडे निघून गेले होते. ते कुठं हिंडत होते आणि रात्रभर काय-काय करीत होते कुणास ठाऊक, पण आता दिवस उगवला आणि घरोघर त्यांची वाट पाहणं चालू होतं.

अकराँनं शिडी आणली. तिच्या सासूनं तिच्या हातातून शिडी घेतली आणि भिंतीला तिरकी टेकवून ठेवली. तिथं खोलीच्या वर एक लहानसा माळा काढलेला होता.

"इकडं या हो, तुम्ही दोघं वर चढून त्या माळ्यावर जाऊन बसा. थोडासुद्धा आवाज करायचा नाही. तुम्ही इथं आहात हे कुणालासुद्धा कळलं नाही पाहिजे. पुढं अल्ला मालिकय!"

हरनामसिंहाला चढताना त्रास झाला. एक तर बोजड शरीर, दुसरं खांद्यावरची बंदूक सारखी पायाच्या मधेमधे येत होती. कसं तरी करून धापा टाकत तो वर जाऊन पोहोचला, मागं मागं बन्तोही चढली. माळा अगदीच लहान होता, मोठ्या मुश्किलीनं पायावरच बसता येत होतं, मागे गच्च सामान भरलेलं होतं. आणि हरनामसिंहानं जेव्हा माळा बंद करून घेतला तेव्हा जवळ जवळ अंधारच झाला. दोघंही गप्प बसून डोळे फाडून अंधारात बघत होते. काही विचार करण्यासारखं नव्हतं की काही बोलण्यासारखं! एका बारीक दोराच्या आधारावर दैव लटकत होतं.

बराच वेळ हरनामसिंह धापा टाकत होता. माळ्याच्या आत दमछाक होत होती, थोडा अंधार होता. काही वेळ तसंच बसून राहिल्यानंतर लाचार होऊन हरनामसिंहानं थोडीशी हवा आणि उजेड आत यावा म्हणून माळ्याची ताटी थोडीशी उघडली. त्या बारीक फटीतून त्याला बाहेर उघडणारा दरवाजा आणि अंगणातला थोडासाच भाग दिसत होता. खाली एकदम शांतता होती.

त्याला वाटलं, सासू आणि सून दोघीही अंगणातून बाजूला गेल्या आहेत.

"बन्तो, जर काही वाईट घडलं तर, आपल्या जिवावर बेतलं तर मी आधी तुझ्यावर गोळ्या झाडीन, तुला माझ्या हातानं मारीन..." हरनामनं कुजबुजत्या

आवाजात सांगितलं, "आपण जर पकडले गेलो तर मग दुसरा इलाजच नाही."

बन्तो गप्पच होती. ती एक-एक क्षण मोजत होती. आता काय होईल-आता काय होईल! तिची समज त्याच्यापुढे जाऊच शकत नव्हती.

खाली, मागच्या खोलीत दबलेल्या आवाजात सासू-सुनेचं बोलणं चालू होतं, अकराँनं तोंड फुगवलेलं होतं.

"काफराँ की पनाह देने ओ. बहु माडा करने ओ. मडद तुदाँ पुछसन."

(काफिरांना आश्रय दिलास, फार वाईट केलंस. नवरा तुला विचारील.)

पण तिची सासू विचलित झाली नाही.

"तू चुप कर. बदनसीब कोई आये ते मैं धक्का देके बाहर कढ्ढ देवाँ?"

(तू गप्प बस. कुणी अभागी आलं तर त्याला काय धक्के मारून बाहेर हाकलून देऊ?)

"न ओळख, न पाळख. हे आमचे कोण लागतात? किती वाईट वाटेल अब्बाला आणि रमजानलाही? दोघं जण वर चढून बसलेत आणि त्या शिखड्याच्या हातात बंदूकय. जर आमचे नवरे आले न् त्यानं गोळी मारली तर? तू तर फार विश्वासानं त्यांना वर बसवलंस!"

सासू अकराँच्या चेहऱ्याकडे बघत बसली. तिच्या बोलण्यात अर्थ होता. जर सगळं बिघडलं, नवरे आल्यावर त्यांना सगळं कळालं आणि त्यांच्या-ह्यांच्यात वादावादी झाली, शिवीगाळ झाली, आणि या म्हाताऱ्यानं गोळी झाडली तर काय होईल? रमजान एरवीच किती तरी दिवसांपासून बावचळलेला आहे. एखाद्याला आश्रय देणं वेगळं, आणि आपल्या नवऱ्याचा न् पोराचा जीव संकटात टाकणं वेगळं. ह्यात काय शहाणपणय? ही गोष्ट तिला कशी काय लक्षात आली नाही?

ती उठून माळ्याच्या जवळ, खाली उभी राहिली.

"ऐक, सरदारजी, माझं ऐक!" तिनं दबलेल्या आवाजात सांगितलं.

हरनामसिंहानं ताटी अजून थोडीशी उघडली.

"काय आहे, बहन!"

"तुझी बंदूक माझ्याजवळ दे. इकडून खाली सोड. मी धरते."

हरनामसिंह उत्तर देण्याआधी क्षणभर अवाक् झाला.

"मी बंदूक कशी काय देऊ बहन?"

"नाही, तू बंदूक देऊन टाक. बंदूक घेऊन तुला वर बसता येणार नाही."

मग पुन्हा दोघंही शांत झाले. बंदूक देण्याचा अर्थ होता आपले प्राण त्यांच्या हातात देणं. जर त्यानं नकार दिला तर तिनं तात्काळ दोघांना घराबाहेर काढलं असतं, आणि बाहेर, दिवसा-उजेडी, बंदूक खांद्यावर लटकत असली तरी काही उपयोग नव्हता.

"ऐकतोय का सरदारजी, माझ्या घरात असताना तुला बंदुकीची काय जरूरय?"

"बंदूक देऊन तर मी अगदी निःशस्त्र होऊन जाईन, बहन! कुठं वणवण भटकत फिरू? हिचा आधार!"

"तू बंदूक देऊन टाक, इकडून खाली सोड, तू जाशील तेव्हा मी तुला परत देईन!"

हरनामसिंहानं आपल्या बायकोच्या चेहऱ्याकडं पाहिलं, आणि मग गुपचूप बंदूक देऊन टाकली.

बंदूक द्यायच्या आधी त्यातल्या गोळ्या तरी काढून घ्यायला पाहिजे होत्या, हे नंतर हरनामसिंहाच्या लक्षात आलं. भरलेली बंदूक तिच्या हातात दिली. पण मग मान झटकली. जिथं सगळं आयुष्यच अनिश्चिततेत हलू लागलंय तिथं बंदुकीतून गोळ्या काढून घेतल्या काय, न घेतल्या काय, काय फरक पडणारय!काढून घेतल्या तर मरणाची एक योजना कमी झाली असती, काढली नसती तर मरणाच्या हजार योजनांमधली एक योजना वाढली असती. हरनामसिंहानं थंड श्वास घेतला, इतक्या जोरात घेतला की खाली उभ्या असलेल्या सासू-सुनेलाही ऐकू गेलं असेल असं बन्तोला वाटलं.

माळ्यावर पुन्हा अंधार पसरला.

काय अवस्था आली होती! काल यावेळी बन्तो आपल्या घरात पेटीतले कपडे नीट लावून ठेवत होती, आज नवरा-बायको दोघं उंदरासारखे या माळ्यावर घुसून दडून बसले आहेत. काल तो आणि करीमखान या दंगलीची निर्भर्त्सना करीत होते, ज्यांच्या डोळ्यांतून 'प्रकाश' हरवला होता त्यांना वाईट म्हणत होते. जणू जे काही घडत होतं ते त्यांच्यापासून फार दूर कुठेतरी होतं. त्यांच्या संदर्भात ते तटस्थतेनं चर्चा करू शकत होते, त्यावर टीकाटिप्पणी करीत होते.

अचानक त्याचं मन खचलं. बंदूक हातातून गेलीय, आता पुन्हा ती परत मिळेल की नाही? मी हे काय करून बसलो? आपल्या हातानीच आपले हात कापून घेतले. बंदूक माझ्यासाठी आंधळ्याच्या काठीसारखी होती. आता मला ती कुठं मिळेल? विचार करता करताच हरनामसिंहाला घाम फुटला. त्याला आपल्यापेक्षाही आपल्या बायकोची स्थिती जास्त शोचनीय वाटली. आता मी तिला माझ्यासोबत नेऊ तरी कशाच्या आधारावर? आता तर लोक दगड मारून मारून आम्हाला ठार करतील. भक्ती आणि ज्ञान आणि मानवप्रेमाची त्याची अनेक वर्षांची कमाई वस्तुस्थितीच्या एका थपडेत नाहीशी झाली.

"जसबीरचा काही पत्ता लागला का?" अचानक बन्तोनं विचारलं.

हरनामसिंह गप्पच राहिला. सांगणार तरी काय? राहून राहून अचानक बन्तोच्या आतून 'आई' बोलू लागायची. रात्री नाल्याच्या काठाकाठानं चालतानाही तिनं दोनतीनदा आपल्या मुलांची आठवण काढली होती, आता पुन्हा तेच सुरू झालं होतं. जेव्हा जेव्हा काही वेळ आपल्या डोक्यावरची संकटाची सावली दूर व्हायची, तिला मुला-मुलीची आठवण असह्य व्हायची.

गावात एकदम गलका सुरू झाला. गलका वाढतच चालला होता, स्त्री-पुरुष एकमेकांशी बोलत असताना ऐकू येत होतं. तेवढ्यात कुणीतरी जोरात दार ठोठावलं, आणि एका बाईचा आवाज आला:

"ए अकराँ, अग बाहेर ये, बघ-बघ, ते लोक येऊ लागलेत!"

अकराँच्या कुठल्यातरी मैत्रिणीचा आवाज होता. अकराँ पळतच दरवाजा उघडून बाहेर आली.

वर बसलेल्या हरनामसिंहाच्या उरात धडकी भरली. बन्तोनं डोळे वर करून आपल्या नवऱ्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं. रोज चमकणारा चेहरा एकदम पांढराफटक पडला होता, आणि कपडे मळकट आणि सुरकुत्यांनी भरलेले होते.

माळ्याच्या अर्धवट उघड्या ताटीमधून हरनामसिंहाला घरातल्या मालकिणीचा चेहरा दृष्टीस पडला. अंगणात समोरच्या दाराकडे पाहात दोन्ही हात कमरेवर ठेवून मालकीण उभी होती. तिची उंच देहयष्टी, सरळ साधीभोळी देहरेषा पाहून त्याचं मन सावरलं गेलं. जणू त्याचा विश्वास पुन्हा परत आला होता. ही बाई असेतोवर सगळं काही नाहीसं होणार नाही, सगळं काही मरणार नाही.

"जर वाहेगुरूला मान्य असेल तर आम्हाला त्रास होणार नाही. तुम्ही तर भक्त आहात, तुम्हाला कशाची भीतीय!" बन्तोनं आपल्या पतीला धीर देत म्हटलं. हरनामसिंह गप्पच बसून राहिला.

बाहेर आवाज वाढतच होते, थट्टामस्करी न् हसण्याचे आवाज होते, वाढत्या पावलांचा कोलाहल होता. अंगणातला दरवाजा उघडाच होता. तेवढ्यात अकराँच्या बोलण्याचा आणि जोरजोरात हसण्याचा आवाज आला. घरातले पुरुष रात्रभराच्या कामानंतर घरी परतले आहेत हे हरनामसिंहाच्या लक्षात आलं.

थोड्याच वेळात अकराँचा सासरा आणि अकराँ एक मोठा जाडजूड ट्रंक उचलत अंगणात आले. सासऱ्याच्या डोक्यावरची पगडी बसकट झाली होती. त्यानं तो ट्रंक डोक्यावर घेऊन गावापर्यंत आणल्याचं लक्षात येत होतं.

हरनामनं हात लांबवून आपल्या बायकोच्या गुडघ्याला स्पर्श केला.

"आपला ट्रंकय. मोठा काळा ट्रंक. आपलंच दुकान लुटून आलेत."

बन्तोनं बाहेर बघायचा प्रयत्नच केला नाही.

"अजून कुलूप तसंच आहे," हरनामसिंह पुटपुटला.

अकराँचा सासरा ट्रंकेवर बसला होता आणि पगडी काढून कपाळावरचा घाम पुसू लागला होता. त्याच्या बायकोनं पुढे जाऊन दार बंद केलं.

"रमजान नाही आला?"

"रमजान धर्मप्रचारासाठी गेलाय."

वर बसलेल्या हरनामसिंहानं पुन्हा हात लांबवून आपल्या बायकोच्या गुडघ्याला स्पर्श केला : "एहसानअली आहे. मी ओळखतो त्याला. त्याचा माझ्याशी देण्याघेण्याचा व्यवहारही होता."

"बंदच्या बंद ट्रंक उचलून आणलात, अब्बा, ह्यात काही आहे की नाही कुणास ठाऊक !"

"का? इतका जड होता. माझी तर कंबरच मोडून गेलीय पार. कपड्यांचा ट्रंकय, काही ना काही तर असेलच की!"

"बस्, एक ट्रंकच आणलीत? रमजाननं काही आणलंय का?"

"त्यानंच तर हा बाहेर ओढून आणला. अख्खाच्या अख्खा ट्रंक उचलून आणलाय. अजून काय पाहिजे तुम्हाला?"

"आणा, तो उघडून, त्याचं कुलूप तोडून टाकू?" अकराँनं विचारलं आणि पळत जाऊन खोलीतून हातोडा आणला. चोरीचा माल बघायच्या उत्सुकतेपोटी ती वर लपलेल्या सावकाराबद्दल सांगायचं विसरूनच गेली. तिची सासू अजूनही गप्प बसून समोर उभी होतीच.

"लस्सी पाजव, राजो, तहान लागलीय," सासऱ्यानं सांगितलं आणि त्याची बायको-राजो त्याच पावली लस्सी आणायला गेली.

ट्रंकेच्या कुलपावर ठोकाठोकी सुरू झाली.

एहसानअली कटोरा हातात घेऊन लस्सी पीत असतानाच त्याच्या बायकोनं- राजोनं-त्याला सांगितलं की तिनं घरात एका म्हाताऱ्या शीखाला आणि त्याच्या बायकोला आश्रय दिला आहे.

तेवढ्यात हरनामसिंहानं ताटी उघडून आणि मान बाहेर काढून तो म्हणाला,

"बेटी, कुलूप कशाला तोडतेस? ही घे किल्ली, हा ट्रंक आमचाय." मग एहसानअलीकडे तोंड वळवून म्हणाला, "एहसानअली, मी हरनामसिंहय. तुझ्या घरवालीनं आम्हाला इथं आश्रय दिलाय. गुरू महाराज तुला सलामत ठेवो. हा ट्रंक आमचाय; पण आता तू तो तुझाच समज. तो तुझ्याहाती पडला, दुसऱ्या कुणाच्या हाती पडला नाही ते किती चांगलं झालं !"

एहसानअलीनं वर डोळे केले तर तो शरमिंदा झाला. जणू तो चोरी

करतानाच पकडला गेलाय.

अकरॉंचे हात एकदम थांबले आणि ती ओरडून म्हणाली, "अम्मानं त्यांना आसरा दिलाय. मी म्हणाले होते की काफीर आहेत, त्यांना आत येऊ देऊ नका, पण अम्मानं माझं ऐकलं नाही."

अकरॉं आपल्या सासऱ्याला खुश करण्यासाठी सांगत होती, पण एहसानअली अजूनही स्तब्धच उभा होता, आणि त्याला फार अवघडल्यासारखं झालं होतं. पूर्वी त्यांच्यात देण्या-घेण्याचे व्यवहार होते, आणि एकमेकांची चांगलीच ओळख होती. हरनामसिंहशी कसं वागावं हे त्याच्या लक्षातच येत नव्हतं, अशा प्रत्यक्ष सामन्याची त्याला कल्पना नव्हती. एखाद्या हिंदूला किंवा शीखाला बघून एकदम रक्त सळसळ करू लागावं असा जोशही त्याच्यात नव्हता.

"हरनामसिंह, खाली उतर!" मग आपल्या चोरीच्या अपराधभावनेला त्याच्या बायकोनं हरनाम व त्याच्या बायकोवर केलेल्या उपकाराच्या आधारानं लपवत, किंचित बहादुरीच्या आविर्भावात तो म्हणाला, "माझ्या घरात आश्रय घेतलास हे तुझं फार मोठं नशीब समज, इतर कुणाच्या घरी गेला असतास तर एव्हाना मारला गेला असतास!"

अकरॉं कुलूप उघडायला अधीर झाली होती, पण राजोनं तिच्या हातून किल्ली घेतली होती, आणि पुन्हा पुन्हा मागूनसुद्धा राजोनं तिला किल्ली दिली नव्हती.

"मी तुला काहीच म्हणणार नाही, हरनामसिंह, तू माझ्या घरी आलास, पण आता तू तात्काळ निघून जा. माझ्या पोराला जर तू इथं आहेस हे कळलं तर तो तुझ्याशी फार वाईट वागेल. गाववाल्यांना जर कळलं की आम्ही तुला आश्रय दिलाय तर आमचेही फार वाईट हाल होतील."

"आम्हाला सगळं मान्यय एहसानअली, आमचं काय चालू शकणारय? पण यावेळी दिवसाढवळ्या आम्ही बाहेर पडलो तर आम्हाला कोण जिवंत सोडणारय?"

एहसानअली गप्प झाला, आणि आपल्या बायकोच्या चेहऱ्याकडे पाहू लागला, जणू हे तिला सांगत असावा की ही काय नवीनच भानगड उपस्थित करून ठेवलीस.

"काल रात्रीही लोक तुम्हाला शोधत होते," एहसानअली म्हणाला, "आता जर तुम्ही इथं लपून बसला आहात, हे लोकांना कळलं, तर आम्हाला सोडणार नाहीत. तुम्ही इथून निघून जाण्यातच, तुमचंही आणि आमचंही भलं आहे."

अकरॉंनं आपण होऊन शिडी आणली आणि माळ्याच्या खाली ठेवली. दोघंही पति-पत्नी गुपचूप खाली उतरले. दोघंही बळीचे बकरे आहेत असं वाटू लागलं.

मग पुन्हा सकाळी घडलं होतं ते नाटक सुरू झालं. दोघंही खाली आले.

दोघांपैकी एकानंही विनवणी केली नाही. हरनामसिंह आपली बंदूक मागायला जाणार होता आणि राजो गुपचूप कमरेवर हात ठेवून अंगणातच उभी होती. तेवढ्यात एहसान अली म्हणाला, "यांना पेंढ्या ठेवलेल्या खोलीत बसव राजो, आणि कुलूप लावून घे बाहेरून. हे घे, इथंच ते कुलूप उघडून मगच जा, चल, लवकर कर." मग हरनामसिंहावर उपकार केल्याच्या भावनेनं तो म्हणाला, "नजरेची मर्यादाय हरनामसिंह, पण काफिरांनी शहरात जे काही प्रकार करून ठेवलेत ते पाहिले की, अल्लाकसम रक्त सळसळू लागतं बघ."

राजो पुढं पुढं चाललेली होती आणि मागं मागं बन्तो व हरनामसिंह. खोली ओलांडून ते घराच्या मागच्या एका अंधाऱ्या दालनात आले. तिथं शेणाचा, चाऱ्याचा आणि गुराढोरांचा तीव्र वास येत होता. इथंच राजोनं एका खोलीचं दार उघडलं. खोली फरशीपासून छतापर्यंत पेंढ्यांनी भरलेली होती.

"इथं बसा. माझा नवरा फार भाग्यवानय. तुमची ओळख आहे हे मला माहीत नव्हतं. कसातरी इथं वेळ काढा आता."

हरनामसिंह आणि त्याची बायको इथंही माळ्यावर बसल्यासारखेच दाटीवाटीनं बसले. राजोनं दार बंद करून घेतलं आणि बाहेरून कडी घातली.

वेळ जाऊ लागला. दोघांनाही इथं संध्याकाळपर्यंत सहारा मिळेल, अशी थोडी थोडी आशा वाटू लागली. दिवसा कधीतरी राजोनं भाकरी आणि लस्सीही आणून दिली. दोघं जण खूप वेळ अंधारात बसून डोळे फाडून फाडून अंधारात बघण्याचा प्रयत्न करत होते. दोघांच्याही पोटात थोडं अन्न गेल्यावरच त्राण आलं. बन्तोनं हरनामसिंहाला विचारलं, "तुम्हाला काय वाटतं, इकबालसिंह गावातच असेल का पळून गेला असेल तिथून?"

"वाहेगुरूला जे मान्य असेल ते होईल. एखादा नेक माणूस त्याला भेटला तरच त्याचा जीव वाचेल."

"जसबीर एकटी नाहीय हे चांगलंय. गावात आपल्या संगतचे खूप लोक आहेत, सगळे एकत्र जमले असतील."

यावर हरनामसिंहानं विचारलं, "हे लोक आपली बंदूक परत करतील नं? तुला काय वाटतं ? मला तर काही वाटत नाही देतील म्हणून."

ते खूप वेळ बोलत बसले. खोली बंद होती, पण इथं माळ्यावर होता तेवढा उकाडा नव्हता. पेंढ्यांच्या समोर बसून बसून त्यांचे डोळे झाकू लागले. रात्रभराचे थकलेले होते, बऱ्याच वेळानं त्यांना डुलकी लागली.

जेव्हा त्यांची झोप मोडली तेव्हा, "बाहेर या, कुठं घुसून बसलात, तुमच्या मायला... या बाहेर, तुमच्या ..... "

कुन्हाडीचे प्रहार सारखे पडतच होते. हरनामसिंह आणि बायको दोघंही घाबरून गडबडून उभे राहिले. जणू एखादं दुःस्वप्न पाहून उठले होते, आणि पायापासून डोक्यापर्यंत थरथरले होते.

"चल काढ किल्ली, काफिरांना आसरा दिलास. तुमच्या काफिरांची मी ...." मग आणखी एक प्रहार दारावर पडला.

"हळू बोल रमजाना," कुण्यातरी बाईचा आवाज होता. बहुधा अकराँ आपल्या पतीला हळू बोलण्याबद्दल सांगत असावी.

पुन्हा दारावर कुन्हाडीचे घाव सुरू झाले. दार वरतून थोडंसं चिरलं गेलं आणि त्यातून उजेडाची आणखी एक फट दिसू लागली.

मग एका दुसऱ्याच बाईचा आवाज येऊ लागला, "भुंकायला काय झालंय तुला? झालंय काय?" राजो बोलत होती, "कुठंय ती हडळ, नाही तुझी जीभ खेचून काढली तर मग बोल, हर्रामजादी, तुला सांगितलं होतं याला सांगू नकोस म्हणून, का सांगितलंस? तुझ्या पोटात काहीच रहात नाही का ? .... रमजाना, तुझी काय इच्छाय घरात खून करायचाय? घरात आसऱ्याला आलेल्यांना मारणारेस? हा माणूस आपल्या ओळखीचाय, आम्ही याचे देणेकरी होतो मागं."

"फार बक् बक् करू नकोस, आई, शहरात या काफिरांनी दोनशे मुलमान मारून टाकलेत." मग कुन्हाडीचा आणखी एक वार झाला. "निघा बाहेर लौकर, तुमच्या मायला...."

दोन घावातच कोयंडा तुटला आणि अख्खाच्या अख्खा दरवाजा उघडला. उजेडाचा ढीगच आत येऊन पडला. रमजान धापा टाकत होता. कुन्हाड त्याच्या हातातच होती. जवळच अकराँ उभी होती. तिच्या बाजूलाच राजो उभी होती. चेहरा पांढरा-फटक आणि आक्रसलेला होता. तिचे दोन्ही हात कमरेवर होते.

"बाहेर या, काफिर स्साले..."

रमजाननं डोकावून आत पाहिलं. हरनामसिंह आणि त्याची बायको एकमेकाला खेटून दारासमोर बसलेले होते आणि डोळे दिपलेल्या अवस्थेत बाहेर पहात होते. दार उघडल्याबरोबर हरनामसिंह उठून उभा राहिला आणि गुपचूप समोर आला.

"मारून टाक...." पोकळ आवाजात हरनामसिंह म्हणाला.

"तुझ्या तं....." म्हणत रमजाननं डावा हात पुढे करून हरनामसिंहाची मान पकडली. हरनामसिंहाच्या जाड्याभरड्या सदऱ्याचं वरचं बटन तुटून खाली पडलं. यातच त्याची पगडीही सैल झाली. मग ज्या झटक्यात रमजाननं त्याची मान पकडली होती त्याच झटक्यात ती सोडून दिली. मानेवर बोटांची लाल लाल

चिन्हं उमटली.

हरनामसिंहाला त्यानंही ओळखलं होतं. त्याच्या दुकानावर एक-दोनदा तो चहा प्याला होता. त्याची दाढी आता पहिल्यापेक्षा जास्तच पांढरी झाली होती, आणि शरीर दुबळं झालेलं होतं.

दोन-तीनदा रमजाननं कुन्हाड उगारण्याचा प्रयत्न केला, पण कुन्हाड हातात असूनही त्याला उचलता आली नाही. काफिराला मारणं वेगळी गोष्टय, आपल्या घरात ओळखीच्या माणसानं आश्रय घेतलेल्याला मारणं वेगळी गोष्टय. त्याचा खून करणं एखाद्या डोंगराचं शिखर ओलांडण्यापेक्षाही कठीण काम आहे. धार्मिक पागलपणा आणि घृणेच्या या वातावरणात एक बारीकशी रेष अजूनही कुठे तरी शिल्लक होती आणि ती पार करणं फारच अवघड होतं.

रमजान त्याच्यासमोर धापा टाकत उभा होता. मग शिव्या देत देत बाहेर निघून गेला.

जवळ जवळ मध्यरात्र झाली असावी. उंचीपुरी राजो पुढे पुढे आणि तिच्या मागे मागे हरनामसिंह आणि बन्तो चाललेले होते. झाडांच्या राईपर्यंत राजो त्यांच्या सोबत आली होती. झाडांच्या गर्दीवर चंद्र आलेला होता, आणि वरचं आभाळ चांदण्यांनं निथळून गेलेलं होतं. पुन्हा तेच अलौकिक, रहस्यमय, स्वप्निल दृश्य. पुन्हा तसंच चांदण्याचं आणि अंधाराचं आपापसात लपंडाव खेळणं चालू होतं. वनराई आणि तिच्या पल्याडचा अथांग विस्तार पुन्हा रहस्यमय आणि भयावह वाटू लागला होता. पुढं चालणाऱ्या राजोचं शरीर फारच गंभीर वाटत होतं. राजोनं आपल्या हातात दुनळी बंदूक घेतलेली होती.

ते पुन्हा नदीच्या काठाच्या खाली उतरत होते. डाव्या बाजूला दूर आकाश लाल होऊ लागलेलं होतं. हरनामसिंहानं हळूच आपल्या बायकोचा हात दाबला आणि तो म्हणाला, "डाव्या बाजूला बघ, बघितलंस?"

"पाहिलंय, कुठलं तरी गाव जळू लागलंय."

"वाहेगुरू..." बन्तो पुटपुटली.

चालता चालता हरनामसिंहाचे पाय पुन्हा थबकले. दूर, खूप दूरवर दुसऱ्या बाजूचं क्षितिजही लाल झालेलं होतं. "ते कुठलं गावय? तेही जळू लागलंय." बन्तो गप्प होती.

हरनामसिंहानं मागे वळून पाहिलं. चांदण्यात गावातली मातीची चपटी घरं उभी होती. एखाद-दुसऱ्या घरात दिवा मिणमिणत होता. घरांच्या बाहेर पेंढ्यांचे उंचउंच ढीग रचलेले होते. एखादी बैलगाडीही एखाद्या घरासमोर सोडलेली दिसायची.

वनराईत त्यांना पिराची पांढरी कबर दिसली. त्याच्यावर दिवा तेवत नव्हता. आज तिथं दिवा लावायला लोक विसरले होते.

राजो वनराईच्या कडेकडेनं चालली होती. मग वनराईचं टोक आलं, आणि ती चढणसुद्धा आली. तिच्यावरून चढून हरनामसिंह आणि त्याच्या बायकोनं त्या सकाळी गावात प्रवेश केला होता. राजो थांबली. राजोनं आपल्या हातातली बंदूक बन्तोच्या हातात दिली.

"जा आता, देव तुमचं रक्षण करील. सरळ काठाकाठानं चालत जा. पुढं तुमचं नशीब!"

आणि तिचा कंठ गहिवरून आला.

"तू आमच्यावर फार उपकार केले आहेस, राजो बहन. आम्ही ते जन्मात विसरू शकत नाहीत," बन्तो म्हणाली.

"आता जेवढं आयुष्य उरेल तेवढं तुझे उपकार म्हणूनच..." हरनामसिंहाचा आवाज अडखळल्यासारखा झाला.

"मैं के जाणा बहेण, अपणा-अपणा नसीबा. चहवाँ पासे अग लगी है." (मला काय कळणारय, बहन. चारी बाजूला आग लागलेली आहे.)

हे म्हणत असतानाच राजोनं आपला हात आपल्या कुडत्याच्या खिशात घातला आणि पांढऱ्या कपड्यात गुंडाळलेली एक छोटीशी थैली बाहेर काढली.

"ही घ्या, ही तुमचीच वस्तू आहे."

"कायय राजो बहन?"

"एह तुसॉडे संदूक विचों मिले हन. मैं कड्ढ लियायी हाँ. तुसॉडे ऊपर औछा वेला आया है, जेवर कोल होये ताँ सहारा होवेगा." (हे तुमच्या पेटीत मिळालं. मी काढून आणलेत. तुमच्यावर अशी वाईट वेळ आलीय तर ह्या दागिन्याची थोडी मदत होईल.)

"वाहेगुरू तुला सलामत ठेवो, बहन, चांगलं कर्म होतं म्हणून तुमची भेट झाली," म्हणत बन्तोला रडू कोसळलं.

"जा आता, देव तुमच्यामागं आहे, वेळ होऊ लागलीय," राजो म्हणाली. ती त्यांना काहीच सांगू शकत नव्हती. कोणत्या दिशेला जावं, कोणत्या गावाकडे जावं, कुणाच्या घराचं दार ठोठवावं, काहीही सांगणं तिला शक्य नव्हतं.

दोघंही नवरा-बायको ती चढण उतरू लागले. राजो टेकाडावर उभी राहिली आणि त्यांना जाताना पाहात राहिली. तोच ओबडधोबड, वाळू आणि दगड-गोट्यांनी भरलेला रस्ता होता. व चंद्र चमकत होता, आणि सगळं मैदान काळ्या आणि पांढऱ्या चित्रात विभागलेलं होतं. कुठं अंधाराचा पुंजका होता, तर कुठे पाऱ्यासारखं चमकणारं चांदणं होतं.

थोडं दूरवर गेल्यावर त्यांनी मागे वळून पाहिलं. राजो अजूनही त्या टेकाडावरच उभी होती, आणि अज्ञाताकडे जाणाऱ्या त्यांच्या पावलांकडे बघत होती. मग ते बघत असतानाच ती मागे वळली आणि गावाकडे जाऊ लागली. तिच्या निघून जाण्यानं आसपास चहूबाजूला पसरलेली वैराण शांतता हरनामसिंह आणि बन्तोसाठी अधिकच भयावह होऊ लागली.

17

या दरम्यान खेड्यातल्या ओबडधोबड जमिनीवर आणखी एक नाटक रंगात आलेलं होतं. रमजान आणि त्याचे मित्र इलाहीबख्शहून आणि मुरादपूरहून लूटमारीचं सामान घेऊन हसत-गप्पा मारत येत होते, त्याच वेळी दूर एका टेकाडावर त्यांना एक शीख पळत असताना दिसला. तो या जमावाला पाहून पळाला होता की आधीपासूनच पळत होता हे माहीत नव्हतं, पण या लोकांना जेव्हा तो पळत असताना दिसला तेव्हा त्यांना एकच नवीनच खेळ मिळाला. 'या अली!' अशी रमजाननं जोरात आरोळी ठोकली आणि सगळे लोक-सुमारे वीस-तीस तरी लोक असावेत ते - त्याच्या मागाहून पळत पळत आले. जमीन सपाट, एकसारखी नव्हती. जागोजागी टेकाडं, खड्डे, दऱ्या होत्या आणि टेकाडांमधोमध तऱ्हेतऱ्हेची गिरिकंदरं होती. सरदारचं तोंड तर गावाकडेच होतं, पण बैलगाडीचा रस्ता सोडून तो शेतातून आणि झाडाझुडपांतून पळायचा प्रयत्न करीत होता. त्याच्या दृष्टीनं गावकऱ्यांची नजर चुकवण्याचा हाच एक मार्ग होता.

एकदा दृष्टीस पडल्यानंतर तो दिसेनासा झाला.

"लपलं सालं शिखडं!" रमजान म्हणाला, आणि त्याची पावलं झपाझप पडू लागली. पन्नासेक यार्डांचं अंतर असेल-नसेल, तेवढ्यात तो पुन्हा एकदा ओझरता दिसला. सरदार त्या टेकाडांच्या आणि खड्ड्यांच्या रस्त्यानं पळतच होता. पण सरदार जिथं दिसला होता त्या जागेवर जेव्हा ते आले तेव्हा सरदार तिथंच गायब झाला होता.

"कुठल्या तरी कपारीत लपलाय!" नूरदीन म्हणाला, "काढा मायच्या.... ला!"

त्यावेळी हे लोक एका टेकाडावर उभे होते. काही वेळापूर्वीच या धर्मरक्षकांनी ढेकळं आणि दगडधोंडे त्या पळणाऱ्या शीखाच्या दिशेनं फेकायला सुरुवात केली होती, पण आता त्यांनी आजूबाजूच्या खड्ड्यात आणि कपारीत दगड

मारायला सुरुवात केली. तिथंच कुठेतरी लपलेला असला तर निदान दगड-धोंडे खाऊन तरी आपोआप बाहेर येईल या अंदाजानं ते चालू होतं. सरदार जर पळत राहिला असता तर या दगडाधोंड्यांच्या वर्षावानं पावसाळी उंदीर मरतो तसा नक्कीच मरून पडला असता. पण तो पळण्याऐवजी एका टेकाडाच्या खाली असलेल्या अंधाऱ्या गुहेसारख्या कपारीत अंग चोरून बसला होता. आजूबाजूला असंख्य कपारी होत्या, आणि त्यातल्या नेमक्या कोणत्या कपारीत तो बसलाय ते शोधणं काही सोपं काम नव्हतं.

"ओ सिक्खा, बडी तरिक्खा, चल नीघ बाहेर!" नूरदीननं मोठ्या आवाजात म्हटलं आणि त्यामुळे सगळे जोरजोरात हसले. नूरदीन रमजानच्याच गावचा होता. गाढवावर माती आणि विटा लादून ने-आण करायचा. त्याच्या दातांवर लाल-लाल हिरड्या होत्या. जेव्हा तो हसायचा तेव्हा त्या दुरूनसुद्धा दिसायच्या.

काही लोक खाली उतरले.

"नीघ बाहेर, तुझ्या आयला..." दुसरा म्हणाला आणि एक गोटा उचलून जोर लावून आत फेकला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. कपारीच्या आत अंधार होता, आणि कपार फारच खोल होती. आतून काही उत्तर आलं नाही.

मग खूप जणांनी गोटे उचलून एकाच वेळी मारायला सुरुवात केली, पण त्याचाही काही परिणाम झाला नाही.

"आत जाऊन बघा बे, असं काही कळायचं नाही." रमजान म्हणाला.

"जरा जपून जा रे, रमजान, त्याच्याजवळ कृपाण असेल!"

"त्याच्या आयला..." हसून रमजान म्हणाला, पण तरीही सावधगिरी म्हणून त्यानं आपला चाकू उघडला. रमजान आत घुसला तसे त्याचे मित्रही आत घुसले.

"बाहेर निघय सावकारा!"

रमजान ओरडला. काही लोक अजून आत घुसले.

तो दुसऱ्याच कपारीत लपून बसलेला होता.

त्याचवेळी त्या जमावातला अजून टेकाडावरच उभा असलेला एक माणूस किंचाळत उठला, "तो चालला, तो बघा, तिकडंच गेलाय!" आणि त्यानं डाव्या बाजूला दोनतीन टेकाडं सोडून पलीकडे असलेल्या टेकाडाकडे बोट दाखवलं. त्याला त्या दिशेनं सरदाराचे झिळमिळीत कपडे दिसले होते.

सगळे जण त्या दिशेनं पळाले. दोन-तीन कपारींच्या आत एकच वेळी दगड फेकले जाऊ लागले. एका कपारीत एक गोटा सरळ सरदाराच्या गुडघ्यावर जाऊन आदळला, पण तो ओरडला नाही आणि अजून आत सरकून बसला. मग धडाधड गोट्यांचा वर्षाव सुरू झाला. एखादा गोटा कपारीच्या भिंतीला जाऊन लागायचा, एखादा सरळ त्याच्या गुडघ्यावर किंवा खांद्यावर जाऊन आदळायचा. आणि सरदार तळमळायचा. दगड-गोटे बरोबर तिन्ही कपारीत फेकले जात होते, पण काही वेळानंतर एका कपारीतून कण्हण्याचा दबलेला आवाज ऐकू येऊ लागला. मग हल्लेखोरांना तो याच कपारीत लपून होता याची खात्री पटली आणि मग दगड-गोट्यांचा मारा आणखीच जोरात सुरू झाला.

त्याचवेळी एका बुद्धिमान माणसाच्या डोक्यात एक विचार आला, आणि तो जोरात ओरडला, "अरे अरे, थांबा थांबा, दगड मारू नका!"

काही लोकांनी आवरले. तरीही एखाद-दुसरा दगड पडतच राहिला.

मग तो बुद्धिमान माणूस कपारीच्या अगदी समोर येऊन उभा राहिला आणि जोरात म्हणाला, "ए सरदार, धर्मांतर करायचं कबूल कर. आम्ही तुला सोडून देऊ!"

आतून काहीच आवाज आला नाही. फक्त कण्हण्याचा क्षीण आवाज आला.

"बोल, इस्लाम मान्य करशील का नाही? जर मान्य असलं तर आपण होऊन बाहेर ये. आम्ही तुला काही म्हणणार नाहीत. नाहीतर दगड मारून मारून तुझा जीव घेऊ."

तरीही आतून काहीच उत्तर आलं नाही. एखाद-दुसरा दगड अजूनही फेकला जात होता, सरदारानं लवकर निर्णय घ्यावा म्हणून.

"नीघ बाहेर घुबडाच्या अंड्या, नाहीतर तुझं मढं बाहेर काढू."

तरीही शांतच. आतून काहीच आवाज आला नाही. लोक पुन्हा दगड-धोंडे उचलून सर्वशक्तीनिशी आत फेकून मारू लागले. मग रमजाननं एक मोठा दगड उचलून आणला आणि तो कपारीच्या समोर जाऊन उभा राहिला.

"आता बाहेर ये, नाहीतर या दगडानं तुझं भरीत करून टाकीन."

काहीजण हसले. अजूनही दगड येतच होते.

त्याच वेळी कपारीतून हातापायांच्या आधारानं रांगत रांगत सरदार कपारीच्या तोंडाजवळ आला. त्याची पगडी उघडून गळ्यात लटकली होती. कपडे मातीनं भरले होते आणि जागोजागी फाटले होते. गोटे लागल्यामुळे त्याच्या कपाळावर आणि गुडघ्यावर जागोजागी टेंगळं आली होती आणि जखमांमधून रक्त ओघळू लागलं होतं.

सरदार अजूनही जणू चार पायांवर बसला होता, आणि त्याची नजर इकडं तिकडं फिरून सगळं न्याहाळत होती. भयंकर यातनेनं त्याचं तोंड वाकडं होऊ लागलं होतं.

"बोल, इस्लाम स्वीकारशील का नाही?" रमजाननं विचारलं. अजूनही त्याच्या हातात तो प्रचंड दगड होताच.

सरदार पहिल्यांदा भीतीनं व्याकुळ होऊन गेला आणि नंतर बराच वेळ तो भकास डोळ्यांनी पाहतच राहिला, मग त्यानं वर-खाली डोकं हलवलं.

नूरदीनच्या मागं उभ्या असलेल्या एका माणसानं सरदाराला ओळखलं. हा इकबालसिंह होता, मिरपूरमध्ये कपड्यांचं दुकान चालवत होता. त्याचा बाप हरनामसिंह ढोक इलाहीबख्शमध्ये चहाचं दुकान चालवायचा. बहुधा हा ढोक इलाहीबख्शकडेच पळत जात असावा, पण रस्त्यातच तो पकडला गेला. ओळख पटताच तो माणूस इकबालसिंहाच्या दृष्टीस पडू नये म्हणून नूरदीनच्या मागं लपला. नंतर तो कायम मागंमागंच राहिला. काही बोलला नाही की दगड मारला नाही. पण तरी त्यानं इतरांना थांबवलंही नाही. इथं त्या लोकांना थोपवण्यात काही अर्थच नव्हता हे त्याला माहीत होतं.

"तोंडानं बोल मादर...! बोल, नाहीतर हा बघ दगड, आत्ता तुझ्या खोपडीवर मारतो."

"इस्लाम स्वीकारीन," हुंदक्यांच्या मधून इकबालसिंहनं सांगितलं.

मग लगेचच गगनभेदी गर्जना झाली : "अल्ला-हो-अकबर!"

"नारा-ए-तकदीर! अल्लाह-हो-अकबर!" सगळ्यांनीच नारा लावला.

रमजाननं दगड एका बाजूला फेकून दिला. सगळ्यांनी आपल्या हातातले दगड-धोंडे फेकून दिले. रमजाननं पुढे हात करून म्हटलं, "ऊठ, तू आता आमचा भाऊ आहेस!"

इकबालसिंहाचं सगळं शरीर ठणकत होतं. तो अजूनही कण्हत होता. यातना, घबराट आणि त्रासामुळे त्याला उभं राहणं शक्य होत नव्हतं.

"ये, गळ्याला गळा लावू," रमजान म्हणाला आणि त्यानं त्याला मिठी मारली.

रमजाननंतर सगळ्यांनीच एकानंतर एक त्याच्या गळ्याशी गळा लावला. आधी डोकं उजव्या खांद्यावर ठेवायचं मग तिथून उचलून डाव्या खांद्यावर न्यायचं, मग पुन्हा एकदा उजव्या खांद्यावर. मिठी मारायची ही मुसलमानी रीत होती. इकबालसिंहचे पाय लडखडत होते, आणि घशाला कोरड पडली होती. पण तीन चार वेळाच्या सरावानंतर त्याला मिठी मारण्याचा हा प्रकार नीट समजला होता.

वातावरण इतक्या लवकर बदलेल, आणि त्याच्या रक्ताला आसुसलेले लोक त्याला छातीशी लावतील अशी इकबालसिंहाला आशा नव्हती.

मग ते टेकाडाच्या रांगा ओलांडून बाहेर आले. रमजाननं त्याला धरलेलं होतं. मग त्यांनी गव्हाच्या सळसळत्या शेतातून त्याला पुढं पुढं नेत बाहेर आणलं. त्यांच्या काहीच लक्षात येत नव्हतं, आपल्या विजयाच्या प्रीत्यर्थ त्याची

मिरवणूक काढल्यासारखं त्याला न्यावं, की पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणि शेवटी पकडल्या गेलेल्या एखाद्या क्षुद्र कैद्यासारखं त्याला न्यावं, की ज्याला ते प्रेमभरानं भेटले होते, अशा एखाद्या धर्मबांधवासारखं न्यावं? इकबालसिंहाला नीट चालता येत नव्हतं. काही नाही तरी पाच धोंडे त्याच्या गुडघ्यावरच लागले होते. कपाळावरूनही रक्त ओघळत होतं. एका ठिकाणी शेताचा बांध ओलांडताना तो अडखळला तेव्हा गमतीनं नूरदीननं त्याला पुढे ढकललं आणि तो सरळ समोर तोंडावर पडला.

"बघा रमजानजी, मला अजूनही धक्के मारतायत," त्यानं उठत उठत कळवळून सांगितलं. ज्यानं चांगलं वागायची शपथ घेतल्यानंतरही त्याला मारण्यात येत असतं, अशा एखाद्या लहान बालकासारखं सांगितलं.

"अरे, धक्का देऊ नका रे," रमजान म्हणाला, आणि आपल्या दोस्तांकडे पाहून हसत हसत त्यानं डोळा मारला.

"धक्का नका देऊ रे," मागाहून कुणीतरी रमजानची नक्कल केली, आणि त्याला हळूच धक्का मारला.

घृणा आणि द्वेषाचं इतक्या लवकर सद्भावनेत रूपांतर होऊ शकत नाही, ते फक्त उथळ हसण्यात आणि विनोदातच बदलू शकत असतं. ते इकबालसिंहाला मारू शकत नसले तरी त्याला कमीत कमी आपल्या क्रूर विनोदाचं लक्ष्य बनवू शकत होते.

"बघा, रमजानजी, मागाहून कुणी तरी मला ठोसा मारलाय."

इकबालसिंह त्या वेळी स्वाभिमानाच्या सर्वात खालच्या थराला जाऊन पोहोचला होता. जगण्याला चिकटून राहणारा प्राणी फक्त गयावया करू शकतो, रांगू शकतो, हसायला सांगितलं तर हसू शकतो, रडायला सांगितलं तर रडू शकतो.

मध्येच नूरदीनला मस्करी सुचली.

"थांब रे!" त्याचा हात पकडून नूरदीननं त्याला थांबवलं.

इकबालसिंह थांबला आणि कातर डोळ्यांनी त्याच्याकडे पाहू लागला.

"याची सलवार काढा. याला नागवं करून गावात घेऊन जाऊ. हा आपल्याला पाहून फार वेळ लपून बसला होता."

आणि त्यानं पुढे येऊन इकबालसिंहाच्या सलवारीत हात घातला.

"देखो रमजानजी..." इकबालसिंहानं रमजानकडे बघून तक्रार केली.

"खबरदार, कुणी त्याची सलवार काढली तर..." रमजाननं ओरडून सांगितलं.

"अजून यानं धर्म स्वीकारला नाही. जोपर्यंत हा इस्लाम धर्म स्वीकारत नाही तोपर्यंत हा काफीर आहे, मुसलमान नाहीय. काढा याची सलवार."

रमजाननं आपली बाजू घेतल्याचं पाहून इकबाललाही थोडी हिंमत आली. तोही चिडून म्हणाला, "नाही काढू देणार सलवार. करा माझं काय करायचंय ते!"

हे ऐकून काही जण हसू लागले.

अशाच पद्धतीनं इकबालसिंहाची थट्टामस्करी करीत, त्याचा अपमान करीत ते गावात आले.

इमामदीन तेलीच्या घरी इकबालसिंहाला धर्माची दीक्षा देण्यात येऊ लागली. गावातला न्हावीही तिथं आला, मशिदीतून मुल्लाही आला. तेलीच्या घरातल्या अंगणात प्रचंड गर्दी जमा झाली.

न्हाव्याची बोटं थकून गेली. केस कापता कापले जात नव्हते. गर्दीच्या मधोमध जमिनीवर बसलेला इकबालसिंह पुन्हा संभ्रमित झाला होता. सुरुवातीला न्हाव्यानं त्याचे केस कात्रीनं कापायला सुरुवात केली होती, पण नंतर घोड्याची लीद आणि मुतानं त्याच्या केसांचे वेगवेगळे गुच्छ करून बांधले व ते कापू लागला. सर्वात शेवटी त्यानं घोड्याचे केस कापायची मोठी मशीन आणली. मशीन चालवली तेव्हा त्याच्या डोक्यात कमी जास्त वलयं निर्माण झाल्यासारखे केस झाले. मग वस्तऱ्यानं त्याचं टक्कल साफ करण्यात आलं. चमनगोटा झाल्यावरच इकबालसिंहाला आपली मान सरळ करण्याची संधी मिळाली. दाढी कापण्यात आली नाही. मग जेव्हा दाढी कमी करायची वेळ आली तेव्हा खूप जणांचे आवाज एकाच वेळी ऐकू येऊ लागले :

"दाढीचा कट मुसलमानी पाहिजे!"

"कल्ले काढूनच दाढी कापा, मिश्या बारीक करा."

इकबालसिंहाचा पिचलेला चेहरा त्याच्या घाबरलेल्या, त्रस्त डोळ्यांशिवायही खरोखरीचा मुसलमानी चेहरा वाटू लागला होता.

त्याचवेळी गर्दीतून वाट काढत नूरदीन आत आला. जेव्हा इकबालसिंहाचे केस कापले जात होते तेव्हा तो मधूनच निघून गेला होता, पण ते कुणाच्या लक्षात आलं नव्हतं. पण आता तो परतला होता आणि लोकांना ढकलत ढकलत आत घुसत होता.

"अहो, बाजूला सरका, रस्ता द्या."

आत आल्याबरोबर तो सरळ इकबालसिंहाजवळ जाऊन बसला.

डाव्या हातानं त्यानं इकबालसिंहाचं तोंड उघडलं आणि ज्यातून रक्त गळतच होतं असा एक मोठा मांसाचा तुकडा, इकबालच्या तोंडात टाकला. इकबालसिंहाचे डोळे गरगरले. त्याचा श्वास कोंडला होता.

"तोंड उघड, तुझ्या मायला... उघड. आता चाव ते मादर..."

आणि नूरदीन लोकांकडे पाहून, आपल्या लाल हिरड्या दाखवत, खीः खीः करून हसू लागला.

त्याच वेळी मुल्ला आणि गावातला एक प्रतिष्ठित वयस्कर माणूस समोर आले. त्या वयस्कानं नूरदीनला दाटलं आणि तिथून उठून लावलं, "उठ इथून, आपल्या धर्माची दीक्षा घेणाऱ्याला परेशान करतोस का?"

आदरणीय वयस्क माणूस आत आल्यानं सारं दृश्यच बदललं. लोक मागे सरकले. इकबालसिंहाला सांभाळून उठवण्यात आलं. एका माणसानं खाट उचलून आणली, आणि त्याला खाटेवर बसवण्यात आलं. नंतरचे विधी अगदी काळजीपूर्वक पूर्ण करण्यात येऊ लागले.

माळ हातात घेऊन मुल्ला इकबालसिंहाकडून कलमा (धर्ममंत्र) म्हणवून घेतला,

"ला इलाह इल्लिल्ला
मुहम्मद रसूल अल्ला!"

तीन वेळेस कलमा म्हणण्यात आला. आजूबाजूच्या उभ्या असलेल्या लोकांनी बोटं डोळ्यांना लावली, आणि मग त्यांचं चुंबन घेतलं. मग एक-एक करीत वीसही लोकांनी त्याला मिठी मारून छातीला लावलं.

यानंतर मिरवणुकीसारखं त्याला विहिरीवर नेलं गेलं, आंघोळीनंतर त्याला नवे कपडे घालण्यात आले.

जेव्हा आंघोळ करून स्वच्छ नवे कपडे घालून तो निघाला तेव्हा इकबालसिंह खरोखरच इकबाल अहमद दिसू लागला होता. मग लोकांनी नारे लावले :

"नारा-ए-तकदीर! अल्लाह-हो-अकबर!"

मग ती मिरवणूक पुन्हा इमामदीन तेल्याच्या घराकडे रवाना झाली. वातावरणात खोल गांभीर्य आणि धर्मभावना थरथरत होती. दिवस मावळता मावळता इकबालसिंहाची सुंता केली गेली. त्याला ती वेदना सहन करणं आता कठीण राहिलेलं नव्हतं. सगळा वेळ बुजुर्ग (वडीलधाऱ्या) लोकांनी त्याला सहारा दिलेला होता, आणि सुंता चालू असताना पुन्हा पुन्हा त्याच्या कानात सांगण्यात येत होतं, "तुझं लग्न करू. तुला एक सुंदर बायको मिळवून देऊ. काळू तेल्याची विधवा तुझ्याच वयाची आहे. तरुण सुदृढ बांध्याची. तिला बघून तुझं मन एकदम खूष होईल. आता तू आमच्यापैकी आहेस, आता तू शेख आहेस, शेख इकबाल अहमद!"

संध्याकाळ ढळता ढळता इकबालसिंहाच्या शरीरावरच्या सगळ्या शीख खुणा काढून टाकण्यात आल्या होत्या आणि शरीरावर सगळ्या मुसमानी खुणा उतरल्या

होत्या. जुन्या खुणा काढून नव्या खुणा आणायचाच उशीर की माणूस बदलला होता, आता तो दुश्मन नव्हता, दोस्त होता; काफीर नव्हता, मुसलमान होता. मुसलमानांचे सगळे दरवाजे त्याच्यासाठी उघडे झाले होते.

खाटेवर पडलेला इकबाल अहमद रात्रभर तडफडत होता.

18

तुर्क आले होते, पण ते आपल्याच शेजारच्या गावातून आले होते. तुर्कांच्या मेंदूत ते आपल्या जुन्या शीख शत्रूंवर हल्ला करताहेत एवढंच होतं आणि शीखांच्या मेंदूतही ज्यांच्याबरोबर खालसा लढत असत ते दोनशे वर्षापूर्वीचे तुर्क होते. ही लढाई म्हणजे ऐतिहासिक युद्धांच्या साखळीतली एक कडी होती. लढणाऱ्यांचे पाय विसाव्या शतकात होते आणि डोकं मध्ययुगात होतं.

घनघोर युद्ध झालं. दोन दिवस आणि दोन रात्रीपर्यंत चाललं. मग दारूगोळा संपला आणि लढणं कठीण झालं. आता गुरुग्रंथ-साहेबच्या चौकीमागं पांढऱ्या शुभ्र चादरीनं झाकलेली सात प्रेतं पडलेली होती. पाच प्रेतांची डोकी आपापल्या मांडीवर घेऊन पाच बायका बसलेल्या होत्या. फार आग्रह केल्यावर काही वेळ त्या उठायच्या, पण तेजासिंहानं पाठ फिरवायचा उशीर की त्या पुन्हा येऊन बसायच्या. दोन प्रेतांना कुणीच वारस नव्हता. त्यातलं एक प्रेत निहंगसिंहाचं होतं. तो गोळ्यांचा वर्षाव होत असतानाही मिशीवर ताव देऊन, छाती फुगवून छतावर उभा राहिला होता. दुसरं प्रेत सोहनसिंहाचं होतं. तो शहरातला दंगा थांबवण्यासाठी आला होता. हा माणूस गल्लीच्या टोकाशी मारला गेला. लढाई थांबवण्याचा प्रस्ताव घेऊन दुसऱ्या दिवशी तो शेख गुलाम रसूलकडे चालला होता. त्याचं प्रेत तिथंच पडून राहिलं असतं. पण काही मुसलमानांनी उत्तररात्री त्याचं प्रेत गुरुद्वारासमोर फेकून दिलं होतं-सोहनसिंहाच्या हाती पाठवलेल्या प्रस्तावाचं उत्तर म्हणून शीखांना दाखवण्यासाठी. त्याचं प्रेत एका बाजूला पडलेलं होतं आणि ते कुणीच मांडीवर घेतलेलं नव्हतं. तशी सोहनसिंह मरण्याच्या आधीच त्याची आणि मीरदादची स्थिती शांती प्रस्थापित करण्याऐवजी निव्वळ निरोप्यांसारखी झाली होती.

या व्यतिरिक्त आणखी किती तरी प्रेतं कसब्यात जागोजागी पडलेली होती. खालसा शाळेच्या चपराशाचं प्रेत शाळेच्या अंगणात पडलेलं होतं. दंग्याच्या आधी, जेव्हा सगळी संगत गुरुद्वारात जमू लागली होती तेव्हा त्याला शाळेतच खंबीरपणे

रहायची ताकीद देण्यात आलेली होती. चपराशाची बायको जिवंत होती, पण तिला माली पाटलानं आपल्या घरी ठेवून घेतली होती, म्हणून ती धडपणे जिवंत राहिली होती. माई भागाँचं प्रेत तिच्या घरातल्या अंगणातच पडलेलं होतं. माई भागाँनं मेल्यानंतरही आपले दागिने वाचवले होते, कारण ते भिंतीत गाडलेले होते, आणि हल्लेखोरांना दागिन्यांबाबत काहीही कळालं नव्हतं. तिचं घर आगीचं भक्ष्य होण्यापासूनही वाचलं होतं, कारण तिच्या घराला लागूनच रहीम तेल्याचं घर होतं. माई भागाँचा जीव एका झोपडीत गेला होता. म्हातारा सौदागरसिंहही मरून पडलेला होता, त्याचं प्रेतही गुरुद्वारात नेऊन टाकायला लोक विसरले होते.

काही प्रेतं कसब्याच्या बाहेरही जागोजागी विखुरलेली होती. एक प्रेत विहिरीजवळ उताणं पडलं होतं. हा माणूस फसवणूक झाल्यानं मारला गेला होता. हा कसब्यातला अल्लाहरखाँ पखालजी होता. दंगल चालू असतानाही आपली पखाल घेऊन चांदण्या रात्री विहिरीवर आलेला पखालजी. शेखच्या घरातलं पाणी संपलं होतं, लहान पोरं पाणी पाणी करून ओरडत होती म्हणून हा आपली पखाल घेऊन विहिरीवर आला, आणि शेखच्या गच्चीवरूनच सरळ अचूक नेम त्याच्या पाठीवरच बसला. एक लाश कुणा सरदारजीची होती, ती शहराकडून येणाऱ्या सडकेवर पडली होती. फतहदीन नानवाल्याचं गुरुद्वाराकडे जाणाऱ्या गल्लीच्या डाव्या तोंडाशीच दुकान होतं. तो स्वतः तर वाचला, पण त्याच्या दुकानावर काम करणारी दोन लहान-लहान पोरं मारली गेली होती. दंगल चालू असतानाही ही पोरं पळत पळत रस्त्यावर यायची. कधी एकमेकांच्या मागं पळायचे, कधी गल्लीतच खेळत बसायचे. याशिवाय खालसा शाळेतच्या इमारतीतून अजूनही आगीच्या ज्वाला उसळत होत्या. डाव्या गल्लीच्या टोकाशी नदीच्या ऐन वरच्या भागात शीखांची सगळी दुकानं आगीच्या भक्ष्यस्थानी पडली होती. दुसरीकडे कसायांची तिन्ही दुकानं आणि तेली मोहल्ल्यातल्या मुसलमानांची तीन-चार घरं अजूनही जळत होती.

आता गुरुद्वारातला दारूगोळा जवळ जवळ संपला होता. छतावरचा किशनसिंह मिनिटा-दोन मिनिटांनी एखादी गोळी झाडायचा, दुश्मनांना वाटावं की मोर्चा कायम आहे; नाहीतर परिस्थिती फारच गंभीर व्हायची. सगळ्या गुरुद्वारावर एक प्रकारचा थकवा पसरलेला होता. डोळे एकमेकांना बघत, पण तोंडातून काहीच शब्द फुटत नसे. "दारूगोळा संपत आला आहे," कुणाच्या तोंडातून बाहेर पडलं कुणास ठाऊक; पण ज्याच्या-ज्याच्या कानावर पडलं तो निश्चेष्ट होऊन पहात रहायचा. दारूगोळा तसा शेखाच्या किल्ल्यातही संपलाच होता, पण ते लपवण्यासाठी दोन्ही बाजूंनी पुन्हा पुन्हा नारे लावले जात. 'अल्लाह-हो-अकबर'चे

नारे आता एकाऐवजी तीन दिशांनी येऊ लागले होते. नाऱ्यांचं प्रत्युत्तर पहिल्यापेक्षाही उंच आवाजात गुरुद्वारातूनही दिलं जाई, पण नाऱ्यांचा पोकळपणा आता कुणापासूनच लपू शकत नव्हता.

मुसलमानांना बाहेरून कुमक येऊ लागली आहे अशी गुप्तहेरांची बातमी होती, पण शीखांचा मात्र बाहेरशी संपर्क पूर्ण तुटलेला होता. दोन माणसं लपून-छपून कुमक मिळवण्यासाठी कहूटाला पाठवण्यात आली होती. पण ती अजून परतली नव्हती. युद्धसमितीचा विचार होता की पैसे देऊन तडजोड घडवून आणावी आणि त्यांनी आपल्या राजदूताद्वारे शेखांशी बोलणी सुरू केली होती.

गुरुद्वाराच्या आत, दरवाज्याजवळ युद्धसमितीचे पाचही सदस्य तेजासिंहजी सोबत समझोत्याबाबत विचार करीत होते.

"दोन लाख मागतायत. दोन लाख आम्ही कुठून द्यावेत?" आवेशात तेजासिंहजी म्हणाले.

"आपण छोट्या ग्रंथींना काय सांगून पाठवलं होतं?"

तडजोड घडवून आणण्यासाठी तेजासिंहजींनी सोहनसिंहाच्या मृत्यूनंतर मीरदादला मध्यस्थ करण्याचा प्रयत्न केला होता, कारण तो दंगा होण्यापूर्वी तडजोड करण्याचा प्रयत्न करीत होता. पण जेव्हा त्याला रुपयाची देवाण-घेवाण करून गोळ्या मारणं बंद करण्याचा प्रयत्न चाललाय असं कळलं तेव्हा त्यानं आपलं अंग काढून घेतलं. लाचार होऊन तेजासिंहानी ग्रंथीच्या छोट्या भावाला, ज्याला सगळे 'छोटा ग्रंथी' म्हणून हाक मारत, पाठवून संदेश दिला होता.

"मी म्हणालो होतो वीस-तीस हजार रुपये सांग." तेजासिंहजी म्हणाले, "पण ते दोन लाख मागत आहेत."

"आमची स्थिती कमजोर झालीय हे त्यांना कळलं असेल."

"त्यांच्या बापालाही कळू शकत नाही," बांगडीवाला हीरासिंहानं त्वेषात येऊन सांगितलं, "आम्ही काही त्याचे कमी लोक कापले नाहीत. वीस-एकोणीसचाच फरक असेल, सिंहजी. आमचं दुर्दैव की आमचा दारुगोळा संपलाय..."

दूरवरून पुन्हा गर्जना आली, "अल्लाह-हो-अकबर!"

"दागिने किती गोळा झालेत?" आणखी एका सदस्यानं विचारलं.

तेजासिंहजी उठून गुरुग्रंथ-साहेबाच्या चौकीसमोर ठेवलेल्या एका पेटीजवळ गेले. ती उघडून त्यांनी- बायकांनी आपल्या अंगावरचे दागिने काढून त्या पेटीत टाकलेले होते- ते दागिने आपल्या हातात घेतले, आणि हातांनीच त्याचं अंदाजे वजन करून त्याप्रमाणे ते हिशोब करू लागले.

"वीस-पंचवीस हजारापेक्षा जास्तीचे नसतील..." ते दोन लाख मागतायत. आम्ही द्यायचे कुठून?"

"द्यायची इच्छा असेल तर आपण एकटे सुद्धा ते देऊ शकाल तेजासिंहजी, आपण फार माया जमा केलेली आहे."

पण तेजासिंहांनी या उद्‌गाराकडे लक्ष दिलं नाही.

"सांगा, पन्नास हजार देऊ."

"पन्नास हजार फार कमी आहेत, ते ऐकणार नाहीत!"

"तुम्ही सांगून तर पहा. खालून सुरू केलं म्हणजे एक लाखापर्यंत त्यांना खाली आणता येईल."

तेजासिंहांनी छोट्या ग्रंथीला बोलावलं. "जा ग्रंथीजी, त्यांच्याबरोबर एक लाखापर्यंत निर्णय करून या. पण अट ही की बाहेरून येणारे लोक नदीच्या पलीकडे जातील, मग ते आपले तीन प्रतिनिधी पाठवतील, आमचे लोक थैल्या घेऊन उभे राहतील."

छोट्या ग्रंथीनं हात बांधून सांगितलं, "सत वचन, महाराज, पण ते जर म्हणाले की थैल्या अगोदर द्या, मगच आम्ही नदी ओलांडून जाऊ, तर मग मी काय म्हणू?"

यावर बांगडीवाला पुन्हा त्वेषात आला, "का, आमच्या बोलण्यावर विश्वास नाही का? आम्ही काय लाहोरवाले आहोत? अमृतसरवाले आहोत? की आज एक सांगायचं आणि उद्या दुसरंच? आम्ही सैयदपूरचे रहिवासी आहोत, आमची जबान म्हणजे काळ्या दगडावरची रेघय."

सैयदपूरचे रहिवासी असल्याचा अभिमान मुसलमानांइतकाच शीखांनाही होता, सगळ्यांनाच सैयदपूरची लाल माती, उत्तम प्रतीचा गहू, फळबागा आणि इतकंच काय, सैयदपूरचा कडक हिवाळा आणि बर्फिल हवेचा सारखाच अभिमान होता आणि याच पद्धतीनं आपल्या आदरतिथ्याचा, उदारतेचा आणि हसतमुख स्वभावाचाही गर्व वाटत होता. दंगा सुरू झाल्यानंतर दोन्ही बाजूंचे लोक सैयदपूरचे रहिवासी या नात्यानं छातीठोकपणे मैदानात उतरले होते.

पुन्हा चंद्र वर आला होता, आणि त्यात मोर्चेवाल्यांना रात्रीचं दृश्य अधिकच भयावह वाटू लागलं होतं. आज रात्री पुन्हा गोळीबार सुरू झाला तर काहीही होऊ शकतं, जाळपोळ होऊ शकते, लुटमार होऊ शकते. आता सगळेच निर्णय चुकीचे वाटू लागले होते. गुरुद्वारात एकत्र जमणं चुकीचं होतं, शेख गुलाम रसूल आणि त्याच्या सहकाऱ्यांशी बोलणं तोडून टाकणं चुकीचं होतं. या चुकांना काही अंतच नव्हता. शत्रूवर विजय मिळवता आला असता तर त्याच चुका रणनीतीच्या श्रेष्ठ

चाली मानल्या गेल्या असत्या.

शेख गुलाम रसूलच्या ओट्यावर बसून काही लोक गप्पा मारत होते. आपल्या बाजूच्या प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी यांनाही संधी मिळाली नव्हती, पण जिथं गुरुद्वाराची अवस्था एखाद्या घेरलेल्या, बंदिस्त जागेसारखी होती तिथं शेखांच्या घराचं मात्र तसं नव्हतं. शेखांचं घर उघड्या जागी होतं. त्याचा संपर्क आजूबाजूच्या सगळ्याच गावांशी कायम होता.

ओट्यावर बसलेले धर्मरक्षक बाहेरगावाहून आलेले होते. सगळे आपापल्या कर्तबगारीचे किस्से ऐकवत होते, आपापले अनुभव सांगत होते:

"आम्ही जेव्हा गल्लीत घुसलो तेव्हा सावकार पळू लागला होता, कुणी इकडं पळायचा, कुणी तिकडं . हिंदूंची एक पोरगी तिच्या घराच्या गच्चीवर पळाली. आम्ही तर पाहिलंच होतं हो. दाहाबारा लोक सरळ तिच्यामागं गच्चीवर गेले. ती एका गच्चीचा कट्टा ओलांडून दुसऱ्या घराच्या गच्चीवर चालली होती, तेवढ्यात आम्ही तिला पकडलं. नबी, लालू, मीरा, मुर्तूझा असं आळीपाळीनं सगळ्यांनीच तिला दाबलं."

"शप्पथ?" एकानं संशयानं विचारलं.

"कसम अल्लापाकची. जेव्हा माझी पाळी आली तेव्हा खालून हां नाही न् हूं नाही, ती हललीच नाही. मी पाहिलं तं काय पोरगी मेलेली होती," आणि पोकळ हसून तो म्हणाला, "मी प्रेतालाच करत सुटलो होतो."

"शप्पथ?" त्याच्या सहकाऱ्यानं हुंकार भरीत विचारलं.

"कुराण शरीफची कसम, मी खरं सांगतोय..विचार जलालला, तोही तिथं होताच की. त्याचवेळी आम्हाला कळलं की ती बाई मेली होती," आणि तो तोंड वाकडं करून थुंकला.

आणि एक असाच धर्मरक्षक ऐकवू लागला, "वेळ असते एक-एक. एका अशाच गावंढळ बाईला आम्ही गल्लीत धरलं. आम्ही सावकाराच्या घरून बाहेर पडलो होतो. असा हात चालला होता म्हणता, जे कुणी समोर येईल त्याची एकाच झटक्यात मान कापली जायची. आता ही बाई जी समोर आली तर जोरजोरात किंचाळाय लागली. ती हर्रामजादी म्हणत होती की मला मारू नका, तुम्ही सातही जण मला घ्या, एक-एक करून मला जे करायचंय ते करा. पण मला मारू नका."

"मग?"

"मग काय, अजीज्यानं सरळ तिच्या छातीत खंजीर खुपसला. तिथंच मरून पडली."

चांदणं सांडलेल्या उतारावरून छोटा ग्रंथी हळूहळू चालला होता. नदीच्या किनाऱ्यावर मुसलमानांचे नेते तडजोडीच्या वार्तालापासाठी उभे होते. गुरुद्वाराच्या एका खिडकीतून तो रस्ता दिसत होता, म्हणून लोक श्वास रोखून छोट्या ग्रंथीकडे बघत होते. तेवढ्यात छतावर कुणाच्या तरी पळत जाण्याचा आवाज आला , आणि एका निहंगसिंहानं वरूनच ओरडून सांगितलं, "पश्चिमेकडून हल्लेखोर येऊ लागलेत. दुश्मनांना कुमक मिळालीय."

आणि बघता बघता खरोखरच दूरवरून हल्लेखोरांचा परिचित आवाज कानावर पडला. ढोलाचा आवाज आणि 'अल्लाह-हो-अकबर' चा नारा.

तेजासिंहाचा चेहरा खरर्कन उतरला. मोठा ग्रंथी खिडकीला चिकटून उभा होता. आणि आपल्या लहान भावाला चढण उतरताना बघत होता, एकदम ओरडला, "जाऊ नकोस, मेहरसिंह, परत ये."

पण छोट्या ग्रंथीनं ते ऐकलं नाही. तो तसाच नदीकाठावरच्या गोल-गोल गोट्यांवरून वाकडा-तिकडा चालत पुढेपुढेच चालला होता.

"परत ये, मेहरसिंह, ये!"

मोठ्या ग्रंथीनं ओरडून सांगितलं, मग अनेक आवाज त्याच्या मागोमाग उमटले. छोट्या ग्रंथीनं एकदा मागे वळून पाहिलं आणि मग तो पुन्हा पुढे पुढे चालू लागला.

ढोल बडवत चालत येणाऱ्या हल्लेखोरांचे आवाज अजून जवळ जवळ येऊ लागले होते. उत्तरादाखल आता नदीच्या काठावरचे धर्मरक्षकसुद्धा 'अल्लाह-हो-अकबर' चे नारे लावू लागले होते.

छोटा ग्रंथी आता चांदण्या रात्रीच्या मोठमोठ्या काळ्यापांढऱ्या ठिपक्यांच्या उजेडात हरवत चालला होता.

आता खिडकीतून स्पष्टपणे काही दिसत नव्हतं, पण त्यांना वाटलं की लोक छोट्या ग्रंथीला भेटण्यासाठी पुढे सरसावलेत. मग त्यांना असंही वाटलं की लोकांनी ग्रंथीला घेरले आहे, मग लाठ्या-काठ्या उचलल्या गेल्या, चांदण्यात काहीतरी चमकल्यासारखंही वाटलं. बहुधा ती कुणाची तरी कुऱ्हाड असावी किंवा मग छोट्या ग्रंथीची तलवार तरी असावी!

तेजासिंह एकदम थिजून गेला. मोठा ग्रंथी बेहोष होऊन ओरडला, "माझ्या भावाला मारून टाकलं, मारून टाकलं!" आणि मागचा-पुढचा काहीही विचार न करता, अनवाणी पायांनी, निःशस्त्र, गुरुद्वारातून बाहेर पडून, गल्ली पार करून उतारावरून चालत जाऊ लागला.

"थांबवा, थांबवा त्याला," कुणीतरी जोरात ओरडून सांगितलं. त्यावर

दारावर तैनातीला असलेल्या निहंगसिंहानं पळत पळत उतारावर जाऊन ग्रंथीची कंबर धरली आणि ग्रंथीला उचलून परत आणू लागला.

ढोल आणि टाळ्यांचा आवाज गावात पोहोचला होता. सगळीकडून नारे घुमू लागले होते. पुन्हा गोळीबार सुरू झाला होता. लोक इकडं तिकडं पळू लागले होते.

"जो बोले सो निहाल!

सत सिरि अकाऽऽल!"

तलवारी हवेत उंचावण्यात येऊ लागल्या, आणि दुसऱ्याच क्षणी हवेत फिरणाऱ्या तलवारी घेऊन शीखांचा एक जमाव, आणि इतर लोकांच्या मधोमध मोठा ग्रंथीही नारे लावत दुष्मनांना आव्हान देत ती चढण उतरू लागला. मोकळे सोडलेले केस, रस्त्यातल्या दगडांवर लडखडणारी पावलं, त्यांनी मरण्याचं व्रतच घेतलेलं होतं.

गुरुद्वाराच्या आत, डाव्या हाताच्या भिंतीजवळ स्त्रिया आणि बालकांचा एक जमाव होता. वाढत्या चीत्कारात जणू सगळ्या बायका आपोआपच एका जागी आलेल्या होत्या. जसबीर कौरचा चेहरा धुंद झाल्यासारखा वाटत होता. तिचे हात अजूनही तिच्या कमरेवर लटकत असलेल्या कृपाणाच्या मुठीवर होते.

स्त्रिया स्वतः होऊनच गायत्रीचा पाठ म्हणू लागल्या होत्या. गुरुद्वारातला गुणगुणता आवाज हळूहळू तीव्र होत चालला होता.

त्याच वेळी डाव्या हाताला लागून गल्लीच्या टोकाशी असलेल्या घरांच्या मागून आगीच्या ज्वाळा भडकू लागल्या होत्या, आणि वातावरणात लालभडकपणा जास्तच गहिरा होत चालला होता.

"आग लागलीय. शाळेजवळच्या गल्लीत. किसनसिंहाचं घर जळू लागलंय," जसबीरनं ऐकलं, पण तरीही न ऐकल्यासारखं केलं. तिच्या शरीरातून एक लाट सतत उसळत होती. आणि डोळ्यांसमोर काहीच स्पष्टपणे दिसत नव्हतं. जणू सगळ्या गोष्टी तरंगत होत्या, अर्धवट उजेडात तिच्या आजूबाजूला फिरू लागल्या होत्या. ती बायकांच्या मधोमध ऐन दिव्याखाली उभी होती. तिच्या चेहऱ्यावरून अजूनही तेज ओसंडत होतं.

गल्लीच्या डाव्या बाजूला मोर्चा भुसभुशीत झाल्यासारखा कोलमडून पडला. चांदण्यात न्हाऊन निघालेल्या चढावरून काही माणसं रांगत-सरपटत येऊ लागली होती. छतावर उभ्या असलेल्या निहंगसिंहानं त्या सर्वांना अगोदर पाहिलं होतं. त्यानं किशनसिंहाला सांगितलं. पण किशनसिंहानं निराश होऊन मान हलवली. चढाव चढून येणाऱ्या काळ्या, रांगणाऱ्या आकृत्यांची संख्या वरचेवर वाढतच होती. पण त्यांच्यावर गोळ्या झाडण्यासाठी गोळ्या तरी कुठं होत्या? किशनसिंहानं

एक-दोनदा फैरी झाडल्या आणि नंतर तो गप्प झाला.

गुरुद्वाराच्या बाहेर उभ्या असलेल्या शीखांचा आणखी एक जत्था केस मोकळे सोडून हातात नंग्या तलवारी घेऊन डाव्या बाजूनं गल्लीतून पुढे सरकू लागला. कारण गल्लीच्या तोंडाशी असलेला मोर्चा तुटल्यामुळे तुर्क त्याच रस्त्यानं हल्ला करणार हे उघड होतं. तेवढ्यात गर्जना करणारे आवाज येऊ लागले, दोन-चार गोळ्या झाडल्याचेही आवाज आले, मग अचानक आभाळाला भेदत जाणारा आवाज आला : 'अल्लाह-हो-अकबर!'

आणि तलवारी फिरवणारे सरदार गल्लीतल्या अंधारात नाहीसे झाले.

त्याच वेळी गुरुद्वारातून पांढऱ्या वस्त्रातल्या धर्मप्रिय स्त्रियांचा समूह बाहेर आला. सर्वात पुढे जसबीर कौर होती, अर्धवट मिटलेले डोळे, चमकणारा रुबाबदार चेहरा. सगळ्याच बायकांनी आपल्या ओढण्या डोक्यावरून काढून गळ्याभोवती अडकवल्या होत्या, सगळ्यांचे पाय नागवे होते. सर्वांचेच चेहरे चमकत होते. मंत्रमुग्ध झाल्यासारख्या त्या गुरुद्वारातून बाहेर आल्या होत्या.

"तुर्क आले! तुर्क आले!" काही बायका ओरडत होत्या. काही गुरुवाणीचा पाठ म्हणत होत्या. काही उन्मादात बरळत होत्या :

"जिथं माझा सिंहवीर गेलाय, तिथंच मीही जाणारय."

काही जणींजवळ त्यांची मुलं होती. दोघी-तिघींनी मुलांना कडेवर घेतलं होतं. काही जणी आपल्या पोरांच्या मनगटांना धरून त्यांना आपल्यासोबत फरपटत नेत होत्या.

गुरुद्वारातून निघून बायकांचा समूह गल्लीतल्या उजव्या बाजूनं डाव्या दिशेकडे वळला. मग काही अंतर चालून गेल्यावर, दोन घरांच्या मधून जाऊन चढावाजवळ पोहोचणारी छोटीशी वाट वळत सरळ विहिरीपर्यंत गेली होती त्या दिशेनंच बायकांचा समूह आगेकूच करीत होता.

चहूकडे हाहाकार माजला होता. उसळत्या आगीच्या ज्वाळा आता दोन ठिकाणांहून वर येऊ लागल्या होत्या. चढावावर, घरांच्या भिंतीवर, गल्लीतल्या विटांच्या-फरशीवर ज्वाळांच्या सावल्या नाचत होत्या. नदीच्या पाण्यात लाल ज्वाळांची सावली थरथरत होती. पाणी आपोआपच लाल होऊ लागलं होतं. या चीत्कारात घरांची दारं तोडण्याचेही आवाज मिसळत होते. कसब्यात लुटालूट सुरू झाली होती. गुरुद्वारासमोरच्या गल्लीत मध्यभागी उभं राहून भाला उंचावून निहंगसिंह किंचाळत होता, "या तुर्कांनो, या! कुणात शक्ती असेल त्यांनी येऊन पहावं! मी आव्हान देतोय याऽ!"

स्त्रियांचा समूह त्या बांधलेल्या विहिरीकडे चालला होता. विहीर चढावाच्या

खाली उजव्या हाताला होती, आणि तिथं गावातल्या स्त्रिया आंघोळीसाठी, कपडे धुण्यासाठी, गप्पाटप्पांसाठी जायच्या. मंत्रमुग्ध झाल्यासारख्या त्या दिशेनं पुढे पुढे निघाल्या होत्या. त्या का आणि कुठं जाताहेत हे त्यावेळी एकीच्याही लक्षात येत नव्हतं. चांदणं ओघळलेल्या त्या विहिरीवर जणू अप्सराच उतरल्या होत्या!

सगळ्या आधी जसबीरनं विहिरीत उडी घेतली. तिनं कुठलाही नारा लावला नाही, कुणाला हाक मारली नाही, फक्त 'वाहेगुरू' म्हटलं आणि उडी घेतली. तिनं उडी मारताच कितीतरी स्त्रिया विहिरीभोवतीच्या ओट्यावर चढल्या. हरिसिंहाची बायको आधी वर चढली, मग तिनं आपल्या चार वर्षांच्या मुलाला ओढून घेतलं, आणि मग दोघांनीही एकदमच, पोराला हातानं ओढत, उडी मारली. देवसिंहाची बायको आपल्या दूध पिणाऱ्या पोराला छातीशी घट्ट धरून आत पडली. प्रेमसिंहाच्या बायकोनं स्वतः उडी मारली, पण तिचं पोरगं मागंच राहिलं. त्याला ग्यानसिंहाच्या बायकोनं आत ढकलून आपल्या आईकडे पाठवलं. बघता बघता गावातल्या दहा बायकांनी आपल्या पोरांना घेऊन विहिरीत उड्या टाकल्या.

तुर्क जेव्हा खरोखरच गल्ली डाव्या बाजूनं प्रेतांचा खच तुडवत गुरुद्वाराकडे येऊ लागले तेव्हा गुरुद्वारात एकही बाई नव्हती. विहिरीतून बायकांच्या ओरडण्याचा, किंचाळण्याचा आणि मुलांच्या रडण्याचा आवाज ऐकू येत होता. गावात जागोजागी ऐकू येणाऱ्या 'अल्लाह-हो-अकबर' आणि 'सत सिरी अकाल'च्या नाऱ्यासोबत विहिरीत बुडून मरणाऱ्या बायका-पोरांच्या आरोळ्याही मिसळलेल्या होत्या.

चांदणं फिकट झालं होतं. हळूहळू तांबडं फुटत होतं. रात्रीचं जादूनं भारावलेले वातावरण पुन्हा छिन्नभिन्न होऊ लागलं होतं. रोजच्यासारखंच स्वच्छ शीतल वारं वाहू लागलं होतं. गावाबाहेर डोलणारी गव्हाची शेतं त्या वाऱ्यानं झुलू लागली होती. वाऱ्यानं फळबागेतल्या बहराचा गंध वाहून आणलेला होता. नदीकडून वाऱ्याची एक झुळूक आली. ती बहराच्या गंधानं भरलेली होती. त्यात या मोसमात झाडाझुडपांवर उमलणाऱ्या पांढऱ्या फुलांचाही वास होता. कधी कधी बागेतून पोपटांचा एक थवा पंख फडफडवत, चीं-चीं करत उडत जायचा. नदीचं पाणी निळं-निळं होऊ लागलं होतं. वाऱ्याची झुळूक आली की पाणी थरथरायचं.

रात्री कधी लूटमार बंद झाली होती कुणास ठाऊक ! फारशा घरांना आगी लावण्यात आल्या नव्हत्या, कारण गुरुद्वाराची गल्ली सोडून गावातल्या इतर गल्ल्यांमधून मुसलमान आणि शीखांची घरं सोबतच होती. शाळा जरा वेगळीकडे बाजूला होती किंवा मग कोपऱ्यावरची काही घरं स्वतंत्र, वेगळी होती. सकाळ होईपर्यंत आगीच्या ज्वाळा मंद आणि क्षीण झाल्या होत्या. जी बारीक-बारीक घरं

होती ती जळून राख झालेली होती. जळत्या घरातून आता पिवळा-पिवळा धूरच मोठ्या प्रमाणावर बाहेर येत होता.

गुरुद्वारात एक दिवा अजूनही जळतच होता, जणू एका बाजूला युद्ध-समितीचे चार सदस्य अंतिम वेळेची प्रतीक्षा करीत होते. थकून गेलेले तेजासिंहजी गुरुद्वाराच्या अन्नधान्य असलेल्या कोठीत गव्हाच्या एका पोत्यावर खाली मान घालून बसले होते.किशनसिंह अजूनही छतावरच आपल्या खुर्चीत बसलेला होता. एक निहंगसिंह भाला घेऊन अजूनही गुरुद्वाराच्या प्रवेशद्वाराआड उभा होता.

जेव्हा उजेड वाढत चालला तेव्हा घारी आणि कावळ्यांच्या झुंडीच्या झुंडी आभाळात घिरट्या घालू लागल्या. अनेक गिधाडंही आभाळात दिसत होती. शाळेच्या बाहेर उभ्या असलेल्या एका निष्पर्ण झाडावर दहा-पंधरा गिधाडं येऊन बसली- लहान लहान डोकी आणि मोठमोठ्या पिवळ्या चोंची असलेली- काही गिधाडं विहिरीच्या ओट्यावरही येऊन बसली होती. विहिरीत प्रेतं फुगू लागली होती आणि पाण्यावर तरंगू लागली होती. घरांच्या वरवंड्यांवरही गिधाडंच गिधाडं दिसत होती. गल्ल्या निर्जन झाल्या होत्या. विखुरलेल्या प्रेतांनी गावातली निःस्तब्धता अधिकच गडद-गहिरी केली. आता गावातल्या गल्ल्यांतून हळूहळू पावलं टाकत जरी कुणी जाऊ लागलं की त्याच्या पावलांचा आवाज घुमू लागे. दंगेखोर लूटमारीचं सामान घेऊन परतले होते आणि बरेचसे मारले गेले होते. गुरुद्वाराहून विहिरीकडे जाणाऱ्या रस्त्यावर जागोजागी बायकांची पैंजणं, ओढण्या, बांगड्यांच्या काचा पडलेल्या होत्या. विशेषतः गुरुद्वाराजवळ बांगड्यांच्या काचा मोठ्या प्रमाणावर इतस्ततः पडलेल्या होत्या. गल्लीबोळात तोडक्यामोडक्या रिकाम्या पेट्या, पत्र्याचे डबे, खाटा, लुटीची कहाणी सांगत होत्या. घरांची कवाडं कुठे अर्धवट उघडलेली, तर कुठे तुटून पडलेली दिसत होती. जागोजागी रात्रभर चाललेल्या भयंकर वादळाच्या खुणा दिसत होत्या.

पण लढाई अजून संपलेली नव्हती. थोरल्या कसायाचं मोठं पोरगं लपत-लपत गुरुद्वाराच्या मागे गेलं आणि ते गुरुद्वाराच्या मागच्या खिडक्यांवर तेल ओतून त्या पेटवून द्यायच्या तयारीत होतं.

अचानक आसमंतात एक अनोखा शब्द ऐकू येऊ लागलाः खोल, हळू हळू येणारा, घरघरतानाचा शब्द. हा कसला आवाजय? हा आवाज खोलीत बसलेल्या तेजासिंहानंही ऐकला, गुरुद्वाराच्या छतावर पहारा करणाऱ्या किशनसिंहानंही ऐकला, शेखांच्या हवेलीतल्या सगळ्यांच्याच कानावरही पडला होता. सगळेच थबकले. थोरल्या कसायाचं पोरगं अजूनही थबकलेलंच होतं, गुरुद्वाराला आग लावायच्या तयारीत असलेलं पोरगं! हा कसला आवाजय? घरघरणारा, खोल होत

जाणारा, सतत वाढतच जाणारा आवाज. दारांच्या भिंतींच्या मागं लपलेले किंवा बसलेले एक-एक, दोन-दोन लोक बाहेर डोकावू लागले. किशनसिंह खुर्चीतून उठला आणि पळत-पळत वरवंडीजवळ जाऊन उभा राहिला.

विमान होतं. मोठं, मोठमोठ्या काळ्या पंखांचं विमान. दऱ्या-खोऱ्यांवर, पहाडांवर पंख फैलावून घरघरत गावाच्या दिशेनं झेपावत होतं. कधीकधी त्याचे पंख काळेभोर व्हायचे, पण कधीकधी चांदीसारखे झगमगायचे. कधी त्याचा उजवा पंख खाली झुकायचा, कधी डावा. ते विमान जणू हवेवर खेळत, गम्मत करत येऊ लागलं होतं.

ते विमान जेव्हा जवळ आलं तेव्हा लोक उठून बाहेर येऊ लागले; लोक गल्लीत, छतांवर, ओट्यांवर येऊन उभे राहिले आणि उत्सुकतेनं विमानाकडे पाहू लागले. गावावर आल्यावर विमान आणखीनच खाली आलेलं होतं आणि विमानाच्या आत बसलेला चालक-गोरा सैनिक-आपला हात हलवून खाली उभ्या असलेल्या लोकांना अभिवादन करत होता. त्याच्या मोठमोठ्या चष्म्याच्या काचांखालचं त्याचं स्मितहास्यही काही लोकांना दिसलं होतं.

"हसलाय, मी स्वतः पाहिलंय" बाहेर उभा असलेला एक मुलगा दुसऱ्याला म्हणाला. "त्यानं हातात पांढऱ्या रंगाचे हातमोजे घातलेले होते. असा हात हलवत होता. तू पाहिलं नाहीस?"

सगळेच हात थांबले. आता अजून काही होणार नाही. इंग्रजालासुद्धा दंग्याची बातमी कळालीय. आता कुणी आग लावणार नाही, कुणी बंदूक चालवणार नाही. गुरुद्वाराच्या खिडक्यांवर तेल शिंपडणाऱ्या थोरल्या कसायाच्या मुलानं काडी पेटवायचाच उशीर होता की, आपले हात मागं ओढले. लोक आ करून विमानाकडे बघतच राहिले.

कॉकपिटात बसलेल्या गोऱ्या सैनिकानं गुरुद्वारावरून उडताना हात हलवला. खाली, छतावर असलेल्या किशनसिंहाला वाटलं, जणू त्याच्याकडे बघूनच हात हलवला होता, आपल्या साथी सैनिकाला बघूनच हात हलवला होता. किशनसिंह इतका वेळ अस्वस्थ आणि शुद्ध हरपल्यासारखा उभा होता, तो लगेचच उठून अटेंशनमध्ये उभा राहिला आणि टाचा एकमेकांवर आपटून त्यानं सॅल्यूट ठोकला. शेवटी सैनिक सैनिकच असतात, एकमेकांना सॅल्यूट ठोकल्याशिवाय राहत नाहीत. किशनसिंहाचं हृदय ओंडक्यासारखं उसळू लागलं. ब्रह्मदेशात असताना रोज संध्याकाळी तो त्याच्या कॅप्टन जॅक्सनला भेटायला जात असे. जॅक्सन नेहमी लक्षपूर्वक त्याचं बोलणं ऐकून घ्यायचा आणि त्याच्या सॅल्यूटचं उत्तर सॅल्यूटनंच द्यायचा.

किशनसिंहानं भावनातिरेकात जोरजोरानं हात हलवून ओरडून म्हटलं : "गॉड सेव द किंग, साहेब, गॉड सेव द किंग!"

विमान पुढं निघून गेलं होतं आणि आता शेखांच्या हवेलीच्या वरून उडत होतं. किशनसिंह डोळे फोडून-फोडून त्या दिशेनं पाहू लागला. शेखांच्या घराच्या छतावरही लोक चढून बसलेले होतेच आणि हात हलवून हलवून इंग्रज वैमानिकाला अभिवादन करू लागले होते. गोऱ्या सैनिकानं मुसंड्यांच्या अभिवादनाला प्रत्युत्तर दिलं होतं की नाही, हे बघायची किशनसिंहाला फार उत्सुकता होती. आणि त्याला खरोखरच वाटलं, पायलटनं आपला हात आत ओढून घेतला आहे. हे बघून किशनसिंहाला हार्दिक आनंद झाला. तो तिथंच उभ्याउभ्या उड्या मारू लागला :

"दोन दिवस आधी आला असता तर साहेब, आमचं इतकं नुकसान झालं नसतं, पण ठीकय, काही हरकत नाही..."

मग किशनसिंहाला जोर चढला मुठी वळवून, शेखांच्या घराकडे बघत तो ओरडला : "आता चालवा गोळी, मुसंड्यांनो, हा बघा मी समोर उभाय! चालवा गोळी! आता का नाही चालवत? आधी फार वाघ बनला होतात, चालवा आता गोळी!" आणि बलदंड शरीराचा किशनसिंह वरवंडीजवळ उभा राहून, हात हलवत मुठी दाखवत पागलसारखा नाचू लागला.

लवकरात लवकर शहरात जाऊन, डेप्युटी कमिशनरांची भेट घेऊन, त्यांना या सगळ्या घटनांचा तपशील देऊन, किती नुकसान झालंय त्याची यादी देणं आवश्यकय याचा तेजासिंह विचार करू लागले होते. आता आले तर काय उपयोगय, पण ठीकय, काही हरकत नाही, आम्ही पण बरेच मारलेत, मुसरडे पुन्हा कधी आमच्याशी लढायची हिंमत करणार नाहीत.

गुरुद्वाराच्या मागं उभ्या असलेल्या थोरल्या कसायाच्या पोरानं तेलाची बाटली नालीत ओतून दिली आणि बाटली ओट्याखाली लपवली. कोरड्या चिंध्या खिडकीतून गुरुद्वारात फेकून दिल्या. आणि सिगरेट पेटवून झुरके घेत घेत जिकडून आला होता तिकडे तो परत गेला.

विमानानं कसब्यात तीन चकरा मारल्या. तिसऱ्यांदा उडताना खाली उभ्या असलेल्या लोकांनीही हात हलवून हलवून त्याच्या अभिवादनाचं प्रत्युत्तर दिलं. तीन चकरा मारल्यावर ते इतर गावांकडे निघून गेलं.

कसब्यातलं वातावरण बदललेलं होतं. लोक बाहेर निघू लागले होते. लढाई बंद झाली होती. प्रेतांची विल्हेवाट लावली जात होती. काही लोक आपल्या कपड्या-दागिन्यांचा शोध घ्यायला म्हणून आपापल्या घरांकडे परतत होते- काय

उरलंय, काय लुटलं गेलंय ते बघायला. सेवक आणि निहंगसिंह गुरुद्वारा धुऊन काढण्याच्या साफसफाईच्या कामात गुंतले होते. तिकडे शेखांच्या आज्ञेवरून मशीदही झाडून पुसून स्वच्छ केली जात होती. दोन्ही समुदायांचे लोक आपापली धर्मस्थानं धुऊन स्वच्छ करत होते.

ज्या ज्या गावांवरून विमान उडत गेलं त्या त्या गावात ढोल वाजणं बंद झालं होतं. नारेबाजी बंद झाली होती. जाळपोळ आणि लुटालूट बंद झाली होती.

19

शहरातल्या सडकेवर आलं की वातावरण बदललं आहे याची कल्पना येत होती. कुतुबदीन मोहल्ल्याच्या मशिदीसमोर, सडकेच्या पलीकडे चार सशस्त्र सैनिक खुर्च्या टाकून बसले होते. सडकेवरून चालत जाताना प्रत्येक चौकात दोनतीन सैनिक आपल्या बंदुका खांद्यावर टाकून एखाद्या ओट्यावर बसलेले किंवा रस्त्याच्या कडेला उभे असल्याचे दिसून येते होते. शहरात सैन्य गस्त घालत होतं. दंगलीच्या चौथ्या दिवशी अठरा तासांची संचारबंदी लावलेली होती. पण आज पाचव्या दिवशी संचारबंदी फक्त बारा तासांवर आणण्यात आली होती-संध्याकाळी सहापासून ते सकाळच्या सहापर्यंत. एका बंद गाडीत सिटी मॅजिस्ट्रेट आणि डेप्युटी कमिशनर शिपायांसोबत शहरात हिंडून पाहणी करत आहेत अशी बातमी कानोकानी पसरलेली होती. क्वचित कुठं कुठं दुकानदार दुकानाची एक फळी उघडून बसू लागलेले होते. मोठ्या रस्त्यांवरून दोनदोन घोडेस्वार पोलीस कमरेभोवती पिस्तूल लटकवून नीटपणे पाळलेल्या आलिशान घोड्यांवरून गस्त घालत. कार्यालयं, शाळा, कॉलेजं अजूनही बंदच होती. गल्ल्यांच्या अंधाऱ्या भागात किंवा नाक्यांवर अजूनही काही मोजके लोक हातात भाले-बरच्या घेऊन आणि तोंड झाकून घेऊन लपून चोरून बसलेले असायचे. पण कर्फ्यू लावल्यानंतर आणखी सैन्य मागवण्यात आल्यामुळे दंगलीचं वातावरण उरलेलं नव्हतं. लोक घराबाहेर पडू लागले होते. एका मोहल्ल्यातून दुसऱ्या मोहल्ल्यातही आजूबाजूला बघत बघत जाऊ लागलेले होते. बातम्यांचं स्वरूप बदललेलं होतं.

दोन रिफ्यूजी कॅम्प्स उघडण्यात येणार होते आणि तिथं आजूबाजूच्या वीस गावांमधून येणाऱ्या लोकांना सहारा दिला जाणार होता अशीही बातमी होती.

कँटोनमेंट आणि शहरातल्या दोन सरकारी इस्पितळात फक्त जखमी लोकांनाच भरती करण्यात येत होतं असं नाही, तर गावातली प्रेतंही उचलून तिथं गोळा करण्यात येऊ लागलेली होती. प्रत्येक बातमीत डेप्युटी कमिशनरचं नाव नक्कीच घेतलं जायचं. पाईप तोंडात घालून तो प्रत्येक जागी हजर असायचा. त्यानं कर्फ्यू लागल्यानंतर गस्तीवर असताना सरकारी इस्पितळासमोर उभ्या असलेल्या एका तरुणाला पाहिल्यावर दोनदा हाक मारून बोलावण्याचा प्रयत्न केला आणि मग तो न आल्यामुळे त्याला गोळ्या घालून मारून टाकलं होतं, असं त्याच्याबद्दल बोललं जात होतं. आता दंगल होऊ शकत नाही, हे शहरात पसरलं होतं. काँग्रेसच्या वतीनं एका शाळेच्या इमारतीत रिलीफ फंडाचं ऑफिस उघडण्यात आलं होतं आणि तिथं गावागावांतून येणाऱ्या लोकांची प्रचंड गर्दी लोटू लागली होती. डेप्युटी कमिशनर तिथंही तीन वेळा जाऊन आला होता. सार्वजनिक संस्थाबरोबर सहकार्य करून सरकार विविध समस्या सोडवू पहात होतं. सरकारची ही वृत्ती बघून सार्वजनिक संस्थांचे पुढारी फार हिंडत फिरत असल्याचं दाखवू लागले होते. तिकडं सरकारी अधिकाऱ्यात चपळता आली होती. इथपर्यंत की राजकीय वर्तुळातही डेप्युटी कमिशनराबद्दलचं मत बदलू लागलं होतं. डेप्युटी कमिशनर जरी साम्राज्यवादी यंत्रातला एक तुकडा असला तरी तो निव्वळ तुकडाच नव्हता. हा डेप्युटी कमिशनर फार अक्कलहुषारी असलेला आणि सहानुभूती असलेला माणूस होता. ज्या दिवशी संध्याकाळी त्यानं इस्पितळाबाहेरच्या एका माणसाला गोळी घालून ठार केलं होतं त्या दिवशी तो विलक्षण अस्वस्थ झाला होता आणि रात्रभर झोपू शकला नव्हता. प्रोफेसर रघुनाथचं तर असं ठाम मत होतं की वास्तविक हा डेप्युटी कमिशनर प्रशासनासाठी जन्मलेला नव्हता, तो कोमल अनुभूतीवाला पुस्तकी माणूस होता, त्याला खरं तर ब्रिटिश सरकारनं या कामी जुंपून त्याच्यावर घोर अन्यायच केलेला होता. हो, पण काही राजकीय लोक अजूनही त्याला शिव्या देत होते, आणि त्यांच्या मते दंगली वगैरेंचा कर्ता-सवरता तोच होता.

दौऱ्यावर निघालेल्या डेप्युटी कमिशनर रिचर्डची गाडी हेल्थ-ऑफिसरच्या घरासमोर थांबली. हेल्थ-ऑफिसरला साहेब आले आहेत ही बातमी टेलिफोनवर सांगण्यात आली आणि त्याला अगदी आतून विलक्षण आनंद झालेला होता. हेल्थ-ऑफिसरनं मुद्दाम कोट-पँटीऐवजी खास देशी पोषाख घातला, रेशमी कुरता, खाली सळसळणारी पंजाबी सलवार आणि पेशावरी वहाणा असा. त्याच्या पत्नीनं चहा-कॉफीची व्यवस्था केली. साहेब आत येताच पाईपातल्या तंबाखूचा सुगंध अंगणभर दरवळला. पण डेप्युटी कमिशनरांनी चहा-कॉफी काहीच घेतलं नाही. जवळ जवळ पाच मिनिटं उभ्याउभ्याच ते बोलले. हेल्थ-ऑफिसरशी हस्तांदोलन करून ते म्हणाले :

"नाईस्! वेरी नाईस्! तुम्हाला या दिवसातही पोषाखाबद्दल बरीच काळजी असते. देशी पोशाख तुम्हाला खूपच शोभून दिसतो."

मग हेल्थ-ऑफिसरच्या पत्नीशी हस्तांदोलन करताना तो म्हणाला, "तुमचा दिवस अजून उगवला नाही का?" कारण हेल्थ-ऑफिसरची पत्नी अजूनही ड्रेसिंग गाऊनमध्येच होती.

मग पुन्हा हेल्थ-ऑफिसरकडे तोंड वळवून तो म्हणाला, "रिफ्युजी कॅम्पमधली पाण्याची व्यवस्था पुन्हा एकदा नीट बघितली पाहिजे." स्वतःशीच बोलू लागलाय अशा पद्धतीनं डेप्युटी कमिशनरनं हे वाक्य म्हटलं. "...आणि पाणी वाहून जाण्यासाठी अजून नाल्या खोदलेल्या नाहीत," डोकं हलवत स्मितहास्य करीत तो म्हणाला. स्मिताचा अर्थ होता आठवण देणं, दोन दिवसांपूर्वी सांगितलेलं काम अजून झालं नव्हतं म्हणून.

"मी सगळी व्यवस्था केलीय्, आजपासून काम सुरू होईल."

"गुड," डेप्युटी कमिशनरनं सांगितलं आणि पुन्हा हास्य केलं, "ज्या गावात बायका-मुलांनी विहिरीत जीव दिला आहे तिथं रोगराई पसरण्याचा धोका आहे. तुम्हाला तिथं जावं लागेल."

हेल्थ-ऑफिसरनं कान टवकारले. गावागावांतले लोक पळून शहरात येताहेत, मी तिथं जाऊन काय करू? पण डेप्युटी कमिशनरला प्रत्येक गोष्टीची आठवण होती.

"आज तिसरा दिवसय, तिथं प्रेतं फुगून सडू लागली असतील. विहिरीत तात्काळ डिस्इन्फेक्टंट टाकावं लागेल, तरच रोगराई पसरणार नाही. उद्यापासून तुम्ही रोज सकाळी येत चला. मी बसची व्यवस्था केली आहे. दोन मुस्लिम शिपाई तुमच्यासोबत असतील. भीतीचं काही कारण नाही."

डेप्युटी कमिशनरचा हात फक्त शहराच्याच नाडीवर नव्हता, तर जिल्हाभराच्या नाडीवर होता.

दरम्यान हेल्थ-ऑफिसरची पत्नी कपडे बदलून अंबाडा घालून नीटनेटकी होऊन आली होती. तिनं पुन्हा एकदा चहा-कॉफीचा आग्रह केला. त्यानं मंद हास्य केलं:

"देअर विल् बी टाइम फॉर टी, मिसेस कपूर, बट् नॉट् नाऊ, थँक यू!" मग पुन्हा आत्मीयतेनं म्हणाला, "वेल्, आपको भी थोडी मदद करनी होगी. रिफ्यूजी कॅम्पमध्ये दोन हजार खाटा तर आज पोहोचतीलच, पण कपड्यांची वगैरे थोडीशी व्यवस्था करावी लागेल. स्त्रियांची जर एखादी छोटीशी रिलीफ कमिटी स्थापन झाली तर फार चांगलं होऊ शकेल ." आणि रिचर्डनं पुन्हा हसून डोकं हलवलं.

रिचर्डचा फार मोठा गुण होता. तो अशा पद्धतीनं बोलायचा की जणू एखादी गोष्ट सल्ला-मसलतीसाठी पुढं करतोय, पण वास्तविक ती आज्ञा असायची, निर्देश असायचा. हेल्थ-ऑफिसरच्या पत्नीलाही विलक्षण आनंद झाला होता. डेप्युटी-कमिशनरच्या बायकोबरोबर काम करायची संधी मिळेल, याच्याहून जास्त अजून काय पाहिजे? पण तिनं काही उत्तर द्यायच्या आधीच रिचर्ड हेल्थ-ऑफिसरला घेऊन देवडीच्या पुढं निघून गेलेला होता.

"शवं जाळण्याबाबत तुमचं काय मतय? मला वाटतं, हे काम म्युनिसिपल कमिटीकडे सोपवलं पाहिजे, आणि सर्व जनतेस ह्याबाबत माहिती देणं योग्य नाही. त्यामुळे पुन्हा तणाव वाढण्याची शक्यताय!"

हेल्थ-ऑफिसर शंभर टक्के सहमत होता.

"आधीपासूनच तसं केलं गेलं आहे. खड्ड्यात फेका आणि जाळून टाका. आता एकाएकाची प्रेतयात्रा निघू लागली तर तणाव वाढू लागेल," डेप्युटी कमिशनरची री ओढत हेल्थ-ऑफिसर म्हणाला, मग हळूहळू बडबडू लागला, "आधी एकमेकाला मारतात-कापतात, आणि मग पुन्हा सरकारनं त्यांच्या प्रेतांची विल्हेवाट लावावी अशी सरकारकडून अपेक्षाही करतात."

डेप्युटी कमिशनरनं हेल्थ-ऑफिसरकडे डोळ्यांच्या कोपऱ्यातून चोरून पाहिलं. क्षणभरासाठी तो थबकला, मग हसून म्हणाला, "वेल्, लेट्स गेट गोइंग्. नो टाइम् टु वेस्ट." आणि डोकं हलवून जीपमध्ये जाऊन बसला.

दहा मिनिटांनंतर तो रिलीफ कमिटीच्या कार्यालयात गेला. जिथं शहरातले खास-खास लोक एकत्र झालेले होते, तिथं तो सरकारच्या रिलीफसंबंधीच्या योजनांचा तपशील सांगत होता.

"बाजार उघडले आहेत. कोळशाच्या चार वॅगन्स स्टेशनात आलेल्या आहेत. आणखी दहा वॅगन्स मंगळवारपर्यंत पोहोचतील. अजून काही दिवसांसाठी तरी संध्याकाळी ६ पासून सकाळी ६ पर्यंत कर्फ्यू चालूच राहील. शिवाय सैन्याचा बंदोबस्त आणि पोलिसांची गस्तही चालूच राहील. शहरातली प्रेतं उचलण्यात आली आहेत, आणि त्यांची विल्हेवाट लावण्याचं काम सरकार स्वतःच करील, पोस्ट ऑफिसं आज दुपारी उघडली जातील, पण पोस्ट वाटण्याचं काम हाती घेतलं जाणार नाही. मोठ्या पोष्ट ऑफिसात सगळी डाक बाहेर ठेवण्यात आलेली आहे. हो, रजिस्ट्री, पत्रं आणि पाकिटं वाटली जातील." बोलताना कधीकधी रिचर्डचा चेहरा लाल व्हायचा आणि त्याचे ओठ थरथरायचे. जणू त्याला भाषण द्यायची सवय नसावी, पण एकही वाक्य, एकही शब्द अनावश्यक नसायचा.

"आमची अशी इच्छा आहे की सार्वजनिक संस्थांनी रिफ्यूजी कॅम्पमध्ये

सरकारला सहकार्य द्यावं. रेशनच्या सप्लायसाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था करण्यात आलेली आहे, तंबू उभारण्यात आले आहेत. आम्हाला काही डॉक्टरांची आवश्यकता आहे, बऱ्याच व्हॉलंटिअर्सची पण, जे रिफ्यूजींच्या देखरेखीसाठी मदत करू शकतील अशाच..."

बोलताना रिचर्डच्या तीक्ष्ण नजरेनं सभागृहात बसलेल्या अनेक व्यक्तींना ओळखलं होतं, आणि त्यांच्या चेहऱ्यावरचा भावही ओळखून घेतला होता. उंबऱ्याजवळ मनोहरलाल उभा होता. काळा, जाडजूड मनोहरलाल, व्यंगपूर्ण आविर्भावात हात छातीवर बांधून उभ्या उभ्या हसत होता, डेप्युटी कमिशनरच्या एकेका वाक्यावर नाक-भुवया चढवत होता. हा माणूस दंगा होण्यापूर्वी हल्लेखोरांच्या एका गटाबरोबर आला होता, आणि रिचर्डच्या ऑफिसच्या बाहेर जोरजोरात बोलत होता. रिचर्डच्या दृष्टीनं हा माणूस इथंही बकबक करण्याची शक्यता होती. दुसरा माणूस देवदत्त नावाचा कम्युनिस्ट होता. गेल्या वर्षभरात रिचर्डनं त्याला दोनदा तीन-तीन महिन्यांसाठी तुरुंगात पाठवलं होतं. हा माणूस दंगलीपूर्वी आणि दंगलीतही दंगल थांबवण्याचा प्रयत्न करत होता. कॉंग्रेस आणि मुस्लिम लीगच्या कार्यकर्त्यांना एकत्र आणून तो त्यांच्या बैठकी घ्यायचा आणि शहरात शांतता राखण्याचं आवाहन करण्यासाठी त्यांना प्रेरित करायचा. त्याची दृष्टी अजूनही शांततेवरच होती, या वेळीही तो त्याच्याशिवाय कशावरही बोलणार नाही. ऑफिसात कॉंग्रेसी कार्यकर्ते बक्षी आणि त्याला माहीत असलेले इतर अनेक लोक होते. बरेचसे वकील होते आणि त्यांच्याशी त्याची ओळख होती. याच सभेत आणखी एक माणूस होता, तो कॉंग्रेसमध्येही होता, सोशालिस्ट पार्टीतही होता, आणि गुप्तचर विभागात सी. आय. डी. ही होता. तो माणूस गडबड करू शकतो, सभेत जोरजोरात नारे लावू शकतो, वॉक आऊटही करू शकतो, सरकारला शिवीगाळही करू शकतो.

पण रिचर्डनं सरळ लाइन घेतली. शहरातल्या परिस्थितीवर चर्चाच होऊ दिली नाही. आपल्या सूचना सांगितल्या आणि तो गप्प बसला.

रिचर्ड आपलं बोलणं संपवून खाली बसायला थोडासा वेळ होता. त्या आधीच लाला लक्ष्मीनारायण उठून उभा राहिला : "या शहरातील जनता आणि शहरातल्या सर्व संस्था सरकारला सर्वतोपरी साह्य करतील, अशी आम्ही डेप्युटी कमिशनरांना खात्री देऊ इच्छितो. हे आमचं सुदैव आहे. इतका योग्य, इतका सहानुभूती असलेला ऑफिसर आम्हाला लाभलेला आहे, हे आमचं सुदैव आहे."

यावर रिचर्ड उठून उभा राहिला, रिचर्डनं रिलीफ कमिटीच्या सदस्यांचा निरोप घेतला आणि तो बाहेर निघून गेला. लक्ष्मीनारायण आणि काही वकील पळत

त्याला सोडायला जीपपर्यंत गेले. मीटिंग पंधरा मिनिटांत संपली. त्याच वेळी अचानक मागून, दवाज्याच्या दिशेने ऐकू आलं:

"इथं सगळे भाट जमा झालेले आहेत, सरकारची चापलुसी करणारे. आपण कुणाला घाबरत नाहीत. सरळ जे खरं असेल ते तोंडावर सांगतो. या दंगलीला कोण जबाबदार आहे? जेव्हा शहरात तणाव वाढतच होता तेव्हा सरकार कुठे होतं? आता कर्फ्यू लावला गेलाय, पण त्याच वेळी का नाही लावला? त्या वेळी हे बहादूर साहेब कुठं होते? आपण काही कुणाला भीत नाही, सरळ तोंडावर बोलतो..." मनोहरलाल बोलतच होता.

पण तोपर्यंत जीप निघून गेलेली होती.

"बस् बस्, ते सगळं इथं आणायची गरज नाही," रिलीफ कमिटीचे कार्यकर्ते उठू लागले होते, तेव्हा एका सद्गृहस्थानं त्यांच्या जवळून जाताना म्हटलं, "घ्या सरकारला शिव्या देऊन, पण काय होणारय? या वेळी सरकारला शिव्या देऊन तुम्हाला काय मिळणारय?"

"ओ बक्षीजी , तुम्ही पण असं बोलू लागलात? तर तुम्हीही जाऊन आता सूत कातत बसा, नाहीत नाल्या साफ करत बसा. राजकारण काही तुम्हाला जमणारी गोष्ट नाहीय."

"तुला इतकं ओरडायला काय झालं? मला काही कळत नाही का, की दंगली घडवून आणल्या जातात, गांधीजींनी एकदा नाही दहादा सांगितलंय..."

"मग तुम्ही काय केलंत?"

"काय नाही केलं? मुस्लिम लीगवाल्याकडं जाऊन सांगितलं, शहरात शांतता राखण्यासाठी आमच्यासोबत येऊन काम करा, डेप्युटी कमिशनरकडे जाऊन सांगितलं - सैन्य आणून शहरात शांतता प्रस्थापित करा आणि दंगल थांबवा. यापेक्षा जास्त आम्ही करूच काय शकतो? आणि आता जेव्हा लोक बर्बाद होऊन आलेत, आमचं काय कर्तव्य, त्यांची मदत करायची का सरकारला शिव्या द्यायच्या? फार आलायस स्वातंत्र्यवाला !"

"आम्ही पण फार पाहिलेत, आमच्या तोंडून बोलून घेऊ नका बक्षीजी, आम्हाला सगळं माहीतय्. कॉंग्रेसचे मेंबर रिफ्यूजी कॅम्पसाठी सरकारकडून कॉन्ट्रॅक्ट्स घेऊ लागलेत सप्लायचे. म्हणून असाल तर आत्ता नावं सांगतो."

"कॉन्ट्रॅक्ट्स घेतायत तर मी काय करू?"

"तुम्ही लोकांनीच त्यांना कॉंग्रेसमध्ये पण चौधरी बनवून टाकलंय."

त्याच वेळी एक कार्यकर्ता मनोहरलालजवळ आला आणि मनोहरलालच्या कमरेत हात घालून त्याला तिथून घेऊन जाऊ लागला, "जाऊ दे यार, आम्ही फार

पाह्यलेत. इथं सगळे राघू बसले आहेत. गांधीजी वर्ध्यात बसून हुकूम सोडतात की इथं त्यांची अंमलबजावणी होऊ लागते. पण ते स्वतः मात्र काहीच विचार करत नाहीत."

"डेप्युटी कमिशनरला इथं कशाला बोलावून आणायचं?"

पण त्याचा दोस्त त्याला जवळजवळ ढकलतच फाटकापर्यंत घेऊन गेला. गेटावर गेल्यावर मनोहरलालनं आपली बडबड बंद केली.

"घ्या! आता सिगरेट तर पाजवा, दोन झुरके तरी-"

आणि दोन्ही मित्र गेटजवळ ओट्यावर बसले.

डेप्युटी कमिशनर निघून गेल्यानंतर बक्षीजींची मनःस्थितीही थोडीफार तशीच होऊ लागली होती.

"दंगा घडवून आणणाराही इंग्रज, दंगा थांबवणाराही इंग्रजच, भुकेनं मारणाराही इंग्रजच, भाकरी देणाराही इंग्रजच, घरातून बेघर करणारा इंग्रजच, घरात आणून बस्तान बसवायला मदत करणाराही इंग्रजच..." पण जेव्हापासून दंगली सुरू झाल्या होत्या तेव्हापासून बक्षीजींच्या डोक्यात निव्वळ धूळ उडू लागली होती. फक्त एकच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगायचे, 'इंग्रजानं पुन्हा बाजी मारली', 'इंग्रजानं पुन्हा बाजी मारली,' पण पहिल्यापासून शेवटपर्यंत त्यांना स्थितीवर नियंत्रण ठेवता आलं नाही.

रिचर्ड ज्यावेळी शहरात हिंडून पाहणी करीत होता, त्याच वेळी लीझा बोअरडम्‌मुळे विलक्षण अस्वस्थ झालेली होती.

आपल्या बेडरूममधून बाहेर येऊन लीझा मोठ्या दालनात आली. आलमाऱ्यात खचाखच भरलेली पुस्तकं छातीवरचं ओझं झाली होती. काळाची गती थांबलेली आहे आणि काहीही हलत नाहीये असं वाटायचं. प्रत्येक गोष्टीला अर्धांगवायूनं पछाडलं होतं. जिवंत असं जर काही असलंच तर फक्त गौतमबुद्ध आणि बोधिसत्त्वाचे डोळे. ते अंधाऱ्या कोपऱ्यात छळानं आणि कपटानं भरलेल्या असंख्य षड्‌यंत्रांचं जाळं पसरवल्यासारखं तिच्याकडे बघत होते. संध्याकाळच्या वेळी या खोलीत येताना तिला भीती वाटायची. जागोजागी उभ्या असलेल्या मूर्ती तिला विषारी सापांच्या डोक्यासारख्या वाटायच्या.

ती जेवण करायच्या खोलीत आली. इथलं वातावरण जरा जास्तच शांत होतं. इथं फुलं होती, मंद प्रकाश होता. इथं मूर्ती नव्हत्या, पुस्तकांचंही ओझं नव्हतं. इथल्या वातावरणात मुलायमपणा होता. माणूस इथं सगळं काही विसरू शकत होता, खूप काही आठवू शकत होता. इथं प्रेम केलं जाऊ शकत होतं, आळस देता येणं शक्य होतं, आलिंगन आणि चुंबनासाठीच इथं मंद प्रकाश होता.

लीझाला आपला गळा दाटून आल्यासारखं वाटलं, आणि डोळ्यात आसवं टोचू लागली. आतल्याआत पुन्हा काहीतरी दाटून आलं आणि तिची अस्वस्थता वाढू लागली. या खोलीतला मुलायमपणाही एका असह्य स्तब्धतेत रूपांतरित झाला. अचानक तिच्या आत व्याकुळता भरून आली. आपला हुंदका दाबून धरत ती उठली, आणि किचनकडे जाणाऱ्या व्हरांड्याजवळ येऊन जोरात ओरडली, "खानसामा!"

दुरुन कुठून तरी भिंतींचे असंख्य पडदे ओलांडून आवाज आला:

"जीऽ मेमसाहेऽऽब !"

आणि खांद्यावर झाडणी अडकवून, दुडक्या चालीत धावत येऊन खानसामा मेमसाहेबांसमोर येऊन उभा राहिला. चार वाजू लागले होते, त्याला मेमसाहेबांचा काय आदेश असणारय ते कळलं होतं. कधी तीनपर्यंत, कधी चारपर्यंत, कधी साडेचार वाजेपर्यंत मेमसाहेबांचं धैर्य टिकून राह्यचं. आणि मग ती ज्या खोलीत असेल तिथून जोरजोरात ओरडून बोलवायची आणि सांगायची, "बीयर लाव, एकदम थंड बियर पाहिजे!"

आणि लीझा हळुवार कण्हण्यासोबतच पुन्हा जेवणाच्या खोलीत परत गेली. लीझा हाऊसकोट घालूनच त्याच्यासमोर येऊन बसली होती, आणि हाऊसकोटही अर्धवट उघडाच होता. या निर्जन जंगलात राहत असताना, माणूस आपली मनःस्थिती विसरू शकेल, स्वतःला विसरू शकेल असं बियरशिवाय काहीच उरलेलं नव्हतं.

रिचर्ड संध्याकाळी आठ वाजता परतला. लीझा नशेत चूर होऊन सोफ्यावरच पडल्या-पडल्या झोपी गेली होती. तिपाईवरच्या बियरच्या बाटलीत अजूनही थोडेसे घोट शिल्लक होते. सोफ्याच्या एका टोकावर लीझाचं डोकं कलंडून जवळजवळ लटकतच होतं आणि तिचे केस अर्ध्या चेहऱ्यावर विस्कळीतपणे पसरलेले होते. हाऊसकोट वर ओढला गेला होता आणि त्यामुळे तिचे गुडघे उघडे पडले होते.

"डॅम दिस् कंट्री, डॅम दिस् लाइफ!" रिचर्ड सोफ्यासमोर उभं राहून पुटपुटला.

आपल्या घरी आल्यावर रिचर्ड दुसऱ्या जगात येऊन पोहोचायचा. घराच्या आत इंग्लंडचं आयुष्य होतं, त्याचं स्वतःचं आयुष्य आणि त्यातल्या समस्या होत्या आणि त्यांचा बाहेरच्या जगाशी दुरान्वयानंही संबंध नव्हता. बाहेरचं जग तर व्यवसाय होता, पण खरं आयुष्य घराच्या आतच होतं, आणि ते त्याचं स्वतःचं होतं. त्याच्या अध्ययनात तो घराचं आणि बाहेरचं असं दोन्हीकडचंही आयुष्य विसरून जायचा.

तो सोफ्याच्या एका टोकावर बसला आणि पुढं होऊन त्यानं लीझाच्या

गालाचं चुंबन घेतलं. आपलं कर्तव्य पार पाडताना रात्री कधी कधी औपचारिकपणे ज्या उत्तेजनेनं आणि आग्रहानं या देहाला तो आपल्या मिठीत घ्यायचा तोच हा देह त्याला यावेळी स्थूल, मांसल आणि अनाकर्षक वाटत होता. लीझाचं वजन पुन्हा वाढू लागलं होतं, आणि डोळ्यांखाली वर्तुळं न् उंचवटे दिसू लागले होते. बोअरडम्मुळे लीझा जाड होऊ लागली होती. दरवेळी घरी परतल्यावर लीझाला तो या स्थितीत बघायचा तेव्हा त्याचं मन खिन्न व्हायचं.

"लीझा!" त्यानं पुढे वाकून लीझाच्या कानाजवळ हाक मारली, आणि हात पुढे करून तिच्या कपाळावरचे केस बाजूला केले.

लीझा झोपेत होती. रिचर्डनं तिचा खांदा हलवला. मग लीझा टेबलाजवळ बसून जेवायच्या मनःस्थितीत नाही हे बघून, तिला तिच्या बिछान्यावर झोपवणंच योग्य होईल या विचारानं, त्यानं आपला डावा हात लीझाच्या मानेखाली ठेवला, उजवा हात तिच्या गुडघ्यांच्या खाली ठेवून तो लीझाला उठवून तिच्या खोलीत घेऊन जाण्याचा प्रयत्न करू लागला.

त्याच वेळी लीझाचा हाऊसकोट ओला होऊ लागला आहे हे रिचर्डला जाणवलं. मग त्याची दृष्टी सोफ्यावर गेली- ज्या बाजूला लीझाचे पाय होते तिथं सोफ्याच्या सीटवरचा एक वर्तुळाकार भाग ओला झाला होता.

रिचर्डचं मन वितृष्णेनं दाटलं. लघ्वीचा उग्र वास त्याच्या नाकात घुसला. रिचर्डनं उभ्याउभ्याच डोकं हलवलं. तीच गोष्ट पुन्हा नव्यानं घडू लागली होती. लीझा नुकतीच एक वर्ष लंडनमध्ये राहून आली होती. त्या आधी कंटाळून ती भारतातून पळून गेली. आता ती पुन्हा पळून जाईल. एक तर ती पुन्हा निघून जाईल किंवा मग मला माझी बदली दुसरीकडे कुठेतरी करून घ्यावी लागेल.

सोफ्याकडे पाहून त्याला अचानक एक विचित्र गोष्ट आठवली, आणि तो हसला. त्यानं हा सोफा त्याची इथं बदली झाली तेव्हा लॉरेन्स नावाच्या कमिशनरकडून घेतला होता, कारण त्याची लखनौला बदली झाली होती. आणि नंतर जेव्हा त्यानं सोफ्यावरचं कापड काढलं होतं तेव्हा त्याखाली त्याला, अगदी आत्ता दिसत होता तसाच, एक मोठा डाग दिसला होता. कमिशनरची पत्नीही बोअरडमनं पछाडलेली होती, आणि तीही भयंकर नशेत, हसता-हसता किंवा रडता-रडता, सोफा ओला करून टाकायची, असं त्यानं ऐकलं होतं. आणि कमिशनरही जागोजागी आपल्या बदल्या करवून घेत हिंडत राहायचा. शेवटी त्याच्या पत्नीनं त्याला सोडून दिलं आणि सैन्यातल्या एका तरुण कॅप्टनशी लग्न केलं. रिचर्डनं आपल्या बायकोकडे पाहिलं, अणि मग सोफ्याकडे. या घराचाच असा काही तरी गुण असला पाहिजे, तो मनातल्या मनात म्हणाला, आणि लीझाला उचलून

घेत तो बेडरूमकडे गेला.

बेडरूमपर्यंत जाता जाता लीझा जागी झाली होती, थोडीशी नशाही उतरू लागली होती.

"काय आहे रिचर्ड, मला कुठं घेऊन चाललास?"

"तुझा गाऊन खालून ओला झालाय, लीझा, तुला तुझ्या खोलीत घेऊन चाललोय."

पण लीझाला हे उत्तर नीट ग्रहण झालं नाही.

लीझाला त्यानं बेडजवळच्या आरामखुर्चीवर बसवलं.

"जेवण करणार आहेस का?"

"जेवण? कसलं जेवण?"

रिचर्डला वाटलं, तिच्या दोन्ही खांद्यांना धरून तिला गदागदा हलवावं, तिला लगेच जाग येईल, पण त्यानं असं काहीच केलं नाही. आणि दोन्ही हात कमरेवर ठेवून तो तिच्याकडे बघतच राहिला.

लीझानं विखुरलेल्या केसांमधून डोकं वर उचललं, "रिचर्ड, तू हिंदू आहेस का मुसलमान?"

आणि ती खुदकन् हसली.

"तू कधी आलास, मला कळलंच नाही," लीझा म्हणाली.

"तू दिवसाचं जेवण घ्यायला आलास का रात्रीचं?"

रिचर्डला क्षणभर वाटलं, लीझा त्याचा उपहास करतेय, ती जितकी बतावणी करतेय तेवढी काही तिला नशा चढलेली नाहीय. त्यावर तो तिच्या समोरच्या पलंगावर बसला आणि त्याच्या कडेवर हात ठेवून म्हणाला, "आजकाल मला खूप काम असतं, लीझा, तुला कळायला पाहिजे, खूप कामय, शहरातली धान्याची मंडी जळून खाक झालीय आणि आजूबाजूची १०३ गावं जळून गेलीत."

"१०३ गावं जळाली आणि मला कळलंसुद्धा नाही? मी झोपूनच राहिले आणि मला कळलंही नाही!" मग तक्रारीच्या सुरात म्हणाली, "मला सांगायचं तरी, रिचर्ड, मला उठवून सांगायचं असतंस. इतक्या मोठमोठ्या गोष्टी घडल्या आणि तू मला सांगितलंही नाहीस?"

"झोप लीझा, कपडे बदल आणि झोप, तुला झोप येऊ लागलीय."

"तू माझ्याजवळ बस, मला एकटीला झोप येत नाही."

"तू झोप, अजून मला बरंच काम करायचंय."

"इतकी गावं तर जळून गेलीत अन् अजूनही तुला कामं आहेत? आता तुला अजून काय काम करायचंय?"

रिचर्ड थबकला. लीझा उपहास करू लागलीय का? तिच्या मनात माझ्याबद्दल तिरस्कार निर्माण होऊ लागला आहे का की ती अशा पद्धतीनं बोलतेय?

नशेत बुडालेल्या सगळ्याच माणसांप्रमाणे लीझा मनात येईल ते बोलू लागली होती. ती खुर्चीवरून उठली आणि अडखळत पलंगावर जाऊन रिचर्डच्या शेजारी त्याला खेटून बसली. मग रिचर्डच्या गळ्यात दोन्ही हात टाकून तिने त्याच्या छातीवर डोकं ठेवलं. नाही, हा तिरस्कार असू शकत नाही. तिनं अजाणतेपणीच ते वाक्य म्हटलं असावं.

"तुझं माझ्यावर प्रेम नाहीय, मला माहीतय, मला सगळं माहीतय!"

मग रिचर्डच्या केसांवरून हात फिरवत ती म्हणाली, "किती हिंदू मेलेत, किती मुसलमान मेलेत, रिचर्ड? तुला सगळं माहीत असेलच! धान्याची मंडी म्हणजे काय असतं?"

रिचर्ड गप्प बसून तिच्याकडे पाहात राहिला. लीझाकडे बघता बघता कधी कधी त्याला तिच्याबद्दल घृणा वाटू लागायची. ती जितकी जास्त नशेत असायची तितकी जास्त अनाकर्षक होत चालली होती. मांसाचा गोळा होत चालली होती. या प्रकारचं नातं जास्त दिवस टिकू शकत नाही. रिचर्डचे डोळे लीझाच्या चेहऱ्यावर खिळले. लीझाबद्दलच्या त्याच्या भावना स्पष्ट नव्हत्या. हिच्यासोबत वैवाहिक संबंध ठेवावेत की तोडावेत हा प्रश्नही आपल्या करियरच्या संदर्भातच विचार करण्यासारखा होता. या वेळी त्याच्या करियरमध्ये एक निर्णायक वेळ आलेली होती, आणि त्यासाठी एक नाजूक संतुलन ठेवणं अत्यंत आवश्यक होतं. जनतेचा असंतोष ब्रिटिश सरकारविरुद्ध भडकून उठणार नाही हे बघणं फार आवश्यक होतं. आत्तापर्यंतची सगळी कामं त्यानं अतिशय कौशल्यानं आणि पूर्णत्वानं केली होती. लोक त्याच्या प्रामाणिकपणानं प्रभावित झालेले होते. प्रत्येक गोष्ट अगदी योग्य झालेली होती. यासाठी काहीही करून लीझाला सोबत ठेवणं आवश्यक होतं.

त्यानं पुढे वाकून लीझाच्या गालाचं चुंबन घेतलं.

"हे बघ, लीझा," रिचर्ड उत्साहात सांगू लागला, "मला उद्या सैयदपूरला जायचंय, एका विहिरीत डिस्इन्फेक्टंट टाकायला लावायचंय, त्या विहिरीत काही बायकांनी जीव दिलेलाय. तू पण सोबतच का नाही येत? तिथून आपण मोटरनं तक्षशिलेला जाऊन येऊ. तक्षशिलेला म्युझियम बघू. काय म्हणतेस? तो सगळा भाग फारच सुंदरय."

लीझानं तारवटलेल्या डोळ्यांनी रिचर्डच्या चेहऱ्याकडे पाहिलं, आणि ती म्हणाली, "मला कुठं घेऊन जातोयस, रिचर्ड? मला जळत्या गावांचा दौरा करवून आणतोस? मला काहीही बघायचं नाहीय, कुठेही जायचं नाहीय!"

"नाही, नाही, घरात बसून राहण्यानं काय होणारय? आता परिस्थिती बदलली आहे, आता तू हिंडू-फिरू शकतेस," रिचर्डनं उत्साहाचं सोंग कायम ठेवत म्हटलं, "आता आपण एकत्र हिंडू शकतो. इथला खेड्यांचा भाग खरोखर फार सुंदरय. त्या दिवशी, या सैयदपुरातच फळांच्या बागेजवळून जाताना मी लार्क पक्ष्याचा आवाज ऐकला होता. या ऋतूत तिथं लार्क पक्षी येत असतात. या उष्ण देशातही लार्क पक्षी असतात हे मला माहीत नव्हतं. तू पूर्वी कधी पाहिले नसतील असेही तऱ्हेतऱ्हेचे पक्षी तिथं असतात."

"जिथं बायकांनी जीव दिलाय ती हीच जागाय का?"

"हं तीच, विहिरीच्या जवळच नदी आहे, आणि नदीच्या पलीकडे फळबागा..."

लीझाच्या ओठांवर मंद स्मित झळकलं आणि ती रिचर्डच्या चेहऱ्याकडे पाहत म्हणाली, "तू कसा प्राणी आहेस, रिचर्ड, अशा ठिकाणीही तू नवेनवे पक्षी पाहू शकतोस, लार्क पक्ष्याचा आवाज ऐकू शकतोस?"

"ह्यात काहीच विशेष नाही, लीझा, सिव्हिल सर्विस आम्हाला तटस्थ करून टाकते. आम्ही जर प्रत्येक घटनेनं भावनावश होऊ लागलो तर एकही दिवस प्रशासन चालू शकणार नाही."

"१०३ गावं जळाली तरी?"

"तरीही नाही," क्षणभर थांबून रिचर्ड म्हणाला, "हा माझा देश नाहीय, आणि हे माझ्या देशाचेही लोक नाहीत."

लीझा रिचर्डच्या चेहऱ्याकडे बघतच राहिली.

"पण तू तर या लोकांबद्दल पुस्तक लिहिणार होतास, रिचर्ड! यांच्या वंशाबद्दल. तेच नं?"

"पुस्तक लिहिणं वेगळी गोष्टय लीझा, त्याचा प्रशासनाशी काय संबंधय?"

लीझाला पुन्हा हरवल्यासारखं बघून रिचर्ड म्हणाला, "आज मी हेल्थ-ऑफिसरच्या बायकोला, रिफ्यूजीसाठी सामान जमवायला सांगितलंय - इथं गावागावांतून येणाऱ्या रिफ्यूजींसाठी दोन कॅम्प्स उघडायचा विचारय. आणि तू तिला या कामात मदत करशील, अशी मी खात्री दिलीय." मग आपली सूचना अधिक स्पष्ट करताना तो म्हणाला, "रिफ्यूजींसाठी कपडे, त्यांच्या मुलांसाठी खाण्या-पिण्याच्या गोष्टी आणि खेळणी तू जमा करू शकतेस. यामुळे तुला हिंडण्या-फिरण्याची संधी मिळेल..."

तरीही लीझा गप्पच राहिली. रिचर्डनं पुन्हा वाकून लीझाचं चुंबन घेतलं, आणि उजव्या हातानं तिचे केस कुरवाळत म्हणाला : "मी थांबू शकत नाही, लीझा,

मला खूप कामं आहेत, या वेळी मला माझ्या कार्यालयात असायला हवं होतं."

आणि तो उठून उभा राहिला.

"पुन्हा भेटेन, लीझा! माझी वाट पाहू नकोस... आणि खेड्यावर जाण्यासाठी सकाळी तयार होऊन बस. आपण आठ वाजता निघू." आणि तो खोलीच्या बाहेर निघून गेला.

लीझा बराच वेळ तशीच बसून खोलीच्या दरवाज्याकडे पाहत राहिली. तिचं अंग शहारून उठलं. खोली पुन्हा एका विराट शून्यात बुडून गेली.

20

"आम्हाला फक्त आकडे पाहिजेत, आकडे! तुम्हाला कळत कसं नाही? तुम्ही जे चऱ्हाट लावत बसता, सगळी कथा सांगायला सुरू करता, मला तुमची कथा नकोय, फक्त आकडे पाहिजेत. किती मेले, किती घायाळ झाले, आर्थिक नुकसान किती झालं? फक्त आकडे..."

रिलीफ कमिटीचा कार्यकर्ता रजिस्टर उघडून त्रासिकपणे म्हणायचा, पण रिफ्यूजींना काही ते लक्षातच यायचं नाही. दिवसभर बसून राहा, रजिस्टर काळं करीत रहा, संध्याकाळी यादी तयार करू लागावं तर दोन गावांचेसुद्धा आकडे पूर्ण होत नसत. यांना कुणी समजावून सांगावं, यांच्याशी कडकही बोलवत नव्हतं, कार्यालयातून बाहेरही काढून देता येत नव्हतं. सगळेच्या सगळे आत घुसायचे. कधी कधी कार्यकर्त्याला, एकाच वेळी शेकडो रिफ्यूजी बोलू लागले आहेत, आणि प्रत्येकजण आपापली कहाणी त्याच्याच कानात ओरडून ओरडून ऐकवू लागले आहेत असं वाटायचं. पण त्यांना कुणी काय सांगावं - बर्बाद होऊन आले आहेत, बेघर, सामानसुमान गमावलेले. सगळे त्याच्याच टेबलाजवळ वाकत येतात. रिफ्यूजींनी आपला किस्सा सुरू केला नाही तर दहा मिनिटांत अख्ख्या गावाचे आकडे घेतले जाऊ शकतात. मला हे सगळं सांगत बसू नका, मला फक्त आकडे द्या. पण टेबलासमोर बसलेला करतारसिंह हात जोडून सांगू लागला होता :

"अहो, मी त्याला पुन्हा म्हणालो, इमदादखान, आपण खेळत खेळत लहानाचे मोठे झालो, तू मला विसरलास, पण बाबूजी, सकाळची वेळय, वाहेगुरू खोटं बोलायला लावणार नाही, इमदादनं आधी माझ्यावर वार केला..."

कारकून अस्वस्थ व्हायचा. तो आकडे मागत होता आणि लोक त्याला

आपल्या जखमा दाखवत होते.

"कुऱ्हाड सरळ माझ्या कपाळावरच लागली. या डोळ्यावर. का बाबूजी, माझा डोळा वाचेल का? दादा म्हणत होता, बन्तासिंह, डोळ्यावरची पट्टी काढायची नाही. मी काही पट्टी काढली नाही."

हे आकडे नव्हते, ही कहाणी होती. आणि आता आणखी एक माणूस टेबलासमोर येऊन बसला होता.

आकडेवाला कारकून टेबलावरून डोळे न उचलताच प्रश्न विचारत चालला होता आणि उत्तरं लिहून घेत होताः

"नाव?"

"हरनामसिंह."

"वडिलांचं नाव?"

"सरदार गुरुदयालसिंह."

"मौजे?"

"ढोक इलाहीबख्श."

"तहसील?"

"नूरपूर."

"किती घरं हिंदूंची न् शीखांची होती?"

"फक्त माझं एकट्याचं!"

कारकुनानं डोकं वर केलं. एक वयस्क सरदार प्रश्नांची उत्तरं देत होता.

"तुम्ही वाचलात कसे?"

"करीमखानसोबत आमचे फार चांगले संबंध होते. संध्याकाळी जेव्हा..."

कारकुनानं बोटाचा इशारा करून त्याचं बोलणं बंद केलं.

"जीवितहानी?"

"नाही साहेब. मी आणि माझी घरवाली वाचलोत. माझा मुलगा इक्बालसिंह नूरपूरमध्ये होता, त्याचं काही कळलं नाही. मुलगी जसबीर कौर सैयदपूरमध्ये होती. तिनं विहिरीत उडी टाकून जीव दिला..."

कारकुनानं पुन्हा बोटाचा इशारा करून गप्प बसवलं, "सरळ सांगा जीवितहानी?"

"एक मुलगी बुडून मेली."

"पण ती तुमच्या गावी तर मेली नाही ना?"

"नाही साहेब."

"हे आकडे दुसऱ्या गावातले आहेत. तुम्ही तुमच्या गावातले सांगा."

"आर्थिक नुकसान?"

"दुकान जळून गेलं. सगळं सामान लुटून नेलं. एक ट्रंक होता तोही चोरीला गेला. त्यातले दोन सोन्याचे कडे... पण तो ट्रंक मी स्वतःच एहसानअलीला दिला होता. राजो, त्याची घरवाली प्रामाणिक आणि चांगली बाई. तिनं..."

कारकुनाचं बोट पुन्हा वर उचललं गेलं, आणि हरनामसिंह गप्प झाला.

"दुकान किती रुपयांचं होतं?"

"काय ग बन्तो, दुकान किती रुपयांचं असेल?"

"काही तरी सांगा, सामानसुमानासह... लवकर सांगा, मला अजून खूप कामं आहेत."

"बस्, असेल सात-आठ हजारांचं, मागं जमीन होती, काही."

"दहा हजार लिहू?"

"हां साहेब, लिहून टाका."

"काही चोरीस गेलेला माल परत मिळवायचाय का?"

"जी, एक बंदूक होती, दुनळी बंदूक, ती अधीरोत जलालदीन सुभेदाराच्या घरात ठेवलीय..."

"पण तुम्ही तर अधीरोचे नाहीत, ढोक इलाहीबख्शचे राहणारे आहात."

"होय साहेब, आम्ही ढोक इलाहीबख्शहून पळून गेलो होतो. पहिल्या रात्री तर आम्ही नदीच्या काठाकाठानं पळत राहिलो. रात्री पुन्हा चालत राहिलो. दुसऱ्या दिवशी अधिरोत जलालदीननं आम्हाला आसरा दिला. तो फार चांगला माणूसय, त्यानं आम्हाला भांडी पण वेगळी दिली. तुमचा स्वैंपाक तुम्हीच करून घ्या म्हणाला..."

"बस् बस्, पुरे झालं. त्या सुभेदाराचं नाव आणि पत्ता सांगा."

हरनामसिंह त्याला आपली कहाणी ऐकवू इच्छीत होता, आपल्या पोराबद्दल चौकशी करायला सांगणार होता, पण कारकुनानं काहीही ऐकून घेतलं नाही. सगळा वेळ ओठावर बोट ठेवून होता आणि मग त्याला निघून जायला सांगितलं.

"आता तुम्ही निघून जाऊ शकता."

आकडेवाल्या कारकुनानं त्याला आवश्यक तेवढी गोष्ट लिहून घेतली होती. धान्यातले दाणे काढून घेतले होते, बाकी नुस्ता भुस्सा राहिला होता. भुस्साच भुस्सा. पण कधीकधी कारकून ऐकू लागला तर ऐकतच बसायचा. एखादी आत्मकथा त्याला बांधून ठेवायची. त्याचं मन आणि हृदय जखडून टाकायची

"का बाबूजी, काय माहीत माझ्या सुखवंतनं विहिरीत उडी मारली नसेल ते! काय माहीत हो, पोराला घेऊन गावात कुठे लपून बसली असेल तर. मी

गल्लीतून पळत जाऊन माझ्या घरी गेलो होतो. खाट घ्यायला. आसासिंह जख्मी झाला होता म्हणून. त्याच वेळी मी खूप बायकांना गुरुद्वारातून निघताना पाहिलं. सुखवंतही त्यांच्याबरोबरच होती. मला काय माहीत कुठं चालल्या होत्या ते. तिनं हात वर केलेले होते आणि गळ्यात ओढणी बांधलेली होती. मी खाट घेऊन आलो तेव्हा सुखवंत गल्लीत उभी होती. आधी तीही बायकांच्या मागंमागंच चालली होती. मग ती मागे उभी राहिली होती. आमचा मुलगा गुरमीत गुरुद्वाराच्या ओट्यावर उभा होता. त्यावेळी मागची शाळा जळू लागलेली होती. आगीच्या ज्वाला कधी वरच्या बाजूला जायच्या आणि उजेड भडक व्हायचा. कधी ज्वाला नाहीशा झाल्या की गल्लीत ऊन-सावलीसारखं व्हायचं. याच ऊन-सावलीत मी पाहिलं- सुखवंत घाबरलेली होती. ती कधीही घाबरायची नाही, त्या दिवशीच घाबरली होती. ती परत आली, पोराकडे परत आली. मग गल्लीत उभी राहिली. आग भडकली तेव्हा मी पाहिलं की गल्लीच्या मधोमध ती थरथर कापत उभी होती. 'सुखो, काय करतेयस्?' मी म्हणालो, पण तेव्हा विचार करायला न् बोलायला वेळच कुठे होता! जर त्या वेळी सुखवंतनं मला पाहिलं असतं तर तिनं गुरमीतला तर नसतं नेलं. पुन्हा एकदा ती पोराजवळ गेली आणि मग पुन्हा चालता चालता थांबली. ती काय करायला चाललीय, काय विचार करू लागलीय मला काय माहीत? तेवढ्यात गावाबाहेर गोंधळ सुरू झाला. 'या अली', 'या अली', असे आवाज येऊ लागले. तेवढ्यात मी वळून पाहिलं तर सुखवंत झटकन गुरमीतजवळ आली आणि गुरमीतला हातानी उचलून बायकांच्या मागेमागे पळत जाऊ लागली. शेवटच्या वेळी मी तिला पाहिलं तेव्हा ती पळत होती न् तिची हिरव्या रंगाची ओढणी उडत होती, मग गल्लीचं वळण आलं न् ती डोळ्यासमोरून दिसेनाशी झाली... काय माहीत, तिनं विहिरीत उडी घेतली नसेलही! काय माहीत, की गुरमीतला सोबत घेऊन गेली नसेल, काय माहीत, गुरमीत बुडाला नसेल, तिथं कुठं तरी विहिरीच्या आसपास भटकत असेल. का हो? का बाबूजी? याचा शोध लावला जाऊ शकत नाही का?"

पण हे आकडे नव्हते आणि परतून आणून द्यायचं काम त्याचं नव्हतं, ते देवराजजी करतात, चोरीस गेलेलं सामान परत मिळवणं, गाडलेलं सोनं काढून देणं, कपडालत्ता काढणं, अशी सगळी कामं तेच बघत असतात. सरदारजी, पोराचा शोध लावायला तुम्ही त्यांच्याकडे जा. माझ्याकडे यायचं नाहीय. तुम्ही तिसऱ्यांदा माझ्याकडे आलात, पुन्हा पुन्हा तीच गोष्ट सांगत बसता, ती ऐकणं माझं काम नाहीय...

पण तरीही सरदार समोर बसून कारकुनाकडे बघतच राहिला. हा कोणत्या

आशेनं माझ्याकडे येऊन बसतोय, मी काहीच करू शकत नाही हे मी याला कसं सांगू, पण शेवटी तो कारकून हळू आवाजात सांगायचाच:

"मंगळवारी कदाचित एक बस तुमच्या गावाला जाईल. मी देवराजजींना सांगून ठेवेन, तुम्हाला तिच्यातून घेऊन जायला. पण तुम्ही हे कुणाला सांगू नका, नाहीतर सगळं गाव माझ्याकडे पळत येईल..."

पण या वाक्याचा सरदारावर काहीच परिणाम व्हायचा नाही. मग आपल्याच तर्कानं स्वतःला समजावून सांगत तो म्हणायचा : "पण आपल्या स्वतःच्या डोळ्यांनी बघून घेणं चांगलं असतं. सगळ्या गोष्टी ठोक बाजारात बघून घेतल्या पाहिजेत. पोरगं कुठे लपून बसलं असेल तर मला बघून आपण होऊन बाहेर येईल. पळत पळत बाहेर येईल. किंवा तिथं बसल्या बसल्याच ओरडून सांगेल, 'मला शोधा', 'मला शोधा'. घरातही रोज लपून बसायचा, कधी एका दारामागं, कधी दुसऱ्या दारामागं..."

कारकून हळूच खुर्चीतून उठला, आणि कार्यालयाबाहेर आला.

किती लोक कार्यालयात गर्दी करून घुसले आहेत ते बाहेर सज्ज्यात येऊन पाहिलं. खाली अंगणात जागोजागी खेड्यापाड्यांतून आलेले लोक टोळीटोळीनं बसले होते. मागे लांबलचक रुंद ओट्यावर गर्दी करून लोक बसलेले आहेत. याच ओट्यावर बसून वानप्रस्थीजी वैदिक धर्माच्या मोठेपणाचा प्रचार करीत असत. इकडं पायऱ्यांवरही लोक येऊन बसलेले आहेत.

"रडू नकोस बाबा, गंडासिंह!" त्याच्या कानावर आवाज पडला. कुणीतरी वयोवृद्ध एका माणसाची समजूत घालत होता, "रडू नकोस. जे गेले ते गुरुमहाराजाला प्रिय झाले. पंथासाठी त्यांना जावं लागलं. ते नेहमीसाठी अमर झाले!"

"वाहे गुरु, वाहे गुरु! सतनाम, सच्चे बादशहा!"

पायऱ्यांवर बसलेल्या तीनचार शीखांचा आवाज आला.

आकडेवाला कारकून सज्ज्यात उभा असतानाच आणखी एक सरदार त्याच्याजवळ आला. तो जवळ येताच कारकुनाला आपलं हळुवार हसणं दाबता आलं नाही. मोठमोठ्ठे डोळे, मध्यमवयीन सैलसर शरीर, तोही सारखा सारखा कारकुनाकडे चकरा घालत होता आणि कायम कारकुनाच्या कानाजवळ तोंड नेऊन बोलायचा :

"काही व्यवस्था झालीय का हो गावाकडे जायची? बस जाईल ना? कधी निघेल?"

"ज्या दिवशी बस जाणार असेल त्याच्याआधी तुम्हाला कळवीन. तसं ते माझं काम नाहीय, लाला देवराज..."

"पण आमचं काम होऊन जाईल नं?" मग पुन्हा कारकुनाच्या जास्तच कानाजवळ तोंड करून म्हणाला, "मी तुमचं पण तोंड गोड करीन!"

यावर कारकून किंचित वैतागून म्हणाला, "ओ सरदारजी, थोडी तरी अक्कल जाग्यावर ठेवून बोलत जा. विहिरीत थोड्याथोडक्या नाही, सत्तावीस बायका बुडून मेल्यात. त्यात तुमची घरवाली कोणतीय ते तुम्ही कसं ओळखाल?"

"हे तुम्ही माझ्यावर सोपवून द्या, वीरजी, मी कडे पाहूनच ओळखीन. पाच-पाच तोळ्यांचं एक-एक कडं आहे. गळ्यात सोन्याची साखळी आहे. आता घरवाली बुडून मेली, सगळ्यांचंच झालं ते तिचंही झालं, माझ्यावर प्रसंग गुदरला, पण मी ते कडे आणि साखळी कशी काय सोडून देऊ? काय वीरजी?"

मग पुन्हा कानाजवळ तोंड नेऊन त्यानं सुरू केलं, "जर मला उतरवलंत तर आतूनच तुम्हालाही देईन की! तसं काही नाही...त्या नेक बाईनं इतका पण विचार केला नाही की बाबा, आता मी तर बुडू लागलेय, मी माझे कडे तर काढून ठेवावेत. काय वीरजी? पण आम्ही तुमचं तोंड गोड करू, तुम्ही आमचं एवढं काम करून टाका." मग बाजूला होऊन कारकुनाच्या तोंडाकडे पाहत राहिला न् म्हणाला, "आणखी कुणाला कळलं नाही पाहिजे-बस् तुम्ही न् मी! बसमधून आणखी कुणाला घेऊन जायची गरज नाही."

"ओ सरदारजी, प्रेतं फुगून वर आलीत. फुगलेल्या प्रेताच्या मनगटातून तुम्ही कडं काढू शकता का? जरा अक्कल-बिक्कल नीट ठेवून बोलत जा. सरकार तुम्हाला काढू तरी देईल का?"

"का बरं, बायको माझीय, माल माझाय. कडे मी माझ्या स्वतःच्या पैशानं बनवलेत. छिन्नी-हातोडी सोबत घेऊन जाऊ. म्हणत असलात तर एखाद्या सोनाराचं पोरगंही सोबत घेऊन जाऊ. काही मिनिटातच काम होऊन जाईल. काम करायची नियत असली तर सगळं काही होऊ शकतं!"

"ओ सरदारजी, जरा समजून-उमजून बोलत चला. आधी सरकार ओळख मागील, फुगलेल्या प्रेताला ओळखणं काय सोपी गोष्टय?"

"पण वीरजी, हे काम तर तुमचं आहे ना? आम्ही जे तोंड गोड करणार आहोत तर एवढं काम तुम्ही करालच ना!"

"सरदारजी, हे काम माझं नाहीय, जरा समजून द्या. मी फक्त आकडे गोळा करणारा माणूसय. आर्थिक नुकसानीच्या यादीत मी तुमच्या पत्नीच्या पाटल्या न् गळ्यातली साखळी लिहून घेतलीय. माल हस्तगत करायचं काम माझं नाहीय..."

यावर सरदारजीनं कारकुनाचा हात धरला, "नाराज होऊ नका, नाराज होऊ नये बाबूजी, दुनियेची कामं तर चालतच राहतात!" मग कारकुनाला खेटून उभा

राहिला न् त्याचा उजवा हात आपल्या हातात घेऊन त्याची तीन बोटं वेगवेगळी मोजत म्हणाला, "काय? ठीकय? मंजूरय नं? (तीन बोटं पकडण्याचा अर्थ होता, तीन वीस म्हणजे साठ रुपये.)

"सरदारजी, का आपला वेळ घालवताय? मी काऽही करू शकत नाही!"

यावर सरदारानं कारकुनाची बोटं सोडून दिली, आणि तो कारकुनाच्या चेहऱ्याकडे खूप वेळ बघत बसला. मग आपली चादर नीट खांद्यावर ठेवत तो पायऱ्यांकडे वळला. पायऱ्यांवर गेल्यावर तो पुन्हा थांबला.

"ओ बाबू?... काय?" आणि हात वर करून आपली चार बोटं दाखवत म्हणाला, "मंजूरय का?"

कारकुनानं तोंड वळवलं. थोड्या वेळानं सरदाराचा आवाज आला, "काही तरी दयामाया दाखवा आमच्यावर, आम्ही बरबाद होऊन आलोत."

कारकुनानं वळून पाहिलं तर तो पायऱ्या उतरत होता.

काही वेळानंतर कारकून स्वतःच पायऱ्या उतरून खाली अंगणात आला. फार वेळ टेबलाशी बसून काम करणं त्याला अशक्य होऊन जायचं. संध्याकाळपर्यंत कार्यालयात बसणं आवश्यक असायचं. कारण दिवसभराच्या तपशिलाचं एकत्रीकरण संध्याकाळी करावं लागायचं. मग त्याची एक प्रत करून वर्तमानपत्राच्या संपादकाला पाठवावी लागायची, एक काँग्रेसच्या ऑफिसात, आणि तिसरी फाईलमध्ये. पण मृत्यूच्या आकड्यात वीस-तीसचाच फरक असायचा. कुठे दोन मुसलमान जास्त, तर कुठे दोन हिंदू कमी. आर्थिक नुकसान हिंदू आणि शीखांचंच झालं होतं. काल संध्याकाळी देवदत्त आला होता, विचारू लागला, "आजची टोटल काय आहे?"

"आज तहसील नूरपूरचे काही आकडे मिळालेत. मरणाऱ्यांच्या संख्येत फार अंतर नाहीय. जितके हिंदू-शीख, तितकेच जवळजवळ मुसलमान."

देवदत्त रजिस्टर हातात घेऊन एकेक पान पलटवत होता, मग ते परत करताना म्हणाला, "पानांवर अजून एक खाना करा. गरीब किती मेले आणि खाते-पिते लोक किती मेले?"

"त्यात काय अर्थय? तुम्ही प्रत्येक गोष्टीत गरीब-श्रीमंत ओढून आणत असता."

"आकडे गोळा करण्याचा हाही एक प्रकारय. दोन्ही बाजूंचे गरीब किती मेले, श्रीमंत किती मेले. त्यातूनही तुम्हाला अनेक गोष्टी समजू शकतील."

अंगण ओलांडताना आकडे-कारकुनाचे डोळे अनेक लोकांना ओळखू लागले होते. पायऱ्या उतरताच उजव्या हाताला असलेली मुलगी रोजच्यासारखीच डोलू

लागली होती. तिचं लग्न ज्या माणसाशी ठरलं होतं तो जिवंत आहे का मेलाय हे कळतच नव्हतं. ती तिन्ही दवाखाने पालथे घालून आली होती, पण काहीही पत्ता लागत नव्हता. थोडंसं पुढं हरनामसिंह दुनळी बंदूकवाला आपल्या बायकोबरोबर बसलेला होता. आकडेवाल्या कारकुनानं तोंड फिरवलं. तो दिसताच हरनामसिंह आपल्या बंदुकीसाठी त्याचं डोकं खात राहील हे त्याला माहीत होतं

ओट्यावर एका बाजूला काँग्रेसचे काही कार्यकर्ते बसून आपापसात गप्पा मारत होते. काश्मिरीलाल म्हणत होता, "माझ्या प्रश्नाचं तू सरळ उत्तर दे. जर कुणी माझ्यावर हल्ला केला तर त्या वेळी मी काय करू? त्याच्यासमोर हात जोडून त्याला सांगू की मला मार, माझी अहिंसेवर श्रद्धा आहे ना!"

"अरे, चिमणीएवढा तर तुझा जीवय, तुझ्यावर हल्ला करून कुणाला काय मिळणारय?" शंकरनं खोडी काढली.

"का बरं, हल्ला काय फक्त पहिलवानावरच केला जातो का? हल्ला नेहमी दुबळ्या लोकांवर होत असतो," जितसिंह म्हणाला.

"ही चेष्टा नाहीय," काश्मिरीलालनं पुन्हा सुरू केलं, "अशा वेळी अहिंसा काय म्हणते हे मला माहीत करून घ्यायचंय. मी काय करावं?"

त्यानं बक्षीजींना उद्देशून म्हटलं होतं, पण बक्षीजींनी त्याच्या प्रश्नाकडे काही लक्षच दिलं नाही.

"मी तुम्हाला विचारतोय बक्षीजी, माझा प्रश्न टाळू नका."

"कायय? विचार, काय विचारायचंय?"

"बापूंनी सांगितलंय की हिंसा करू नका. आता दंगलीत जर कुणी माझ्यावर हल्ला केला तर अशावेळी मी काय करावं? त्या वेळी मी त्याच्यासमोर उभा राहून हात जोडू- की बाबा, ये, आणि मान झुकवू आणि म्हणू, कापा माझी मान. काय करू?"

शंकर मधेच बोलला, "गांधीजींनी सांगितलंय की तुम्ही स्वतः हिंसा करू नका. पण गांधीजींनी, कुणी तुमच्यावर हल्ला केला तर तुम्ही त्याचं उत्तर देऊ नका, असं काही सांगितलं नाही."

"मग मी काय करू?"

"जर कुणी तुझ्यावर हल्ला केला तर तू त्याला म्हणायचं, थांब, मी काँग्रेस ऑफीसमध्ये जाऊन, माझं संरक्षण करू वा नको? विचारून येतो." जितसिंह म्हणाला.

"बापूंनी हिंसा करायला बंदी घातलेली आहे. त्यावेळी तुम्ही त्याला समजावून सांगा. की तू जे काही करतोयस ते वाईट करतोयस, असं बोला त्याला."

"मी म्हणतो की जोरदार प्रतिकार करा," मास्टर रामदास म्हणाला.

"पण जोरदार प्रतिकार कशानं करू? माझ्या घरात तर चरखेच चरखे आहेत."

"आणि तू स्वतःही मोठा चरखा आहेस, म्हणून दंगलीबद्दलच बोलत बसलायस सारखा."

"तुम्ही गंमत म्हणून टाळू लागलात, पण हे फार गंभीरय," जितसिंह म्हणाला.

"ऐका महाशय," बक्षीजी खूप वेळ नुसतं ऐकतच होते, मग शांतपणे म्हणाले, त्यांचा आवाज भारावलेला होता, "जरनेलला कधी असे प्रश्न पडत नसत. त्याला आपल्या बचावासाठी म्हणून कधी त्रास झाला नाही. जरनेल सणकी होता, अशिक्षित होता, पण कुणी त्याच्यावर हल्ला केला तर काय करायचं याचा त्याला कधीही त्रास झाला नाही."

सगळे गप्प झाले. जरनेलच्या मरणानं सगळ्यांनाच खोलवर धक्का बसलेला होता.

"पण या सगळ्या भावनात्मक गोष्टी आहेत," काश्मिरीलाल थोड्या वेळानंतर म्हणाला.

"ऐका," बक्षीजी पुन्हा सांगू लागले, "तू स्वतः हिंसा करू नकोस; नंबर एक. तू हिंसा करणाऱ्याला समजावून सांग. जर समजावून सांगायची संधी असली तर; नंबर दोन. आणि तो ऐकत नसला तर जोरदार प्रतिकार कर; नंबर तीन."

"झालं नं! याला म्हणतात उत्तर. समाधान झालं नं? काश्मिरीलाल, आता गप्प बस!"

पण काश्मिरीलालचं पुन्हा चालूच, "कशानं प्रतिकार करू? चरख्यानं?"

"चरख्यानं का? तलवारीनं कर की!" जितसिंह म्हणाला.

"तलवार बाळगायची परवानगी आहे ना मला? का हो बक्षीजी?"

बक्षीजी गप्पच.

"आणि पिस्तूल बाळगायची पण?"

"पिस्तुलामध्ये फार हिंसा असते," शंकरनं पुस्ती जोडली.

"तलवारीत कमी असते?"

"हं, तलवारीत आपली शक्ती घालवावी लागते ना. पिस्तुलाचं काय, बस्, घोडा दाबा न् मारत सुटा."

"मग तलवार बाळगू ना? का हो बक्षीजी?"

बक्षीजींनी काहीही उत्तर दिलं नाही. ते जर बोलले असते तर कदाचित त्यांनी पुन्हा जरनेलचंच उदाहरण दिलं असतं. आकडेवाला कारकून पुढं निघून गेला. दंगलीनंतर ही चर्चा खरोखरच फार विसंगत वाटू लागली होती.

दंगलींची भरती-ओहोटी बरीचशी शांत झालेली होती, आणि तळाच्या ढलप्या, चिंध्या आणि हाडांचे सांगाडे, सांगाड्यांचे तुकडे आणि असं बरचंसं उघडं पडत चाललं होतं.

व्हरांड्यात जाणाऱ्या एका दाराजवळ दहा-बारा लोकांची एक टोळी हास्यविनोदात गढून गेली होती. कारकून तिथं थांबला. त्या टोळक्याच्या मध्यभागी वयस्कर असा बुटका शीख झोपलेला होता. विस्कटलेल्या दाट दाढी-मिश्यातून त्याचे हसरे डोळे दिसत होते. तो कशाला तरी हसत होता, आणि हसताना तो लहान मुलांसारख्या टांगा झटकत होता, आणि तळपाय जमिनीवर आपटून हसत होता. आजूबाजूचे लोकही हसत होते. ते त्याचे मित्र आणि नातेवाईक असल्याचं जाणवत होतं.

"आपल्या गावी जायचं का, नत्थासिंह?"

यावर जमिनीवर पडलेल्या नत्थासिंहानं आपले पाय आखडून दुमडून घेतले, कूस बदलून एका अंगावर झोपला, आणि आपल्या दोन्ही जांघांमध्ये हात धरून ठेवले.

"नाही जायचं."

"का नाही जायचं."

त्यानं दोन्ही जांघांमध्ये आपले हात जास्तच दाबून धरले आणि गुडघे चिकटवले. आजूबाजूचे लोक हसू लागले. कारकुनाला वाटलं हा प्रश्न त्याला पूर्वी अनेकदा विचारला गेलाय, आणि तो एक खेळच होऊन बसलाय.

"का नाही जायचं?"

"नाही जायचं," तो म्हणाला, आणि आपल्या जांघा अधिकच घट्ट केल्या आणि लहान मुलांसारखं उजव्या-डाव्या बाजूला डोकं हलवलं.

"पण का नाही जायचं? काही कारण?"

"उत्थे सुनती करने ने." (तिथं सुंता करतात)

आणि तो स्वतः हसू लागला आणि जांघा घट्ट करून त्यानं आपली कूस बदलली. सगळे सरदार जोरजोरात हसू लागले.

व्हरांड्यात पलीकडे अंगणातल्या एका बाजूला शाळेच्या चपराशाची एक खोली होती. रोजच्यासारखाच आजही चपराशाचा नातेवाईक आपल्या ब्राह्मण पत्नीबरोबर खाली मान घालून गप्प बसला होता. पहिल्या दिवशी चपरासी त्याला घेऊन त्याच्याकडे आला होता. त्याची मुलगी बेपत्ता झाली होती आणि तो व त्याची बायको दोघंही भयंकर रडले होते. आपल्या मुलीचा शोध लावा म्हणून सारखं हात जोडून विनवणी करत होते. गावातल्या एका गाडीवानानं तिला घरी ठेवून घेतलं होतं, असंही त्यानं सांगितलं होतं.

आकडेवाला कारकून चालता चालता पंडिताजवळ जाऊन थांबला.

"उद्या सकाळी एक बस नूरपूरला जाईल. सोबत सशस्त्र पोलीस असतील. मुलीचा शोध लावण्यासाठी जायचं असलं तर उद्या सकाळी जा. एक सरकारी माणूस असेलच सोबत."

पंडितानं मान वर कर करून आपल्या बारीक बारीक मळक्या डोळ्यांनी कारकुनाकडे पाहिलं, आणि निराश होऊन डोकं हलवलं.

"आता नाही सापडणार हो, आता प्रकाशो कुठं सापडणारय?"

"पण गावातल्या एका माणसानं तिला घरी ठेवून घेतलंय ते तुम्हीच तर सांगितलं!"

"तिचं काय झालं असेल ते देवालाच माहीत!"

"उद्या आणखीही इत्तर लोक गावी परतणार आहेत. बाई, तुमचं काय मतय?"

पंडिताच्या पत्नीनं डोकं वर केलं, मग शून्यात बघत असल्याप्रमाणे म्हणाली, "मी काय म्हणणारय बाबूजी, जिथं असेल तिथं सुखी रहावी."

कारकुनाला या उत्तराची अपेक्षा नव्हती. त्याला वाटलं, तिचे आई-वडील गावाकडे जाण्यासाठी घाबरू लागलेत.

"तुम्ही मला पत्ताबित्ता द्या. मी पोलिसांना सांगून तिला परत आणून घेतो."

त्यावर ती बाई म्हणाली, "आता आमच्याकडे येऊन तरी काय करील हो? वाईट गोष्ट तर त्यांनी आधीच तिच्या तोंडात टाकली असेल."

मग पंडित म्हणाला, "आमच्यानं आमचा जीव सांभाळला जात नाहीय बाबूजी, दोन पैसेसुद्धा खिशात नाहीत, तिला काय खाऊ घालणार, आम्ही काय खाणार!"

आकडेवाला कारकून आत्तापर्यंत अशा प्रकारच्या अनुभवाशी परिचित झालेला होता. थोडा वेळ तो तिथंच स्तब्ध उभा राहिला, आणि मग पुढे निघून गेला.

प्रकाशोला खरोखरच अल्लारक्खानं घरी ठेवून घेतलं होतं. गावात दंगल सुरू झाली तेव्हा मायलेक डोंगराच्या पायथ्याशी लाकडं गोळा करीत होत्या. अल्लारक्खा आधीपासूनच दोन-तीन माणसांसोबत कुठे तरी दबा धरून बसला होता. वेळ साधूनच ते आले आणि अल्लारक्खा रडणाऱ्या-किंचाळणाऱ्या प्रकाशोला उचलून घेऊन गेला होता. पहिल्या रात्री तर प्रकाशो अंधाऱ्या तळघरात पडून राहिली, पण दुसऱ्या दिवशी अल्लारक्खानं तिच्यासोबत लग्न लावून घेतलं आणि तिच्यासाठी लग्नात घालायचे कपडेही कुठून तरी मागवले. दोन दिवस प्रकाशो उपाशी राहून रडत होती, आणि दगडासारख्या डोळ्यांनी तिच्या घराच्या भिंतीकडे पाहत होती, पण तिसऱ्या दिवशी तिनं वाटीभर लस्सी प्यायली होती, आणि तोंडही धुतलं होतं, तिला खूप भूकही लागली होती. तिचे आई-वडील अजूनही सारखे तिच्या

डोळ्यांसमोर फिरत असत, पण अल्लारक्खाच्या तुलनेत तिचे आई-वडील दुबळे, हीन-दीन होते हे तिला माहीत होतं. तिचे डोळे हळूहळू अल्लारक्खाच्या घरातल्या वस्तूंवरून फिरू लागले होते. खोलीच्या बाहेर अंगणात घोडा बांधलेला होता. घोड्याच्या पाठीवर शिरशिरी यायची, लाटेसारखी त्याची पाठ हलायची. घराच्या बाहेर, झाडाखाली अल्लारक्खाचा टांगा सोडलेला होता. प्रकाशोनं पूर्वीही अनेकदा तो टांगा पाहिला होता. वास्तविक अल्लारक्खाची प्रकाशोवर फार दिवसांपासून नजर होती आणि प्रकाशोलाही त्याचा वास आला होता. गावात जाता-येता, ओढ्यावर पाणी भरताना,कपडे धुताना अल्लारक्खा वेगवेगळे आवाज काढत असायचा, आणि अधूनमधून चोरूनमारून तिला खडेही मारायचा. प्रकाशोनं कधी आपल्या वडिलांजवळ तक्रार केली नव्हती. आपले वडील काहीच करू शकत नाहीत हे तिला माहीत होतं. ती अल्लारक्खालाही घाबरायची आणि आपल्या वडिलांनाही घाबरायची.

शेवटी दंगलीच्या काळात अल्लारक्खा रडत्या तडफडत्या प्रकाशोला उचलून आपल्या घरी आणण्यात यशस्वी झाला. आणि आता या वेळी जेव्हा रिलीफ-कार्यालयात प्रकाशोची आई रडून रडून तिची आठवण काढत होती आणि तिला आपल्याकडे परत आणण्यासाठी धैर्य एकवटू शकत नव्हती, त्याच वेळी प्रकाशो, अल्लारक्खाच्या भीतीपोटी लग्नातले नवे कपडे घालून खोलीतल्या खाटेवर बसली होती. त्याच वेळी अल्लारक्खा तिच्यासमोर येऊन बसला आणि हातरुमालात बांधलेला पुडा खाटेवर तिच्यासमोर ठेवून म्हणाला : "खा!"

प्रकाशो सगळा वेळ खाटेच्या खाली बघत होती. हूं नाही की चूं नाही. तिनं डोळे वर करून अल्लारक्खाकडेही पाहिलं नाही आणि पुड्याकडेही पाहिलं नाही.

"खा, मिठाई है. सूरे निये बच्चिये, खा, मिठाई लियायावाँ तेरे वास्ते." (खा, मिठाई आहे, डुकराच्या पोरी, खा, मिठाई आणलीय तुझ्यासाठी.)

या वेळी प्रकाशोनं डोळे वर करून मिठाईकडे पाहिलं. अल्लारक्खाकडे बघण्याची तिची अजूनही हिंमत होत नव्हती.

"खा!" अल्लारक्खा एकदम ओरडला, त्यामुळे प्रकाशो पायापासून डोक्यापर्यंत थरारली.

"मिठाई ए, सूरे नीये धीये, जहर नही!" (मिठाई आहे, डुकराच्या पोरी, विष नाहीय!)

आणि अल्लारक्खानं पांढऱ्या बर्फीचा एक तुकडा हातात घेतला अणि पुढे होऊन डाव्या हातानं प्रकाशोचा गाल पकडून ओढला, त्यामुळे प्रकाशोचं तोंड उघडलं आणि त्यानं तिच्या तोंडात बर्फीचा तुकडा कोंबला.

प्रकाशोला अल्लारक्खाच्या या आरडाओरड्यात आग्रहाचा अस्पष्ट सूर दिसत होता; पण अजूनही ती भेदरलेली, आक्रसून बसलेली होती. मुसलमानाच्या हातची मिठाई कशी खायची?

"हिंदू हलवायाच्या दुकानातली आहे, डुकराच्या पोरी, खा!"

हळूहळू भीतीपोटी प्रकाशो मिठाईचा तुकडा तोंडात चावू लागली. तिला मिठाईचा तुकडा चावत असताना बघून अल्लारक्खाला हसू आलं. तो म्हणाला, "विष आहे का मिठाई?"

प्रकाशो कधी कधी मिठाई चावू लागायची, कधी तोंड बंद करून घ्यायची.

"खा!" असं अल्लारक्खा जोरात ओरडायचा आणि प्रकाशोचा जबडा पुन्हा चालू लागायचा. प्रकाशोच्या शरीराचा वास अल्लारक्खाला अस्वस्थ करू लागला होता.

"आपल्या हातानं खा!" यावेळी त्याचा आवाज सौम्य झाला होता, "खाल्ली नाहीस तर तुला खाली पाडून सगळी मिठाई तुझ्या तोंडात कोंबून टाकीन. खा!"

प्रकाशोनं अल्लारक्खाकडे पाहिलं. याआधीही तिनं अल्लारक्खाला खूप वेळा पाहिलं होतं, पण इतक्या जवळून कधीच पाहिलं नव्हतं. त्या पातळ काळ्या मिश्या तिला दिसल्या. अल्लारक्खानं डोळ्यात सुरमा घातला होता, आणि त्यानं स्वच्छ पांढरे कपडे घातले होते. केसांना तेल लावलेलं होतं.

प्रकाशोची भीती थोडीशी कमी झाली. पण वरवर मात्र ती पहिल्यासारखीच भेदरल्यासारखी आक्रसून बसली होती.

"खातेस का खाली पाडून घालू?" अल्लारक्खा म्हणाला, आणि त्याचा डावा हात पुन्हा प्रकाशोचा गाल आणि हनुवटी पकडण्यासाठी उंचावला.

आपल्या शरीरातून अल्लारक्खाचं भय कमी होऊ लागलंय, कमी-कमी होऊ लागलंय, दूर होऊ लागलंय, हे हळूहळू प्रकाशोला जाणवू लागलं. बर्फीचा तुकडा चघळत असताना तिनं पुन्हा एकदा त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं. मग तिचं लक्ष त्याच्या मानेकडे गेलं. त्यानं गळ्यात काळ्या दोऱ्यानं एक ताईत बांधलेला होता. गळ्याजवळचं बटण उघडंच होतं. त्याच्या धारदार सदऱ्याकडेही तिचं लक्ष गेलं. अल्लारक्खा फारच नीटनेटका, स्वच्छ होऊन बसला होता.

अल्लारक्खानं बर्फीचा आणखी एक तुकडा हातात घेतला होता. प्रकाशो चावणं कधी बंद करील आणि कधी तो तुकडा तोंडात कोंबू शकेल याची वाट बघतच तो बसला होता. प्रकाशोची दृष्टीही त्याच्या हाताकडेच होती. अचानक प्रकाशो सौम्य आवाजात म्हणाली, "तू खा!"

या वाक्याचा अल्लारक्खावर विजेसारखा परिणाम झाला.

"बोलली तं शेवटी! ..."

"नको."

"खा."

प्रकाशोनं नकारार्थी डोकं हलवलं. एक मंद स्मित प्रकाशोच्या ओठांवर पसरलेलं आहे असं अल्लारक्खाला वाटलं. प्रकाशोनं डोळे वर उचलून अल्लारक्खाकडे पाहिलं.

"तू खाऊ घातलंस तर खाईन!"

प्रकाशोची नजर क्षणभर अल्लारक्खाच्या चेहऱ्यावरच खिळून राहिली. मग तिनं हळूच मिठाईचा एक तुकडा उचलला. तुकडा हातात घेतल्यावरही तिचा हात उचलत नव्हता. प्रकाशोचा चेहरा पांढराफटक पडला होता, आणि हात कापू लागला होता. आपण हे काय करतोयत आणि आपल्या आई-वडिलांना कळालं तर त्यांना काय वाटेल? पण त्याच वेळी आग्रह आणि उन्मादानं भरलेल्या अल्लारक्खाच्या डोळ्यांनी तिला पाहिलं आणि तिचा हात अल्लारक्खाच्या तोंडापर्यंत पोहोचू शकला.

दोघं एकमेकांसोबत खुलू लागले होते. अल्लारक्खानं पुढे होऊन तिला मिठीत घेतलं. घाबरलेली असूनही प्रकाशो या अनोख्या अनुभवात भाग घेऊ लागली होती, ती ग्रहणही करू लागली होती. जणू भूतकाळ मागे सरकत, सुटत चाललाय आणि वर्तमानकाळ आपले बाहू फैलावून तिला आलिंगन देण्यासाठी उतावीळ होऊ लागलाय असं तिला वाटलं. स्थिती झपाट्यानं बदलत होती. या प्रसंगात प्रकाशोला आई-वडिलांची आठवण विसंगत वाटू लागली होती.

खूप वेळ ते एकमेकांसोबत पडून राहिले. खूप वेळ प्रकाशो गप्प होती. मग जेव्हा अल्लारक्खाच्या बाजूला तिची पाठ होती आणि डोळे खोलीच्या भिंतीवर खिळलेले होते तेव्हा ती हळूच म्हणाली, "मी पाणी भरायला जायची तेव्हा तू मला खडे का मारायचास?"

उत्तरादाखल अल्लारक्खाचा हात प्रकाशोच्या कमरेभोवती गेला.

"कारण तू माझ्याशी बोलायची नाहीस म्हणून."

"मी का बोलू?"

"आता बोलतेयस की नाही?"

प्रकाशो गप्प बसली. मग हळूच म्हणाली, "माझी आई कुठंय?"

"मला काय माहीत तुझी आई कुठंय ते. घरी नाहीय का?"

प्रकाशो गप्प बसली. तिच्या छातीत कळ आल्यासारखं झालं, आणि डोळ्यांत पाणी येऊ लागलं. आई-वडील कुठेतरी निघून गेलेत आणि आता पुन्हा कधीच भेटू शकणार नाहीत याची तिला खात्री पटू लागली होती.

"आमच्या घराला आग लावली होती का?"

"नाही. लोक आग लावत होते, पण मी त्यांना थोपवलं. मी तिकडं कुलूप लावून आलोय."

प्रकाशोला त्याच्या उत्तरानं बरं वाटलं. तिनं हळूच आपला हात उचलून कमरेवरच्या अल्लारक्खाच्या हातावर ठेवला.

रिलीफ कार्यालयात आलेला प्रत्येक माणूस आपला विशिष्ट अनुभव घेऊन आला होता. पण तो अनुभव तपासण्याची, पारखण्याची आणि त्यातून निष्कर्ष काढण्याची क्षमता कुणाजवळही नव्हती. शून्यात दृष्टी लावून बसण्याशिवाय, डोकं हलवून हलवून प्रत्येकाचं बोलणं ऐकून घेण्याशिवाय कुणाला काहीही सुचत नव्हतं. एखादी अफवा उठली की अंगणात विखुरलेले लोक उठून जाऊन ती ऐकायला एकत्र गोळा व्हायचे. आपल्याला काय करायचंय, कुठे जायचंय हे कुणालाही कळत नव्हतं. पुढे काय होईल याची धूसर रूपरेषाही कुणासमोर नव्हती. एक अनिवार्य घटनाचक्र फिरू लागलंय, त्यावर कुणाचंही नियंत्रण नाही, कुणाच्याही हातात निर्णय नाही, संचालन नाही, आणि संचालनाची क्षमताही नाही; सगळे बाहुल्यासारखे फिरत असतात, भूक लागली की उठून इकडं तिकडं हिंडून काही तरी खाऊन घेत असतात, आठवण आली की रडत बसतात आणि सकाळपासून रात्रीपर्यंत लोकांचं बोलणं कान देऊन ऐकत असतात.

21

शांतता समितीच्या मीटिंगसाठी लोक हॉलमध्ये जमू लागले होते. कुणालाही आक्षेप असणार नाही अशी हीच एक जागा होती. कारण हा महाविद्यालयाचा हॉल होता, आणि महाविद्यालय हिंदूंचंही नव्हतं आणि मुसलमानांचंही नव्हतं. महाविद्यालय ख्रिश्चनांचं होतं. प्रिन्सिपलही हिंदुस्तानी नव्हता, अमेरिकन पाद्री होता, फार मनमिळाऊ, फार शांतताप्रेमी होता. मीटिंग सुरू व्हायला अजून वेळ होता. शहरातले सर्वच जमातीतले खास-खास लोक येणार होते. जे लोक आलेले होते ते मोठ्या व्हरांड्यात दोनदोन, तीनतीनच्या टोळ्या करून हिंडत फिरत गप्पागोष्टी करीत होते किंवा मग हॉलच्या आत उभे राहून विचार-विमर्श करीत होते.

बुटका कॉन्ट्रॅक्टर शेख नूरइलाहीला सांगत होता, "विकत घ्यायचा विचार असला तर हीच वेळय. नंतर किंमती वाढत जातील. मला विचारा शेखजी, मी योग्यच सांगतोय. विचार असला तर बोलवून घेऊ का?"

"काय माहीत, किंमती अजूनही उतरल्या तर?" शेखजीनं अंदाज बांधत सांगितलं.

"यापेक्षा आणखी काय कमी होणारैत? याच भागात मी पंधराशे रुपये एकर जमीन स्वतः विकलीय. आता तोच एकर सातशेला मिळू लागलाय." मग कोपर पकडून आणि तोंड वर करून तो म्हणाला, "शेखजी, शांतता-वगैरे झाल्यावर किंमती वाढतील का कमी होतील?"

"विचार करीन."

"अवश्य विचार करा, पण विचार करतच बसू नका. याआधीही तुम्ही चांगले चांगले सौदे हातातून घालवलेत."

शहरात दंगली झाल्यापासून एक लाटच आली होती. ज्या भागात मुसलमान जास्त संख्येनं होते तिथून हिंदू-शीख सोडून निघून जाऊ लागले, आणि ज्या भागात हिंदू आणि शीखांची संख्या जास्त होती तिथले मुसलमान घरदार वेचून निघून जाऊ इच्छित होते.

"तुम्ही तुमचं मन पक्कं करा, मी शंभर-पन्नास कमी करायला लावीन. हा सौदा चांगलाय, आणि पुन्हा मिळायचा नाही. तुम्हाला मुसलमानी भाग असावा न् घरासमोर मोठी सडक असावी हेच पाहिजेय नं?"

"ठीकय, लवकरच कळवीन."

अजून दोन मिनिटं जरी शेख नूरइलाही तिथं उभा राहिला असता तरी सौदा पक्का झाला असता. पण कसंतरी करून आपला हात सोडवून तो कॉन्ट्रॅक्टर मुन्शीरामच्या तावडीतून निघून गेला, आणि म्युनिसिपल कमिटीच्या काही सदस्यांच्या टोळक्यात जाऊन उभा राहिला. मुन्शीराम उभ्या उभ्या इकडं तिकडं पाहू लागला, मग हळूहळू सरकत सरकत बाबू पृथ्वीचंदजवळ गेला:

"तुमच्या बाजूचं जुळं घर विकाऊ आहे का?"

"ते घर कुठंय, निव्वळ कच्ची इमारतय."

"कच्ची असली तरी मी म्हणेन की घेऊन टाका. कवडी किंमतीनं विकायला निघालीय. जोडून घेतलंत तर घर एकदम लांबरुंद, मोठ्ठं होऊन जाईल."

"आणि जर पाकिस्तान निर्माण झालं तर?"

"सोडा हो राजे, हे सगळे राजकारण्यांचे चोचले आहेत. आणि निर्माण झालं तरी काय होणारय, लोक तर इथंच राहणार आहेत ना, कुठं पळून तर जाणार नाहीत ना?"

आजचा दिवस एका सौद्याशिवायच रिकामा जावा, असं मुन्शीरामला वाटलं

नव्हतं. इतके पैसेवाले धनवान लोक एकाच ठिकाणी एकत्र कुठं सापडणार आहेत?

बाबू पृथ्वीचंदानं भाकीत करीत सांगितलं, "शांतता वगैरे झाली तर आपला मोहल्ला सोडून कोणी जाणार नाही."

"काय बोलताय बाबूजी, आता तो विचार काढा डोक्यातूनच. आता हिंदूंच्या मोहल्ल्यात कुणी मुसलमान राहणार नाही न् मुसलमानांच्या मोहल्ल्यात हिंदू राहणार नाही. ही काळ्या दगडावरची रेघ समजा. पाकिस्तान होवो न होवो, आता मोहल्ले वेगळे वेगळे होणार हे स्पष्टचय."

लाला लक्ष्मीनारायण दूरवरून येताना दिसले तर शेख नूरइलाहीनं चिमटा काढला, "आला बघा सावकार!"

जवळ आल्यावर शेख नूरइलाहीनं मोठ्या आवाजात म्हटलं, "दंगल धडवूनच दम घेतलात तुम्ही, ओ सावकार!"

आजूबाजूचे लोक हसले. शेख नूरइलाही आणि लाला लक्ष्मीनारायणचे घनिष्ठ संबंध होते, दोघंही शहरातल्या मिशन स्कूलमध्ये सोबतच शिकले होते, दोघंही कपड्यांचा व्यापार करायचे.

"सावकाराचा काही भरोसा नाही, का सावकार?"

त्यांना इतक्या प्रेमानं एकमेकांशी बोलताना पाहून एका बाजूला उभा असलेला सरदार सोहनसिंह आपल्याच मित्राला म्हणाला, "आम्हाला सगळ्यांना इथंच राहायचंय. पागलपणा डोक्यात शिरला तरी इथंच राहायचंय. क्षुल्लक लढाई-भांडणाचं काही विशेष नाही. तसं तर घरातील भांडीही एकमेकांवर आदळतात, शेजाऱ्या-पाजाऱ्यांची आपापसात भांडणं होतच असतात. पण राहायचंय तर आपल्या सगळ्यांना इथंच. शेजारी आपला उजवा हात असतो."

आणि दोघांनीही मिठी मारली. आतल्याआत दोघंही कट्टर पंथी होते, पण एकत्र खेळत लहानाचे मोठे झाले होते म्हणून दोस्तीही होती, मिळणं-मिसळणं होतं, थोडेफार सुखदुःखात सहभागीही व्हायचे. शेख नूरइलाहीच्या वाक्यात विनोद किती होता आणि हिंदुबद्दलची घृणा किती होती, हे सांगणं कठीण होतं.

मग हळूच तो लक्ष्मीनारायणला म्हणाला, "तुझ्या गाठी मी गोदामातून उचलून घेतल्या होत्या."

लक्ष्मीनारायण मंद हसला. मग शेख नूरइलाही आपल्या विनोदी पद्धतीनं म्हणाला, "आधी तर मी म्हणालो, जळू द्या, स्साला सावकाराचा माल. मग मनात आलं, नाही यार, शेवटी तर दोस्तचय माझा..."

आजूबाजूला उभ्या असलेल्या लोकांना दोस्तांचं हे भेटणं फार बरं वाटत होतं.

नूरइलाही सांगतच होता, "आधी तर पोरला मजूरच मिळाले नाहीत. त्या

रात्री मिळणार तरी कुठून ? मी त्याला म्हणालो, 'काहीही करून त्या गाठी उचलून ने, नाही तर लाला काही मला जगू द्यायचा नाही.' आणले पकडून मग कुठून तरी दोन हमाल."

यावर दोघेही हसले.

तो हास्यविनोद आपल्याजागी ठीक होता, त्यामागे एक विशेष दृष्टी होती, पण त्यात सच्च्या भावना नव्हत्या, फक्त एक प्रकारची अनौपचारिकता होती. प्रौढ स्वार्थी पुरुषांमध्ये वाढत्या वयासोबतच येत जाणारी अनौपचारिकता. शिवाय आत खोलवर वैमनस्यही होतं, घृणाही होती. तरीही दोघं व्यापारी होते, व्यवहारकुशल होते, एकमेकांची आवश्यकता कुठं असते याची जाण असणारे होते.

खांबाखाली उभा असलेला हयातबख्श, कुठल्यातरी शहराच्या सौंदर्याचं वर्णन करीत होताः

"इतकं विलक्षण सुंदर शहर, सरदारजी, की जणू नववधूच उभी आहे," तो सांगत होता, "संध्याकाळी दिवे झगमगायचे तेव्हा चारी बाजूंना नुसता लखलखाट, समुद्राचा किनारा, सजावट, काय सांगू सरदारजी, जशी नववधूच उभी आहे. स्वच्छ चकचकीत रस्ते बघताना तर डोळे नुसते भिरभिरत राहतात बघा."

"कोणत्या शहराची स्तुती चाललीय हयातबख्श?"

"रंगून, रंगून. फारच सुंदर शहरय. फार पूर्वी मी तिथं गेलो होतो. वा वा, काय सांगू यार!"

एकमेकांना भेटणारे विभिन्न जातिधर्माचे लोक जाणूनबुजून दंगलींची चर्चा टाळत होते. एरवी जळत्या गावांच्या आणि जळत्या धान्यमंडीच्या पार्श्वभूमीवर नववधूसारख्या एखाद्या सुंदर शहराची चर्चा कशी काय शक्य होती?

दुसरीकडे वयोवृद्ध लाला पृथ्वीचंद आपल्याभोवतीच्या लोकांना तीव्र बारीक आवाजात सांगत होता, "मी त्यांना समजावून सांगितलं, अरे मूर्खांनो, गल्लीच्या तोंडाशी लोखंडाचं फाटक बसवून काय तुम्ही वाचणार आहात? अरे, काही अकलेची गोष्ट करा. बाहेरचा माणूस आत येऊ शकला नाही तर आतलाही माणूस बाहेर जाऊ शकणारय का? फाटक बसवून तुम्ही आपल्याला कैद करवून घेत आहात."

एका कोपऱ्यात लाला श्यामलाल काँग्रेस कमिटीचा सदस्य आकडेवाल्या कारकुनाला ढकलतच एका बाजूला घेऊन जात होता, "एक गोष्ट तुला लक्षात ठेवायला पाहिजे, बेटा... इकडं या बाकावर बसून बोलू, ये."

दोघंही जण बसले. लालाजी आपलं तोंड आकडेवाल्या कारकुनाच्या कानाजवळ नेऊन सांगू लागले, "म्युनिसिपल कमिटीच्या निवडणुकीत आमच्या वॉर्डातून कोण उभं रहाणारय काँग्रेसकडून ?"

"मला तर माहीत नाहीय लालाजी. सध्या लोक रिलीफच्या कामात गुंतले आहेत."

"सगळे लोक नाहीय. तू नक्कीच रिलीफच्या कामात गुंतलायस. तरीही तू काही ऐकलंच असशील की?"

"मी खरंच काही ऐकलं नाही, लालाजी. पण अशा परिस्थितीत कमिटीच्या निवडणुका होतील की नाही, मला शंकाच आहे."

"दुनियादारीची कामं कधी बंद झालीत का, बेटा? मी डेप्युटी कमिशनरांना भेटलोय. दोन महिन्यांनी निवडणुका होणार आहेत. नावाचे अर्ज पंधरा जूनला भरायचेत. म्हणून आता काही फार वेळ राहिलेला नाहीय!"

"मला तर काहीच माहीत नाहीय."

"जगात डोळे उघडे ठेवून चालावं लागतं, बेटा. आता तर आम्ही जास्त वेळ राहणार नाहीत. तुमच्यासारख्या तरुणांनाच ही सगळी कामं सांभाळावी लागणार आहेत. म्हणूनच आता फार वेळ शिल्लक नाहीय." मग आकडेवाल्या कारकुनाच्या कानाजवळ तोंड नेऊन ते म्हणाले, "मी उभा राहणारय निवडणुकीला."

कारकुनानं लालाजींच्या चेहऱ्याकडे पाहिलं.

"काँग्रेस मंगलसेनला तिकीट देणारय असं मी ऐकलंय."

"पण लालाजी, तुम्हाला काँग्रेसच्या तिकिटाची काय गरजय?"

पण प्रश्न विचारताच आकडेवाल्या कारकुनाला कळून चुकलं होतं. आता जर हिंदू उभा राहणार असला तर त्याला काँग्रेसच्या समर्थनाची गरज होती, मुसलमान असला तर मुस्लिम लीगची. काँग्रेस हिंदुंची संस्था आहे हे लोकांच्या मनात आता पक्कं रुजलं होतं. लाला शामलालचे कपडे दुरून खादीसारखे दिसायचे एवढाच त्यांचा काँग्रेसशी संबंध होता.

"काँग्रेसनं अशा माणसांना तिकीट दिलं तर बदनाम होणार नाही का?" मग पुन्हा त्यांनी कानाजवळ तोंड नेऊन सांगितलं, "जुगाराचे अड्डे चालवितो. त्याचे दोन अड्डे आहेत. पोलीसवाल्यांशी हातमिळवणी करून अड्डे चालवतोय. आता शहरात गांधीजी आले, नेहरूजी आले की त्यांच्या पुढेपुढे नाचत असतो, म्हणून काय तो काँग्रेसी होतो? खादी तर काही घालत नाही."

"घालतो." आकडेवाला मध्येच म्हणाला.

"आत्ता घालू लागलाय, गेल्या दोन वर्षांत. आधी कुठं घालत होता? याच्या घरात तरी कुणी घालतं का खादी?"

आकडेवाल्या कारकुनासारखा सहिष्णू श्रोता पाहून लालाजी बोलतच होते, "बिअर पीत असतो. विश्वास नसला तर कंपनी बागेतल्या क्लबात जाऊन बघ, याचा बापही लबाड होता. हाही लबाडय." मग लाला श्यामलालनं नाक फुगवून सांगितलं, "याच्या बापाला मूळव्याध झाली आहे. त्यातच मेला तो. हाही तसाच मरणारय."

आकडेवाल्या कारकुनाला मूळव्याध ही काय पीडा आहे ते माहीत नव्हतं, पण लालाजी मंगलसेनवर इतका का राग काढतोय हे न समजल्यानं तो हैराण झाला होता.

"मी जर याच्या भानगडी काढू लागलो तर एका दिवसात नागवा होऊन जाईल, पण मी म्हणतो, नको बाबा, समाजात सगळ्यांनाच जगायचंय, तो जाणे न् त्याचं काम जाणे, पण बनवाबनवी न् खोटेपणानं लोकांची फसवणूक तरी करू नये."

"पण लालाजी, मंगलसेन जिल्हा काँग्रेस कमिटीचा मेंबर तरी आहे, पण आपण काँग्रेसचे चार आण्याचे मेंबरसुद्धा नाहीत. तुम्हाला कसं काय तिकीट मिळू शकतं?"

"अरे, तिकीट मागतंच कोण? या वॉर्डासाठी काँग्रेसनं कुणालाच तिकीट देऊ नये, स्वतंत्रपणे कुणीही उभं राहिलं तरी चालेल एवढीच माझी इच्छाय..."

तिकडं लाला लक्ष्मीनारायण हयातबख्शला कुठल्या तरी औषधाबद्दल विचारू लागला होता. हयातबख्शला बऱ्याचशा जडीबुटींची नावं माहीत होती. मुतखड्यावर तो स्वतः औषध तयार करायचा आणि फुकट वाटायचा, पण उपाय मात्र सांगायचा नाही, कारण त्यामुळे औषधाचा परिणाम निघून जातो म्हणे.

रणवीरला पळताना दुखापत झाली होती, गटारीत पाय गेल्यामुळे पाय फारच मुरगळला होता, आणि गुडघ्यालाही मार लागला होता. हयातबख्श मान डोलवत ऐकत होता, मग म्हणाला, "नाही-नाही , तेलानं मालीश करू नका, त्याच्या परिणामानं फार थंड पडेल ते. माझ्याजवळ तेलय, अशरफनं ते लाहोरहून आणलं होतं, त्यानं नसा सैल पडतात, लवकर आराम मिळेल त्याला. खात्रीलायक आहे. मी पाठवून देईन."

मग आवाज हळू करून तो म्हणाला, "पाय कसा काय मुरगाळला?" मग आवाज जास्तच हळू करून तो सांगू लागला, "तो कुठल्या तरी दलात-बिलात पण जात असतो असं कळलंय मला. माझं ऐका, काही दिवस त्याला बाहेरगावी पाठवून द्या. इथं पकडलं जायची भीतीय!"

लाला लक्ष्मीनारायणचे कान एकदम तत्पर झाले, पण आपल्या भीतीचं प्रदर्शन त्यांनी होऊ दिलं नाहीः

"अरे, पंधरा वर्षांचं तर पोरगं आहे. ते काय भाग घेणार?"

पण त्यांना अगदी आतून हा उपाय आवडला. रणवीरला काही दिवसांसाठी

बाहेरगावी पाठवणं ही चांगली गोष्ट आहे.

कॉलेजचे दोन चपरासी गेटजवळच एका बाकावर बसून गप्पा मारत होते. एकजण दुसऱ्याला म्हणत होता, "आपण अडाणी लोकच भांडत असतो. समजूतदार, खानदानी लोक भांडत नाहीत. इथं सगळेच आलेत, हिंदू, शीख, मुसलमान सगळेच. पण कसे गोडीगुलाबीनं, प्रेमानं बोलताहेत एकमेकाशी..."

राजकारणातले बहुतेक सगळेच आले होते, बक्षीजींची वाट बघत असावेत. सगळ्या स्थानिक पुढाऱ्यांना देवदत्तनं घरोघर जाऊन बोलावून आणलं होतं. तो मीटिंगला आला होता. काँग्रेस आणि मुस्लिम लीगच्या सगळ्या नेत्यांना एका जागी आणण्यात आपण पुन्हा एकदा यशस्वी झालो आहोत या विचारानं तो आनंदित झाला होता. त्याला चांगलीच व्यावहारिक समज होती. ही मीटिंग सुरू होण्यापूर्वी या मीटिंगच्या अध्यक्षपदासाठी त्यानं कॉलेजचे प्रिन्सिपल ल्यूकस साहेबांचं नाव सुचवलं होतं. ल्यूकस अमेरिकन होते, वयोवृद्ध होते, शहरातल्या मुलांच्या तीन पिढ्यांना त्यांनी शिकवलं होतं, इंग्रज नव्हते, आणि हिंदू वा मुसलमानही नव्हते. टाळ्यांच्या कडकडाटात ते अध्यक्षाच्या खुर्चीत येऊन बसले. सगळेजण व्हरांड्यातून येऊन हॉलमध्ये बसू लागले होते. त्याच वेळी मुस्लिम लीगचा एक तरुण कार्यकर्ता आणि एका काँग्रेसवाल्यात चर्चा चालली होती. लीगवाला उसळून उभा राहिलाः

"लेके रहेंगे पाकिस्तान! बक्षीजी, तुम्ही ही फसवणूक सोडून द्या. एकदा तुम्ही मान्य केलंत की काँग्रेस ही हिंदुंची जमातय, हिंदुंचा समूहय, हिंदुंचा पक्षय की मग मी तुम्हाला मिठी मारीन. काँग्रेस मुसलमानांचं नेतृत्व करू शकत नाही!"

दंग्याच्या पूर्वीही हे वाक्य पुन्हा पुन्हा ऐकायला मिळालं होतं. दरम्यान कुठून तरी नारा आलाः "पाकिस्तान - झिंदाबाद!"

लगेचच दहा ठिकाणांवरून आवाज आलेः "गप्प बसा! गप्प बसा!"

ल्यूकस साहेब म्हणू लागले, आपल्याला जमेल तसं आपण सर्वांनी मिळून शहरातलं वातावरण चांगलं ठेवलं पाहिजे असं मला वाटतं. इथं शहरातली सगळीच मोठी मोठी माणसं जमलेली आहेत, त्यांच्या संघटित आवाजाचा फारच चांगला परिणाम होऊ शकतो. मला वाटतं, आपण एक शांतता कमिटी स्थापन करावी, आणि या कमिटीनं प्रत्येक मोहल्ल्यात, प्रत्येक रस्त्यावर, गल्लीगल्लीत शांतता राखण्यासाठी प्रचार करावा. यात सगळ्याच राजकीय प्रतिनिधींचा समावेश असावा. यासाठी मला वाटतं, एखाद्या बसची व्यवस्था होऊ शकली तर त्यावर लाउडस्पीकर-मायक्रोफोन लावला जावा, आणि त्यात काँग्रेस, मुस्लिम लीग आणि सगळ्याच राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी जागोजागी फिरून शांततेचं आवाहन करावं."

टाळ्यांच्या कडकडाटानं या प्रस्तावाचं स्वागत केलं गेलं.

अचानक एक सभ्यगृहस्थ उठून उभे राहिले. तो शहानवाझ होताः

"बसची व्यवस्था मी करीन!"

पुन्हा टाळ्यांचा कडकडाट. देवदत्तनं समोर येऊन सांगितलंः "बसची व्यवस्था सरकारकडून झालेली आहे असं आम्हाला कळलंय."

पुन्हा एकदा टाळ्यांचा कडकडाट झाला. शहानवाझ अजून उभाच होता, 'पेट्रोलचा सगळा खर्च मी देईन!"

"उत्तम, उत्तम, वाहवा!"

यावर एका सद्गृहस्थानं उठून सांगितलं, "मित्रहो, प्रोग्रॅम नक्की करण्यापूर्वी एक नियमित शांतता कमिटी स्थापन करणं उचित होईल, त्यासाठी सदस्यांची नेमणूक करावी, आणि मग काम सुरू करावं असं मी सुचवू इच्छितो."

इथंही निवडणुकीची भानगड उपस्थित झाली. यावर लगेचच पुढं होऊन देवदत्तनं सांगितलं, "या कमिटीवर तीन व्हाईस-प्रेसिडेंट्स असावेत अशी माझी सूचना आहे. मी जनाब हयातबख्श..."

"थांबा! व्हाईस-प्रेसिडेंट्स तीनच असावेत की कमी-जास्त असावेत हे आधी ठरवा. माझं असं मत आहे की व्हाईस-प्रेसिडेंट्स पाच असावेत. जितके जास्त व्हाईस-प्रेसिडेंट्स असतील तितकी शांतता-कमिटी अधिक प्रातिनिधिक बनेल."

यावर एक सरदारजी म्हणाले, "मी अशी नम्र विनंती करू इच्छितो की व्हाईस-प्रेसिडेंट्स तीनच असावेत, एक हिंदू, एक मुसलमान, एक शीख. कार्यकारिणीला आपण कितीही मोठं करू शकता आणि त्यात प्रतिनिधित्व देऊ शकता."

"इथं हिंदू-मुसलमानांचा प्रश्न आणू नये, ही शांतता कमिटी आहे," देवदत्त पुन्हा सांगू लागला, "मी अशी विनंती करतो की सर्व राजकीय पक्षांच्या लोकांनी कमिटीत सामील व्हावं. माझं मत आहे की मुस्लिम लीगतर्फे जनाब हयातबख्श साहेब, काँग्रेसच्या वतीनं बक्षीजी आणि गुरुद्वारा प्रबंध कमिटीच्या वतीनं भाई जोधसिंह व्हाईस-प्रेसिडेंट्स म्हणून नियुक्त केले जावेत."

एक सज्जन उठून उभे राहिले, "जर राजकीय पक्षांचे प्रतिनिधी नियुक्त करायचे असतील तर तिन्ही पक्षांचे अध्यक्ष निवडले जावेत. त्यांची नावं घेण्याची गरज नाही."

लाला लक्ष्मीनारायण उठून म्हणाले, "मला अतिशय खेद होतोय की आपण तिन्ही राजकीय पक्षांची नावं घेतलीत, पण हिंदू सभेला पूर्ण विसरलात. हिंदू सभा

हा राजकीय पक्ष नाहीय का?"

"नाही-नाही, तो राजकीय पक्ष नाहीय."

"जर तो राजकीय पक्ष नसेल तर गुरुद्वारा प्रबंधक कमिटीही राजकीय पक्ष नाहीय."

पाच-सात जण एकदम उठून उभे राहिले, "हा शीख जनतेचा अपमानय. गुरुद्वारा प्रबंधक कमिटीच शीखांचं प्रतिनिधित्व करते."

देवदत्त पुन्हा झटकन पुढे झाला, "लोकहो, अशा रीतीनं आम्हाला काहीही काम करणं शक्य होणार नाही. जातीयवादाच्या मूलतत्त्वांच्या विरोधातच आपल्याला लढायचं आहे. कुणाकुणाला प्रतिनिधित्व मिळालंय हे महत्त्वाचं नाहीय, महत्त्वाचं हे आहे की शांतता समिती ही सर्व जातीजमातींची मिळून एक एकसंध संघटना व्हावी, म्हणजे मगच आम्ही हिंदू-मुस्लिम-शीख-ख्रिस्ती मिळून एका प्लॅटफॉर्मवरून शांततेचं आवाहन करू शकू. ही गोष्ट लक्षात ठेवूनच जनाब हयातबख्श, बक्षीजी आणि ग्यानी जोधसिंहजी यांना शांतता कमिटीचे व्हाईस-प्रेसिडेंट्स म्हणून नियुक्त करण्यात यावं असं मी मांडू इच्छितो.

"मान्यय, ठीकय, पुढं चला," एक आवाज आला. त्यावर कुणीतरी टाळ्या वाजवल्या आणि मग बऱ्याच लोकांनी मिळून टाळ्या वाजवल्या आणि या प्रस्तावावर विरुद्ध बोलणाऱ्यांना बोलायची संधीच मिळाली नाही. प्रस्ताव असा एकमतानं पास झाला.

यावर मास्टर रामदासनं उठून सांगितलं, "जनरल सेक्रेटरी म्हणून मी कॉम्रेड देवदत्तचं नाव सुचवू इच्छितो. एक तर ते खूप अविश्रांत परिश्रम करू शकतात. त्यांच्याच प्रयत्नांमुळे आपण आज इथं एकत्र जमलो आहोत. येता काही काळ फार नाजूक असेल. शांतता समितीला फार सावधपणे आणि परिश्रमपूर्वक काम करावं लागणार आहे. या कामासाठी कॉम्रेड देवदत्त फार योग्यतेची व्यक्ती आहे..."

"शहरातले सगळे तरुण मेले का?" मनोहरलाल आजही एका भिंतीला टेकून छातीवर हात बांधून मागे उभा होता, तो पुढे म्हणू लागला, "मी विचारतो की सरकारचं शेपूट धरणारे, गद्दार देशद्रोही कम्युनिस्टच या कामासाठी उरलेत की काय? बाकी सगळे तरुण मेलेत? ही निवड म्हणजे ढोंगय. मी या मीटिंगमधून वॉक आऊट करतो."

आणि तो वळून हॉलच्या बाहेर जाऊ लागला.

"थांब यार, मनोहरलाल, एखादं काम तरी होऊ देत जा."

मनोहरलाल अजूनही संतापलेलाच होता, "जाऊ दे यार, फार पाहिलेत आम्ही. मनोहरलाल तोंडावर बोलत असतो. अरे, तो आपल्या बापालासुद्धा घाबरत नाही..."

पण काँग्रेसच्या काही तरुण युवकांनी त्याला थांबून ठेवलं. एक माणूस त्याच्या कमरेत हात घालून त्याला मीटिंगमध्ये परत घेऊन आला.

"सगळे सरकारचे पिट्टे जमा झालेत. मी सगळ्यांना ओळखतो..."

"खामोष! गप्प बसा!"

"मी कॉम्रेड देवदत्तचं नाव सुचवतो."

"मी त्या नावाला अनुमोदन देतो."

टाळ्यांचा कडकडाट. कामकाज पुन्हा खेळीमेळीनं चालू लागलं होतं. पण कार्यकारिणी सदस्यांची निवड करताना सगळ्याच प्रकारच्या नावांची सूचना येऊ लागली. लक्ष्मीनारायण मरयादास, शहानवाझ... तेव्हा अनेक मुस्लिम सदस्य एकाच वेळी उभे राहिले आणि दाराकडे जाऊ लागले. पुढे पुढे मौलाबख्श चालला होता. तो म्हणाला:

"या कमिटीत हिंदुंची संख्या जास्त आहे. आम्ही या कमिटीत सामील होऊ इच्छित नाही. ही सगळी हिंदुंची हातचलाखी आहे हे आम्हाला आधीच माहीत होतं."

देवदत्तसह दहा जण त्यांना थांबवण्यासाठी गेले. दाराजवळ खूप वेळ नाटक चालू होतं. शेवटी एका फॉर्म्युल्याच्या आधारावर कार्यकारिणी निवडायचा निर्णय घेण्यात आला- कार्यकारिणीत एकून पंधरा सदस्य असतील, सात मुसलमान, पाच हिंदू आणि तीन शीख. खूप वेळ चर्चा झाली, लोकांना चर्चेमुळे भयंकर कंटाळा आला होता, लोक थकून गेले होते, पण शेवटी हा फॉर्म्युला मंजूर झाला, आणि त्यात लाला लक्ष्मीनारायणही सामील झाले, शहानवाझही आणि आणखीही किती तरी. बिचाऱ्या श्यामलालचं नाव कुणीही घेतलं नाही. खूप वेळ तो आकडेवाल्या कारकुनाचा कोट ओढत होता, पण आकडेवाल्यानं टाळलं, शेवटी श्यामलाल स्वतःच उठून उभे राहिले:

"मलाही या कमिटीत सहभागी करून घेऊन सेवा करण्याची संधी देण्यात यावी असं मी सुचवू इच्छितो."

"जागा भरल्या गेल्यात, खाली बसा!" मंगलसेन म्हणाला. मग एक सद्गृहस्थ उठले:

"मला वाटतं, काही हरकत नाही. कमिटीत एक हिंदू, एक मुसलमान, एक शीख वाढवावा."

"हे शक्य नाही. अशा तऱ्हेनं तुम्ही किती लोकांना सामील करून घेणार आहात?"

अजून हा तिढा सुटलाही नव्हता. तेवढ्यात बाहेरून हॉर्न वाजवल्याचा

आवाज आला. देवदत्तनं अध्यक्षाच्या खुर्चीजवळ जाऊन सांगितलं, "सर, शांतता कमिटीची बस आलीय. आपण आपल्या पहिल्या फेरीला इथूनच सुरुवात करू. त्यात प्रेसिडेंट आणि त्यांच्याशिवाय जितके लोक येऊ शकतील त्या सर्वांनीच चलावं. बसमध्ये लाऊडस्पीकर लावण्यात आला आहे. बस जागोजागी थांबत जाईल आणि आळीपाळीनं बुजुर्ग लोक लोकांना शांतता राखण्यासाठी सांगतील."

लोक उभे राहिले आणि उठून बाहेर येऊ लागले. गुलाबी आणि पांढरी बाजू असलेली बस होती, शांतीची बस! समोर टपावर दोन्ही कोपऱ्यात काँग्रेस आणि मुस्लिम लीगचे झेंडे लावलेले होते. लाऊडस्पीकरचा एक भोंगा पुढे आणि एक मागे लावण्यात आला होता.

"यावर युनियन जॅकचाही झेंडा लावायला पाहिजे," मनोहरलालनं उपहासानं म्हटलं.

लोक बाहेर येताच बसमधून नारे ऐकू येऊ लागले.

"हिंदू-मुस्लिम--एक असो!"

"हिंदू-मुस्लिम एकजूट-जिंदाबाद!"

"शांतता समिती-जिन्दाबाद!"

लोकांनी आत डोकावून डोकावून बघितलं, हा कोण माणूसय? आधीच बसमध्ये जाऊन बसणारा आणि लाऊडस्पीकरवरून घोषणा देणारा? ड्रायव्हरच्या सीटशेजारी एक माणूस हातात मायक्रोफोन घेऊन बसलाय. खूप लोकांनी त्याला ओळखलंच नाही. काहींनी ओळखलं. नत्थू मेलेला होता, नत्थू जर इथं असता तर त्याला ओळखायला वेळ लागला नसता. तो मुरादअली होता. काळा चेहरा, बारीक टोकदार मिश्यावाला मुरादअली. त्याची बारीक छडी त्याच्या पायांजवळ पडलेली होती, बारीक बारीक डोळे आजूबाजूला फिरत होते, आणि लाऊडस्पीकरमधून नारे घुमू लागले होते.

शांतता -मोहिमेवर निघण्यापूर्वी छोटीशी चर्चा झाली. कुणी कोणत्या सीटवर बसायचं, पुढे कुणी बसायचं, मागे कुणी बसायचं आणि आधी कुणी बोलायचं आणि कुणी कुणी घोषणा द्यायच्या.

पुढे मागे नाही, ड्रायव्हरच्या सीटच्या मागं मुस्लिम लीग आणि काँग्रेसच्या अध्यक्षांनी आजूबाजूलाच बसायचं.

काही वेळ गोंधळ चालू राहिला, बस खच्चून भरली होती, कारण काही लोकांना रस्त्यात उतरून आपल्या घरी जायचं होतं. मनोहरलाल शेवटपर्यंत चिडलेलाच होता, "या बसमध्ये एक तर मी बसेन नाहीतर कम्युनिस्ट बसेल. मी देशाशी गद्दारी करणाऱ्यासोबत कधीही बसू शकत नाही."

बसच्या पायरीवर उभ्या असलेल्या देवदत्तनं म्हटलं, "मनोहरलाल साहेब, आम्ही काही पडद्यामागे बोलत नसतो. आम्ही काँग्रेसचं शेपूट नाहीत, आम्ही धंदेवाईक क्रांतिकारक आहोत. शहरात शांतता प्रस्थापित करणं आवश्यकय, आणि त्यासाठी सगळ्या पक्षांच्या नेत्यांनाही एकत्र आणणं आवश्यकय. आपल्या पक्षाचा नेताही आपण आहात आणि जनताही आपण एकटेच आहात. हे सरकारी इच्छेनुसार चाललय् हे आम्हालाही माहीतय. पण या वेळी शहरात शांततेसाठी एका प्लॅटफॉर्मवर येणं आवश्यकय."

"शांतता आता काय करणार?" मनोहरलाल चिडून म्हणाला, "शांतता तर तुमच्या साहेबानंच प्रस्थापित केलीय. दंगे घडवून आणल्यावर आता शांतता घडवून आणलीय."

श्यामलाल व्हरांड्यात उभा राहून आपल्या उमेदवारीची चर्चा एकेकाशी करू लागला. या दरम्यान मंगलसेन उडी मारून बसमध्ये जाऊन बसला. नुस्ता बसलाच नाही, तर बरीच पुढची सीटही मिळवली. अचानक त्याच्यावर नजर पडताच श्यामलाल रागाने लाल झाला आणि पळत पळतच पुढे निघून गेला, "मला कुणीच सांगत नाहीत! मला कुणीच सांगत नाहीत!" आणि लोकांना ढकलत ढकलत, धापा टाकत बसमध्ये चढला.

मुस्लिम लीगच्या अध्यक्षासोबत बसलेले बक्षीजी समोर बघत होते, पण खोल विषण्णतेत बुडालेले होते. 'घारी उडतील, अजूनही घारी उडतील,' त्यांनी मनातल्या मनात म्हटलं.

त्याचवेळी ड्रायव्हरच्या शेजारच्या सीटवर बसलेल्या मुरादअलीनं पुन्हा नारे लावायला सुरुवात केली आणि आसमंतात घुमणाऱ्या घोषणांच्या मध्ये शांततेची बस आपल्या शांतता-मोहिमेवर निघाली.

बंगल्यातल्या भोजनकक्षातील मुलायम प्रकाशात टेबलाच्या दोन्ही बाजूंना बसलेले रिचर्ड आणि लीझा आपल्या भावी कार्यक्रमाबद्दल विचार करीत होते. लीझा पुन्हा सावरली होती. रिचर्डलाही आज जास्त काम नव्हतं. शहरातलं जीवन पुन्हा पूर्वपदावर येऊ लागलं होतं. खालच्या अधिकाऱ्यांनी काम सांभाळून घेतलं होतं.

"तशी तर माझी अजून काही दिवस इथं रहायची इच्छा होती. तक्षशिलेच्या म्युझियममध्ये थोडं काम करायचं होतं. इथल्या लोकांचा अजून अभ्यास करायचा होता. पण इथं आता जास्त दिवस राहणं होणार नाही."

लीझाला ही बातमी ऐकून, मनातल्या मनात आनंद झाला: "तर तुझी

बदली होणारय? तुला बढती मिळणारय?" रिचर्ड गालातल्या गालात हसला. काहीच बोलला नाही.

"तू सांगत कां नाहीस? खरोखरच तुला बढती मिळणारय का?"

"बढतीचं काही नाही, लीझा, ज्या ठिकाणी दंगेधोपे होतात तिथून सरकार सामान्यतः अधिकाऱ्यांच्या बदल्या करून टाकतं. नवीन अधिकारी येतात..."

"लवकरच जावं लागणारय का?"

"बहुतेक! मला नक्की काही माहीत नाही."

"पण तुला तर इथं राहायची इच्छा होती ना? तक्षशिला म्युझियममध्ये काम करायची तुझी इच्छा होती, तुला एक पुस्तक लिहायचं होतं..."

रिचर्डनं खांदे उडवले. मग त्यानं पाइप पेटवला आणि टेबलाखाली पाय लांब करून मस्करी करायच्या मूडमध्ये मंदस्मित करून तो म्हणाला, "कुठून सुरू करू?"

"काय? कुठून सुरु करू म्हणजे?" लीझानं भुवया उंचावल्या, आणि विचारलं.

"तुला इथं काय काय घडलंय ते हेच माहीत करून घ्यायचं होतं ना?"

यावेळी लीझानं खांदे उडवले. सांग किंवा सांगू नकोस, काही विशेष फरक पडणार नाही, असंच तिला म्हणायचं असावं.